म. ग्रं. सं. ठाणे
विषय
सं. क्र.



REFBK-0016049

भारत
गौरव
ग्रंथमाला



# भास्करबुवा बखले


लेखक
नीळकंठ महादेव केळकर

कर्नाटक प्रकाशन संस्था, मुंबई २

मूल्य पंचवीस रुपये

## ‘अब किसको गाना सुनावूं ?’

असा विलाप ज्यांच्या निधना-
नंतर अल्लादियां खां ह्यांनीं
केला, ‘ हिंदुस्थाननें एकच
गवई निर्माण केला आणि
तो म्हणजे आमचा भाऊ
भास्करबुवा ’ असे उद्गार
ज्यांच्याबद्दल देवासवाले
रजब अलीखां ह्यांनीं काढले,
त्या भास्करबुवा बखल्यांनीं
गानदेवतेला प्रसन्न करून घेण्यासाठीं
केलेली खडतर तपश्चर्या,
सिद्धि मिळाल्यानंतर त्यांनीं
अखिल भारतवर्षांत गाजवलेला
दिग्विजय, त्यांचें निर्मळ
चारित्र्य, संगीताच्या प्रसारा-
साठीं त्यांनीं स्थापिलेल्या
संस्था, ह्या सर्वांचा आलेख
चित्रकार नी. म. केळकर
ह्यांनीं ह्या चरित्रग्रंथांत
काढलेला आहे. प्रेम, आदर
आणि आस्था ह्यांचा प्रत्यय
पानापानांतून देणारें हें चरित्र
तितकेंच अधिकृतही आहे.



धर्म - नीति

चरित्र

१४५२ २८७६९

भारत
गौरव
ग्रंथमाला



# भास्करबुवा बखले

लेखक
नीळकंठ महादेव केळकर

ठाणे
ग्रं. क्र. १६०५४
(स्थळ प्रत)

REFBK-0016049

न संस्था, मुंबई २

मूल्य पंचवीस रुपये

© नीळकंठ महादेव केळकर

पहिली आवृत्ति
२१ ऑक्टोबर, १९६७

मुद्रक : व. बा. खळे
जय गुजरात प्रिंटिंग प्रेस
गांवदेवी, मुंबई ७

प्रकाशक : बा. ग. ढवळे
कर्नाटक प्रकाशन संस्था
चिराबाजार, मुंबई २

प्रकरणांचा

# अनुक्रम


पुरस्कार १

हितगूज २४

प्रास्ताविक आणि ऋणनिर्देश ३२

भूमिका

बालपण ४९

नाटक-मंडळींत ५८

नाटक-मंडळींत : २ ६९

अभिजात गायकीच्या जंगलांत :

गुरुकुल ८१

तपस्या ९१

गुरु-कुलांतील आठवणी १०७

मुंबईचें स्वागत   १२१
विद्यार्थी व धंदेवाईक   १२९
दुसरे गुरु : नथ्थनखां   १३६
मुंबईंत पुनरागमन   १४४
पुढचें पाऊल   १४८
महाराष्ट्राबाहेर लौकिक   १५६
धारवाडला सरकारी नोकरीवर   १६२
विदेही कलावंत   १७२
‘ किर्लोस्कर भारत गायन समाज ’   १८१
बुवांचे शिष्य   १९३
शिक्षण-पद्धति   २०७
शास्त्र-ज्ञान   २१२
सुगम-संगीत   २१९
भाग्यकाळ   २३०
नाट्यसृष्टींतलें अखेरचें कार्य   २३९
संयुक्त ‘ मानापमान ’   २४२
अखेरच्या दोन मैफली   २४८
अखेर   २५४
उपसंहार   २६१

परिशिष्टें

१. थोरांचे उद्गार   २६५
२. ‘ ट्रिनिटी क्लब ’   ३५०
३. भास्करबुवांचा लेख   ३५२

सूचि   ३६१

बुवांच्या
चरित्राचे
प्रेरक
श्री. माधवराव
धामणकर
ह्यांस....



श्री. माधवराव धामणकर
बुवांचे जामात



सौ. येसूताई धामणकर
बुवांच्या द्वितीय कन्या

## बुवांचे कुटुंबीय



सौ. शांताताई जेमिनीस
बुवांच्या तृतीय कन्या



नानासाहेब जोगळेकरांची मुलगी पत्नी

बुवांच्या पत्नी

बुवांची ज्येष्ठ कन्या माई

बुवांच्या चतुर्थ कन्या सौ. प्रमिला दातार

बुवांच्या पत्नी

बुवांचा नातू सुहास दातार





बीनकार बंदेअलीखां
सूक्ष्म स्वरांची जाणीव

# बुवांचे एकंदर गुरु सात

ह्या तिघांचीं
छायाचित्रें
मिळालीं.
चौघांचीं
मिळालीं नाहींत ते
पिंगळेबुवा
मौलाबक्ष
नाटेकर
फैजमहंमद



आग्रेवाले नथ्थनखां
खेळकर लयकारी



जयपूरवाले अलादियाखां
अप्रतिम, कूट गायकी



दोन पेटीवाले
आणि
एक गायक

गुंडोबा वालावलकर — नारायणराव राजहंस — गणपतबुवा पुरोहित

# बुवांचा शिष्यपरिवार

ताराबाई शिरोडकर



'ताराबाईनें गाणें सोडलें नसतें, तर आम्हां कोणालाही गाण्यांत मानाचें स्थान मिळणें कठीण होतें.'
— सूरश्री केसरबाई



बालगंधर्व
बुवांनीं पैलू पाडलेला हिरा



बापूराव केतकर
बुवांचें वळण टिकवणारे



मास्तर कृष्णराव
स्वतंत्र प्रतिभेचे गवई



चिंतोबा गुरव
' शारदे ' तले ' श्रीमंत '



दिलीपचंद्र वेदी
महामहोपाध्याय, कीर्तनकार, पेटीवादक




पित्रे वकील
कर्नाटकांतील गायनाचें तीर्थक्षेत्र




मणेरीकर मास्तर
ड्रॉइंगमास्तर – बुवांशीं तादात्म्य



दातार मास्तर
' भारत गायन समाज ' हेंच ध्येय



गायनाइतकेंच
अक्षरही
रेखीव ....




बाळकृष्णबुवा इचलकरंजीकर
ख्याल गायकीचे आद्य आचार्य

महाराष्ट्राची
गायनाभिरुचि
वाढविणारे
बुवांचे
समकालीन



भूगंधर्व रहिमतखां
अशी ' फिरत ' झाली नाहीं



पंडित रामकृष्णबुवा वझे
भरणेदार थोर गवई



पंडित विष्णु दिगंबर
कलेचा इभ्रतीनें प्रसार




अबदुल करीमखां
' किराणा ' घराणें



अष्टेकरबुवा
ह्यांनीं बुवांना सांभाळलें



नथ्थनखांपुत्र अब्दुल्ला
बुवांनीं ह्यांना सांभाळलें



स्त्रीभूमिका
किर्लोस्कर
कंपनी
१८८५



बालनट : १८८६

१८८६ त
नाटक
मंडळी
सोडून
१८९६ त
भास्करचे
भास्करबुवा
झाले.



## बुवांचें विविध दर्शन



१९०१ – २ चा सुमार

१९०७

१९०५





मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे स्थापना
वि: ................
अनुक्रम
क्रमांक ........................ नों. दि: ..............



१९०८



१९१५

१९०४ : गंधे ह्यांच्या मळ्यावर ' किर्लोस्कर कंपनी ' तील प्रमुख नट





१९१६

१९२० : शिकारपूर





१९१६



१९२०

हें
दर्शन
आणि
गायन
पुन्हा
केव्हां
होईल ?

# पुरस्कार

प्रस्तुत पुरस्कार लिहायला माझे मित्र श्री. नी. म. केळकर ह्यांनीं मला सांगितलें, तेव्हां मीं त्यांना तत्काळ होकार दिला. कारण ह्या पुरस्काराच्या निमित्तानें एका अद्वितीय कलाकाराच्या स्मृतीस अभिवादन करण्याची संधिच ते मला देत होते.

कै. पं. भास्करबुवा बखले ह्यांचें देहावसान झाल्याला आज पंचेचाळिसांवर वर्षें होऊन गेलीं. १९२० सालीं मीं तेरा वर्षांचा असतांना त्यांचीं दोन गाणीं ऐकलीं होतीं. पहिल्या गाण्याच्या वेळीं पुण्याला रास्त्यांच्या वाड्यांत असलेल्या ‘ पूना गायन समाजा ’त कोणा साहेबाच्या भेटीनिमित्त कांहीं समारंभ होता. मध्यें खुर्च्यांवर सर्व प्रतिष्ठित मंडळी बसली होती. भिंतीलगतच्या एका बाकावर मी अंग चोरून बसलों होतों आणि भास्करबुवा येऊन माझ्या शेजारीं त्याच बाकावर बसल्यामुळें मी अधिकच संकोचून गेलों होतों. पण थोड्याच वेळांत बुवांनीं स्टेजवर जाऊन गायलाच सुरुवात केली. जातांना माझ्या अंगाला झालेला त्यांच्या जरीच्या उपरण्याचा स्पर्शमात्र आठवणीच्या

देव्हाऱ्यांत मीं गेलीं पंचेचाळिसांवर वर्षें जपून ठेवला आहे. तें वीस मिनिटांचें गाणें साहेबाला किती समजलें देव जाणे! पण तो खूष झाल्याचें दिसलें. भास्करबुवांचें गाणें आणि गाण्याच्या वेळचें उत्फुल्ल दर्शनच असें होतें, कीं कोणींही आल्हादित व्हावें आणि मलाही असेंच वाटत आलें आहे, कीं परकीयांना आपलें गाणें ऐकवायचें झालें तर त्याची मांडणी बुवांच्या मांडणी सारखीच चतुर आणि दर्शन त्यांच्यासारखेंच विलोभनीय हवें. त्यानंतर असा कोणी गायक दिसला नाहीं, ही गोष्ट वेगळी.

दुसऱ्या गाण्याची आठवण तर ह्याहीपेक्षां खोल आहे. गाणें रात्रीचें होतें आणि तंत्रोऱ्यावर एका बाजूला बालगंधर्व, दुसऱ्या बाजूला मास्तर कृष्णराव आणि पेटीला गोविंदराव टेंबे होते. बालगंधर्व बिचारे नुसतेच तंबोरा वाजवीत होते आणि मैफलभर त्यांनीं तोंडही उघडलें नाहीं. वीस-एकवीस वर्षांचे मास्तर कृष्णराव अर्थातच मधून-मधून गाऊन बुवांची साथ करीत होते. पण माझ्या मनावर कायमचा असर झाला तो बुवांच्या गायनानें आणि गोविंदरावांच्या पेटीच्या साथीनें. बुवांची उपज गेली म्हणजे गोविंदराव ती लक्षपूर्वक ऐकत व लगेच पुढच्या आवर्तनांत स्वतः ती त्याच डौलानें काढीत; अथवा दुसरी एखादी त्याच जातीची उपज घेत. त्यामुळें बुवांचीही स्फूर्ति जागृत होई आणि मग ते आधींच्यापेक्षांही सरस उपज घेत. एकमेकांच्या कलात्मकतेला डिवचून चाललेल्या ह्या गाण्यामुळें श्रोत्यांच्या उत्साहाला उधाण येई आणि प्रत्येक समेला त्यांची दाद त्यांच्या हेलावलेल्या अंतर्मनांतूनच येई. बुवांची आणि गोविंदरावांची पेटीवर काढलेलीं, अशीं आलटून-पालटून आलेलीं आवर्तनें हें त्या रात्रीच्या बैठकीचें वैशिष्ट्य होतें. हें सारें दृश्य आज आठवलें, म्हणजे तसें त्यानंतर कधीं पाहायला मिळालें नाहीं व पुढेंही मिळणार नाहीं, म्हणून हळहळ वाटते. अजाण वयांतल्या ह्या गाण्यानें माझ्यावर झालेला संस्कार हा माझ्या आयुष्यांतल्या कांहीं अत्यंत उत्कट प्रसंगांपैकीं एक म्हणून मी सतत इतकीं वर्षें मनांत वागवीत आलों आहें.

आणखी महत्त्वाची गोष्ट अशी, कीं एवढ्या प्रदीर्घ अवधींत कोणाही गायकाकडून बुवांच्या गायकीविषयीं, कलात्मकतेविषयीं, अगर चारित्र्या-

विषयीं एकही टीकात्मक किंवा उणादुणा उद्गार कधीं माझ्या कानांवर आला नाहीं. उलट महनीय कलाकारांच्या तोंडूनही ज्या-ज्या वेळीं बुवांचा उल्लेख होई, त्या-त्या सर्व वेळीं त्यांच्याविषयींचा पराकोटीचा आदर वा प्रेमभावच व्यक्त केला जाई. ज्या महनीय व्यक्तींकडून असे उल्लेख मीं प्रत्यक्ष ऐकले, त्यांत कै. गोविंदराव टेंबे, श्री. बालगंधर्व, मास्तर कृष्णराव, वगैरे बुवांचे शिष्य तर होतेच, पण पै. वासी मंजीखांसाहेब, कै. वझेबुवा, कै. रामभाऊ सवाई गंधर्व, विलायतखांसाहेब आग्रेवाले, असे निरनिराळ्या प्रणालीचेही कलाकार होते. ह्या सर्व गोष्टींमुळें बुवांच्या ऐकलेल्या पहिल्या गाण्यापासून वाटत असलेल्या आदराचें आज इतकीं वर्षें सतत पोषणच होत आलें आहे. अर्थातच पुरस्काररूपानें आदरांजलि वाहाण्याची ही संधि मी दवडीन, हें शक्य नव्हतें.

हें चरित्र भास्करबुवांच्या मृत्यूनंतर पंचेचाळीस वर्षांनीं प्रसिद्ध होत आहे. बुवांचे जामात, माझे मित्र श्री. धामणकर ह्यांनीं अनेक लोकांना भेटून, अनेक ठिकाणीं जाऊन आणि आठवणी व इतर माहिती जमा केल्यासही आज बाविसांवर वर्षें होऊन गेलीं. इतकीं वर्षें हें काम अशा रीतीनें रेंगाळत पडावें, हें मला स्वतःला आणि माझ्यासारख्या संगीतावर लेखन करणाऱ्यांना अर्थातच भूषणावह नाहीं. त्या दृष्टीनें श्री. केळकर ह्यांनीं हें महनीय कार्य अंगावर घेऊन यशस्वी रीतीनें पुरें पाडल्यामुळें मला व्यक्तिशः उपकृत झाल्यासारखें वाटत आहे हें तर खरेंच, पण त्याबरोबरच त्यांनीं संगीत-विषयक वाङ्मयांतील एक अतिशय महत्त्वाची अशी उणीव भरून काढली आहे, ह्याबद्दलही त्यांचे गायक-वर्गातर्फें आभार मानले पाहिजेत.

संगीत-विषयक वाङ्मय आधीं एकूण कमीच. त्यांतून गायकांचीं चरित्रें हा भाग तर अगदीं हाताच्या बोटांवर मोजण्याइतकासुद्धा नाहीं. ह्या हिंदुस्थानांत मियां तानसेनपासून तों आजतागायत एवढे महान्-महान् गायक होऊन गेले, कीं ज्यांच्या स्मृति चालू घडीपर्यंत वंदनीय म्हणूनच समजल्या जातात. पण ग्रंथ-रूपानें चरित्र लिहिण्याची आपल्याकडे प्रथाच नव्हती. मराठींतसुद्धां गायकांचे चरित्र-ग्रंथ अवघे तीनच. एक कै. इंगळे-बुवांनीं लिहिलेलें कै. बाळकृष्णबुवा इचलकरंजीकरांचें, दुसरें श्री. विनायकराव

पटवर्धन ह्यांनीं लिहिलेलें पं. विष्णु दिगंबर पलुस्करांचें आणि तिसरें कै. गोविंदराव टेंबे ह्यांनीं लिहिलेलें म. अल्लादियाखांसाहेबांचें. ह्यांखेरीज भाऊराव कोल्हटकर, बालगंधर्व, मास्टर दीनानाथ, वगैरेंचीं चरित्रें उपलब्ध आहेत, पण तीं ते ते चरित्र-नायक नट आणि नाट्य-संगीताचे उपासक होते म्हणून. अभिजात संगीतांतील चरित्र-ग्रंथांतील हें दुर्भिक्ष्य विषाद वाटण्यासारखें आहे, पण त्याला जाणकार लेखकांमध्येंसुद्धा असणारी एक समजूत जबाबदार आहे. ती म्हणजे गायकांचें चरित्र तें काय लिहायचें ? आणि ग्रंथ रूपानें लिहिण्यासारखें त्यांत असतें तरी काय ? लहानपणीं गुरुगृहीं अपमान आणि कष्ट सोसले; गुरुपत्नी बहुधा वाईटच होती; गुरुजी फार विद्वान् आणि अधिकारी होते; चरित्रनायकानें अफाट मेहनत केली; यश, कीर्ति आणि वैभव संपादन केलें; गांवोगांवीं यशस्वी दौरे केले; प्रत्येक ठिकाणीं रंग जमवला आणि श्रोत्यांना खूप केलें; वगैरे सांगितलें, कीं झालें चरित्र. ह्याला पुस्ती म्हणून त्याच्या गायकीचें गुण-वर्णन आणि थोडें-फार परीक्षण घातलें, म्हणजे काम झालें. फार तर एका लेखाचा हा मजकूर पण ही समजूत किती फोल आहे, हें सिद्ध करायला फार लांब जायला नको. प्रस्तुत चरित्र जवळ-जवळ तीनशें पानांचें होऊनही मला स्वतःला तें पुरेसें वाटत नाहीं. आणखी कित्येक गोष्टींची मला जिज्ञासा आहे, पण ती ह्या विस्तृत ग्रंथानेंही भागत नाहीं. उदाहरणार्थ, बुवांचे पहिले गुरुजी फैजमहंमदखांसाहेब ह्यांचे गुरुजी कोण ? त्यांच्याजवळ खांसाहेबांनीं किती वर्षें तालीम घेतली ? त्यांची गायकी ग्वाल्हेर घराण्याची होती, कीं आग्रा वळणाची होती ? बुवांना त्यांनीं कोणते राग शिकवले ? बुवांनीं गंडा बांधला होता कीं नाहीं ? बुवा शिकायला राहिले, त्या वेळीं फैजमहंमद-खांसाहेबांचें वय काय होतें ? त्यांचे इतर शागीर्द कोण ? बुवांनीं स्वतःचा रियाज केव्हां, कोठें, किती वर्षें केला ? रियाजाची पद्धति काय होती आणि त्यांत खर्जाच्या मेहनतीचा भाग असल्यास किती होता ? अशा कितीएक गोष्टी सांगतां येतील. ह्यांतली महत्त्वाची गोष्ट अशी, कीं श्री. धामणकरांनीं दिलेली माहिती घेतल्यानंतरही केळकरांनीं खूप कष्ट घेतले. पण बुवांच्या लहानपणींची माहिती देणारे आज इतक्या वर्षांनंतर कोणी हयात नाहींत,

त्याला धामणकरांनीं अगर केळकरांनीं तरी काय करावें ? सांगायचा मुद्दा असा, कीं इतकें तपशीलवार, विस्तृत आणि संगतवार चरित्र लिहिलें, तरीही माझ्यासारखा एखादा म्हणतो, कीं त्यांत आणखी माहिती हवीच होती ! तेव्हां गायकाचें चरित्र एकाच सांच्याचें असतें अथवा त्यांत लिहिण्यासारखा भाग फ़ारसा नसतो, ह्या म्हणण्यांत कांहीं अर्थ नाहीं, हें प्रस्तुत ग्रंथ वाचून कोणालाही पटेल.

आणखी माहिती हवी होती, ह्याची केळकरांनाही जाणीव आहे. ह्या बाबतींत त्यांनीं स्वतःची भूमिका सांगितली आहे ती अशी : "बुवांच्या जीवनांतील कित्येक कालखंडांची व घटनांची परंपरा अज्ञात व अस्पष्ट आहे, ती तशीच राहूं द्यावी. कारण चुकीच्या माहितीच्या आधारावर चुकीचीं विधानें होऊं नयेत, ह्या गोष्टीचा मीं कसोशीनें प्रयत्न केला आहे." ह्यापेक्षां अधिक समंजसपणाची व स्वतःवरच्या जबाबदारीची जाणीव ठेवणारी भूमिका काय असूं शकेल ?

बुवांच्या चरित्राला श्री. केळकर ह्यांच्यासारखा चतुरस्र चरित्रकार लाभावा हा एक सुयोगच समजला पाहिजे. एक तर 'आर्टिस्ट' आणि 'पोर्ट्रेट पेंटर' म्हणून केळकरांचें यश फार मोठें आहे. ते चित्रकार-परिषदेचे आणि 'आर्ट्स् सोसायटी'चे भूतपूर्व अध्यक्ष असून, दिल्लीच्या सोसायटीच्या गव्हर्निंग कौन्सिलचेही कित्येक वर्षें सभासद आहेत. त्यांचीं भव्य तैलचित्रें राष्ट्रपति-भवन, संस्थानिकांचे राजवाडे आणि इतरत्र लागलीं आहेत. पण केळकर नुसतेच चित्रकार नाहींत. ते एक अव्वल दर्जाचे वाङ्मय-सेवकही आहेत. त्यांनीं कथा-कादंबऱ्या पुष्कळ लिहिल्या आहेत आणि कै. डॉ. केतकरांच्या कादंबऱ्यांचें व संशोधन-ग्रंथांचें संपादनही केलें आहे. चित्रकलेच्या व्यासंगाच्या निमित्तानें त्यांनीं नृत्य आणि नाट्य ह्या विषयांतही अवगाहन करून, 'चित्र व शिल्प' हा प्रदीर्घ प्रबंधही लिहिला आहे. इतकें सर्व असूनही त्यांना जर संगीताचा स्पर्श नसता, तर हा चरित्र-ग्रंथ एक 'अव्यापारेषु व्यापार' झाला असता. पण आश्चर्याची गोष्ट अशी, कीं संगीताचेही संस्कार त्यांच्या मनावर लहानपणापासूनच झालेले आहेत आणि तेसुद्धा अशा-तशा गायकांचे नव्हेत, तर खुद्द भास्करबुवांच्याच गाण्याचे. तरुणपणांत

बुवांचीं पुष्कळच गाणीं त्यांनीं ऐकलीं आहेत. बुवांचा सहवासही त्यांना थोडा-फार लाभला आहे. शिवाय बुवांच्या नंतरचीं गाणीं गेलीं चाळीस वर्षें ते ऐकत आलेच आहेत. गाण्यावर मेहनत केलेली नसली, तरी ते रागदारी गुणगुणतात आणि तालांतही त्यांना गति आहे. " हें चरित्र लिहिण्याचं काम खरं म्हणजे माझ्यासारख्याचंच होतं. तें तुम्हीं केलंत हा एक उपकारच झाला. " असें जेव्हां मी त्यांना म्हणालों, त्या वेळीं " कां ? हें काम माझं नव्हतं, असं तुम्ही कां समजतां ! " असें म्हणून माझ्यावर ते रागावलेच ! एकूण गाणाऱ्याचा म्हणून जो एक पीळ असतो, तोही त्यांच्याजवळ आहे. त्यामुळें " मी संगीतांतला नाहीं " ही कल्पनाही त्यांना सहन होत नाहीं. तरी पण प्रत्यक्ष गायक नसल्यामुळें स्वतःविषयीं मनामध्यें ते गौणपणा बाळगतात. " गायन-क्षेत्रांतील मेरुमणि श्री. भास्करबुवा ह्यांचें चरित्र लिहिण्याचें धाष्टर्य मजकडून घडलें, तर लोक खाजगी रीतीनें मला हसतील. माझ्या मर्यादा मी जाणून आहें. " असें जेव्हां ते प्रास्ताविकांत म्हणतात, त्या वेळीं त्यांना आवर्जून सांगावेंसें वाटतें, कीं एखाद्या प्रत्यक्ष गाणाऱ्या माणसानें जरी हें चरित्र लिहिलें असतें, तरी तो त्यांत अधिक कांहीं करूं शकला नसता. उलट नाट्य, शिल्प, चित्र, वाङ्मय, वगैरे इतर कलांच्या व्यासंगानें समृद्ध झालेलें मन त्याला तेथें कार्यान्वित करतां आलें नसतें आणि संगीताच्या विकासाला लागणाऱ्या आर्थिक स्थैर्याच्या पायाविषयीं कांहीं मूलभूत विचार, बुवांच्या आधींची संगीत-विषयक परिस्थिति, तसेंच त्या वेळच्या राजकीय आणि इतर सांस्कृतिक चळवळी, इत्यादींचा आढावा आणि चित्र, शिल्प, वगैरे क्षेत्रांतले जाणतेपणानें दिलेले दाखले, त्यांना देतां आले नसते. म्हणूनच केळकरांच्या ह्या चतुरस्रपणानें, संगीत-विषयक चरित्र-वाङ्मयांत एक मोलाची भर पडत आहे असें म्हणण्यांत, वस्तुस्थितीचेंच दिग्दर्शन मी करीत आहें, असें मला वाटतें.

प्रत्यक्ष गायक नसल्यामुळें केळकरांनीं स्वतःकडे गौणपणा घेतला आहे. पण कदाचित् त्यामुळेंच हा चरित्र-ग्रंथ एका संभाव्य दोषापासून संपूर्णपणें मुक्त राहिला आहे. लेखक गायकच असला, म्हणजे तो कोठल्या ना कोठल्या तरी घराण्यांत पडतोच व त्या घराण्याचा त्याला अभिनिवेश वाटत असतो.

त्यामुळें स्वतःच्या घराण्याची अवास्तव स्तुति व इतर घराण्यांवर अथवा गायकांवर अवास्तव टीका करण्याचा मोह त्याला आवरत नाहीं. ह्या दोषांतून मुक्त व्हायला गायकीचा फारच मोठा प्रवास घडावा लागतो आणि पूर्ण मुरलेला गायक झाल्याखेरीज इतर गायकींतले गुण पारखण्याची पात्रता त्याच्या अंगीं येत नाहीं. केळकर हे आहेत तितके यशस्वी चित्रकार असूनही प्रत्यक्ष गायक झाले असते, तर त्यांना गायकीचा एवढा मोठा प्रवास घडला नसता आणि वर वर्णन केलेले दोषही ह्या चरित्रांत साहजिकच डोकावले असते. पण गायक नसल्यानें पंथ-निष्ठेची बाधा त्यांना झाली नाहीं, त्यामुळें ह्या चरित्रांत इतर गायकांवर अगर गायकींवर अन्याय झालेला नाहीं, हें नमूद केलें पाहिजे.

ह्या चरित्र-ग्रंथाचा आणखी एक विशेष सांगायला हवा. चरित्राच्या शेवटीं पन्नास-पाऊणशें पृष्ठें परिशिष्टें जोडलीं असून, त्यांत अनेक गायकांच्या, शिष्यांच्या, गुरुबंधूंच्या आणि इतर मित्रांच्या आठवणी त्यांच्या-त्यांच्या शब्दांत, अथवा शब्दशः भाषान्तर करून दिल्या आहेत. ह्या ग्रंथांतला हा एक महत्त्वाचा भाग म्हणून समजायला हवा. एक तर ज्यांना बुवांच्या प्रत्यक्ष सहवासाचें, साहचर्याचें, शिष्यत्वाचें अगर गाणें ऐकण्याचें भाग्य लाभलें आहे, अगर होतें, त्यांच्याच लेखणींतून त्या उतरल्या असल्यामुळें त्यांना प्रत्यक्ष पुराव्याचें महत्त्व आहे आणि ह्याच आठवणींचा चरित्र-लेखनांत उपयोग झाल्यामुळें हें चरित्र-लेखन बरेंच साधार झालेलें आहे. बुवांच्या व्यक्तित्वाच्या सर्व पैलूंचा क्रमाक्रमानें विकास कसा झाला, त्याचें साद्यंत वर्णन ह्या चरित्रांत आलें असून, अज्ञात आणि अस्पष्ट जागाही त्यांत तशाच राहूं दिल्यामुळें त्याला विश्वसनीयतेचें वजन आलें आहे.

केळकरांच्या लेखनकर्तृत्वाविषयीं इतकें सांगून झाल्यानंतर, हा चरित्र-ग्रंथ वाचून माझ्या मनावर बुवांच्या गायकीविषयीं, व्यक्तित्वाविषयीं व स्वभाव-वैशिष्ट्यांविषयीं काय संस्कार झाला, तें सांगणें आतां ओघानेंच आलें. बुवांचें हें विस्तृत चरित्र इतक्या अवधीनंतर आज प्रसिद्ध होत असलें, तरी लेख-रूपानें त्यांच्यविषयीं अधिकारी व्यक्तींनीं लिहिलेलें वाङ्मय बरेंच आहे. त्याचप्रमाणें परिशिष्टांत दिलेलें आणि ह्याच ग्रंथाकरतां आवर्जून जमवलेलें

आठवणींचें साहित्यही, त्याचे बहुतेक सर्व लेखक गायक असल्यामुळें, तितक्याच योग्यतेचें आहे. ह्या साऱ्यांचा परिणाम माझ्यावर झाला असून त्यांतील कांहीं-कांहीं भाग तर माझ्या डोळ्यांसमोर सारखे तरंगत असतात. त्यांतीलच कांहीं येथें उद्धृत करतों. उद्देश असा, कीं बुवांचा असर ह्या सर्व कलाकारांवर किती खोल उमटला होता, हें समजावें आणि त्यांच्याविषयीं त्यांना किती प्रेम, आदर आणि भक्ति-भाव वाटत होता, अगर आहे, ह्याची आजच्या वाचकांना पुसट तरी कल्पना यावी.

पहिल्या वर्गांत मोडणारे आणि स्वतःच्या शिष्यत्वाचें भूषण मानणारे कै. गोविंदराव टेंबे ह्यांनीं "असा अष्टपैलू गुणमंडित गायक शतकांतून एखादाच निर्माण होतो." अशी बुवांची प्रशंसा करून "त्यांच्या गाण्यांत स्वरांचा जिवंतपणा, रागाचा सचेपणा आणि तालाचें लालित्य हे तीनही गुण उत्कर्षाला पोंचलेले होते ... त्यांच्याइतका वर्णोच्चाराचा स्पष्टपणा व रेखीवपणा त्यांच्या वेळच्या श्रेष्ठ गायकांमध्येंसुद्धा चुकूनच दिसे." असें विधान केलें आहे. ह्याशिवाय "त्यांची बोलतान एखाद्या परीसारखी सुंदर असे." असेंही ते म्हणत असत. अशाच तऱ्हेचें वर्णन प्रा. ना. सी. फडके ह्यांनीं केलेलें असून "भास्करबुवांची आठवण झाली, कीं 'तेथें कर माझे जुळती' एवढेंच म्हणणें माझ्यासारख्यांच्या हातीं उरलेलें आहे." असें म्हटलेलें आहे. श्री. केशवराव भोळे ह्यांनीं "बुवांची भरघोंस मुरलेली कसदार बिलंपत त्यांची त्यांच्याबरोबर गेली." असा विलाप केला आहे. ह्याच तऱ्हेच्या आठवणी शिल्पकार फडके ह्यांनींही दिलेल्या असून "फैजमहंमदखांसाहेबांकडून चिजेची मांडणी व आलापी घेतली, नथ्थनखांसाहेब आग्रेवाले ह्यांच्याकडून लयकारी आणि बोलतान घेतली आणि अल्लादियांखांसाहेबांकडून सूक्ष्म, पेंचदार आणि कूट अशी गायकी आत्मसात् केली." अशा तऱ्हेचें वर्णन बहुतेक सर्वांनींच केलेलें आहे.

आठवणी पाठविणाऱ्यांपैकीं श्री. गोविंदराव देसाई ह्यांनीं तर "त्यांचें गाणें ऐकून दुष्टपणा, हेवा, ईर्षा, निंदा, इत्यादि विकार नाहींसे होत असत." असें लिहिलें आहे. तसेंच बुवांचे पंजाबमधील शिष्य आणि प्रसिद्ध गायक पंडित दिलीपचंद्र वेदी ह्यांनीं "संगीताच्या गगनांत सदैव उजाळा देण्याचा

गुण भास्करबुवांचा होता. दिवसा भास्कर व रात्रीं चंद्र, असे ते विराजत." असें सांगून बुवांची "न्यासाची तान समेवर आली, कीं सर्व श्रोत्यांच्या डोळ्यांत अश्रुधारा वाहात आणि हें गाणें, कीं तंतुवादन, असा संभ्रम त्यांना पडे." असें वर्णन केलें आहे. "गाण्याचें पर्यवसान रडण्यांत होत असेल, तर तें ऐकूंच नये." असें प्रथम म्हणणारे शिल्पकार फडके, भास्कर-बुवांचें गाणें ऐकून आपल्याला स्वतःचेच अश्रु कसे आवरेनासे झाले तें सांगतात आणि "रडूं हा शब्दच तेवढा अप्रयोजक होता." असा मग खुलासा करतात. त्याचप्रमाणें बुवांचे दुसरे एक पंजाबमधील शागीर्द प्रसिद्ध सिनेमा-दिग्दर्शक श्री. हरिश्चंद्र बाली ह्यांनीं आपल्या आठवणींत अशा कांहीं घटना सांगितल्या आहेत, कीं त्या सत्यकथा आहेत, असें आवर्जून सांगावें लागेल. उदाहरणार्थ, "अलिया फत्तू, अलादिया मेहरबान, भाई मोती व माननीय तानरसखांचे पुत्र, ह्यांच्यासारख्या दिग्गज गायकांची सतत तीस वर्षांहून अधिक काळ साथ केलेले सारंगी-नवाज उस्ताद झेंडेखां, ह्यांना सर्व प्रकारच्या गायकींचा परिचय होता. भास्कर-बुवांची साथ करतांना मात्र आनंदातिशयानें अश्रु ढाळीत झेंडेखांनीं आपली सारंगी भास्करबुवांच्या चरणीं वाहिली." हरिश्चंद्रजींनीं सांगितलेली आणखी एक सत्यकथा पाहा. "अमृतसरला लोकांनीं इशारा केला, म्हणजे 'हजरत ख्वाजासंग खेलिये धमार' ही चीज बुवा म्हणत आणि मुसलमान कलावंत बुवांवर पुष्पवृष्टि करत. हिंदूंनीं 'जरा आमच्याकडे पाहा.' म्हटलें, म्हणजे 'गोपाला मेरी करुणा' ही चीज बुवा सुरू करीत. हा 'हजरत ख्वाजा'चा प्रसाद बने आणि संपन्न लोक बुवांवर सुवर्णाचीं नाणीं उधळत." असें सांगून "ही घटना आजच घडल्यासारखी अजूनही डोळ्यांपुढें उभी आहे." अशीही हरिश्चंद्रजी ग्वाही देतात. हरिश्चंद्रजींनीं सांगितलेली आणखी एक आठवण तर फारच विस्मयजनक आहे. ती अशी : "जालंदरच्या देवी तलावांतील जलशांत स्त्रियांना बंदी असे व ती लष्करी शिस्त पाहून त्या मनांत दुःखी असत. पण त्यांनीं जिवाचा धडा करून उपाय शोधून काढला. डोक्याला पटके गुंडाळले, केस झाकून घेतले, टोप्या वापरल्या, बाकीचें शरीर कांबळीनें झाकून घेतलें. दहा माणसें आलीं,

तर त्यांत तीन पुरुषवेष-धारी स्त्रिया असत. ही गोष्ट फक्त रात्रीच्या वेळीं शक्य असे. कारण त्या वेळीं विजेचे दिवे नव्हते. स्त्रिया अशा रीतीनें वेष पालटून, स्वतःला संभाळीत, आपसांत भाषण न करतां, कांहीं अटकाव न होतां मंडपांत घुसत. हीच युक्ति वापरून इतर ठिकाणच्या स्त्रियाही जलशामध्यें अशाच रीतीनें प्रवेश मिळवीत. अधिकारी मंडळींना आजपर्यंत ह्या घटनेची वार्ता समजलेली नाहीं. प्रसिद्ध पखवाजी मिया मलंगखां ह्यांची पत्नी दसोंधा हिनें बुवासाहेबांना अश्रुपूर्ण नेत्रांनीं कुर्निसात-पूर्वक सांगितलें, कीं " मी आपल्या गायनाची प्रत्येक बैठक ऐकल्यें. " ही सत्यकथा सांगून त्यावर " आतां स्त्री-जातीला बरोबरीचे अधिकार प्राप्त झाल्यावर हें रहस्य उघडें करणें शक्य झालें आहे. " असाही खुलासा हरिश्चंद्रजी करतात. ह्याखेरीज त्यांच्या लिखाणांत सुरस आणि चमत्कारिक परीकथाच वाटाव्यात, अशा कित्येक सत्य-कथा वर्णिलेल्या आहेत, कीं ज्या तीन-तीन वेळां वाचूनही वाचकांना स्वतःचे अश्रु आवरणें जड जाईल. त्या येथें उद्धृत करून त्यांची वाफ दवडणें योग्य होणार नाहीं. वाचकांनीं त्या मुळांतूनच वाचाव्या.

" भास्कर गये अब किसको गाना सुनावूं ? " असा विलाप अल्लादियां-खांसाहेब करीत असत आणि " हिंदुस्थाननें एकही गवैय्या पैदा किया, जिसे हम सब मानते हैं और वो था हमारा भैय्या भास्करबोवा. " असें देवासवाले रजबअलीखांसाहेब दातेसाहेबांना म्हणत असत आणि दिलीपचंद्र वेदींनीं तर तोडी रागांत बुवांवर केलेल्या चिजेंत " धाक परी तुमरी हिंदमें, सिंधु पंजाब दक्षिण गुजरात, गुरुवर्य भास्करराव महाराज. " असें अगदीं वस्तुस्थिति-निदर्शकच वर्णन केलें आहे. बुवांना आधीं न मानणारे कराचीचे मुबारक-अलीखां ह्यांच्या तोंडून बुवांचें गाणें ऐकल्यानंतर 'सुभानल्ला' असे नकळतच उद्गार निघाले. " मी तर वेडाच होऊन त्यांच्या मागून फिरूं लागलों व शिकारपूर येथें असतांना दररोज त्यांच्या डोक्यास तेल लावून तें मालिश करण्यांत भूषण मानूं लागलों. " अशी त्यांची आठवण प्रो. देवधरांनीं लिहून ठेवली आहे. इतक्या महान् कलाकारांनीं केलेली ही प्रशंसा ऐकल्या-नंतर त्यांत माझ्यासारख्यांनीं कांहीं भर घालायचा प्रयत्न करणें वेडेपणाचें

होईल. तिच्यावरून अर्थातच भास्करबुवा एक अद्वितीय गायक होऊन गेले, ह्याविषयीं कोणालाही संशय राहाणार नाहीं. पण बुवांचें हें अद्वितीयत्व कशांत होतें हें पाहायला गेलें, तर मात्र निरनिराळ्या व्यक्तींनीं दिलेलीं कारणें वेगवेगळीं आहेत, हें सहज ध्यानांत येतें. अवतरणांचे मूळ लेखक हे सर्व अव्वल प्रतीचे जाणकार होते ही गोष्ट लक्षांत घेतली, म्हणजे त्यांच्या आठवणींतून निर्देशित झालेले सर्व गुण भास्करबुवांच्या गायकींत होते, असा निष्कर्ष आपोआपच निघतो आणि त्यामुळें त्यांची गायकी ही गायनाच्या सर्वच घटकांत उत्कृष्ट प्रावीण्य संपादन करून, त्यांची प्रमाणशीर मांडणी करणारी अशी सर्वांगपरिपूर्ण गायकी होती, असें विधान करावें लागतें.

असे निर्देशित झालेले गुण कोणते हें पाहाण्यापूर्वी गायकीचे घटक तरी आपण कोणकोणते मानले आहेत, तें बघितलें पाहिजे. स्थूल दृष्टीनें पाहिलें, तर संगीतांत स्वर, लय व उच्चारणाची अभिव्यक्ति असे तीन प्रमुख घटक मानले गेले आहेत. कोणत्याही प्रकारचें, म्हणजे ठुंबरी, भावगीत, सिनेमा-संगीत, वगैरे कसलेंही संगीत असो, त्यांत हे तीन घटक पाहिजेतच. नाहीं तर तें संगीत परिणामकारक होणार नाहीं. पण अभिजात संगीताच्या गायकींत ह्याच घटकांचे अधिक सूक्ष्म भाग पडले आहेत. ते म्हणजे सुरेलपणा, रागाचा सच्चेपणा, चिजेची मांडणी, आलापी, बिलंपत, तालाचा पक्केपणा, लयकारी, बोलतान, फिरत, इत्यादि. ह्या सर्वांच्या जोडीला चिजेंतील अक्षरांच्या म्हणजे स्वर-व्यंजनांच्या उच्चारणाची स्पष्टता. अर्थातच गायकी सर्व अंगांनीं परिपूर्ण अशी व्हायला हवी असेल, तर सर्व घटकांमध्यें सारखेंच आणि उत्कृष्ट प्रकारचेंच प्रावीण्य संपादन करून, त्यांची मांडणीही प्रमाणशीर केली पाहिजे. पण प्रत्यक्षामध्यें असें दिसतें, कीं बहुतेक गायक ह्यांपैकीं एका अगर कांहीं घटकांमध्येंच प्रवीण असतात. त्या विशिष्ट घटकांतलें प्रावीण्य त्यांनीं अगदीं पराकोटीला नेलेलें असतें आणि त्याचमुळें त्यांना प्रतिष्ठाही प्राप्त झालेली असते. बाकीच्या घटकांमध्येंही त्यांना गति असते, पण ती प्रावीण्य अगर वैशिष्ट्य ह्या सदरांत घालतां येण्यासारखी नसते, इतकेंच नव्हे, तर कांहीं विशिष्टच घटकांना प्राधान्य दिल्यामुळें त्यांचें बाकीच्या घटकांकडे

थोडें-बहुत दुर्लक्षही झालेलें असतें आणि त्या दृष्टीनें त्या इतर घटकांना गौणच लेखण्याची त्यांची प्रवृत्ति बनते. शिवाय असेंही दिसतें, कीं प्रत्येकानें आपल्या विशिष्ट घटकांना प्राधान्य देण्याचें आणि इतर घटकांना त्या मानानें गौणत्व देण्याचें तत्त्व-ज्ञानही बनवलेलें असतें. मग दुनियेलाही श्रेष्ठ गायकी म्हणजे हीच, बाकीच्या सर्व त्या मानानें कमी प्रतीच्या, असेंच वाटूं लागून, तशीच त्यांची धारणा बनते. त्याच तत्त्व-ज्ञानावर मग त्यांची निष्ठा जडते. ह्या निष्ठेतूनच घराण्याचा अगर संप्रदायाचा उगम होतो व कर्तबगार शिष्य लाभले, म्हणजे त्या घराण्याला अगर संप्रदायाला लोक-प्रियता आणि प्रतिष्ठा लाभते. परंतु सर्व घटकांत सारखेंच आणि उत्कृष्ट तऱ्हेचें प्रावीण्य आढळणें ही गोष्ट फारच विरळा. संगीताच्या दुनियेंत सभोवार नजर टाकली, तर असें दिसतें, कीं ज्यांनीं सुरेलपणा व आलापी ह्या घटकांना प्राधान्य देऊन त्यांत अतिरिक्त प्रावीण्य संपादन केलें आणि त्या मानानें इतर घटकांना गौणत्व दिलें, त्यांनीं नांवलौकिक तर मिळवलाच, पण स्वतःची परंपराही स्थापन केली. त्याचप्रमाणें ज्यांनीं चिजेची मांडणी, तालाचा पक्केपणा, लयकारी, बोलतान, वगैरे घटकांकडे विशेष लक्ष देऊन, त्यांत अतिरिक्त प्रावीण्य संपादन केलें आणि स्वराच्या व आलापीच्या घटकांकडे त्या मानानें गौणत्व दिलें, त्यांनाही त्याच प्रकारचें यश मिळून गेलें. तसेंच, ज्यांनीं फक्त तानफिरतीच्या अगर फक्त बोलतानेच्या घटकांमध्यें आपली शर्थ केली आणि इतर घटकांकडे त्या मानानें दुर्लक्ष केलें, तेही आपली गायकी गाजवून आणि परंपरा निर्माण करून गेले.

ह्यावरून नाव अगर यश मिळवण्यासाठीं अथवा परंपरा स्थापन करण्यासाठीं, सर्व घटकांमध्यें सारखेंच आणि पराकाष्ठेचें प्रावीण्य संपादन करण्याची आवश्यकता नाहीं, असें अनुमान निघतें. एका अगर कांहीं घटकांचें प्रावीण्य संपादन करून त्यांना प्राधान्य दिलें आणि इतर घटकांना त्या मानानें गौणत्व दिलें तरी पुरतें, असेंही त्यावरून दिसून येतें. असे गायक मधून-मधून दिसतातच. परंतु सर्व घटकांमध्यें सारखेंच आणि पराकाष्ठेचें प्रावीण्य संपादन करून त्याची सम प्रमाणांत मांडणी करणारा गायक, गायकी अगर परंपरा फार दुर्मिळ असते.

हाच विचार कार्ल सीशोअर ह्या ग्रंथकारानें आपल्या ‘Psychology of Music’ ह्या अमोल ग्रंथांत मांडला आहे. ह्या ग्रंथकारामध्यें पदार्थ-विज्ञानशास्त्र आणि सांगीतिकता ह्यांचा मोठा मनोज्ञ समन्वय झाला होता. अनेक अनुभवी पदार्थ-विज्ञान-शास्त्रज्ञ व सांगीतिक ह्यांच्या साहाय्यानें सतत पन्नास वर्षे प्रयोग-शाळेंत खपून, त्याचें फलित म्हणून त्यानें हा ग्रंथ लिहिला. त्यावरूनच मी हें विवेचन करीत आहें. सीशोअरचे सिद्धान्त अर्थातच पाश्चात्य संगीताला उद्देशून आहेत व त्यानें त्या संगीताचे मुख्य घटक अथवा शाखा चार मानल्या आहेत. पाश्चात्यांच्या ‘हार्मनी’ संगीताच्या ह्या चार शाखा अगर घटक आपल्या संगीताला लागू पडत नाहींत. आपल्या संगीताचे घटक आपण वेगळे मानले आहेत आणि त्याचें दिग्दर्शन मीं आतांच केलें आहे. पाश्चात्य संगीताच्या चार घटकांचा अगर शाखांचा आपल्याला उपयोग नसला, तरी सीशोअरच्या सिद्धान्ताला त्यामुळें बाध येत नाहीं. तो आपल्या संगीताला जशाचा तसा लागू पडतो. त्याचेंही विवेचन मीं थोडें-फार केलें असलें, तरी तो मुळांतूनच सांगणें इष्ट असल्यामुळें तो त्याच्याच शब्दांत खालीं देत आहें :

"Of course a great musician or a balanced musician of any degree of greatness tends to have these four trunks of capacity branching out in balanced symmetrical form, but such cases are comparatively rare. Many distinguished musicians are dominantly of one of these types. Their performance and appreciation and their musical creations all give evidence favouring dominance of one of the trunk lines, although within these trunk lines large and distinctive sub-branchings may be recognised. Furthermore, great capacity in each of these types is not essential to marked distinction in musical achievement. Very extreme sensitivity in one or more of them may even be a drawback to balanced musical development."

एकेका घटकामध्यें अतिरिक्त प्रावीण्य संपादन करणारे गायक अगर गायक्या आढळतात. पण सर्व घटकांत सारखेंच आणि उत्कृष्ट प्रकारचें प्रावीण्य संपादन करून त्याची योग्य मांडणी करणारी गायकी अथवा गायक फारच विरळा, असा सिद्धान्त मांडून कोणत्याही एखाद्या अगर अनेक

घटकांतील अतिरिक्त प्रावीण्य आणि संवेदना 'सर्वांग-परिपूर्ण' आणि 'प्रमाणशीर' गायकीला केव्हां-केव्हां बाधकच होते, असेंही सीशोअरनें म्हटलें आहे.

सांगण्याचें तात्पर्य असें, कीं सर्व घटकांत सारखेंच आणि उत्कृष्ट प्रकारचें प्रावीण्य संपादन करून, त्याची प्रमाणशीर मांडणी करून, 'सर्वांग-परिपूर्ण' गायकी गाणारे असे भास्करबुवा त्या काळांत एक अद्वितीय गायक होऊन गेले. किंबहुना, त्यांचें अद्वितीयत्व त्यांच्या ह्या सर्व घटकांच्या प्रमाणशीर समन्वयात्मक आणि संकलनात्मक अशा गायकीमध्येंच सामावलेलें होतें. हा निष्कर्ष काढतांना निरनिराळ्या व्यक्तींनीं केलेल्या त्यांच्या प्रशंसेंतून स्तुति-विषयक भाग वगळून फक्त वस्तु-निष्ठ वर्णनाचा भाग येथें लक्षांत घेतला आहे. उदाहरणार्थ, बुवांच्या फैजमहंमदखांकडून घेतलेल्या आलापीची, चिजेच्या मांडणीची आणि बिलंपतीची तारीफ सर्वांनींच केली आहे. त्याचप्रमाणें नथ्थनखांसाहेब आग्रेवाले ह्यांच्याकडून घेतलेला तालाचा पक्केपणा, लयकारी, बोलतान, तान, इत्यादींची प्रशंसाही सर्वांनीं केली आहे. शिवाय अल्लादियाखांसाहेबांपासून आत्मसात् केलेल्या तिढ्या, पेंचदार आणि कूट अशा गायकीचें आणि शाखांतून उपशाखा व त्यांतून पुनः फुटणाऱ्या भरदार वृक्षाची शोभा दाखविणाऱ्या त्यांच्या तान-फिरक्यांचें वर्णन गोविंदराव टेंबे ह्यांनीं केलें आहे. तसेंच त्यांनीं बुवांच्या रागाची सचाई, स्वरांचा जिधंतपणा, तालाचें लालित्य, इत्यादि विशेष सांगून त्यांच्या परीसारख्या बोलतानेचें आणि उच्चारणाच्या स्पष्टपणाचेंही वर्णन केलें आहे. केशवराव भोळे ह्यांनीं त्यांच्या बिलंपतीची तारीफ केलेली आहे. पण गोविंदराव टेंबे, प्रा. ना. सी. फडके अथवा शिल्पकार फडके ह्यांना बुवांच्या शिष्यत्वाचा, स्नेहीपणाचा, अगर परिचयाचा अभिमान म्हणून अगर अन्य कारणास्तव 'संबंधित व्यक्ति' म्हणतां येईल. पण पंडित दिलीपचंद्र वेदींनीं दिलेल्या आणि आतां मी सांगणार आहें त्या आठवणींना तसें स्वरूप नाहीं. कारण दिलीपचंद्र हे बुवांचे शागीर्द असले, तरी त्यांनीं आठवणींत सांगितलेल्या प्रसंगाला ते फक्त 'साक्षीभूत' होते. जालंदर येथें २६ डिसेंबर, १९११ रोजीं रात्रीं झालेल्या मैफलींत बुवांनीं 'सुरझाय रही' हा हमीर-

मधला ख्याल, 'मेंडेरे यार' ही द्रुत चीज आणि त्यांतलाच एक तराणा म्हटला, त्या वेळचें दिलीपचंद्रांनीं केलेलें खालील वर्णन पाहा :

"ध्रुपद-गायक बिलंपित आलापीवर खूष होते. ख्याल-गायक द्रुत तानांना हात उंचावून वाहवा देत, तोंडानें 'सुभानअल्ला' वगैरे उद्गार काढीत होते. पखवाज व तबला-वादक बुवासाहेबांच्या लयकारीची उसळून-उसळून स्तुति करीत होते. तात्पर्य हें, कीं जो तो आपापल्या अंगानें, असे सर्वेच, तारीफ करूं लागले. गाणें संपल्यावर कोणी चरण-स्पर्श करीत, तर कोणी साष्टांग नमस्कार घालीत, इत्यादि."

प्रत्येक घटकाची, त्या-त्या घटकांत प्रावीण्य असलेल्या गायकांकडून प्रशंसा आणि "जो तो आपापल्या अंगानें, असे सर्वेच, तारीफ करूं लागले." हें वर्णन, म्हणजे बुवांच्या सर्व घटकांतील समन्वयात्मक व प्रमाणशीर मांडणीचाच पुरावा नव्हे काय ?

एवढा पुरावा कोणाला पुरेसा वाटला नाहीं, तर त्यांनीं पंडित दिलीपचंद्रांनीं दिलेली दुसरी एक आठवण पाहावी. ही आठवण पतियाळा घराण्याचें नांव ज्यांनीं सबंध हिंदुस्थानांत गाजवलें, त्या 'अलिया-फत्तू' ह्या अजोड जोडीपैकीं प्रत्यक्ष खांसाहेब अलीबक्ष ह्यांची आहे. अलीबक्ष-साहेबांना 'जरनेल' (General) आणि फतेअलीसाहेबांना 'करनेल' (Colonel) अशीं नांवें त्यांच्या चढाऊ व आक्रमक गायकीवरून पडलीं होतीं, ह्याची गायक-वर्गाला आठवण करून देण्याची आवश्यकता नाहीं. ३ जानेवारी, १९२० रोजीं पतियाळा संस्थानचे मुख्य मंत्री राजा दयाकिसन कौल ह्यांनीं संस्थानाधिपतींना ऐकवण्यासाठीं भास्करबुवांचें गाणें केलें. त्या मैफलीचें वर्णन पंडित दिलीपचंद्रजींनीं केलें आहे तें असें :

"त्या वेळीं मिर्यां अलीबक्षसाहेब (जरनेलसाहेब) उपस्थित होते. बुवासाहेबांनीं 'पुरिया' मधील विलंबित ख्याल 'फूलन के हरवा' सुरू केला. नंतर 'कामोद' व त्यानंतर अलीबक्षसाहेबांच्या आग्रहामुळें 'दरबारी' विलंबित ख्याल 'तू ऐसो हो करीम' आणि द्रुत ख्याल 'नैनन सो नैन' म्हटला. मियां अलीबक्ष मधून-मधून म्हणत होते, 'ही आहे हद्दूखांसाहेबांची गमक तान', 'ही आहे फैजमहंमदखांची खानापुरी आणि

रागविस्तार', 'ही आहे रहमतखांची बारीक फिरत' आणि 'ही आहे मुबारकअल्लींची पेंचदार तान.' अखेर राजासाहेबांकडे वळून ते म्हणाले, "हुजूर, लोक म्हणतात, कीं हा अलीबक्ष कोणाची कधीं तारीफ करीत नाहीं, फार अभिमानी आहे. वास्तविक ते लोक मला खूष करणारं गाणं गाऊंच शकत नाहींत. माझी तर कल्पना होती, कीं आतां ख्याल-गायकी मरत आहे; पण खुदाची मेहरबानी आहे, कीं पंडित भास्करबुवांच्या रूपानें एक अद्वितीय ख्याल-गायक जिवंत आहे. आतां ह्याच्या बरोबरीचा ख्याल-गायक हिंदु पंडितांत व खांसाहेब लोकांतही मिळणार नाहीं. चारही अंगांनीं अत्युत्तम ढंगानें सजलेलं गाणं भास्करबुवांच्या कलेंत दिसतं. खुदा त्यांना तंदुरुस्ती व दीर्घायुष्य देवो!" मियां अलीबक्षांचें वय ह्या काळीं अंदाजें ७७ होतें.

पंडित दिलीपचंद्रांच्या ह्या दोन आठवणींनीं बुवांच्या सर्व घटकांच्या समन्वयात्मक गायकीविषयीं आणि तिच्या प्रमाणशीर मांडणीविषयीं उरल्या-सुरल्या सर्व शंकांचें निरसन होईल.

एकूण "बुवांची योग्यता फक्त अल्लादियाखांसाहेबच जाणत होते." असें केसरबाई केरकर म्हणतात, त्यांतील मर्म आतां ध्यानांत येईल. बुवांची गायकी हरढंगी आणि सर्वांगपरिपूर्ण असून ते संगीताचे एक 'पूर्णावतार'च होते, असें म्हणायला कांहीं हरकत नाहीं. हें विधान करण्यांत मीं स्वतःच्या पदरचें कांहींही घातलेलें नाहीं. आज पंचेचाळीस वर्षें बुवांविषयीं बुजुर्गांनीं सांगितलेल्या हकिकती ऐकत आलों, त्यांच्याविषयींचें लिखाण वाचत आलों, प्रस्तुत चरित्र आणि त्याला जोडलेलीं परिशिष्टें काळजीपूर्वक वाचलीं आणि ह्या सर्वांतून जें सर्वांनींच थोड्या-बहुत प्रमाणांत सांगितलें आहे, त्याची मीं फक्त एकत्र जुळणी केली आहे इतकेंच. नुकत्याच झालेल्या बुवांच्या पुण्य-तिथीच्या दिवशीं श्री. केशवराव भोळे ह्यांनींही पुणें नभोवाणीवरून केलेल्या भाषणांत हाच मुद्दा अगदीं तळमळीनें सांगितला होता.

बुवांनीं महाराष्ट्रांत व महाराष्ट्राबाहेर म्हणजे उत्तरेला जलंदर, लाहोर, जयपूर, कराची, अहमदाबाद, बडोदें, इंदूर, ग्वाल्हेरपासून दक्षिणेला म्हैसूर, बंगलोरपर्यंत संगीत-शौकिनांकडून असामान्य प्रशंसा संपादन केली, ती आपल्या हर-ढंगी सर्वांग-परिपूर्ण गायकीमुळेंच, ह्यांत संशय नाहीं. पण

जिच्यामुळें त्यांना एवढी प्रतिष्ठा लाभली व पट्टीच्या मुसलमान उस्तादांनींसुद्धा त्यांचे गोडवे गायले, ती गायकी, त्यांच्यामागून फारशी मूळ धरूं शकली नाहीं. कदाचित् बुवांची गुणवत्ता बव्हंशीं व्यक्तिगत होती, अगर सर्व घटक-गुणांनीं समृद्ध असा शिष्य-परिवार मिळणें त्यांच्या नशिबांत नव्हतें, अथवा त्यांचा मृत्यु अकालीं म्हणजे वयाच्या त्रेपन्नाव्या वर्षी झाला, ह्यांपैकीं एक अगर अनेक कारणें असूं शकतील. पण मास्तर कृष्णराव फुलंब्रीकर अथवा कै. बापुराव केतकर ह्यांच्याखेरीज बुवांची परंपरा फारशी कोणी चालवूं शकले नाहींत.

मास्तरही बुवांची भरदार आणि दमदार गायकी गात नाहींत, अशा तक्रारी ऐकायला आल्या आहेत व अजूनही येतात. पण त्या बाबतींत एका महत्त्वाच्या गोष्टीकडे दुर्लक्ष केलें जातें. एक तर मास्तरांच्या आवाजाची जातच वेगळी आणि नाजूक आहे. शिवाय त्यांचा पल्ला बुवांच्या कमींत कमी तीन सप्तकाच्या आवाजाच्या मानानें फार लहान. त्यांतूनही दम्याच्या विकारानें अपुरा श्वास. तरीही ह्या अडचणींतून मार्ग काढून बुवांच्या मागून सतत तीस-पस्तीस वर्षें सबंध महाराष्ट्र मास्तरांनीं गुंगविला. ही जादू त्यांना बुवांची तालीम आणि सहवास मिळाला नसता, तर करतां आली नसती. शिवाय असा एकाबरहुकूम दुसरा गायक अगदीं बेमालूम होत नसतो. तसें झालें असतें तर ती बुवांची नक्कल झाली असती व एक प्रतिभावंत कलाकार म्हणून मास्तरांचें नांवही झालें नसतें. मास्तर जें कांहीं गायले ती बुवांची नक्कल नव्हती. तें गाणें त्यांचें स्वतःचें होतें व बुवांकडून तालीम व प्रेरणा घेऊन त्यांनीं तें स्वतःचें बनवलें होतें. मास्तरांना स्वतःचा आत्मा बुवांच्या गायकीचा शोध घेतां-घेतांच सापडला व तो बुवांनींच दाखवला आणि ह्यांतच मास्तरांच्या सांगीतिक जीवनाचें सार्थक होतें. मास्तरही तसेंच मानतात व जाहीरपणें सांगतात. नाहींतर इतक्या अडचणींतून मार्ग काढतां-काढतां त्यांना एखादा मामुली गायक होऊन कोठें-तरी सांदी-कोपऱ्यांत जीवन कंठीत बसावें लागलें असतें. आवाजानुरूप गायकी कशी बदलते, ह्याचें सर्वांच्या आठवणींतलें ढळढळीत उदाहरण म्हणजे कै. गोविंदराव टेंबे ह्यांचें गायन आणि पेटी-वादन. एकच गोविंदराव,

रागविस्तार ', ' ही आहे रहमतखांची बारीक फिरत ' आणि ' ही आहे मुबारकअल्लीची पेंचदार तान.' अखेर राजासाहेबांकडे वळून ते म्हणाले, " हुजूर, लोक म्हणतात, कीं हा अलीबक्ष कोणाची कधीं तारीफ करीत नाहीं, फार अभिमानी आहे. वास्तविक ते लोक मला खूष करणारं गाणं गाऊंच शकत नाहींत. माझी तर कल्पना होती, कीं आतां ख्याल-गायकी मरत आहे; पण खुदाची मेहरबानी आहे, कीं पंडित भास्करबुवांच्या रूपानें एक अद्वितीय ख्याल-गायक जिवंत आहे. आतां ह्याच्या बरोबरीचा ख्याल-गायक हिंदु पंडितांत व खांसाहेब लोकांतही मिळणार नाहीं. चारही अंगांनीं अत्युत्तम ढंगानें सजलेलं गाणं भास्करबुवांच्या कलेंत दिसतं. खुदा त्यांना तंदुरुस्ती व दीर्घायुष्य देवो ! " मियां अलीबक्षांचें वय ह्या काळीं अंदाजें ७७ होतें.

पंडित दिलीपचंद्रांच्या ह्या दोन आठवणींनीं बुवांच्या सर्व घटकांच्या समन्वयात्मक गायकीविषयीं आणि तिच्या प्रमाणशीर मांडणीविषयीं उरल्या-सुरल्या सर्व शंकांचें निरसन होईल.

एकूण " बुवांची योग्यता फक्त अल्लादियाखांसाहेबच जाणत होते." असें केसरबाई केरकर म्हणतात, त्यांतील मर्म आतां ध्यानांत येईल. बुवांची गायकी हरढंगी आणि सर्वांगपरिपूर्ण असून ते संगीताचे एक ' पूर्णावतार 'च होते, असें म्हणायला कांहीं हरकत नाहीं. हें विधान करण्यांत मीं स्वतःच्या पदरचें कांहींही घातलेलें नाहीं. आज पंचेचाळीस वर्षें बुवांविषयीं बुजुर्गांनीं सांगितलेल्या हकिकती ऐकत आलों, त्यांच्याविषयींचं लिखाण वाचत आलों, प्रस्तुत चरित्र आणि त्याला जोडलेलीं परिशिष्टें काळजीपूर्वक वाचलीं आणि ह्या सर्वांतून जें सर्वांनींच थोड्या-बहुत प्रमाणांत सांगितलें आहे, त्याची मीं फक्त एकत्र जुळणी केली आहे इतकेंच. नुकत्याच झालेल्या बुवांच्या पुण्य-तिथीच्या दिवशीं श्री. केशवराव भोळे ह्यांनींही पुणें नभोवाणीवरून केलेल्या भाषणांत हाच मुद्दा अगदीं तळमळीनें सांगितला होता.

बुवांनीं महाराष्ट्रांत व महाराष्ट्राबाहेर म्हणजे उत्तरेला जलंदर, लाहोर, जयपूर, कराची, अहमदाबाद, बडोदें, इंदूर, ग्वाल्हेरपासून दक्षिणेला म्हैसूर, बंगलोरपर्यंत संगीत-शौकिनांकडून असामान्य प्रशंसा संपादन केली, ती आपल्या हर-ढंगी सर्वांग-परिपूर्ण गायकीमुळेंच, ह्यांत संशय नाहीं. पण

जिच्यामुळें त्यांना एवढी प्रतिष्ठा लाभली व पट्टीच्या मुसलमान उस्तादांनींसुद्धा त्यांचे गोडवे गायले, ती गायकी, त्यांच्यामागून फारशी मूळ धरूं शकली नाहीं. कदाचित् बुवांची गुणवत्ता बव्हंशीं व्यक्तिगत होती, अगर सर्व घटक-गुणांनीं समृद्ध असा शिष्य-परिवार मिळणें त्यांच्या नशिबांत नव्हतें, अथवा त्यांचा मृत्यु अकालीं म्हणजे वयाच्या त्रेपन्नाव्या वर्षी झाला, ह्यांपैकीं एक अगर अनेक कारणें असूं शकतील. पण मास्तर कृष्णराव फुलंब्रीकर अथवा कै. बापुराव केतकर ह्यांच्याखेरीज बुवांची परंपरा फारशी कोणी चालवूं शकले नाहींत.

मास्तरही बुवांची भरदार आणि दमदार गायकी गात नाहींत, अशा तक्रारी ऐकायला आल्या आहेत व अजूनही येतात. पण त्या बाबतींत एका महत्त्वाच्या गोष्टीकडे दुर्लक्ष केलें जातें. एक तर मास्तरांच्या आवाजाची जातच वेगळी आणि नाजूक आहे. शिवाय त्यांचा पल्ला बुवांच्या कमींत कमी तीन सप्तकाच्या आवाजाच्या मानानें फार लहान. त्यांतूनही दम्याच्या विकारानें अपुरा श्वास. तरीही ह्या अडचणींतून मार्ग काढून बुवांच्या मागून सतत तीस-पस्तीस वर्षें सबंध महाराष्ट्र मास्तरांनीं गुंगविला. ही जादू त्यांना बुवांची तालीम आणि सहवास मिळाला नसता, तर करतां आली नसती. शिवाय असा एकाबरहुकूम दुसरा गायक अगदीं बेमालूम होत नसतो. तसें झालें असतें तर ती बुवांची नक्कल झाली असती व एक प्रतिभावंत कलाकार म्हणून मास्तरांचें नांवही झालें नसतें. मास्तर जें कांहीं गायले ती बुवांची नक्कल नव्हती. तें गाणें त्यांचें स्वतःचें होतें व बुवांकडून तालीम व प्रेरणा घेऊन त्यांनीं तें स्वतःचें बनवलें होतें. मास्तरांना स्वतःचा आत्मा बुवांच्या गायकीचा शोध घेतां-घेतांच सापडला व तो बुवांनींच दाखवला आणि ह्यांतच मास्तरांच्या सांगीतिक जीवनाचें सार्थक होतें. मास्तरही तसेंच मानतात व जाहीरपणें सांगतात. नाहींतर इतक्या अडचणींतून मार्ग काढतां-काढतां त्यांना एखादा मामुली गायक होऊन कोठें-तरी सांदी-कोपऱ्यांत जीवन कंठीत बसावें लागलें असतें. आवाजानुरूप गायकी कशी बदलते, ह्याचें सर्वांच्या आठवणींतलें ढळढळीत उदाहरण म्हणजे कै. गोविंदराव टेंबे ह्यांचें गायन आणि पेटी-वादन. एकच गोविंदराव,

पण गातांना आणि पेटी वाजवतांना त्यांची नजर आणि उद्दिष्ट हीं वेगळीं होत असत. हा फरक त्यांच्या गळ्याचा आवाज आणि पेटीचा आवाज ह्यांची जातच वेगळी असल्यामुळें त्यांना करावा लागत असे. मास्तरांच्या बाबतींतही असा फरक होणें अपरिहार्य होतें.

मास्तरांखेरीज, ख्यात-नाम व झगझगीत प्रकाश-वलय भोवतीं असलेले बुवांचे आणखी दोन शागीर्द म्हणजे कै. गोविंदराव टेंबे आणि श्री. नारायणराव राजहंस ( बालगंधर्व ). पण ह्या दोघांची शागिर्दी म्हणजे प्रत्यक्ष तालीम न घेतां निव्वळ सहवासानें मैफली ऐकल्यामुळें व चिजा सांगण्यामुळें निर्माण झालेला प्रभाव आणि आदर-भाव. ही शागिर्दी अर्थातच एक-तर्फी होती. म्हणजे बुवा स्वतःला गुरु समजत नसत पण हे दोघे मात्र स्वतःला बुवांचे शिष्य म्हणवीत व त्यांत भूषण मानीत. पण त्यांतही मुद्दयाची गोष्ट अशीच दिसते, कीं बुवांच्या शागिर्दीचा उपयोग त्यांना झाला, तो प्रत्यक्ष बुवांची तालमीची गायकी निर्माण करण्याकडे न होतां, प्रत्येकाला स्वतःच्या अगर पेटीच्या आवाजाला, वृत्तीला, कलात्मक धारणेला आणि प्रतिभेला पोषक होऊन त्यांच्या-त्यांच्या आत्म्याचा शोध लागण्यांतच झाला. खऱ्या गुरूचें कार्य ह्याखेरीज दुसरें कोणतें ? स्वतःच्या छापाचे शिष्य निर्माण करण्यापेक्षां शिष्यांचा आवाज, त्यांची वृत्ति, त्यांची धारणा व त्यांची कलात्मकता, ह्यांचाच विकास घडवून आणणारा गुरु श्रेष्ठ नव्हे काय ?

सर्वांग-परिपूर्ण अशा गायकीची परंपरा अशा रीतीनें जवळ-जवळ खंडित झाली असली, ( मास्तरांचेंही आतां वय झालें आहे व त्यांना खास त्यांचा असा कर्तबगार शिष्यही मिळाला नाहीं ) तरी बुवांची महाराष्ट्राला लाभलेली अमोल देणगी म्हणजे नाट्य-संगीत होय. ह्या देणगीचा विसर मराठी रंग-भूमीला कधींही पडणार नाहीं. बुवांच्या सांगीतिक आयुष्याची सुरुवातच नाटकापासून झाली होती व त्यांना शागीर्द मिळाले, तेही गोविंदराव टेंबे, बालगंधर्व, मास्तर कृष्णराव, जगन्नाथबुवा पंढरपूरकर ह्यांच्यासारखे रंग-भूमि गाजवणारे नटच. बुवांनीं नाटकांत काम करायचें तरुण वयांतच सोडलें होतें, तरी त्यांच्या अंगांतच नाट्य होतें आणि तें त्यांच्या उस्तादी गायकीलाही शोभा आणि उठावच देत होतें. इतक्या अनुकूल परिस्थितींत

नाट्य-संगीताकडे त्यांचें लक्ष न जाणेंच अस्वाभाविक झालें असतें आणि ह्याचाच परिपाक म्हणजे खाडिलकरांच्या ‘ विद्याहरण ’, ‘ स्वयंवर ’, ‘ द्रौपदी ’, वगैरे नाटकांना त्यांनीं दिलेल्या अभिजात संगीताच्या चाली. बुवांची नाट्य-संगीतांतील ही कामगिरी चांगलीच क्रान्ति-कारक ठरली. त्या वेळीं रंग-भूमीवर रूढ असलेल्या ‘ किर्लोस्करी ’ संगीताला म्हणजे साकी, दिंडी, लावणी, स्त्रीगीतें, वगैरे अगदीं बालबोध अशा संगीताला शह बसून तें जवळ जवळ कायमचेंच मागें पडलें. शिवाय बुवांनीं ह्या नवीन दिलेल्या संगीताची परंपराही इतकी बल-शाली बनली, कीं गेलीं पन्नास वर्षें ती सतत टिकून राहिली आहे आणि पुढेंही राहील, असें आजही तिच्यामध्यें सामर्थ्य आहे. बुवांच्या ज्या उस्तादी गायकीमुळें त्यांना अपार यश आणि अत्युच्च स्थान लाभलें, त्या गायकीचा प्रभाव खंडित व्हावा आणि तिला एक सहजासहजीं फुटलेला फाटा मात्र परंपरा-रूपानें चिर-स्थायी व्हावा, हा एक विचित्र योगायोगच समजला पाहिजे.

‘ स्वयंवर ’ नाटकाला १९१६ सालीं बुवांनीं चाली देऊन नाट्य संगीताला एक क्रान्ति-कारक वळण लावलें, पण त्याची सुरुवात त्याच्याही आधी पांच वर्षे, म्हणजे १९११ सालींच श्री. गोविंदराव टेंबे ह्यांनीं खाडिलकरांच्या ‘ मानापमान ’ नाटकाला चाली देऊन केली होती. दोन्हींमधला फरक एवढाच, कीं गोविंदरावांनीं चाली दिल्या, त्या ठुमरी, कव्वाली, गजल ह्या गायकीच्या खास पूरब बाजाच्या होत्या, तर बुवांनीं दिलेल्या चाली अभिजात रागदारी गायकीच्या होत्या.

बुवांनीं उठाव-दार मुखड्याच्या आकर्षक बांधणीच्या दुर्मिळ चाली शोधून ‘ स्वयंवरां ’ त घातल्या. ‘ नाथ हा माझा ’, ‘ मम आत्मा गमला ’, ‘ सुजन कसा मन चोरी ’, ‘ स्वकुलतारक सुता ’, ‘ प्रेम नच जाई ’, ‘ मम सुखाची ठेव ’, वगैरे अगदीं सुगम, रागदारीच्या आणि सौंदर्यपूर्ण चालींनीं जाणत्या आणि नेणत्या अशा दोन्ही प्रकारच्या श्रोत्यांची जी पकड घेतली, ती आजपर्यंत कायम आहे. त्यांचे रागही साधेच म्हणजे यमन, बिहाग, भूप, भीमपलास, बागेश्री, तिलककामोद, वगैरे होते. पण चालींची निवड अतिशय विचारपूर्वक केलेली होती. नाट्य-संगीताला पुढें स्वतः गोविंदराव, मास्तर कृष्णराव, ह्यांच्यासारखे

थोर-थोर संगीत-दिग्दर्शक व शिक्षक लाभले. त्यांचाही वांटा नाट्य-संगीताच्या यशामध्यें आहेच. पण टेंबे ह्यांना अभिजात संगीताची अचूक नजर बुवांनींच दिली. बालगंधर्वांना नाट्य-संगीताची तालीमही त्यांनींच दिली आणि मास्तर कृष्णराव तर त्यांचे खास शागीर्दच. नाट्य-संगीताचे एक अधिकारी अभ्यासक श्री. बाबुराव जोशी ह्यांनीं आपल्या ' संगीतानें गाजलेली रंगभूमि ' ह्या ग्रंथांत ह्या सर्व गोष्टींचें सांगोपांग विवेचन करून, बुवांना नाट्य-संगीताच्या ' गंधर्व परंपरेचे शिल्पकार ' असें म्हटलें आहे. पण खरें म्हणजे बुवांना समग्र नाट्य-संगीताचेच कुल-स्वामी समजायला पाहिजे. " ' मानापमान '– ' स्वयंवरा ' पासून नाटकांत गाणेंच गाणें झालें. "; " त्यामुळें अभिनयाकडे दुर्लक्ष झालें. "; " नाटककार भ्रष्ट झाले. "; " हीं नाटकें नाट्याचींच मारेकरी ठरलीं. " अशी टीका ह्या नाटकांवर झाली. पण त्या विषयाची चर्चा ह्या ठिकाणीं अप्रस्तुत होईल. येथें मुद्दा एवढाच, कीं बुवांनीं सुरुवात केलेल्या ह्या नाट्य-संगीताची मोहिनीच अशी जबरदस्त होती. अगदीं मराठी न समजणाऱ्या प्रेक्षकांनासुद्धा ह्या नाटकांची त्यामुळें गोडी लागली आणि मराठी रंगभूमीची लोकप्रियता अन्य-भाषिकांमध्येंही पसरली.

अभिजात संगीत आणि नाट्य-संगीत ह्या दोन्ही शाखांमधील बुवांच्या कर्तृत्वाची फलश्रुति काय, असा एक प्रश्न येथें उपस्थित होतो. त्याचें उत्तर, बुवांनीं ह्या दोहोंमधलें अंतर पुष्कळच कमी करून त्यांना खूपच जवळ आणलें, असें दिलें पाहिजे. बुवांनीं हें अंतर कमी करण्याचा प्रवास दोन्ही ठिकाणांहून एकदमच सुरू केला. त्यांतील एक बाजू अशी, कीं अभिजात संगीताला खुद्द स्वतःच्या हसऱ्या व खेळकर गायकीच्या योगानें त्यांनीं सर्व-साधारण समाजापर्यंत पोंचविलें. बिदागीची पर्वा न करतां आपली लोकप्रिय गायकी त्यांनीं पंचविसांवर वर्षें अगदीं सातत्यानें समाजाला ऐकवली. यमन, भूप, बिहाग, भीमपलास ह्यांसारखे मामुली रागही बुवांच्या तोंडून ऐकले, म्हणजे त्यांची वेगळीच मोहिनी श्रोत्यांवर पडे आणि ह्याच मोहिनी-अस्त्रामुळें, त्या काळीं मुष्किल म्हणून गणले गेलेले पुष्कळसे राग मामुली ह्या सदरांत आणण्याची कामगिरी त्यांना करतां आली. श्यामकल्याण, बिहागडा, सुहा कानडा, गौरी, पटबिहाग, खोकर, सावनी, खट, वगैरे

किती-तरी अनवट राग नेहमींच्या प्रचारांत आणण्याचें श्रेय बुवांनाच दिलें पाहिजे. ह्याशिवाय बुवांच्या गाण्याच्या वहीमध्यें आणखीही कितीतरी अनवट रागांतल्या चिजा लिहिलेल्या आढळतात. त्या सर्व त्यांच्या गायनांतही असाव्यात असें दिसतें. वहीचा उल्लेख आलाच आहे, म्हणून एक गंमत सांगण्यासारखी आहे. 'मेरो पिया' ही 'नायकी कानड्यां' तली चीज बुवांच्या वहींत 'रायसा कानड्यां' त लिहिलेली आहे आणि 'री तुमे समज नाही' ही 'रायसा' मधील चीज तिच्यांत 'नायकी' मध्यें लिहिलेली आढळते. पन्नास-साठ वर्षांपूर्वी गुरुजींना रागाचें नांव विचारण्याचीच सोय नसे. कोणाकडून कांहीं-तरी ऐकायचें व तें वहीमध्यें हळूच लिहून ठेवायचें. त्यामुळेंच असे प्रमाद होत असत, असें नुकत्याच दिवंगत झालेल्या कै. लक्ष्मीबाई जाधव ह्यांचेंही म्हणणें असे. त्यांच्या स्वतःच्या 'री तुम समज' ह्या चिजेच्या ग्रामोफोन रेकॉर्डच्या बाबतींत हाच घोटाळा झाला होता.

अशा रीतीनें एका बाजूनें बुवांनीं अभिजात संगीत सर्व-साधारण समाजापर्यंत पोंचविलें, तर दुसऱ्या बाजूनें त्यांनीं नाट्य-संगीताला अभिजाततेच्या पातळीवर आणलें. नाट्य-संगीताला अर्थातच बालगंधर्व, गोविंदराव टेंबे, मास्तर कृष्णराव, पंढरपूरकरबुवा, इत्यादि कसलेले नट लाभले. त्यांचाही वांटा नाट्य-संगीताला ह्या उच्च पातळीवर नेण्याच्या यशामध्यें आहे, पण त्याची सुरुवात बुवांनींच करून दिली. बुवांनीं आपल्या स्वतःच्या अगणित मैफलींत हीं नाटकांतील रागदारीचीं पदें गाऊन त्यांना मैफलीची आणि अभिजाततेची प्रतिष्ठा मिळवून दिली. तेव्हांपासून कोठल्याही गायकाची मैफल त्यांत नाटकांतील एखाद-दुसरें पद म्हटल्याखेरीज पूर्ण झाली नाहीं. तसेंच कोणत्याही नट-गायकालाही सुरुवातीला एखादा ख्याल गायल्याखेरीज गत्यंतर नसे. अशा रीतीनें नाट्य-संगीताला ख्याली संगीताच्या बैठकींत आणण्याचें श्रेय बुवांनाच द्यायला पाहिजे.

चरित्र वाचून बुवांच्या दिलदार व उमद्या स्वभावाचीही कल्पना येते. फारशी ओळख नसतांनाही गाणें ऐकण्यासाठीं बरोबर आलेल्या मंडळींचा गाडी-घोड्याचा खर्चसुद्धा बुवा करीत असत, अशी आठवण श्री. धामणकरांनीं सांगितली आहे, "आम्हांला आंत कोण सोडणार ?" अशी चिंता त्या वेळचे,

बुवांना नांवही माहीत नसलेले मेडिकल कॉलेजचे विद्यार्थी श्री. केशवराव भोळे ह्यांनीं व्यक्त करतांच "मैफलीच्या ठिकाणीं येऊन दाराशीं उभें राहायचें व मी आलों म्हणजे माझ्याबरोबरच आंत शिरायचें" हा गुरुमंत्र बुवांनीं त्यांना दिला.

सिंधमधील एक आठवण नुकतीच मला श्री. गोपालजी पंजाबी ह्यांनीं सांगितली. एका तबलजीनें साथ चांगली केली व बुवा खूष झाले. "तुला काय पाहिजे?" म्हणून बुवांनीं त्याला विचारलें. "मीं अजून शंभराची नोट पाहिली नाहीं" असें त्यानें म्हणतांच बुवांनीं त्याला शंभराची नोट काढून दिली!

ह्या चरित्रांतले कांहीं उत्कट प्रसंगही कायमचे लक्षांत राहातील. बुवा फैझमहंमदखांसाहेबांकडे शिकत असतांना त्यांच्याबरोबरचे सहाध्यायी राजरत्न दाजीसाहेब तांबे वकील ह्यांनीं सांगितलेली आठवण अंतःकरण पिळवटून टाकणारी आहे. तालीम चालू असतांना खांसाहेबांना खोकल्याची उबळ आली. जवळ तस्त नव्हतें. तेव्हां बुवांनीं ओंजळ पुढें करून त्यांत ती थुंकी झेलली. बाहेर जाऊन हात धुवून येऊन पुन्हा तालमीला सुरुवात केली. तांबे ह्यांना ह्या प्रकाराची किळस येऊन त्यांनीं गाणें शिकणेंच सोडून दिलें. पण त्यानंतर चाळीस वर्षांनीं ती आठवण सांगतांना मात्र त्यांच्या हृदयाची कालवाकालव झालेली त्यांच्या लिखाणांतच दिसते! नाहींतर, "आपला एक वेळचा गुरुबंधु किळसवाणी सेवा करून गायनाचार्य झाला, बुवांची पूर्वीची स्थिति व नंतरची वैभवशाली स्थिति डोळ्यांसमोर उभी राहिली, म्हणजे बुवांनीं भक्तीनें परमेश्वर-स्वरूप मिळवलें; तें स्वरूप निराळें नाहीं, असाच भास होतो." असें ते लिहिते ना!

बुवांच्या विलक्षण करारी स्वभावाविषयीं एक आठवण सांगण्यासारखी आहे. आवाज फुटल्यामुळें भाऊराव कोल्हटकरांनीं हलकीं कामें सांगून अपमान केल्यावर बुवांनीं 'किर्लोस्कर कंपनी' सोडण्याचें ठरवलें व तोंपर्यंत स्त्री-पात्री नट म्हणून वाढविलेले केस कारागिराकडून काढवून साफ गोटाच करून घेतला. "मीं कंपनी सोडली." म्हणून सांगण्यासाठीं बुवा भाऊरावांपुढें उभे राहिले आणि "भास्करचा भास्करबुवा होईन, तेव्हांच आपणास तोंड

दाखवीन!" असें म्हणून निघून गेले. अशा जिद्दीच्या माणसांच्या हातूनच कांहीं अचाट कार्य होत असतें.

असाच आणखी एक उत्कट प्रसंग, चित्रकारानें चित्र काढावें, असा आहे. इंदूरला 'मदारसा हायस्कूल' च्या समारंभांत महाराजांच्या स्तुतिपर स्वागत-गीत म्हणायचें होतें. आश्चर्य वाटेल, पण हें स्वागत-गीत रचलें होतें अण्णासाहेब किर्लोस्करांनीं आणि गायलें तें भाऊराव कोल्हटकर, बाळकोबा नाटेकर, मोरोबा वाघोलीकर आणि तरुण भास्कर बखले ह्यांनीं! साथीला होते खुद्द बंदेअलीखांसाहेब बीनकार व तबल्यावर प्रत्यक्ष नानासाहेब पानसे! संगीतांतलीं हीं नांवेंच इतकीं महान् आहेत, कीं इंदूरच्या त्या प्रसंगाच्या निमित्तानें तीं एकत्र आल्यावर स्वर्गांगनांनींच त्यांची अगदीं मनोभावानें दृष्ट काढली असेल!

केळकरांनीं सांगितल्यापासून आज दोन महिने बुवांविषयीं उपलब्ध असलेलें वाङ्मय, ग्रंथासाठीं जमवलेल्या आठवणी, खुद्द चरित्राचें हस्त-लिखित, वगैरेंचें वाचन करण्यांत आणि बुवांच्या गायकीविषयीं चिंतन करण्यांत गेलेला काळ फार आनंदांत गेला आणि आधींच वाटत असलेला बुवां-विषयींचा आदरही दुणावला. बुवांचें नांव आतां संगीतांतल्या ऋषि मुनींच्या मालिकेंत, म्हणजे हरिदासस्वामी, बैजूबावरा, तानसेन, सदारंग ह्यांच्या जोडीला जाऊन बसलें आहे. अनेकांनीं तशा चिजाही केलेल्या आहेत. त्यांतील एका अज्ञात गायकानें रचलेल्या आणि बावीस सालीं जालंदरच्याच देवी तलावाच्या मैफलींत बुवांच्या स्तुतिपर गायल्या गेलेल्या 'हंसकिंकिणी' रागांतल्या चिजेनेंच हें गुणगान संपविणें उचित होईल :

विद्या बरवाने गुणी, नमन गुणको करे
मान-अपमान को भेद न माने ।
नमन करे हरिदास, बैजू, तानसेन को
सदारंग, भास्कर को, नित नाम ध्यावे ॥

केळकरांच्या ह्या चरित्रग्रंथाला सुयश लाभो!

**वामन हरि देशपांडे**

कृष्ण निवास, ५८ बी, वाळकेश्वर रोड, मुंबई ६

# हित-गूज

मीं मनांत योजलेल्या 'देव-गंधर्व' भास्करबुवा बखले ह्यांच्या चरित्राच्या लेखनाचें कार्य श्री. केळकर ह्यांनीं केलें, ह्यामुळें अतिशय आनंदानें मी हें आत्म-कथन लिहीत आहें. हें निवेदन लिहिण्याचा हेतु ह्या चरित्राचा पूर्वेतिहास देण्याचा आहे.

'मूकं करोति वाचालम्। पंगुं लंघयते गिरिम्॥' ह्या महाकवीच्या उक्तीप्रमाणें, किंवा टेनिसनच्या विख्यात ओळीप्रमाणें, इच्छेच्या उत्कटतेनेंच इच्छा सफळ होतात. तसेंच माझें झालें.

'देव गंधर्व' भास्करबुवा बखले देव-लोकीं जाऊन आज पंचेचाळीस वर्षें झालीं आणि आतां त्यांचें सु-विस्तृत चरित्र प्रसिद्ध होत आहे. तें वाचतांना वाचकास गुदगुल्या झाल्यावांचून राहाणार नाहींत. चरित्राच्या मूळ कल्पनेला सुरुवात मजसारख्या साहित्य-पंगूकडून होऊन, दुसऱ्या एका भास्करबुवांच्या भक्त अशा अनुभवी साहित्यिकाकडून हा द्रोणागिरी ओलांडला गेला, त्यामुळें माझें मन अत्यंत प्रसन्न झालें आहे.

वास्तविक बुवांचें देव-लोकीं प्रयाण झाल्यापासून वर्षा-दोन-वर्षांतच कोणाही शिष्यानें, भक्तानें, साहित्यिकानें, नाटक-कारानें किंवा इतिहास-कारानें त्यांचें चरित्र लिहून प्रसिद्ध करायला हवें होतें. पण तसें तें झालें नाहीं, हें पाहून खेद होतो व असें कां घडलें नाहीं, हा एक यक्ष-प्रश्नच वाटतो !

कित्येक वर्षांपूर्वी श्री. गोविंदराव टेंबे ह्यांनीं 'रत्नाकर' मासिकांत बुवांच्या गायकीचें वर्णन करण्यासाठीं एक उत्तम लेख लिहिला. बुवांचें गुण-गान त्यांचे चाहाते प्रा. ना. सी. फडके ह्यांनीं आपल्या 'कोंदणें' व 'मुजरे' ह्या लेख-संग्रहांत केलें आहे. बुवांच्या गायकीचें एक अंग श्री. केशवराव भोळे ह्यांच्या 'अस्ताई'त वाचायला मिळतें. पण चरित्र असें मात्र कोणींही लिहिलें नाहीं. प्रो. देवधरांनीं 'संगीत कलाविहार' मध्यें एक अल्प चरित्र-रेखा लिहिली. शिल्पकार फडके ह्यांनींही बुवांचें माहात्म्य 'कलाविहारां'त व 'लोकसत्ते'त प्रसिद्ध केलें. बुवांच्या गाण्याची व महात्म्याची आठवण अजूनही संगीताच्या दुनियेंत जराही अस्पष्ट झालेली नाहीं.

आतां बुवांचे भक्त, विख्यात चित्रकार श्री. नीळकंठ महादेव केळकर ह्यांनीं हें चरित्र लिहून तें प्रसिद्ध होत असतांना माझा बुवांशीं कस-कसा संबंध आला, ते सर्व प्रसंग डोळ्यांपुढें चित्र-पटाप्रमाणें स्पष्ट दिसत आहेत.

व्यक्तिशः बुवांना आदरांजलि वाहाण्याच्या ह्या प्रसंगीं बुवांविषयीं माझ्या मनांत जो आदरभाव प्रस्थापित झाला, तें वृत्त ह्या चरित्राच्या वाचकांस सांगून, मीं केलेल्या प्रयत्नांचा इतिहासही थोडक्यांत येथें नमूद करावा, ही चरित्र-लेखक श्री. केळकर ह्यांची सूचना मी सादर स्वीकारीत आहें.

१९१८ सालीं गणेशोत्सवांत जमलेल्या २८ रुपयांत एक गाणें 'गजानना'-पुढें व्हावें, ह्या संकल्पामुळें माझा ह्या महान् गायकाशीं अचानक परिचय झाला. 'शींव' हें त्या काळचें खेडें. तेथें आम्हीं गणेशोत्सव करायचें ठरवलें. कीर्तन, व्याख्यान, वगैरे कार्यक्रम ठरवला. गाणें सर्वोत्तम गायकाचें करावें, असेंही ठरवलें व तपास सुरू केला. आम्हांस बातमी लागली, कीं मुंबईस ग्रँट रोडजवळच्या शास्त्री हॉलमध्यें 'भास्करबुवा बखले' नामक फार मोठे गायक राहातात.

आम्ही मुलें-मुलें त्यांना जाऊन भेटलों. त्यांना विनंती केली व त्यांनीं एकदम ‘ हो ’ म्हटलें. दिवस पक्का केला, वेळ ठरवली व परत निघालों. बुवांना बिदागी काय द्यावी लागेल, हें विचारायचेंच विसरलों. पुन्हा परत गेलों. “ आमचा खेड्यांतला उत्सव, तुमची योग्य बिदागी देण्याचं आमचं सामर्थ्य नाहीं. ” हें आमचें बोलणें ऐकून बुवा हसले. म्हणाले, “ उत्सव म्हणजे देवाची सेवा. तुमच्याबरोबर मी पण सेवा करीन. ” उत्सवाचा एकंदर हिशेब सांगून “ आम्ही गाण्यासाठीं फक्त २८ रुपये खर्च करूं शकूं. ” असें आम्हीं म्हणतांच बुवा एकदम म्हणाले, “ ठीक आहे. गाणं कायम झालं. ”

बुवांच्या ह्या वागणुकीनें आम्ही अगदीं भारावून गेलों. व्यक्तिशः माझ्या मनांत त्यांच्याविषयीं अत्यंत पूज्य-भाव उत्पन्न झाला. बुवांना बिदागी काय द्यावी हें समजण्याइतका पोंच तेव्हां आम्हांला नव्हता. आतां हळहळ वाटते.

ह्या गाण्यामुळें दर वर्षीं शींवच्या गणेशोत्सवांतल्या शनिवारीं बुवांचेंच गाणें व्हावें, अशी प्रथा पडली. आमचा ठराव झाल्याशिवाय बुवा दुसऱ्या कोणाचाही ‘ शनिवार ’ ठरवीत नसत. सतत चार वर्षें बुवा गणेशोत्सवांत शींवला येऊन गणेशाची सेवा करीत.

गाणें आटोपल्यावर पहाटेच्या गाडीने बुवा परत जात. परंतु १९२१ सालीं ते उत्सवांतल्या गाण्यानंतर परत न जातां “ तुमच्या बिऱ्हाडीं झोपतों, सकाळीं परत जाईन. ” असें म्हणाले. त्यांना बहुधा थकवा आला असावा. बुवा आपल्याकडे झोपणार, हें ऐकून मला फार आनंद झाला. पण त्या चाळींत बुवांना कोठें, कसें झोपवावें, ह्या कल्पनेनें संकोचही वाटला. शेवटीं चाळीच्या गॅलरींतच त्यांचें अंथरूण घातलें. सकाळीं चहा-पाणी करून स्वारी आनंदानें मुंबईस गेली. हीच त्यांची शींवला शेवटची भेट. १९२२ सालीं बुवा वैकुंठाला गेले. पण भविष्य-कालीन घटना लक्षांत घेतां, बुवांचा त्या दिवशींचा मुक्काम हें एक आप्तपणा निर्माण करण्याचें प्रसाद-चिन्ह ठरलें.

शींवच्या बैठकीमुळें बुवांचा व माझा परिचय वाढत गेला. बुवांची कोठेंही बैठक असो, त्यांचा निरोप यायचा. मी व माझे मित्र कै. देवधर बुवांच्या दर बैठकीस हजर राहूं लागलों. गाणें संपल्यावर गाडी न मिळाल्यास,

पहाटे त्या ओसाड भागांतून, भुताखेतांची भीति मनांत न येतां, दादर ( हिंदु कॉलनी ) ते शींव, आम्ही रान तुडवीत परत जात असूं. बुवांच्या गाण्याची धुंदी आमच्या सोबतीस असे.

बुवांच्या प्रत्येक मैफलीला, त्यांच्या भक्तांचा तांडाच्या तांडा जाई. बुवा सर्वांच्या गाडी-घोड्याच्या भाड्याचा खर्च करायचे. आमचा खर्च आम्ही करीत असूं. बुवा म्हणायचे, " बडे लोक आहेत, त्यांच्या खर्चाचे पैसे आपण गरीब लोक कोण देणार ! "

लोकमान्यांच्या मृत्यूनंतर महात्माजींनीं सुरू केलेल्या लोकमान्य टिळक-स्मारक-फंडाला एक कोट रुपयांचा निधि जमवायचें ठरलें होतें. 'संयुक्त मानापमान' करायचें ठरलें. बुवा कोणालाही न सांगतां अगदीं अज्ञात स्थळीं निघून गेले. त्या अज्ञात स्थळीं त्यांची व माझी अकल्पित गांठ पडली. त्यांचा तो उद्वेग, मनस्ताप व दुःख पाहाण्याची पाळी माझ्यावर आली.

सातारा येथील एका नामवंत गृहस्थाची कन्यका लग्नाची होती व आमचें स्थळ त्यांनीं विचारांत घेतलें होतें. 'संयुक्त मानापमान' पाहून मुलगी पाहायला जावें, असें मनांत होतें. तिकिटेंही काढलीं होतीं. पण वडलांच्या इच्छेप्रमाणें नाट्य-प्रयोगापूर्वींच मी साताऱ्याला मुलगी पाहायला गेलों. " वडील निर्णय कळवतील, " असें त्या गृहस्थांस सांगून, मी मुंबईस परत जायला निघालों. " अरे, तुझे मुंबईचे भास्करबुवा इथें आलेले पाहिले. " असें मेहुण्यांच्या बोलण्यांत आलें. बुवाही मुंबईस परत जाणार असतील, अशी कल्पना मनांत आली. बुवांना अ-कारण भेटावें, इतकी त्यांची-माझी घसट नव्हती, पण मेहुण्यांबरोबर बुवांच्या भेटीस गेलों. बुवा ओटीवरच स्तब्ध बसले होते. त्यांना नमस्कार करून मी बाजूला बसलों. मला पाहातांच त्यांना आनंद झाला. " इकडे साताऱ्याला कसे ? " वगैरे विचार-पूस त्यांनीं केली.

" मुंबईस 'संयुक्त मानापमान' पाहायला आपण येणार असालच, आपण बरोबरच जाऊं. " असें मीं म्हणतांच त्यांची प्रसन्नता लोपली. मुद्रा बदलली व नजर जराशी करडी-करारी झाली. ते म्हणाले, " तुम्हांला जायचं असलं तर जा, पण एक करा, कीं नारायणरावाला मी इथें आहें, हें अजिबात कळूं देऊं नका. त्याला कळलं, तर तो मला वाटेल तें करून नाटकाला घेऊन

जाईल." मीं न जाण्याचें कारण विचारलें. "माझं कारण समजल्यावर 'नाटकाला जाणार नाहीं' असं वचन देत असाल, तर कारण सांगतों." बुवांच्या डोळ्यांत अश्रु उभे राहिले. "मला माझ्या शिष्याचा पाडाव झालेला बघायचा नाहीं." असें म्हणून बुवांनीं आपण नारायणरावाचें मन वळवण्यासाठीं केलेल्या प्रयत्नांचें वृत्त सांगितलें.

बुवांना वचन दिल्याप्रमाणें मी 'संयुक्त मानापमाना'च्या प्रयोगाला गेलों नाहीं. बुवांना तेवढेंच समाधान वाटलें.

मी बुवांच्या गायकीच्या परंपरेचा भक्त बनलोंच होतों. बुवांजवळ मीं गाणें शिकायचें ठरवलें. तसें मीं बुवांना बोलूनही दाखवलें. "मी जालंदर, शिकारपूरकडील दौऱ्यावरून आलों, म्हणजे मग शिकवणीचं बघूं." असें म्हणून बुवा दौऱ्यावर गेले. १९२२ मध्यें बुवांचा अंतकाल झाला, त्यापूर्वीं मी मास्तर कृष्णरावांकडे जाऊं लागलों होतों. बुवांच्या मृत्यूनंतर मुंबईंत शोक-सभा झाली. गणपतबुवा पुरोहित, मणेरीकर मास्तर, विलायतहुसेनखां, शिल्पकार फडके, 'संदेश' कर्ते अच्युतराव, वगैरे मंडळींचीं बुवांविषयीं भाषणें झालीं व दुखवट्याचा ठराव बुवांच्या कुटुंबास मीं पोंचवावा, असें ठरलें. बुवांच्या अंत्य-संस्कारासाठीं घरची मंडळी माहुलीस गेली होती, तेथें मीं ठराव पोंचता केला. मी आतां बुवांच्या जागीं मास्तरना मानून त्यांच्याकडे शिक्षणासाठीं जाऊं लागलों. नोकरी करून उरलेल्या वेळांत गाणें शिकण्याचा क्रम सुरू होता. मास्तरांबरोबर, काश्मीर, म्हैसूर, वगैरे ठिकाणीं गेलों. तेथें बुवांची महति सांगणाऱ्या आठवणी जागोजाग कानीं पडूं लागल्या.

भास्करबुवांविषयींचा परमादर देशभर पसरलेला पाहून त्यांचें चरित्र लिहिलें जावें, निदान आपण ती माहिती जमवावी, असें वाटूं लागलें. मध्यंतरीं कै. भास्करबुवांच्या कन्येशीं विवाह होऊन मी त्यांच्या भक्ताप्रमाणें आप्तही झालों होतों. बुवांचें चरित्र लिहिण्याची आपली पात्रता नाहीं, तेव्हां निदान चरित्र-विषयक माहिती जमवण्याचें काम तरी करावें, नंतर एखाद्या चांगल्या लेखकाला चरित्र लिहायला सांगतां येईल, असें मीं मनाशीं ठरवलें. मास्तर कृष्णराव ह्यांनींही साहाय्य देण्याचें आश्वासन दिलें. त्याप्रमाणें १ ऑक्टोबर, १९४३ रोजीं मास्तर कृष्णरावांच्या सहीचें पत्रक छापवून तें

बुवांच्या सर्व आतेष्ट, शिष्य, चाहात्या, संबंधित लोकांकडे पाठवलें. अनेकांकडून पत्रें व सहकार्याचीं आश्वासनें मोठ्या हुरूपानें आलीं.

बुवांचे मित्र व शिष्य पित्रे वकील, ह्यांनीं सुमारें चाळीस फूलस्कॅप पानें मजकूर अत्यंत सुसंगत व गुण-ग्राहकतेनें लिहून पाठवला. हुबळी-धारवाडच्या बुवांच्या अनेक चाहत्यांकडून त्यांनीं माहिती जमवून पाठवली. ठोसरस्वामी, 'रियासत'कार सरदेसाई, श्रीगोंदेकर, वगैरे मंडळींनीं सविस्तर वृत्तान्त लिहून दिले. ग्वाल्हेरचे महान् अधिकारी गायक राजाभय्या पूंछवाले, 'गोपाळ गायन समाजा'चे गोविंदराव देसाई, विनायकबुवा पटवर्धन, वगैरे जाणकारांनीं आत्मीयतेनें बुवांच्या आठवणी लिहून, आदरांजलि अर्पिण्याची उत्सुकता दर्शवली. मीं ह्या सर्वांचे कोणत्या शब्दांत आभार मानावे, हेंच मला सुचत नाहीं. मी ह्या सर्वांचा अतिशय ऋणी आहें.

बडोदें, वगैरे अनेक ठिकाणीं जाऊन, मी बुवांचे गुरुबंधु, वगैरे शक्य त्या सर्वांस भेटलों. शंकरभय्या, वगैरे अनेक संबंधितांस भेटलों. त्यांच्या मुलाखती व सह्या घेऊन, बरेंचसें चरित्र-साहित्य जमवलें. पुढें चरित्राची एक रूप-रेषाही लिहून काढली.

मजजवळचें सर्व साहित्य व चरित्राची रूप-रेषा घेऊन, मीं गायन व लेखन ह्या दोनही क्षेत्रांत जाणकार असलेल्या अशा अनेकांकडे साहित्यिक साहाय्य मागितलें. परंतु त्यांचें धोरण मला समाधानकारक वाटलें नाहीं. त्यांनीं सहानुभूति दर्शवली त्याबद्दल मला कृतज्ञता वाटते.

शेवटीं आठवणी व चरित्राची त्रोटक रूप-रेषा, कोणातरी उत्तम संगीतज्ञ लेखकाच्या पुरस्कारानिशीं छापून टाकावी व आपण चरित्राची उणीव अंशतः तरी भरून काढावी, असें मला वाटूं लागलें. पोटाचा व्यवसाय संभाळून मला हें काम करायचें होतें. तरीही ह्या कामीं जो प्रदीर्घ विलंब झाला, तो माझ्या औदासीन्यामुळें वा चुकारपणामुळें नव्हे, एवढेंच मला ह्या चरित्राच्या वाचकांना नम्रपणें सांगायचें आहे.

बुवांबरोबर त्यांची अफाट विद्या व कला गेली. श्री. नारायणराव राजहंस (बालगंधर्व) व मास्तर कृष्णराव ह्यांनीं बुवांच्या वळणाचें गाणें घरोघरीं लोकप्रिय केलें. मास्तर कृष्णरावांकडे कांहीं काळ शिकलेल्या श्री. रामभाऊ

मराठे ह्यांनीं निदान मास्तर कृष्णराव व नारायणराव ह्यांचें अतिशय रंजक गायनाचें वळण टिकवलें आहे. पर्यायानें बुवांच्या वळणाचा लाभ अगदीं अल्पांशानें कां होईना, आजच्याही संगीत-प्रेमी लोकांस होत आहे.

बुवांनीं स्वतः सारीगम रूपानें लिहिलेल्या अनेक रागांतील त्यांच्या चिजा, वगैरे अनेक महत्त्वाचे अवशेष अजूनही उपलब्ध आहेत. ते सर्व क्रमानें प्रसिद्ध करतां येतील अशी खात्री वाटते. बुवांचें जरीचें उपरणें, कद, साफा, वगैरे कांहीं वस्तुही रक्षिल्या गेल्या आहेत. बुवांचे सर्व उपलब्ध फोटो व वरील सर्व वस्तु ह्यांचा संग्रह 'भारत गायन समाजां'त करावा, अशी इच्छा आहे. क्रमानें ह्या सर्व गोष्टी साध्य होतील, अशी आशा आहे. तूर्त प्रस्तुत चरित्र-लेखनाचा योग कसा आला, तें येथें नमूद करून ठेवणें अवश्य वाटतें.

गेल्या पावसाळ्यांत ऑगस्टमध्यें मुंबईचे विख्यात चित्रकार-लेखक श्री. नी. म. केळकर अचानक मजकडे आले व त्यांनीं मला चरित्र-लेखना-विषयीं काय प्रगति झाली, तें विचारलें. श्री. नी. म. केळकर हे 'भारत गायन समाजा'चे एक थोर कार्यकर्ते रावसाहेब केळकर ह्यांचे चुलतबंधु असून, ते बुवांच्या सहवासांत अनेक वर्षें राहिलेले संगीत-प्रेमी आहेत, असें मला त्यांच्या बोलण्यावरून समजलें. त्यांनाही चरित्र पूर्ण व्हावें अशी उत्कंठा आहे, हें माझ्या निदर्शनास आलें. मीं मजजवळचा एकूण एक कागद, आठवणी, चरित्राची रूप-रेषा, वगैरे सर्व साहित्य चित्रकार केळकरांच्या स्वाधीन केलें. श्री. केळकरांनीं ते सर्व कागद नीट फायलींत लावून बुवांच्या जीवनांतील घटनांची कालानुक्रमवार जंत्री केली. अनेक पुस्तकें गोळा करून, अनेकांना भेटून, कित्येकांशीं पत्र-व्यवहार करून, त्यांनीं संपूर्ण चरित्र दोनदा लिहून काढलें. मी ही प्रगति आनंदानें नित्य पाहात आलों.

इतिहासज्ञाची चिकित्सक सत्यान्वेषी दृष्टि, बुवांच्या गाण्याचें वेड, संगीताच्या अनेक अंगांचें विवेचन व अनुरूप भाषा ह्यांमुळें श्री. केळकरांनीं लिहिलेलें चरित्र सजूं लागलें. बुवांच्या अनेक जाणकार मित्रांना श्री. केळकर ह्यांनीं पुस्तकांतील बराचसा भाग वाचून दाखवला. श्री. कऱ्हाडकरबुवा, श्री. बापुराव राजहंस ह्यांनीं चरित्राविषयीं संपूर्ण समाधान व्यक्त केलें. मुळांत मीं कोणत्याच

वैयक्तिक स्वार्थानें वा लौकिकाच्या लालचीनें हें काम आरंभलें नव्हतेंच. त्यामुळें मीं गोळा केलेली सर्व साधन-सामुग्री मीं श्री. केळकरांसारखा बुवांचा योग्य असा भक्त भेटतांच त्याच्या स्वाधीन केली व त्या भक्तानेंही त्या सामुग्रीचें पूर्ण सार्थक केलें, हें पाहून, मला व्यक्तिशः किती आनंद झाला आहे, तें कोठवर सांगावें !

श्री. केळकरांनीं स्वतः अतोनात श्रमपूर्वक चरित्र लिहिलें, फोटो मिळवले, नवीन खूप माहिती मिळवली व शेवटीं एखाद्या थोर नामवंत व्यक्तीला चरित्र अर्पण न करतां मजसारख्या बुवांच्या अगदीं सामान्य भक्ताला तें पुस्तक अर्पण केलें. मी ही अर्पण-पत्रिका पाहून चकितच झालों. मला हा बहुमान स्वीकारतांना विलक्षण संकोच वाटत आहे. परंतु केळकरांनीं हें एवढें महत्त्वाचें थोर काम केलें आहे, कीं त्यांच्या आग्रहापुढें मला कांहींच बोलतां येत नाहीं. म्हणून बुवांच्या असंख्य भक्तांचा व प्रेमी जनांचा एक नम्र प्रतिनिधि ह्या नात्यानेंच मीं ह्या समर्पणाचा स्वीकार केला, हें येथें नमूद करणें, मी माझें कर्तव्य समजतों.

श्री. केळकरांनीं बुवांच्या भक्तीनें ही त्यांची जी सेवा केली आहे, त्याविषयीं सर्व संगीत-प्रेमी जनता त्यांना शतशः धन्यवाद देईल, ह्यांत संदेह नाहीं. मी सर्वांच्या आधीं केळकरांचें आनंदानें अभिनंदन करीत आहें.

**माधवराव धामणकर**

# प्रास्ताविक आणि ऋणनिर्देश

हरिभाऊ आपटे ह्यांचें मीं लिहिलेलें त्रोटक चरित्र बऱ्याच वर्षांपूर्वी प्रसिद्ध झालें होतें. तेंच पुष्कळ विस्तृत स्वरूपांत मीं पुन्हा लिहिलें आणि हरिभाऊंच्या जन्मशताब्दीनिमित्त ८ मार्च, १९६४ रोजीं तें ' भारत गौरव ग्रंथमाले ' नें प्रकाशांत आणलें. त्यानंतर मी पुण्यास गेलों असतां माझे चुलत बंधु श्री. सीताराम विष्णु ऊर्फ रावसाहेब केळकर ह्यांनीं ' भारत गायन समाज ' ह्या संस्थेची पूर्ण बांधकाम झालेली इमारत मला दाखवली. हें कार्य तडीस नेतांना किती अडचणींना तोंड द्यावें लागलें व काय काय संकटें आलीं, तेंही वृत्त मला क्रमानें समजलें.

ह्या नव्या इमारतींतील मैफलीची जागा, जुन्या मंडळींचीं व नामांकित गवयांचीं चित्रें, ह्यांचें दर्शन घडतांक्षणीं माझ्या डोळ्यांसमोर भास्करबुवांचें तें प्रसन्न व्यक्तिमत्व उभें राहिलें. मीं ऐकलेल्या त्यांच्या अगणित मैफली माझ्या मनांत साकार झाल्या. पुनः ते सुंदर जमलेले तंबोरे व गायनाचे स्वर कानांत गुंजन करूं लागले.

ही नवी वास्तु पाहून अतिशय आनंद झाला. बुवांच्या नंतर अष्टेकरबुवा, बापुराव केतकर, रावसाहेब केळकर, वगैरे मंडळींनीं अत्यंत हलाखीच्या स्थितींत समाज टिकवला, एवढेंच नव्हे, तर तेथें आतां एक संगीत शाळा सुसंघटितपणें सुरू आहे, एका छोट्या ग्रंथालयाची सुरुवात झाली आहे, सभा, चर्चा, मैफली, वगैरे कार्यक्रम चालू आहेत, आणि ह्या सर्वांच्या द्वारा बुवांच्या स्मृतीचा नंदादीप तेवत आहे, हें पाहून अत्यंत समाधान वाटलें. पण अनेक उणीवांचीही तीव्र जाणीव झाली. बुवांचें उत्तम तैलचित्र, बुवांचें चरित्र, इत्यादि जें जें शक्य असेल तें तें करून, बुवांचें स्मरण जितकें परिपूर्ण करतां येईल तितकें तें करावें, असें मला वाटलें.

ह्या संदर्भात मीं रावसाहेब केळकर ह्यांस विचारलें. तेव्हां ते म्हणाले, " मास्तर कृष्णराव व बुवांचे जामात श्री. धामणकर ह्यांनीं चरित्र-लेखनाचा प्रयत्न सुमारें वीस वर्षांपूर्वीच केला होता, तें कार्य कां व कुठवर येऊन स्थगित झालं आहे, हें मला निश्चित ठाऊक नाहीं. "

मी मास्तर कृष्णरावांस भेटलों. त्यांना मी निकरावर येऊन म्हणालों, " आतां माझ्या वयाची पासष्टी उलटलेली आहे. तुम्हींही सत्तरी गांठलीत. आतां जर बुवांचं चरित्र, स्मारक, वगैरे कामं वेगानें केलीं नाहींत, तर सर्वच कार्यनाश होईल. एका वर्षांत निदान हें काम झालंच पाहिजे."

मास्तर कृष्णराव ह्यांना अशी नोटीस देऊन, मी मुंबईस परतलों आणि श्री. माधवराव धामणकर ह्यांस भेटलों. त्यांचा व माझा विशेष परिचय नव्हता.

मी बुवांचा निस्सीम भक्त, रावसाहेब केळकरांचा भाऊ व एक अनुभवी लेखक आहें, हें पाहून श्री. धामणकरांनीं स्वतः जमवलेलें सर्व साहित्य माझ्या स्वाधीन केलें. त्यांना बुवांविषयीं कितीही आत्मीयता वाटत असली, तरी ते लेखक नव्हत. कोणाही कुशल व अनुभवी लेखकानें चरित्र-लेखन करायचें मनावर न घेतलें, तर स्वतः जमवलेल्या आठवणी व लिहून काढलेली संक्षिप्त चरित्र-रेषा प्रसिद्ध करावी, जमल्यास एखाद्या संगीतज्ञा-कडून पुरस्कार लिहून घ्यावा, अशा निर्णयाला ते आले होते.

श्री. धामणकरांनीं जमवलेलें साहित्य मीं पुनः पुनः वाचून पाहिलें. त्यांनीं लिहिलेली चरित्र-रेषाही वाचून पाहिली. माझी खात्री झाली, कीं ह्या

माहितींत संशोधनपूर्वक भर घातली, कालानुक्रमाबद्दल दक्षता बाळगली, तर साधारण बरें चरित्र लिहितां येईल. मीं सर्व उपलब्ध माहिती संगतवार लिहून काढली. अनेक कालखंडांची मुळींच माहिती नव्हती. बुवांची गुरु-परंपरा, त्या त्या गुरूचें वैशिष्ट्य व त्यांच्या प्रभावानें बुवांच्या अष्टपैलू कलेला प्राप्त झालेलें रूप, हें सारें नीट लिहिणें फार विकट आहे, हेंही माझ्या लक्षांत आलें.

मीं नेटानें प्रयत्न सुरू केला. बुवांच्या जीवन-पटाची कालानुक्रमवार जंत्री केलीच होती. त्याशिवाय तत्कालीन गायकांचीं चरित्रें, गायनविषयक लेख, टीका, इत्यादि सर्व साधन-सामुग्री मिळवली. माझे जुने मित्र हरिश्चंद्र बाली, पंडित महामहोपाध्याय दिलीपचंद्र वेदी, इत्यादि मित्रांना अधिक माहिती लिहिण्याबद्दल विनंती केली. अनेक विद्वान् गवयांना व बुवांच्या चहात्यांना भेटलों. जस-जशी माहिती जमा झाली, तस-तसा चरित्राचा कच्चा आराखडा लिहून काढला. पुनः पुण्यास गेलों. बुवांचे सर्व उपलब्ध फोटो मिळवले. 'भारत गायन समाज', 'सोशल क्लब' मधील 'भरत नाट्य-संशोधन केंद्र', श्री. शिवरामबुवा गुरव ह्यांचें घर, इत्यादि ठिकाणीं पाऊणशें वर्षांपूर्वींपर्यंतचे अनेक दुर्मिळ फोटो मिळाले. मी बुवांचें चरित्र लिहीत आहें असें पाहून, प्रत्येकानें मला मोठ्या उत्साहानें साहाय्य केलें.

गायनाभ्यासी चिकित्सक लेखक श्री. वामनराव देशपांडे ह्यांना मीं लिहिलेली चरित्राची कच्ची प्रत वाचायला दिली. त्यांनीं प्रत्येक विधानाचा पुरावा मागितला. गुरुपरंपरेचा खुलासा मागितला. त्यांनीं स्वतःच्या संगीत-विषयक संग्रहांतून अनेक दुर्मिळ पुस्तकें मला दिलीं. 'महाराष्ट्र संगीत विद्यालया'चे वृद्ध गायनाचार्य बाबुराव गोखले ह्यांच्या ग्रंथ-संग्रहाचें मला नेहमींच साहाय्य मिळत आलें आहे. त्यांनींही अनेक पुस्तकें दिलीं. सर्वांनींच आत्मीयतेनें मला साहाय्य केलें. त्यांचे केवळ शाब्दिक आभार कसे मानूं?

पुण्याचे विख्यात फोटोग्राफर श्री. वा. ना. भट ह्यांनीं अनेक फोटोंच्या नकला करून निगेटिव्ह करून दिल्या. ते तर मला मदत करायला सदाच तत्पर असतात. गायिका योगिनी जोगळेकर आणि वृद्ध चित्रकार व वादनपटु श्री. रघुवीर पेंटर ह्यांनीं दोन जुने फोटो दिले. मला सर्वांनींच हौसेनें साहाय्य केलें. श्री. माधवराव धामणकर, रावसाहेब केळकर, मास्तर कृष्णराव,

बुवांचे नातू श्री. सुहास दातार, इत्यादि मंडळींचें साहाय्य हें तर घरचें, गुरुगृहींचें साहाय्य. ह्यांचे आभार मानलेले ह्या घरच्या मंडळीस मुळींच आवडणार नाहींत.

गुरुवर्य कऱ्हाडकरबुवा व श्री. बापुराव राजहंस ह्यांनीं चरित्र-वाचन ऐकलें व खूप प्रोत्साहन दिलें. बापुरावांनीं स्वतःला सुचलेली पुरवणी माहिती दिली, जुन्या चिजा गाऊन दाखवल्या, मार्मिक चर्चा केली. प्रा. ना. सी. फडके ह्यांनीं स्वतःच्या लेखनाकडे अंगुलि-निर्देश केला. मीं अनेकांच्या लेखनांतून माहिती व उतारे घेतले आहेत; त्यांच्या ऋणाचा निर्देश येथें कृतज्ञतापूर्वक केला पाहिजे.

मी बडोद्यास गेलों. बुवांच्या हकिकती ठाऊक असणाऱ्या अनेकांस भेटलों. वृद्ध कीर्तनकार नानाबुवा सुपेकर, रेकॉर्ड ऑफिसांतील श्री. खरे व श्री. गोखले, गायक श्री. पंचाक्षरीबुवा, वगैरे अनेकांनीं माहिती देण्याचा प्रयत्न केला. वृद्ध विद्वान् गायिका हंसाबाई ह्यांनीं फैजमहंमद ह्यांजबद्दल माहिती दिली. त्यांच्या सद्भावनेबद्दल मला कृतज्ञता वाटते.

माझा संगीताशीं व भास्करबुवांशीं जो दृढ संबंध जडला, त्याबद्दल येथें थोडें आत्मकथन करणें प्रसंगोचित ठरेल.

माझ्या वडलांनीं कांहीं नाटक-मंडळ्यांना आर्थिक साहाय्य केलें. 'नाट्यकला प्रवर्तक मंडळी' चे मालक श्री. पटवर्धन, श्रेष्ठ गायक रामभाऊ कुंदगोळकर, इत्यादि मंडळींचा आमच्या घरीं अनेकदा दीर्घ मुक्काम असे. रामभाऊंचे तंबोरे अनेकदा तिसऱ्या मजल्यावर माझ्या निजायच्या खोलींत ठेवलेले असत. निसारहुसेन, रामकृष्णबुवा वझे, वगैरे लोकांचा तर आमच्या घरीं अड्डाच असे. मला नित्य उत्तम गाणें ऐकायला मिळे. माझा आवाज जात्याच गोड व सुरेल असल्यामुळें नाटकांतील पदांचें आणि गोहरजान, जानकीबाई, जोहराबाई, वगैरे गायिकांच्या ध्वनि-मुद्रिकांचें अनुकरण, ही माझी त्या वेळची गायनसेवा असे. तान फिरणें व तीही ह्या उत्तम नमुन्यांच्या वळणाची आणि अखंड गाणें, ह्यांमुळें माझ्या गाण्यांत, मुख्यतः आवाजांत, आकर्षण असे. आमचें घर खूप मोठें. तिसऱ्या मजल्यावरच्या मनसोक्त गाण्याचा उपद्रव घरच्या मंडळींना होण्याची शक्यता नव्हती.

आमच्या घरीं श्री. गणपणतबुवा पाध्ये हे ध्रुपद-टप्पा-गायक विद्वान् गृहस्थ अनेक वर्षें भाडेकरू म्हणून राहात असत. ते फैजमहंमदखां ह्यांच्याकडे कांहीं काळ शिकले होते. पहाटे त्यांची शिकवणी सुरू झाली, कीं बुवा मला बोलावून शिकायला बसवायचे. बुवा शिकवतील तीं ध्रुपदें माझ्या वाहात्या गळ्यांतून चटकन् नीट उच्चारलीं जात. सरळ आलाप सहज येत.

'नाट्यकले' चे मालक पटवर्धन ह्यांचा पुतण्या आमच्याच घरीं राहात असे. त्याला तबला-वादनाचें वेड. तो मेहनतीला बसला, कीं एका जोडीवर मी स्थिर लयीनें ठेका धरावा, आणि त्यानें दुपटी-चौपटीनें पर्णे वाजवावीं. मी सर्व ताल शिकलों. अशा प्रकारें स्थिर लय, नरम वादन, इत्यादि गुणांचा मला दृढ परिचय झाला.

सूक्ष्म स्वर आणि चतुर लयकारींतील सौंदर्य ह्यांची ओळख असली, तरी स्वतः उत्तम गायन-वादन करण्याइतका रियाज करायला मला वेळ नसे. शाळेचा व नंतर कॉलेजचा अभ्यास, खेळ, चित्रकलेच्या अभ्यासाची जोड, ह्या सगळ्यांमुळें गाण्याच्या पद्धतशीर रियाजाला मला कधींच वाव मिळाला नाहीं. अगदीं वयाच्या दहाव्या वर्षापासून तप-दोन-तपें मला अखंड, अप्रतिम दर्जाचें गाणें ऐकायला मिळालें. बुद्धीवर उत्तम संस्कार झाले. गुरु पाध्येबुवा हे भास्करबुवांचे गुरुबंधु. ह्यांचा परिचय 'संगीत कलाविहार' च्या १९५१ सालच्या अंकांत एका विद्वान् गायकानें लिहिला आहे. पाध्येबुवा हे भास्कर-बुवांचे अनन्य भक्त. त्यांचें माझ्यावर अपत्य-निर्विशेष प्रेम. गांवांत कोठेंही, कोणाचेंही गाणें असो, रात्रीं अंधाऱ्या रस्त्यांनीं जातांना बुवा मला सोबत म्हणून प्रत्येक मैफलीस घेऊन जात असत. ऐकलेल्या प्रत्येक गाण्यावरील सूक्ष्म मार्मिक टीका ते मला ऐकवत असत.

१९१३ ते १९२२ सालापर्यंत भास्करबुवांची पुण्यांतील एकही मैफल मी सहसा चुकवली नाहीं. मुंबईस आलों, तरी बुवांचें गाणें असलें, कीं गर्दींत घुसायचें; आमंत्रण नसलें तरी संधि मिळेल तेथें गाणें ऐकायचें, हा माझा त्या वेळचा क्रम असे. अजूनही, थोड्या कमी प्रमाणांत कां होईना, मीं गाणें-बजावणें ऐकण्याची संधि सोडत नाहीं.

माझ्या इतर अभ्यासांत संगीतावरील शास्त्रीय ग्रंथांच्या वाचनावर मीं विशेष भर दिलेला असून, नृत्य, नाट्य, वाद्यें, ग यन, वगैरे विषयांचा कालशः

विकास निश्चित करण्याचा मी अल्पसा प्रयत्न करीत आहें. संगीत-विषयक अनेक संस्कृत ग्रंथांचें वाचन झाल्यावर, आतां मला माझ्या जुन्या संस्कारांचा थोडासा अर्थ समजूं लागला आहे. आतां पाध्येबुवांची तात्त्विक चर्चा आठवते. थोडा नवीन अर्थ समजतो. पन्नास वर्षें संगीताचें अखंड वेड लावून घेतल्यावर आतां माझ्यांत गाणें ऐकायची थोडी पात्रता आली आहे.

परंतु भास्करबुवांचें चरित्र लिहायला मी किती अपात्र आहें, ह्याचीही मला इतरांपेक्षां अधिक उत्कट जाणीव आहे. मी विद्वान् गायक नाहीं. तरीही बुवांच्या गायन-विद्येचें रस-ग्रहण करायला मी कोणत्या आधारावर शिकलों ? सवाई गंधर्व, रामकृष्णबुवा वझे, वगैरे अधिकारी मंडळींनीं ह्या विषयावर केलेली चर्चा व त्याहीपेक्षां पाध्येबुवांनीं मला ऐकवलेली सप्रयोग टीका, हेच माझ्या रस-ग्रहणाचे मुख्य आधार आहेत.

पाध्येबुवा माझ्या वडलांना वारंवार म्हणायचे, “ ह्या बाबुरावाचं नरडं कापून घेतलं पाहिजे. केवढी नैसर्गिक देणगी, पण रियाज करीत नाहीं ! ” आतां मात्र मीं लिहिलेलें भास्करबुवांचें हें चरित्र वाचायला ते हयात असते, तर त्यांनीं मला माझ्या शंभर अपराधांची क्षमा केली असती. मला त्यांची मूर्ति डोळ्यांपुढें दिसत आहे. स्वर्गांतून आलेले त्यांचे पुढील शब्दच जणूं माझ्या कानीं पडत आहेत :

“ अरे बाबुराव, तूं हें एक काम मात्र अप्रतिम केलंस. भास्करबुवांचं, गायकांच्या दैवताचं, चरित्र लिहिलंस ; सर्व पापांचं क्षालन केलंस. माझा तुला संपूर्ण आशीर्वाद आहे ! ”

मीं हें काम अजाणपणें परंतु अत्यंत आस्थापूर्वक निष्ठेनें केलें आहे. भास्करबुवांच्या मीं अगणित बैठकी ऐकल्या. प्रत्येक बैठकीचें गुण-ग्रहण पाध्येबुवांच्या तोंडून सप्रयोग ऐकलें. तेवढाच माझा अधिकार. बुवांचें गाणें ऐकलेल्या अधिकारी मंडळींनीं माझें वेडें-वाकडें लेखन गोड मानून घ्यावें, एवढीच त्यांना प्रार्थना.

**नीळकंठ महादेव केळकर**

पुरुषोत्तम बिल्डिंग,
ऑपेरा हाउस पोस्ट-ऑफीससमोर,
मुंबई ४

# भूमिका

भास्कर रघुनाथ बखले हे एक अति-चतुर, अति-विद्वान्, भव्य प्रतिभाशाली गायक होऊन गेले. १८६९ सालीं जन्म घेऊन ते १९२२ मध्यें आपल्या पन्नाशीनंतर लवकरच कालवश झाले. १८८४ सालीं ते 'किर्लोस्कर कंपनीं'त नट म्हणून राहिले. चढा, खुला, गोड गळा असलेला व तालासुरांचा कायदा पाळून गाणारा मुलगा म्हणून ह्यापूर्वीच त्यांचा लौकिक झाला व त्यामुळेंच ह्या पंधरा वर्षांच्या मुलाला श्री. अण्णासाहेब किर्लोस्करांनीं पाचारण केलें. सोन्याचें सलकडें त्यांनीं स्वतःच्या गान-नैपुण्यानें ह्यापूर्वीच मिळवलें होतें. ह्यापुढील आयुष्याचीं अडतीस वर्षें अखंड गायनाभ्यास एकाग्रतेनें करून भास्करबुवांनीं भारतांतील अद्वितीय गायक म्हणून लौकिक मिळवला.

१८८५ सालीं 'किर्लोस्कर कंपनीं'त त्यांना विख्यात वीनकार बंदेअल्लीखां ह्यांनीं स्वखर्चानें गंडा बांधला. सहा महिने त्यांच्याजवळ शिकल्यावर कांहीं महिन्यांनीं वयपरत्वें आवाज फुटून त्यांनीं नाटक-कंपनी १८८६ मध्यें सोडली

व ते बडोदा दरबारचे महान् गवई फैजमहंमदखां ह्यांच्याकडे गाणें शिकण्यास राहिले. १८९४ अखेर तेथील शिक्षण पूर्ण होतांच, पंचविशी ओलांडण्याच्या सुमारास, ते गवई-पेशांत दाखल झाले. परंतु त्यांनीं आग्रा घराण्याचे नामांकित गायक नथ्थनखां ह्यांच्याजवळ स्वतःचें शिक्षण चालू ठेवलें. १९०१ च्या सुरुवातीस नथ्थनखां मरण पावले, पण त्यांच्याजवळ शिक्षण चालू असतांनाच, पुणें, मुंबई व धारवाड येथें भास्करबुवांच्या अगणित मैफली होऊन त्यांचा लौकिक प्रस्थापित झाला होता. दोन वर्षांतच त्यांनीं स्वतःचे तिसरे गुरुजी अलादियाखां ह्यांच्याजवळ पुढील शिक्षण सुरू केलें. १९२२ सालीं भास्करबुवांना मृत्यूनें गांठलें, तोंपर्यंत ह्या तिसऱ्या गुरूजींकडून त्यांनीं विद्या घेत आमरण विद्यार्थी-दशेंत काळ कंठला. इ. स. १८८० ते १९२२ पर्यंत गायन-कलेचे अभ्यासू विद्यार्थी म्हणून ते जगले. केवळ मृत्यूनेंच त्यांची विद्यार्थी-दशा संपवली.

१८९३ सालीं रावसाहेब माधवराव रानडे हे मुंबईच्या मुख्य न्यायालयाचे न्यायाधीश म्हणून नेमले गेले व त्यांनीं सुरू केलेल्या सार्वजनिक कार्याचें नेतृत्व लोकमान्य बाळ गंगाधर टिळक ह्या महान् विभूतीकडे आलें. त्यांच्या दैदीप्यमान कर्तृत्वाचा काळ हाच भास्करबुवा बखले ह्यांच्या अतुल्य गायनाचा काळ ठरला. गायन-क्षेत्रांत भास्करबुवांची तपस्या, रचनाबुद्धि व प्रभावी आविष्कार हीं केवळ आश्चर्यजनक होतीं. गायन-क्षेत्रांतील ते प्रति ‘ लोकमान्य ’ च होते.

इ. स. १८९५ ते १९२० हा लोकमान्य टिळकांच्या कर्तृत्वाचा काळ. ह्या काळांत महाराष्ट्राचा कायापालट झाला. साऱ्या भारताचें नेतृत्व महाराष्ट्राकडे आलें. विद्या, कला, पराक्रम व निष्ठावंत तपस्या ह्या गुणांनीं मंडित अशीं अगणित थोर माणसें ह्या काळांत महाराष्ट्रांत अलौकिक कार्य करीत होतीं.

अशा कित्येक कार्यकर्त्यांचीं बरींवाईट व बहुशः अपूर्ण चरित्रें लिहिलीं गेलीं. अनेक गायकांचीं चरित्रें त्यांच्या शिष्यांनीं भक्ति-भाव-पूर्वक लिहिलीं, त्यांत गुरु-भक्तीच्या मानानें त्यांनीं चिकित्सा-बुद्धीचा वापर फारच अल्प प्रमाणांत केला. लोकमान्य टिळकांचें तें विद्युल्लतेसारखें तेज व सागरासारखें

खोल गंभीर व्यक्तित्व त्यांच्या कोठल्याच चरित्रांत वर्णिलेलें आढळत नाहीं. गायन-महर्षि बाळकृष्णबुवा इचलकरंजीकरांचा सुरम्य नरम सुरेलपणा, खणखणीत गोड आवाज, त्यांची परंपरागत वळणाची पण कायदेशीर अस्ताई-अंतऱ्याची मांडणी, त्यांच्या अगदीं ८० वर्षांच्या वयांतही अखंड टिकलेली गायनांतील माधुरी व शिस्त, वगैरे त्यांच्या कितीतरी आदरणीय व कौतुकास्पद गुणांचें यथार्थ चित्रण त्यांच्या चरित्रांत वा गायन-चिकित्सा करणाऱ्या लेखांत कोणींही केलें नाहीं. चित्रकारांचीं चरित्रेंच कोणीं लिहिलीं नाहींत. चित्रकारवर्ग हा अत्यंत अहंमन्य, अडाणी कारागीरवर्ग असल्यामुळें स्वतःच्या काल्पनिक पोकळ गुणांच्या आविष्कारांत व प्रसिद्धीच्या शोधांत चित्रकार दंग असतात. रेखाटणी, रंग, प्रकाश, वगैरे द्रव्यांच्या नियमनाचे महान् आचार्य श्री. शां. पु. आगासकर ह्यांचीं चित्रेंही फारशीं संभाळलीं गेलीं नाहींत. त्यांची अलंकरण-बुद्धि केवळ असाधारण होती. ते जातीनेंच सोनार होते. आगासकरांच्या बुद्धीची घडण बाबुराव पेंटर ह्यांच्यासारखी सुसंस्कृत होती. चित्रकार त्रिनिदाद, पेस्तनजी बोमनजी व शिल्पकार गणपतराव म्हात्रे ह्यांच्याही अतुल तपस्येची नोंद कोणत्याच चरित्रांत झालेली नाहीं. महाराष्ट्राला आपल्या व भारतीय शिल्प-कौशल्याचें मुळींच महत्त्व वाटत नाहीं, हें उघड आहे. ज्या नोबेल-पारितोषिक-विजेत्या रोमां-रोलां ह्या फ्रेंच लेखकानें महात्माजींचें चरित्र लिहिलें, त्यानेंच युरोपियन संगीतांतील परिवर्तनें चित्रित करण्यासाठीं 'जॉं क्रिस्तोफ' ही हजारों पृष्ठांची चरित्र-कथा लिहिली. चित्रकार व कलावंत ह्यांचे पराक्रम युरोपियन वाङ्मयांत सम-रसतेनें चित्रित केले जातात. चर्चिल, आयसेनहोएर ह्यांच्यासारखे मुत्सद्दी हे नामांकित कलावंत होते. कला हें युरोप अमेरिकेच्या संस्कृतीचें एक अविभाज्य अंग आहे. ह्याच्या उलट, "आम्हांला तुमच्या कलेंतलं मंत्र-तंत्र कांहीं समजत नाहीं, आम्ही केवळ औपचारिक सौजन्य-प्रदर्शनासाठीं कलेचं कौतुक करतों." असें प्रांजळपणें सांगण्यांत अनेक विद्वानांना भूषण वाटतें. मला एका विद्यापीठाच्या कुलगुरूंनीं नुकतेंच सांगितलें, "कलेंतला दर्जा, वगैरे भानगडींना मी मुळींच महत्त्व देत नाहीं, मला कुठलंही चित्र चालतं." माझे एक नाटककार मित्र

होते. त्यांना जीवनांतील नाट्याचा पुरेपूर परिचय होता. परंतु ते संगीत व चित्रकला ह्या कला सहनही करूं शकत नसत. मराठी समाजांतच ही विकृति फार मोठ्या प्रमाणांत आहे.

सर्वसाधारण मराठी समाज कलांविषयीं उदासीन असला, तरी ह्या समाजांतला कांहीं वर्ग कमालीचा कला-लोलुप आहे. ही अल्पसंख्य जनताही अगदींच थोडी नाहीं. इतर कोणत्याही प्रांतापेक्षां महाराष्ट्र गायन-विद्येबाबत अधिक आस्थेवाईक आहे. ह्या गान-लोलुप जनतेला अधिक सुस्वर, अधिक सुसंस्कृत व सौंदर्य-पूजक गायन-वादन ऐकायला मिळालें, तर तें हवें आहे, अगदीं उत्कटतेनें हवें आहे. महाराष्ट्रांत ही भूक निर्माण करण्याचें कार्य ज्या सहा-सात गायन-महर्षींनीं प्रचंड प्रमाणांत केलें, त्यांत भास्करबुवा बखले ह्यांचें स्थान अतिशय उच्च आहे.

भास्करबुवा बखले १८९५ सालीं आपलें गायन-शास्त्राचें शिक्षण पूर्ण करून मुंबईस आले व त्यांच्या अभिनव गायकीनें त्यांनीं मुंबईच्या गायन-रसिकांचें मन जिंकलें. त्यांनीं अनेक मैफली गाजवल्या, अनेक विद्यार्थी त्यांच्याजवळ गायनाचें शिक्षण घेण्यासाठीं आकर्षित झाले आणि त्यांपैकीं कित्येकांचा त्यांच्याशीं आमरण प्रेमादराचा संबंध राहिला.

भास्करबुवांचें गायन समजणें बरेंच कठीण होतें. १८८२ सालीं आपलें शिक्षण पूर्ण करून पंडित बाळकृष्णबुवा इचलकरंजीकर मुंबईत वर्ष-दीड वर्ष राहिले. त्यांनीं मुंबईच्या श्रोतृ-वर्गाला ख्याल-गायकीचा चांगलाच परिचय करून दिला होता. बाळकृष्णबुवा मुंबई सोडून गेले, तरी नथ्थनखां-सारखे उत्तरेचे ख्याल-गायक मुंबईत अधून-मधून गायनाचे जलसे करीत असत. १८९० च्या सुमारास अनेक गायकांचे मुंबईत जलसे झाल्याचें नमूद झालें आहे. विष्णुपंत छत्रे ह्यांनीं आपल्याबरोबर भू-गंधर्व रहिमतखांना मुंबईस ह्याच सुमारास आणलें व अनेक शिष्य ख्याल-गायकींत तयार केले. कलावंत स्त्रिया अशा विद्वान् गायकांजवळ गाण्याचें शिक्षण घेत असत. त्या शिकवण्यांवर गवई लोक मुंबईत स्वतःचा चरितार्थ चालवून आपल्या कलाकौशल्याचा लाभ इतर जनतेस देत असत.

१८९५ सालीं भास्करबुवा मुंबईस आले. त्यानंतर आणखी दोन महान् गवई महाराष्ट्रांत आले. त्यांपैकीं एक अल्लादियाखांसाहेब हे जयपूरचे महाविद्वान् गायक कोल्हापूरच्या महाराजांच्या पदरीं राहिले. त्याचप्रमाणें दुसरे अब्दुलकरीमखां हे बडोदें दरबारचे अतिशय मधुर सुरेल गायक तिकडून येऊन कर्नाटकांत स्थाइक झाले. बाळकृष्णबुवा इचलकरंजीकर ह्यांनीं पंडित विष्णु दिगंबर, पंडित अनंत मनोहर व गुंडोबुवा इंगळे हे तीन विद्वान् ख्याल-गायक सहा वर्षे शिकवून तयार केले होते. ह्या सहा महाविद्वान् गायकांशिवाय सातवे महाविद्वान् गायक रामकृष्णबुवा वझे हेही १९०० सालापूर्वींच गोव्यास व्यवसायांत उतरले होते. त्यांनींही ग्वाल्हेर, वगैरे उत्तर-भारतीय शहरांत गायनाचें शिक्षण खूप कष्ट घेऊन संपादन केलें होतें.

वर निर्देश केलेल्या सात गायन-महर्षींच्या गाण्यानें महाराष्ट्रीय जनतेच्या गायनाभिरुचीवर अतिशय मोठा परिणाम केला. अर्थात् प्रत्येकाच्या कार्यानुसार त्या परिणामांत कमी-अधिकपणा होता. कांहीं गवयांचें गाणें फारच कमी प्रमाणांत महाराष्ट्रांतील जनतेला ऐकायला मिळालें. प्रत्येकानें शिकवलेले शिष्यही संख्येनें व गुणांनीं कमी-अधिक तयार झाले. परंतु प्रत्येकाच्या कार्याविषयीं महाराष्ट्रीय जनता अतिशय कृतज्ञ आहे. सरकारी मदत व सहानुभूति ह्यांचा सामान्य शिक्षणास जसा आधार होता, तशी मदत व सहानुभूति गायन-वादन विद्येच्या वांट्याला आली नाहीं. गायन-वादनाचें शिक्षण घेणारा बहुसंख्य वर्ग कमालीचा गरीब असल्यामुळें विद्यादानही बहुधा फुकट करावें लागे. स्वतःच्या गुरुजींना भरपूर गुरु-दक्षिणा देऊन, स्वतःच्या विद्यार्थ्यांस जेवण, कपडे, वगैरे देऊन विद्यादान करावें लागे. कलावंत स्त्रिया शिकवणीचा मेहेनताना देत. गाण्याच्या मैफलींमध्यें थोडी प्राप्ति होई. ती सर्व कमाई गुरुजींना उत्तर-काळांत गुरु-दक्षिणा देऊन व इतर विद्यार्थी-वर्गास फुकट शिक्षण देऊन, भास्करबुवांनीं विद्येचा प्रसार केला. ज्या गुरुजींनीं भास्करबुवांना फुकट गायन-विद्येचें शिक्षण दिलें, त्यांचें ऋण भास्करबुवांनीं उत्तर-आयुष्यांत यथाशक्ति फेडलें.

भास्करबुवा हे एक अद्वितीय कलाकार होते. शास्त्र पचवून कलेंतील सौंदर्याचा सर्वांगीण आविष्कार करण्याचें सामर्थ्य त्यांनीं अतोनात परिश्रम

करून आणि मार्मिक, रसिक, बुद्धिचातुर्यानें व असामान्य प्रतिभेनें संपादन केलें होतें. त्यांची प्रतिभा केवळ आश्चर्यजनक होती.

भास्करबुवा बखले हे एक असामान्य सुरेल गायक होते एवढें लिहिण्यानें त्यांच्या सुस्वर गायनाचें वर्णन पूर्ण होऊं शकत नाहीं. प्रत्येक रागांत स्वर-सप्तकाला एक वेगळेंच सूक्ष्म स्वर-श्रेणीचें प्रमाण प्राप्त होतें. त्या प्रमाणांनीं त्या-त्या रागाचा प्रभाव शतगुणित होतो. सामान्य सुरेल गायकाच्याही आकलनापलीकडचें असें हें रसीलें प्रभावी जिवंत सुरेलपण असतें. असें हें सुरेलपण कंठगत करण्यास एक वेगळीच जाणीव व्हावी लागते व तसेंच परिश्रमही करावे लागतात. ह्या दर्जाच्या सुरेलपणांत रागाचें माधुर्य अनेक पटींनीं वाढविण्याची शक्ति असते. जाणकार श्रोत्यांच्या बुद्धीपलीकडे जाऊन, त्यांच्या भावना हेलावून, आनंदाची एक अद्भुत अनुभूति त्यांस ह्या सुरेलपणानें होते. डोळे आनंदाश्रूंनीं भरून येतात. श्रोत्यांचें देहभान नाहींसें करून एक प्रकारची वेहोषी अनुभवास येते. असा अनुभव भास्करबुवांच्या गाण्यांत अगणित वेळां येई. एकेक स्वराचें सौंदर्य श्रोत्यांना अत्युत्कटतेनें जाणवावें, अशा क्रमांच्या स्वरमाला भास्करबुवांच्या आलापांत इतक्या अनपेक्षित व अभिनव स्वरूपांत येत, कीं श्रोता एकाग्रतेनें व उत्सुकतेनें जिवाचे कान करून गाणें ऐकत राही, देहभान विसरून जाई. खानदानी चिजा व ध्रुवपदें रचणारांनीं एकेका रागाचें वेगळेंपण स्पष्टपणें श्रोत्यास जाणवेल व त्याच्या विशिष्ट रूपाचें सौंदर्य मनांत भरेल, अशा रचना अतिशय मार्मिकतेनें केल्या आहेत. भास्करबुवांनीं अतिशय मार्मिक चिंतन केलें होतें व रागाचें सौंदर्य जास्तींत जास्त प्रकर्षानें कसें प्रतीत करतां येईल व रागाचें वैशिष्ट्य ठळकपणें कसें व्यक्त करतां येईल, ह्याचें रहस्य पूर्णतया आत्मसात् केलें होतें. त्यामुळें रागाची वा चिजेची बंदिष संभाळण्यांत जी भीरुता साधारण विद्वान् गायकाच्या गायनांत असते, ती मर्मज्ञ भास्करबुवांच्या रचना-चतुर बुद्धीला कधींच अडवूं शकत नसे. त्यांचा स्वर-विलास स्वैरपणें, आनंदानें आणि उत्साहानें त्यांच्या गाण्यांतून उसळून बाहेर पडे व त्यांच्या चेहऱ्यावर सदैव विजेत्याचें प्रसन्न हास्य विलसे. सुंदर नक्षीप्रमाणें एकमेकांतून उद्भवणाऱ्या व सुसंबद्ध अशा

आलापांनीं ते राग-स्वरूप उभारीत असत व त्या भव्य रचनेची निर्मिति पाहातां-पाहातां श्रोते आश्चर्यानें व कौतुकानें मोहून जात असत.

अगदीं भारदस्त न गणलेले रागही भास्करबुवा स्वतःच्या मैफलींत वैचित्र्य निर्माण करण्यासाठीं गात; पण तें गाणें इतकें प्रभावी असे, कीं त्यांनींच गायलेल्या अत्यंत प्रौढ व प्रगल्भ रागांच्या मालिकांत ते खेळकर वृत्तीनें खुलून दिसत असत. परंपरागत कायदेशीर विस्तार करून, एखाद्या ख्यालाचा अस्ताई-अंतरा ते इतक्या चातुर्यानें व अभिनव रचनांनीं नटवीत, कीं एखाद्या भरजरी अमूल्य बनारसी शेल्याचा पोत त्यांच्या ख्यालाला येत असे. त्या जरीचें नक्षीकाम जणूं अजंठ्यांतील जगजेत्या अलंकार-कुशल कसबी कलावंतांनीं केलें आहे, अशीच त्या ख्यालाच्या सर्वांगांत साक्ष मिळे.

भास्करबुवांच्या स्वर-वैभवाला नृत्याचा ललित-मनोहर डौल देणारी अतिशय शोभादायक अशी त्यांची लयकारी असे. भास्करबुवांसारख्या भारत-जेत्या गायकाची लयकारी अचूक असे, सहज-मनोहर असे, हें वर्णन करण्याची खासच जरुरी नाही. पण त्यांच्या आलापांना, तानांना, डौल व अलंकारिक शोभा अशी असे, कीं बुवांच्या लयकारीनें श्रोते मनांतल्या मनांत अखंड डुलत राहात. रागाचे स्वर मूर्त रूप घेऊन मनोहर नृत्य करीत आहेत, असा स्थिर भास श्रोत्यांना गाणें ऐकतांना होई.

भास्करबुवांचें गाणें केवळ कानांतच नव्हे, तर थेट हृदयांतच खोल घर करून राही. कित्येक महिने, नव्हे कित्येक वर्षें, त्या गाण्याचा मनावरील संस्कार पुसट होऊं नये, असा प्रभाव त्यांच्या प्रतिभेंत होता.

नरम, सुरेल्या, रसाळ गायनाचें वर्णन 'गाण्यांत दर्द आहे' असें मैफलींतील जाणकार करतात. हें वर्णन भास्करबुवांच्या गाण्याच्या बाबतींत अपुरें पडतें. केवळ आर्जवी स्वर आणि संवादाची आस, एवढाच अर्थ 'दर्द' शब्दानें मनांत येतो, पण भास्करबुवा सर्वच मधुर रस स्वतःच्या गायनानें श्रोत्यांना अनुभवायला लावीत.

काव्यांतल्या रसाची उत्कट अभिव्यक्ति करण्यासाठीं म्हटलेली ठुमरी आणि बुवांच्या गाण्यांतले विविध रस, ह्यांत फार मोठा फरक असे. विशिष्ट स्वर-माला व लय ह्यांनीं एक स्वतंत्र रस-भाव रसिक संगीतज्ञ श्रोत्यांच्या मनांत

उद्भवतो. त्यात निःशब्द काव्य असतें. ‘ मांड ’ सारखा हसरा, खेळकर राग, ‘ देसकार ’ सारखा चढाऊ, लढाऊ वृत्तीचा राग, ‘ जोगी ’ तील आर्तता, ‘ भैरवी ’तील प्रेमाची शरणागति, हे रस-भाव पूर्णतया शब्द-निरपेक्ष, स्वरोत्पन्न, पण लयीच्या अनुरूपतेनें व्यक्त होणारे आहेत. ‘ हिंदोल ’ मध्यें मंदिरांतील प्रार्थनेचे घंटा-नाद आपोआपच ऐकूं येतात. लयीच्या साथीनें स्वर स्वतःचींच भाव-गीतें गातात.

नृत्य-नाट्याचे संगीताचार्य व पुराणकार हा सर्व प्रभाव मुख्यतः लयीचा असतो, असें मानतात; त्यांत बरेंचसें सत्य असलें, तरी रागांचें रंजकत्व त्यांतील संवादी स्वर, विशेष प्रकारचे आलाप व मुरक्या ह्यांच्या योगानें जें एक शब्द-निरपेक्ष भावना-जगत् श्रोत्याच्या मनांत उभें राहातें, त्यांत सांठविलेलें असतें. ‘ सोहनी ’, ‘ परज ’, ‘ हमीर ’, ‘ दरबारी कानडा ’ व ‘ तोडी ’ ह्यांसारख्या रागांचें भाव-विश्व शब्द-निरपेक्षच असतें.

भास्करबुवांच्या गाण्याच्या मैफलींत हे राग ऐकण्याचें भाग्य ज्यांना लाभलें असेल, त्यांना हें स्वरांचें व लयीचें शब्द-निरपेक्ष भावना-निर्मितीचें वैभव भरपूर उत्कर्षास गेलेलें अनुभवायला मिळालें असलें पाहिजे. ह्या त्यांच्या वैभवापुढें अतिशय मोठे विद्वान् गायक नम्र होत असत. जालंदरच्या ‘ संगीत महोत्सवां ’त भास्करबुवांचा उल्लेख ‘ देव-गंधर्व भास्करबुवा ’ असा होई. संगीत-क्षेत्रांतल्या विद्वान् रसज्ञ गायक-वादकांनीं ‘ देव-गंधर्व ’ हें अभिधान स्वयंस्फूर्तीनें भास्करबुवांस अर्पण केलें होतें.

भास्करबुवा हे केवळ अतुलनीय प्रतिभा-संपन्न श्रेष्ठ कलावान् होते, एवढ्यानेंच त्यांची थोरवी संपत नाहीं. ते बिदागीचा विचार न करतां, संधि मिळेल तेथें मनसोक्त गात असत. गानलोलुप अशा निदान थोड्यातरी श्रोत्यांसमोर उत्तम साथीनिशीं रियाज करण्याचा आनंद अनुभवण्यासाठीं ते अमर्याद गात असत. सकाळ, संध्याकाळ, रात्र ह्या तिन्ही काळांत ते वेगवेगळे राग अमर्याद तयारीनें, केवळ स्वतःच्या गानभक्तीच्या बेहोषीनें गात असत. अखंड रियाजानें त्यांच्या विद्या-लोलुप गायनाला इतका विलक्षण सफाईचा उजाळा आलेला असे, कीं ते स्वतः व श्रोते एका आनंदमय, सौंदर्यमय, शोभामय व तेजोमय जगांत, समाधींत, रमून जात असत.

स्वतःच्या शक्तीवर त्यांचा इतका जबरदस्त ताबा असे, कीं ते कधींही स्वर-संवादांच्या तयारीच्या आणि तानांच्या व लयकारीच्या कसरतीच्या आहारीं जात नसत. त्यांच्या कलेचे सर्व पैलू त्यांच्या स्वाधीन असत. त्यामुळेंच ते सर्व प्रकारच्या सभांवर व मैफलींवर स्वामित्व गाजवीत. गाणें सुरू होतांच ते रंग जमवीत व हा रंग अखंड उत्कर्षगामी असे. वर्षांतील निदान शंभर रात्री ते रात्रभर मैफल गाजवून गात असत. गणेशोत्सव, नवरात्र, गुरुपौर्णिमा, कोजागिरी, हे सण असोत; समाजांत दर गुरुवारीं दत्तापुढें गाणें असो; एकादशीनिमित्त स्वतःच्या बिऱ्हाडीं देवापुढें गाणें असो; कोणाच्याही घरीं लग्न-मुंज असो; सत्कार-सभा असो; कोणत्याही निमित्तानें भास्करबुवांचें गाणें त्याच हिरिरीनें चालू असे. पुणें, मुंबई, धारवाड, वगैरे भागांत १९०० ते १९२० ह्या काळांत सर्व गायन-लोलुपांना भास्करबुवांचें गाणें अखंड मुबलक ऐकायला मिळे.

बुवांनीं निदान पन्नासांहून अधिक शिष्यांस त्यांनीं घेतलें तितकें शिक्षण दिलें. कांहीं कलावंत स्त्रिया शिकवणीचा मेहेनताना देत, पण पंचाण्णव टक्के विद्यार्थी बुवांकडे फुकट शिकत. कपडे, खाणें-पिणें, वगैरे अवांतर मदतही बुवांचीच घेत. 'गंधर्व मंडळी'तील पंढरपूरकरबुवा, मास्तर कृष्णराव, गोविंदराव टेंबे, पेटकर, वगैरे अनेक गायक-नटांना भास्करबुवांनीं नाटकांतल्या गाण्याचें शिक्षण दिलें. बालगंधर्व ह्या अत्यंत सुरेल आवाजाच्या हिऱ्याला भास्करबुवांनीं असे सुंदर पैलू पाडले, कीं त्या तेजानें धंदेवाईक गवईही गंधर्वांच्या गायनापुढें फिके पडूं लागले. गायन-विद्येतील कूट स्थळांचा विचार अखंडपणें करण्यांत रमलेले भास्करबुवांचे एक गुरु अलादियाखां हेदेखील केवळ अत्यंत सुंदर, साध्या, रसाळ, प्रसन्न गाण्याच्या लोभानें गंधर्वांच्या अगणित नाट्य-प्रयोगांना उपस्थित असत.

भास्करबुवांच्या तालमीमुळें नाट्य संगीताला अधिक ताल-स्वर-बद्ध डौलदार स्वरूप प्राप्त झालें. अखेर तें इतक्या दर्जाला पोंचलें, कीं उत्तरेचे गायक-वादक मराठी नाट्य-संगीताचा समावेश पक्क्या गाण्यांत करूं लागले. महाराष्ट्रांत गाणें शिकायची हौस असलेल्या घरोघरीं गंधर्वांच्या उत्कृष्ट सुरेल गाण्याचें वळण स्थापित झालें. हा सर्व भास्करबुवांच्या शिकवणीचा महिमा.

भास्करबुवांनीं केलेल्या जादूची कल्पना येण्यासाठीं 'स्वयंवर'-पूर्व बालगंधर्व व नंतरचे बालगंधर्व ह्यांची तुलना डोळ्यांपुढें आणावी. पुढच्या पिढ्यांनीं 'वेका' रेकॉर्ड व नंतर घेतलेल्या ग्रामोफोन कंपनीच्या रेकॉर्ड ह्यांची तुलना करावी. नारायणरावांच्या विकासाची बरीच कल्पना ह्या तीन मिनिटांच्या 'नमुना पाकिटां' वरून आल्याशिवाय राहाणार नाहीं. 'गंधर्व कंपनीं'तील तीन गायक नटांमुळें अनेक रागांतील सुरेल, लयबाज, रंजक रचना महाराष्ट्राच्या कोना-कोपऱ्यांत पोंचल्या. सुरेलपणा व लयकारी ह्यांचा परिचय नवशिक्या गायक-वादकांच्या अनुकरण-प्रवृत्तीनें प्रत्येक मराठी घरांत जाणवूं लागला.

नारायणराव बालगंधर्वांच्या गाण्याचें भास्करबुवांच्या संस्कारानें निर्माण झालेलें थोर स्वरूप आतां वेगळ्याच प्रकारें जाणवतें. अनेक विद्वान् गायक व वादनकार आपण हुबेहूब गंधर्वांची नक्कल करूं शकतों, अशी महत्त्वाकांक्षा बोलून दाखवतात. श्री. विठ्ठलराव कोरगांवकरांसारखे रसज्ञ वादक कांहीं गाणीं गंधर्वांच्या डौलानें वाजवतात. त्यांत नारायणरावांच्या गायकीचा थोडासा अंश प्रत्ययास येतो. भरपूर तयारी करून शिकलेल्या अनेक गायकांच्या गाण्यांत प्रयत्न करूनही बालगंधर्वांच्या गाण्याचे गुण फारच अल्प प्रमाणांत उतरलेले आढळतात. बालगंधर्वांच्या गाण्यांतली ती मनोहर, संथ लय, कमालीचा सुरेलपणा, विलक्षण सरळपणा, पण कमालीची रंजक बांधणी, ह्यांचा साक्षात्कार अन्य पट्टीच्या गवयांच्या ठायींही मिळणें दुष्कर. अलीकडच्या कोणत्याही मैफलीच्या वेळीं तें पंचवीस-तीस वर्षांपूर्वी ऐकलेलें बालगंधर्वांचें वैभव-संपन्न गाणें पुन्हा-पुन्हा मनांत घोळूं लागतें. मनांत दारुण निराशा निर्माण होते. वाटतें, कीं कलावंताचें कार्य हें त्या व्यक्तीपुरतेंच असतें व नंतर थोड्याच काळांत तें नष्ट होतें.

गंधर्वांनीं महाराष्ट्रीय बहुजनसमाजाच्या हृदयांत स्वराविषयीं व लयीविषयीं जी प्रेमादराची ज्योत पेटवली, ती आज पन्नास वर्षांनंतरही घरोघरीं तेवत आहे.

भास्करबुवांनीं स्वतः आमरण परिश्रम करून गायनांतील, वादनांतील, नर्तनांतील सौंदर्याचा शोध केला. साध्या, सुरम्य, ललित-मनोहर रचनांपासून अत्यंत प्रगल्भ, अवघड अशा कूट स्थळांचाही अभ्यास त्यांनीं अखंड चालू

ठेवला. पण विद्याभ्यास-जडतेवर आपल्या चपल, चतुर, मनोज्ञ प्रतिभेनें मात करून त्यांनीं गायनांत एक नवें भव्य प्रासादिक पर्व निर्माण केलें. हीच त्या अजोड दिव्य-भव्य कलावंताची किमया. प्रत्यक्ष देवळांत जो आनंद मला क्वचितच झाला असेल, त्यापेक्षां अधिक विशुद्ध आनंद मीं माझ्या तरुण वयांत कांहीं भव्य विभूतींच्या सहवासांत अनुभवला. त्यांत लोकमान्यां-सारखा लोकनेता, खाडिलकरांसारखा कलावंत, अनेक चित्रकार-शिल्पकार, अनेक गायक-वादक, कवि, लेखक आहेत. भास्करबुवा बखले ह्यांचा मला सुमारें सात-आठ वर्षें जो कमी-अधिक सहवास लाभला, त्यांच्या ज्या अगणित मैफली मीं ऐकल्या, माझ्या गायन-गुरुजींच्या मार्गदर्शनानें बुवांच्या भव्य कलेचा मला जो अल्प-परिचय झाला, त्या सर्वांमुळें मला लाभलेला आनंद मला दहा खडतर जन्मांना पुरेल इतका आहे.

## १ . . .

# बालपण

महाराष्ट्राचे दैदीप्यमान कलाकार गायक भास्करबुवा ऊर्फ भास्कर रघुनाथ बखले ह्यांचा जन्म आश्विन शुक्ल १२, शक १७९१ (१७ ऑक्टोबर, १८६९) रोजीं, रात्रीं दहा वाजून बारा मिनिटांनीं (मुंबई टाईम) झाला. बडोदें संस्थानांतील कठोर ह्या खेडे-गांवीं एका गरीब कऱ्हाडे ब्राह्मण कुटुंबांत ह्या बाल-भास्कराचा उदय झाला.

बखले कुटुंबाचें कुलदैवत गोव्याची म्हाळसा नारायणी देवी आहे, त्यावरून हें कुटुंब मूळचें गोव्याचें असावें. बखले कुटुंब भास्करबुवांच्या आजोबांच्या काळीं म्हणजे सन १८५० पूर्वीपासून कोल्हापुरास राहात असे. आजोबा त्र्यंबकराव ह्यांचें कापडाचें दुकान होतें. त्र्यंबकरावांस एकंदर चार मुलें होतीं : तीन मुलगे व एक मुलगी. पैकीं रघुनाथराव हे तीन भावांपैकीं सर्वांत लहान होते. हे भास्करबुवांचे वडील. रघुनाथरावांचें लग्न, पुण्याजवळ आरवी म्हणून खेडें आहे, तेथील सावकार भोपटकर-नामक होते, त्यांची मुलगी यमुना हिच्याबरोबर झालें. यमुना सात वर्षांची होती व रघुनाथराव अठरा वर्षांचे होते. यमुनेचें सासरचें नांव जानकी ठेवण्यांत आलें.

रघुनाथरावांचे दोन बंधु नाना व शिवराम ह्यांचींही लग्नें आरवी येथेंच झालीं. बहीण 'बाई' बडोद्यास सरकारी धान्य-कोठारावर एक कारकून होते त्यांस देण्यांत आली.

रघुनाथरावांचे वडील त्र्यंबकराव ह्यांच्या मृत्यूनंतर मुलांनीं त्यांचें कापडाचें दुकान नुकसान येऊं लागल्यामुळें विकून टाकलें. नाना व शिवराम ह्यांनीं नोकऱ्या धरल्या. रघुनाथराव स्वतःची बहीण बडोद्यास होती, तिकडे नोकरीच्या शोधासाठीं गेले व तेथें त्यांस लवकरच शेतसारा-वसुलीच्या खात्यांत 'कुलकर्णी' म्हणून नोकरी लागली. ते बडोदें संस्थानचे सरकारी नोकर झाले. त्यांची नेमणूक 'तापी व्हॅली रेल्वे' वरील कठोर ह्या गांवीं झाली, म्हणून ते वडील मुलगा त्र्यंबक व लहान मुलगी तानूबाई ह्यांस घेऊन त्या गांवीं गेले. तेथें त्यांस आणखी एक मुलगी झाली. परंतु ती अल्पवयी ठरली. त्या मुलीच्या पाठीवर १८६९ सालीं त्यांस मुलगा झाला. ह्या मुलाचें नांव भास्कर ठेवण्यांत आलें. भास्करची वडील बहीण तानूबाई ही आठ वर्षांनीं मोठी होती व थोरला भाऊ त्र्यंबक चौदा वर्षांचा होता. तानूबाई दहा वर्षांच्या झाल्या, तेव्हां त्यांचें लग्न दक्षिणदासशास्त्री ह्यांच्याबरोबर झालें. दक्षिणदास हे संस्कृतज्ञ शास्त्री असून, पुराणिक म्हणून स्वतःचा चरितार्थ चालवीत असत.

रघुनाथरावांस नोकरी-निमित्त खेडोपाडीं राहावें लागे. परंतु मुलांचें शिक्षण व्हावें, म्हणून त्यांनीं भास्करची मुंज आठव्या वर्षी उरकून त्याला बडोद्यास त्यांच्या बहिणीकडे विद्याभ्यासासाठीं ठेवलें. शिवाय बडोद्यांत आत्याबाई होत्याच. १८७७ च्या सुमारास भास्कर बडोद्यांत प्राथमिक शाळेंत जाऊं लागला. त्या काळांत इंग्रजी शिक्षणाचा प्रसार पुण्या-मुंबईच्या बाहेर फारसा झाला नव्हता. बहुसंख्य मुलें 'व्हर्नॅक्युलर फायनल' ची परीक्षा देऊन नोकरींत शिरत. कांहीं मुलें संस्कृत पाठ-शाळेंत शिक्षण घेऊन शास्त्री, पुराणिक, कथेकरी, वगैरे पेशा पतकरत. भास्करची मुंज झाली त्या सुमारास कांहीं काळ जरी रघुनाथरावांची बदली बडोद्यास झाली होती, तरी लवकरच त्यांस दुसऱ्या गांवीं जावें लागलें. थोरला मुलगा त्र्यंबक मराठी सात इयत्तां-पर्यंत शिकला. त्याचीही नेमणूक बडोदें संस्थानांत शेत-सारा-वसुलीच्या

खात्यांत तलाठी म्हणून विजापूर ह्या खेड्यांत झाली, त्यामुळें भास्कर एकटाच बडोद्यांत शिकत राहिला.

रघुनाथरावांचे बडोद्यास असतां त्यांचें बिऱ्हाड महंमदवाडींत नव-कोट-नारायण श्री. मैराळ ह्यांच्या वाड्यांत असे. त्यांची बदली गांवोगांवीं झाली, तरी मुलांच्या शिक्षणापायीं त्यांच्या पत्नी जानकीबाई कांहीं वर्षें बडोद्यांतच महंमदवाडींतल्या बिऱ्हाडीं राहात. पण पुढें वडील मुलगा त्र्यंबक नोकरीवर विजापूरला गेला व रघुनाथरावांची खेडो-पाडीं फारच गैरसोय होऊं लागली, म्हणून त्या बडोद्यांतील बिऱ्हाड मोडून रघुनाथरावांच्या नोकरीच्या गांवीं गेल्या. जातांना त्यांनीं बाल-भास्करला शेजारच्या देव-नामक सरकारी पेन्शनर गृहस्थांच्या आश्रयाला ठेवलें. भास्कर आतां दहा वर्षांचा झाला होता. मराठी शिक्षण संपण्यापूर्वीच तो विठ्ठल-मंदिरांतील संस्कृत पाठशाळेंत संस्कृत शिकूं लागला. देव ह्यांजकडे कांहीं दिवशीं वारानें जेवावें, कांहीं दिवस गांवांत मधुकरी मागावी आणि खूप अभ्यास करावा, असा क्रम भास्करचा असे. विठ्ठल-मंदिरांतील पाठ-शाळेंत महाबळशास्त्री संस्कृत शिकवीत, तेथेंच बाळशास्त्री तेलंग हे न्याय-शास्त्र ( तर्क-शास्त्र ) शिकवीत. बडोद्याच्या महाराजांकडून त्यांस न्याय-रत्न ही पदवीच मिळाली होती. त्यांचें ह्या आई-बापांपासून दूर राहून शिक्षण घेणाऱ्या भास्करवर फार प्रेम जडलें होतें. ते त्यास आपल्या मुलाप्रमाणें मानीत. ही पाठ-शाळा दानाध्यक्ष राजारामशास्त्री टोपले ह्यांच्या देखरेखीखालीं चालवीत. बडोद्यांतील वैदिक, शास्त्री मंडळींना पुरस्कार देण्याचा अधिकार हे दानाध्यक्ष राजारामशास्त्री टोपले ह्यांच्या हातीं असे.

संस्कृत भाषेचें शिक्षण पूर्वी फारच व्यवस्थित असे. अमरकोश पाठ करावा; नाम-रूपावलि, धातुरूप कोश, कौमुदी, आदि व्याकरण-ग्रंथ क्रमानें पाठ करावे; नंतर 'पंचतंत्र', 'हितोपदेश', आदि सोपे कथात्मक व नंतर काव्यादि ग्रंथ वाचावे; अशा प्रकारें बरेंचसें पाठान्तर करून संस्कृत शिक्षण घ्यावें लागे. भास्करची बुद्धि अतिशय तल्लख असून त्याचें शिक्षण उत्तम प्रकारें चालू होतें. महाबळशास्त्र्यांजवळ हळू-हळू तो 'रघुवंश' हें काव्य

वाचूं लागला. महाबळशास्त्र्यांनीं भास्करला दुसरा सर्ग शिकवल्याची आठवण लिहून पाठवली आहे.

ह्या संस्कृत शिक्षणानें भास्करची वाणी अतिशय शुद्ध व स्पष्ट शब्दोच्चार करून उत्तम बनली होती. भारतीय हिंदु संस्कृतीविषयीं दृढ श्रद्धा व आदर उत्पन्न होऊन ब्राह्मण विद्यार्थ्यास शीलवान्, विद्यानिष्ठ वळण लागतें, तसे सर्वोत्तम संस्कार बाल-भास्करच्या मनावर झाले होते. वडील व विद्वान् मंडळींविषयीं आदर बाळगून विनम्र भावानें विद्या-साधन करण्याचें उत्कृष्ट शिक्षण भास्करला मिळालें. आपण विद्या-निष्ठ, शीलवान् राहिलेंच पाहिजे, एरव्हीं आपणास वारानें जेवायला घालणारे लोक नाराज होतील, मधुकरी मिळणार नाहीं, ओळखीच्या जुन्या वडीलधाऱ्या मंडळींस ना-पसंत असें आपलें वर्तन होऊं नये, ही सुप्त जाणीव इतक्या बाल-वयांत स्वावलंबनानें स्वतःचें शिक्षण घेणाऱ्या भास्करच्या मनांत असे. मध्यम गौरवर्ण, लांब सरळ नाक, सुंदर डोळे व आनंदी वृत्ति ह्यांमुळें भास्कर सर्वांना प्रिय असे. विद्यार्थी-वर्गांत तो अधिकच प्रिय होण्याचें कारण त्याचें अखंड गाणें. भास्करचा अतिशय गोड, उंच, चढा आवाज आणि त्याचें स्वैर कविता-गायन शाळेंतल्या मुलांत इतकें प्रिय झालें होतें, कीं शाळेच्या मधल्या सुट्टींत भास्करला गांठून त्याला एखादें गाणें म्हणायला लावण्याचा बरोबरीच्या मुलांचा नित्यक्रमच झाला होता.

बडोद्यांत त्या वेळीं विष्णुबुवा पिंगळे नांवाचे एक गायक कीर्तनकार अतिशय लोकप्रिय होते. त्यांचें जुन्या ध्रुपद-गायकीच्या वळणाचें गाणें भास्कर रोज ऐकत असे. बहिणीचे यजमान दक्षिणदास हे पुराण सांगत. पुराण व कीर्तन ऐकणें हा भास्करचा आवडता व्यवसाय होता. वडलांची नोकरी सुटली होती. भास्करला आतां चौदावें वर्ष लागलें होतें. तरीही मधुकरी मागण्यावांचून गत्यंतर नव्हतें. संस्कृत पाठ-शाळेंतलीं मुलें म्हणून कोणाकोणाकडून ब्रह्मचारी, ब्राह्मण ह्या नात्यानें जेवायला बोलावणें येई; पैसा, दोन पैसे दक्षिणा मिळे.

अशा परिस्थितींत पाठ-शाळेंतलें, विठ्ठल-मंदिरांतलें व ज्या 'देवां' कडे वारानें जेवायचें त्यांच्या घरांतलें कांहीं वर-काम किंवा बाजार-हाट करणें,

ह्यापलीकडे भास्करला कसलाच उद्योग नव्हता, राहाण्याला थारा नव्हता किंवा स्वतःच्या गाण्यापेक्षां दुसरी कसलीच करमणूक नव्हती. सकाळीं व व रात्रीं अभ्यास करणें आणि संध्याकाळीं पुराण-कीर्तन ऐकणें, ह्यांत भास्करचा वेळ जाई. भास्करला पिंगळेबुवांचीं अनेक भजनें पाठ येऊं लागलीं. पिंगळे-बुवांचा भास्करशीं थोरल्या बंधूंनीं परिचय करून दिला. वडलांची नोकरी सुटली होती, त्यांस व आईस घेऊन त्र्यंबकराव विसनगरला बदलून गेले, तेव्हां भास्करला पिंगळेबुवांनीं स्वतःकडे ठेवून घ्यावें, सकाळीं पाठ-शाळेंत संस्कृत शिकून, संध्याकाळीं पिंगळेबुवांच्या साथीला उभें राहावें, गाणें शिकावें, असें ठरलें. भास्करच्या जीवनाला हा एक नवा पैलू पडला. खड्या सुरेल आवाजांत शेकडों श्रोत्यांना स्पष्ट ऐकूं जाईल, अशा प्रकारचें गाणें भास्कर गाऊं लागला. झांज व पखवाज ह्यांच्या लयीचा सराव त्याला होऊं लागला व त्याच्या नैसर्गिक गोड आवाजाला ताला-स्वराचें उत्तम वळण मिळूं लागलें. पिंगळेबुवांच्या कथेंत बाल-भास्करचें गाणें हें एक मोठेंच आकर्षण होऊन बसलें.

एकदा विष्णुबुवा पिंगळे ह्यांचें कीर्तन डीसा कँटोनमेंट ह्या लष्करी कँपमध्यें झालें. भास्कर कीर्तनांत गाण्याला होता. पिंगळेबुवांनीं ताला-सुरांत बसवलेलीं दोन पदें त्यानें इतकीं उत्तम म्हटलीं, कीं लष्करांतील कॅप्टनसाहेबांनीं तीन तोळ्यांचें एक सोन्याचें कडें भास्करला बक्षीस दिलें. भास्करला गाण्यांत इतकें यश मिळूं लागलें, कीं गांवांत कोठेंही उत्सव असला, तरी तेथें गाण्यासाठीं त्याला हटकून आमंत्रण मिळे. कथेंत शेकडों लोकांसमोर गाऊन त्याच्या अंगीं स्वाभाविकच सभा-धीटपणा आला होता.

आजच्या शिक्षण-विषयक कल्पनांप्रमाणें भास्करचें शिक्षण फारच थोडें झालें होतें असें मानलें, तर ती एका प्रकारें चूक होईल. इंग्रजी भाषा, गणित ह्यांसारख्या विषयांचें शिक्षण मिळालें नाहीं, तरी संस्कृत भाषा, पुराणादि संस्कृत वाङ्मय ह्यांत सामाजिक नीति, भारताचा सांस्कृतिक इतिहास, ह्यांचें जें ज्ञान मिळे, त्यामुळें शालेय शिक्षणाच्या आजच्या क्रमापेक्षां पुष्कळच व्यापक व उत्तम मानसिक संस्कार त्या जुन्या पद्धतीच्या शिक्षणानें व राहाणीनें होत असत. श्रद्धा, निष्ठा, कष्ट-शीलता, गुरुजनांबद्दल आदर

बुद्धि, नम्रता, वगैरे अनेक सात्त्विक गुणांची संपदा ह्या जुन्या शिक्षणानें मिळे. उच्च दर्जाचें शील व प्रामाणिकपणा ह्यांचा दृढ संस्कार ह्या जुन्या बालबोध वळणांत असे. विद्येबद्दल कमालीची ओढ लागून, विद्या संपादन करणें, हाच सर्वांत मोठा पुरुषार्थ, ही गोष्ट ह्या विद्या-व्यासंगी लोकांच्या सहवासांत बाल-भास्करच्या मनांत खोलपणें ठसली होती. भास्करच्या मनावरील व बुद्धीवरील संस्कार अतिशय उत्तम प्रकारचे होते. गरिबीनें भास्करला कष्ट-शीलता व गुरु-सेवा ह्यांची सवय इतकी पक्की जडली होती, कीं स्वतःच्या आई-वडलांची सेवा करावी, तितक्याच निष्ठेनें तो आपल्या गुरुजनांची सेवा करी.

बाल-भास्करनें ' महाभारतां 'तील अनेक आख्यानें पुराणांत व कीर्तनांत ऐकलीं होतीं. बहिणीचे यजमान पुराणिक असल्यामुळें त्यांच्याकडेही त्याच कथा वाचायला-ऐकायला मिळत असत. पाठ-शाळेंतही अशा काव्य-कथांचे पाठ असत व पिंगळेबुवांकडेही त्याच भारतीय पुराण-कथांचें श्रवण होऊन जोडीला संत-कवींचें काव्यही ऐकायला मिळे. एकलव्याची कथा केवळ ऐकायलाच नव्हे, तर प्रत्यक्ष आचरणांत आणायची पाळी भास्करवर आली, पण त्याची बुद्धि विचलित झाली नाहीं. त्याची विद्येवरील श्रद्धा दृढ व्हावी, असेच उत्तम संस्कार बाल-भास्करच्या मनावर झालेले होते.

पिंगळेबुवांनीं भास्करला शिकवलेलीं कांहीं गाणीं नंतर चाळीस-पन्नास वर्षांनीं आठवणी लिहितांनाही इष्ट-मित्रांना आठवत होतीं. ' छोटी छोटी गोरिया ' व ' नमामि महिषासुर मर्दिनीं ' हें ' नारायणी ' रागांतलें पद भास्कर इतक्या गोडीनें म्हणे, कीं तें बडोद्यांत त्या काळीं अत्यंत लोकप्रिय झालें होतें. पांढऱ्या सहाव्या पट्टीचा तो उंचा चढा स्वर आणि भास्करचा गोड फिरणारा आवाज अनेक वर्षें बडोदेकरांच्या कानांत ठसून गेला होता.

१८८३ सालची गोष्ट. बडोद्याचे महाराज श्रीमंत सयाजीराव गायकवाड ह्यांचे सरकारी अधिकारी सरसुभे गजाननराव भाटवडेकर ह्यांजकडे राजकुमार फत्तेसिंह ह्यांच्या वाढ-दिवसानिमित्त मेजवानी व उत्सव-समारंभ होता. उत्सवांत गायला अनेक मंडळींबरोबर बाल-भास्करलाही आमंत्रण होतें. भास्करचें शास्त्रीय वळणाचें व कमालीच्या गोड गळ्याचें गाणें, महाराजांना

व दरबारी मंडळींना इतकें आवडलें, कीं त्या मुलाबद्दल चौकशी होऊन त्याला सरकारी गायन-शाळेंत शिक्षण मिळावें, अशी योजना सयाजीराव-महाराजांनीं केली.

त्या काळीं बडोद्यांत मौलाबक्ष ह्यांची गायन-वादनाची एक शाळा असे. त्या शाळेंत भास्करचें गाण्याचें शिक्षण सुरू झालें. बाकीचा नित्यक्रम चालूच होता. आतां भास्करचें वय अवघें १४ वर्षांचें होतें. अजून त्याच्या भावी व्यवसायाचें स्वरूप निश्चित ठरलेलें नव्हतें. संस्कृत शिकून शास्त्री, पुराणिक, कथेकरी किंवा इतर कोणताही प्रतिष्ठित धंदा करावा, अशीच कल्पना प्रमुख होती; कारण गायन हा व्यवसाय त्या काळीं सामाजिक प्रतिष्ठेचा मानीत नसत. कलावंतांचे व्यवसाय हे दरिद्री लोकांचे, दुःशील लोकांचे, असाच अजूनही बऱ्याच भारतीयांचा सर्वसाधारण समज आहे. कोणत्याही व्यवसायाला पैशानें प्रतिष्ठा लाभते. पाऊणशें वर्षांपूर्वी ही गोष्ट सर्वांना नीट समजत नसे. १० रु. महिना मिळवणारा तलाठी, पोस्टांतला कारकून व शाळा-मास्तर हा दरमहा अडीचशें रुपये मिळवणाऱ्या मौलाबक्षांसारख्या मुख्य संगीताधिकाऱ्यापेक्षां अधिक सच्छील, अतएव अधिक प्रतिष्ठित, असें त्या वेळचे लोक समजत असत. अजूनही पैशापेक्षां सच्छील हें समाजांतील प्रतिष्ठेचें एक महत्त्वाचें अंग आहे, असें मानणारा फार मोठा वर्ग समाजांत आहे. विद्या, कला व शील ह्यांची किंमत जाणणारा वर्ग ज्या समाजांत जागृत व प्रभावी असेल, त्या समाजाची प्रकृति सुदृढ आहे, असें निश्चितपणें समजायला हरकत नाहीं. पण अजून दुर्दैवानें भारतांत तशी अवस्था नाहीं.

मौलाबक्षांच्या संगीत शाळेंत बाल-भास्करला ठराविक सारीगम व लयीची बंदिस्त गायकी ह्यांचें शास्त्रीय शिक्षण मिळूं लागलें. स्वैर गाण्यापेक्षां स्वर-ताल-बद्ध गाण्याचें वळण पिंगळेबुवांनीं भास्करला आधींच लावलें होतें. अगदीं तेरा-चौदा वर्षांच्या बालवयांत भास्करच्या गाण्याला बांधेसूद वळण लागल्यामुळें बेसूर, बेताल, गायन भास्करच्या गळ्यांत मुळांतच शिरलें नव्हतें. त्यामुळेंच 'नारायणी' रागांत देवीचें स्तुति-गीत लय-बद्ध म्हटल्यानेंच त्याला संगीत-शाळेंत प्रवेश मिळाला होता. गायन-कलेची भास्करला मिळालेली निसर्ग-दत्त देणगी केवळ असामान्य होती.

मौलाबक्षांच्या शाळेंत सतार, तबला, वगैरे वाद्यांचें वादन व इतर गायकांचें गायन भास्करला ऐकायला मिळूं लागलें. शिस्तबद्ध गाण्याचेच संस्कार भास्करच्या कानांवर व मनावर सतत होत राहिले.

१८८४ सालीं मौलाबक्षांच्या शाळेचा वार्षिक समारंभ झाला. समारंभाचे अध्यक्ष गजाननराव भाटवडेकर सरसुभे हे होते. बडोद्याच्या गायन-वादन-क्षेत्रांतली व राज-दरबारची सर्व प्रमुख मंडळी समारंभाला उपस्थित होती. समारंभांत गायन-वादन झालें. नवीन विद्यार्थी भास्कर बखले ह्याचेंही गाणें झालें. एवढ्या मोठ्या समाजांत खड्या गोड आवाजांत गायची भास्करला कितीतरी आधींपासून सवय होतीच. त्यामुळें त्या प्रसंगीं त्याचें गाणें इतकें प्रभावी ठरलें, कीं साऱ्या सभेनें भास्करचें खूपच कौतुक केलें. अध्यक्षांनीं व मौलाबक्षांनीं भास्करची पाठ थोपटली. दुसऱ्या दिवशीं 'सयाजी-विजय' पत्रांत बक्षीस-समारंभाचें सविस्तर वृत्त प्रसिद्ध झालें. त्या वृत्तान्तांत भास्करचा खडा गोड आवाज, त्याचें ऐटबाज गाणें म्हणण्याचें चातुर्य, इत्यादि गुणांचें सविस्तर वर्णन प्रसिद्ध झालें.

'किर्लोस्कर कंपनी' चा मुक्काम त्या वेळीं पनवेल येथें होता. अण्णासाहेब किर्लोस्कर ह्यांनीं 'राम-राज्य-वियोग' नाटकाचे.पहिले तीन अंक लिहिले होते. पनवेलचे प्रसिद्ध सावकार गुळवे ह्यांच्या वाड्यांत 'किर्लोस्कर कंपनी' चा मुक्काम असून 'राम-राज्य-वियोग' नाटकाच्या तालमी सुरू होत्या. कंपनींतील प्रमुख गायक नट भाऊराव कोल्हटकर मूळचे बडोद्याचे. त्यांचे बंधु अप्पाराव कोल्हटकर हेही उत्तम गायक व तबला-वादनकार बडोद्यांतच राहात असत. 'सयाजी-विजय' पत्र भाऊराव कोल्हटकरांमुळें 'किर्लोस्कर कंपनीं' त नियमानें येत असे. ह्या योगायोगामुळें बडोद्यांतील मौलाबक्षांच्या शाळेच्या बक्षीस-समारंभाचें व बाल-भास्करच्या असामान्य गाण्याचें वर्णन अण्णासाहेब व भाऊराव कोल्हटकर ह्यांच्या वाचनांत आलें.

'किर्लोस्कर कपनीं' त गायक असून मुख्य स्त्री-भूमिका करायला भाऊराव कोल्हटकर होते व न गाणारे पण सुस्वरूप असे उत्तम स्त्री-अभिनय करणारे शंकरराव मुजुमदार होते. 'राम-राज्य-वियोगां' त मंथरा व कैकेयी ह्या दोन स्त्री-भूमिका असून मंथरेचें काम भाऊराव कोल्हटकर करणार होते व

शंकरराव मुजुमदार कैकेयीचें काम करणार होते. दोघांच्याही तालमी होऊन नाटक बसत आलें होतें. पंधरा वर्षांचा भास्कर ' किर्लोस्कर कंपनी ' स मिळाला, तर आपल्याला आणखी एका गायक नटाचा लाभ होईल असें ठरवून, अण्णासाहेबांनीं भाऊराव कोल्हटकरांमार्फत बडोद्यास पत्रव्यवहार केला. भास्कर हा एक निराश्रित गरीब मुलगा असून संस्कृत पाठ-शाळेंत, मधुकरी मागून शिकत आहे असें कळतांच, अण्णासाहेबांनीं भाऊरावांस बडोद्यास पाठवलें. मुलाचा रंग, रूप, गायन, वगैरेंची पाहाणी करून तो स्त्री-भूमिकेस अनुरूप वाटला, तर भाऊरावांनीं त्यास घेऊनच यावें, असें ठरलें होतें.

भाऊराव कोल्हटकर बडोद्यास गेले. बाळशास्त्री तेलंग, वगैरे भास्करचे हित-संबंधी लोक बहिणीचे यजमान दक्षिणदास पुराणिक, आश्रयदाते पिंगळे-बुवा, वगैरे मंडळींस भेटून भास्करनें ' किर्लोस्कर कंपनीं ' त दाखल व्हावें, अशी सर्वांची संमति मिळवून, स्वतः भाऊरावांनीं भास्करचें गाणें ऐकलें.

१९ ऑगस्ट, १८८४ रोजीं भाऊराव कोल्हटकर भास्करला घेऊन पनवेलला पोंचले. बाळकोबा नाटेकर, अण्णासाहेब, भाऊराव कोल्हटकर, मोरोबा वाघुलीकर, ह्या ' किर्लोस्कर कंपनी ' च्या प्रमुख मंडळींसमोर भास्करची पुन्हा परीक्षा झाली. त्याची तरतरीत मुद्रा, सडपातळ अंग-यष्टि आणि अत्यंत गोड आवाज ह्यांचा प्रभाव इतका पडला, कीं अण्णासाहेबांनीं कैकेयीची भूमिका भास्करला द्यायचें ठरवलें. कैकेयीला मंथरेबरोबर भरपूर गाण्याला वाव द्यावा व ' राम-राज्य-वियोग ' नाटकाच्या आकर्षणांत भर घालावी असें ठरलें.

भास्करची संस्कृत शिक्षणाची इतिश्री होऊन गायक नट म्हणून स्वावलंबी व्यवसायांत भास्करचा ऐन पंधराव्या वर्षीं प्रवेश झाला. भास्करच्या जीवनाला ही एक फारच मोठी कलाटणी मिळाली.

२ . . .

## नाटक-मंडळींत

'किर्लोस्कर कंपनी ' १८८० सालीं स्थापन करून अण्णासाहेब किर्लोस्कर ह्यांनीं मराठी नाट्यसृष्टीला व संगीत–क्षेत्राला वेगळेंच आकर्षक व श्रेष्ठ पद प्राप्त करून दिलें होतें. सुशिक्षित, प्रतिष्ठित मंडळींची नाटक कंपनी आणि वाङ्मय, गायन ह्यांची जोड असलेली अभिनव उच्च दर्जाचीं नाटकें करणारी एक श्रेष्ठ ध्येयाची संस्था, असें फार मोठें बहु-मानाचें स्थान ' किर्लोस्कर कंपनी ' ला सुरुवातीपासूनच प्राप्त झालें. कंपनींतील राहाणीचा मोठ-मोठ्या श्रीमंतांनाही हेवा वाटावा, अशी ऐश्वर्य-शाली राहाणी ' किर्लोस्कर कंपनी ' ची असे.

अण्णासाहेब, वगैरे मंडळींचीं तीं पागोटीं, भारी शालजोड्या, भाऊरावांचे उंची सर्जचे कोट, जरीचे रुमाल, वगैरे सर्व राहाणी-मान अतिशय प्रतिष्ठित आणि वैभव-संपन्न असे. मधुकरी मागून कोणाच्या तरी आश्रयानें कसें तरी जगणाऱ्या भास्करला प्रथमच इतकें चांगलें खाणें-पिणें, उंची कपडे व कलात्मक वातावरण ह्यांचा लाभ झाला.

बाळकोबा नाटेकर हे ‘ किर्लोस्कर कंपनीं ’ तले गायन-शिक्षक होते. बीन, सतार, वगैरे वाद्यें ते वाजवीत. शास्त्रीय गाण्याचें त्यांचें ज्ञान बऱ्यापैकीं होतें. भाऊरावांचें गायन जुन्या परंपरागत लावणी वळणाचें. त्यांची सर्व मदार त्यांच्या अद्भुत, गोड, चढ्या फिरत्या आवाजावर, असामान्य रूप-संपदेवर व स्त्री-सदृश अभिनय-कौशल्यावर असे. मोरोबांच्या व अण्णासाहेबांच्या गाण्याची धाटणी अगदीं सरळ व सोपी असे. ‘ शाकुंतल ’ नाटकांत ‘ असावरी ’ सारखे राग डोकावले तर ‘ सौभद्रां ’ त ‘ यमन, ’ ‘ पिलू, ’ ‘ कालंगडा, ’ ‘ विभास, ’ वगैरे अनेक रागांची योजना करण्यांत आली होती. अण्णासाहेब किर्लोस्करांनीं महाराष्ट्रांतल्या सर्व-साधारण जनतेला हें गाणें प्रथमच मोठ्या दिमाखानें ऐकवलें होतें. बाळकोबा नाटेकर नारदाची व कृष्णाची भूमिका करीत. त्यांच्या तोंडचें रागदारीचें गाणें अगदीं ठाकठीक ऐकायला मिळे. भाऊरावांना वेग-वेगळ्या वळणाचीं पण ‘ पिलू ’ रागांतलीं लागोपाठ तीन पदें असत व पुढेंही इतर अनेक प्रकारचीं अभिनव चालीचीं पदें असत. त्यांच्या अत्यंत खणखणीत सुरेल आवाजांत कोणतेंही गाणें मनोरम लागत असे. कारण त्यांचें गायनच तसें भावनापूर्ण असे.

भास्कर गायक नट म्हणूनच कंपनींत दाखल झाला. ह्याच सुमारास ‘ राम-राज्य-वियोगा ’ च्या तालमी सुरू होत्या. आणखी पंधरा-सोळाच दिवसांनीं दि. ४ सेप्टेंबर, १८८४ रोजीं ‘ राम-राज्य-वियोगा ’ ची रंगीत तालीम होती. शंकरराव मुजुमदार कैकेयीची भूमिका करणार होते. पण भास्कर एवढ्यांतच कंपनींत आल्यामुळें ती भूमिका त्याला द्यायचें ठरलें. भास्कर गायक-नट, तेव्हां त्याला पदें हवींतच. म्हणून पदें करायला दिलीं. आणि ‘ राम-राज्य-वियोग ’ संगीत स्वरूपांत रंगभूमीवर आणायचें ठरलें.

भास्करच्या तालमी घेण्यासाठीं गोविंदराव देवलांना हरिपूरहून खास बोलावण्यांत आलें. स्त्रियांचा अभिनय, स्त्री-सदृश भाषा बोलणें, वगैरे सर्वच गोष्टी नवीन नट भास्कर ह्याला शिकवणें अवश्य होतें. हें सर्व कार्य क्रमशः सुरू झालें. जस-जशीं पदें तयार झालीं — त्यांची रचना बहुधा देवल मास्तरनींच केलेली होती — तस-तशी पदांची तालीम बाळकोबा नाटेकर घेऊं लागले. भाऊराव व अण्णासाहेब किर्लोस्कर सर्व कामावर देखरेख करीत होते.

२० ऑक्टोबर, १८८४ रोजीं 'राम-राज्य-वियोगा' चा पुण्यांत प्रथम प्रयोग लागला. त्या प्रयोगांत शंकरराव मुजुमदारांनींच कैकेयीची भूमिका केली. भास्कर हळू-हळू तयार होत होता. मंथरेचें काम भाऊराव कोल्हटकर करीत होते आणि त्यांच्या बरोबरीनें कैकेयीचें गायन व भूमिका प्रभावी होईल अशी खात्री वाटेपर्यंत अण्णासाहेबांनीं भास्करला रंगभूमीवर आणण्याची घाई केली नाहीं.

दिवाळीनंतर थंडीच्या दिवसांत मुंबईची हवा अत्यंत आल्हाद-दायक असल्यामुळें बडे सरकारी अधिकारी, वगैरे लोक मुंबईंत असत. पुण्यांत पाऊस कमी. पावसाळ्यांत पुण्यास मुक्काम ठोकून हिवाळ्याचा मोसम मुंबईत घालवायचा अनेक थोर लोकांचा क्रम असे. हिवाळ्यांत 'किर्लोस्कर कंपनी मुंबईस आली ती 'राम-राज्य-वियोग' हें नवें नाटक घेऊनच आली व येथेंच भास्करनें प्रथम कैकेयीची भूमिका केली व ती गाण्याच्या दृष्टीनें भाऊराव कोल्हटकरांना तोडीस तोड अशा थाटानें साजरी झाली. 'किर्लोस्कर कंपनी' चे गायन-मास्तर बाळकोबा नाटेकर ह्यांनीं भास्करला उत्तम तालीम दिली होती. भाऊरावांच्या गाण्यांना व अभिनयाला जशी टाळी पडे, तशीच टाळी भास्करच्याही गाण्याला पडूं लागली. भास्करचें रंगभूमीवर निश्चित स्थान निर्माण झालें. भाऊरावांप्रमाणेंच उंच गोड गळा व अतिशय सुरेल, बांधीव, शास्त्र-शुद्ध पद्धतीचें गाणें, ह्यांच्या योगानें भास्करची छाप जनतेवर चांगलीच पडली. हें कार्य किती कठीण होतें ह्याची कल्पना येण्यास मंथरा व कैकेयी ह्या पात्रांना दर अंकांत लागोपाठ पदें कसकशीं होतीं, त्याची पाहाणी करणें उपयुक्त ठरेल. मंथरेचें काम महाराष्ट्रीय गायन-शौकिनांच्या गळ्यांतला ताईत अशा 'भावड्या' चें असल्यामुळें नवशिक्या भास्करला किती कठीण सामना द्यावा लागला असेल, ह्याची कल्पना पुढील पदांच्या क्रमावरून येईल. मंथरा व कैकेयीचीं पदें पुढीलप्रमाणें आहेत :

**मंथरा :** "उद्यां बघ जातें, नृप-सिंहासन रामातें।"

**कैकेयी :** "मम सुत भरत जरी असला।"

**मंथरा :** "राम-करीं जरि नृप-पद गेलें।"

**कैकेयी :** " जो मम नयन-चकोर इंदु । "

**मंथरा :** " खोटी तुजवर नृप-ममता ती। "

ह्याप्रमाणें मंथरा व कैकेयी म्हणजे ' भावड्या ' व ' भास्कर ' ह्यांच्यांतील हा गायनाचा सामना अद्भुत वठे. मंथरेच्या भूमिकेंतील ' भावड्या ' चें आवेशयुक्त गाणें व कैकेयीच्या भूमिकेंतील ' भास्कर ' चें भाव-मधुर व्याकुल गाणें ह्या वैचित्र्यानें ह्या प्रवेशास बहारीचा रंग चढे. ' जो मम नयन-चकोर इंदु ' ह्या भास्करच्या गाण्याला अनेकदा टाळी पडे. सर महादेव भास्कर चौबळ हे ह्या गाण्याची अनेक प्रसंगीं आठवण काढून तारीफ करीत.

तिसऱ्या अंकांत कैकेयी व दशरथ ह्यांचीं पदें क्रमानें येत. हा सर्व वृत्तान्त ' किर्लोस्कर कंपनी ' चे तत्कालीन व्यवस्थापक श्री. साठे ह्यांनीं आपल्या रोज-निशींत तपशीलवार नमूद करून ठेवला आहे.

श्री. नारायणराव जोगळेकर ह्यांनीं सांगितलेली एक आठवण नाट्य-भक्त श्री. पुरुषोत्तम रामचंद्र लेले सांगत. जोगळेकरांनीं ही हकीकत ' किर्लोस्कर कंपनी ' च्या जुन्या मंडळींकडून ऐकली होती. अर्थात् अशा दंतकथांत थोडी अतिशयोक्तिही असते.

" अण्णासाहेब किर्लोस्कर हे दशरथाची भूमिका करत. त्यांना स्वतःचें गाणें वेळेवर सुचत नसे. अशा वेळीं भाषणांना ज्याप्रमाणें पडद्यांत प्रॉम्प्टर असे, तेंच कार्य भास्करराव बखले ह्यांस कैकेयीची भूमिका करतांना करावें लागे. हें केवळ शब्द सुचविण्याचें काम नसे. भास्करनें दशरथाचें गाणें स्वतःशीं गुणगुणावें व तें ऐकून अण्णासाहेबांनीं मोठ्यानें गावें. शब्द व सुरावट दोन्ही भास्करनें सुचवावींत आणि अण्णासाहेबांनीं गावें, असा तो क्रम असे. " भास्करच्या गाण्याविषयीं अण्णासाहेबांस किती विश्वास वाटत असें, हें ह्या आठवणींत सूचित होतें.

' किर्लोस्कर कंपनी ' चे मॅनेजर साठे ह्यांनीं तिसऱ्या अंकाबद्दल पुढील तपशील नमूद करून ठेवला आहे. शेवटच्या मोठ्या प्रवेशावरील टिपण पुढीलप्रमाणें आहे :

" राजा उतार-वयाचा व कैकेयी तरुण वयाची असल्यामुळें तरुण बायको कशी चढेल असते, हें ह्या प्रवेशांत पाहाण्याजोगें आहे. अण्णासाहेबांनीं पदांच्या चालींची रचना फार बहारीची केली आहे.

**कैकेयी :** ( १ ) " वृषपर्व्याशीं युद्ध चाललें स्वर्ग-लोकीं जेधवां
संनिध होतें मी तेधवां। "
( २ ) " एक क्षणभरि जवळी नसलें।
वाटे अपणा वर्षचि गेलें। "
( ३ ) " पडेल भूवरि तो गृह-माली। "

हीं कैकेयीचीं तीन पदें झाल्यावर दशरथाला दोन पदें असत.

**दशरथ :** ( १ ) " सोडुनि अजि रामराय जाय जरि वनीं। "
( २ ) " निर्मल कुल कसलें, निपजुनि दूषण मीं अणिलें। "

शेवटीं कैकेयीचें पद आहे :
" हरिश्चंद्र नृपरायें राज्यदान जरि दिलें। "

ह्या प्रवेशाच्या शेवटीं कैकेयी राजाच्या मस्तकावर लत्ताप्रहार करते व राजा मूर्छित होतो. "

साठे ह्यांनीं नमूद केलें आहे, कीं " हा प्रवेश इतका रंगत असे, कीं ज्यांच्या डोळ्यांतून टिपें पडलीं नाहींत व हृदय थरारलें नाहीं, असा प्रेक्षक नाट्य-गृहांत एकही नसे. नाटक संपल्यावर भर रस्त्यावरील गर्दींत स्त्री-पुरुष प्रेक्षक कांहीं काळ त्या कैकेयीची अत्यंत निंदा करीत. कैकेयीचा कडक शब्दांनीं भर रस्त्यावर निषेध करावा, ह्यावरून नाटक संपल्यावर बराच काळपर्यंत श्रोत्यांच्या मनावर नाटकाचा परिणाम कसा टिकत असे, हें अनेकदा अनुभवास येई : "

' किर्लोस्कर कंपनी ' ची राहाणी बादशाही थाटाची असे. जेवणास चांदीचीं भांडीं, सणावाराच्या दिवशीं मेजवान्या, रोषणाई, अत्तरांचे दिवे, असें ऐश्वर्य असे.

आतां भास्करला सोळावें वर्ष लागलें होतें. परंतु अण्णासाहेब व भाऊराव ह्यांच्या बरोबरीनें भूमिका करणारा गायक-नट म्हणून ' किर्लोस्कर कंपनीं ' त भास्करला बरीच चांगली मानाची वागणूक मिळे. न गाणारे व अगदीं सामान्य

दासींचीं, वगैरे गैरमहत्त्वाचीं कामें करणारे जे नट असत, त्यांच्याप्रमाणें त्याचें स्थान मजूर-नोकरासारखें नसे. भास्कर ह्या क्षेत्रांत नवा, म्हणून तो अत्यंत अदबीनें वागे. ‘ किर्लोस्कर मंडळी ’ च्या खास नटांप्रमाणें त्यास दूध पिण्यास मिळे. ‘ किर्लोस्कर मंडळीं ’ त त्या वेळीं कोठींत बदाम, पिस्ते, वेदाणा, वगैरे मेवा सदैव भरपूर असे. त्या काळांत सर्वच वस्तु अतिशय स्वस्त असत. आज भुईमुगाच्या दाण्यांना जेवढी किंमत पडते, तेवढ्या किंमतींत तेव्हां बदाम-पिस्ते मिळत. वेदाणा दोन आणे शेर मिळे, रुपयाला वीस शेर दूध मिळे. त्या वेळचा भास्करचा वीस रुपये पगार आजच्या दोनशें रुपये पगारापेक्षां अधिक मूल्याचा असे. ‘ किर्लोस्कर मंडळीं ’ त सुरुवातीपासून वार्षिक बोनस वांटण्याची रीत असे. नाटक-मंडळीच्या फायद्यांतून प्रत्येक नटाला पगाराच्या दसपट तरी बोनस मिळे. अर्थात् मंडळीच्या कामांत कुचराई व गुन्हे केल्यास ह्या बक्षीस रकमेंत कपात केली जाई. सरकारी नोकरीपेक्षांही ‘ किर्लोस्कर नाटक मंडळी ’ च्या नोकरींत अतिशय आकर्षकपणा होता. प्रतिष्ठाही बहुतांशीं मिळे. नटाचें मुखावलोकन केलें तर स्नान करावें, असें मानणाऱ्या जुन्या कर्मठ समाजांत ही प्रतिष्ठा निरपवाद होण्याचा काळ, कोठल्याही कारणानें असो, अजूनही प्राप्त झालेला नाहीं.

चार घरीं मधुकरी मागून मिळतील ते भाकरीचे तुकडे मोडून जगायचें, एखाद्या वाराच्या दिवशीं व मेजवानींतच नीट जेवायला मिळालें तर मिळायचें, अशा खडतर अवस्थेंत जगलेल्या भास्करला ‘ किर्लोस्कर मंडळीं’त अतिशय थाटामाटाची व ऐश्वर्याची राहाणी लाभल्यानें जितकें सुख-समाधान मिळालें, तितकेंच त्या वातावरणाच्या सत्य-स्थितीचें जवळून दर्शन झाल्यानें तिचें भयानक किळसवाणें रूपही त्याला पाहायला मिळालें. नाटक मंडळींतील नटांच्या जीवनाचें चित्र महान् कादंबरीकार हरिभाऊ आपटे ह्यांनीं आपल्या कादंबऱ्यांत चित्रित करून ठेवलें आहे. नाटक-मंडळ्यांचे नट कितीही वैभवशाली असले, रूप-गुणांनीं संपन्न असले, तरी ते बहुतेक नीति, कर्तृत्व, शिक्षण, वगैरे सर्वच बाबतींत खालच्या पातळीवरचे व अनेकदा अगदीं किळसवाणे असत. नाटक-मंडळ्यांचे प्रमुख नट रूपवान् कलावंत असले, तरी त्यांचें चारित्र्य निर्मळ असेलच, अशी खात्री नसे. कारण त्यांना

व्यसनी कलावंत, श्रीमंत मंडळी व गानलोलुप कलावंत स्त्रिया ह्यांचा सहवास सहजच घडे. भास्कर वयानें लहान आणि अतिशय बालबोध अशा सोवळ्या वळणांतून आला होता. तो 'किर्लोस्कर मंडळीं' तील इतर मंडळींशीं फारसा न मिसळतां त्याचे गायन-गुरुजी बाळकोबा नाटेकर ह्यांच्या अखंड सहवासांत गायन-वादन ऐकत राही. बाळकोबा सदैव बीन, सतार, अथवा अशाच गायन-विद्येच्या साधनांत मग्न असत. विद्या-निष्ठ भास्करला त्यांची संगत अनेकशः उपकारक वाटे.

मंडळीचा मुक्काम ग्वाल्हेरला असतांना बाळकोबा तेथील सर्व नामांकित गाण्यांच्या मैफलींना जात आणि त्यांच्याबरोबर भास्कर जात असे. ग्वाल्हेरचे विख्यात सतारिये अमीरखां ह्यांजकडे बाळकोबा सतार-वादन शिकत. बाल-भास्करला ही सर्व तालीम पाहायला मिळे, सूक्ष्म स्वर व ताल-क्रियांची चर्चा ऐकायला मिळे. त्याच्या मनांत संगीतांतील गहन सौंदर्य-स्वरूपाचा वेध घेण्याची नकळत प्रेरणा रुजत होती. गायन-विद्येवरील त्याची आसक्ति नित्य नवे-नवे संस्कार मनावर उमटवीत होती. नकळत त्याला त्याच्या विद्येंतील सूक्ष्म, नाजूक सौंदर्य-स्थलांचें आकलन व्हावें, असेच संस्कार त्याच्या मनावर होत होते. संगीताच्या अपार क्षेत्रांत प्रावीण्य मिळवण्यासाठीं अनंत अखंड अभ्यास करण्याचें बाळकडू भास्करला बालपणींच उदंड प्रमाणांत पाजलें जात होतें.

कांहीं कलावंतांच्या लहरीपणाचा अनेकदा कार्य-कारण-भाव सहज समजण्यासारखा नसतो. नोकरींत अधिक पगार मिळण्यासाठीं अथवा मानापमानाच्या बारीकशा निमित्तानें रुसवा धरणें, सत्याग्रह करणें, वगैरे प्रकार कलावंतांनीं केल्याचें अनेकदा अनुभवास येतें.

बाळकोबा नाटेकर हे 'किर्लोस्कर मंडळीं' तील गायन-शिक्षकच नव्हते, तर एक महत्त्वाचे संगीत नट होते. वास्तविक त्यांना मंडळीच्या मालकाच्याच दर्जानें वागवण्यांत येत असे, पण ते एखादे वेळीं रुसून बसत. 'मला सर्दी झाली आहे,' 'गळा ठीक नाहीं,' 'मी तूर्त कामच करीत नाहीं,' असें बाळकोबांचें अधून-मधून रुसणें चाले.

भास्कर बखले कामें करायला लागून थोडेच महिने झाले होते. एकाएकीं बाळकोबांनीं 'कांहीं काळ काम करीत नाहीं' असें म्हटलें. 'सौभद्रांत' ते दोन भूमिका करीत; पहिल्या अंकांत नारदमुनि व पुढें श्रीकृष्ण-नारदाची छोटी भूमिका बाल-भास्करला शिकवण्यांत आली व नारदाचीं पदें म्हणून ती त्यानें उत्तम वठवली. बाल-भास्कर फारच लवकर रंगभूमीवर रुळल्याप्रमाणें काम करूं लागला. एक तर त्याच्या असाधारण सुंदर, सुसंस्कृत गळ्यामुळें गाणें हें त्याला सहज-साध्य असे. 'किर्लोस्कर मंडळी' च्या नाटकांतील बहुतेक पदें त्याला वारंवार ऐकून पाठ झालीं होतीं व तीं तो स्वतःशीं म्हणतही असे. बाळकोबा नाटेकर हेच 'किर्लोस्कर मंडळीं' त भास्करचे गायन-गुरु होते, त्यांचीं पदें भास्कर उत्तमच गात असे. मंडळींत भास्करचें गाणें हा एक मोठा कौतुकाचा विषय असे. सभा-धीटपणा हा कथेंत गाऊन अजाण वयांतच त्यांच्या अंगीं बाणला होता. अण्णासाहेब किर्लोस्करांचा त्या लहान मुलावर त्याच्या ह्या अलौकिक गुणांनीं विलक्षण लोभ जडला होता.

भास्कर नाटक-कंपनींत गेला, तेव्हां त्यानें केवळ बडोद्यांतल्या वडील परिचित गुरु-जनांची अनुज्ञा घेतली होती. वडील नोकरी सुटल्यामुळें विरागी बनून पार्थिव पूजेंत मग्न असत. त्यांना भास्कर नाटक-मंडळींत गेल्याचें वृत्त लवकरच समजलें. रघुनाथरावांना विलक्षण अस्वस्थता येऊन विवंचना वाटूं लागली. मुलगा आजारी पडला व मेला तर जितकें दुःख होईल, त्यापेक्षां तो शील-भ्रष्ट होण्याच्या आशंकेनें तत्कालीन सुशिक्षित ब्राह्मण अधिक बेचैन होत. मुलगा नाटकांत गेला. त्याच्या जन्माचें नाटक तर होत नाहीं ! त्याची वाताहत तर होत नाहीं ! ह्या काळजीनें रघुनाथराव व जानकीबाई अतिशय उद्विग्न झालीं. मुंबईस 'किर्लोस्कर नाटक मंडळी' चे प्रयोग सुरू आहेत हें समजल्यावर त्यांनीं मुंबईस जायचें ठरवलें. मुंबईस जाऊन नाटक-मंडळींतून स्वतःच्या मुलाला परत घरीं नेण्याच्या निग्रहानें रघुनाथराव मुंबईस येऊन दाखल झाले. जवळ प्रवास-खर्चासाठीं पैसे नव्हते, ते थोरला मुलगा त्र्यंबकराव ह्यानें दिले. आपण आपल्या गरिबींत लहान मुलाला एकाकी वाऱ्यावर सोडल्याचा कांहीं भयंकर परिणाम तर होणार नाहीं, ह्या शंकेनें रघुनाथराव व्याकुळ झाले होते.

५

मुंबईतल्या ' व्हिक्टोरिया थिएटर ' मध्यें ' किर्लोस्कर मंडळी ' चे प्रयोग चालू आहेत, हें ऐकून मुलाच्या शोध-समाचारासाठीं रघुनाथराव कसे-बसे मुंबईत येऊन पोंचले. थिएटरचा पत्ता मिळवून एका मित्राच्या मदतीनें ते तेथें गेले. मित्रानें त्यांस नाटकाचें तिकीट घेऊन दिलें. नाटकांत मुलगा दिसेल, ह्या आशेनें रघुनाथरावांनीं नाटकाचा प्रयोग पाहिला. पण कैकेयीच्या भूमिकेंत स्त्री-सदृश भाषा बोलणारा व गाणारा मुलगा, हाच आपला भास्कर असेल, अशी रघुनाथरावांस शंकासुद्धा आली नाहीं. आधींच त्यांनीं ह्या नव्या वळणाचें नाटक कधीं पाहिलेलें नव्हतें. मुलाला ओळखायचें तें फक्त आवाजावरून. पण स्त्री-भूमिकेंतल्या भास्करचें मुद्दाम शिकवलेल्या पद्धतीचें बोलणें व आवाज हीं त्यांना ओळखूं आलीं नाहींत. नाटकांत इतक्या दिमाखानें, तयारीनें गाणारा मुलगा हाच भास्कर, असें ओळखायला वडलांनीं त्याचें असें मोकळ्या आवाजांतलें साथीसह गाणें कधींच ऐकलें नव्हतें.

नाटक संपून मंडळी नाट्य-गृहाबाहेर पडतील, तेव्हां मुलास गांठून, त्याची समजूत काढून, त्याला ह्या दुराचारापासून दूर घरीं परत न्यायचें, अशा विचारानें रघुनाथराव नाट्य-गृहाच्या दरवाजाबाहेर उभे राहिले. बराच वेळ बाहेर पडणाऱ्या मंडळींची टेहळणी करीत, दारांत उभा असलेला हा खेडवळ माणूस नाटक-गृहाच्या पहारेकऱ्याच्या नजरेस आला. त्यानें ह्या माणसावर लक्ष ठेवलें. बरीच मंडळी निघून गेली, तरी हा दरवाजांतून हटत नाहीं, प्रेक्षक तर केव्हांच गेले होते, हें पाहून पहारेकरी त्यांच्याजवळ गेला. त्यानें विचारलें, " बाबा, तुम्ही कोणाची वाट पाहात आहांत ? " पहारेकऱ्यानें हा प्रश्न विचारायला व प्रत्यक्ष अण्णासाहेब नाट्य-गृहाबाहेर पडायला एकच गांठ पडली. " मी माझा मुलगा भास्कर भेटेल म्हणून इथें वाट पाहात आहे. " हे रघुनाथरावांचे शब्द ऐकून अण्णासाहेब पुढें झाले. त्यांनीं रघुनाथरावांस नाट्य-गृहांत नेलें. स्वतःची वेषभूषा उतरून, तोंड धुवून भास्कर येईपर्यंत अण्णासाहेबांनीं रघुनाथरावांस आदरानें बसवून घेतलें. पूस-तपास केला. अण्णासाहेब किर्लोस्करांची ती भव्य रुबाबदार मूर्ति, मोठें भारी किंमतीचें पागोटें, अंगरखा व भरजरी शालजोडी आणि अत्यंत सुसंस्कृत शालीनतेचें वर्तन पाहून रघुनाथराव दिपून गेले.

भास्कर आला. त्यानें वडलांचे पाय धरले. कैकेयीची भूमिका करून प्रेक्षकांना दिपवून टाकणारा नट हाच आपला मुलगा भास्कर हें पाहून, रघुनाथरावांचा जीव भांड्यांत पडला. स्त्रीवेषानुकूल लांब केस ठेवलेला, स्वच्छ सुरेख पोषाख केलेला मुलगा त्यांच्या पायां पडला, तेव्हां रघुनाथरावांचें मन गहिंवरून आलें. त्यांच्या डोळ्यांत अश्रु उभे राहिले. मुलाची वाताहत झाली नाहीं, उलट तो जुन्या वळणाच्या, सुसंस्कृत वर्तनाच्या प्रौढ प्रतिष्ठित मंडळींच्या सहवासांत आहे हें पाहून, रघुनाथरावांचें मन एकदम शांत झालें.

अण्णासाहेबांनीं मंडळींतील शिस्त, सद्वर्तनाबद्दलचा कटाक्ष, वगैरे गोष्टी सांगून भास्करच्या गायन-गुणाचें चीज करील अशीच ती प्रतिष्ठित संस्था आहे, वगैरे वस्तु-स्थिति रघुनाथरावांस समजावून सांगतांच त्यांचें मत पालटलें. ह्या नव्या मार्गानें कां होईना, पण मुलाचा उत्कर्ष होत असेल तर होऊं दे, असें मनांत आणून मुलाला घरीं परत नेण्याचा संकल्प त्यांनीं सोडून दिला. आपण खेड्या-पाड्यांत गरिबीच्या खडतर आयुष्यांत जगणार, त्यापेक्षां भास्कर खूपच सुस्थितींत, सुखांत आहे, त्याच्या अंगावर उंची कपडे आहेत, चांगल्या लोकांच्या संगतींत मुलगा बहु-मानानें जगतो आहे, हें पाहून रघुनाथराव परत विसनगरला, थोरला मुलगा त्र्यंबकराव नोकरीवर होता तेथें, परतले. दोन्ही मुलगे आपापल्या उद्योगाला लागले. स्वतःला नोकरी नाहीं, तरी मुलीचें लग्न झालें आहे, आतां आपण ईश्वर-भक्तींत शेवटचे दिवस काढावे, असें रघुनाथरावांनीं ठरवलें.

विसनगरला परतल्यावर आपली पत्नी जानकीबाई व मुलगा त्र्यंबक ह्यांस भास्करच्या वैभवाची हकीकत रघुनाथरावांनीं सांगितली. पण ते स्वतः आतां बेकार व असमर्थ बनले होते. प्रकृतीही नीट राहिना. शेवटीं त्यांनीं संन्यास घेतला व त्या विरक्तीच्या झटक्यांत दोन-तीनच दिवसांनीं त्यांनीं समाधि घेतली.

वडलांच्या आकस्मिक मृत्यूचें वृत्त कळतांच रजा घेऊन भास्कर विसनगरला गेला. वडलांचे दिवस उरकतांच दुःखी आई व वडील बंधु ह्यांचा निरोप घेऊन भास्कर पुन्हा ‘ किर्लोस्कर मंडळीं ’ त कामावर रुजू झाला.

पण दिवाळीपूर्वीं २ नोव्हेंबर रोजीं भास्करवर दुसरा आघात झाला. अण्णासाहेब किर्लोस्कर ह्यांस त्यांच्या ऐन तरुण वयांत मृत्यूनें गांठलें. अण्णासाहेबांचें वय केवळ ४२ वर्षांचें होतें. आधुनिक संगीत नाट्य-कलेचा हा प्रणेता अकालीं नाहींसा झाला. ' किर्लोस्कर मंडळी ' वर हा फारच मोठा आघात होता. भास्कर आतां अवघ्या सोळाव्या वर्षीं पुन्हा पोरका झाला. नुकतें कोठें समजायला लागलें होतें, अशा तेरा-चौदा वर्षांच्या वयापासून स्वावलंबनानें जगल्यामुळें भास्कर अकाल प्रौढ बनतच होता. पण संकटांनीं धीर न खचावा असे त्याचे बाल-वयांतले सर्वच संस्कार आरोग्यशाली होते. त्याला स्वकष्टानें स्वतःचें भवितव्य उज्ज्वल करायचें होतें. संगीत-विद्या-साधन हा त्याच्या जीवनाचा एकमेव आधार आतां उरला होता.

२ . . .

# ‘नाटक-मंडळीं’त : २

अण्णासाहेब किर्लोस्कर हे ‘ किर्लोस्कर नाटक-मंडळी ’ चे अनेक अर्थांनीं सूत्रधार होते. नाट्य-लेखक, नट व मालक ह्या आदर्श भूमिकेंत ते असल्यामुळें व्यवसायाचीं सर्वच महत्त्वाचीं अंगें स्वानुभवानें त्यांना अवगत होतीं. उत्तम कलावंत जोडणें, कंपनीचा दर्जा संभाळणें, भांडवल जमवणें, वगैरे सर्वच अंगांनीं अण्णासाहेब यशस्वी ठरले होते. मराठी समाजांतील प्रतिष्ठित विद्वान् धुरीणांना ‘ किर्लोस्कर ’ ही आपल्या समाजाची एक भूषण-भूत संस्था वाटावी, असें प्रेमादराचें स्थान त्यांनीं आपल्या मंडळीसाठीं निर्माण केलें होतें.

बाल-भास्करला अर्थातच अण्णासाहेबांच्या ह्या सर्व कर्तृत्वाची कल्पना असेल वा नसेल, आपला पोटाचा व्यवसाय जी गायन-विद्या, ती अधिक शिकून, स्वतःचा विकास साधण्याचें एक आश्रयस्थान, एवढाच संबंध बाल-भास्करचा ‘ किर्लोस्कर मंडळी ’ शीं होता.

पुनर्घटनेसाठीं ‘ किर्लोस्कर नाटक-मंडळी ’ अण्णासाहेबांच्या मृत्यूनंतर कांहीं काल स्थगित करावी लागली. मंडळीचे भागीदार व मंडळीला

सहानुभूतीनें मदत करणारे सल्लागार, ह्यांच्या विचारानें भाऊराव कोल्हटकर ह्यांस नेतृत्व देऊन पुन्हा नाटक-मंडळी सुरू करण्याचा विचार ठरला. अण्णासाहेबांच्या भूमिका रामभाऊ किंजवडेकरांनीं कराव्या असें ठरून, त्यांच्या तालमी सुरू झाल्या. ह्या पुनर्घटित मंडळीचा मुक्काम मात्र तातडतोब इंदूरला हलवावा लागला, कारण १२ डिसेंबर, १८८५ रोजीं 'मदरासा हिज हायनेस स्कूल' नामक गायन-शाळेच्या उद्घाटन-समारंभानिमित्त होणाऱ्या जलशाचें आमंत्रण अण्णासाहेब किर्लोस्करांनीं मृत्यूपूर्वी स्वीकारून ठेवलें होतें. ह्या शाळेला इंदूरच्या होळकरमहाराजांचाच आश्रय असल्यामुळें समारंभांत म्हणण्यासाठीं महाराजांच्या स्तुतिपर कविताही अण्णासाहेबांनीं आधींच लिहून त्या मंजूरही करून घेतल्या होत्या. नट-वर्गाकडून त्या कवितांच्या चाली ठरून तालमीही झाल्या होत्या. पण ह्या भव्य समारंभास अण्णासाहेबांनीं उपस्थित असावें अशी विधि-योजना नव्हती. ह्या समारंभाच्या आधींच कांहीं दिवस 'किर्लोस्कर मंडळीं'तील प्रमुख गायक इंदुरास येऊन दाखल झाले व मोठ्या थाटानें गाण्यांची तालीम सुरू झाली.

भाऊराव कोल्हटकर, बाळकोबा नाटेकर, भास्कर बखले, मोरोबा वाघुलीकर, वगैरे मंडळी गायकांत होती. साथीला अखिल-भारतीय कीर्तीचे पखवाजी नानासाहेब पानसे व महान् बीनकार बंदेअल्लीखांसाहेब हीं प्रचंड लौकिकाचीं माणसें होतीं.

पानसे घराण्याचे संस्थापक नानासाहेब हे लय-शास्त्राचे एक फारच मोठे अधिकारी होते. ते नृत्य-शिक्षकही होते; गायकांना व वादकांना लयकारी शिकवणारे महान् आचार्य होते.

बनारस येथें ज्योतसिंग-नामक गुरूजवळ बारा वर्षें शिक्षण घेऊन, अखंड मेहनतीनें त्यांनीं आपला हात कमालीचा नरम व आकर्षक बनवला होता. बनारस हें ठुमरीचें व नर्तनाचें माहेरघर. तेथील वातावरणांत नानासाहेबांनीं स्वतःचें वादन कमालीचें डौलदार बनवलें होतें. सूक्ष्म गणिती दृष्टि व नृत्याची मार्मिक शिकवणी घेऊन, त्यांनीं अनेक परणें व मुखडे सुधारून डौलदार बनवले होते. विलंपतींतील अतिशय ठाय वजनदार लय डोक्यांत व हातांत पक्की करून त्यांनीं अनेक नवे बोल रचले. जुन्यांमध्यें काट-छाट करून व

नवीन भर घालून त्यांनीं अनेक बोल अधिक डौलदार केले. त्यांना लयकारीची एक दिव्य दृष्टिच आली होती. त्यांनीं अनेक विद्यार्थी शिकवून तयार केले. मृदंग, नृत्य व गायन ह्यांचें एकत्र शिक्षण स्वतः घेऊन व तें अखंड इतरांस शिकवून, त्यांनीं मेहनतीचे प्रचंड पर्वत उचलले. नानांचा मृदंग ऐकावा व समोर अतिशय सुंदर नृत्य पाहिल्याचें काल्पनिक सौख्य अनुभवावें, असा त्यांच्या वादनांत डौल असे, मृदुता असे. परंतु ह्या महान् आचार्यांच्या सौजन्याला सीमा नव्हती. कोणत्याही गायक-वादकाचा उपमर्द न करतां त्याला गौरवून त्याच्या लयकारींत मदत करावी, प्रोत्साहन द्यावें, अशी त्यांची वृत्ति असे. इंदूरचे महाराज जें अल्प वेतन देत, तेवढ्यावर ते खूष असत. प्रसंगीं कथेकऱ्याचीही साथ करीत. एखाद्या चाल-चलाऊ गायकाची साथ करतांनाही त्याचा यत्किंचित् अपमान होऊं देत नसत. नानासाहेब पानसे ह्यांचा 'किर्लोस्कर मंडळी' शीं अण्णासाहेब किर्लोस्कर ह्यांच्या हयातींतच स्नेह-संबंध जडला होता.

दुसरे साथीदार बंदेअल्लीखां हेंही असेंच एक मोठें प्रस्थ होतें. अनेक राज-दरबारांत त्यांनीं मान-सन्मान मिळवलेला. हे ग्वाल्हेरचे नामांकित गवई हद्दूखां ह्यांचे जावई. हे गायन-वादनाशीं एकरूप झालेले मोठे लहरी वादनकार होते; ह्यांनीं राज-दरबारीं राहूनही फकिराप्रमाणें स्वैर वृत्ति टिकवली होती. नामांकित गायिका चुन्ना ही ह्यांची पट्टशिष्या. अत्यंत सूक्ष्म स्वरांचा विचार केलेले, कमालीचे मधुर वादक म्हणून त्यांना भारतांतील अजोड वादन-कारांत अग्रमान मिळे.

इंदूरच्या ह्या संघ-गायनाला विलक्षण रंग चढला. साथ व गायन अत्यंत सुरम्य झालें. एकजात सुरेले आवाज, खूप तालमीनें उत्तम बसविलेलें गायन, त्यांतून साथ इतकी नरम आणि डौलदार, कीं सारी सभा ह्या प्रार्थना-गीतांनीं डोलूं लागली. वातावरण स्वरांनीं व लयीनें भरून गेलें. इंदूरचे महाराज व दरबारचे गायन-प्रेमी लोक अतिशय खूष झाले. मंडळीनें आतां इंदुरांतच नाटकें लावून दीर्घ मुक्काम करावा, असा सर्वांचा आग्रह पडला.

‘ सुंदर मुखललना ’ ह्या ‘ हमीरां ’ तील चालीवर ‘ कैलासनाथ वंदुनि तुज हेंच मागतों ’ ह्या महाराजांस आयुरारोग्य मागण्याच्या प्रार्थनेनें इंदूरची जनता बेहद्द खूष झाली. ह्या समारंभामुळें विख्यात मृदंग-वादक नानासाहेब पानसे व बीनकार बंदेअल्लीखां ह्यांचा ‘ किर्लोस्कर मंडळीं ’ तील गायक-वर्गाशीं अधिक सलगीचा स्नेह जडला. भास्करच्या गायन-प्रेमी शिकाऊ अवस्थेस अप्रतिम वातावरण निर्माण झालें. अत्युत्तम लयकारी व सुरेल ढंगदार स्वरांचीं आंदोलनें ह्यांचा भास्करच्या शिकाऊ बाल-मनावर खोल ठसा उमटला. त्याच्या सद्भाग्याचा एक प्रसंग ह्याच नव्या परिचयामुळें लवकरच आला.

‘ किर्लोस्कर मंडळी ’ ची पुनर्घटना होऊन इंदुरांत नाट्य-प्रयोग सुरू झाले. रामभाऊ किंजवडेकरांनीं अण्णासाहेबांची दशरथाची भूमिका घेतली व ‘ राम-राज्य-वियोगा ’ चा तीन अंकी प्रयोग ठरला. इंदूरची दरबारी मंडळी, त्याचप्रमाणें नानासाहेब पानसे, बंदेअल्लीखांसाहेब, वगैरे बडी पाहुणे मंडळी नाट्य-प्रयोगाला उपस्थित होती.

बंदेअल्लीखांसाहेबांस मराठी भाषेचें ज्ञान अगदींच जुजबी होतें. त्यांना कथानक स्थूल मानानें समजलें, तरी फिकीर नव्हती. त्यांचें सर्व लक्ष गाण्याकडे होतें. भाऊरावांचा तो खणखणीत निरंकुश फिरणारा गळा, त्या गाण्याची एकंदर गोडी, सर्व-साधारण श्रोत्यांना जरी आश्चर्य-जनक सुंदर वाटली, तरी बंदेअल्लीखांसाहेबांचें चित्तमात्र वेधलें, तें भास्करच्या गाण्यानें. भास्करचाही आवाज चढा, खुला, गोड होता, पण त्याच्या गाण्यांत ताल-स्वराच्या नियमनाचाही संस्कार स्पष्ट होता. शास्त्रीय गाण्याचें वळण पूर्णपणें अंगीं बाणलेलें; त्यांतून बाळकोबा नाटेकरांनीं प्रत्येक गाण्यावर खूप तालमी घेऊन केलेली मेहनत; ह्यांमुळें भास्करचें गाणें रेखीव, प्रमाणबद्ध आणि बंदेअल्लीखांसारख्या अजोड उस्तादाच्या मनाला चटका लागेल असें झालें. वारंवार टाळ्या पडत. भास्कर एकेक गाणें पुनः पुनः म्हणे. खांसाहेबांच्या मनांत आलें, कीं हा कोवळा पोरगा उत्तम उस्तादाच्या तालमींत राहील, तर तो फार मोठा गायक बनेल. इतक्या लहान वयांतच गाण्यांत कायदा उत्पन्न झालेला. स्वर-ताल संभाळून निर्भयपणें गळा फिरवणारा हा मुलगा त्यांच्या मनांत भरला. बंदेअल्लीखांसाहेब अतिशय आकर्षित झाले. तो चढा,

खडा, स्वरेल आवाज आणि अगदीं कायदेशीर गाणें, हीं वैशिष्ट्यें खांसाहेबांस भाऊराव कोल्हटकरांच्या गाण्यापेक्षांही अधिक आवडलीं.

नाटक संपल्यावर पहाटे खांसाहेब ‘ किर्लोस्कर मंडळी ’ च्याच बिऱ्हाडीं झोपायला गेले. पहाटे दूर स्वतःच्या घरीं जाण्याचा त्यांनीं कंटाळा केला. सकाळीं झोप झाल्यावर सर्व गायक नट खांसाहेबांस अभिवादन करण्यासाठीं गेले. वडील मंडळींशीं बरोबरी करून खांसाहेबांच्या पुढें जाण्याची बालभास्करला हिंमत झाली नाहीं. पण खांसाहेब तो मुलगा केव्हां येतो, ह्याची वाट पाहात होते. शेवटीं त्यांना राहावेना. त्यांनीं कैकेयीच्या ‘ जो मम नयन-चकोर इंदु ’ ह्या गाण्याचे स्वर म्हणून, तें गाणें गाणारा मुलगा कोठें आहे, अशी चौकशी केली, तेव्हां भास्करला खांसाहेबांकडे बोलावण्यांत आलें.

भास्करनें बंदेअल्लीखांसाहेबांस मोठ्या अदबीनें व आदरानें नमस्कार केला. बंदेअल्लीखांसाहेबांनीं भास्करचा हात धरून त्याला स्वतःजवळ बसवून घेतलें; खिशांतून पैशांची थैली काढली व बाजारांतून मिठाई, चणे, गूळ, वगैरे साहित्य आणण्यास एका नोकराला सांगितलें. त्यांनीं भास्करला म्हटलें, “ बाळ, मी तुला गाणं शिकवणार आहें. आजच्या आज गंडा बांधून मी तुला माझा शिष्य बनवत आहें. ” जुन्या घरंदाज गवयांना शिकवण्यापूर्वीं हा गंडा बांधायचा विधि करीत असत. ह्या विधीनें गुरु व शिष्य ह्यांना कांहीं बंधनें निर्माण होत. ह्या विधीचें पावित्र्य उभयतांनीं रक्षण करायचें असे. घराण्याची गायकी, शिस्त, वगैरे गुरु-शिष्यांनीं पाळायची. गुरूनें स्वतःच्या मुलाप्रमाणें शिष्याला शिकवायचें आणि शिष्यानें गुरूला यथा-शक्ति गुरुदक्षिणा द्यायची. खांसाहेबांनीं बाजारांतून सामान आणवलें. भास्करच्या तोंडांत चणे-गूळ घालून त्याला आपला रीतसर शिष्य बनवलें. भास्करचा हा केवढा बहुमान होता, हें त्याला त्या वेळीं कितपत कळलें असेल कोणास ठाऊक ! त्यानें भांबावून विचारलें, “ मी आपणास गुरुदक्षिणा कोठून देऊं ? मी अगदीं गरीब मुलगा आहें. ” खांसाहेबांनीं स्वतःच्या थैलींतले पैसे काढून भास्करच्या हातीं १। पैसा दिला आणि सांगितलें, “ ही दक्षिणा दे. ” मंडळीचा अनेक महिने इंदुरास मुक्काम होणार होता. “ मंडळीच्या तालमी, वगैरे कामांतून जेवढा म्हणून रिकामा वेळ मिळेल, तेवढा मजकडे घालवीत

जा. मी तुला शिकवीन." एवढें सांगून बंदेअलीखांसाहेब स्वतःच्या बिऱ्हाडीं निघून गेले.

खांसाहेबांकडून जी अमूल्य विद्या मिळेल, ती त्यानें पवित्र समजावी व त्याच्या हातून हलगर्जीपणा होऊं नये, त्या बाल-विद्यार्थ्याच्या मनावर पवित्र संस्कार व्हावा, म्हणूनच गंडा बांधायचा विधि करण्यांत आला. बंदेअली-खांसाहेबांनीं पाहिलें, कीं मुलगा शिक्षण घेण्याच्या वयाचा आहे. त्याच्या नैसर्गिक सुरेल खड्या आवाजाला आतांच लगाम घालणें अवश्य आहे. मुलगाही ताला-सुराची कदर करणारा आहे, जात्या अत्यंत सुरेल आहे. सुवर्णावर संस्कार झाले, तर त्यांतून अ-सामान्य कला-कृति निर्माण होण्याची सर्व प्रकारें सिद्धता आहे. स्वयंस्फूर्त उल्हासानें बंदेअलीखांसाहेबांनीं शिकवण्यास उत्सुक व्हावें, अशी निसर्गाची असाधारण देणगी बाल-भास्करला लाभली होती. अतिशय कलाकुसरीनें सौंदर्ययुक्त गाणें गाण्यास भास्करला देवानें घडवलें होतें. त्याच्या गळ्यावर व बुद्धीवर आतां कलेचे शास्त्रीय संस्कार फक्त घडवणें अवश्य होतें.

'भोरकइ मिलन बहिलवा, मोरी माई पीतम संगवा' ही 'जौनपुरीं' तील चीज बंदेअलीखांनीं भास्करला शिकवली. ह्या रागावरून भास्करची शिकवणी रोज सकाळीं चालू असे, असें सूचित होतें. ह्या सकाळच्या शिकवणीमुळें भास्करनें बंदेअलीखांसाहेबांकडे सकाळचे इतर रागही ऐकले असावेत हें उघड आहे. भास्करबुवा पुढें सकाळचे अनेक राग ज्या असामान्य वैभवानें नटवीत, त्यांत 'तोडी,' 'देसी,' 'देसकार,' वगैरे राग असत.

खानदानी मुसलमानाची गायकी, तीही एका महान् तंत-विद्या-विशारद उस्तादाची. भास्करला नुकतेंच सतरावें वर्ष लागलें होतें. सुरेलपणा किंवा लयकारींतील डौल, ह्यांतील सूक्ष्म सौंदर्य-स्थळें उस्तादांनीं दर्शवलीं, तर त्यांचें आकलन होण्याइतका भास्कर गायनाच्या शिक्षणांत रुळला होता. बाळकोबा नाटेकरांसारखा शास्त्रीय दृष्टि असलेला गुरुजी 'किर्लोस्कर मंडळीं' त होताच. पण ह्या शिक्षणापेक्षां अधिक रसाळ स्वर लावण्याचें वळण बंदेअलीखांनीं दाखवलें, तर त्या शिक्षणाचा संस्कार व्हावा इतका गायनाचा अनुभव गेल्या चार-पांच वर्षांच्या गायनाभ्यासानें भास्करला खासच होता.

भास्करच्या गळ्यांतील नैसर्गिक सुरेलपणावर व लयबद्ध वळणावर लुब्ध होऊन स्वतः आस्थेवाईकपणें जीव तोडून शिकवणारे बंदेअल्लीखांसारखे गुरु लाभल्यामुळें, अभिजात गायकींतील अधिक रंजक, सुंदर गायन-क्षेत्राची भास्करला साहजिकच जाणीव झाली. पांच-सहा महिन्यांनीं 'किर्लोस्कर मंडळी'चा मुक्काम इंदूरहून हलला, तेव्हां खांसाहेबांनीं मोठ्या दुःखानें भास्करला निरोप दिला. भास्करला जातां-जातां बंदेअल्लीखांनीं बजावलें, "इस गंडे की लाज रखो." खांसाहेबांचा कंठ भरून आला.

भास्करनें ह्या थोर देणगीला मनांत पूज्य पवित्र स्थान दिलें. जेथें मिळेल तेथून शास्त्रीय शिक्षण घ्यायचें, खूप रियाज करायचा आणि गुरुजींचें हृद्गत जाणून त्यांना निराशा वा दुःख वाटेल असें कांहीं करायचें नाहीं, असें भास्करनें मनाशीं निश्चित केलें. भास्करनें हा निश्चय आमरण पाळला.

इंदूरचा हा सहा-सात महिन्यांचा मुक्काम भास्करच्या जीवनांत क्रांति घडवणारा ठरला. नानासाहेब पानसे ह्यांजकडे जावें, नृत्य-मृदंगाचा अभ्यास ऐकावा; बंदेअल्लींकडे चुन्नाचें गाणें, तालीम ऐकावी; खांसाहेबांचें बीन-वादन ऐकावें; स्वतः तालीम घ्यावी; अशा एका वेगळ्याच परमोच्च संगीताच्या अभिजात वातावरणांत भास्करचें मन तरंगत होतें. त्याच्या बाल-वयामुळें कोठेंही औपचारिक परकेपणा त्याला बाधला नाहीं.

एकदा बंदेअल्लीखांसाहेब बीन वाजवीत असतां, भास्कर तंबोरा छेडीत होता. लयीप्रमाणें बोटांचे आघात तंबोऱ्यावर करीत तो वादन ऐकण्यांत रमला होता. एक-दोन वेळां बंदेअल्लीखांनीं मागें वळून पाहिलें. भास्कर अधिकच स्पष्टपणें तंबोरा छेडूं लागला. नंतर खांसाहेब रागावले. भास्करला एक जोराची चपराक त्यांनीं मारली आणि ते म्हणाले, "अरे, तुझा तंबोरा ऐकायला माणसं जमलीं आहेत, का माझं बीन-वादन? तंबोरा नरम न वाजला तर माझं बारीक काम श्रोत्यांना कसं ऐकूं जाईल?" भास्करला त्या चपराकीमुळें खूप मोठा लाभ झाला. त्याला साथीचें तंत्र समजलें. खांसाहेब आपल्याला स्वतःच्या मुलाप्रमाणें वागवतात हें जाणवलें.

पुढें बाल-भास्करचा अजोड 'भास्करबुवा' झाल्यावर ते ही घटना मैफलींत मित्रांना हसत सांगत. भास्करला आपलेपणानें, प्रेमानें, हक्कानें

चपराक मारणारें आतां कोणीच उरलें नव्हतें. भास्करबुवा अशा आठवणी सांगतांना अंतर्मुख होत असत. गहिंवरून त्यांच्या डोळ्यांत पाणी चमके.

'किर्लोस्कर मंडळी'ला आतां हळू-हळू नवीन नाटकें व नवीन आकर्षणांची आवश्यकता भासूं लागली होती. १८८० सालीं नाटक-मंडळी सुरू झाल्यापासून 'शाकुंतल,' 'सौभद्र,' व 'राम-राज्य-वियोग' हीं तीन नाटकें अण्णासाहेबांनीं लिहिलीं होतीं. तेवढ्याच सामुग्रीवर मंडळी फार काळ काढूं शकेल, असें वाटेना. निरनिराळ्या गांवीं जाऊन मुक्काम करावे व जुन्या नाटकांवरच निर्वाह करावा, असें कांहीं काळ चाललें. पूर्वीं शंकरराव मुजुमदार शकुंतलेची भूमिका गद्य रूपांत करीत. पुढें देवलांकडून पदें करून घेऊन, शकुंतलेची भूमिका गायक नट भास्करला देण्यांत आली. हें त्या जुन्या नाटकाला नवीनच आकर्षण लाभलें.

'सौभद्र' नाटकांत भास्करला अजून कोणतीच भूमिका दिली नव्हती. रुक्मिणीच्या महालांत एक-दोन मुलींचा नाच सुरू करण्यांत आला. मुद्दाम एक उत्तम नर्तक बोलावून, बाळा मानकामे व भास्कर बखले ह्यांना गाऊन नाच करायला शिकवण्यांत आलें. "हा नाच व नाचाचें गाणें अप्रतिम होत असे," असा जनरल रेशीमवाले ह्यांचा अभिप्राय नमूद झाला आहे. नाच-गायनाचे तज्ज्ञ असा जनरल रेशीमवाले ह्यांचा फार मोठा लौकिक होता. नाना पानशांच्या चाहात्यांत जनरल रेशीमवाले ह्यांस मोठा मान इंदुरांत मिळे.

भास्करच्या संगीत शिक्षणाला नृत्याच्या शिक्षणाची जोड मिळाली व भास्करच्या कलेला एक चिरपरिणामकारक पैलू पडला. नृत्याला व नृत्यानुरूप गायनाला एका वेगळ्या डौलाची व लयकारीची गरज असते. अलंकारिक हस्ताभिनयाचा डौल आलापांतही यावा लागतो. पद-न्यासाच्या तोड्यानुसार कालाचा व समेचा मेळ बसावा लागतो आणि तोही सर्व अलंकारिक डौलानें. भास्करसारख्या गायनाभ्यासी मुलाच्या मनावर ह्या सर्व ऐटबाज स्वर-लयीचा खोल ठसा उमटला असेल, ह्यांत मुळींच शंका नाहीं.

पूर्वीं लग्नकार्यांत कलावंतिणींचे नाच होत. त्या नाचाचा एक नवा अर्थ आतां भास्करच्या नृत्य-शिक्षित मनाला समजूं लागला. राज-दरबारीं तर अनेक नामांकित कलावंतिणींचें नृत्य व ठुमरीचें गायन ऐकायला मिळे.

गुजरातमध्यें सणावारीं गरवे गाऊन नाचायची प्रथा असे. त्या नाच-गाण्यांतील गतिमयतेचें नवीनच आकर्षण गायक भास्करला वाटूं लागलें.

भास्करबुवांना मैफलींत अनेकदा ह्या गरब्यांची आठवण होई. शंकरभय्या व बुवा त्या नृत्याच्या लयकारीबद्दल चर्चा करीत. बुवा तालाचें एक वेगळेंच वजन शंकरभय्यांना दाखवीत. आणि तेही तशा वजनाचे चार दोन मुखडे वाजवीत. बुवा अनेक गरवे गुणगुणत. पण ' भारत गायन समाजां ' त इतर गायक लोक जमले, कीं ह्या जुन्या आठवणींना खंड पडे. बुवा हातावर टाळीनें लय दाखवून, अभिनयानुसार दोन बोटें हवेंत फिरवीत. बोटें फिरक्या घेत समेवर येत. शंकरभय्या व भास्करबुवा ह्या चर्चेंत आनंदांत रमून जात. भास्करबुवांच्या आयुष्याच्या अखेरीस मीं स्वतः पाहिलेल्या ह्या उत्तर-कालीन घटनांचें मूळ, बुवांच्या मनांत त्यांच्या ऐन तारुण्याच्या सुरुवातीस रुजलें होतें. रंगभूमीवर एक-दोनच नाच प्रेक्षकांस दिसले, तरी नृत्य-शिक्षक व नृत्य शिकणारीं मुलें ह्यांना अनेक नृत्यानुकूल चिजा व अभिनय ह्यांचा अभ्यास घडे.

' किर्लोस्कर मंडळीं ' त नाच, गाणें, वाद्य-वादन ह्या विद्याभ्यासांत दंग असतांना १८८६ च्या अखेरीस भास्करला अठरावें वर्ष लागलें. त्या सुमारास त्याचा आवाज फुटला. त्याच्या गाण्यांतला हमखास जनतेचें मन आकर्षित करण्याचा गुण अनिश्चित होऊं लागला. पूर्वी ' सौभद्रां 'त रुक्मिणीचें काम करणारा मुलगा मार्तंड महाजनी स्त्री-भूमिकेला न शोभेल इतका उंच दिसूं लागला. त्याची मिशीही बरीच वाढली. त्याचें तें काम काढून घेऊन, ती गद्य भूमिका भास्करला देण्यांत आली. दोन वर्षांनीं गोविंदा सोरटी हा नवा नट मिळून, ती भूमिका त्याला देण्यांत आली.

आवाज फुटला, तरी तो मेहनतीनें सुधारला पाहिजे, म्हणून भास्कर अधिकच मेहनत घेऊं लागला. मध्यंतरीं भास्करचे महाबळ-गुरुजी नाटक पाहायला आले. त्यांनीं भास्करला भेटून " हा बेगडी धंदा सोडून दे. " असा खूप आग्रह केला. " तूं गवई हो. तुझ्यासारख्या निसर्ग-दत्त गुणाच्या मुलानें हें रुक्मिणीचं नटणं-मुरडणं करण्यांत काय अर्थ ? " वगैरे अनेक परींनीं महाबळ-गुरुजींनीं उपदेश केला.

भास्करच्या मनाचा अजून निश्चय झाला नव्हता. वडील वारलेले. थोरल्या बंधूंनीं नुकतेंच लग्न केलेलें. त्यांच्यावरच आईच्या पोषणाचा भार. अशा स्थितींत स्वतःची नोकरी व मीठ-भाकरी सोडून गाणें शिकायला कोणाजवळ व कोठें जावें, ह्याचा निर्णय करणें, ही गोष्ट सोपी नव्हती. परत इंदूरला बंदेअल्लीखांसाहेबांकडे जावें, तर तेथें खायला कोण घालणार ? कोठें राहाणार ? गाणें शिकायचें खरें, पण पोटाचीही सोय आधीं पाहाणें अवश्य होतें.

१८८६ सालीं 'किर्लोस्कर मंडळी'चा मुक्काम मिरजेस होता. मिरज हें बाळकृष्णबुवा इचलकरंजीकरांच्या तेथील वास्तव्यामुळें गायन-शिक्षणाचें एक केंद्र बनलें होतें. बाळकोबा नाटेकरांबरोबर भास्कर बाळकृष्णबुवांकडे जाई. नाटेकरांबरोबर जाऊन-येऊन तेथील गायक-वादक मंडळींचा व भास्करचा परिचय झाला होता.

भास्करनें स्वतःच्या गाण्याच्या मेहनतीसाठीं एक खोली स्वतंत्रपणें घेतली. त्या काळांत रुपया, आठ आणे महिना भाडें देऊन स्वतंत्र खोली मिळत असे. सुरासाठीं तंबोरा व लयीला एक डग्गा मिळवून भास्कर त्या खोलींत स्वर-साधना करी. फुटलेल्या आवाजावर संस्कार करणें, ही थोड्या दिवसांत साधणारी गोष्ट नव्हती. कधीं-कधीं आवाज मुळींच चालेनासा होई. पण भास्करचा प्रयत्न अविरत चालू होता. नाटकाच्या तालमी, नवें नाटक नसल्यामुळें, बेता-बाताच्याच असत. भास्कर नाटकाच्या वेळाशिवाय उरलेला वेळ गायकीच्या शिकवण्या ऐकत व स्वतःच्या खोलीवर रियाज करण्यांत, घालवत असे.

गायक नसलेलीं नाटक-कंपनींतील मुलें, म्हणजे वर-काम करणारे अनाथ पोटार्थी मजूर, अशी मंडळीचे मॅनेजर साठे ह्यांची कल्पना असे. वर-काम करण्यास गैर-हजर असणें, जेवायची वेळ चुकणें, वगैरे अनेक बारीक-सारीक निमित्तांनीं मॅनेजर साठे भास्करला रागावत.

भाऊराव कोल्हटकर प्रथम भास्करच्या शास्त्रीय गायन शिकण्याची थट्टा करीत. ते म्हणत, "गाणं ही ईश्वरी देणगी आहे. मेहनतीनें येणारी ही कला नाहीं." भास्कर उत्तर देई, "ईश्वरानें दिलेल्या देणगीचा आदर-पूर्वक स्वीकार करून आपण अगत्य-पूर्वक त्या गळ्यावर शास्त्रीय संस्कार केले

पाहिजेत. अनेक अलंकार त्या गळ्यांत ठाम बसवले पाहिजेत." एकदा ह्याच बोलण्यावरून दोघांची चुरस लागली. भाऊरावांनीं एक तान घेतली, भास्करनें तिची हुबेहूब नक्कल केली. हें पाहून भाऊरावांनीं आग्रह केला, "भास्कर, तूं आतां तुझी सुशिक्षित तान घे. मी सहज नक्कल करून दाखवीन." नाहीं-होय करतां-करतां भास्करनें तीन-चार वक्र-वळणांची एक इतकी अवघड तान घेतली, कीं पुनः पुनः ऐकून व पुनः पुनः प्रयत्न करूनही भाऊरावांच्या घशांतून ती तान निघेना. भास्कर संपादन करीत असलेल्या विद्येबद्दल भाऊरावांची खात्री झाली. ह्या आठवणीवरून एवढेंच दिसतें, कीं भास्कर नाटक-मंडळींत नट म्हणून काम करीत असला, तरी त्याची गायन-शास्त्राच्या अभ्यासांत अविरत प्रगति प्रयत्न-पूर्वक चालू होती.

फुटलेल्या आवाजामुळें भास्करचें 'किर्लोस्कर मंडळीं'तील स्थान ढासळूं लागलें होतें. आवाज केव्हां सुधारेल त्याचा नेम नाहीं. सुरावर ताबा राहीना. गळा हमखास स्वर-स्थानें घेईना.

गणेशोत्सवाची आरास करण्यास भास्कर हजर न राहातां गाण्याची मेहनत करायला गेल्याचें ऐकून, एकदा मॅनेजर साठे रागावले व भास्करला टाकून बोलले. गाणें सुटलें तर नाटक-मंडळींत उष्टीं-खरकटीं करण्यापेक्षां आपल्या नोकरीचा दर्जा महत्त्वाचा नाहीं, हें इतर नट-नोकरांना जी वागणूक मिळे, त्यावरून भास्कर समजून चुकला होता.

एका प्रयोगाला आवाज मुळींच चालेना. स्वर बरोबर लागले नाहींत. भाऊराव कोल्हटकर आधींच 'किर्लोस्कर मंडळी'च्या भवितव्याबद्दल चिंताक्रान्त होते. ते संतापले व भास्कर रंगभूमीवरून आंत येतांच त्याला म्हणाले, "भास्कर, तुझा आवाज बिघडला आहे. आज तुझं गाणं अगदींच बेसूर झालं. अशानें तुझा 'किर्लोस्कर मंडळी'स काय उपयोग? तूं कसचा गवई होणार!" भाऊरावांचें मन भास्करबद्दल फारसें अनुकूल नव्हतें. थोडा मत्सराचाही भाग असावा असें वाटतें.

भाऊराव कोल्हटकर संतापाच्या भरांत बोलले. पण त्यांचे शब्द मानी भास्करच्या मनाला विलक्षण झोंबले. आपल्याला 'किर्लोस्कर मंडळीं'त ह्यापुढें कांहीं महत्त्वाचें स्थान नाहीं, हें तरुण भास्करला स्वच्छ दिसलें.

भास्करनें मनाशीं निश्चय केला, कीं येथें आतां ह्यापुढें अपमानास्पद स्थितींत राहाण्यांत कांहीं अर्थ नाहीं. वेळींच नाटक-मंडळी सोडून आपण आपल्या भवितव्याचा निश्चित मार्ग आखला पाहिजे.

नाटक-मंडळी सोडायचा निश्चय करून भास्करनें न्हावी बोलावला आणि स्त्री-भूमिकांसाठीं वाढवलेले केस कापून, घेरा-शेंडी ठेवून, हजामत करवून घेतली. लगेच भास्करनें नाटक-मंडळी सोडण्याचा आपला निग्रह भाऊरावांस सांगितला. सर्वांचा निरोप घेऊन, भास्कर तडक बडोद्यास निघाला.

बडोद्यांत त्याच्या बहिणीचें बिऱ्हाड होतें. दक्षिणदास ह्यांचें पुराणिक म्हणून बडोद्यांत स्थिर स्थान होतें. बंधु विसनगरला होते. तेथेंच आई होती. "बडोद्यांतच गाणें शिकण्यासाठीं मी नोकरी सोडून आलों," असें भास्करनें बंधूंस व आईस कळवलें. येथें भास्करच्या आयुष्यांतलें आणखी एक पर्व संपलें.

प्रकरण चौथें

# अभिजात गायकीच्या जंगलांत : गुरुकुल

'किर्लोस्कर कंपनी' सोडून १८८६ च्या उत्तरार्धांत भास्कर गाणें शिकण्यासाठीं बडोद्यास परत आला, तेव्हांचें बडोद्याचें एकंदर वातावरण विद्या व कलांच्या अभ्यासाला अनुकूल होतें. १८७५ पासून सतत साठ-सत्तर वर्षें श्रीमंत सयाजीराव-महाराज गायकवाड ह्यांची कारकीर्द बडोद्यांत गाजली. म्हैसूर व बडोदें ह्या दोन संस्थानांनीं इंग्रजी राजवटीला लाजवलें. शिक्षण, उद्योग, वगैरे अनेक विषयांत ह्या दोन संस्थानांची प्रगति इंग्रजी राज्यांतील पुण्या-मुंबईच्या प्रगतीपेक्षांही तुलनेनें अधिक प्रभावी असे.

बडोद्याचें कलाभवन, मध्यवर्ती ग्रंथालय, म्युझियम, वगैरे अनेक संस्था मुंबईशीं बरोबरीनें टक्कर देत. जुन्या विद्यांचा अभ्यास, ग्रंथालय, प्रकाशन, हस्त-लिखित-संग्रह, वगैरे विषयांत बडोद्याचें नांव भारतांत अजूनही गाजतें. ह्याचें कारण श्रीमंत सयाजीरावमहाराज गायकवाड ह्यांनीं बडोद्यांत निर्माण केलेलें पांडित्य-पूजक वातावरण.

श्रीमंत सयाजीराव वारंवार युरोपांत राहात. तिकडील सुसंघटित कार्याचा आदर्श ते बडोद्यांतील कारभारी मंडळींपुढें ठेवीत. निरनिराळ्या भागांतली चतुर, विद्वान् व अ-साधारण मंडळी धुंडून काढून, त्यांना बडोद्यांतील मोठे हुद्दे देऊन, एकंदर राज्य-कारभाराचा दर्जा उंचावेल, असा अखंड प्रयत्न श्रीमंत सयाजीरावांचा असे.

बडोद्यांतील गायन-क्षेत्रांत ज्या कांहीं मंडळींनीं १८७५ ते १९२५ पर्यंतचीं पन्नास वर्षें गाजवलीं, त्या अनेक कुशल मंडळींचीं नांवें अजूनही भारतीय संगीतक्षेत्रांत अविस्मरणीय ठरलीं आहेत.

नामांकित वीणा-वादक व गायक मौलाबक्ष, त्यांचे गुरु घसीटखां, घसीटखां ह्यांचे बंधु फैजमहंमदखां व त्यांचे जांवई फैयाझखां, हीं नांवें अखिल भारतांत अजूनही आदरानें उच्चारलीं जातात. सनईवाले गणपतराव पिराजी वसईकर, पखवाजी नासरखां व गुलाबसिंह, गायक फिदाहुसेन व त्यांचे पुत्र निसार हुसेन, खांसाहेब रझाक हुसेन, कथ्थक नृत्यकार राहतअली व अजमलअली, गरबा गाणाऱ्या इच्छाबाई, तंजौरच्या नर्तकी लक्ष्मीबाई व ईदनजान, बीनकार जमालुद्दिन व त्यांचे पुत्र आबिद हुसेन, पंडित मीनप्पा, व्यंकप्पा, धाणेकर बंधु, जलतरंगपटु अमीरखां, वीनकार अलीहुसेन, सतारिये इनायत हुसेन, गंगाराम पखवाजी मथुराबाले, गुलाबसागर, उस्मानखां, सुलतानखां, वगैरे राजाश्रय मिळालेल्या कलावंत मंडळींनीं बडोदें गजबजलें होतें. कांहीं वर्षें अब्दुल करीमखां, लक्ष्मीबाई, बालगंधर्व, इत्यादि कलाकारांस बडोद्याचा उदार आश्रय मिळाला.

भास्कर बखले बडोद्यांत शिकायला राहिला, त्या वेळीं प्रत्येक बड्या उस्तादाकडे कित्येक शिष्य होते. अनेकांनीं नांव-लौकिक संपादन केला. अंगीं असाधारण कौशल्य असल्याशिवाय बडोद्यांत नांव कमावणें, ही गोष्ट सहज साधणारी नव्हती.

भास्कर बखलेनें जी गुरुपरंपरा निवडली, त्या परंपरेबद्दल जास्तींत जास्त सुसंगत वृत्त ह्या सर्व-सामान्य वृत्तांतून संकलित करण्याचा येथें प्रयत्न करण्यांत येत आहे.

खंडेरावमहाराजांच्या काळीं दाक्षिणात्य-विद्या-विभूषित व म्हैसूरचे वीणावादक म्हणून बडोदें सोडून गेलेले मौलाबक्ष १८७५ सालीं श्रीमंत सयाजीराव गायकवाड राज्यावर आल्यानंतर त्यांच्या आमंत्रणामुळें बडोद्यास राजगवई म्हणून परत येऊन राहिले. सयाजीरावांबरोबर युरोपांत जाऊन इंग्रजी नोटेशन-पद्धतीनें भारतीय संगीत लिहून, नंतर भारतीय सा-री-ग-म लिहिण्याचा एक प्रकार मौलाबक्षांनीं रूढ केला. क्रमिक अभ्यासाचीं संगीत-विषयक पुस्तकें लिहून संगीताच्या शिक्षणाला त्यांनीं आधुनिक वळण लावलें.

हे मौलाबक्ष १८७० सालीं 'गायनाब्धि सेतु' नामक संगीत-विषयक मासिक बडोद्यांत चालवीत. पण तें पत्र फार दिवस चाललें नाहीं. १८९६ मध्यें पैगंबरवासी होईपर्यंत मौलाबक्षांनीं वीस वर्षें बडोद्यांत स्वतःचें नांव गाजवलें.

मौलाबक्षांना उत्तरेचें व दक्षिणेचें अशा दोन्ही पद्धतींचें संगीत उत्तम प्रकारें येत असे. मुख्य वीणा-वादन व दुय्यम गाणें, असा त्यांचा व्यवहार असे. दक्षिणच्या 'त्यागराज,' 'दिक्षितार,' वगैरे नामवंतांच्या रचना मौलाबक्षांनीं ऐकल्या होत्या.

ह्या स्थूल वृत्तान्तावरून ह्या चरित्राला उपकारक असें कालशः वृत्त काय निष्पन्न होतें, तें पाहाणें अवश्य आहे.

१८७५ सालीं श्रीमंत सयाजीरावमहाराज राज्यावर आले व त्यांनीं मौलाबक्षांना बडोद्यांत नेमणूक करून दिली. मौलाबक्षांनीं १८८६ पूर्वींच 'सा-री-ग-म' च्या लय-बद्ध टिपणांच्या आधारें संगीत शिकवण्यास सुरुवात केली. अनेक क्रमिक पुस्तकें ह्यानंतर चार-सहा वर्षांत त्यांनीं प्रसिद्ध केलीं.

१८८२ पूर्वींच त्यांनीं घसीटखां ह्यांजकडे वीणा-वादनाचें व गायनाचें शिक्षण घेऊन भारताचा दौरा केला होता. बंगाल, महाराष्ट्र, वगैरे भागांत हिंडून त्यांनीं बराच लौकिक कमावला.

भास्करराव बखले ह्यांचे गुरुजी फैजमहंमद ह्यांचे वडील बंधु घसीटखां व स्वतः फैजमहंमद ही मंडळी सयाजीरावांच्या राज्यारोहणाच्या काळींच बडोद्यांत येऊन स्थाइक झाली होती, असा ह्या वृत्तावरून पुरावा दिसतो. इतिहासकार श्री. नानासाहेब सरदेसाई १८८८–८९ ह्या काळाला उद्देशून

लिहितात, कीं मौलाबक्ष व फैजमहंमद ह्या उस्तादांची स्पर्धा ह्यापूर्वी निदान पंधरा वर्षांपासून बडोदेंकरांच्या परिचयाची होती. मौलाबक्ष ह्यांनीं फैजमहंमद ह्यांचे वडील बंधु घसीटखां ह्यांजवळ गायन-वादनाचें शिक्षण घेतलें. ह्या सर्व विधानांचा कालानुक्रम पुढें दिल्याप्रमाणें लावतां येतो.

सन १८९६ मध्यें ६३ व्या वर्षी मौलाबक्ष पैगंबरवासी झाले. त्यांचा जन्म १८३३ सालचा. १८७५ सालीं श्रीमंत सयाजीरावांनीं त्यांस बडोद्यास परत बोलावून राजाश्रय दिला, तेव्हां मौलाबक्ष बेचाळीस वर्षांचे, बराच नांव-लौकिक संपादन केलेले वादनकार होते. मुसलमानी घराण्यांतील उत्तरेची विद्या व हैद्राबाद, म्हैसूर भागांतली दाक्षिणात्य विद्या मौलाबक्षांनीं संपादन केली होती. श्रीमंत सयाजीरावांच्या पदरीं असलेल्या फ्रेडलिस ह्या युरोपीय संगीतज्ञाजवळ त्यांनीं युरोपीय संगीत-लेखनाचा परिचय करून घेतला. १८७७ सालीं व्हिक्टोरिया राणीनें भारताचें राज्य-पद स्वीकारलें, त्या समारंभांत मौलाबक्ष व फ्रेडलिस ह्यांनीं भारतीय संगीत युरोपीय बँडवर वाजवून इंग्रजांना चकित केलें. मौलाबक्षांच्या वादनाचा लौकिक लॉर्ड नॉर्थब्रुक, वगैरे गव्हर्नर मंडळींच्या कानीं गेला व श्रीमंत सयाजीराव त्यांना युरोपमधील संगीत शिक्षण, वाद्यवृंदांची संघटना, वगैरे परिस्थिति दाखविण्यास युरोपांत घेऊन गेले.

मौलाबक्ष व त्यांचे गुरु घसीटखां हे समकालीन मानले, तरी धाकटे बंधु फैजमहंमद हे मौलाबक्षांच्या वयाचे अथवा एक-दोन वर्षांनीं लहान असतील. १८३५ च्या सुमारास त्यांचा जन्म झाला असला, तर १९२० सालीं मृत्युसमयीं त्यांचें वय सुमारें ८५ वर्षांचें असावें. १८९४ सालीं भास्करबुवा आपलें शिक्षण संपवून मुंबईस गेले, तेव्हां फैजमहंमदसाहेब ह्यांची साठी उलटली असावी. आतां ते मैफलींत गात नसत. "शिकवणीच्या वेळींही चपळपणें हालचाल करण्याचें त्यांचें वय नव्हतें." ह्या श्री. निगोस्करांच्या वर्णनावरूनही साठीचें, वार्धक्याचें वय जवळ आल्याचें सूचित होतें. १९१२ सालीं त्यांनीं फैय्याजखांसाहेबांना बडोद्याचे दरबार-गवई म्हणून निवडलें, तेव्हां त्यांचें स्वतःचें वय सत्तरीच्या पुढें असावें, हें उघड दिसतें.

भास्करबुवा ह्यांचें शिक्षण उस्ताद फैजमहंमद ह्यांजकडे झालें, तेव्हां उस्तादांचें वय पन्नास ते साठ ह्या वयाच्या दरम्यान होतें व स्वतःचा मुलगा

नाहीं, म्हणून त्या उत्तर-वयांत फैजमहंमद ह्यांनीं दाऊद हा तरुण मुलगा दत्तकाप्रमाणें पाळला होता. अशा प्रकारें घसीटखांच्या काळांतच स्वतःच्या घराण्याची विद्या इतर घराण्यांतल्या व्यक्तीस न देण्याची हद्दूखां व हस्सूखां ह्यांनीं अनुभवलेली प्रथा, फैजमहंमदखांनीं चालू ठेवली असावी.

फैजमहंमदसाहेब ह्यांच्या घराण्यांत त्यांचे आजोबाही थोर नामांकित गायक होते. ह्या आजोबांचेंही नांव फैजमहंमद असून त्यांना फतेहमहम्मद, इलायदबक्ष व महम्मदबक्ष असे तीन मुलगे होते. वडील चिरंजीव फतेहमहम्मद ह्यांचे दोन मुलगे म्हणजे बडोद्यांतील प्रसिद्ध घसीटखां व फैजमहम्मदखां. हें घराणें आग्र्याहून बडोद्यास आलें असावें, असा अंदाज करावा लागतो.

लखनौचे पिढीजाद गवई नथ्थनपीरबक्ष आग्र्यास असतां त्यांचे वडील चिरंजीव कादरबक्ष ह्यांच्याजवळ फैजमहम्मद ह्यांचें शिक्षण अनेक वर्षे झालें. नंतर कादरबक्षांना अपघाती मृत्यु येऊन, त्यांचीं मुलें हद्दू व हस्सू ह्यांना बाल वयांतच आजोबा ग्वाल्हेरला घेऊन गेले. त्याच सुमारास घग्गे खुदाबक्ष हे थोर विद्वान् गवई आग्र्यास येऊन राहिले. त्यांच्याकडे फैजमहंमद ह्यांचें उत्तर-कालीन शिक्षण झालें, अशी हकीकत नमूद झाली. आहे. हद्दूखां-हस्सूखां हे फैजमहंमदपेक्षां कदाचित् वयानें अल्प-वयस्क व हस्सूखांचे चिरंजीव रहिमतखां हे भास्करबुवांपेक्षां थोडे वडील पण समकालीन असावेत, असें ऐतिहासिक वृत्त आतां उपलब्ध आहे.

पैगंबरवासी विलायतहुसेनखांनीं प्रयत्नपूर्वक जमवलेलें मुसलमान गायक घराण्यांचें ऐतिहासिक वृत्त ‘ संगीतज्ञांचें संस्मरण ’ ह्या नांवानें प्रसिद्ध झालें आहे. श्री. दत्तोपंत जोशी ह्यांनीं कांहीं गायक-वादकांचें त्रोटक वृत्त प्रसिद्ध केलें आहे व हाथरसच्या प्रकाशन-संस्थेनें भारतीय गायक-वादकांचें थोडक्यांत ऐतिहासिक वृत्त प्रसिद्ध केलें आहे. अशा अनेक संदर्भ-ग्रंथांत कै. भास्कर-बुवांचे मुख्य गुरुजी फैजमहंमद ह्यांचा उल्लेख क्वचित् असला, तरी कलावंत म्हणून गौरवानें त्यांचें संक्षिप्त चरित्रही कोणीं लिहून प्रसिद्ध केलें नाहीं.

गांवो-गांवच्या गायक-वादकांचे इतिहास संशोधन-पूर्वक जमा केले, तर लोकप्रिय नामांकित कलाकारांपेक्षां अधिक महत्त्वाच्या कितीतरी गायक-वादकांचा इतिहास संकलित होईल. ह्या इतिहासाची दुसरी बाजू लेखनांत

कधींच नमूद होत नाहीं. ती म्हणजे त्या-त्या गांवच्या शैलीचें स्वरूप व विकास-क्रम. ही बाजू प्रत्यक्ष गायनाच्या मुद्रिका ऐकल्याशिवाय निश्चितपणें समजणें सर्वस्वीं अशक्य दिसतें.

मीं स्वतः निसारहुसेन, त्यांचे शिष्य वझेबुवा, बाळकृष्णबुवा इचलकरंजी-कर, कृष्णराव पंडित, वगैरे ग्वाल्हेरच्या वळणाच्या अनेक विद्वान् गायकांचें बरेंच गाणें ऐकलें, पण त्यांत घराण्याचें वळण, दर्जा, वगैरे कोठल्याच बाबतींत मला 'ग्वाल्हेर'चें असें स्पष्ट वळण समजलें नाहीं. अर्थात् हें वळण स्पष्ट समजण्याची मला पात्रता नसेल. पण बाळकृष्णबुवा इचलकरंजी-कर व रामकृष्णबुवा वझे ह्यांना एकाच वळणाचे गवई असेंही म्हणण्याची माझी हिंमत नाहीं. रहिमतखां ह्यांचें वळण आणिकच वेगळें वाटे.

ही चर्चा मी मरहूम फैजमहंमद व त्यांचे शिष्य भास्करबुवा ह्यांच्या गायकीच्या घराण्याचीं वैशिष्ट्यें निश्चित सांगतां यावींत, ह्यासाठीं उपस्थित करीत आहें.

प्रत्येक गुरु-घराण्यांत एकेका खानदानी चिजेचें स्वरूप निश्चित टिकतें, असेंही दिसत नाहीं. भास्करबुवा व त्यांचे गुरुबंधु ह्यांना एकच चीज फैजमहंमदखांनीं वेग-वेगळ्या वळणानें शिकवल्याचें वृत्त ह्या ग्रंथांत इतरत्र नमूद केलें आहे.

मीं रहिमतखांसाहेबांचें अगदीं अखेरच्या काळांतलें गाणें दोन-तीनदां ऐकलें. पण त्यांच्या गाण्याचें वळण व पंडित रामकृष्णबुवा वझे ह्यांचें वळण एकच होतें, असें माझें मन मला सांगत नाहीं. रहिमतखां ह्यांची ती विजेसारखी वेगानें येणारी तान, लयीच्या वजनानें सहज, सरळ डौलांत उच्चारलेला एकेक शब्द व पंडित रामकृष्णबुवा वझे ह्यांच्या गायनां-तील वक्र खटके व गमकाची धडक, ह्यांत मला घराण्याचें कोणतेंच साम्य जाणवलें नाहीं. प्रत्येकाच्या गायकींत वैयक्तिक गुणधर्म ऐशीं टक्के व शिकवणीच्या वळणाचा प्रभाव दहा टक्के, असें गणित मला पटतें.

ज्या मंडळींचें गाणें मीं ऐकलें नाहीं, अशा विद्वान् गायकांच्या गुरु-घराण्याचे संबंध चरित्राच्या सांगतेसाठीं लिहीत असतां, माझ्या मनांत

जे विचार येत आहेत, ते प्रांजलपणें वाचकांस सांगणें, हें मी आपलें कर्तव्य मानतों.

भास्करबुवांचे गुरु फैजमहंमद व त्यांचे बंधु घसीटखां हे बडोद्यास आले, तेव्हांच अनुक्रमें ४०–४२ वर्षें वयाचे असावेत, असें वाटतें. जुन्या जमान्यांतल्या रीतीप्रमाणें, निदान एखादें तप, गुरुमुखांतून विद्या मिळाल्या-शिवाय गवयाला धंदेवाईक इभ्रत मिळत नसे. फैजमहंमद ह्यांस स्वतःच्या घरचें शिक्षण प्रथम दहा वर्षें, नंतर नथ्थनपीरबक्ष ह्यांच्या घरीं कादरबक्षांकडे सहा-सात वर्षें व शेवटीं घग्गेखुदाबक्ष ह्यांच्याकडे निदान पांच-सात वर्षें तरी शिक्षण मिळालें असावें. निदान वीस-बावीस वर्षांच्या रियाजानंतर घसीटखां व फैजमहंमद ह्यांनीं बडोद्यास राजाश्रय मिळवला असावा, असा अंदाज दिसतो.

फैजमहंमद ह्यांना एखादी लहानपणीं शिकलेली चीज आठवेनाशी झाली, तर ती ते घसीटखांना विचारीत व ती ते सांगत, असें वृत्त नमूद झालें आहे. घसीटखां हे नामांकित वीणा-वादक व सतार-वादक होते. ह्यांत ह्या घरच्या सूक्ष्म सुरेलपणाची व लयबाजपणाची सूचना मिळते. बंदेअल्ली ह्यांजसारख्या बीनकाराकडे शिकलेला भास्कर घसीटखां व त्यांचे बंधु फैजमहंमद ह्यांच्याबद्दलचा लौकिक आधींच ऐकून घेऊन बडोद्याला आला असेल. "हें गाणें, कीं तंत-वाद्य-वादन?" असे उद्गार फैजमहंमद ह्यांच्या शिकवणीबद्दल त्यांच्या शिष्यांनींच लिहून ठेवले आहेत.

आतां उस्ताद फैजमहंमद ह्यांजबद्दल 'संगीत' ह्या हिंदी मासिकांत जी थोडी माहिती मिळते, ती नमूद करून आपल्या चरित्र-कथनाकडे वळणें इष्ट वाटतें.

"प्रो. फैजमहंमद ह्यांचे पिताजी फत्तेहमहंमद उत्तर-भारतांतील नामांकित गवई होते. त्यांचे दोघे बंधुही उत्तम कलाकार होते. प्रो. फैजमहंमद हे स्वतः अव्वल दर्जाचे गायक होते, म्हणूनच श्रीमंत सयाजीरावांनीं त्यांस दरबार-गवई नेमलें होतें. फैजमहंमद ह्यांनीं अनेक वर्षें बडोद्यांत आपली संगीत-शाळा यशस्वीपणें चालवली. पंडित भास्करबुवा बखले, प्रो. गोविंद-

प्रसाद, पंडित निगोस्करबुवा, रोकडनाथ व हंसाबाई ही त्यांची नामांकित शिष्यपरंपरा.

"फैजमहंमद ह्यांची गायकी विशेष प्रकारची होती. तीमध्यें स्पष्टता, वजन व शक्ति असे. नाभीपासून स्वरारंभ होऊन, छातीच्या जोरदार दाबानें त्यांच्या 'गमक'-गायकींत विशेषच वजन जाणवे. त्यांच्या गायनाचें चलन सरळ नसून, अवघड स्वनांचें असे. त्या काळीं ही गायकी आपल्या वैशिष्ट्यानें व वजनदारपणें गाजत होती. त्यांच्या गायनानें सर्व सभा चकित होत असे.

"फैजमहंमद दिसायला भव्य, उजळ वर्णाचे व रुबाबदार होते. पण स्वभावानें थोडे उग्र असत."

हें एक वर्णन झालें. पुढें १८९० च्या आसपास फैजमहंमद साठीजवळ आल्यावर ते नानासाहेब सरदेसाई ह्यांस मौलाबक्षांच्या मानानें ठेंगू, लहान चणीचे, काळवंडलेले भासले, परंतु हें केवळ अवस्थांतर दिसतें. ह्या दोन्ही वर्णनांत विरोध वा चूक आहे, असें मानण्याचें मुळींच कारण दिसत नाहीं.

फैजमहंमद ह्यांचें पहिलें गुरु-घराणेंही ख्याल-गायकीचें होतें. नथ्थन-पीरबक्ष हे लखनौचे विख्यात ख्याल-गायक मख्खनखां ह्यांचे चिरंजीव. ह्या गुरु-घराण्यांत पिढ्यान्‌पिढ्यांचे संस्कार व मेहनतीनें संवर्धन केलेली विद्या होती. मख्खनखां, नथ्थनपीरबक्ष, कादरबक्ष, त्यांचे मुलगे हद्दूखां व हस्सूखां, हस्सू ह्यांचे चिरंजीव रहिमतखां ही परंपरा डोळे दिपून जाण्यासारखी दिसते. कित्येक पिढ्यांनीं अविरत कष्ट करून ही विद्या कमावलेली होती. फैजमहंमद ह्यांजवरील संस्कार असाधारण थोर होते, ह्यांत शंका दिसत नाहीं. ह्या उत्कृष्ट शिकवणीनंतर घग्गेखुदाबक्ष ह्यांची तालीम फैजमहंमदखां ह्यांनीं घेतली.

लहानपणीं स्वतःच्या आवाजांत असलेला दोष दूर व्हावा, म्हणून खुदाबक्षांनीं अघटित मेहनत केली. असाधारण विद्वान् व तयारीचे गायक म्हणून त्यांनीं लौकिक मिळवला. आपल्या पश्चात् आपले चिरंजीव गुलाम अब्बास, गुलाम अब्बासचे शिष्य नथ्थनखां व फैय्याजखां ही उज्ज्वल परंपरा त्यांनीं निर्माण केली. फैजमहंमदनीं स्वतःच्या गुरु-घराण्यांतील गायक म्हणून फैय्याजखां ह्यांस स्वतःची कन्या दिली व बडोद्याचे दरबार-गवई म्हणून

त्यांची नेमणूक करून घेतली. नथ्थनखां, गुलाम अब्बास, हीं सर्व कौटुंबिक नात्याचीं माणसें होतीं.

मुसलमान लोकांत ही आमरण अभ्यास अवश्य असलेल्या विद्यांची व कलांची परंपरा ज्या जिद्दीनें टिकवली जाते, त्या मानानें हिंदु लोकांत आतां कोणतीच विद्या अथवा कला शिकण्याचें त्राण उरलेलें नाहीं. ह्या विद्या व कलांच्या परंपरेंत कांहीं महत्त्वाचें वा टिकण्यालायक आहे, अशी श्रद्धाही नव-शिक्षितांत नाहीं.

धारवाडच्या शंभूराव किर्लोस्करांनीं लिहिलें आहे, कीं भास्करनें १८८६ सालीं 'किर्लोस्कर कंपनी' सोडली. तरुण भास्कर बखले फैजमहंमद ह्यांजकडे शिकायला राहिला, त्या काळीं विद्या व कलांसाठीं उग्र तपस्या केली पाहिजे, भारतीय विद्या व कला ह्याच हिंदूंच्या दृष्टीनें महत्त्वाच्या आहेत, अशी श्रद्धा जागृत असे. १७ वर्षांचा भास्कर बखले ज्या दिवशीं फैजमहंमद ह्यांजकडे शिकायला राहिला, त्याच दिवशीं ८ वर्षांचा माणिकराव जुम्मादादांच्या व्यायामशाळेंत शिकायला राहिला. दोघांची दिनचर्या समान होती. पाणी भरणें, शेळ्या चारणें, वगैरे एकच प्रकारची मजुरी दोघे निष्ठावंत विद्यार्थी गुरुगृहीं करीत. भास्करनें नाटक-मंडळी सोडून बडोदें येथें तो गायनाचें शिक्षण घेण्यास राहिला, त्या काळचें वातावरण आतांपर्यंतच्या वृत्तान्तावरून वाचकांच्या डोळ्यांसमोर उभें राहील. अनेक गायक-वादकांचीं घराणीं त्या काळांत बडोद्यांत होतीं व त्या सर्वांचें गायन-वादन विद्यार्थी भास्कर ह्यास ऐकायला मिळे. विद्यार्थी-दशेंतले हे संस्कार कलावंताची घडण घडविण्यांत अत्यंत महत्त्वाचे असतात.

ज्या फैजमहंमदखांसाहेबांचें नंतरच्या लेखकांनीं नीटसें वर्णन नमूद केलेलें नाहीं, त्यांचें महत्त्व तरुण भास्कर जेव्हां बडोद्यांत गाणें शिकण्याच्या उद्देशानें गेला, तेव्हां जाणती मंडळी फारच मानत असत, हें उघड दिसतें. भास्करनें बडोद्यांतलें सर्वश्रेष्ठ विद्यापीठ म्हणून फैजमहंमद ह्यांचें घराणें निवडलें, व तेथील शिक्षणानें भारतास एक अजोड कलावंत भास्करबुवांच्या रूपानें लाभला. फैजमहंमद ह्यांनीं त्या भव्य कलाकाराच्या चरित्राचा पाया मजबूत केला, ही गोष्ट अतिशय महत्त्वाची आहे. लोकप्रियता व लौकिक

ह्यांपेक्षां अधिक विश्वसनीय असे गुण फैजमहंमद ह्यांजवळ असावेत, हेंच अनेकशः प्रत्ययाला येतें.

सर्वांत महत्त्वाचा विचार असा, कीं ज्या फैजमहंमदखांना रूप नाहीं, आकृति नाहीं; जात्या मुखदुर्बळ, शालीन; ज्याला मैफल जिंकण्याची जिद्द नाहीं; अशा उस्तादाला चोखंदळ सयाजीरावमहाराजांनीं स्वतःच्या पदरीं ठेवलें, राहायला स्वतंत्र बंगली दिली, कायम पगाराशिवाय शिकवण्या केल्यास स्वतंत्र वेगळा पगार दिला, ते महाराज भोळे किंवा साधे-सुधे नव्हते. अनेक तज्ज्ञांकडून माणसाची कसून परीक्षा करून घेतल्याशिवाय सयाजीराव-महाराज कोणासही थारा देत नसत. महाराजांनीं फैजमहंमदखांसाहेबांना त्यांच्या मृत्यूपर्यंत इतमामानें संभाळलें, ही घटना अर्थपूर्ण आहे.

बंदेअलीखांसाहेबांचा गंडा बांधलेला तरुण भास्कर मौलाबक्षांच्या शाळेंत पुन्हा परत न जातां, मोठे वशिले लावून फैजमहंमद ह्यांजकडे निष्ठापूर्वक विद्या घेण्यासाठीं आठ-नऊ वर्षें राहिला, ही घटनाही तितकीच सूचक आहे.

दोन वर्षें 'किर्लोस्कर मंडळी' बरोबर ग्वाल्हेर, इंदूर, वगैरे भागांत हिंडून आणि विद्वान् गायकांच्या अखंड सहवासांत राहून, संगीताची दुनिया भास्करला थोडी तरी परिचित झाली होती. भास्करच्या सल्लागारांनीं फैजमहंमद ह्यांचीच निवड सकारण केली असली पाहिजे. ह्या सल्लागारांत मंगेशराव व पुरुषोत्तमराव तेलंगही असावेत, असें वझेबुवांच्या आठवणीवरून दिसतें. फैजमहंमद ह्यांची गाढ विद्वत्ता व मार्मिक शास्त्र-ज्ञान ह्यांबद्दल बडोद्यांत चांगलाच दबदबा असावा. भास्करनें फैजमहंमद हे गुरुजी निवडले, ह्या घटनेचा अर्थ स्पष्ट आहे. त्या गुरुजींच्या घरांतच गाढ विद्येचें पाणी मुरत असलें पाहिजे; त्यांचा लौकिक भास्करच्याही कानीं आला असावा; एरव्हीं भास्करसारखा तिखट विद्यार्थी ह्या अनाकर्षक गवयाच्या चरणीं लीन झालाच नसता.

## प्रकरण पांचवें

# तपस्या

सतरा वर्षांचा तरुण भास्कर 'किर्लोस्कर कंपनीं'तील विलासी जीवन सोडून आतां खडतर अशा कष्ट-प्रद जीवनांत परत आला होता. कांहींच साधलें नाहीं, तर कथेकरी बनून स्वतःचा उदरनिर्वाह कसाही करतां येईल, इतका आत्म-विश्वास भास्करच्या मनांत होता. आयुष्याच्या गेल्या दोन-तीन वर्षांत स्वपराक्रमानें स्वतःचा चरितार्थ इभ्रतीनें चालविल्याचा अनुभव ह्या आत्म-विश्वासाच्या पोटीं होता. बंदेअल्लींचे सहा महिन्यांचे, तसेंच बाळकोबा नाटेकरांचे व शास्त्रीय गायन जाणणाऱ्या इतर गायक-वादकांचे दीर्घ मुदतीचे संस्कार ह्या तरुणाच्या मनावर खोल रुजलेले होते. गेल्या कांहीं वर्षांत अनेक विद्वान् गायक-वादकांची विद्या ऐकून तरुण भास्करला गायन-विद्येच्या विस्तृत क्षेत्राची जाणीव झाली होती.

त्या काळचे उत्तम गवई व वादनकार 'किर्लोस्कर मंडळी'चें नाटकी गाणें ऐकायला येत. कंपनींत व इतरत्र होणाऱ्या मैफलींत भास्करला गाणें व वादन नेहमींच ऐकायला मिळत असे.

बडोद्यास बहिणीकडे मुक्कामास आल्यानंतर "आतां आपण गायन-विद्येच्या अभ्यासास जीवित वाहून घेणार" हा निश्चय भास्करनें बहीण, बहिणीचे यजमान, पितृ-तुल्य बाळशास्त्री तेलंग, वगैरे हितचिंतकांस सांगितला. मौलाबक्षांच्या शाळेंत भास्करला पुन्हा सहज प्रवेश मिळाला असता, पण भास्करला बडोद्यांत सर्वोच्च कला शिकण्याचें दुसरें अधिक चांगलें स्थान ठाऊक होतें. बडोदें सरकारच्या नोकरींत असलेले महान् गायक फैजमहंमदखां ह्यांजकडे विद्या घेण्याचें भास्करनें ठरवलें. त्याला गायनाचा अभ्यास-क्रम पूर्ण करून केवळ प्रमाण-पत्र मिळवायचें नव्हतें. त्याला कलेचें अत्युच्च, व्यापक आणि सौंदर्यशाली वैभव हस्तगत करायचें होतें.

न्यायरत्न बाळशास्त्री तेलंग हे बडोदें राज्यांतले थोर शिक्षणाधिकारी होते. त्यांनीं भास्करला गांवाबाहेरील एका झोपडीवजा बंगलींत फैजमहंमदखां-साहेब राहात तिकडे नेलें.

"हा एक गरीब होतकरू तरुण मुलगा आहे, ह्याला गायनविद्या शिकायची आहे. आपण त्यास शिकवावें," असें बाळशास्त्र्यांनीं खांसाहेबांस सुचविलें. खांसाहेबांनींही एका थोर शिक्षणाधिकाऱ्याची ही आज्ञाच समजून, "बरें, मी त्याला शिकवीन," असें आश्वासन दिलें. मौलाबक्षांच्या शाळेंतला हा विद्यार्थी नाटक-कंपनींत चार-पांच वर्षें राहून, आवाज फुटल्यामुळें पुन्हा गायन शिकण्यास आला आहे, हें समजल्यावर फैजमहंमदखांसाहेबांस हुरूप वाटण्यासारखें त्यांत कांहीं नव्हतें. शिवाय मुलगा गुरु-दक्षिणा देण्यासही असमर्थ होता. पण फैजमहंमद स्वतः सरकारी नोकरींत असल्यामुळें दुसऱ्या एका सरकारी शिक्षणाधिकाऱ्याची आज्ञा पाळणें तर भाग होतें. भास्करच्या बाबतींत फैजमहंमदखांसाहेबांचा असा सर्वच जुलमाचा रामराम होता.

तरुण भास्करची अवस्था आतां अतिशय अनिश्चिततेची व भीति-दायक होती. वडील बंधूंनीं लग्न केलें होतें. तेच आईलाही संभाळीत होते. बहिणीकडे मीठ-भाकरीची सोय होती. पण नोकरींतून सांठवून आणलेले थोडे पैसे संपले, कीं तिला देण्यासारखेंही भास्करजवळ कांहीं राहाणार नव्हतें. स्वतःचा तंबोरा, वगैरे गायनाभ्यासाला आवश्यक अशीं साधनें भास्करजवळ नव्हतीं. सकाळीं जेवून संध्याकाळसाठीं बहिणीनें भाकरी व तिखट बांधून द्यावें व

दिवसभर फैजमहंमदखां ह्यांजकडे वर-कामाच्या गड्याप्रमाणें राबावें, असा नवा दिन-क्रम सुरू झाला होता. खांसाहेब स्वतःच्या पाळलेल्या मुलाला बहुधा रात्रीं शिकवीत. क्वचित् लहर लागली, तर भास्करला संध्याकाळीं 'सुधे बोल' ह्या भूपांतल्या चिजेची अस्ताई शिकवून, खांसाहेब शिकवणी बंद करीत. ही शिकवणीदेखील चार-सहा दिवसांनीं खांसाहेबांची लहर लागली तर मिळे.

खांसाहेबांच्या शेळ्या चारायला न्याव्या, घराभोवतीं त्यांनीं केलेली घाणही काढावी, घरांत पडेल तें काम करावें, बाजारच्या वस्तु आणून द्याव्या, असा कार्यक्रम चालू होता. घर गांवाच्या टोकाला इतकें दूर, कीं प्रत्येक वस्तु आणायला मैल-दोन-मैलांची पाय-पीट करावी लागे. क्वचित् खांसाहेब आपल्या मुलाला घेऊन शिकवायला बसले, तर घराबाहेर उभें राहून, खिडकींतून तालीम ऐकायला मिळे. चीज व सा-री-ग-म कागदावर लिहून घ्यावी, क्वचित् स्वतःही शिकायला बसावें, असें गरीब भास्करचें जीवन खडतर असे.

अशा अवनत दशेंतच माणसाच्या शीलाची पारख होते. "कांहीं काळ अपमान, दुःखें, कष्ट सोसून मी पुनः अभिमानानें डोकें वर काढीन," अशा निर्धारानें भास्कर गुरुजींच्या बंगलींत दिवस कंठीत होता. खांसाहेबांची बंगली बेचराजीच्या मैदानाजवळ गांवाच्या अगदीं टोकाला दूर असे. बेचराजीच्या मैदानांत शेळ्या चारायला नेल्या, कीं त्या ओसाडींत भास्कर मोकळ्या गळ्यानें गाण्याचा अभ्यास करी. फुटलेल्या गळ्याला पुन्हा स्वरेल बनवण्यासाठीं तो अहो-रात्र झटत होता.

मुलगा नाटकांत गेला, आणखी कोठें गेला, तरी तो शील-भ्रष्ट होणार नाहीं, अशी भास्करला ओळखणाऱ्या सर्वांची खात्री होती. हें बालपणीं झालेल्या उत्कृष्ट संस्कारांचें फळ होतें. तो सदाचरणी व विद्या-निष्ठच राहील असा भास्करच्या सर्व आप्तेष्टांना भरंवसा वाटे. नोकरी सोडून भास्कर परत बडोद्यास आला आहे, त्याचा गायनाचा अभ्यास करण्याचा निश्चय आहे, हें कळतांच वडील बंधूंकडून त्यास प्रोत्साहन मिळालें. "शक्य ती मदत करीन",

असें केवळ आश्वासनच नव्हे, तर कुटुंबाच्या गरीब स्थितींत जेवढें शक्य होतें तेवढें प्रत्यक्ष द्रव्यसाहाय्य वडील बंधु करीत.

गुरुजी फैजमहंमदखां सीधे-साधे, कर्तव्य-कठोर, महान् विद्वान् गायक होते. स्वतःच्या घरीं केलीं असतीं तीं कामें विद्यार्थ्यांनीं गुरु-गृहीं केलीं, तर त्यांत कांहींच गैर नाहीं, असेंच सर्व जुन्या गुरुजींप्रमाणें फैजमंहमदखांही मानीत असत.

भास्करला गुरु-कुलांतील प्रारंभींचें हें जिणें हताश करण्यासारखें होतें. खांसाहेब कचित् शिकवायला बसले, तरी भास्करचा फुटलेला आवाज त्यांना उत्साह-जनक वाटत नव्हता. खास मुसलमानी घराणेदार गायकींत विशिष्ट दर्जाच्या सौंदर्यानें स्वर लागण्याला अतिशय महत्त्व असतें. भास्करला सुरेलपणाची कल्पना असली, तरी आतां आवाज हुकमी काम देत नसे. प्रत्येक रागांत तेच स्वर अत्यंत सूक्ष्म हिशेबानें वेग-वेगळ्या दर्जाचे लागतात. ‘भूप’, ‘यमन’, वगैरे राग शिकवतां-शिकवतां शिष्य स्वरांचा बारकावा समजून स्वर लावूं शकतो, त्याचा स्वर हमखास स्थिर लागतो, असें दिसल्याशिवय कोणताही मोठा गवई गाण्याचें खरें शिक्षण सुरूच करूं शकत नाहीं.

मौलाबक्षांच्या शाळेंतल्यासारखें नोटेशन व सा-री-ग-म लिहून आणि लयीची टाळी वाजवून, भराभर, क्रमानें, एकेक राग शिकवण्याची ही शाळा नव्हती. फैजमहंमदखांसाहेबांकडे प्रत्येक छोटा आलाप व अस्ताईची ओळ, स्वराची आस, लय सांभाळून व सौंदर्ययुक्त म्हणतां आली, तरच पुढचे आलाप व स्वर खांसाहेब शिकवणार. ह्या दृष्टीनें शिष्य भास्कर व गुरुजी फैजमहंमदखां ह्यांची अनेक कारणांनीं बरेच महिने दिल-जमाई झाली नाहीं. भास्कर ह्या पराभवानें कमालीचा दुःखी-कष्टी असे.

खांसाहेबांचे शिष्य कानडे ह्यांनीं लिहिलें आहे, “खांसाहेबांचीही एक खाजगी अडचण होती. ते स्वतःच्या मुलाला शिकवत तें सावत्र भाऊ झोपीं गेल्यावर, बऱ्याच उशिरां रात्रीं. स्वतःच्या सावत्र भावाला आपली गायकी मिळूं नये, अशी फैजमहंमदखांसाहेबांची इच्छा असे.” खांसाहेबांची शिकवण्याची पद्धतिही थोडी कठीण होती. अगदीं साधे सरळ आलाप वा पलटा म्हणायला ते नोकराला लय धरायला बसवीत; मग प्रत्येक स्वर वा

आकार लयीच्या ठाय वजनांत म्हटला पाहिजे, ह्याबद्दल फैजमहंमदखां फार दक्ष असत.

पहिले सहा महिने तर खांसाहेबांचें भास्करकडे फारसें लक्षच नव्हतें. तो प्रथम मौलाबक्षांच्या शाळेंत होता, ही एकच गोष्ट खांसाहेबांस निरुत्साही करण्यास पुरेशी होती. मौलाबक्ष श्रीमंत सयाजीरावांच्या खास मर्जीतले. ते महाराजांबरोबर इंग्लंडला जाऊन युरोपियन संगीत व नोटेशन-पद्धति शिकून आलेले. त्यांच्या आधुनिक दृष्टिकोनामुळें परंपरागत गायकी व गायन-शिक्षण-पद्धति ह्यांबद्दल त्यांच्या मनांत अनादर. ह्या सर्व कारणांनीं मौलाबक्ष व फैजमहंमदखां ह्यांची दिल-जमाई होणें कठीण होतें. मनांत अढी असे.

भास्करचें गरिबीचें वर्तन, त्याची कष्ट-शीलता, त्याची गायन-विद्या-निष्ठा, ह्या गोष्टी खांसाहेबांना दिसत. त्यांना लहर आली, तर भास्कर संध्याकाळीं शेळ्या चारून आला, कीं ते थोडा वेळ शिकवायला बसत. पण 'सूधे बोल'च्या पुढें पहिल्या सहा महिन्यांत भास्करची प्रगति झाली नव्हती. त्याचा आवाजमात्र क्रमानें सुधारत असला, तरी त्यांतील नैसर्गिक माधुरी व जोर कमी झाला होता. पांढऱ्या सहाव्या पट्टींत अनिर्बंध फिरणारा आवाज, आतां एखादी पट्टी खालीं, पण निश्चित स्वरांच्या जागा घेऊं लागला होता. प्रगति सावकाश होत होती, पण निश्चित होत होती. भास्करमात्र खांसाहेबांच्या उदासीनतेनें बेचैन, दुःखी होता.

एकदा अशा निराश अवस्थेंत दिवसभर कष्ट करून, थकून, भास्कर घराबाहेर एका दगडावर बसला होता. स्वतःच्या दुरवस्थेनें तो रडकुंडीस आला होता. ऐन सतरा वर्षांच्या उतावीळ वयांत भवितव्याकडे केवळ आशेनें पाहात बसणें व सुदैवाची प्रतीक्षा करीत बसणें, त्या पराक्रम-प्रिय तरुणाला असह्य होत होतें. केवळ निष्ठेवर भास्कर जगत होता. अतिशय उद्विग्न मनानें अशा केविलवाण्या स्थितींत भास्कर बसला होता. त्याचें बाह्य जगाकडे लक्ष नव्हतें. इतक्यांत गांवाबाहेरच्या त्या ओसाड रस्त्यावरून एक गाडी आली. ती बंगलीशीं थांबली. गाडीच्या आवाजानें भास्कर भानावर आला. समोर पाहातो, तों त्याचे पालक न्याय-रत्न बाळशास्त्री तेलंग उभे होते.

न्याय-रत्न बाळशास्त्री भास्करचा समाचार कळावा म्हणून सहज आले होते. अनेक महिन्यांत त्यांना भास्करच्या प्रगतीचें वृत्त समजलें नव्हतें. त्यांनीं विचार-पूस केली. त्या चाणाक्ष माणसाच्या नजरेंतून भास्करची दुःख-व्याकुल निराश अवस्था सुटली नव्हती. त्यांनीं बारकाईनें अनेक प्रश्न विचारून पाहिले. मनाच्या कोंडलेल्या आवेगांचा बांध फुटून भास्करनें मन-मोकळेपणानें सर्व हकीकत सांगितली. स्वतःची दारुण निराशा व दुःख तो झाकून ठेवूं शकला नाहीं. एकंदर हताश स्थिति निवेदन करतांना त्याच्या डोळ्यांत अश्रु आले. भास्करचें पाणी-दार, पराक्रमी, मानी मन बाळशास्त्र्यांना त्याच्या लहानपणापासून ठाऊक होतें. भास्करबद्दलच्या जिव्हाळ्यामुळेंच ते सर्व परिस्थिति समजूं शकले; त्यांनीं घरांत जाऊन खांसाहेबांची भेट घेतली.

कुशल-प्रश्नोत्तरें झाल्यावर शास्त्रीबुवांनीं खांसाहेबांना विचारलें, "भास्करची काय खबर आहे? तो कांहीं शिकला का? मला त्याचं गाणं ऐकूं द्या. म्हणजे कळेल, तो कितपत सुधारत आहे तें." शास्त्रीबुवांनीं सरळ मुद्द्यालाच हात घातला.

"अजून तितकं ऐकवण्यासारखं कांहीं नाहीं, सुरुवातच आहे." अशी सारवा-सारव खांसाहेबांनीं सुरू केली. खांसाहेबांकडे शिकायला येण्यापूर्वी हजारों श्रोत्यांना झुलवणारा भास्कर खांसाहेबांकडे कांहींच प्रगति करूं शकला नाहीं, ही अवस्था जरा विपरीतच होती. खांसाहेबांचें गुळमुळीत बोलणें ऐकून बाळशास्त्र्यांनीं शांतपणें म्हटलें, "खांसाहेब, मुलगा अतिशय गुणी, म्हणून आपल्यासारख्या थोर गुरूंच्या स्वाधीन केला. तो जितका लवकर शिकेल, तितका तो लवकर स्वतःच्या पायांवर उभा राहील. त्याचे वडील गेले. आतां तुम्हीच त्याचे पालक. आपणां सर्वांचे पालक सरकार सयाजीराव-महाराज. एका गरीब मुलाला आपण योग्य वेळीं जरूर ती मदत केली नाहीं, असं समजलं, तर महाराजांना काय वाटेल? त्यांना मी काय जबाब देऊं?"

खांसाहेबही दरबारीच उस्ताद होते. त्यांनीं त्या गर्भित इशाऱ्याची तात्काळ दाद घेतली. त्यांनीं बाळशास्त्र्यांना आश्वासन दिलें, "शास्त्रीबुवा, आपल्या सूचनेचा मी पूर्ण आदर करीत आहें. भास्करला लवकर तयार केला पाहिजे, ही निकड माझ्या लक्षांत आली. आपण पुन्हा सहा महिन्यांनीं यावं नि

भास्करची प्रगति प्रत्यक्षच पाहावी." खांसाहेबांच्या ह्या आश्वासनानें बाळशास्त्र्यांचें समाधान झालें. भास्करला धीर देऊन ते निघून गेले.

एकदम मनु पालटला, फैजमहंमदखांनीं आतां स्वतःच मनावर घेतलें. निरनिराळ्या रागांचे कालानुकूल आरोह-अवरोह व वेग-वेगळ्या तालांचीं वजनें, ह्यांचे पाठ भास्करला दिवसभर मिळूं लागले. खांसाहेबांनीं थोडे खडे बोल ऐकल्यामुळें भास्कर आतां 'सूवे बोल' ह्या चार बोलांपुढें जाऊं लागला. प्रत्येक तालांतील आलापाचा डौल सांगून, तोच आलाप शेकडों वेळां म्हणायला लावायचा, असा क्रम सुरू झाला. शेकडों वेळां म्हटलेल्या आलापांत येणारें सहज सौंदर्य, तालाचें वजन, स्वच्छ दाणेदार स्वर, ह्यांनीं भास्करच्या आवाजाला आतां वेगळेंच प्रभावी वळण लागलें. भास्करची सर्व पूर्व-वयांतली तपस्या आतां उपयोगी पडूं लागली. भास्करला ताल-स्वरांची दृष्टि आधींच होती. त्याची प्रगति आश्चर्यकारक वेगानें होऊं लागली. खांसाहेब आतां जिद्दीनें शिकवूं लागले होते. मौलाबक्षांच्या शाळेंतील विद्यार्थ्यापेक्षां, स्वतः शिकवलेला विद्यार्थी कसा अतुलनीय होतो, हें त्यांना प्रत्यक्षच विद्यार्थी तयार करून, बडोद्याच्या जनतेला दाखवायचें होतें. दोन उस्तादांतील ती कायमची चुरस होती. भास्करसारखा निष्ठावान् व कष्टांना न डगमगणारा विद्यार्थी आणि फैजमहंमदखांसाहेबांसारखा विद्वान् रसज्ञ गायक गुरु, असा 'समसमां संयोग कीं जाहला' अशी आतां स्थिति झाली होती.

भास्कर बखलेला फैजमहंमदखांसाहेब मोठ्या आस्थेनें शिकवीत आहेत, ह्या गोष्टीचा बडोद्यांत थोड्याच दिवसांत बोभाटा होऊन गांवांतील आणखी चार-पांच विद्यार्थी खांसाहेबांकडे शिकायला येऊं लागले. भास्कर आतां दाऊदच्या शिकवणीच्या वेळीं तंबोऱ्यावर बसूं लागला. भास्करला ही खास तालीम रात्रीं आठ ते दहापर्यंत मिळे. घरचा नोकर अबदुल्ला हा डग्ग्यावर ताल धरीत असे. खांसाहेबांच्या तालमींत हा अबदुल्ला हळू-हळू पक्क्या स्थिर लयीचा बनला होता.

रोजच्या दोन-तीन तासांच्या तालमींत बहुधा एकच ख्याल नीट घोटून गायला जात असे. कधीं तालाचें वजन अथवा मांडणीचें वैचित्र्य म्हणून दुसरे एक-दोन ख्याल ह्या तालमीच्या वेळीं घटवले जात. अनेक दिवस

तोच ख्याल वारंवार सविस्तर म्हणून, एकेक राग व एकेक ताल पक्का केला जात होता.

फैजमहंमदखां हे हद्दूखां-हस्सूखां ह्यांच्या वडिलांचे शिष्य आणि पक्के उस्ताद होते. एकेका रागाचे स्वर व त्या स्वरांतून निर्माण होणाऱ्या अगणित सुंदर स्वर-माला विद्यार्थ्याकडून अगणित वेळां घोटून घ्यायच्या व त्याही लयीच्या डौलानें. प्रत्येक आलाप व तान-पलटा लयीच्या वजनांत अतिशय डौलांत बांधलेला. रागाचे जीव-स्वर कशा खुबीनें प्रमुख प्रभावी ठेवायचे, त्या स्वरांच्या आवतीं भोवतीं अलंकारांची गुंफण करून, रागाचें मूर्त रूप कसें स्पष्ट व आकर्षक प्रभावानें उभारायचें, ह्याची कसून मेहनत खांसाहेब करून घेत. खांसाहेब स्वतः गाऊन, विद्यार्थ्याला बरोबर गायला लावून, प्रत्येक भाग घटवून घेत. स्वतःच्या गायकींतलें सर्व सौंदर्य विद्यार्थ्यांच्या गळ्यांत उतरेपर्यंत ही घोकंपट्टी न थकतां, न कंटाळतां चाले.

प्रत्येक तालाचें वजन व डौल विद्यार्थ्याच्या गळ्यांत पक्का बसावा, म्हणून वेग-वेगळ्या तालांतल्या बांधणीच्या त्या रागांतल्या अनेक चिजा खांसाहेब विद्यार्थ्याकडून घोटून घेत. केवळ तोंड-पाठच नव्हे, तर लय व स्वर विद्यार्थ्याच्या रक्तांत भिनावेत, अशी अविरत मेहनत चाले. खांसाहेब स्वतः शिकस्त करीत. भास्कर तितकाच जीव तोडून मेहनत करी.

ह्या क्रमानें भास्करच्या गळ्यांत दोन-तीन वर्षांत अनेक ख्याल खेळूं लागले. फुटलेल्या आवाजांतील सर्व दोष नाहींसे होऊन, स्वर स्वच्छ, आस-युक्त व स्थिर लागूं लागले. लयीच्या डौलांत घसा आलापांचीं आंदोलनें सहज घेऊं लागला. लयीनें बांधलेल्या आकारांत हजारों पलटे भास्करच्या गळ्यांतून कष्ट-शून्य स्वरूपांत खेळूं लागले. आतां ह्यापुढें भास्करची कुशाग्र बुद्धि खांसाहेबांच्या स्वरेल गायनांतील अधिक सूक्ष्म, गूढ सौंदर्य-स्थळें धुंडूं लागली. खांसाहेबांनीं ह्या नव्या जाणिवेची तात्काळ दखल घेतली. केवळ तीन वर्षांच्या तालमीनें, खांसाहेबांच्या कलेंतील गूढ सौंदर्य धुंडणारी भास्करची उत्कंठा पाहून खांसाहेबांचें मन आनंदानें फुलून गेलें. गुरु-शिष्यांच्या अंतःकरणाचें ऐक्य अधिक खोल झालें. शास्त्राचीं बंधनें आत्मसात् करून शिष्य आतां कलेच्या सौंदर्याच्या क्षेत्रांत पदार्पण करीत होता.

खांसाहेबांच्या गळ्यांतील प्रत्येक रागाचे स्वर लावतांना दिसणाऱ्या सूक्ष्म छटा, विशेष क्रमानें स्वरोच्चार केल्यास त्यांचा होणारा भिन्न प्रभाव, स्वरोच्चारांत निर्माण होणारा जिवंत प्रकाश, एकेका स्वराला प्राप्त होणारें कमालीचें रंजक रंगदार तेज, हें ह्या कला-क्षेत्रांतलें मनोज्ञ रस-ग्रहण करण्यास भास्कर उत्सुक आहे, एवढेंच नव्हे, तर सूक्ष्म स्वर-भेद त्याच्या गळ्यांतून स्पष्ट उमटतात, हें पाहून खांसाहेबांचें कलासक्त मन आनंदानें उचंबळून येई.

प्रत्येक स्वर व स्वर-माला उच्चारतांना भास्करची नजर त्या-त्या रागांतलें गूढ सौंदर्य व सामर्थ्य शोधीत आहे, पुनः पुनः शेकडों वेळां म्हटलेल्या त्याच स्वर-माला भास्कर अधिक जागृततेनें, सहजतेनें सचेतन करीत आहे, लयीच्या सहजतेला अलंकारिक डौल देत आहे, राग-देवता त्या एक-निष्ठ कलावंत स्वर-दृष्टीसमोर ललित-मनोहर नृत्य करीत आहे, असा भास्करचा अभ्यास पाहून खांसाहेब अधिकच स्फूर्तीनें गाऊं लागत.

भास्करला त्या स्वरोन्मादाचें एक नवीनच ऐश्वर्य पाहायला मिळूं लागलें. आत्म-विस्मृतीच्या आनंदाच्या उन्मादानें गुरु-शिष्य त्या स्वर-सागराच्या लाटांत डुंबूं लागले, कीं दोघांचीही समाधि लागे. एक प्रभावी साक्षात्कार दोघांना अनुभवास येऊं लागला. पूर्वींचे शिकलेले राग, पूर्वींचेच अलंकार, आतां कलात्मक नाजूक आर्ततेनें, रंजक तेजानें, चमकदारपणें उच्चारण्यास खांसाहेब शिकवूं लागले. भास्कर हें सर्व ऐश्वर्य आत्मसात् करीत होता.

भास्कर बखलेला आतां अनेक नवे विद्यार्थीमित्र मिळाले. आत्मारामबुवा, बाळकृष्णबुवा, गणपतराव गोखले, रघुवीरदास, केशवबुवा, ही विद्यार्थी-मंडळी भास्कर बखलेच्या भोवतीं जमूं लागली. ह्या मंडळींत तेव्हां कान्हेरेशास्त्री असत. ही सर्व मंडळी शनिवारीं अथवा रविवारीं कोणाच्या तरी घरीं एकत्र जमत व तेथें गाण्या-बजावण्याचा जलसा होई. सर्व विद्यार्थी गात. कोणी सतार, जलतरंग वाजवत. गणपतराव गोखले सतार उत्तम वाजवत. रघुवीरसिंग नस-तरंग वाजवत. हे जलसे ऐकण्यासारखे असत. चार जाणत्या मित्रमंडळींत नित्य गाऊन बैठक रंगवणें, केलेल्या कठीण रियाजाचें प्रत्यक्ष मैफलींत चीज करणें, ह्या गोष्टी भास्करच्या अंगवळणीं पडत चालल्या. भास्करचें गाणें इतर मुलांच्या मानानें गायला व समजायला अवघड, म्हणून त्यास दुसरे

गाणारे मित्र ' अवघडदास ' म्हणत. भास्कर ज्या निकरानें विद्या संपादन करी' ती पाहून कोणी त्यास एकलव्य म्हणत, तर कोणी हा द्रोणाचार्यांचा आवडता शिष्योत्तम पार्थ-कुमार असें म्हणत. जुन्या आठवणी लिहितांना बडोद्याचे भास्करबुवांचे एक स्नेही श्री. शंकरराव सप्रे लिहितात, " बडोदें ही भास्कररावांची तपोभूमि. " ह्या तपोभूमीचें अनेक समकालीनांनीं अतिशय भावना-पूर्ण वर्णन केलें आहे. सर्व आठवणी स्वतंत्रपणें प्रसिद्ध होतील, पण येथें कांहीं लेखकांनीं त्या वेळच्या बडोद्यांतील संगीत-क्षेत्रांतील परिस्थितीचें वस्तुनिष्ठ वर्णन केलें आहे. त्यांतील थोडे उतारे देणें अवश्य वाटतें.

१८८९ मध्यें सयाजीरावमहाराज गायकवाड ह्यांचे खाजगी चिटणीस म्हणून इतिहास-कार नानासाहेब सरदेसाई ह्यांची नेमणूक झाली. त्यांना बडोद्यांतील अगणित सांस्कृतिक कार्यक्रम व कार्य-कर्ते ह्यांची बारकाईनें पाहाणी करून कित्येक गोष्टी महाराजांपुढें मांडाव्या लागत. रियासत-कार नानासाहेब सरदेसाई लिहितात, " राजधानीचे किती-तरी भिन्न व्यवसाय एकदम माझ्या अनुभवास येऊं लागले. स्वप्नसृष्टिच ती म्हटली तरी चालेल. हत्तीवरची स्वारी, गवई-नर्तकींचे जलसे, आखाडे व पहिलवान, दरबारी भेटी, अशा किती-तरी गोष्टींत महाराजांना भाग घ्यावा लागे ... पहिल्या एक-दोन वर्षांत त्यांच्या प्रत्यक्ष सेक्रेटरीचेंच काम मला करावें लागत होतें ... एकदा बडोद्याचे दोन गवई महाराजांच्या भेटीस आले. एकाचें नांव मौलाबक्ष व दुसऱ्याचें फैजमहंमद. ... दोघांच्याही गायन-शाळा असून, त्यांसाठीं जागा, उपकरणें, खर्च, इत्यादींच्या अडचणी सांगण्यासाठीं ते महाराजांकडे आले ... मौलाबक्षांना शाळेंत जल-तरंगाची व फैजमहंमदांना सतारीची सिद्धता करायची होती. प्रथमच ह्या दोन व्यक्तींची स्वभाव-भिन्नता माझ्या मनांत उभी राहिली. शरिरानें व वागणुकीनें त्यांचा विरोध लपण्यासारखा नव्हता. मौलाबक्ष थोराड, भव्य व स्थूल ठेवणीचे, रंगी-बेरंगी पोषाख, त्याच्यावर अनेक बिल्ले लटकत असलेले, डोक्यावर झोकदार रंगीत फेटा, झुबकेदार कल्ल्यांच्या मिशा, असें त्यांचें रूपच त्यांच्या मनांतला भाव मला सांगे, कीं मला म्हणजे ह्या अज्ञ पोराला मी काय कपाळ सांगूं आपली मागणी ! ह्याच्या अगदीं उलट फैजमहंमदखांचा प्रकार. ठेंगू, काळें-सांवळें

सडपातळ शरीर, तोंडावरची माशी हलूं नये अशी गरिबीची लीन वृत्ति, अंगांत एक साधा शुभ्र सुरकुतलेला अंगरखा, डोक्यावर तशीच शुभ्र चपटी पागोटी, देखावा व भपका यत्किंचित् त्यांत नव्हता. उभयतांच्या निवेदनांत एकमेकांची चुरस व निंदा भरपूर व्यक्त झाली. दहा-पंधरा वर्षेतरी मौलाबक्ष व फैजमहंमद ह्या दोघांचा कलह बडोद्यांत पुढेंही कैक वर्षें गर्जत होता.

"मौलाबक्ष आपली दाद ताबडतोब वाटेल त्याजकडे लावून घेणारा जहांबाज असून, त्याच्या अगदीं उलट फैजमहंमद स्वतः मुख-दुर्बळ व दुसऱ्यावर छाप बसवण्यांत सर्वथैव असमर्थ आहे. निदान भलाईच्या दृष्टीनें फैजमहंमदबद्दल माझ्या मनांत अनुकंपा उत्पन्न झाली.

"महाराज सर्वांचे वस्ताद होते. निर-निराळ्या इसमांकडून पूर्ण तपास केल्याशिवाय ते कोणाही एकट्यावर विश्वास ठेवणारे नव्हते. त्यांनीं दोघांच्याही शक्य त्या सोयी लावून दिल्या.

"फैजमहंमदांची व महाराजांची भेट झाली तेव्हां बोलतां बोलतां ते महाराजांस म्हणाले, 'मला माझ्या कसबाचा एवढा अभिमान वाटतो, कीं वाटेल त्या नवशिक्याला पंधरा दिवसांत मी सतार व गायन ह्यांची गोडी लावूं शकेन.'

"महाराजांनीं खांसाहेबांना शब्दांत पकडून 'माझे सेक्रेटरी सरदेसाई ह्यांस गायनाभिरुचि लावून द्याल, तर मी तुमचं बोलणं सत्य मानीन,' असें लगेच म्हटलें."

सरदेसायांस स्वतःला वेळ नव्हता. त्यांनीं आपले बंधु नारायणराव ह्यांस खांसाहेबांकडे शिकायला पाठवण्याचें ठरवलें. नारायणराव नुकतेच मॅट्रिक झाले होते. नरायणराव फैजमहंमदांकडे ठरावाप्रमाणें पंधरा दिवस गेले व पुढें आ-मरण संगीताभ्यासी बनले. अशा प्रकारें सरदेसाई कुटुंबांत गाणें शिरलें. महाराजांकडे फैजमहंमदांची कायमची दाद लागली. खांसाहेब नानासाहेबांबद्दल कृतज्ञता बाळगूं लागले. फैजमहंमद ह्यांजकडे भास्कर बखले ह्याजबरोबर, नानांचे बंधु गणपतराव व डॉक्टर दिनकरराव आणि मुलगा श्यामकांत गायन शिकायला जाऊं लागले.

१६०४५

मूळ मौलाबक्षांच्या शाळेंत शिकलेला भास्कर एरव्हीं कमी प्रसिद्ध, पण असामान्य समर्थ अशा फैजमहंमद गुरूकडे कां आकृष्ट झाला असेल, ह्या रहस्याचा उलगडा ह्या वरच्या वृत्तान्तांतच होतो. फैजमहंमदखां ह्यांच्या प्रगल्भ, खोल, गायन-विद्येची जाणीव असल्यामुळेंच भास्करनें न्याय-रत्न तेलंगांच्या आधारानें फैजमहंमदांकडे स्वतःच्या शिक्षणाची सोय लावून घेतली असावी.

खांसाहेबांच्या घरगुती वातावरणाचें व विद्यादान-पद्धतीचें त्यांच्याकडे शिकायला जाणाऱ्या कानडेशास्त्र्यांनीं जें वर्णन केलें आहे, तेंही फार उद्बोधक असल्यामुळें त्यांतील थोडा भाग येथें उद्धृत करतों. कानडेशास्त्री लिहितात, " भास्कररावांना गाण्याची तालीम मिळे, ती रात्रीं आठ वाजल्यापासून दहा वाजेपर्यंत. फैजमहंमद शिकवायचे, घरांतला नोकर अब्दुल्ला हा डग्ग्यावर ठेका धरायचा व आमच्यासारखा दुसरा फालतू शिष्य तंबुरा वाजवायचा. ही तालीम फार-फार ऐकण्यासारखी असे. फैजमहंमद हे बाहेर बैठकींत गात नसत. पण तालीम देणारा, शिकवणारा असा गवय्या दुर्मिळ ! खांसाहेबांचें गाणें पिढी-जाद व उस्तादी असे.

" खांसाहेब फक्त ख्यालच गात व शिकवत. त्यांना घसीटखां म्हणून एक भाऊ असत. ते खांसाहेबांजवळ राहात नसत. दुसरीकडे राहात. तेही पूर्वी गात असत. पण कोणा अज्ञात कारणानें त्यांचा आवाज नाहींसा झाला व मग ते सतार उत्तम वाजवूं लागले. फैजमहंमदखांना कधीं एखाद्या चिजेचें विस्मरण झाल्यास ते घसीटखांसाहेबांस विचारीत असत. खांसाहेब निर्व्यसनी असत. तंबाकू, भांग, अफू, वगैरे व्यसन नसे.

" खांसाहेबांना कोणास गुरु करायचें असल्यास भावी शिष्याला खांसाहेबांना दक्षिणा द्यावी लागे. नांवालाच शिष्य बनायचा. एक दिवस शिष्यानें नारळ, फुलें, पेढे, वगैरे न्यायचे व ते खांसाहेबांपुढें ठेवून, नंतर ऐपतीप्रमाणें दक्षिणा, निदान सव्वा रुपया द्यायची, म्हणजे तो शिष्य बनला. ही थोडीशी हिंदु पद्धति होती. शिष्याला वाटे, आतां आपल्याला खूप गाणें शिकवणार ! पण आठ-पंधरा दिवसांत एखाद-दुसरी ठुमरी सुरू करावी व एक-दोन महिन्यांत ती पुरी व्हावी. असे शिष्य पुष्कळ असत ...

खांसाहेबांचें इतर आचरण, वर्तन कसें असेल, तें सांगवत नाहीं. घरांतील राहाणी कळणें कठीण. बायकांना पडदा. पाळीव मुलगा दाऊद हा नेहमीं घरांत नसायचा. नोकर अब्दुल्ला व शिष्यमंडळी माडीवर बसत.

" खांसाहेब बाहेर शिकवण्या करीत नसत. पण ते सरकारी नोकर ; त्यामुळें बड्या लोकांच्या रखेल्यांना त्यांच्या घरीं जाऊन शिकवत. खांसाहेब हीं सरकारी कामें कशीं नाकारणार ?

" खांसाहेबांना १८९० पूर्वींच बडोदें सरकारनें शाळा चालवण्यास जागा देऊन सर्व योजना केली होती. केवळ दरबारी गायक म्हणून खर्चासाठीं चाळीस रुपये महिना मिळत. त्याचेच भरीला शाळेचे संचालक म्हणून खांसाहेबांस दरमहा चाळीस रुपये अधिक मिळत. फैजमहंमद ह्यांचे पट्टशिष्य व मदतनीस शिक्षक म्हणून भास्करराव बखले ह्यांस प्रथम दरमहा दहा व पुढें एक वर्षानें पंधरा रुपये पगार मिळे. बहिणीच्या आश्रयानें तीन-चार वर्षें शिक्षण घेतल्यावर स्वतःचें पोट भरण्याइतपत ही नोकरी त्यांस मिळाली होती. "

फैजमहंमद ह्यांची शाळा काठेवाड दिवाणजींच्या वाड्यांत असे. तेथें एकंदर तीन-चार शिक्षक असत. एक वर्ग सतारीचा असे. भास्कररावांचें खांसाहेबांकडचें शिक्षण दोन वर्षांहून अधिक काळ केवळ प्राथमिक तयारीचें होतें, असें खुद्द भास्करबुवांनींच ' किर्लोस्कर कंपनी ' बरोबर ते घारापुरीच्या सहलीस गेले असतां सांगितलें. ' किर्लोस्कर कंपनी ' चे अगदीं जुने पेटीवादनकार पांडोबा क्षीरसागर ह्यांनीं त्या आठवणी नमूद केल्या आहेत. त्या त्यांच्याच शब्दांत येथें देत आहें :

" दररोज दुपारीं बहिणीच्या बिऱ्हाडीं जेवायचें व सायंकाळची दशमी-भाजी घेऊन गुरुजींकडे जायचें. गुरुजींचें घर शहराच्या सीमेवर असे. माझे गुरुजी स्वतःच्या मुलास दररोज गाणें शिकवत होते, त्या वेळीं मी तंबोरा वाजवीत होतों. सुमारें तीन वर्षांत मला गुरुजींनीं साधारण रागांची व तालांची माहिती दिली. पूर्वींचे गुरुजी विश्वास बसल्याशिवाय व आपला शिष्य कसोटीस उतरल्याशिवाय आपल्या उंचीउंची चिजा शिकवत नसत. नव्हे, नुसत्या अशा खास चिजा ऐकवीतही नसत. मी चिजा चोरून उतरून

घेत होतों. माझे गुरुजी आपल्या मुलाला शिकवत असतां, मला कांहीं काम काढून बाहेर पाठवत व नंतर आपल्या मुलास भारी-भारी चिजा ऐकवीत. त्या वेळीं मी बाहेर उभा राहून कागदावर शिसपेन्सिलीनें चिजा उतरून घेत असें.

"मे. मौलाबक्ष गवई हे श्रीमन्महाराज सयाजीरावांबरोबर विलायतेस गेले होते. महाराजांच्या कृपेनें व खर्चानें पाश्चिमात्य संगीत-कला ते शिकून आले. नंतर बडोद्यास महाराजांनीं दोन गायन-शाळा स्थापन केल्या. मे. मौलाबक्षांची एक व दुसरी आमच्या गुरुजींची. त्या वेळीं पुढील तीन वर्षांत माझी ग्राहक-बुद्धि पाहून, मला माझ्या गुरुजींनीं पुष्कळच विद्या शिकवली व माझा नंबरही शाळेंत वर असे. आपले विद्यार्थी मे. मौलाबक्षांच्या गायन-शाळेपेक्षां वरिष्ठ व्हावे, ह्या आमच्या गुरुजींच्या ईर्ष्येमुळें मी उत्तम तयार झालों. गायनाचा अभ्यास होतांच, मी माझ्या गुरुजींचा संतोष-पूर्ण आशीर्वाद घेऊन मुंबईस आलों. गवई पेशा स्वीकारला. १८९६ सालीं मुंबईस 'किर्लोस्कर मंडळीं'त भाऊराव कोल्हटकरांनीं माझें गाणें केलें. त्या वेळीं पित्रे वकील तेथें हजर होते."

बुवांच्या तोंडची हकीकत पांडोबा क्षीरसागर पेटीवाले ह्यांनीं जशी लिहिली, तशी निवेदन करतांना चरित्र-कथन एकदम सहा वर्षांचें अंतर तोडून पुढें गेलें. पण बऱ्याच महत्त्वाच्या घटना ज्या क्रमानें ह्या विद्यार्थी-दशेंत घडल्या, त्याच क्रमानें समजून घेतल्याशिवाय पुढें जाणें इष्ट नाहीं. म्हणून पुन्हा आपण चार वर्षें मागें गेलें पाहिजे.

कानडेशास्त्री १८९०-९१ सालांना उद्देशून लिहीत आहेत. ते लिहितात :

"भास्कररावांचें आमच्या परिचयाच्या काळांत वय किती होतें, तें लक्षांत नाहीं. गाण्याचा व्यवसाय, घरची गरिबी, इंग्रजी शिक्षण नाहीं व मराठी शिक्षणही यथा-तथाच असावें. स्वारी वयांत आली. लग्न करायचें, पण मुलगी कोण देणार ? त्यांच्या स्नेह्या-सोबत्यांनीं खटपट केली. पण मुलगी कोणी देईना. भटजी, याज्ञिक, शास्त्री, ज्योतिषी, वैद्य, नाटकी, गवई ह्यांच्या मुलांमुलींचीं लग्नें करणें फार कठीण जातें. तेव्हांचा मनु म्हणजे इंग्रजी शिक्षण, बी. ए., एम्. ए. झालेला मुलगा, मग तो भिकारी का

असेना, असा नवरा-मुलगा हवा असे. भास्करराव हे गवई; अद्यापि गवई म्हणूनही झाले नव्हते; म्हणून लग्न करण्याचें त्यांनीं मनांत आणलें, पण लग्नाचा योग येईना.

" बाळशास्त्री तेलंग हे भास्कररावांचे स्नेही व अत्यंत हित-चिंतक. मित्र ह्या नात्यानें सल्ला दिला, कीं तुम्ही इकडे-तिकडे तुकडे मोडण्यापेक्षां आईला आणून इथेंच बिऱ्हाड करावें. पोटापुरती नोकरी भास्कररावांस होतीच. त्यांनीं आईला आणून ठकारांच्या वाड्यासमोरच बिऱ्हाड थाटलें. ठकारांचा वाडा सूर-सागर तलावाच्या कांठीं असे व बहुतेक ब्राह्मणवस्तीच्या मध्यभागींच भास्कररावांनीं बिऱ्हाड थाटलें. त्या वेळीं त्यांच्या संसाराचा बाजारहाट मलाच करावा लागे. "

ज्याप्रमाणें कानडेशास्त्री हे फैजमहंमदखांसाहेबांच्या विद्यार्थ्यांपैकीं एक असत, तसेच श्री. अनंत शंकर करंदीकर हे दुसरे शिष्य होते. हे भाऊराव कोल्हटकर ह्यांचे भाचे. भाऊराव कोल्हटकरांचे वडील बंधु अप्पाराव कोल्हटकर हेही जुन्या वळणाचे गायक असत. ते गातांना स्वतःच तबला वाजवून लावणी, ठुमरी, वगैरे प्रकार गात. हे गाण्याचे अतिशय मार्मिक जाणकार होते. दांडिया बाजारांतील नीलकंठेश्वराच्या मंदिराच्या आवारांत अप्पाराव व गणपतराव कोल्हटकर राहात. बडोद्याच्या गायन-क्षेत्रांतल्या सर्वांचीच सहज प्रसंगानें भेट व ओळख होऊन भास्करराव शिष्य करंदीकरांसह अप्पाराव कोल्हटकरांच्या गायनाच्या अड्ड्यावर जाऊं लागले. अप्पाराव कोल्हटकरांचें गाणें ऐकावें; इतरही नामांकित गायक-वादक तेथें येत, त्यांचेंही गायन-वादन व चर्चा ऐकावी. ह्या गोष्टींचा फायदा भास्कररावांस मिळे. पुढें-पुढें भास्कररावांचें गाणें हेंच ह्या अड्ड्याचें प्रमुख आकर्षण होऊं लागलें. अप्पासाहेब कोल्हटकरांकडे वे. शा. सं. बाळशास्त्री तेलंग, छोटूमहाराज ध्रुव, भास्कररावांचे एक शिष्य त्र्यंबकबुवा कर्वे, गंगाधरबुवा मांडे, वगैरे मंडळी जमत. मांडेबुवा भास्कररावांची साथ करीत. पुढें ह्याच अड्ड्यावर पंडित ब्रिजलालजींचा बुवांशीं स्नेह जमला. पंडित ब्रिजलालजी हे मौलाबक्षांच्या शाळेंत शिकले, तरी भास्करबुवांची साथ करतां-करतां त्यांचेच भक्त व शिष्य झाले. हा संबंध बुवांच्या मृत्यूपर्यंत टिकला.

खांसाहेबांकडे पंडित गोविंदसिंग ( पुढें हे संन्यासी झाले ), दादासाहेब निगोजकर, रोकडनाथ, राजरत्न दादासाहेब तांबे ( वकील ), श्रीमती हंसाबाई, गणपतराव बर्वे, वगैरे अनेक विद्यार्थी जमले. मौलाबक्षांच्या शाळेपेक्षां फैजमहंमदखांच्या शाळेचें नांव जाणत्या गायक-मंडळींत वरचढ ठरलें आणि भास्कर बखले हा खांसाहेबांचा पट्टशिष्य व सर्वोत्कृष्ट उदयोन्मुख गायक तयार झाला आहे, असा लौकिक चार-पांच वर्षांत संगीत-क्षेत्रांत सर्वत्र प्रस्थापित झाला. वडील जाणत्या लोकांपासून गायन-वादन शिकत असलेल्या सर्व तरुण मंडळींत भास्करचें गाणें हा आदराचा, कौतुकाचा विषय झाला होता. भास्कर बखलेची लोकप्रियता बडोद्यांत त्या वेळीं अतुलनीय होती.

भास्करराव बखले ह्यांच्या आठवणी सांगणारे सर्व लोक त्यांच्या एक-निष्ठ व सर्वांगीण अभ्यासाचें केवळ आश्चर्य-चकित होऊन वर्णन करतात.

बडोद्यांत स्थापन केलेलें बिऱ्हाड, सरकारी शाळेंतली, पंधरा रुपयांची का होईना, नोकरी व भास्करचा वाढता लौकिक, ह्यांमुळें १८९२ सालीं त्यांस आजोळच्या मंडळींच्या ओळखीनें, रा. रामचंद्रपंत देवस्थळी ह्यांची मुलगी वेणू ही सांगून आली. पन्नास रुपये व सात वर्षांची मुलगी वेणू देऊन रामचंद्रपंतांनीं भास्कररावांस चतुर्भुज केलें. बडोद्यांत भास्करचें लग्न नीटनेटकें पार पडलें. त्या वेळीं त्याला विसावें वर्ष पूर्ण होत आलें होतें. त्या काळच्या मानानें त्याचें लग्न फारच उशिरां झालें होतें.

आतां आपल्या विद्येमुळें, कलेमुळें व विवाहित अवस्थेनें सामाजिक प्रतिष्ठेच्या पहिल्या पायरीवर भास्करराव स्थापन झाले होते. आतां उपासमार, अनिश्चितता, वगैरे सर्व दुरवस्था ओलांडून भास्करराव एका भव्य पराक्रमशाली चरित्राच्या पायरीवर येऊन पोंचले. निराधार, किनारा नसलेल्या पाण्यांत पोहण्याची अवस्था मागें पडली होती. त्यांना स्वतःच्या कला-क्षेत्रांतील नवीं-नवीं क्षितिजें आतां दिसूं लागलीं होतीं.

प्रकरण सहावें

# गुरु-कुलांतील आठवणी

ह्या चरित्राचे निर्वेतन ऑडिटर गायनाभ्यासी श्री. वामनराव देशपांडे ह्यांनीं प्रत्येक विधानाला पुरावा म्हणून व्हाउचरची मागणी केल्यामुळें सुसंगत लिहिलेल्या प्रकरणांत अधिक माहितीची भर घालून माझ्या चरित्र-कथेला पाठिंबा देणाऱ्या लिखित विधानांची येथें साक्ष देण्यांत आली आहे. बुवांनीं समाजांत वा कुटुंबीयांस सांगितलेल्या क्वचित् कांहीं घटना लेखी पुरावा नसलेल्या आहेत. परंतु कोठेंही काल्पनिक कथा लिहून चरित्र-नायकाची अतिशयानें स्तुति करण्याचा हेतु नाहीं; वस्तुनिष्ठ निवेदन करण्याची शिकस्त करण्यांत येत आहे. पुनरुक्ति शक्य तों टाळली आहे.

बुवांच्या संबंधितांनीं लिहून दिलेली माहिती कोठल्याही तात्कालिक हेव्यादाव्यानें दूषित नाहीं. बुवांच्या व्यक्तित्वाचा जो खोल ठसा संबंधितांच्या मनावर उमटला, तो त्यांच्याच शब्दांत येथें देण्यांत आला आहे. अर्थात् लोकांच्या आठवणींत जेथें कालविपर्यास, वगैरे कांहीं उणिवा विस्मरणानें

निर्माण झाल्या, त्या मीं इतर विश्वसनीय पुराव्याच्या साहाय्यानें सुधारल्या आहेत.

हे सर्व पुराव्याचे कागद, फोटो, निगेटिव्हज् व बुवांच्या वस्तु ' भारत गायन समाजां 'त बुवांच्या स्मारक-संग्रहांत जपून ठेवण्यांत आल्या आहेत.

बडोदें येथील वकील राजरत्न श्रीमान् दाजीसाहेब तांबे लिहितात, " भास्करराव व मी म्हणजे गुरुबंधु. कारण फैजमहंमदखां ह्यांच्याकडे गाणें शिकण्यास मी बुवांच्याच बरोबर होतों. गुरुजी वयस्क होऊं लागले होते. बसल्या जागेवरून उठून जाऊन, कांहीं व्यवहार करण्याचा त्यांना कंटाळा येऊं लागला. त्यांचें अंग रगडणें, डोक्याला तेल लावणें, वगैरे कामें शिष्यांना करावीं लागत.

" एकदा खांसाहेबांची प्रकृति बरी नव्हती व भयंकर खोकला झाला. रोजची तालीम देण्याचा आळस त्यांनीं केला नाहीं. मध्येंच खोकल्याचा उमाळा आला. त्यांनीं उगा-दान (तस्त) आणण्यास बुवांना सांगितलें. तें कांहीं केल्या सापडेना. खोकल्याचा जोर वाढला व कफ जमिनीवर पडणार तोंच खांसाहेबांनीं बुवांना बोलावून ' भास्कर, यह लेव ' म्हणून बुवांच्या ओंजळींत सर्व इस्टेट टाकली. बुवांनीं तिचा ताबा घेऊन, बाहेर मोरीवर जाऊन, आपली सोडवणूक करून घेतली व परत पलटे घोकण्यास बुवा जागेवर येऊन बसले. गुरु-सेवेचा हा प्रकार मला किळसवाणा वाटला. मीं गाणें सोडलें.

" आपला एके काळचा गुरु-बंधु किळसवाणी सेवा करून गायनाचार्य झाला. बुवांची पूर्वींची स्थिति व नंतरची वैभवशाली स्थिति डोळ्यांसमोर उभी राहिली, म्हणजे बुवांनीं भक्तीनें परमेश्वर-स्वरूप मिळविलें, तें स्वरूप निराळें नाहीं, असाच भास होतो. "

भास्करबुवांचे एक बाल-मित्र बडोद्याचे शंकरराव सप्रे लिहितात, " बडोदें ही बुवांची जन्मभूमि नसली, तरी तपोभूमि होती. त्यांच्या गायनाच्या शिक्षणास सुरुवात बडोद्यासच झाली व मरहूम खांसाहेब फैजमहंमदखां ह्यांचा गाण्याचा लाडका परंतु अंतःकरण हालवून सोडणारा कायदा त्यांनीं

आत्मसात् केला. बुवांच्या गायन-कलेचा आत्मा फैजमहंमदखां ह्यांचा कायदा होता. गायन-कला साध्य करण्यासाठीं बुवांनीं आयुष्याचें रान केलें. "

भास्करबुवांचें शिक्षण पूर्ण झाल्यानंतर फैजमहंमदखांसाहेब ह्यांजकडे अनेक वर्षें तालीम घेतलेले त्यांचे गुरु-बंधु दादाबुवा गणूबोवा निगोजकर लिहितात, " खास गायकीचें शिक्षण खांसाहेब आपल्या मुलाला शिकवत असत, तेंसुद्धा रात्रौं बाराच्या पुढें. बुवा ती तालीम अंधारांत घराच्या बाहेर बसून ऐकत असत. त्याचा त्यांना बराच फायदा होऊं लागला.

" खांसाहेबांच्या जवळ त्यांचे सावत्र-बंधु 'बडेबाबा' म्हणून होते. त्यांना गाण्याची तालीम ऐकून कांहीं फायदा होईल म्हणून त्यांच्यादेखत ते कोणास कांहीं शिकवत नसत. त्यामुळें खांसाहेब स्वतःच्या मुलाला केव्हां शिक्षण देतील हें बुवांना समजायचें नाहीं. ह्याच्यापायीं बुवांना कित्येकदा उपास घडे, कैक रात्रीं झोप मिळत नसे, ऊन-पाऊस-थंडीचा त्रास सहन करावा लागे.

" खांसाहेबांची पिकदाणी धुणें, कपडे धुणें, घरचा भाजीपाला आणणें, वगैरे कामें बुवांना करावीं लागत. ते लोकांकडे वार लावून जेवत. गाण्याची तालीम मिळाल्याशिवाय ते जेवणास जात नसत. त्यामुळें लोकांचीं जेवणें उरकून गेलेलीं असायचीं, परंतु खांसाहेबांच्या ही गोष्ट लक्षांत येऊन, त्यांची कृपा-दृष्टि होऊन, बुवांना जें शिक्षण हवें होतें, तें मिळूं लागलें.

" बुवांना खास फैजमहंमदखांसाहेबांकडून दीडशें ते दोनशें उत्तम ख्याल मिळाले व ठुमऱ्या पण बऱ्याच शिकायला मिळाल्या. घराण्याच्या गायकीचा विशेष म्हणजे मींड, सरळ तान, अस्ताई अंतरे, संपूर्ण व अस्ताईचे खानेखुने भरण्याची प्रेमळ हातोटी व सुरुवातीपासून रंग-देवता हजर, अशी ख्याति होती.

" भास्करबुवा हे खांसाहेबांची संपूर्ण आठवण करून देत. त्यांच्या ढंगानें गाऊन मैफल रंगवीत असत. बडोद्यांत बुवांचीं गाणीं कितीतरी प्रसंगीं ऐकायला मिळालीं. त्या बैठकींतून मुसलमान गायक असत. सर्व आपापल्या परी उत्तम गाऊन जात. परंतु बुवांचा रंग कांहीं औरच !

" बुवा पैशांकरतां नव्हते. बडोद्यांत तर ते पैसे घेतच नसत. आमच्या नीलकंठेश्वराच्या मंदिराच्या आवारांत कै. भाऊराव कोल्हटकरांचे घरांत

कै. अप्पाराव ( भाऊरावांचे बंधु ) व कै. गणपतराव ( दुसरे बंधु ) असे राहात. कै. अप्पारावांना गाण्याचा व तबला-वादनाचा फार षोक. ते स्वतः तबला वाजवून लावणी म्हणत असत. बुवांचा व ह्या मंडळींचा अतिशय घरोबा. त्यामुळें रात्रं-दिवस ह्या देवळांत गायनाचा सुव्यवस्थित कार्यक्रम चालू असायचा. बुवा आले, कीं त्यांत भर पडायची व गांवांतील लोकांना तर बुवांचा मुक्काम असेपर्यंत गाण्याची मेजवानीच मिळायची. ते सर्व दिवस अजून आठवतात.

" बुवा आपल्या ऐन उमेदींत ज्या ज्या प्रसंगीं जें-जें गाऊन गेले, त्याचे पडसाद व त्या लहरी नीलकंठेश्वराच्या भोवतीं अजून घिरट्या घालीत आहेत, असाच मला भास होतो.

" माझें आतां वय झालें आहे, तरी संध्याकाळ झाल्यावर देव-दर्शनाला मी हळू-हळू बाहेर पडतों व तिन्ही देवळांत दर्शन घेऊन पूर्वीं ऐकलेल्या बुवांच्या गाण्याच्या आठवणी करीत घरीं परत येतों. अजून आठवण झाली, कीं बुवांची प्रसन्न मूर्ति डोळ्यांसमोर साक्षात् उभी राहाते व प्रत्यक्ष ते नाहींत, म्हणून रडूं आल्याशिवाय राहात नाहीं.

" बुवांनीं फैजमहंमदखांसाहेबांचा गंडा बांधला होता, परंतु आज-काल गंडा बांधून घेणाराला गंडांतरच येतें, तसें खांसाहेबांनीं केलें नाहीं. म्हणजे पैसा, वगैरे कांहीं घेतला नाहीं. त्यांचा नंबर सर्व शिष्यांत पहिलाच लागेल, अशी माझी खात्री आहे. बुवा खांसाहेबांस भेटायला येत असत, त्या वेळेस पैशांची थैली, जरीचे कपडे, वगैरे खांसाहेबांस अर्पण करीत. बुवा रागदारी, लावणी, टप्पा, वगैरे फार उत्तम गात असत, असें माझें मत आहे व माझे ते गुरु-बंधु आज हयात असते, तर दुनियेला कांहीं अप्रतिम लाभ झाला असता.

" बुवा गुण-ग्राहक होते व दुसऱ्याजवळ जें चांगलें असेल तें प्रेमानें ग्रहण करीत असत. लखनौ येथें कालका आणि बिंदा हे पिता-पुत्र प्रसिद्ध ठुमरी-गायक होऊन गेले. बुवा तेथें गेले होते. बुवांचें गाणें ऐकून कालका-बिंदा फार खूष झाले. त्यांनीं बुवांना अनेक ठुमऱ्या दिल्या. त्यांपैकीं कांहीं बुवांनीं बडोदेंकरांना वेळोवेळीं ऐकवल्या.

"थोडक्यांत, धन्य ते गुरुजी व धन्य ते शिष्य भास्करबुवा!"

स्वामी ब्रह्मानंद कपि ब्रह्मचारी, पूर्वाश्रमींचे पंडित गोविंदप्रसाद गोपाळ-प्रसाद, लिमडी संस्थानच्या राजेसाहेबांचे ए. डी. सी. हे बुवांचे गुरु-बंधु. ते लिहितात,

"खांसाहेबांचे (फैजमहंमदखांचे) पूर्वज हिंदुच होते. त्या संस्कारामुळें व भास्करबुवांच्या सहवासामुळें समर्थ रामदासांचे 'मनाचे श्लोक' ते निरनिराळ्या रागदारींत म्हणत असत. 'मना सज्जना भक्तिपंथेंचि जावें' हा श्लोक तर बडोद्यांत त्यांच्या तोंडून लोकांनीं अनेक प्रसंगीं ऐकला आहे. 'विहरति हरिरिह सरस बसंते', वगैरे अष्टपद्या ते जोड रागांत गात असत व भास्करबुवा बहुतेक बैठकींत त्याचप्रमाणें अष्टपद्या, वगैरे गात असत.

"आमच्या घराण्यापैकीं भास्करबुवानें नाटकांत कांहीं चिजा देऊन, मराठीकरण करून, जनतेला झुलवून सोडलें आहे. त्यांची योजकता फार बहारीची होती. खांसाहेब कांहीं उत्तम सोज गात असत व ते गात असतांना श्रोत्यांच्या डोळ्यांत पाणी उभें राहात असे. भास्करबुवाला कांहीं सोजचें गाणें मिळालें होतें. उदाहरण म्हणजे 'भाई वे तोरी सांवरों' ही 'भैरवी' रागांतील चीज खालीं दिलेल्या सोजवरून केलेली आहे. द्रौपदी परमेश्वराचा धावा करते, अशा करुण प्रसंगीं, बालगंधर्वाच्या तोंडीं सोजवर केलेल्या चिजेचें मराठी पद 'मीं जरि आज केशवा, माधवा गमविलि लाज' हें घालून श्रोतृ-वर्ग रडत ठेवला आहे. हा योगभ्रष्ट गंधर्व (भास्करबुवा) आपला अवतार लवकर संपवून आपल्या निवासस्थानीं गेल्यामुळें जन्मभर आठवण करण्यापलीकडे आपण काय करणार! सोज–भैरवी – (मूळचा सोज)–जबके झिंदामे सखीना को मुकदर लाया ॥ बचपने की जो असि रीती तो दम घबराया ॥ अहो बाबाकी मेरा दम अहे लबोपराया ॥ रो रो चिल्लाईके रैनको अजबघर पाया ॥ (अंतरा) रोई मै राह मेरा अखर तकिया प्यार मुझे ॥ कैदखानेमे तो दिखलाई दिदार मुझे ॥

"भास्कर व मी खांसाहेब फैजमहंमदखां ह्यांच्याकडे शिकत होतों. आमचे खांसाहेब प्रेमळ खरे, पण अतिशय लहरी, करारी व किंचित् रागीट पण होते. त्यांच्या ह्या सर्व वृत्ति संभाळून आम्हांला त्यांची सेवा करावी लागे.

भास्करला व मला खांसाहेबांची सेवा करण्यास कांहींच वाटत नसे. कारण गायनाची विद्या त्यांच्याकडून आम्हांला भरपूर मिळत असे. भास्कर दिवसभर त्यांच्याकडे राबत असे. त्याची अत्यंत गरिबी होती. केवळ लोकाश्रयावर राहून, प्रखर गुरु-सेवा करून, विद्यार्जन करायचें व्रत त्यानेंच पुरें केलें.

" खांसाहेबांची गायकी अत्यंत कठीण, सूर सच्चा, अस्ताई-अंतरे स्वच्छ व कांहीं अजब तर्कीबीचे असत. अडाणा, शंकरा, बहार, बिलावल, तोडी, वगैरे राग आमचे त्यांनीं इतके तयार करून घेतले होते, कीं ते गातांना खांसाहेब साक्षात् उभे राहात. भास्करबुवा जेव्हां-जेव्हां मला भेटत, तेव्हां-तेव्हां खांसाहेबांविषयीं अतिशय उपकारित्व दाखवीत व गातांना " मी त्यांचें प्रथम ध्यान करूनच गातों व त्यामुळें मैफल मला आपलीशी करतां येते. " असें नेहमीं सांगत. त्यांना खांसाहेबांचे बहुतेक राग मिळून गेले व भास्करनें जिवापाड मेहनत करून ज्या नाटक-कंपनींतील लोकांनीं त्यांची हकालपट्टी केली, त्यांच्याकडून ' भास्करबुवा ' म्हणवून घेतलें, ही गोष्ट मला ठाऊक आहे व गुरु-बंधु ह्या नात्यानें मला ती फार अभिमानाची आहे. ' बिहाग ' रागाची अस्ताई " राजनके राजा महाराजा " खांसाहेब फैजमहंमदखां ह्यांनीं आम्हां दोघांनाही शिकवली होती. पुढें मुंबईला गेल्यावर ती चीज म्हणण्यांत थोडा फरक पडला, असें मला वाटतें. कारण आमच्या खांसाहेबां-समोर एकदा तो ( भास्करबुवा ) म्हणत असतां पडलेला फरक त्यांच्या लक्षांत आला. लगेच त्यांनीं मला म्हणायला सांगितलें. मीं त्यांच्याच कायद्यानें चीज म्हटली. त्या वेळीं खांसाहेब बुवांना म्हणाले, ' इतक्या लवकर कायदा कसा विसरलास ? ' नंतर बुवांना मीं पण तोच प्रश्न केला. त्यांनीं उत्तर दिलें, ' फरक मीं कांहीं केला नाहीं, तर चीज जशी मला शिकवली तशीच मीं त्यांच्यासमोर म्हटली. अरे, तुला व मला ही चीज खांसाहेबांनींच वेगवेगळ्या स्वरांनीं शिकवली हें त्यांच्या लक्षांत नाहीं. त्यामुळें हा घोटाळा झाला. ' नंतर माझ्या लक्षांत आलें, कीं खांसाहेब प्रत्येक शिष्याला निरनिराळी गायकी शिकवतात. "

फैजमहंमदखां ह्यांच्या शिष्या बडोद्याच्या गायिका हंसाबाई पटवर्धन लिहितात, " गायकानें रागाच्या प्रत्येक स्वरांत मिसळून जाऊन रस उत्पन्न

केला पाहिजे. तरच तो लोकांना मोहक वाटेल, अशी त्यांची शिकवणूक होती. त्यांची शिस्त फार कडक असे. खाण्यापिण्याचे नियम ते स्वतः पाळत असत व शिष्यांनासुद्धा ते बंधन-कारक असत. त्यांनीं प्रशंसा केलेल्या गवयाचेंच गाणें शिष्यांनीं ऐकावें, अशी त्यांची सांगी असे. कारण शिष्याला चांगल्या गाण्याचा समज येण्यास बराच कालावधि लागतो व न समजतां ऐकलेल्या गाण्याचा वाईट परिणाम शिष्यावर होऊन, घराण्याची गायकी बिघडली जाते.

" माझा जो भेटीचा योग आला त्यांत मला असें आढळून आलें, कीं बुवा अत्यंत करारी, गुरु-भक्ति-परायण व विद्वान् असे असावेत. कारण त्यांच्या चेहऱ्यावर विद्या झळकत होती व कृतींत तर अनेक गुण दिसून येत होते.

" खांसाहेब हयात होते तोंपर्यंत माझ्या आठवणींत त्यांना भेटण्यासाठीं तीन-चार वेळां बुवा आले होते. प्रत्येक वेळीं गुरु-चरणांवर मस्तक लीन करून गुरु-दक्षिणा म्हणून पैशांची थैली अर्पण करीत असत. दोन-तीनशें तरी रुपये त्या थैलींत असतील, अशी माझी खात्री आहे.

" खांसाहेबांच्या सर्व कायद्यांचें पालन बुवांनीं केलें होतें व खांसाहेबांची मनोभावें प्रखर सेवा करून त्यांचा पूर्ण आशीर्वाद मिळवला होता."

रियासतकार नानासाहेब सरदेसाई लिहितात, " इसवी सन १८८९ च्या वर्षारंभास मी बडोद्याच्या नोकरींत दाखल झालों. ह्यानंतर थोड्याच दिवसांनीं महाराजांशीं बोलतां-बोलतां फैजमहंमद बोलून गेले, कीं वाटेल त्या नवशिक्याला मी पंधरा दिवसांत सतार व गायनाची गोडी उत्पन्न करीन.

[ नानासाहेबांचा धाकटा भाऊ मॅट्रिकला बसला होता. परीक्षा झाल्यामुळें तो रिकामा होता. तो भाऊ नारायणराव, फैजमहंमदखां ह्यांजकडे शिकायला जाऊं लागला. पुढें नानासाहेबांचा मुलगा श्यामकांतही जाऊं लागला. त्या दोघांना गाणें शिकण्याचें अनावर आकर्षण खरेंच वाटूं लागलें. महाराजांनीं फैजमहंमद ह्यांची सर्व सोय लावून दिली. खांसाहेबांना वाटलें, सरदेसाई ह्यांच्या वशिल्यानें हें सर्व घडलें. ते कृतज्ञतापूर्वक सरदेसाई ह्यांस वारंवार भेटत. ]

" ते विद्यार्थ्यांचे व माणुसकीचे भुकेले असल्यामुळें त्यांचें निर्व्याज प्रेम पाहून माझे बंधु व शेजारचीं मुलें त्यांजकडे जाऊं लागलीं. हीं सर्व मुलें मला सांगत, भास्करबुवाही वाखाणणी करीत, कीं फैजमहंमदखां खरे कलावंत आहेत. खुद्द खांसाहेबांचा आवाज कांहीं आकर्षक नाहीं, पण शिकवण्याची कला अप्रतिम. मात्र गवई माणसाचे दोषही त्यांच्या ठिकाणीं भरपूर प्रमाणांत होते. अनेक खेपा घालाव्या, रात्र-दिवस जवळ पडून राहावें, केव्हां लहर लागेल तेव्हां खरी. नियमितपणा त्यांस माहीत नव्हता. मात्र लहर लागली, कीं भरपूर पीक पदरांत पडायचें.

" फैजमहंमद अत्यंत प्रेमळ, लीन, मृदु-भाषणी असत. त्यांच्या जिव्हेंत कठोरपणा कसा तो बिलकूल नव्हता.

" भास्करबुवांचे गुरु कशा प्रकारचे होते ह्याची ह्यावरून कल्पना होईल. ते कधींच मरून गेले. त्यांचें नांवही आज कोणास माहीत नसेल. लहानशा खोपटांत, एकटे राहात. एक लहानशी लाकडी खाट, दोरीनें विणलेली, एवढेंच काय तें घरांत सामान. मी गेलों म्हणजे मला त्या खाटेवर बसवीत.

" मुलांनीं आमच्या घरीं केळी लावल्या होत्या. त्यांतल्या एकीला एक घड लागला. मुलांना वाटलें, फैजमहंमदखां आपणास फुकट शिकवतात, त्यांस तो घड द्यावा. मलाही ही कल्पना सुंदर वाटली. निदान सव्वाशें केळ्यांचा तो मोठा घड होता.

" फैजमहंमदना मोठी कृतज्ञता वाटली. त्यांनीं मलाही मुलांसह केळीं खायला बोलावलें. ते म्हणाले, 'मला ना बायको, ना मूल.' शेवटीं मुलें, विद्यार्थी जमवून दुसऱ्या दिवशीं त्या घडावर सर्वांनीं ताव मारला."

[ नानासाहेब सरदेसाई ह्यांस खांसाहेबांच्या गोषांतील पत्नीची व पाळलेल्या मुलाची माहिती नसावी असें दिसतें. ह्या बाबतींत रोज घरांत वावरणाऱ्या विद्यार्थ्यांच्या आठवणी अधिक माहितगारीच्या. ]

भास्करबुवांचें शिक्षण फैजमहंमदखांसाहेबांकडे पांच वर्षांहून अधिक काळ झाल्यावर एक घटना घडली. ह्या घटनेनें भास्करला त्याच्या उत्तर आयुष्यांतील एका गुरुजींची ओळख झाली. श्री. गोविंदराव टेंबे ह्यांनीं ती घटना अलादियाखांसाहेबांच्या चरित्रांत नमूद केली आहे. १८९० सालीं

फैजमहंमदखांसाहेबांची संगीत-शाळा स्थापन होऊन त्यांचा मदतनीस म्हणून शिष्य भास्कर शाळेंत शिकवत असे. आतां फैजमहंमदखांसाहेब गांवांतल्या महत्त्वाच्या गाण्यांनाही भास्करला बरोबर नेऊं लागले होते.

१८९२ चा सुमार असावा. बडोद्यास त्या वेळीं एक नामांकित, अत्यंत षोकी व रसिक असे हकीमसाहेब होते. त्यांच्या घरीं कांहीं धार्मिक सोहाळ्या-निमित्त मजलिस होती. अशा मजलिसींत जमलेल्या सर्वच गायकांनीं भाग घेण्याचा शिष्टाचार असे. ह्याच सुमारास अलादियाखांसाहेब व त्यांचे बंधु हैदरखां हे बडोद्यास येऊन एका सराईत उतरले होते. त्यांना मशिदींतील इमामांनीं हकीमसाहेबांकडील मजलिसीला आमंत्रण केलें असल्यामुळें ते आले होते. राज-गवई मौलाबक्ष, फैजमहंमदखां, भास्कर, वगैरे मंडळी उपस्थित होती. अलादियाखांसाहेबांनीं त्या मजलिसींत एक सलाम म्हटला, अशा सलामांत ताना व पलटे ह्यांना मनाई असली, तरी अलादियांचा तो सलाम ऐकतांच फैजमहंमदखांसाहेबांनीं जाणलें, कीं हे फार मोठे अधिकारी विद्वान् गायक आहेत. चोराचीं पावलें चोरालाच ओळखतात. फैजमहंमद-सारख्या मर्मज्ञ संगीतज्ञानें अलादियांची विद्वत्ता चार आलापांत जाणली.

अलादियाखांसाहेब हकीमसाहेबांच्या प्रेमळ आग्रहामुळें बडोद्यास वर्ष दीड वर्ष राहिले. त्यांच्या अनेक बैठकी झाल्या. फैजमहंमदखांसाहेबांच्या सहवासांत भास्करला अनेकदा अलादियांचें गाणें ऐकायला मिळालें व त्यांच्या गायनांतील अवघड करामतींची तारीफही फैजमहंमदखांसाहेबांच्या तोंडून ऐकायला मिळाली. ह्या तारिफेचें रहस्य समजण्याइतका भास्कर आतां सुजाण झाला होता.

ह्या अलादियांना मौलाबक्षांनीं बडोद्यास सरकारी आश्रय मिळूं दिला नाहीं. म्हणून ते १८९४ सालीं मुंबईच्या एका हकीमसाहेबांच्या आश्रयास जाऊन राहिले.

ह्या जुन्या हकिकती भास्करबुवांनीं सांगितल्या, तशा गोविंदरावजींनीं नमूद करून ठेवल्या आहेत. अलादिया कायम बडोद्यास राहाते, तर भास्करबुवा बडोदें सोडून महाराष्ट्रांत पुण्या-मुंबईस आलेच नसते, तेथेंच शिकत राहिले असते, असा ह्या आठवणींचा सारांश आहे.

हीच इतिहासाची पुनरावृत्ति १८९४ अखेर नथ्थनखांसाहेबांच्या बाबतींत घडली. त्यांनाही बडोद्याच्या राज-दरबारीं मौलाबक्षांनीं आश्रय मिळूं दिला नाहीं. ह्याच काळांत अबदुलकरीमखांसाहेब व त्यांचे बंधु बडोदें सरकारच्या नोकरींत शिरले होते. त्यांचाही मौलाबक्षांनीं टिकाव लागूं दिला नाहीं. पुढें मौलाबक्ष परलोकीं गेल्यावर फैजमहंमदखां हेच सरकारचे गायन-विषयक मुख्य सल्लागार झाले. १९१५ सालीं फैजमहंमदखांसाहेब बरेच वृद्ध झाल्यामुळें त्यांनीं सयाजीरावमहाराजांच्या आज्ञेनुसार आपल्या पसंतीचे प्रसिद्ध गायक फैयाजखां ह्यांची शिफारस केली व ते पुढें दरबार-गायक झाले.

बडोद्याच्या दरबारीं अबदुलकरीमखां हे एक नवीन तयार गवई भास्कर-बुवांचें शिक्षण पूर्ण होण्याच्या सुमारास आले. ते कांहीं राग गातांना तंबोऱ्याची पंचमाची तार तीव्र निषादाची करून गात. ह्या त्यांच्या गायनाचा कसा परिणाम होतो, ह्याबद्दल भास्कररावांनीं पुरुषोत्तमपंत तेलंग व मंगेशराव तेलंग ह्या आपल्या मित्रांशीं चर्चा केल्याची आठवण तेलंगांनीं सांगितली, असें पंडित कपिलेश्वरीबुवांनीं आपल्या ‘ श्रुति-दर्शन ’ ह्या ग्रंथांत नमूद केलें आहे. स्वरांच्या सूक्ष्म स्वरूपाची चर्चा करण्याइतकें ज्ञान भास्करबुवांना त्यांच्या विद्यार्थी-दशेंत झालें होतें, एवढेंच ह्या आठवणींत नमूद झालें आहे.

बडोद्यांत त्या काळीं मौलाबक्ष ह्यांच्या हातीं संगीत-शिक्षणाचीं सर्व सूत्रें होतीं. मौलाबक्षांनीं ठराविक वेळांत पुरा होणारा संगीत-शिक्षण-क्रम, देशी संगीत लिहिण्याची नोटेशन-पद्धति, गायनाभ्यासाचीं क्रमिक पुस्तकें, वगैरे सर्व प्रकारची युरोपीय शिस्त स्वतःच्या शाळेंत प्रस्थापित केली होती. ह्या सर्व शिस्त-शीर कार्य करण्याच्या थाटानें बडोद्यांतील सरकारी अधिकारी व खुद्द राजवाड्यांतील वजनदार मंडळी दिपून गेली होती. गायन-विद्या-प्रसाराचें एक नवें प्रगमनशील युग सुरू होत आहे, अशी बडोद्यांतील जनतेची खात्री झाली होती.

बडोद्याला विद्यांच्या व कलांच्या अभ्यासाला योग्य ती मदत मिळते आणि थोर विद्वान् व कलावंत ह्यांची बूज राखली जाते, असा सर्वत्र लौकिक झाल्यानें, अनेक विद्वान् गवई व नर्तकी बडोद्यांत येत. मौलाबक्षांकडे वशिला लागला, तर सरकार-वाड्यांत अशा गायक-नर्तकांचे कार्यक्रम होत. फैजमहंमदखां-

साहेबही एका सरकारी संगीत-शाळेचे प्रमुख. त्यामुळें त्यांना व त्यांचे मदतनीस भास्करराव ह्यांना अशा सर्व उत्सवांस व जलशांस आदराचें आमंत्रण असलें, तरी महाराज प्रत्येक कलावंताच्या दर्जाबद्दल जाणत्या लोकांत गुप्त तपास करीत व एकंदर विद्वानांचें मत अजमावल्यावरच कलावंतांना सरकारी पुरस्कार मिळे.

फैजमहंमदखांसाहेब स्वतःचा बडेजाव न माजवतां गरिबीनें व लीनतेनें विद्य-दानाचें कार्य करीत होते. सुमारें पंधरा वर्षें आधींपासून बडोद्यांत त्यांचा जम बसलेला होता. फैजमहंमदखां ह्यांचें लीन वर्तन, अनेक सरकारी अधिकाऱ्यांकडून त्यांना मिळणारा मान, ह्या गोष्टींमुळें फैजमहंमदखां ह्यांना कोणाकडूनही उपद्रव होऊं नये, अशी मौलाबक्ष हे चतुर मुत्सद्दी गायनाधिकारी दक्षता बाळगीत. फैजमहंमदखांसाहेबमात्र अशा स्थानिक दरबारी राजकारणांत लक्ष घालीत नसत.

अशांतच आग्रा घराण्याचे एक परंपरागत थोर अधिकार असलेले गवई नथ्थनखां बडोद्यास आले. खानदानी घराण्यांच्या प्रेमादरामुळें ते फैजमहंमदखां आग्रेवाले ह्यांजकडे उतरले व त्यांना आशा होती, कीं बडोद्यांत आपलीही कदर होईल.

बडोद्यांतली त्यांची पहिली बैठक फैजमहंमदखांसाहेबांकडेच झाली. थोर, जुनी विद्या जाणणारी व खानदानी गायकीची प्रेमी, अशीच थोडी निवडक मंडळी गाण्याच्या बैठकीस उपस्थित होती. एका उस्तादाचें, दुसऱ्या उस्तादाच्या घरचें गाणें तें. नथ्थनखांनीं स्वतःच्या कौशल्याची कमाल करून बैठक रंगवली. फैजमहंमदखांसाहेबांचें मन आनंदानें उचंबळून आलें. नथ्थनखां ह्यांची राजवाड्यांत वर्दी लागावी, अशी त्यांनीं व्यवस्था केली. नथ्थनखां ह्यांचें राजवाड्यांतील गाणेंही अतोनात रंगलें. त्याची फैजमहंमदखांनीं भास्कररावांजवळ मनसोक्त स्तुति करून त्यांस म्हटलें, “ भास्कर, मीं तुला माझी विद्या सर्वस्वीं देऊन टाकली. आतां तुला नथ्थनखांसारख्या थोर गायकाच्या गायकींतील जें नवें ज्ञान मिळेल, तें घेऊन स्वतःच्या विद्येचा विकास साधायला हवा. मिळेल तिथून, गाण्यांतलं अधिकाधिक ज्ञान मिळवून, दृष्टि विशाल बनवायला हवी, अशी स्वतःची

प्रगति साधण्याइतका सज्ञान तूं नक्कीच झाला आहेस." गुरुजींच्या बोलण्याचा भास्कररावांनीं आदरपूर्वक विचार सुरू केला.

नथ्थनखांसारख्या बड्या पाहुण्यांचें आदरातिथ्य करण्याचें काम शागीर्द भास्कर ह्याजकडेच होतें. श्रीमंत बड्या माणसाच्या पाहुणचारांत जो औपचारिक परकेपणा असतो, तो ह्या पाहुणचारांत नव्हता. दोन महान् कलाकार गवयांच्या परस्परांबद्दलच्या असीम आदराचा, घरोब्याचा जिव्हाळा ह्या पाहुणचारांत होता. ओघानेंच नथ्थनखांनीं बडोद्यांत आपलें बस्तान कसें बसवावें ह्याची चर्चा झाली. तेव्हां बडोद्यांतील संगीतक्षेत्रांतील सर्व अधिकार मौलाबक्षांच्या हातीं असल्यानें दुसऱ्या विद्वान् गायकास बडोद्यांत फारसा वाव मिळण्यासारखा नसल्यामुळें नथ्थनखांनीं बडोद्यांत न राहातां प्रथम मुंबईस जाऊन नंतर दुसऱ्या कोठल्या तरी नरेशाचा आश्रय शोधावा असा निर्णय करण्यांत आला.

नथ्थनखांनीं ह्याच बडोद्याच्या मुक्कामांत भास्कररावांची तालीम व गाणें ऐकलें. ह्या मुक्कामांत नथ्थनखांचा भास्करशीं परिचय वाढला व भास्कररावांना नथ्थनखांचा लोभ संपादन करतां आला. "पुढेंमागें संधि मिळाल्यास मी अधिक विद्या मिळविण्यासाठीं आपणांकडे येईन, आपण मला शिकवलं पाहिजे." असें सांगून भास्कररावांनीं आपणाला विद्या देण्याचें आश्वासन नथ्थनखां ह्यांजकडून मिळवलें. यथाकाल नथ्थनखां मुंबईस निघून गेले.

नथ्थनखांच्या मागोमाग आपणही मुंबईस जावें असें भास्कररावांना वाटूं लागलें. पण बडोदें ताबडतोब सोडणें कठीण होतें. बडोद्याची नोकरी सोडली तरी स्वतंत्र संसार थाटण्याइतकें पत्नीचें वय नव्हतें. ती अवघी दहा-अकरा वर्षांची. शिवाय मुंबईस स्वतःचा धंदेवाईक जम बसवण्यास किती वेळ लागेल ह्याचाही अंदाज नाहीं. त्यामुळें बडोद्याचें बिऱ्हाड मोडून कायम मुंबईस जाण्याचा विचार तूर्त पुढें ढकलावा लागला.

आतां बडोद्यांत भास्कररावांच्या स्वतंत्र गायनाच्या बैठकी होऊं लागल्या होत्या. अप्पाराव कोल्हटकरांच्या घरची बैठक व इतरत्र मित्र-मंडळींत होणाऱ्या त्यांच्या गायनाचा लौकिक, बडोद्यांतच नव्हे तर मुंबईच्या गायन-

प्रेमी मंडळींपर्यंत पोंचला होता. बडोद्यांत १८९५ सालीं गणेशोत्सवांत बुवांचें अनेक ठिकाणीं गाणें ठरलें होतें. सरकारी उत्सव, समारंभ, वगैरे प्रसंगीं फैजमहंमदखां भास्कररावांसच पुढें करीत. स्वतः तयार केलेल्या अद्वितीय शिष्याच्या तयारीनें फैजमहंमद ह्यांचें हृदय आनंदानें व अभिमानानें फुलत असे.

गणेशोत्सवांतलें एक गाणें कोल्हटकर मंडळींच्या बिऱ्हाडाला लागूनच असलेल्या जागेंत होतें. 'किर्लोस्कर कंपनी' चे मालक व महाराष्ट्राचे आवडते 'भावड्या' ऊर्फ भाऊराव कोल्हटकर गणेशोत्सवासाठीं बडोद्यास बंधूंकडे आले होते. त्यांनीं प्रथम भास्कररावांचें गाणें घरांतूनच दुरून ऐकलें. गाणें त्यांना इतकें आवडलें, कीं सहजच त्यांनीं 'कोण गात आहे?' अशी चौकशी केली. फैजमहंमद ह्यांचे भास्करराव नामक पट्टशिष्य गात आहेत, असें भाऊरावांस समजलें. गाणें रंगूं लागलें. भाऊरावांनीं भास्कररावांचा आवाज ओळखला नाहीं. ती लहानपणची नैसर्गिक गोडी आतां आवाजांत नसली, तरी तो आतां खूपच कसलेला, कल्पनातीत सुरेल व हुकमी बंदिषमध्यें फिरणारा असा झाला होता. भास्कररावांच्या गळ्याचा तो मधुर विलास ऐकून भाऊराव गाण्याच्या बैठकींत जाऊन बसले. त्यांना गाणें उपेक्षून दूर बसणें शक्यच नव्हतें.

भाऊराव बैठकींत गाणें ऐकायला येऊन बसलेले पाहातांच भास्कररावांनीं त्यांना लगेंच ओळखलें. परंतु जुन्या मालकांना नोकरानें आतांच ओळख देण्याची जरुरी नव्हती. त्यांनीं गाणें तसेंच चालू ठेवलें. भास्करराव गायला बसले, कीं ते स्वतःच्याच रंगांत रंगून जात. गाणें कमालीचें रंगलें. शेवटीं भाऊरावांना राहावेना. ते उठून पुढें गेले. ओठावर जुन्या काळाला अनुरूप अशा मिशा, डोक्याला पुणेरी रेशमी पगडी, अशा थाटांतला हा तरुण आपण पूर्वीं कोठें तरी पाहिला आहे, असें त्यांस वाटलें. एक चीज संपल्यावर भाऊराव भास्कररावांजवळ गेले व त्यांनीं त्यांच्या नांव-गांवाची चौकशी केली. "मी भास्कर रघुनाथ बखले. फैजमहंमदखांसाहेबांचा शागीर्द." अशी स्वतःची ओळख भास्कररावांनीं दिली व भाऊरावांस लवून वंदन केलें.

भाऊरावांची आतां खात्री झाली, कीं आठ वर्षांपूर्वी ' किर्लोस्कर कंपनीं 'तून नोकरी सोडून गेलेला तरुण तो हाच. ते एवढेंच म्हणाले, " भास्करबुवा, आतां तुम्हीं असामान्य दर्जा प्राप्त करून घेतला आहे. ' किर्लोस्कर कंपनी ' ही स्वतःचंच घर समजून, जुना स्नेह व ऋणानुबंध कायम ठेवा. जुन्या झाल्या-गेल्या गोष्टी विसरून जा. " आणि त्यांनीं आपलें भर-जरी उपरणें भास्करबुवांच्या खांद्यावर घातलें. बुवांनीं त्याचा आदरानें स्वीकार केला.

भाऊरावांचें तें कळकळीचें बोलणें भास्कररावांच्या अंतःकरणास भिडलें. त्यांनीं भाऊरावांना वचन दिलें, कीं " मी परकेपणा मानणार नाहीं. " त्याप्रमाणें गाण्याच्या बैठकीच्या दुसऱ्या दिवशीं भास्करराव अप्पारावांकडे जाऊन भाऊरावांस भेटले. मुंबईत येतांच कंपनींत गाणें झालें पाहिजे, असें भाऊरावांनीं भास्कररावांकडून वचन घेतलें. भाऊराव मुंबईस परत गेले व त्यांनीं 'भास्करच्या नव्या अवतारा 'चें खूपच लांब-लचक वर्णन कंपनींतील सहकाऱ्यांना ऐकवलें.

नथ्थनखांच्या बडोद्यांतील महिनाभराच्या मुक्कामांत भास्कररावांनीं जें त्यांचें गाणें ऐकलें, त्यांत त्यांना स्वतःच्या विद्येंतील नवीं क्षितिजें दिसूं लागलीं होतीं. आतां स्वावलंबनानें स्वतःचें पराक्रमी जीवित-कार्य करण्याचें वय झालें होतें. स्वतःचा संसार चालवण्याची जोखीम होती. उपासमार नसली, तरी स्वतःचें असें भांडवल म्हणून कांहींच रक्कम पदरीं नव्हती. नथ्थनखां व इतर मुंबईच्या परिचित मंडळींकडे पत्र-व्यवहार करून भास्कररावांनीं मुंबईतील वास्तव्याची योजना ठरवली आणि बडोदें सोडलें. मुंबईस झावबाच्या वाडींत परशुरामपंत बर्वे नामक गवई राहात, त्यांच्या शेजारींच एक खोली घेऊन भास्करराव मुंबईस राहायला आले.

मुंबई हें पराक्रमाचें आगर. स्वतःच्या अंगीं उत्तम कर्तृत्व असलें, तर लौकिकाचें शिखर गांठण्यासारखी सर्वश्रेष्ठ मंडळींशीं स्पर्धा करण्याची संधि मुंबईत मिळते. अशा थोर स्पर्धेत न उतरतां केवळ कष्टानें जगायचें असलें, तरी कष्टाची मीठ-भाकरी देण्यांत मुंबई कसूर करीत नाहीं. बडोद्याची तपोभूमि सोडून, आतेष्टांचा आधार सोडून, भास्कर मुंबईस जाणार हें ऐकून, फैजमहंमदखां मनापासून दुःखी झाले. त्यांचें भास्करवर स्वतःच्या मुलापेक्षां अपरंपार प्रेम होतें.

प्रकरण सातवें

# मुंबईचें स्वागत

१८९५ सालीं भास्करबुवांनीं खांसाहेब नथ्थनखां ह्यांचें गाणें स्वतःचे गुरुजी फैजमहंमदखां ह्यांच्या घरीं व बडोदें दरबारच्या बैठकींत ऐकलें. "माझ्याजवळची सर्वच विद्या मीं तुला गेल्या सात-आठ वर्षांत शिकविली आहे, आतां कलेच्या विकासार्थ तुला नथ्थनखांसारख्या दुसऱ्या थोर गायनाचार्याकडे शिक्षण घेणं हिताचं ठरेल. नथ्थनखां हेही आमच्या आग्रा घराण्याचेच आहेत." असें फैजमहंमदखांसाहेबांनीं भास्कररावांस बोलून दाखवलें. परंतु त्या उपदेशाची अंमलबजावणी करण्यासाठीं भास्कर आपणांस आपल्या उतारवयांत सोडून जाणार हें ठरतांच, फैजमहंमदखांसाहेबांस फार दुःख झालें. अनेक शिष्यांना शिकवलें, तरी स्वतःचें नांव उज्ज्वल करील असा एकच पट्ट-शिष्य भास्कर, हा उत्तम गायक तयार झाला. बडोद्यांत शाळा चालवण्यास मुख्य आधार भास्करचा, तो आतां बडोदें सोडून जाणार म्हणून फैजमहंमदखांसाहेब अतिशय अस्वस्थ झाले, नाराज झाले. हा प्रवाद मुंबईच्या संगीत-प्रेमी

लोकांनींही ऐकला होता, असें तत्कालीन आठवणी लिहिणारे भास्करबुवांचे भक्त-शिष्य पित्रे वकील ह्यांनीं नमूद करून ठेवलें आहे.

गायनविद्येचा पुढील अभ्यास करण्यासाठीं नथ्थनखांकडे मुंबईस जाण्यापूर्वी भास्कररावांनीं गुरु फैयाजखांसाहेबांचा आशीर्वादपूर्वक निरोप घेतला आणि नंतर बडोद्यांतलें स्वतःचें बिऱ्हाड मोडून ते वडील बंधु विसनगर येथें राहात, तिकडे गेले. आई व पत्नी ह्यांना बिसनगरला बंधूंकडे ठेवून मग ते मुंबईच्या मार्गाला लागले.

बडोद्यास आईच्या हातीं बिऱ्हाड होतें. आई थोरल्या मुलाकडे ( त्र्यंबक ) वर्षांतून दोन-चारदा जात असे. कसेंही असलें तरी बडोद्यांत वडील बहीण व आई ह्यांचा आधार होता. गांवचे अनेक वरिष्ठ अधिकारी, विद्वान् व कला-प्रेमी लोक भास्कररावांकडे येत. क्वचित् गांवच्या एखाद्या उत्सवांत गाणें झालें, तर तत्कालीन रिवाजाप्रमाणें, धोतर-जोडी, उपरणें, वगैरे वस्तु मिळत. सरकारी नोकरीच्या पंधरा रुपयांत किरकोळ दहा-पांच रुपयांची दरमहा भर पडे. गरिबीची मीठभाकरी खाऊन भास्करराव अहोरात्र गुरुजी फैजमहंमदखांसाहेबांच्या सेवा-शुश्रूषेंत मग्न असत. मुंबईस जातांना भास्कररावांजवळ बरोबर नेण्यासाठीं पुंजी कसलीच नव्हती. मुंबईत कोणी आतेष्टही नव्हते.

भास्कररावांचें अगदीं विद्यार्थी-दशेंतलें गाणें ज्यांनीं पूर्वी बडोद्यांत ऐकलें होतें, ते सरसुभे गजाननराव भाटवडेकर ह्यांचे बंधु डॉ. भालचंद्र कृष्ण हे १८७५ ते १८८५ सालापर्यंत बडोदें सरकारचे वैद्यकीय सल्लागार होते. गजाननराव व डॉ. भालचंद्र कृष्ण हे दोघे बंधु भास्करच्या गोड गाण्याचे मोठे चाहाते होते. डॉ. भालचंद्र ह्यांनीं बडोदें सोडल्याला दहा वर्षें झालीं होतीं. आतां बरोबर दहा वर्षांनीं मुंबईत भास्करराव त्यांना भेटायला गेले. तेव्हां भास्कर हा भास्करबुवा बनून आपल्याला मुंबईत भेटायला आला म्हणून त्यांना अतिशय धन्यता वाटली. डॉ. भालचंद्र ह्यांचे मित्र व साहाय्यक श्री. शांताराम नारायण हे संगीताचे शोकी. त्यांचा मंगेशराव व पुरुषोत्तमराव ह्या तेलंग बंधूंशीं फार स्नेह. हे तेलंग बंधु सयाजीरावमहाराजांच्या निकट सहवासांतले असल्यामुळें भास्कररावांचा लौकिक त्यांच्या कानांवर होता.

विद्यार्थीदशेंतच भास्करची तीक्ष्ण बुद्धि, स्वर-ताल-चिकित्सा व अत्यंत सूक्ष्म कारागिरीचे बारकावे हस्तगत करणारा अभ्यास, ह्या गोष्टी चर्चेंत ऐकून तेलंग बंधु मुग्ध होत. एक महान् प्रभावी गवई बडोद्यांत तयार होत आहे, अशी तेलंग बंधूंनीं मनाशीं खूणगांठ बांधून ठेवली होती. त्यामुळें ते भास्करला मुंबईंत भेटायला उत्सुक होते.

पुरुषोत्तमराव तेलंग हे अष्टपैलू कलाकार होते. ते नख-चित्रें, रेखा-चित्रें काढीत. त्यांनीं पुढें आंतरराष्ट्रीय लौकिक ह्या कलेंत मिळवला. तेलंग बंधु हे संस्कृत भाषेंतलेही गाढे विद्वान् असले, तरी बीन-वादन, सतार वादन, गायन-विद्येंतील गूढ सूक्ष्म स्वर-ताल-विचार, ह्यांत सदैव रमलेले असत. ‘ संगीत रत्नाकर ’ ह्या ग्रंथाचें चिकित्सापूर्वक वाचन त्यांनीं केलें होतें. उत्तरेचे अनेक वादक व गायक ह्यांच्या मैफली ऐकण्यासाठीं त्यांनीं खास प्रवास केलेला होता. अनेकांचे गंडे बांधून विद्या हस्तगत केलेली होती. ग्वाल्हेर, बडोदें, दिल्ली, आग्रा, ह्या गायन-विद्येच्या केंद्रांत तेलंग बंधु अतिशय मान्यता पावले होते.

१८९५ च्या सुमारास तेलंग बंधु मुंबईंत होते. तेथेंही सर्व गायन-प्रेमी व विद्या-व्यासंगी लोकांशीं त्यांनीं जिव्हाळ्याचें नातें जोडलेलें होतें. भास्करराव बखले लवकरच मुंबईस नथ्थनखां ह्यांजकडे अधिक शिक्षण घेण्यासाठीं बडोदें संस्थान सोडून येत आहेत अशी बातमी मुंबईच्या गायन-वादन प्रेमी मंडळींत आधींच पसरली होती.

मुंबई हें तेव्हां विकसनशील संस्कृतीचें व इंग्रजी राजवटीच्या कारभाराचें प्रमुख केंद्र होतें. उद्योग-धंदे, व्यापार, शिक्षण ह्या सर्वच क्षेत्रांत मुंबईचें पाऊल वेगानें पुढें पडत होतें. इतर ललित-कलांचेंही मुंबई हेंच प्रमुख केंद्र बनलें होतें. स्थापत्य, शिल्प, चित्र, कारागिरी, वगैरे सर्वच विषयांचीं महाविद्यालयें सर जमशेटजी, नाना शंकरशेट, वगैरे मंडळींनीं स्थापून चाळिसांहून अधिक वर्षांचा काळ लोटला होता. मुंबईंत नाटकाचा नवा व्यवसाय गुजराथी, हिंदी, उर्दू व मुख्यतः मराठी भाषेच्या लोकांत लोकप्रिय होऊन, त्या धंद्याच्या आश्रयानें नाच, गाणें, वगैरे कलांना एक नवी चालना मिळाली होती. व्यवसायांचा विकास होऊं लागला म्हणजे विद्या-कलांच्या

तात्त्विक विकासाचा मार्ग दिसूं लागतो. फोनोग्राफ, हार्मोनियम, वगैरे नवीन साधनें बाजारांत आलीं होतीं.

संस्थानिकांपेक्षांही श्रीमंत असा व्यापारी-वर्ग मुंबईत निर्माण होत होता व त्याच्या आश्रयानें जगणाऱ्या कलावंत स्त्रियांच्या शिकवण्या मिळवण्यासाठीं अनेक विद्वान् गायक उत्तरेकडून मुंबईत येत होते. अशा गायकांचे सार्वजनिक जलसे होत असत.

१८९५ ते १९०५ पर्यंत भास्करबुवा मुंबईतच बहुतेक काळ राहिले. त्या काळचें मुंबईचें गायन-वादनाचें वातावरण, त्या काळाची पूर्वपीठिका व मुंबईनें भास्करबुवांचें केलेलें उत्सुक स्वागत, ह्यांबद्दल बुवांच्या स्नेह्यांनीं व नंतर शिष्य बनलेल्या दोन-तीन सद्‌गृहस्थांनीं लिहिलेल्या आठवणी त्यांच्याच शब्दांत उद्‌धृत करणें इष्ट वाटतें. त्यांत महत्त्वाचा इतिहास आहे.

किर्लोस्करांच्या नाटकांतील पदें म्हणून गायनाचा नाद लागलेले धारवाडचे वकील श्री. त्रिं. का. पित्रे, २८-१२-४३ रोजीं लिहितात, "१८८३ सालीं कोल्हापुरीं राजाराम हायस्कुलांतील गायन-क्लासांत कै. केशवबुवा गोगटे ह्यांच्याकडे (माझ्या) शास्त्रीय गायनाचा ओनामा झाला. १८८४ सालीं पुनः मुंबईला परत आल्यानंतर मुंबईतील नातूंच्या गायन-क्लासांत, कै. साजापूरकरबुवा, पंढरपूरकरबुवा, वगैरेंकडे आणखी कांहीं चिजा शिकण्यांत आल्या. आमच्या सुदैवानें तो क्लास चालूं लागून त्यावर कै. परशुरामबुवा बर्वे ह्या त्या वेळच्या सुप्रसिद्ध गवयांची शिक्षकाच्या जागीं नेमणूक झाली. त्या क्लासांत माझ्याबरोबर कै. गणपतराव मणेरीकर, ड्रॉइंग मास्तर हेही शिकत असत.

"कै. परशुरामबुवा दिवंगत होऊन चाळीस वर्षांहून अधिक वर्षें होऊन गेल्यानें, अलीकडच्या गायन-प्रेमी जनांना त्यांचें नांव माहीत नसणें स्वाभाविकच. पण ते हयात असतांना त्यांच्या वेळीं मुंबईत जे कांहीं प्रसिद्ध गवई व गायन-शिक्षक होते, त्यांत त्यांची गणना होती.

"उत्तर हिंदुस्थानांत अत्यंत सुप्रसिद्ध होऊन गेलेले वादनाचार्य कै. नानासाहेब पानसे ह्यांच्याकडे ते (परशुरामबुवा) पखवाज शिकले होते, व कै. विष्णुपंत छत्रे ह्यांच्या शिष्य-वर्गापैकीं ते एक पहिल्या नंबरचे गायक

होते; अर्थात् त्यांची गायकी हद्दूखां ह्यांच्या घराण्यापैकीं. त्या वेळच्या मुंबईतील, बापूतारा, कृष्णी कोल्हापूरकरीण, हिराबाई पेडणेकर, वगैरे नांवाजलेल्या गायिकांना ते शिकवत असत. तसेंच श्री. कागलकरांच्या तैनातींत असलेल्या व पुढें गायनसम्राट अलादियाखां ह्यांच्याकडे शिक्षण घेऊन केसरबाईच्या जोडीच्या झालेल्या कै. तानूबाई घोरपडे ह्यांनाही परशुरामबुवांनीं पहिल्यापासून बरींच वर्षें शिकवलें."

पुढें नातूंचा क्लास आर्थिक व इतर अडचणींनीं संपुष्टांत आल्यामुळें आपण परशुरामबुवांच्या घरींच शिक्षण घेऊं लागलों अशी माहिती देऊन श्री. पित्रे लिहितात, "कै. परशुरामबुवांना चिजांचा संग्रह करण्याचा फार हव्यास. त्यांच्याकडे त्या वेळच्या सर्व प्रचलित रागांतील चिजा, तराणे, ठुमऱ्या, अष्टपद्या, पदें, भजनें, वगैरेंचा फार मोठा व व्यवस्थित स्वरूपाचा भरणा होता. कै. गायनाचार्य गुरुवर्य भास्करबुवांचा परिचय होण्यापूर्वींच त्यांनीं मला तो संग्रह देऊन टाकून अत्यंत ऋणी करून ठेवलें होतें. कै. परशुरामबुवा असे अत्यंत निःस्वार्थी, प्रेमळ व उदार बुद्धीचे होते. गायनविद्येंत त्यांच्याहूनही वरचढ व बहुरंगी असे भास्करबुवा ह्यांच्याशीं माझा परिचय होण्यापूर्वींची माझी गायनविद्येच्या बाबतींतील परिस्थिति अशी होती.

"१८९१ सालीं मे महिन्यांत मुंबईतील फ्रामजी कावसजी हॉलमध्यें मरहूम खांसाहेब गुलामअब्बास व त्यांचे शिष्य नथ्थनखांजी ह्यांचें वरिष्ठ दर्जाचें गाणें ऐकण्याचा प्रथमच प्रसंग आला व त्यानंतर कै. शामराव विठ्ठल ह्यांच्याकडे व इतर एक-दोन ठिकाणींही त्यांना ऐकलें.

"त्याच सालीं जुलै महिन्यांत मरहूम बंदेअल्लीखां ह्यांचा बीन व चुन्नाजी ह्यांचें अतिमनोहर व रसपूर्ण गाणें ऐकण्याचा प्रथमच योग आला. अशा प्रकारें गाण्याचा नाद वाढत चालला असतांना सुप्रसिद्ध श्रीयुत मंगेशरावजी तेलंग, अनेक-विद्या कोविद व संगीत-शौकिन बीनकार ह्यांची ओळख होऊन त्यांच्याकडे गाण्याची चर्चा व बैठकी चालू असतां सन १८९५-९६ च्या सुमारास प्रो. भास्करबुवा बखले, कडी प्रांत, तालुका विसनगर येथून मुंबईकडे येऊन राहाणार असल्याची बातमी कै. पुरुषोत्तमरावजी व मंगेशरावजी तेलंग ह्यांच्याकडून ऐकण्यांत आली होती व त्यांच्या गायन-नैपुण्याची

तारीफही जाहीर होती. तेव्हां आमच्यासारख्या नादिष्ट व गान-लोलुप लोकांना त्यांच्या येण्याचा ध्यास लागावा व त्यांच्या भेटीची आतुरता उत्पन्न व्हावी, हें अगदीं स्वाभाविकच. मरहूम फैजमहंमदखांसाहेब ह्यांच्या अस्ताई-अंतरे म्हणण्याच्या पद्धतीसारखी बांधेसूद, रसीली व मनोवेधक पद्धति इतर घराण्यांतील गुणी जनांत असल्याचें ऐकिवांत नाहीं, असेही उद्गार श्री. तेलंग ह्यांच्या बैठकीच्या वेळीं निघत. तेव्हां स्वाभाविकच गुरुवर्य भास्करबुवा मुंबईला केव्हां येतात व त्यांचे अस्ताई-अंतरे आम्ही केव्हां ऐकतों, अशाविषयीं मला व गुरुवर्य परशुरामबुवांना चुटपूट लागून राहिली.

" ह्या वेळीं परशुरामबुवा ठाकुरद्वारीं झावबाच्या वाडींतील एका चाळींत राहात होते. त्या चाळीच्या जवळच एका बंगलींतील दिवाणखान्यांत बाळोबा पेटीवाले ह्यांचें पेटी-वादन होत असे. परशुरामबुवा व इतर मंडळी ह्यांची बऱ्याच वेळां तेथें गाण्या-बजावण्याची बैठक होत असे. भास्करबुवांच्या राहाण्याच्या ठिकाणाची माहिती काढून, त्यांना भेटून व विनंती करून एकदा घेऊन या, असें सांगितल्यावरून परशुरामबुवा त्यांना आदरपूर्वक घेऊन आले.

" भास्करबुवांचा तो तरतरीत चेहरा, चमकदार डोळे व विद्येचें तेज ह्यांमुळें त्यांच्याविषयीं विशेष आदर उत्पन्न होऊन आम्हीं त्यांचें स्वागत केलें. नंतर बुवांच्या (परशुरामबुवा) इच्छेनुसार थोडेंसें पेटी-वादन व दोघांचें थोडेंसें गाणें झाल्यावर आणखी एक-दोन चिजा ऐकवण्याविषयीं मीं व परशुरामबुवांनीं भास्करबुवांना विनंती केली. भास्करबुवा हे खरे गुणी, दिलदार य मोकळया मनाचे. त्यांनीं ताबडतोब तंबोरा आपल्या स्वराशीं व पेटीशीं जुळवून आणि कांहीं आढे-वेढे न घेतां, ' गौडसारंग ' रागांतील ' संयो ने मेरे ' व ' यार नजर नही ' ह्या दोन चिजा आलापादि प्रकारांनीं गाऊन तंबोरा बंद केला. तो अस्ताई-अंतऱ्याचा प्रकार आम्हांला कांहीं अपूर्वच वाटला. अस्ताई-अंतऱ्याचा इतका ढंगदार, सुंदर, रसीला व बांधेसूद उठाव आणि मिलाफ ह्यापूर्वी आमच्या ऐकण्यांत नव्हता. अस्ताई-अंतऱ्याची ती मनोहर पद्धति व अस्ताई-अंतरा भरण्याची ती रंगदार व शिस्तवार पद्धत मनांत भरून आम्हा सर्वांना त्यांच्याविषयीं मोठा

आदर वाटला. आमच्या हिंदूंतसुद्धा मुसलमान गवयांनाही जड वाटणारा व खालीं पाहायला लावणारा. गुणी जवान असल्याबद्दल मोठा अभिमान उत्पन्न झाला. त्या माडीवर, त्यांच्या घरीं, श्री. मंगेशराव तेलंगांच्या दिवाणखान्यांत त्यांच्या-आमच्या भेटी होऊं लागल्या व पूरिया, धनाश्री, पूर्वी, गौरी, हमीर, छायानट, बहार, बागेसरी, अडाणा, मालकंस, वगैरे अनेक प्रचारांतील रागांतील तयारीला चढलेल्या चिजांची चित्ताकर्षक ठेवण व त्यांचा विस्तार करण्याची रसभरित पद्धति पाहून, त्यांच्या गाण्याच्या ढंगाविषयीं मनांत फार आवड उत्पन्न झाली."

दुसरे शिष्य नाना ठोसर (ठोसरस्वामी) ह्यांच्या आठवणींतील उतारे—

" कै. भास्कर रघुनाथ बखले ऊर्फ योगभ्रष्ट एक गंधर्व ह्यांच्याबद्दल माहिती व आठवणी पाठविण्याबद्दल मास्टर कृष्णा ह्या सहीनें एक विनंती-पत्र मला ७-१२-४३ रोजीं पोस्टानें मिळालें. मजकूर वाचून मला प्रत्यक्ष बुवासाहेब भेटले, अशी भावना होऊन, अवर्णनीय आनंद झाला. अंतःकरण भरून आलें व उशिरां कां होईना, अशा सत्पुरुषाच्या चरित्र-लेखनाची स्फूर्ति जागृत झाली, ह्याबद्दल परमेश्वराच्या अतर्क्य अशा लीलेचें कौतुकच वाटलें.

" सुमारें १८९५ सालीं 'श्रीपाद संगीत समाज' ह्या नांवाची एक गायन-वादन संस्था मुंबई येथें रामवाडीच्या नाक्यावर स्थापन झाली होती. चालकाचें नांव आठवत नाहीं, पण त्यांचा रामचंद्र ह्या नांवाचा मुलगा मुंबईमध्यें बरेच दिवस दिलरुबा, सतार, वगैरेच्या शिकवण्या करीत असे. ह्या वरील संस्थेंत एकदा गायन चाललें असतां, अकस्मात् मी व माझे एक गायन-प्रेमी स्नेही कै. नाना गाडगीळ रस्त्यावर उभे राहून गाणें ऐकत होतों. त्यावेळीं बुवासाहेबांची कांहींच माहिती नव्हती. परंतु बुवांनीं 'गोपाला मेरी करुणा' ही चीज म्हटली, ती ऐकून माझी चित्ताकर्षक स्थिति झाली.

" चार-पांच वर्षांनीं रा. नाना गाडगीळ ह्यांच्यामुळें बुवांच्या प्रत्यक्ष परिचयाचा योग आला.

" पुढें बडोद्याचा शिक्षण-क्रम संपवून मुंबईस आल्यावर त्यांचा परिचय परशुरामबुवा बर्वे ह्यांच्याशीं झाला. बडोद्याहून येतांना त्यांच्यावर गुरूंची कांहीं कारणामुळें अवकृपा झाली, असें सांगण्यांत येई.

" बर्वेबुवा अत्यंत धार्मिक, स्नानसंध्याशील देवपूजा, वगैरे गोष्टींत प्रेमी असे असल्यामुळें, त्याविरुद्ध गोष्टींत बुवांचा व चरित्र-नायकाचा परिचय तुटला. पुढें थोड्याच काळांत बर्वेबुवा दिवंगत झाले. बखलेबुवांना मुंबई मुक्कामापर्यंत संतति-लाभ नव्हता. पुढें एक मुलगी झाली असें वाटतें.

" बुवांच्या वेळीं मुंबईमध्यें एक रसिक श्रोता असे. त्या व्यक्तीचें नांव रा. पुरुषोत्तमराव तेलंग. ही व्यक्ति मैफलींत पुढें बसली, कीं रंग-देवता हजर. त्यांचे बंधु मंगेशराव तेलंग हे बीन-कार; व्यवसाय सरकारी नोकरीचा. त्यामुळें रविवारींच तेलंगांच्या घरीं ( गाण्याच्या मैफलीचा ) हा योग येत असे. मलाही दोन-चार वेळां श्रवणाचा लाभ झाला; बुवांच्या पेटंट चिजा म्हणजे — माझ्या ऐकण्यांतल्या – ' अडाण्यां ' तील ' मुंदरी मोरी का ', ' अल्लासाहेब ', ' जो पिया मोरे, आन ', ' तोरे नयन लगाव ', ' बाकीरे सुरत ', ' तिलक कामोद ', ' गोपाला मेरी ', वगैरे, वगैरे.

" मला तत्कालीन चार-पांच मुसलमान गवयांचें गाणें ऐकण्याचा सुयोग आला. अलीहुसेन, रहिमतखां, निसारहुसेन, नझरखां व अगदीं अलीकडील अब्दुलकरीमखां ... मीं थोडेंच ऐकलें पण चांगलें ऐकलें व चिर-स्मरणीय ऐकलें. परंतु बुवांच्या गायकीची जी गोडी लागली, त्यामुळें दुसऱ्या कोणाकडेच मन रमेना.

" पुष्कळ वेळां आपण पाहातों, कीं गवय्यांच्या अंगीं, विचित्र अंगविक्षेप, तोंड वेडें-वाकडें होणें, मुद्रा क्रूर, आदळ-आपट, वाणी अशुद्ध, इत्यादि दोष असतात. आणखी एक दोष राहिला, तो हा, कीं समेवर येतेवेळीं अधरासन होऊन खालीं आदळणें. ह्यांपैकीं एकही दोष आमच्या चरित्र-नायकाच्या ठिकाणीं नव्हता. उलटपक्षीं गायन भरांत आल्यावर, रंग-देवता प्रसन्न झाल्याचीं चिन्हें बुवांच्या चेहऱ्यावर दिसून त्यांचा चेहरा एखाद्या प्रफुल्लित गुलाबाच्या फुलाप्रमाणें दिसत असे. "

भास्करबुवा ह्या नवीन गवयाचें मुंबईनें उत्सुकतेनें स्वागत केलें व पुढील पंधरा वर्षें त्यांचा जीवन-क्रम एकसारखा विकास-क्षम व आनंदाचा गेला.

प्रकरण आठवें

# विद्यार्थी व धंदेवाईक

नथ्थनखां ह्यांजकडे शिक्षण घेण्याचें ठरवूनच भास्करराव मुंबईस आले. स्वतःचें पोट भरून व बिऱ्हाड करण्याइतका धंद्यांत जम बसवूनच ह्यापुढचें शिक्षण घेणें अवश्य होतें. नथ्थनखांनीं भास्कररावांस शिकविण्याचें वचन दिलें होतें. त्याप्रमाणें शिकवणीचा मेहेनताना कितपत मिळेल हा विचार कमी महत्त्वाचा मानून त्यांनीं तालीम सुरूही केली.

नथ्थनखां जसे गायनांत चतुर होते, तसेच ते व्यवहार-चतुरही होते. मुंबईतील गायन-क्षेत्राची कल्पना येतांच त्यांनीं कोठेंतरी राजाश्रय मिळविण्याचें मनाशीं ठरविलें आणि एकाच वर्षांत मुंबई सोडली. दसऱ्याच्या महोत्सवांत म्हैसूर दरबारचें त्यांनीं आमंत्रण मिळविलें. पुढें दरबार-गवई म्हणून म्हैसूरला त्यांची नेमणूकही झाली. पण त्यांनीं स्वतःचें स्वातंत्र्य टिकावें म्हणून फक्त दरबारी आमंत्रण असेल तेव्हांच म्हैसूरला जावें, इतर वेळीं धारवाड येथें राहावें, अशी दरबारांतून व्यवस्था करून घेतली.

नथ्थनखां ह्यांच्या शिक्षणाचा अखंड लाभ स्वावलंबनानें जगतां येऊन व्हावा, ह्यासाठीं भास्कररावांस अनेक खटपटी कराव्या लागत. पुणें-मुंबई भागांत मिळतील तितक्या मैफलींचीं आमंत्रणें मिळवावीं व जमतील त्या पैशांत जेमतेम नथ्थनखां ह्यांची शिकवणी व उदरनिर्वाह भागावा, अशी परिस्थिति होती. त्यामुळें सुरुवातीस आई व पत्नी ह्यांना खर्चासाठीं पैसे पाठविणें क्वचितच जमे.

स्थिति कितीही अडचणीची असली, तरी त्या काळची एकंदर स्वस्ताई व साधी राहाणी, ह्यांमुळें हा काळही भास्कररावांनीं धीरानें कंठला. ह्या काळांत भास्कररावांच्या मैफली ऐकल्याचें वृत्त अनेक आठवणींत आलें आहे. ह्या मैफलींसाठीं भास्करराव मुंबईंत येत, परंतु वर्षांतील अनेक महिने ते नथ्थनखांचा मुक्काम जेथें असेल, तेथें जाऊन राहात. कधीं म्हैसूरला जाऊन राहावें लागे, तर कधीं धारवाडला. अशीं दोन-तीन वर्षें गेलीं. झावबाच्या वाडींतली खोली त्यांनीं सोडून दिली.

पुढें भास्करराव मुंबईस आले, तर सर भालचंद्र भाटवडेकर ह्यांच्याकडे त्यांचे पाहुणे म्हणून राहात. ह्या थोड्या मुक्कामांतही त्यांचा मित्र-परिवार व शिष्य-परिवार वाढत राहिला असें दिसतें.

मुंबईस त्या काळीं दरसाल चार महिने प्लेगचा उपद्रव होई. १८९६ चा दुष्काळ तर महाराष्ट्रांत सर्वांनाच असह्य झाला होता. अशा परिस्थितींत गायनासारख्या धंद्याला स्थैर्य लाभण्याइतपत सुखासमाधानाचा तो काळ नव्हता. भास्करबुवा गात त्या दर्जाचें गाणें ऐकणारा वर्गही त्या काळीं मुंबईत अगदीं मर्यादित होता. त्यामुळें भास्कररावांना मुंबईत स्थिर न होतां विद्येसाठीं इतरत्र जाऊन कां राहावें लागे, ह्याची संगति सहज लागते.

भास्करबुवा गात त्या दर्जाच्या ख्याल-गायकीचा अल्पसा परिचय मुंबईकरांना ह्यापूर्वी झालेला होता. १८८२ सालीं, बाळकृष्णबुवा इचलकरंजीकर आपले ग्वाल्हेरचें शिक्षण पूर्ण करून सुमारें दीड-दोन वर्षें मुंबईस येऊन राहिले होते. त्यांच्याच प्रेरणेनें, मुंबईत ( फणसवाडींत ) एक गायन समाज स्थापन झाला होता. महादेव चिमणाजी आपटे, विश्वनाथ नारायण मंडलिक, शांताराम नारायण, आदि मुंबईचे थोर पुढारी ह्या समाजाच्या पुरस्कर्त्यांत

असून वासुदेवराव कानिटकर हे त्या समाजाचे चिटणीस होते. 'संगीत दर्पण' हें मासिकही ह्या समाजानें कांहीं काळ चालविलें. प्रतिष्ठित समाजांत तिरस्करणीय मानलेल्या गायन-वादन विषयाला विद्वान् लोकांचें सहकार्य लाभून त्या कलेच्या तात्त्विक विचारासही चालना मिळाली होती. 'संगीत रत्नाकरा' सारख्या संस्कृत ग्रंथाचाही अभ्यास सुरू झाला होता.

ह्या नवीन जागृतीचें पर्यवसान म्हणूनच बडोद्याच्या मौलाबक्षांचे एक बंधु मुंबईस आंग्रेवाडींत येऊन राहिले होते. ते गाण्या-बजावण्याच्या शिकवण्या करीत. सुप्रसिद्ध सर्कसवाले व ग्वाल्हेर घराण्याचे संगीतज्ञ विष्णुपंत छत्रे ह्यांजबरोबर रहिमतखां असत. तेही गिरगांव बॅकरोडवर (हल्लींचा विठ्ठलभाई पटेल रोड) एका प्रशस्त बंगल्यांत राहात. विष्णुपंतांनीं ह्या काळीं मुंबईत कांहीं शिष्य शिकवून तयार केले. त्यांपैकीं परशुरामपंत बर्वे ह्यांचा उल्लेख ह्यापूर्वींच आला आहे. नातू ह्यांच्या गायनशाळेचाही उल्लेख झाला आहे. परंतु शिक्षकांचा पगार, वाद्यें, वगैरे खर्च भागण्याइतकें उत्पन्न ह्या शाळेस होत नसे. कारण गायन-वादन शिकणाऱ्या विद्यार्थ्यांस शाळेची फी देण्याची ऐपत क्वचितच असे.

धनाढ्य पारशी मंडळींनीं ताडदेव भागांत 'कलोत्तेजक समाज' स्थापन केला. तेथें रावजीबुवा बेलबागकर ह्यांची मुख्य गायन-शिक्षक म्हणून नेमणूक झाली होती. हे रावजीबुवा मूळचे दक्षिण हैद्राबादचे. ह्याचें शिक्षण ध्रुपद्-गायकीचें होतें. त्यांच्याजवळ त्या पारशी समाजांत संगीताचार्य पंडित विष्णुपंत भातखंडे ह्यांनीं अनेक वर्षें शिक्षण घेतलें.

गायन-वादनाच्या शिक्षणाची अशी सुरुवात मुंबईत झाली असली, तरीं एकंदर समाजांत गायनविद्येबद्दल जिज्ञासा वाढण्याचा तो काळ होता. पोटाचा सुखरूप व्यवसाय असें स्वरूप गायन-वादनास त्या काळीं नव्हतें. वेश्यांच्या शिकवण्यांशिवाय कमाईचें असें विशेष क्षेत्र उपलब्ध नव्हतें. मोठे गवई संस्थानिकांच्या आश्रयास जात व तेथें मीठ-भाकर खाऊन आपल्या कलेची उपासना चालू ठेवीत. गाणें-बजावणें जाणणारे लोक एखाद्या नाटक-कंपनीचा आश्रय घेत. सुविद्य गायक कथेकरी बनत. गायन-वादनाची विद्या हा, अस्थिर कां असेना, परंतु पोट भरण्याचा एक व्यवसाय होऊं शकतो, अशी

आशा कलावन्त वृत्तीच्या कष्टाळू मंडळीस वाटूं लागली होती. गायन-वादन-विद्येचा हळूहळू विस्तार होऊं लागला होता.

एकंदर काळ स्वस्ताईचा, राहाणीमान अगदीं साधें, कपडे वेताचे, असा तो जमाना होता. मुंबईत तेव्हां दरमहा चार-दोन रुपये भाड्यानें राहायला खोली सहज मिळे. वस्ती मुख्यतः जुन्या घरंदाज पाठारे प्रभु, शेणवी, सुतार, सोनार, वगैरे वर्गाची असे. वाढत्या व्यापार-उद्योग-धंद्यांमुळें खोजा, पारशी, वोहरी, भाटिया-गुजराथी व मारवाडी लोकांचें मुंबईवर आक्रमण सुरू झालें होतें. सरकारी आश्रयानें व खिस्ती मिशनच्या कार्यामुळें एक नवा स्थानिक खिश्चन समाज निर्माण होत होता, परंतु अजून मुंबईतील गायन-वादनाच्या क्षेत्रांत पाठारे प्रभु, शेणवी, सोनार, सुतार, खत्री, वगैरे मंडळींचेंच वर्चस्व होतें.

अशा ह्या तऱ्हेवाईक पंचमेळ शहरांत येऊन स्वतःचें पोट भरायचें आणि नथ्थनखां ह्यांजकडील शिक्षणही चालू ठेवायचें, अशी समस्या भास्करबुवांपुढें होती. मुंबईत तेव्हां अधून-मधून 'किर्लोस्कर नाटक कंपनी' चा मुक्काम असे. भास्करराव एकदा भाऊरावांस जाऊन भेटले. भाऊराव भास्कररावांस अनेकदा कंपनींत ठेवून घेत असत. भाऊराव व अण्णाराव कोल्हटकर ही मंडळी आतां भास्कररावांस आपल्या कुटुंबीयांप्रमाणें प्रेमादरानें वागवीत असे.

सकाळ, दुपार, संध्याकाळ व रात्रीं, त्या त्या वेळचे राग ऐकावे, म्हणून भाऊराव कोल्हटकर भास्कररावांस स्वतःजवळ ठेवून घेत. सवडीप्रमाणें सर्व काळ ते भास्कररावांचें गाणें ऐकत. भास्कररावांस अशा अगत्याच्या श्रोत्यापुढें अखंड गातांना स्वतःचा रियाज मनसोक्त चालू राहातो, हें मोठें समाधान असे. वाद्यांची व साथीचीही इतरत्र दुर्लभ असलेली जोड ह्या बैठकींत असे.

भाऊराव कोल्हटकरांच्या आदर-सत्कारापेक्षां, तेलंग बंधूंकडील दर शनिवार-रविवारची बैठक विद्या-विकासाच्या दृष्टीनें अधिक फलदायी होत असे. मुंबईतील गायन-प्रेमी व व्यासंगी मंडळी तेथें जमत. तेथील चर्चेनें

कोणीही माणूस अधिक सुसंस्कृत बनावा, अशा उच्च दर्जाची ती बैठक असे.

भास्करबुवा आरंभापासून कथेकरी व शास्त्री-मंडळीच्या संस्कृत विद्येच्या वातावरणांत वाढलेले. रघुवंशाचे सर्ग त्यांनीं वाचलेले. त्यांचा संस्कृत भाषेशीं सामान्य परिचय झालेला. त्यांना तेलंगांकडील सुसंस्कृत बैठक अनेक प्रकारें उपकारक वाटे. नाटक कंपनी अथवा गायनाचे अड्डे ह्यांपेक्षां अधिक सुसंस्कृत वातावरण त्यांना आवडे. त्या उच्च पातळीचें आवरण त्यांच्या मनःवर सदैव असे. गांवांतले उत्तम लयबाज तबलजी व वादक त्या बैठकींत असत. गांवांतल्या सार्वजनिक संस्थांत कोणाचें गायन करावें असा प्रश्न निघतांच, तेलंग बंधूंच्या गायन-क्षेत्रांतील वर्चस्वामुळें भास्कररावांस गाण्याचें आमंत्रण हमखास मिळे.

कृष्णाबाई कोल्हापूरकरीण, चुन्ना, वगैरे नामांकित गायिका व अनेक विद्वान् उत्तरीय गवई मुंबईंत येत-जात होते, तरीही भास्कररावांच्या बैठकी अनेक ठिकाणीं होत. त्यांचा लौकिकही मुंबईबाहेर पसरूं लागला होता. १८९६ मध्यें 'सारस्वत समाजां'त व 'श्रीपाद गायन समाजां'त भास्करबुवांच्या मैफली झाल्या. ह्या मैफलींचें वर्णन आठवणी लिहिणारांनीं लिहून ठेवलें आहे. त्याचप्रमाणें तात्यासाहेब केळकरांनीं पुण्यास भास्करबुवांचें गाणें १८९७ सालीं प्रथमच ऐकलें. पुण्यांत डॉ. विष्णुपंत भागवत ह्यांजकडे ही बैठक झाली. त्या बैठकीला बुवांच्याबरोबर नाना हर्डीकर होते, असें तात्यासाहेबांनीं लिहून ठेवलें आहे. ह्या हर्डीकरांचा अधिक परिचय पुढें क्रमशः येईलच. तूर्त आपण बुवांच्या मुंबईतील प्रासंगिक मुक्कामांत घडणाऱ्या घटना समजावून घेऊं. ह्याच काळांत सुमारें सहा महिने त्यांचा मुक्काम नथ्थनखांच्या शिकवणीनिमित्त धारवाड-हुबळी-म्हैसूर ह्या भागांत असे, तिकडील वृत्त पुढें यथानुक्रम येईल.

मुंबईत प्रसंगशः येणाऱ्या व कायम राहाणाऱ्या अनेक नामांकित गायक-गायिकांशीं व वादनकारांशीं बुवांचा स्नेह जडे. विख्यात सतारवादक बर्कतुल्ला ह्यांच्या व भास्करबुवांच्या स्नेहाचें लवकरच गाढ मैत्रींत रूपान्तर झालें. मुंबईत त्या काळीं स्थिरपद असलेले नझीरखां व त्यांची शिष्या

अंजनीबाई आणि नथ्थनखां ह्यांच्या शिष्या बाबलीबाई ह्यांचा बुवांशीं परिचय झाला.

भारतांतील सर्व-श्रेष्ठ दर्जाच्या गायक-वर्गांत भास्करबुवांची गणना होऊं लागली होती. पण त्यांच्या ह्या वाढत्या वर्चस्वामुळें स्थानिक गवई मंडळींत मात्र मत्सराची साक्ष मिळूं लागली. पूर्वीं उल्लेख केलेले गवई परशुरामपंत बर्वे आपलें मुंबईतील प्रमुखपद ढळल्यामुळें चिडलेले असत. भास्करराव मुसलमान गवयाजवळ शिकतो, तो खांसाहेबांसाठी मटण-दारू खरेदी करतो, तो पक्का बाडगा अधार्मिक आहे, अशा ब्राह्मणाशीं शिवाशीव करून पापाचे धनी होऊं नये, असें म्हणत बर्वेबुवा भास्करबुवांस टाळूं लागले. पित्रे ह्या त्यांच्याच शिष्यांनीं ह्या घटनेचें वर्णन केलें आहे.

मुंबईत भास्करबुवांचा लौकिक वाढत असला, तरी त्यांस स्थिर उत्पन्न मिळत नसे. एखादी कलावंत स्त्री खांसाहेबांस शें-पन्नास रुपये महिना देऊन गाणें शिके, तसे पैसे देण्याची ऐपत भास्करबुवांस अद्यापही नव्हती. पण आपल्याच गुरु-घराण्यांतील एक तयार गवई आपणाकडे शिकायला येतो, ह्याबद्दल नथ्थनखांना धन्यता वाटे. पहिल्या गुरुजींची केली तशी सेवा करून, प्रसंगीं मिळणारें थोडें धन गुरुचरणीं वाहून, भास्करराव शिक्षण घेत होते. स्वतःच्या पैशानें गुरुजींसाठीं मद्य-मांस खरेदी करून नेणें हा गुरुदक्षिणेचा एक भाग, असें भास्करबुवा मानीत असावेत. मुंबईत एवढ्या रुबाबांत वावरणारे भास्करबुवा गुरुगृहीं एखाद्या सामान्य नोकराप्रमाणें गुरुसेवा करीत, हें फार थोड्या मंडळींस ठाऊक होतें.

केवळ मैफलींच्या उत्पन्नावर त्या काळीं मुंबईतही फारशी कमाई होत नसे, वीस पंचवीस रुपये देऊन गवयाचें गाणें रात्रभर ऐकलें, तर त्या बिदागींत गवयाच्या महिनाभराच्या उदरनिर्वाहाची सोय झाली, असें लोक मानीत. दरमहा चार-सहा रुपयांत मोठ्या थाटाचें सुग्रास जेवण त्या काळीं खाणावळींत मिळे. चार-दोन विद्यार्थी दरमहा रुपया, दोन रुपये देत, त्यांतून हा खर्च भागे. एखाद-दुसरा उत्तम लांब कोट, डोक्याला रुमाल अथवा पगडी. अंगांत चार सद्रे, एवढें असलें, कीं कपडे-लत्त्याचा खर्च संपला. उत्तम सर्जचें कोटाचें कापड त्या काळीं दोन-तीन रुपये वारानें मिळे व दहा-पंधरा

रुपयांत उत्तम दर्जाचा टिकाऊ कोट बने. चार रुपये किंमतीची पगडी, दोन-तीन रुपये किंमतीची तलम धोतर-जोडी, वगैरे सर्व रुबाब अत्यंत थोड्या खर्चांत भागे.

१८९५ ते १९०० सालापर्यंत भास्करबुवांना धारवाड, म्हैसूर, हुबळी, वगैरे कर्नाटकांतील गांवांत जें शिक्षण मिळालें, त्याचा सुसंगत वृत्तान्त त्या काळीं बुवा अधून-मधून मुंबईंतही राहात असल्यामुळें, कोठल्याच आठवणींतून स्पष्ट होत नाहीं. अनेक आठवणी, गोविंदराव टेंबे ह्यांचीं पुस्तकें, वगैरे साधनांतून जेवढी माहिती मिळाली, ती येथें शक्यतों सुसंगत देण्याचा प्रयत्न केला आहे.

प्रकरण नववें

# दुसरे गुरु : नथ्थनखां

नथ्थनखांसाहेबांकडे थोड्याबहुत नव्या चिजा शिकायला मिळतील, एवढ्याच लोभानें भास्कररावांनीं हे दुसरे गुरु मिळवले नव्हते. त्यांची लयकारी, त्यांच्या ताना-आलापांतील नावीन्य व तडफेनें, विजेत्याच्या विश्वासानें मैफल रंगविण्याची चातुरी असाधारण होती. नाट्यपूर्ण मांडणीनें रागाला अधिक अलंकारिक वैभव प्राप्त करून देण्याची नथ्थनखांची कला, भास्करबुवांस साध्य करून घ्यायची होती.

नथ्थनखां हे अतिशय चतुर गवई होते. ते रंगानें गोरे, अंगानें थोराड व दिसण्यांत बडे रुबाबदार होते. ते नेहमीं चढाईनें वागत आणि तशाच चढाईनें गात. त्यांचं गाणें ते कधींही थंड वा कंटाळवाणें होऊं देत नसत. मैफलीवर प्रभुत्व गाजवण्याची त्यांची हातोटी अवर्णनीय होती. फैजमहंमद ह्यांजकडील गायकी स्वर-प्रधान असे, तर नथ्थनखां हे असाधारण तयारीचे लयकार गायक होते. अतिशय ठाय लयींत ते जितक्या डौलानें गात, तितक्याच सफाईनें ते अवघड तालांचीं सर्व प्रकारचीं वजनें संभाळीत. सहज

लीलेनें फिरत घेऊन, ते समेवर इतक्या सहजतेनें व अकल्पित मार्गानें येत, कीं श्रोते आश्चर्यानें चकित होत व त्यांस विलक्षण आनंद होई !

नथ्थनखांस दोन मुलगे होते, तेही भास्करबुवांबरोबरच तालमीला बसत. वडील मुलगा महंमद बुवांपेक्षा फक्त वर्षा-दोन वर्षांनीं तर दुसरा अबदुल्ला चार-पांच वर्षांनीं लहान होता. महंमदखांचा आवाज गायनाला अनुकूल, गोड, असा नव्हता. पण अबदुल्लाचा आवाजमात्र गोड होता. अर्थात् महंमद जास्त अभ्यासी व संग्राहक वृत्तीचा होता तर अबदुल्ला घशाच्या अनुकूलतेमुळें कमी प्रयत्नवादी असे. भास्करबुवा दुसऱ्या एका उस्तादाकडे भरपूर शिकलेले तयार गायक असल्यामुळें, महंमदचें भास्करबुवांवर अतिशय प्रेम असे. त्यांच्यासारखी व त्यांच्याइतकी विद्या आपल्याला यावी, असा महंमदखांचा प्रयत्न असे. अबदुल्लाच्या पाठीवरचे नथ्थनखांचे तीन मुलगे अगदींच लहान होते. त्यांपैकीं विलायतखां हाच तेवढा पुढें नांवारूपाला आला. नन्नेखां व आणखी एक भाऊ हे फारसे प्रसिद्धीस आले नाहींत.

नथ्थनखांनीं बाबलीबाई नांवाची एक शिष्या शिकवून खूप तयार केली होती. भास्करबुवा शिकायला राहिले तेव्हां नथ्थनखां ह्यांची नुकतीच साठी उलटत होती. गुरुपत्नीही पन्नाशी उलटलेली कर्तृत्ववान् स्त्री होती. गुरुपत्नीचा भास्करवर अतिशय लोभ जडला होता. घरकामें करणारा शालीन शिष्य. त्यांतून खूपच मेहनतीनें गाणें शिकणारा. त्यांना हळू हळू वाटूं लागलें होतें, कीं भास्कर जस-जसा तयार होईल, तस-तसा तो पतीचा लौकिक वाढविण्यास कारण होईल. भास्करचें गाणें गुरुपत्नीला अतिशय आवडत असे.

हा तरुण ब्राह्मण नित्य मांस व मद्य खरेदी करतो हें पाहून मद्य विकणाऱ्या धारवाडच्या एका कलालाची उत्सुकता जागृत झाली. त्यानें चौकशी केली तेव्हां त्यास समजलें, कीं हा ब्राह्मण आपल्या मुसलमान गवई गुरूसाठीं रोज मद्य-मांस घेऊन जातो. त्याचें कुतूहल वाढलें. ह्या ब्राह्मणाचा हा गुरु आहे तरी कसा ? ज्याची सेवा हा तरुण इतकी करतो तो खांसाहेब असलें कसलें गाणें गातो ? त्यानें एके दिवशीं भास्कररावांस म्हटलें, "मला तुझ्या खांसाहेबांचं गाणं ऐकव, मी त्यांची बिदागी देईन."

'खांसाहेबांना विचारून सांगतों' म्हणून भास्करबुवांनीं खांसाहेबांना विचारून संध्याकाळची वेळ ठरवली. त्याप्रमाणें तो कलाल आला, तेव्हां घरच्या मंडळीस व भास्करला बरोबर घेऊन नथ्थनखांसाहेब मनसोक्त हौसेनें गायले. तो कलाल खूप झाला. त्यानें नथ्थनखांसाहेबांपुढें तीन रुपये ठेवले आणि नमस्कार करून तो निघून गेला. भास्करबुवांस हा प्रकार मोठा संतापजनक वाटला. खांसाहेब हसून म्हणाले, "अरे भास्कर, तुला राग कसला आला? त्या बिचाऱ्याला ह्या गाण्यांतलं काय कळतं? माझी तब्येतीनें मेहनत झाली. संध्याकाळ आनंदांत गेली. वर भाजीपाल्यापुरते पैसे मिळाले. त्या माणसानें अजाणपणें म्हटलं, 'मी बिदागी देईन' म्हणून, पण त्याला ह्या गाण्याची किंमत कशी बरं कळणार?"

नथ्थनखां असे मोठे दिलदार वृत्तीचे होते. त्यांनीं पैशांसाठीं गाणें हा विचारच कधीं मनांत आणला नाहीं. त्यांना त्यांचा खर्च भागण्याइतका पैसा सहज मिळे. अधिक पैशाचा हव्यास त्यांनीं कधींच केला नाहीं. भास्करबुवांचा स्वभाव बनण्यांत एकेका गुरूच्या ह्या प्रवृत्तींचा फार मोठा भाग आहे. भास्करबुवा पैशांविषयीं आमरण बेफिकीर असत.

नथ्थनखांसाहेब कसे लयींत मुरलेले गवई होते, ह्याचें वर्णन त्यांचे तृतीय चिरंजीव विलायतहुसेनखां ह्यांनीं करून ठेवलें आहे. नथ्थनखां इतकें डौलदार बिलंपत गात, कीं त्यांच्याबरोबर डौलानें सरळ ठाय ठेका धरणेंही दिल्लीचा नामांकित तबलिया मुजफ्फरखां ह्याला कठीण गेलें. मोकळेपणानें परणे वाजवणें त्यास इतक्या ठाय लयींत जमेना. त्यानें जेमतेम ठेका धरला.

धारवाडला आलेला बनारसचा नामांकित तबलिया कामताप्रसाद एके दिवशीं भास्करबुवांच्या तालमीच्या वेळीं वादनास बसला. कामताप्रसाद पूर्वी अनेक वर्षे बडोद्यास असल्यामुळें बुवांचा निस्सीम भक्त बनला होता. नथ्थनखांसाहेब झुमऱ्यांतील एक चीज बुवांना शिकवीत होते. मध्येंच त्यांना दुसरी कसली तरी आठवण झाली, तेव्हां त्यांनीं भास्करबुवांस हळूच कांहीं सांगितलें. गाणें बंद पडून खांसाहेब कांहीं खाजगी बोलत आहेत हें पाहून, कामताप्रसादनें एक दीर्घ व गुंतागुंतीचा बोल तबल्यावर हळू चालू ठेवला. बोल आतां फक्त एकचतुर्थांश उरला असेल, तोंच नथ्थनखांनीं

भास्करबुवांजवळचें खाजगी बोलणें संपवलें, एक आलाप घेतला आणि ते बिनचूक समेवर आले. कामताप्रसाद आश्चर्यानें थक्क झाला. दुसरें बोलणें चालू असतां व तबल्याकडे फारसें लक्ष नसतां खांसाहेबांच्या डोक्यांतील लयीचें गणित विस्कळित झालें नाहीं, हें पाहून त्याला मोठें नवल वाटलें. बोल इतका दीर्घ व गुंतागुंतीचा होता, कीं साधारण गवई अगदीं गडबडून गेला असता. पण नथ्थनखां लयीचे बादशहा होते.

भास्करबुवांच्या घरची एक घटना इतरत्र प्रसिद्ध झाली आहे, ती अशी– भास्करबुवांचें बिऱ्हाड एका कर्मठ कानडी ब्राह्मणाच्या घरांत होतें. एके दिवशीं खांसाहेब नेहमींप्रमाणें शिकवणीस बसले असतां मद्याची बाटली, सोडा, ग्लास, वगैरे साहित्य खांसाहेबांच्या जवळच मांडलेलें होतें. त्या दिवशीं त्या ब्राह्मणाकडे श्राद्ध असल्यामुळें तो आतां लवकरच बाहेर पडेल, तेव्हां त्याची वाट आपल्या गायनाच्या तालमीच्या जागेवरूनच असल्यामुळें मद्यपानाची मांडामांड त्याला दिसेल, म्हणून भास्करबुवांची फारच तारांबळ उडाली. आधींच मुसलमान गुरु आणि वर त्यांचें हें मद्यपान. तें पाहून घरमालक आपणास नक्कीच बिऱ्हाड हलवायला सांगतील, अशी भास्कररावांस साहजिकच भीति वाटली. त्यांनीं पिण्याचें साहित्य आवरायला सुरुवात केली. तेव्हां खांसाहेबांनीं विचारलें, म्हणून कर्मठ ब्राह्मण घर-मालक लवकरच पिंड टाकायला तेथें येईल, हें कारणही त्यांनीं सांगितलें. नथ्थनखांनीं हसून लगेच एक भजन सुरू केलें. खांसाहेब भक्तिरसांत रंगून गेले. घर-मालक पिंड टाकायला आले. त्यांनीं पिंड बाहेर टाकला. त्यांना घरांत परत जायचें होतें, पण तेही त्या भक्तिरसांत इतके रंगले, कीं पिण्याच्या साहित्याकडे त्यांचें लक्षच गेलें नाहीं. भजन ऐकत-ऐकत मालक कितीतरी वेळ उभे राहिले. त्यांच्या मनांतही आलें नाहीं, कीं हें भजन गाणारा उस्ताद मद्यानें रंगून गात आहे. नथ्थनखांनीं त्यांना भजनांत इतकें रंगवून सोडलें होतें, कीं पुढें कित्येक दिवस ते भास्करबुवांच्या ह्या गुरूंची मनसोक्त स्तुति करीत. भास्करबुवाही पुढें अनेकदा गायनप्रेमी मंडळींस हें आपलें गुरु-माहात्म्य मोठ्या रंगांत येऊन वर्णून सांगत असत.

बुवांनीं सांगितलेली म्हैसूरची एक कथा अशीच असाधारण आहे. फैजमहंमदखांसाहेबांकडे कांहीं काळ भास्करला घराबाहेर पाठवून स्वतःच्या दत्तक मुलाला खास महत्त्वाची शिकवणी देण्याचा जो प्रकार ह्यापूर्वीं वर्णिला आहे, त्याचीच पुनरावृत्ति नथ्थनखांसाहेबांच्या घरीं प्रथम अशाच प्रकारें चाले. तीही हकीकत बुवा आपल्या खास मित्रांना व चहात्यांना क्वचित् सांगत.

नथ्थनखांना स्वतःच्या घराण्यांतील एखादी खास चीज आपल्या दोन मुलांना शिकवायची असली, कीं ते भास्करबुवांस कांहीं कामासाठीं बाहेर पाठवून देऊन मगच त्यांची शिकवणी चालू करीत. नथ्थनखांच्या पत्नीला हा प्रकार आवडत नसे. भास्करच्या गाण्यावर, त्याच्या निष्ठेवर व गुरुसेवेवर खूष झाल्यामुळेंच त्या माउलीचें भास्करवर स्वतःच्या मुलांपेक्षांही थोडें अधिकच प्रेम जडलें होतें. भास्करच्या असामान्य गायकीनें आपल्या घराण्याचा लौकिक उज्ज्वलतेनें पसरेल असा त्या माउलीला विश्वास होता. स्वतःच्या मुलांपेक्षांही भास्करच नथ्थनखांसाहेबांचें नांव गाजवील, अशी गुरुपत्नीला खात्री होती.

एके दिवशीं नथ्थनखांसाहेबांनीं भास्करला घराबाहेर कामाला पाठवून मुलांना 'दरबारीं'तील 'कौन घर आये जनम लियो' ही चीज शिकवली. भास्करला बाहेरचें काम करण्यास पाठवून, खांसाहेब केवळ आपल्या मुलांना खास चीज शिकवीत आहेत हें लक्षांत येतांच, गुरुपत्नी फारच नाराज झाल्या. त्यांनीं स्वयंपाक तसाच बंद केला आणि त्या संतापानें दुसऱ्याच एका खोलींत जाऊन बसल्या. रोजची वेळ टळून गेली तरी खान्याची वर्दी येत नाहीं हें पाहून खांसाहेब घरांत जाऊन पाहातात तों सगळा मामला थंड! पत्नीनेंही थंडपणें सांगितलें, "माझा पोरगा भास्कर घरीं नसतां घराण्याच्या खास चिजेचं शिक्षण स्वतःच्या मुलांना दिलंत, तेव्हां आज खाना बंद." नथ्थनखां मनांत चरकले. गुरुपत्नी पुढें म्हणाली, "माझा पोरगा भास्कर गाईल तर घराण्याचं नांव दुनियेंत झळकेल. महंमदला आवाज नाहीं, अबदुल्ला अजाण आहे. आज मुलांना शिकवलेली चीज भास्करला शिकवलीत, म्हणजे मग खाना खायला या. तोंपर्यंत खाना तयार होईल."

ह्या घटनेनंतर नथ्थनखांचें धोरण पूर्णतया पालटलें. त्यांना भास्करची उत्कट गुरु-भक्ति, विद्यानिष्ठा, वगैरे गुणांची जाणीव होतीच. त्यांनीं भास्करला जीव तोडून गाणें शिकवण्याचा ह्यापुढें क्रम ठेवला.

१९०० सालीं नथ्थनखांची प्रकृति एकाएकीं ढासळली. त्यांनाच त्यांचा स्वतःचा भरंवसा वाटेना. त्यांनीं मुलांना जवळ बोलावून सांगितलें, " बाळांनो, आतां माझा फार दिवस भरंवसा नाहीं. पण खुदाची मेहरबानी आहे. माझ्या जागीं आतां माझा बेटा भास्कर आहे, तोच तुम्हांला शिकवील नि संभाळील. " खांसाहेबांनीं भास्करला जवळ घेऊन म्हटलें, " भास्कर, आमच्या घराण्याची विद्या तुला आम्हां दोघांकडून भरपूर मिळाली आहे. तूं स्वतः खूप समजदार आहेस. तुला सदैव यश मिळेल. खुदा सदैव तुझ्या पाठीशीं आहे. आतां तूं माझ्यानंतर ह्या सर्वांकडे लक्ष ठेव. "

ह्यानंतर एक-दोन महिन्यांतच नथ्थनखां पैगंबरवासी झाले.

खांसाहेबांच्या मृत्यूनंतर भास्करबुवांस कर्नाटकांत राहाण्याची जरुरी राहिली नाहीं. त्यांनीं बिऱ्हाड पुन्हा मुंबईस हलविलें. अनेक वर्षे वारंवार मुंबईबाहेर राहाण्यामुळें मुंबईत स्थायिक होणें कठीण जाईल, असें भास्करबुवांना वाटलें असावें. त्यांचे मुंबईतील सल्लागार व आश्रयदाते नुकतीच ' सर ' ही पदवी मिळालेले डॉ. सर भालचंद्र भाटवडेकर ह्यांचेंही मत तसेंच असावें.

डॉ. सर भालचंद्रांना वाटलें, कीं ह्या अलौकिक मधुर गायकाची महति युरोपियन व इतर थोर सरकारी अधिकाऱ्यांच्या नजरेंत भरावी. गव्हर्नरसारख्या बड्यांनीं भास्करबुवांचा गौरव केला, तर प्रतिष्ठित सुविद्य समाजांत भास्करबुवांस आपोआप मान-मान्यता मिळेल. लौकिकाच्या पाठोपाठ सहजच पुरेसा पैसाही येईल. ह्या संदर्भात डॉ. सर भालचंद्रांच्या सहीचें एक इंग्रजी पत्रक उपलब्ध आहे, तेंच येथें भाषांतर करून वाचकांस सादर करतों.

८ फेब्रुवारी, १९००, मुंबई

रा. भास्कर रघुनाथ बखले ह्यांस मी अनेक वर्षें ओळखतों. ते भारतीय संगीताचे आचार्य आहेत. त्यांचीं गाणीं बडोदें, पालनपूर, ईदर, वगैरे दरबारांत झालीं आहेत. तेथें त्यांच्या गाण्याचें कौतुक झालें असून त्यांस

राजेरजवाड्यांकडून मान्यताही प्राप्त झाली आहे. नुकतेंच भास्करावांचें गाणें मुंबईच्या गव्हर्नरसाहेबांच्या सल्लागार-समितीचे सभासद नामदार सर चार्ल्स् ऑलिव्हियंट, के. सी. आय्. ई., ह्यांनीं ऐकलें आणि गेल्याच सोमवारीं हिज् एक्सलन्सी लॉर्ड व लेडी सॅण्डहर्स्ट ह्यांनीं भास्करबुवांचें गाणें ऐकून आपली अतिशय तारीफ बोलून दाखविली. हैद्राबाद व म्हैसूर येथें भास्करबुवांना असेंच यश मिळावें अशी माझी इच्छा आहे. त्या भागांत संगीताभिरुचि बरीच चांगल्या दर्जाची आहे.

—सर भालचंद्र कृष्ण

इतर आप्तेष्टांनीं न लिहिलेली परंतु ह्या चरित्राच्या दृष्टीनें उपयुक्त अशी बरीच माहिती त्या पत्रकावरून मिळते. भावनावशतेनें, जराही अतिशयोक्ति होऊं न देतां, केवळ उल्लेख करणें, हाच सत्य गौरव, असें मानून हें पत्रक लिहिलेलें आहे. हें इंग्रजी राज्यकर्त्यांच्या रीति-रिवाजाचा दृढ परिचय असलेल्या सर भालचंद्र कृष्ण ह्यांच्या शिस्तीला धरून आहे.

पालनपूर, ईदर, आदि संस्थानिकांचा पुरस्कार भास्करबुवांनीं ह्यापूर्वींच मिळवला होता, ही नवीनच हकीकत ह्या पत्रकांत नमूद झाली आहे. राजेमहाराजे, गव्हर्नर व गव्हर्नरांचे सल्लागार अशा थोरांनीं—इंग्रजांनींही—आदरपूर्वक कौतुकानें गाणें ऐकावें, अशी मान्यता भास्करबुवांस ह्यापूर्वींच लाभली होती, हेंही ह्या पत्रकावरून उघड दिसतें.

म्हैसूर दरबारच्या नथ्थनखांचा शिष्य हैद्राबाद व म्हैसूर ह्या दक्षिणेंतील सर्वांत धनाढ्य दरबारांत मान्यता मिळवील असाही विश्वास ह्या पत्रकांत सर भालचंद्र ह्यांनीं व्यक्त केला आहे. हें छापील पत्रक कोठें, कसें वांटलें गेलें, हें कळत नाहीं. पै. वा. नथ्थनखां ह्यांच्या जागीं भास्करबुवांची नेमणूक व्हावी, अशी खटपट ह्या काळीं झाली कीं नाहीं, तेंही माहीत नाहीं. मात्र खांसाहेबांच्या मृत्यूनंतर आलेल्या म्हैसूरच्या दसऱ्याच्या महोत्सवांत भास्करबुवांस गुरूंच्या जागीं आमंत्रण मिळालें होतें, ही गोष्ट खरी.

म्हैसूरच्या युवराजांच्या लग्नास अनेक ठिकाणचे राजे, गवई, वादनपटु आले होते. त्यांत वासुदेवाचार्य, मुतय्या भागवत, वगैरे दक्षिणेचे विद्वान् गवईही उपस्थित होते. बुवांचा लौकिक ह्या मंडळींनीं मद्रासकडे खूप

वाखाणणी करून पसरवला. पुढें अनेक वर्षें भास्करबुवांस ह्या म्हैसूरच्या उत्सवाचें आमंत्रण येई. हा संबंध अनेक वर्षें टिकला.

१९०० सालीं म्हैसूरच्या युवराजांच्या लग्नांत गाणें गाण्याइतकी नथ्थनखां ह्यांची प्रकृति ठीक नव्हती. त्यांच्याऐवजीं दरबारांत भास्करबुवा गायला गेले. गुरूचा लौकिक व गायकी त्या दरबारांत स्थान टिकवून राहील, इतक्या आवेशानें भास्करबुवा गायले. ह्या बैठकीस तंबोऱ्यावर कोण होतें, ती माहिती नमूद झालेली नाहीं.

नथ्थनखांसाहेबांच्या मृत्यूनंतर कांहीं काळ मुंबईत भास्करबुवांच्या बैठकींत नथ्थनखां ह्यांचे दोन वडील सुपुत्र तंबोऱ्यावर बसत. तिघांचेंही जणूं भावंडांसारखें एक-दिलाचें गाणें होऊन त्यांत कल्पनातीत रंग भरे, अशा आठवणी नमूद झाल्या आहेत.

प्रकरण दहावें

# मुंबईंत पुनरागमन

१८९५ ते १९०० पर्यंतचें पुढील शिक्षणाचें वृत्त आतांपर्यंत वर्णन केलें. भास्करबुवांच्या कलेला ह्या काळांत आणखी कांहीं पैलू पडले; त्यांची गणना तत्कालीन सर्वश्रेष्ठ गायकांत जाणते लोक करूं लागले. तीस वर्षांच्या वयाला इतकें प्रभावी यश हजारों विद्यार्थ्यांपैकीं एखाद्याच्या वांट्याला क्वचितच येतें.

एकीकडे ही भरभराट चालू असतां कौटुंबिक जीवनांतमात्र त्यांना १९०० सालीं दोन-तीन असह्य आघात सोसावे लागले. त्यांच्या वडील भगिनी तानूबाई ह्यांचे यजमान दक्षिणदास पुराणिक हे ह्याच सालांत मृत्युवश झाले. त्यांच्या पाठोपाठ भास्करबुवांच्या मातोश्रींना काळानें ओढून नेलें. भास्करबुवांचा घरगुती आसरा नष्ट झाला. १९०० साल संपून दीड महिना होतो तोंच भाऊराव कोल्हटकर व नंतर चारच महिन्यांत गुरु नथ्थनखां ह्यांजवर काळानें झडप घातली.

भास्करबुवांना ह्या काळांत 'किर्लोस्कर मंडळीं' त परत येण्याचा आग्रह झाला. परंतु बुवा आतां पुन्हा रंगभूमीवर पाऊल ठेवण्याची शक्यता नव्हती.

शिवाय नाट्यक्षेत्राबाहेरील विशाल जगांत फारच मोठ्या दर्जाचे गवई म्हणून त्यांस मान्यताही मिळाली होती. 'किर्लोस्कर कंपनी' शीं जो बुवांचा संबंध अलीकडच्या काळांत आला, तो 'कंपनी' चे एक सल्लागार, मार्गदर्शक, साहाय्यक म्हणूनच आला व त्याचेंच पुढें मोठ्या प्रेमादरांत रूपांतर झालें.

नथ्थनखां ह्यांच्या मृत्यूनंतर गुरुपत्नीस व मुलांस भास्करबुवांनीं भांडीं-कुंडीं, घरचें सामान, वगैरे साधनांनीं सज्ज असें बिऱ्हाड मांडून दिलें. मुसलमानी संसार हा हिंदु संसाराच्या मानानें फारच साधा व छाट-छूट असे. त्यांतून नथ्थनखां हे दरबार-गवई असले तरी पैशाबद्दल बेपर्वा असल्यामुळें निर्धन होते. नीट-नेटका मांड असलेल्या नवीन बिऱ्हाडांत जेव्हां भास्करबुवा गुरु-पत्नीला घेऊन गेले, तेव्हां त्या साध्या-भोळ्या स्त्रीला खरेंच वाटेना, कीं हें सर्व दृष्टींनीं सोईचें, टाप-टिपीचें घर बच्चा भास्करनें आपल्यासाठीं सजविलें असेल. भास्करबुवांनीं जेव्हां समजावून सांगितलें, कीं हें बिऱ्हाड तुमच्यासाठींच आहे, तेव्हां त्या स्त्रीला अतिशय धन्यता वाटली.

ह्यानंतर नथ्थनखांचा थोरला मुलगा महंमद ह्यास बरोबर घेऊन भास्करराव सपत्नीक मुंबईस आले. भास्करबुवांच्या मुंबईच्या बिऱ्हाडांत आतां भगिनी तानूताई व तिचा मुलगा गणपति हीं येऊन राहिलीं होतीं.

मुंबईच्या ह्या नव्या बिऱ्हाडांत आतां बरीच मंडळी बुवांजवळ शिकण्या-साठीं येऊं लागली. गायनशिक्षक परशुरामपंत बर्वे वारल्यामुळें त्यांच्याजवळ शिकणाऱ्या हिराबाई पेडणेकर अधून-मधून येऊं लागल्या. नाना हर्डीकर, नाना ठोसर व नाना गाडगीळ ह्या तीन नानांना शिकवणी सुरू झाली. गणपत पुरोहित व पोस्टांतले एक नोकर बळवंत बर्वे हेही बुवांजवळ शिकूं लागले. शंकर गुरव नांवाचा एक मुलगाही शिकायला असे. कृष्णा नांवाचा एक मुलगा तर बुवांकडेच राहात असे. भास्करबुवांचें हें बिऱ्हाड गिरगांव नाक्यावरील गोरेगांवकरांच्या पांचव्या चाळींत तिसऱ्या मजल्यावर असे. महंमदखां कांहीं महिने मुंबईत भास्करबुवांच्याच बिऱ्हाडीं राहात. त्यांचें पान बाहेरच्या खोलींत मांडीत. घरच्या सोवळ्यांत वावरणाऱ्या स्त्रियांना मुसलमानाचा विटाळ नको म्हणून बुवा त्यांचें उष्टें-खरकटें स्वतः काढून टाकीत.

भास्करबुवांबरोबर मुंबईला आलेले महंमदखां ह्यांसही गाण्याच्या शिकवण्या मिळवून कुटुंबाचा भार उचलायचा होता. नथ्थनखां ह्यांच्या

कुटुंबास मदत म्हणून भास्करबुवा महंमदखांची एखादी मैफल जमवून आणीत. त्यांत ते स्वतःही गात.

भास्करबुवांमुळें ‘ किर्लोस्कर कंपनीं ’ त अबदुल्ला ह्याचें जाणें-येणें असे. कंपनी धारवाडला असतां भास्करबुवा तिकडे गेले. हुबळी व धारवाड येथें दोन-चार बैठकी ठरवून त्यांचें उत्पन्न बुवांनीं नथ्थनखां ह्यांच्या कुटुंबास दिलें.

बुवांकडे शिकायला येणाऱ्यांपैकीं हिराबाई पेडणेकर ह्या बाई सुविद्य असून त्यांना लेखन-वाचनाचा नाद असे. ह्या बाई व ‘ किर्लोस्कर कंपनी ’ चे नवे मालक श्री. नानासाहेब जोगळेकर ह्यांचा फार स्नेह असे. हिराबाईप्रमाणें आपणांसही भास्करबुवांनीं शिकवावें, असें श्री. नानासाहेब जोगळेकरांस वाटे. एकदा कंपनींत नानासाहेब जोगळेकरांनीं बुवांना तशी विनंती केली. त्या वेळीं कंपनींत नथ्थनखां ह्यांचे चिरंजीव अबदुल्ला हे मुक्कामाला होते. “ गंडा बांधायचा अधिकार गुरु-घराण्यांतील अबदुल्ला ह्यांचा आहे. त्यांचा गंडा बांधा. मी घरचाच आहें. मी केव्हांही शिकवीनच. ‘ किर्लोस्कर कंपनी ’ माझीच आहे, ” असें भास्करबुवांनीं सांगितलें व नानासाहेबांनीं अबदुल्लाखां ह्यांचा गंडा बांधला.

१९०१ सालीं भास्करबुवा व अबदुल्ला हे सुमारें दोन महिने हुबळीचे बुवांचे एक फार जुने स्नेही व चाहाते श्री. र. रा. चाफळकर ह्यांजकडे राहात असत, अशी आठवण चाफळकरांनीं लिहिली आहे. परंतु कालशः ह्या सर्व घटनांची संगति लागणें कठीण दिसतें. भास्करबुवांचें बिऱ्हाड गोरेगांवकर चाळींत असतांनाच श्री. गोविंदराव टेंबे ह्यांचें त्यांजकडे जाणें-येणें सुरू झालें, असें दिसतें. संगीताच्या बैठकींतील नित्य भेटणाऱ्या अभ्यासी, प्रेमी मंडळीचा कोठें, केव्हां, कसा स्नेह जमला, हें निश्चित सांगणें नेहमींच कठीण असतें. १९०१-२ सालीं भास्करबुवांकडे शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांपैकीं गणपत पुरोहित ह्या विद्यार्थ्यानें पुढेंही ‘ भारत गायन समाज ’ सुरू झाल्यावर कांहीं वर्षें बुवांजवळ शिक्षण घेतलें. पोस्टांत नोकरी करणारे बळवंतराव बर्वे बुवांकडे टिकून राहिले, पण त्यांना त्यांच्या सरकारी नोकरीमुळें बुवांकडून फारसा फायदा घेतां आला नाहीं. शंकर गुरव पुढें नाटक कंपनींत गेला. गणपत पुरोहितही १९०४ ते १९१० पर्यंत कांहीं काळ ‘ किर्लोस्कर कंपनीं ’ त

असे. ह्याच काळांत भास्करबुवांशीं ‘ किर्लोस्कर कंपनी ’ तील चिंतोबा गुरव, गुंडोबा वालावलकर, ह्यांचा टिकाऊ शिष्य-संबंध जडला. कृष्णराव गोरे, नानासाहेब जोगळेकर ह्यांनीं नाटकांतल्या पदांपुरती तालीम घ्यावी, पण त्यांच्या सहवासाला गुरुशिष्यसंबंधाचें स्वरूप आलें नाहीं. नानासाहेब जोगळेकर अनेक मंडळींकडे शिकले होते. ते मूळचे बळवंतराव केतकरांचे शिष्य. कर्नाटकांतले एक-दोन गवई व ग्वाल्हेरचे कोणी मुसलमान गवई, वगैरे अनेकांकडे जोगळेकर थोड-थोडें शिकले. सतार, दिलरुबा हीं वाद्यें ते वाजवीत. बाळकोबांची परंपरा त्यांनीं ‘ किर्लोस्कर कंपनी ’ त टिकवली होती.

भास्करबुवा गोरेगांवकरांच्या चाळींत राहायला आल्यावर थोड्याच दिवसांनीं त्यांच्यावर आणखी एक कौटुंबिक आपत्ति कोसळली. बंधु त्र्यंबकराव ह्यांस हाडाचा व्रण होऊन त्यांना मुंबईस औषधोपचारांसाठीं आणावें लागलें. अनेक उपाय केले. बुवा कष्ट व पैसा ह्यांची फिकीर कधींच करीत नसत. त्र्यंबकरावदादा हे बुवांना पितृतुल्य वाटत. त्यांची शुश्रूषा करण्यांत बुवांनीं आणि त्यांच्या पत्नीनें जराही कसूर केली नाहीं. परंतु चार-पांच महिने झिजून त्र्यंबकराव मृत्युवश झाले. ह्या घरगुती अडचणींनीं शिकविण्यांत नेहमींच खंड पडे. भास्करराव गवई पेशाचे, त्यांच्या घरीं मुसलमानांची ये-जा असे, त्यामुळें आजूबाजूच्या बिऱ्हाडकरांची कुज-बुज व तक्रार असे. अशा परिस्थितींत ही वास्तु आपल्याला लाभत नाहीं असें ठरवून भास्करबुवांनीं गोरेगांवकरांच्या पांचव्या चाळींतून आपलें बिऱ्हाड हलवून पेपर मिल लेनमधील एका स्वतंत्र बंगलींत नेलें. ह्या लेनमध्यें कांहीं ख्रिश्चन व कांहीं कलावंत स्त्रियांची वस्ती असे. बंगली स्वतंत्र असल्यामुळें शेजाऱ्यांना उपसर्ग होण्याचा संभव नसे. बिऱ्हाड पेपर मिल लेनमध्यें नेलें, तरीहीं शिकवणीच्या वर्गासाठीं बुवांनीं आंग्रेवाडींत निराळी जागा घेतली.

पेपर मिल लेनमधील बिऱ्हाडांत भास्करबुवांस प्रथम पुत्र-रत्नाचा लाभ झाला. पण हा आनंद एक वर्षभरही टिकला नाहीं. वर्षअखेर मुलास देवीचा आजार होऊन तो देवाघरीं गेला. ह्या दुःखद प्रसंगीं बुवांच्या पत्नीला सोबत म्हणून गणपतराव मणेरीकर मास्तर ह्यांच्या पत्नी सुमारें महिनाभर बुवांच्या बिऱ्हाडीं येऊन राहिल्या होत्या.

## प्रकरण अकरावें

# पुढचें पाऊल

भास्करबुवा पेपर मिल लेनमधील बंगलींत राहूं लागल्यानंतर १९०३ सालीं कलकत्त्यास लाला दुनीचंद ह्यांजकडे राहात असलेले अलादियाखांसाहेब मुंबईला आले ते बुवांकडेच उतरले. भास्करबुवा व अलादियाखां ह्यांचा परिचय दहा वर्षांचा जुना होता. कारण फैजमहंमदखां ह्यांजकडे सात-आठ वर्षें शिकून तयार झाल्यावर बडोद्याच्या मुक्कामांत सतत दीड वर्षपर्यंत भास्करबुवांनीं अलादियाखांसाहेबांची अवघड गायकी ऐकली होती. तरीही मुंबईच्या मुक्कामांत भास्करबुवांकडे उतरण्याइतका त्यांचा दाट परिचय केव्हां, कोठें व कसा वाढला हें निश्चितपणें ठाऊक नाहीं. मुंबईस भास्करबुवांकडे गोविंदराव टेंबे ह्या कोल्हापूरच्या सुखवस्तु कलावंताचें येणें-जाणें आधींच दोन वर्षें सुरू झालें होतें, ह्याचा उल्लेख अगोदर येऊन गेलाच आहे. मुंबईत नाना शंकरशेट ह्यांच्या हॉलमध्यें, तसेंच जेथें-जेथें नामवंत गवयांचा सत्कार करणारी मंडळी होती, तेथें-तेथें अलादिया, मियाजान, नझरखां, भास्करबुवा

ह्यांच्या मैफली होत. अशा मैफलींतून बुवांचा अलादियाखांशीं असलेला जुना परिचय पुन्हा पल्लवित झाला असावा. आग्रा घराण्याचे फैजमहंमद व नथ्थनखां ह्यांची तालीम मिळालेल्या भास्करनें अधिक विद्या जयपूरचे अलादिया ह्यांजकडून घ्यावी अशी नथ्थनखांनीं शिफारस केली होती. मुंबईत अलादिया, नथ्थनखां व भास्करबुवा ह्यांच्या प्रतिवर्षी भेटीगांठी होत. त्यांचा अगदीं अनौपचारिक स्नेह होता, असें सूरश्री केसरबाईच्या सांगण्यांत आलें.

अलादियाखां मुंबईत भास्करबुवांकडे उतरले असतां एकदा आजारी पडले. वसईच्या एका वैद्यबुवांच्या औषधानें अलादियाखांसाहेबांस बरें वाटूं लागलें. ह्या वसईच्या वैद्यबुवांकडे अलादियाखांसाहेब अगत्यपूर्वक जाऊन गात असत, ही गोष्ट गवई लोकांत प्रसिद्ध दिसते.

अलादियाखांची शुश्रूषा भास्करबुवांनीं व त्यांच्या पत्नीनें अतिपरिश्रमपूर्वक केली. राहाण्याचा सर्व खर्च भास्करबुवा करीत. महिना-दोन महिने गेल्यावर प्रकृति सुधारली व अलादियाखांसाहेबांनीं भास्करबुवांस विचारलें, " बेटा भास्कर, तूं मला इतक्या दिवसांत गाण्याबद्दल, शिकवण्याबद्दल कसा आग्रह केला नाहींस ? " भास्करबुवांनीं उत्तर दिलें, " घरच्या पाहुण्याकडून असली कसलीच अपेक्षा नव्हती. आपण माझा पाहुणचार स्वीकारलात हीच मोठी मजवर कृपा झाली. " अलादिया व त्यांचे बंधु हैदरखां ह्यांचा भास्करबुवांवर असीम लोभ क्रमानें जडला व तो आमरण वृद्धिंगत होत राहिला. ह्या प्रेमवृद्धीचा एक टप्पा पुढील ऐकीव आख्यायिकेच्या रूपानें समजतो.

वसईच्या ज्या वैद्यबुवांच्या औषधानें अलादियाखांना गुण आला त्यांच्याकडेच एकदा त्यांची बैठक ठरली होती. वसईस थांबणाऱ्या आगगाड्या त्या काळीं तासा-दीड तासानें एकेक अशा असत. अलादियाखांसाहेबांनीं आपले तंबोरे, वगैरे घेऊन पुढें जाण्यास भास्करबुवांना सांगितलें. त्याप्रमाणें भास्करबुवा रात्रीं नऊ साडेनऊच्या सुमारास तंबोरे, तबलजी, वगैरे सर्व साज घेऊन वैद्यबुवांकडे पोंचले. शेकडों मंडळी अलादियांच्या मैफलीच्या आकर्षणानें जमा झाली होती.

साडेदहाच्या गाडीलाही खांसाहेब आले नाहींत आणि आतां एक वाजेपर्यंत गाडी तर नाहीं, हें पाहून मंडळींत चुळबूळ सुरू झाली. आतां

खांसाहेब येतील अशी खात्री स्थानिक मंडळीस वाटेना. तेव्हां वैद्यबुवांनीं व वसईतील प्रतिष्ठित पाहुण्यांनीं भास्करबुवांना गाणें सुरू करण्याचा आग्रह केला. भास्करबुवांस हें सारें फारसें प्रशस्त वाटेना. कारण ते वडील, थोर, विद्वान् गवयांची अदब इतक्या कसोशीनें राखीत, कीं प्रत्यक्ष तालमीव्यतिरिक्त ते सहसा अशा थोर मंडळीसमोर गात नसत. आपण गाणें सुरू केलें, तर अलादियाखांसाहेब खूप रागावतील, असेंही त्यांस वाटत होतें. पण सर्वांनींच जोराचा आग्रह धरला. आतां खांसाहेब आलेच तर मध्यरात्रीनंतर एक-दीडला येतील, तोंपर्यंत सभाही ओस पडेल आणि अलादियाखांना कोणी श्रोतेच उरणार नाहींत, ह्या कल्पनेनें भास्करबुवा मिडेला पडले. रात्रीं अकरा वाजतां त्यांनीं गाणें सुरू केलें. सर्व सभा आनंदानें रंगून गेली. मैफलींत कमालीचा रंग भरला. एक वाजून गेला. कोणालाच भान राहिलें नाहीं. मैफल ऐन रंगांत असतां, एकाच्या सुमारास अलादियाखांसाहेब येऊन पोंचले. त्यांनीं मैफल खूपच रंगली आहे, भास्कर गात आहे, हें पाहिलें. ते मनांतून थोडे नाराज झाले. पण खांसाहेब आले हें समजतांच मैफल थांबली. खांसाहेब आंत आले. भास्करबुवांनीं म्हटलें, “ गुरुजी, माफ करा. ह्या मैफलींत गाण्याचा माझा अधिकार नाहीं, मीं गाण्यानें आपला अपमान होईल, हें मी जाणतों, पण लोकाग्रहापुढें माझा नाइलाज झाला. ” हें बुवांचें स्पष्टीकरण ऐकून अलादियाखांसाहेब म्हणाले, “ आपण माझे शिष्य नाहीं, आपण माझ्या जागीं गायलांत ह्यांत माझा अपमान नाहीं. आपल्याला फैजमहंमदखां व नथ्थनखां ह्या आग्रेवाल्यांचं शिक्षण मिळालं. आज आपल्याला आपल्या गुरूंनीं काय शिकवलं, तें तरी मला ऐकायला मिळेल. आज मी गात नाहीं. मी गाईन पुन्हा केव्हां तरी. आज आपलंच गाणं मला ऐकूं द्या. ”

अलादियांच्या ह्या बोलण्यानें भास्करबुवांचा स्वतःच्या गुरुजींबद्दलचा अभिमान डिंचवला गेला. त्यांनीं मनांत स्वतःच्या गुरूंना नमन केलें आणि पुन्हा गायला सुरुवात केली.

साऱ्या भारताला विस्मयचकित करण्याचें सामर्थ्य भास्करबुवांच्या चौरस गायकींत होतें. स्वरांची सूक्ष्म रसार्द्र दृष्टि, रागाची अकल्पित वैभवसंपन्न

बांधणी, प्रचंड प्रतिभा, ह्या साऱ्या गुणांचा प्रत्यय ह्या मैफलींत क्षणोक्षणीं येत होता. भास्करबुवा त्वेषानें गायले. दोन-तीन तास तें अद्‌भुत गायन ऐकून अलादियांचें हृदय आनंदानें उचंबळून आलें. भास्करबुवांच्या विद्येची पारख करील असा असामान्य श्रोता अलादियाखां ह्यांच्या रूपानें समोर बसलेला असतां भास्करबुवा किती कल्पकतेनें गायले असतील ह्याची कल्पना सामान्य संगीतप्रेमी श्रोत्यास येणें कठीण. सूरश्री केसरबाई म्हणतात, "भास्करबुवांच्या गाण्याची योग्यता समजणारा विद्वान् गायकच विरळा." अलादियांना भास्करबुवांच्या गाण्याचें केवढें वेड होतें, त्यांचें 'बेटा भास्कर' वर किती प्रेम होतें, ह्याचें प्रत्यंतर सूरश्री केसरबाईंना वारंवार मिळे. बुवांच्या मृत्यूनंतर त्यांचें स्मरण होतांच अलादियांचे डोळे भरून येत. "आतां मी कोणाला ऐकवूं ? आतां गायला मन येत नाहीं." ( अब् मेरे साथ भास्कर नही. मेरा जी नही चाहता कि मैं गाऊं. अब किसको सुनाऊं ! ) खांसाहेबांच्या शब्दांतच केसरबाई ह्या आठवणी सांगतात.

अलादिया जबरदस्त विद्वान् व अवघड गाणारे, अचाट भरणेदार गवई होते. भास्करचें तें वसईतलें गाणें हा एक परस्पर भक्तीचा व प्रेमाचा भक्कम पाया भरणारा प्रसंग ठरला. आपल्या गाण्यांतलें स्वारस्य पूर्णतया जाणील इतका भास्कर तयार आहे, ह्याचें प्रत्यंतर अलादियांना ह्या प्रसंगानें मिळालें.

वसईच्या ह्याच मैफलीचें वृत्त मीं अनेक गायकांच्या तोंडून ऐकलें आहे. अनेक वर्षांनीं नुकतेंच हें वृत्त मीं श्री. कृष्णराव चोणकर ह्यांच्या तोंडून ऐकलें. सुमारें तीस वर्षांपूर्वीं हीच कथा मीं गणपतबुवा पुरोहितांच्या गायनाच्या मैफलीच्या वेळीं ऐकली होती. तबलावादक नथूबुवा जोश्यांनींही ही कथा मला सांगितली.

भास्करबुवा व अलादिया ह्यांच्यासंबंधी कांहीं अप्रिय गोष्टीही मीं ऐकल्या आहेत. त्या गैरसमजुतींचा प्रसार थांबवणें येथें अवश्य वाटतें. भास्करबुवांची योग्यता त्यांचे गुरुजी अलादियाखांसाहेब पूर्णपणें जाणत असत, त्याचप्रमाणें गुरु अलादियांच्या प्रचंड भरण्याची व अवघड विद्येची थोरवी भास्करबुवा उत्तम प्रकारें जाणत. भास्करबुवांना अलादियाखांसाहेबांच्या विद्वत्तेची थोरवी मान्य नसती, तर बुवा अलादियाखांसाहेबांच्या अनेक मैफलींत त्यांच्यामागें

तंबोरा घेऊन बसते ना. धारवाडच्या एका खाजगी बैठकीचें वृत्त मीं ऐकलें आहे तें असें, कीं भास्करबुवा तंबोऱ्यावर बसले असतां केवळ सूर देणें, चार स्वरांच्या आलापानें वा चिजेच्या मुखड्यानें सम दाखवणें, ह्यापेक्षां अधिक ते गायले नाहींत. धारवाडच्या बैठकींत अलादियांचा आवाज ठीक नव्हता. गाणें रंगलें नाहीं. भास्करबुवांच्या एका भक्तानें त्यांना विचारलें, "बुवा, तुम्ही कां गात नाहीं?" बुवांनीं कांहींच उत्तर दिलें नाहीं. गाण्यानंतर दुसऱ्या दिवशीं अलादियांचे बंधु त्या प्रश्न विचारणाराला म्हणाले, "भास्कर समंजस आहे. तो गाऊं लागला, तर दुसऱ्याला बैठक रंगवणं अशक्य झालं असतं." अलादियांच्या अनेक दुर्मिळ चिजा हैदरखां भास्करबुवांना सांगत. अलादिया विद्वान् कलावान् होते. त्यांचा आवाज उतारवयांत नेहमींच सारखा चालत नसे. त्यांचें उतारवयांतलें गाणें ज्यांनीं ऐकलें, अशा गायनाभ्यासी मंडळींत एक प्रवाद मीं अनेकदा ऐकला आहे. 'भास्करबुवांची बरोबरी अलादियांना खासच करतां आली नसती.' हा तो प्रवाद. पण असले कुतर्क कोणीं करूं नयेत, हेंच अधिक शहाणपणाचें. अलादियांना भास्करबुवांबद्दल कमालीचा प्रेमादर वाटे. भास्करबुवांच्या बरोबरीनें रंग जमवणें व मैफल जिंकणें ही गोष्ट खरोखरच अवघड होती. अलादियाखांसारख्या विद्वानासही ही करामत क्वचितच साधली असती. परंतु गायनाच्या विद्येंतील ज्या अनेक कूटस्थलांचा भास्करबुवा विचार करीत, अभ्यास करीत, असें रचनात्मक वैभव अलादियांना अवगत होतें व त्यामुळेंच भास्करबुवा अलादियांना गुरुस्थानीं मानीत. अशा अवाढव्य विभूतींची तुलना करण्याच्या अतिक्रमानें कांहींच निर्णायक सत्य समजणार नाहीं. दोन्ही गवई, मग ते गुरु-शिष्य असोत, अथवा समकालीन म्हणून त्यांचें बरोबरीचें नातें असो, दोघेही असामान्य थोर दर्जाचे गायक होते. दहा-वीस वर्षें गाण्याच्या व्यवसायांत असलेल्या माणसांनाही ह्या दोघांची पारख करण्याची पात्रता कधींच नव्हती, हें सूरश्री केसरबाईंचें मत मला आदरणीय वाटतें. केसरबाई म्हणतात, "भास्करबुवांची योग्यता जाणणाराच मला कुठें आढळला नाहीं." अलादिया त्यांची योग्यता पूर्णपणें ओळखून होते. इतरांनीं हजारों रुपये दिले, तरी मैफलीचें आमंत्रण न

स्वीकारणारे अलादिया आपलें गाणें भास्करबुवांना अखंड ऐकवीत. बुवांच्या अखेरच्या काळांतीळ शास्त्रीहॉलमधल्या बिऱ्हाडीं अलादियाखांसाहेब हौसेनें मनसोक्त गात. कारण अलादियांचें गाणें समजून त्यांत रसास्वाद घेणारा एक महान् श्रोता समोर असे. मात्र भास्करबुवा अलादियांसमोर सार्वजनिक संगीत महोत्सवांत चार वेळां गायले असतील तेवढेच, एरव्हीं ते खांसाहेबां-समोर सहसा गात नसत. गुरुजींची मर्यादा ठेवीत. ठाकुरद्वारच्या अनेक गवयांच्या मैफलींत तसेंच कोल्हापूरच्या 'देवल क्लबां'त, बुवांचें गाणें ऐकून अलादिया गहिंवरून आले. त्यांनीं भास्करबुवांची मनःपूर्वक तारीफ केली. ते प्रसंग सुप्रसिद्ध आहेत. भास्करबुवांचें गाणें ऐकून अलादियांना आनंदाचें, अभिमानाचें भरतें येई.

अलादियांचें भास्करबुवांवर जें प्रेम होतें व त्यांच्या गायकीबद्दल मनांत जो गौरव असे, त्याची साक्ष सूरश्री केसरबाईच्या तालमींच्या वेळीं मिळे. अलादियासाहेबांचें वय झालें होतें. रियाज सुटला होता. आवाजाला कंप सुटे. कधीं मनांत असलेले स्वर सुचेनासे होत. मग ते भास्करबुवांना जी अडलेली जागा असेल, ती सांगत आणि म्हणत, "आतां ह्यापुढचं तूं गा." अलादियांच्या अडलेल्या ठिकाणचा विस्तार बुवांनीं सुरू केला आणि अलादियांच्या गायकींतले स्वर व हरकती आल्या, कीं अलादियासाहेब केसरबाईंना सांगत, "हं, आतां हें ऐक. अशी बढत झाली पाहिजे." शिकवणींतले असे प्रसंग भास्करबुवांबरोबर केसरबाईकडे कधीं क्वचित् गेलेले बापूराव राजहंस ह्यांजसारख्या बुवांच्या शिष्यांना पाहायला मिळत. अलादियांचा 'बेटा भास्कर'च्या विद्येवर कमालीचा विश्वास होता. कधीं शिकवणी सोडून अलादियासाहेब गंधर्वांच्या 'स्वयंवर' नाटकाचे दोन अंक पाहून येत. त्यांची खुर्ची 'गंधर्व कंपनी'च्या खेळाला कायमची राखलेली असे. नाटकाहून परत आले, कीं पुन्हा शिकवणी सुरू होत असे. खांसाहेब म्हणत, "नारायणाचं सुरेल आवाजांतलं तें गोड गाणं ऐकतांना भास्करची अतिशय सुखद आठवण येते. भास्करचं तें अमर्याद गाणं पुन्हा कानांत गुणगुणूं लागतं." बुवांच्या सुंदर गाण्याची आठवण हा अलादियांच्या शेवटच्या वार्धक्य-काळांतील एक सुखकारक अनुभव असे. सूरश्री केसरबाई

ह्या सर्व आठवणी सहज सांगूं लागल्या, कीं त्यांच्या मनांत भास्करबुवा व अलादियाखां ह्यांजबद्दल जो गाढ आदर व जिव्हाळा आहे, तो स्पष्ट होतो.

अलादियांकडे आमरण शिकण्याच्या बुद्धीनें भास्करबुवा आकर्षिले होते ते मुख्यतः एका अवघड लयकारीच्या जयपुरी गायकीमुळें. ह्यापुढच्या विकासांत घराणें बदलणें हें वैगुण्य न ठरतां तें एक उपकारक असें पुढचें पाऊल ठरलें.

घराणें बदललें हें येथें मुद्दाम सुचविलें आहे. आतां हें नवें वळण समजून घेतलें पाहिजे. केवळ लयकारीवर नृत्यादि कलांचा परिणाम घडून ध्रुवपदांतून क्रमानें ख्याल, ठुमरी, इत्यादि प्रकार निघाले. प्रत्येक वळणांत लयकारी, रागाची बांधणी व काव्य ह्या घटकांत अंतर पडलें. लयकारीच्या वेगवेगळ्या वळणांनीं गाण्याला वैशिष्ट्य उत्पन्न होतें. दिल्ली, आग्रा, बनारस, जयपूर हीं लयकारीचीं केंद्रें व गाण्याचीं केंद्रें विचारांत घेतलीं, तर टप्पा व कवालीप्रधान पंजाबी केंद्र, ठुमरीचें बनारसी केंद्र आणि जयपूर-जोधपूर हीं हिंदु रियासतींतील ध्रुपद गायकीचीं केंद्रें, ह्यांत बजवय्यांचें वळण भिन्न असे. फैजमहंमद व नथ्थनखां हे दोघेही आग्रा घराण्याचे गायक असूनही त्यांच्या लयकारींत अंतर पडे; कारण फैजमहंमद हे एक पिढी आधींचे गवई; ध्रुपद गायकीला अधिक जवळ. नंतरच्या पिढींत फैजमहंमद ह्यांच्या गुरु-पुत्राकडे शिकलेले नथ्थनखां ह्यांचें गाणें अधिक अवखळ वळणाचें. कितीही ठाय लयीचें पक्कें शिक्षण व मेहनत झाली, तरी नृत्यालंकारी लय पुढच्या पिढींत अधिक प्रिय असावी, असें नथ्थनखांसाहेबांच्या गायकीच्या वर्णनावरून स्पष्ट दिसतें. ध्रुपद गायकीचें वर्चस्व कमी होऊन ख्याल गायकीचें नवें वळण निर्माण होण्याचें परिवर्तन दोन पिढ्यांच्या गायकींत स्पष्ट होत होतें. ही गोष्ट फैजमहंमदखां व नथ्थनखां ह्यांच्या भिन्न गायकींवरून समजून येते. फैजमहंमदखां ह्यांची गायकी कायद्यानें व स्वरांगानें अस्ताई बांधलेली अशी ठाय लयीची असे. तर नथ्थनखांची गायकी कथ्थकनृत्य व ठुमरी ह्यांच्या संस्कारानें लयकारीला, नृत्यांगाला, प्राधान्य देणारी अशी खेळकर व आवेशयुक्त असे. फैजमहंमदखां व नथ्थनखां आग्रा घराण्याच्या एकाच

कुटुंबांत शिकलेले, पण एका पिढीच्या अंतरामुळें दोघांची गायकी भिन्न झाली होती.

जयपूर घराण्याची गायकी खास ध्रुपद व केवळ लयचिकित्सा करणाऱ्या कथ्थक वळणाची होती. ध्रुपद गायकींत रागवैशिष्ट्य अधिकाधिक स्पष्ट ठेवण्याचा कटाक्ष असतो. जयपुरी कथ्थक नृत्याला बनारसी ठुमरीची जोड मिळून लखनौचें कथ्थक नृत्य मिश्र स्वरूपाचें बनलें. ह्याच्या उलट जयपुरी कथ्थक, लयकारीचें गणित व क्लिष्ट हिशेब ह्यांत मग्न राहिलें. ध्रुपद गायकीचें प्रौढ, विद्वत्तापूर्ण स्वरूप व अतिशय क्लिष्ट पण कलात्मक लयकारी, ह्या आधारांवर अलादियाखांसाहेबांचें संगीत-शिक्षण झालें. दोन तपांहून अधिक काळ ही अवघड विद्या संपादन करून अलादिया जेव्हां बडोद्यास आले, तेव्हां फैजमहंमदखां व शिष्य भास्करबुवा त्या अवघड व कुशल गायकीनें मोहित झाले, ह्यांत नवल नाहीं.

भास्करबुवांनीं १९०० सालाच्या अखेरपर्यंत नथ्थनखां ह्यांची खोल तितकीच अवखळ लय अंगीं मुरवल्यावर साहजिकच त्यांचें लक्ष जयपूरच्या अधिक क्लिष्ट विद्येकडे वळलें. १९०३ नंतर अलादियांचा साधेल तितका सहवास मिळवून ते लयकारींतल्या अधिक अवघड करामती शिकण्याकडे वळले. त्यांना अलादियांनीं गंडा बांधून प्रत्यक्ष शिक्षण दिलें नाहीं, परंतु स्वतःच्या गायकींतील मर्म समजणारा दर्दी व अप्रतिम मधुर गायकी गाणारा शिष्य, म्हणून विद्वान गुरुजींनीं भास्करबुवांना आपली गायकी दिवसें-दिवस अधिकाधिक ऐकवली. हाच आतां पुढील शिक्षणाचा योग्य मार्ग होता.

प्रकरण बारावें

# महाराष्ट्राबाहेर लौकिक

भास्करबुवांचें १९०२ ते १९०५ पर्यंतचें जीवन कसें होतें, ह्याची स्पष्ट, सुसंगत हकीकत उपलब्ध नाहीं. १९०४ सालीं मुंबईंत पैशांची ओढाताण होऊं लागली, म्हणून भास्करबुवा मुंबई सोडून पुण्यास जाऊन राहिले, असा आपला अभिप्राय तत्कालीन विद्यार्थी ठोसर ह्यांनीं नमूद करून ठेवला आहे. ह्याच्या उलट "बुवांना ह्या काळीं दोन-तीनशें रुपये सहज मिळत, ते फक्त शिकवण्या करीत; मैफलींतील प्राप्ति भरीला असे." असें वर्णन तत्कालीन 'किर्लोस्कर मंडळी'चे पेटीवादक श्री. पांडोबा क्षीरसागर ह्यांनीं लिहून ठेवलें आहे. ह्या विरोधी वर्णनांतून सत्य काय असेल, ह्याची कल्पना येते. बुवांची राहाणी कमालीची साधी, निर्व्यसनी असून, त्यांचें व्यक्तित्व व नीट-नेटका पोशाख, ह्यांमुळें बुवांना शेकडों रुपयांची प्राप्ति असावी, असें नाटक-मंडळींतील दूरस्थ पांडोबांना भासत असावें. ह्याच्या उलट आंग्रेवाडीतील गायनशाळेंत बहुधा फुकट शिकणारे चार विद्यार्थी, महिना रुपया, दोन रुपये देणारे फक्त

दोन-तीन विद्यार्थी, ह्या वस्तुस्थितीच्या ज्ञानामुळें श्री. नाना ठोसर ह्या गायन-शाळेमधील मुलानें अंदाज बांधला, कीं बुवांनीं आर्थिक अडचणींपायीं मुंबईचें बिऱ्हाड पुण्यास हलविलें. खरें कारण कदाचित् शिकवणीच्या दोन गायिका पुण्यास गेल्या हें असेल किंवा मुंबईस बुवांजवळ राहाणारी बहीण तानूबाई हिच्या मुलाला १९०४ मध्यें पुण्यांतल्या एका छापखान्यांत नोकरी मिळाल्यामुळें ती पुण्याला गेली, हेंही असेल.

श्री. गोविंदराव टेंबे ह्यांनीं 'माझा संगीत-व्यासंग' ह्या आत्मवृत्तांत १९०३ ते १९०९ हा काळ वर्णिला आहे, त्यांत असें दिसतें, कीं भास्करबुवा ह्या सर्व काळांत वारंवार मुंबईस येऊन राहात असावेत. बर्कतुल्ला, मियाजान, मौजुद्दिनखां, महंमदखां, बीनकार मजीदखां, वगैरे मंडळी नथ्थनखांची शिष्या बापूतारा हिच्याकडील एका मैफलीस हजर होती. ही हकीकत १९०४ पूर्वींची दिसते.

भास्करबुवांनीं तरुण गोविंदराव टेंबे ह्यांस अलादियाखां ह्यांचें माहात्म्य ऐकवलें असल्यामुळें अलादियांचा परिचय नथ्यनखां ह्यांच्या हयातींतच भास्करबुवांशीं झाला होता, ह्या सूरश्री केसरबाईनीं सांगितलेल्या वृत्तान्ताला दुजोरा मिळतो.

टेंबे ह्यांच्या लेखावरून भास्करबुवा किरकोळ शिकवण्यांना कंटाळून, आंग्रेवाडींतला क्लास बंद करून, पुण्यास जाऊन राहिले, तरी ते वारंवार मुंबईस येत होते आणि ह्या काळीं त्यांच्या अगणित मैफली मुंबईत झडत होत्या, असें गोविंदराव टेंबे ह्यांच्या लेखनावरून दिसतें.

ग्रँटरोडजवळ डॉ. भालचंद्रांच्या चाळींतल्या कारवारी गायिकांनीं त्यांचीं लागोपाठ पांच गाणीं केलीं, पण सहावें गाणेंमात्र बुवा हौसेनें तेथें फुकट गायले, हें वृत्त वाचतांना भास्करबुवांच्या तत्कालीन लोकप्रियतेची कल्पना येते. विठ्ठलदास द्वारकादास, वगैरे व्यापारी भाटिया कंपूंतही भास्करबुवांचीं गाणीं होत. डॉ. मंत्री ह्या काळच्या आठवणी सांगतात, "आम्हीं गाण्याची शोकी मंडळी वर्गणी करून, पन्नास रुपये जमवून, त्यांतले ३५ रुपये भास्कररावांना बिदागी व वर चहा-कॉफी, वाहन-खर्च दहा-पंधरा रुपये, अशा पद्धतीनें भास्करबुवांचें ह्या काळांत अनेकदा गाणें ऐकलें."

'किर्लोस्कर कंपनी 'त भास्करबुवांचें जाणें-येणें चालूच होतें. तेथें दोन-तीन शिष्य असत. गणपत पुरोहित भास्करबुवांची पाठ कधींच सोडीत नसे. गोविंदरावांची पेटी ऐकून गणपत पुरोहितनेंही हार्मोनियम-वादन सुरू केलें होतें.

१९०३ पूर्वी म्हैसूरला युवराजांच्या लग्नप्रसंगीं गाजलेल्या मैफलीमुळें आणि हैद्राबादला माणिक प्रभु ह्यांजकडे झालेल्या गाण्यामुळें भास्करबुवांचें नांव भारताच्या दक्षिण टोकापर्यंत पसरलें होतें. खुद्द माणिक प्रभु तर भास्करबुवांस 'संगीत-सम्राट्' म्हणत. (चाफळकरांची आठवण)

१९०४ अखेर भास्करबुवांचा लौकिक सर्व उत्तर हिंदुस्थानांतही पसरावा अशी एक महत्त्वाची घटना घडली.

पंजाबमधील जालंदर येथें देवी तलाव मंदिराचे महंतबाबा हरिवल्लभगिरि हे उत्तम ध्रुवपद गायक होते. ते मूळचे होशियारपूर जिल्ह्यांतील बिजवाडा गांवचे. ते पुढें जालंदरला येऊन देवी तलाव मंदिराचे स्वामी तुळजागिरी ह्यांचे शिष्य बनले. ह्यांनीं स्वतः भारतीय संगीतरूपानें देवाची सेवा करावी म्हणून प्रतिवार्षिक गायन-महोत्सवाची प्रथा सुरू केली. १८७५ च्या सुमारास ह्या गायन-महोत्सवाची सुरुवात झाली असावी असा दोन लिखित वृत्तांवरून मीं हिशेब बसविला आहे.

हे स्वामी हरिवल्लभगिरी समाधिस्थ झाल्यावर पंडित तुळारामजी हे ह्या मंदिराचे महंत झाले व त्यांनीं आपल्या गुरुजींची 'संगीत महोत्सवा' ची प्रथा दर वर्षी नाताळच्या मोसमांत चालू ठेवली. पंजाबमध्यें हरिवल्लभगिरींच्या काळीं ध्रुपद गायकी प्रचलित असे. अमृतसर, तळवंडी, हरियाना, शामचौरासी व कपुरथळा हीं गांवें ध्रुपद गायकीसाठीं प्रसिद्ध होतीं. अमृतसरला उस्ताद उत्तमसिंह व मियांबन्नेखां – हद्दूखांचे ग्वाल्हेरचे शिष्य – आणि पतियाळा दरबारचे प्रमुख गायक अलिबक्ष व फतेहअलीखां ही थोडी मंडळी ख्याल-गायन जाणत; पण मुख्य भरणा विद्वान् ध्रुपद गायकांचा असे. अर्थात् पखवाज व तबला-वादकही खूपच विद्वान् असत. ही सर्व विद्वान् मंडळी ह्या महोत्सवांत भाग घेत असल्यामुळें त्याला एक विशेष

दर्जा प्राप्त झाला होता आणि त्यामुळेंच तो सर्व उत्तर हिंदुस्थानभर गाजला होता. खूप वर्गणी जमा होई. मुख्य गायकाला उत्सवांत एक हजार रुपयांपर्यंत बिदागी मिळे. पन्नास वर्षांपूर्वीच्या ह्या एक हजार रुपयांची किंमत आजच्या पंचवीस हजारांइतकी असे. इतर निमंत्रित गवयांस शेकड्यांनीं बिदागी मिळे. गायन-वादन क्षेत्रांत स्वतःचा दर्जा प्रस्थापित करायची ही एक सुवर्णसंधि असे. देशांतले उत्तमोत्तम गायक-वादक ऐकायला मिळावे म्हणूनही ग्वाल्हेर-इंदूरकडून अनेक गायक-वादकांचे तांडे ह्या उत्सवास जमत. निदान दीड-दोनशें गायक-वादकांची ही मैफल असे व श्रोतृसमुदाय पांच ते दहा हजार मंडळींचा असे. एका भव्य मंडपांत प्रशस्त रंगमंच बांधून त्यावर सर्व गायक-वादक बसत. त्या जमान्यांत दूरध्वनिक्षेपक नव्हते. तरीही कारखान्यांचा धडधडाट नसल्यामुळें श्रोते शांत बसले, तर सर्व मंडपभर हजारों श्रोते गायन-वादन ऐकूं शकत, इतकें गांव शांत असे.

१८९८ साल अखेर पंडित विष्णु दिगंबर पलुस्कर हे उत्तर दिग्विजयासाठीं दिल्लीस गेले असतां तुळारामजींनीं त्यांना जालंदरच्या महोत्सवाचें निमंत्रण दिलें. त्यांचें भव्य व्यक्तिमत्व, त्याहूनही भव्य, मधुर आवाज व सरळ, सुंदर गायकी, ह्या गुणांवर जालंदरचीच काय, पण साऱ्या पंजाबचीच जनता लुब्ध झाली. १९०१ सालीं पंडित विष्णु दिगंबर ह्यांनीं लाहोर येथें 'गांधर्व महाविद्यालय' स्थापन केलें. पंडित विष्णु दिगंबर कांहीं निमित्तानें मुंबईस येऊन गेले असतील तेव्हां असो, वा महाराष्ट्रांतील गायकवर्गाशीं झालेल्या पत्रव्यवहारानें असो, भास्करबुवांचा लौकिक त्यांच्या कानीं गेला होता. तुळारामजींनीं पंडित विष्णु दिगंबर ह्यांस महाराष्ट्रांतल्या दुसऱ्या कोणा उत्तम गायकाचें नांव सुचविण्यास सांगितलें, तेव्हां त्यांनीं भास्करबुवांस आमंत्रण करावें, असें सुचविलें.

ह्या काळांत 'किर्लोस्कर कंपनी'त भास्करबुवांच्या नित्य सहवासांत असलेले पांडोबा क्षीरसागर ह्यांनीं दिलेली माहिती अशी : "१९०३ ते १९०४ च्या सुमारास भास्करबुवा मुंबईस राहात होते. शिकवण्यांवर सुमारें २५० रुपये दरमहा बुवांना मिळत होते. शिवाय गाण्याच्या बैठकींचे निराळेच

रुपये मिळत. बुवांची कीर्ति जालंदरपर्यंत पोंचली. पण बुवांचें गाणें जालंदरच्या लोकांनीं ऐकलें नव्हतें. ‘ तुम्हांस ३०० रुपये बिदागी देऊं व येण्याजाण्याचें रेल्वेभाडें तुमचें सेकंड क्लासचें व साथीदारांचें थर्ड क्लासचें देऊं. ’ असें बुवांस जालंदरहून उत्सव-समितीचें पत्र आलें. तें पत्र वाचून बुवा नाराज झाले. पण ‘ किर्लोस्कर मंडळीं ’ तील व मुंबईतील बुवांच्या चाहात्यांनीं ‘ आपण जालंदर येथें जा. आपली योग्यता त्यांना आपलं गाणं ऐकल्यावर कळेल, तेथील लोक गायनांतले जाणकार व निःपक्षपाती आहेत, ’ असा सल्ला दिला. सर्वांच्या आग्रहाला मान देऊन भास्करबुवा जालंदरला गेले. बरोबर एक शिष्य गणपतराव पुरोहित हे होते. ” जालंदरहून आलेल्या वृत्तांत गणपतराव मणेरीकर हें नांव आहे. पुरोहितबुवा १९०५ नंतर गेले असावेत. बुवांच्या गाण्यानें तो हजारों रसिकांचा समुदाय आनंदानें बेहोष झाला. त्यांच्या असाधारण प्रतिभेनें सर्व प्रकारच्या उस्तादांनाही आश्चर्यचकित केलें. सर्व मैफलीला आनंदाचा जणूं कैफच चढला होता. कितीतरी काळपर्यंत बुवांवर श्रोत्यांनीं अखंड पुष्पवृष्टि केली. तासभर अनेकांचे धन्यवाद घेतां-घेतां बुवांना व्यासपीठावरून उठतां आलें नाहीं.

बुवांना सर्व-श्रेष्ठ गायकाची एक हजार रुपये बिदागी तर मिळालीच, पण पंजाबांतल्या कित्येक गांवो-गांवचीं आमंत्रणेंही दिलीं गेलीं. अमृतसर, लाहोर, वगैरे अनेक गांवीं बुवांचें हजारों श्रोत्यांनीं गाणें ऐकलें. महिना, दीड महिना पंजाबी रसिकांना तृप्त करून बुवा मुंबईस परत आले. ह्या दौऱ्याचें वृत्त पुण्याच्या ‘ मराठा ’ ( इंग्रजी ) वृत्तपत्रांत सविस्तर आल्याचें श्री. पांडोबा क्षीरसागर लिहितात. पण मला ‘ मराठा ’ पत्रांत हें वृत्त आढळलें नाहीं.

श्री. पांडोबा क्षीरसागरांच्या वृत्ताला त्या काळीं लाहोरला स्वतःचा फोटो स्टूडियो असलेल्या पंडित श्रीपाद दामोदर सातवळेकर ह्या विख्यात पंडित चित्रकारांचा पाठिंबा मिळाला. ते लिहितात, “ मी १९०१ ते १९०८ पर्यंत लाहोरला होतों. १९०७ सालीं माझ्या स्टुडिओंतच मीं बुवांचें गाणें केलें. तत्पूर्वी दोन-तीन वर्षें भास्करबुवा प्रतिवर्षी लाहोरला येत. त्यांचें गाणें अत्यंत लोकमान्य झालें होतें. ”

भास्करबुवांच्या गाण्याची छाप सर्व उत्तर हिंदुस्थानी गवयांवर पडली. थोरांतल्या थोर गवयांनीं भास्करबुवांचें कौशल्य केवळ अजोड असल्याचें मान्य केलें. खूष करण्यास अतिशय कठीण अशा विशेष ज्ञात्या, व्यापक अनुभवाच्या गायक-वादकांनींही भास्करबुवांची विद्या व कला भारतांत सर्वोच्च दर्जाची आहे, असें आनंदानें, अभिमानानें मान्य केलें. बुवांनामात्र वाटत होतें, 'मी आतां अधिक चांगलें कोठें, केव्हां, कोणाजवळ शिकूं ?'

प्रकरण तेरावें

# धारवाडला सरकारी नोकरीवर

भास्करबुवांच्या पंजाबांतील दौऱ्यांनीं त्यांच्या मुंबईंत उत्तरोत्तर वाढत असलेल्या लौकिकावर कळस चढविला. आतां अखिल भारतांत भास्करबुवांना सर्वश्रेष्ठ दर्जाचा कलावान् अशी मान्यता प्राप्त झाली होती. कांहीं काळ कलावंताला हे उत्कर्षाचे दिवस दिसतात, त्याचप्रमाणें दैनंदिन खडतर समस्यांनाही तोंड देण्याचा प्रसंग त्याच कलावंतावर अनेकदा येतो. अशा समस्यांचा कांहीं काळ तरी विसर पडावा म्हणून भास्करबुवांनीं आतां मुंबईपासून दूर राहाण्याचें ठरविलें.

भास्करबुवांचे मुंबईतले एक शिष्य श्री. पित्रे हे एल्एल्. बी. ची परीक्षा पास होऊन धारवाड येथें वकिलीची सनद काढून तेथें स्थायिक झाले. दुसरे एक शिष्य-भक्त मणेरीकर हे ड्रॉइंग टीचरची परीक्षा पास होऊन धारवाडच्याच ट्रेनिंग कॉलेजांत नोकर म्हणून राहिले. ह्या दोघांना धारवाडला नेण्यास बडोद्याचे बळवंतराव सहस्रबुद्धे हे शिक्षण-खात्यांतले इन्स्पेक्टर कारण झाले. हे स्वतः गायन शिकलेले असून त्यांनीं संगीत-विषयक एक

लहानसें पुस्तकही प्रसिद्ध केलें होतें. पित्रे, मणेरीकर, वगैरे लोकांनीं, खूपच तारीफ केल्यामुळें श्री. सहस्रबुद्धे ह्यांनीं भास्करबुवांचें गाणें ऐकलें. एकदा गाणें ऐकतांच त्यांस चटक लागली. ते संधि मिळेल तितक्या वेळां भास्करबुवांचें गाणें पुन्हा पुन्हा ऐकूं लागले. पित्रे, मणेरीकर व सहस्रबुद्धे ह्या त्रयीनें मनाशीं निश्चय केला, कीं ह्या अद्‌भुत गवयालाही धारवाडलाच आपल्याबरोबर घेऊन जायचें. त्यामुळें श्री. सहस्रबुद्धे ह्यांनीं 'धारवाड ट्रेनिंग कॉलेज'साठीं एक गायन-शिक्षक हवाच अशी मागणी शिक्षणखात्याकडे केली. पण सरकारी मान्यता व हुकूम मिळण्यास त्यापुढें तीन-चार वर्षें अखंड प्रयत्न करावा लागला.

अखेर धारवाडच्या 'ट्रेनिंग कॉलेजां'त गायन-शिक्षक म्हणून भास्कररावांची नेमणूक झाली. पगार फक्त पस्तीस रुपये असला, तरी बळवंतराव सहस्रबुद्धे ह्यांनीं बुवांना सर्व प्रकारच्या सवलती देण्याचें ठरविलें. आधींच शाळा-खात्याला उन्हाळा, दिवाळी, नाताळ, वगैरे सुट्ट्या असत. त्यांतून बुवांना अधिक रजा कारणशः हवी असली, तर तशी भरपूर रजा, प्रतिवर्षीं पांच रुपये पगारवाढ, वगैरे अटी ठरवून सहस्रबुद्धे भास्करबुवांस १९०५ अखेर धारवाडला घेऊन गेले.

कर्नाटकांत शेती-व्यापार करणारे सुखवस्तु लोक बरेच विलासी असत. त्यांच्या पदरीं अनेक कलावंत स्त्रिया असल्यामुळें मुंबईइतक्याच शिकवण्या धारवाडलाही मिळण्याची शक्यता होती. अशा रीतीनें कमी पगाराच्या गौणत्वाची भरपाई इतर सवलतींनीं झाल्यामुळें २२ जानेवारी, १९०६ रोजीं हा महान् कलाकार 'धारवाड ट्रेनिंग कॉलेज' मध्यें गायन-शिक्षक म्हणून हजर झाला.

भारतांतल्या सर्व बुद्धिजीवी विद्वानांची व कलावंतांची सर्वांत मोठी शोकांतिका ही आहे, कीं त्यांना त्यांची विद्या मिळण्याचे मार्ग सुकर, सरळ नाहींत. हव्या त्या आपत्तींना तोंड देऊन, झगडून विद्या साध्य केली, तरी त्यांना स्वतःचा व विद्या-कलांचा अखंड विकास साधेल असें कार्यक्षेत्र उपलब्ध होत नाहीं. महाराष्ट्रीय समाजांतील ही समस्या तर अटळ आहे. महाराष्ट्रांत त्या काळीं कलाक्षेत्र गाजविलेले गायक, वादक अथवा चित्रकार ह्यांची

दुःस्थिति डोळ्यांपुढें आणली, तर माझ्या ह्या सिद्धान्ताची साक्ष मिळेल. कोल्हापूरचा आश्रय अलादियांस मिळाला, तरी तो अगदींच अल्प असे. म्हैसूरच्या दरबारीं आश्रय मिळूनही नथ्थनखां दरिद्रीच राहिले, बाळकृष्णबुवांना तर मासिक २५ रुपये वेतन मिळे. ही सर्व विद्वान् गायक मंडळी विद्यादान करीतच जगली. चित्रकारांचीही स्थिति अशीच करुणाजनक असे.

कोल्हापूरच्या बहुतेक चित्रकारांचे व शिल्पकारांचे गुरु आबालाल रहमान ह्यांस व्हाईसरॉयसाहेबांचें पदक मिळालें होतें. परंतु ते अनेक वर्षें रस्त्यांत माणसांना अडवून, त्यांचीं रेखाचित्रें काढून देऊन, भीक मागून पाव-भाजी मिळवीत. अनेक वर्षांनीं त्यांस अत्यल्प असा राजाश्रय मिळाला. इतर देशांतल्या सुविद्य लोकांना जर समजलें. कीं तालीम, म्हात्रे व त्रिनिदाद ही कलावंत मंडळी शाळा-मास्तर होती, तर सारें जग हसेल. भास्करबुवांसारख्या अजोड गायकानेंही गायन-शिक्षकाची नोकरी धरली, तर तें ह्या महाराष्ट्रीय परंपरेला शोभेसेंच होतें. अब्दुलकरीमखां, अनंत मनोहर, पंडित विष्णु दिगंबर, आदि मंडळींनीं स्वतंत्र राहून, खडतर आयुष्य स्वीकारूनच अखंड विद्यादान केलें.

ह्याच्या उलट कलकत्त्याच्या खानदानी श्रीमंतींत रवींद्रनाथ ठाकूर ह्यांच्या कुटुंबांत विद्या-कलांचा विकास झाला. रवींद्रनाथ व अवनींद्रनाथ विश्वविख्यात झाले, तर मुंबईचे चित्रकार, शिल्पकार, संगीतज्ञ शाळा-मास्तर होऊन जगले. आपापल्या विद्येचा अभ्यास व दान करीत जगले. ज्यांना शिक्षकांच्या नोकऱ्या मिळाल्या नाहींत, ते स्टेशन-मास्तर, पोस्ट-मास्तर, तिकीट-कलेक्टर झाले. महाराष्ट्रांतल्या दारिद्र्यपूजक समाजाला ह्याची कधींच क्षिति वाटली नाहीं.

कारणशः अलादियाही कोल्हापुराहून धारवाडास त्या काळांत वारंवार येत असत असें दिसतें.

मुंबई-पुण्यासारखीं महत्त्वाचीं मध्यवर्ती शहरें सोडून भास्करबुवा धारवाडसारख्या एका मध्यम दर्जाच्या गांवीं येऊन राहिले. त्यांच्या तेथील वास्तव्यांत पूर्वी १८९६ सालीं स्थापन झालेल्या गायन-समाजाचें पुनरुज्जीवन झालें. पित्रे, मणेरीकर, गुरुराव देशपांडे ह्यांचे वडील, आदि हौशी लोकांच्या

शिकवण्या नेमानें सुरू झाल्या. धारवाड-हुबळीला भास्करबुवांच्या मैफली झडूं लागल्या. ह्या सर्व हालचालींनीं धारवाडची संगीत-प्रेमी मंडळी प्रभावित झाली. भास्करबुवांना धारवाडला राहाण्याबद्दल उत्साह वाटावा, म्हणून त्यांचा सत्कार-समारंभ करून त्यांना एक सुवर्णपदक देण्याचें धारवाडकरांनीं योजिलें. १९०६ सालीं ऑगस्टच्या तिसऱ्या आठवड्यांत हा समारंभ मोठ्या थाटानें पार पडला. पित्रे वकील, मणेरीकर ड्रॉइंग मास्तर, बळवंतराव सहस्रबुद्धे, पुणेंकर, डॉ. गोरे, बल्लारी वकील व शेकडों गायनप्रेमी मंडळी समारंभास उपस्थित होती. हुबळीचे बुवांचे एक चाहाते गोपाळरावजी सुळे समारंभासाठीं येऊं शकले नाहींत. त्यांनीं बुवांचें उज्ज्वल चारित्र्य, विद्यानिष्ठा व कलेवरील प्रभुत्व, वगैरे गुणांचें वर्णन करून एक पत्र धाडलें. “बुवांच्या गायनानें गायनप्रेमी जनतेस अत्युच्च दर्जाच्या मनोहर कलेचा आस्वाद मिळून, जनतेची अभिरुचि उंचावते व हें कार्य गौरवपात्र आहे.” असा त्यांच्या इंग्रजी पत्राचा आशय आहे.

श्री. गोपाळराव सुळे हे हुबळी येथील एक संपन्न व सुसंस्कृत कॉंट्रॅक्टर होते. [ त्या जमान्यांत कॉंट्रॅक्टर ह्याचा अर्थ घरें, वगैरे उक्तें बांधकाम करून देणारा धंदेवाईक एवढाच असे. इतर काम उक्तें करणारांस कंत्राटदार हें नांव फारसें प्रचलित नव्हतें. ] मुंबईंत राहाणारानें कुर्ल्यास सहज जावें, त्याप्रमाणें बुवा धारवाडहून हुबळीस जात. सुळे ह्यांजकडे अनेकदा मैफली झाल्या. त्याचप्रमाणें बल्लारी वकील हे अब्दुलकरीमखांसाहेबांच्या व भास्करबुवांच्या वारंवार बैठकी करीत. १९०७ सालीं नोव्हेंबरच्या सुमारास एका निवृत्त सरकारी नोकराच्या सन्मानार्थ धारवाडच्या कलेक्टर कचेरींतील एक अधिकारी श्री. पुणेंकर ह्यांनीं बुवांचें गाणें केलें. त्या मैफलीचें वृत्त त्यांच्याच शब्दांत देत आहें. “गाण्याला ऐंशीं-शंभर मंडळी हजर होती. संध्याकाळीं ४।५ चे दरम्यान गाणें सुरू झालें. त्या दिवशीं भास्कररावजींच्या गाण्याला सुरवातीपासूनच रंग भरला होता. प्रथमतः बुवांनीं ‘गौडसारंग’ राग रसभरित गायल्यानंतर ‘भीमपलासी’ रागाची आलापदारी झाली व त्या रागांतील सर्वश्रुत ख्याल ‘नाद समुद्रको’ ह्याला सुरुवात केली. ती अस्ताई भरतांना असे कांहीं गोड व मधुर स्वर लागून गेले, कीं अगदीं नकळत, साहजिकपणेंच

श्रोते, स्वतः बुवा, सारंगीवाला, तबलजी, वगैरे सर्वांच्या नेत्रांतून आनंदाश्रु गळूं लागून, गाणें अकस्मात् थांबलें. जो-तो एकमेकांकडे पाहूं लागला. बुवांना विचारतां ' क्वचित् इतके हृदयभेदी व अंतःकरण भारून टाकणारे स्वर लागतात...' वगैरे उद्गार काढून त्यांनीं आपल्या गुरुजींच्या नांवें वंदन करून, थांबलेला राग व इतर राग गाऊन गाणें तीन-चार तासांनीं संपविलें."

पुणेंकर ह्यांजकडे हुबळीस ही बैठक झाली त्यापूर्वीं एक वर्ष बुवांना बंगलोरच्या ' संगीत परिषदे ' चें आमंत्रण आलें होतें. बंगलोर हें कर्नाटकी संगीत व उत्तरेचें संगीत ह्यांच्या हद्दीवरचें. तेथें अनेक विद्वान् गायक-वादक येत. किल्ल्यांतील संस्कृत पाठशाळेंत हा उत्सव झाला. बुवा बंगलोरला गाणार आहेत हें कळतांच, हुबळी, धारवाड व इतर अनेक गांवचे त्या बाजूचे बुवांचे चाहाते त्या परिषदेस मुद्दाम गेले होते. उत्सवांत भास्करबुवांचें गाणें अतुल्य ठरलें. तें गाणें ऐकलेले लोक तीस वर्षांनीं त्या मैफलीचें वर्णन करीत. बुवांच्या गाण्याचा संस्कार रसिक श्रोत्यांच्या मनावरून कधींही पुसून जात नसे.

भाऊसाहेब पुणेंकर ह्यांनींच बुवांच्या म्हैसूर येथील कार्यक्रमाचा एक प्रसंग वर्णन केला आहे ; त्यांत बुवांची आत्मिक शक्ति, ईश्वरभक्ति, वगैरे अनेक गुणवैशिष्ट्यें स्पष्टपणें प्रतिबिंबित झालीं आहेत.

१९०७ सालच्या म्हैसूर येथील विजयादशमीच्या गाण्याचा प्रसंग एका मोठ्या संकटामुळें संस्मरणीय झाला. म्हैसूरच्या दसऱ्याच्या उत्सवाचें ऐश्वर्य पाहाण्यास दूर-दूरचे राजे, थोर पाहुणे, देशांतले सर्वश्रेष्ठ कलावंत येतात. भास्करबुवांना म्हैसूर दरबारीं फार मोठा मान असे. सुप्रसिद्ध सतारिये बर्कतुल्ला, रामपूरचे सरोदिये प्रो. अहमदअलीखां व नामांकित बँजो-वादक समारंभास आले होते. मद्रास, कलकत्ता भागांतील थोर गायक-वादकही मोठ्या संख्येनें उपस्थित होते. बुवांचा मुक्काम सरस्वती धर्मशाळेंत होता. सर व्ही. पी. माधवराव हे दिवाण सर्व कलावंतांचें अगत्यानें स्वागत करीत होते. दसऱ्याच्या आदल्या रात्रीं अकरा वाजतां बुवांचें गायन ठरलें होतें.

हवा सर्द होती. धारवाडहून म्हैसूरला येतांच, बदललेल्या हवेनें बुवांचा आवाज बसला. बुवा अतिशय सचिंत झाले. त्यांनीं तंबोरा लावून

स्वर लावायचा प्रयत्न केला, पण घशांतून नीट स्वर येईनात. बुवांच्या बरोबर गेलेले एक शिष्य लिहितात, " बुवांनीं तंबोरा तसाच खालीं ठेवला, दत्ताची तसबीर समोर ठेवली आणि मोठ्या केविलवाण्या मुद्रेनें ते ध्यान करीत बसले. त्यांच्या डोळ्यांत अश्रु उभे राहिले. योग्य वेळ होतांच ते दरबारांत जाऊन गायला बसले. त्यांच्या चेहऱ्यावर नेहमींचा प्रफुल्लित भाव व आत्मविश्वास दिसूं लागला, गाणें कल्पनातीत रंगलें. तज्ज्ञ मंडळी त्या बहारीच्या गाण्यानें खूष झाली. बुवांचा मोठा सत्कार झाला. घरीं आल्यावर बुवांनीं दत्ताच्या तसबिरीपुढें उदबत्ती-कापूर लावून ' गुरुराया ! आज तुम्हींच माझी लाज राखलीत. ' असें म्हणून लोटांगण घातलें. बुवा पुन्हा कितीतरी वेळ ध्यानस्थ बसले होते. चित्त शांत झाल्यावर ते व शिष्य मंडळी झोपीं गेली. बुवांची विद्या-निष्ठा, गुरु-निष्ठा व आत्मिक बळ ह्यांचीच ती कसोटी होती. कदाचित् केलेल्या उपायांचा, ध्यानस्थ बसण्याचा, योग्य वेळीं उपयोग होऊन, आवाज सुधारला असेल. पण त्यांत प्रचंड इच्छाशक्ति, आत्मिक बळ व श्रद्धा ह्यांचा फारच मोठा भाग होता. "

भास्करबुवांच्या धारवाडच्या मुक्कामांतल्या आणखी एकाच मैफलीचा येथें उल्लेख करणें आवश्यक वाटतें. बुवांच्या मैफलींच्या शेकड्यांनीं मोजण्याइतक्या आठवणी लोक सांगतात. चाहात्यांनीं त्या लिहून ठेवल्या आहेत. प्रत्येकजण मैफलीचें वर्णन करतांना लिहितो, कीं ही मैफल केवळ अद्वितीय, चिरस्मरणीय झाली. बुवांच्या प्रत्येक गाण्याच्या बैठकींत गाणें जिव्हाळ्यानें आणि कळकळीनें होत असे. प्रत्येक मैफल ऐकणारांना वाटे, कीं आज आपण कांहींतरी अद्भुत ऐकलें, अशी मैफल पुन्हा ऐकायला मिळणार नाहीं. मी स्वानुभवानें लिहितों, कीं बुवांच्या प्रत्येक मैफलींत हाच साक्षात्कार होई. गायन-वेडे, गायनाचे जाणकार श्री. श्यामनाथ गुर्टू लिहितात, ( मूळ पत्र इंग्रजींत आहे, शब्दशः भाषांतर येथें देत आहें. ) " मी भास्करबुवांना ते फैजमहंमदखांसाहेबांकडे शिक्षण घेत असतां १८९० सालीं प्रथम ऐकलें. तेव्हां त्यांनीं ' पूरिया धनाश्री ' राग विलक्षण तयारीनें गाऊन दाखवला. त्या गाण्यावरून मी समजलों, कीं भविष्यकाळांत ह्या विद्यार्थ्याला अतिशय उज्ज्वल यश मिळेल ... हुबळीचे डॉ. गोरे ह्यांजकडील

गाण्याचें आमंत्रण त्यांना केलें, तो प्रसंग मला विशेष आठवतो. डॉ. गोरे ह्यांजकडे फारच गर्दी होती व खूप जाणकार लोक होते. पित्रे वकील, वगैरे मुरब्बी तेथें होते...मजवर फर्माईश करण्याचा प्रसंग आला. मीं ' गौरी ' राग सुचवला. मला कबूल केलें पाहिजे, कीं बुवांनीं तो राग इतक्या परिपूर्णतेनें व रसील्या स्वरांनीं आळवला, कीं वा ! राग-स्वरूपाची त्यांची जाणीव विलक्षण खोल होती. सर्व सभा मंत्रमुग्ध झाली होती. पित्रेवकील माझ्या लिहिण्याच्या सत्यतेची साक्ष देतील. त्या संध्याकाळची स्मृति मजजवळ आमरण टिकली. गाण्याच्या शेवटीं बुवांच्या गुणगौरवपर भाषण करण्याचा मान मला मिळाला. बुवांना डॉ. गोरे ह्यांच्या वतीनें आठवण म्हणून एक सोन्याची अंगठी देण्यांत आली. मैफल पूर्णतया यशस्वी झाली. ''

धारवाड येथील नोकरीच्या पावणे-तीन वर्षांतील कांहीं चुरशीच्या सामन्यांचें वृत्त बुवांसंबंधींच्या आठवणींत आलें आहे. दोन कलावंतांची तुलना कधींच फारशी फलदायक होत नाहीं. पण तसे प्रसंग संगीत-क्षेत्रांत अनेकदा घडले आहेत. असाच एक प्रसंग भास्करबुवांच्या धारवाडच्या मुक्कामांत घडला.

भास्करबुवा धारवाडला जाण्यापूर्वींच सात-आठ वर्षें कर्नाटकांत अब्दुलकरीमखांसाहेबांची गायकी लोकप्रिय व लोकमान्य झाली होती. मधुर गळा, स्वरेल गायकी आणि भावपूर्ण गाण्याची प्रवृत्ति ह्या गुणांनीं अब्दुलकरीमखांसाहेबांनीं कर्नाटकी गायनप्रेमी लोकांच्या मनावर मोठी पकड बसवली होती. मुसलमानाला सामान्यतः न शोभेल अशी शालीन वृत्ति, आस्थेवाईकपणा, वगैरे गुणांनीं खांसाहेब कर्नाटकी विलासी जगांत अतिशय लोकप्रिय झाले होते. रामभाऊ कुंदगोळकर, वगैरे विद्यार्थी तयार करून खांसाहेबांनीं कर्नाटकच्या लोकांचें मन जिंकलें होतें.

भास्करबुवा हा एक दुसरा प्रतिभाशाली, संगीत-विद्यासंपन्न तरुण धारवाडच्या ' ट्रेनिंग कॉलेजां ' त शिक्षक म्हणून आला; मुंबईहून गाणें शिकून आलेले पित्रे वकील, मणेरीकर ड्रॉइंग मास्तर व इतर अनेक ह्यांनीं त्यांजकडे गायनाचें शिक्षण घेण्यास सुरुवात केली; अधिक विद्यार्थी व विद्यार्थिनी

त्याजकडे आकृष्ट होत गेल्या; एवढेंच नव्हे, तर त्याच्या धारवाड-हुबळी भागांत मैफली झडूं लागल्या; धारवाडच्या गायनप्रेमी जनतेनें त्याचा पहिल्याच वर्षांत मोठा सत्कार करून त्याला एक सुवर्णपदकही दिलें; हें एका शाळा-शिक्षकाचें वर्चस्व अबदुलकरीमखां ह्यांच्या चाहात्यांस जरा विपरीतच वाटलें. गायक आला तो आला, पण स्वतःचे चाहातेही मुंबईहून घेऊन आला. हे 'शाळा-मास्तरा'चे चाहाते वजनदार व पैसेवाले होते. तेव्हां ह्या भटजी 'शाळा-मास्तर' गायकाचें स्तोम अधिक माजतां कामा नये, असेंही खांसाहेब ह्यांच्या भक्तांना व चाहात्यांना वाटणें साहजिक होतें.

हुबळी-धारवाडांत अबदुलकरीमखांसाहेब व भास्करबुवा ह्यांच्या गाण्याच्या मैफली झडल्या तर त्यांत गुणग्राहकतेपेक्षां चढाओढ-चुरस हीच भावना प्रबळ होऊं लागली. खांसाहेबांचे कांहीं भगत, बुवासाहेबांचे कांहीं व बहुतेक तटस्थ जनता, असे वर्ग श्रोत्यांत दिसूं लागले. ह्या दोन्ही गायकांची योग्यता अजमावूं शकतील असे अनुभवी विद्वान् गायक अर्थातच विरळा होते. आणि असते तरी ते असल्या चुरस, शत्रुत्व, वगैरे चळवळींत उतरण्यास प्रवृत्त झाले नसते. ह्या दोघाही गायकांचीं गाणीं भक्तीनें ऐकण्यास गायनप्रेमी सधन वर्गमात्र नेहमींच उत्सुक असे.

अबदुलकरीमखांसाहेबांचें गोड गळ्याचें, सुरेल, भावनापूर्ण गाणें सर्वांसच प्रिय होत असे. तुलनेनें भास्करबुवांचा आवाज खांसाहेबांइतका गोड नव्हता; परंतु त्यांचा सुरेलपणा असामान्य होता. उत्तम लयकारी, विद्वत्तापूर्ण व सर्वांचें हृदय जिंकणारी सुरम्य मांडणी, ह्या अलौकिक गुणांचा प्रभाव भास्करबुवांच्या गाण्यांत असे. दोघांच्या भूमिकाच वेगवेगळया होत्या. सामान्य जनतेला रेसच्या घोड्यांची खानदान जितकी ठाऊक असते, तितकी कलावंतांच्या घराण्यांची महति ठाऊक नसते. कला-विषयांत स्वैर, स्वतःच्या आवडीनुसार, ढोबळ, बेजबाबदार बोलणें अधिक. अशा प्रवृत्तीच्या धारवाडच्या कांहीं उपद्व्यापी मंडळींनीं ह्या दोन महान् गवयांची चुरस लावण्याचें वातावरण निर्माण केलें. अडाणी, अर्धवट लोकांत चर्चा व वितंडवाद होऊन ते ह्या दोन्ही थोर कलावंतांपर्यंत कधीं प्रत्यक्ष पोंचलेच तर दोघेही एकमेकांची स्तुतिच करीत; कारण परस्परांची योग्यता ते जाणून होते.

दोघांचीं हीं चुरशीचीं गाणीं आपल्या घरीं झाल्याचें वृत्त श्री. चाफळकर ह्यांनीं लिहिलें आहे. ते लिहितात, " भास्करबुवा त्या दिवशीं आमच्याचकडे झोपले होते. त्यांस मीं विचारलें, ' बुवा, खरं सांगा, आज अब्दुलकरीमखां कसे गायले ? ' त्यावर बुवा म्हणाले, ' अशी आवाजाची तयारी सात जन्म घेतले तरी आपणांस यायची नाहीं.' दुसऱ्या दिवशीं अब्दुलकरीमखांची गांठ पडली; त्यांनाही मीं विचारलें, ' खांसाहेब, काल भास्करबुवा कसे गायले ? ' त्यावर त्यांनीं बुवांची मुक्तकंठानें स्तुति करून म्हटलें, ' दख्खनमें एकहि ऐसा गवय्या है। सब हिंदुस्थानमें हिंदुओंमें इनके लायख थोडेहि गवय्ये हैं। ' ही उभयतांनीं एकमेकांची स्तुति केलेली ऐकून, दोवेही सारखेच थोर अशी माझी पूर्ण खात्री झाली. " अशाच प्रकारच्या सात-आठ चुरशीच्या मैफली बल्लारी वकिलांकडे झाल्या, त्यांचें वृत्त पित्रे वकिलांनीं नमूद करून ठेवलें आहे, त्यांतूनही हाच निष्कर्ष निघाला.

ह्या वृत्तांवरून एवढेंच समजतें, कीं दोवेही गवई सौजन्यशाली आणि दुसऱ्या कलावंतांबद्दल प्रेमादराची भावना असलेले होते. ही भावना दोघाही गवयांच्या शिष्यमंडळींत व चाहात्या लोकांत फारच कमी प्रमाणांत होती.

तत्कालीन सर्वच थोर गायकांशीं भास्करबुवांचा बराच संबंध आला. भास्करबुवांची वृत्ति थोर गायकाचे गुण तेवढेच सांगायचे अशी असल्यामुळें व आमरण विद्यार्थिवृत्ति असल्यामुळें ते स्वतःच्या काळांतील इतर थोर कलावंतांपेक्षां कित्येक बाबतींत वरचढ असतांही त्यांनीं सर्वांशीं प्रेमाचे, आदराचे संबंध चिरकाल टिकवले.

२३ ऑगस्ट, १९०८ रोजीं भास्करबुवांनीं धारवाडची सरकारी नोकरी सोडली. कारण त्यांचे स्नेही श्री. बळवंतराव सहस्रबुद्धे नुकतेच कालवश झाल्यामुळें त्यांच्या जागीं नवे शिक्षणाधिकारी आले होते, त्यांना भास्करबुवांची योग्यता ठाऊक नसावी. कारण सरकारी शाळेंत शिकविणाऱ्या बुवांसारख्या एका थोर कलावंत गायक-शिक्षकाला सरकारी नियमांचा भंग करून रजेच्या वगैरे सवलती देणें त्यांना गैरशिस्त वाटलें. भास्करबुवांचा आणि श्री. सहस्रबुद्धे ह्यांचा जो स्नेहाचा खाजगी ऋणानुबंध होता, तो आतां तुटला होता. बुवांना स्वतःच्या कुचंबणेचाही कंटाळा आला असावा.

बुवांनीं जीवनांत 'पुनश्च हरिः ॐ' करण्यासाठीं पुण्या-मुंबईकडे जाण्यापूर्वी गोव्यास स्वतःची कुलस्वामिनी देवी म्हाळसा हिचें दर्शन घेण्यास जाण्याचें ठरविलें. ह्याच काळांत हिराबाई पेडणेकर, ताराबाई शिरोडकर, वगैरे कलावन्त स्त्रिया भास्करबुवांकडे शिकत होत्या. बुवांचा मुक्काम असेल तेथें शिष्य-शिष्यिणी येऊन राहात. कदाचित् बुवांना आपल्या गांवीं येण्याचा आग्रह एखाद्या कलावंत शिष्येनें केल्यामुळेंही बुवा गोव्यास गेले असतील. बुवा तिकडे जेमतेम चार महिने राहिले. नाताळच्या अगोदर ते कोल्हापूरमार्गें मुंबईस आले आणि दोन शिष्य घेऊन जालंदरला वार्षिक यात्रेला गेले. प्रत्येक वेळीं वेगळे शिष्य बरोबर असत. मणेरीकर मास्तर, गणपतबुवा पुरोहित, पुण्याच्या बळवंतराव बापटांचे चिरंजीव, वगैरे अनेकांनीं बुवांबरोबर ही उत्तरेची यात्रा केली. देशांतले उत्तमोत्तम गायक-वादक ऐकण्याची ही पर्वणी बुवांप्रमाणें शिष्यांनाही फलप्रद होई. स्वतःचे गुरु बाह्य जगांत किती थोर कीर्ति संपादन केलेले आहेत, ह्याचा साक्षात्कार होऊन शिष्यांचा गुरूबद्दलचा प्रेमादर द्विगुणित, शतगुणित होई.

१९०९ च्या मार्चनंतर बुवा पुन्हा पुण्या-मुंबईच्या आखाड्यांत आले व त्यांच्या जीवनांतलें एक नवें पर्व सुरू झालें. पण मध्यें दोन वर्षें अस्थिरतेचीं गेलीं. नंतर बुवांना त्यांचें कार्यक्षेत्र सापडलें.

प्रकरण चौदावें

# विदेही कलावंत

धारवाडची सरकारी नोकरी सोडून, गोव्यांत कुलस्वामिनी देवीचें दर्शन घेऊन बुवा पुण्यास वडील भगिनी तानूताई ह्यांच्याकडे परत आले. वर्षअखेरचा दौरा आटोपल्यावर बुवांना पुन्हा स्वतःचें बिऱ्हाड स्थापन करायचें होतें. बडोदें व मुंबईचे जुने पाश क्रमानें नाहींसे होऊन पुण्या-मुंबईत नव्या ओळखी व नवे संबंध निर्माण होत होते. मुंबईशीं बुवांनीं आपला संबंध कधींच तुटूं दिला नव्हता आणि पुण्यांतही निरनिराळ्या व्यक्ति व संस्था ह्यांच्याशीं त्यांचे संबंध अधिकाधिक निगडित होत होते. ह्या काळांतील एकंदर अस्थिर परिस्थिति व परिवर्तनें ह्यांचा उल्लेख ह्या प्रकरणांत आहे.

बुवा धारवाडास असतां त्यांस दोनदा सावंतवाडीस गाण्याचें आमंत्रण मिळालें. त्यामुळें तेथील दिवाण श्री. विनायक पांडुरंग गुप्ते ह्यांच्याशीं त्यांचा घनिष्ट मैत्रीचा संबंध जडला. पुढें श्री. गुप्ते सावंतवाडीच्या नोकरींतून मुक्त होऊन मुंबईस आले. मुंबईस त्यांच्याकडे नित्य येणारे डॉ. सांबारे व डॉ. त्रिलोकेकर ह्या गायनप्रेमी मंडळींशींही ओघानें परिचय झाला. डॉ. भांडारे

हे गायनाभ्यासी असल्यामुळें त्यांनीं तर बुवांचें शिष्यत्वच पतकरलें. ह्या नव्या मित्रपरिवारांतच गंगाराम बाबसोबा रेळे, प्रसिद्ध हार्मोनियम वादक भाचुभाई भांडारे, प्रसिद्ध तबलजी दादा लाडू ह्यांचा स्नेह जडला. ह्या मंडळींबरोबरच नामदार समर्थ व नामदार चौबळ ह्यांचाही सहवास बुवांना वारंवार घडे.

ह्या काळांत बुवांचें बिऱ्हाड पुण्यास असे. बुवा मुंबईत आले म्हणजे गिरगांव बॅकरोडवरील दुभाप गल्लींत गोखले ह्यांच्या इमारतींत राहात. ह्या गोखल्यांचें रिपन थिएटरजवळील हॉटेल प्रसिद्ध होतें. गायक व नाटक कंपन्यांच्या चालकांसाठीं त्यांचें घर ही एक हक्काची जागा असे. ह्याच जागेंत बालगंधर्वादि मंडळी अनेकदा उतरत.

भास्करबुवा मुंबईस आले, कीं त्यांच्या मैफली फ्रामजी कावसजी हॉल, बरोज लेन नाक्यावरील नाना शंकरशेट ह्यांचा दिवाणखाना व कांदेवाडींतील रेळे ह्यांचें घर, इत्यादि ठिकाणीं होत. तंबोऱ्यावर शिष्य बर्वे, तबल्यावर दादा लाडू व पेटीवर डॉ. सांबारे, भाचूभाई भांडारे, गोविंदराव टेंबे किंवा गुंडोबा वालावलकर ह्यांपैकीं एखादा असे. बुवांची लोकप्रियता नित्य वाढत्या प्रमाणावर होती. बुवांचीं गाणीं वारंवार ऐकायला मिळत असल्यामुळें बुवांचा मुक्काम जणूं मुंबईतच आहे, असें त्यांच्या चाहात्यांस वाटे.

उन्हाळ्याची सुट्टी, दिवाळीची सुट्टी, नाताळ, ईस्टर व अवांतर सणावारांच्या सुटींत बुवा निरनिराळ्या गांवांना भेटी देत आणि तेथल्या आपल्या हितसंबंधी मंडळींचा समाचार घेत. कोल्हापूर, सातारा, सावंतवाडी, पुणें व मुंबई ह्या सर्व भागांत बुवांचा फेरफटका असला, तरी बहीण तानूताईचा एकमेव आधार अल्पवयीन पत्नीला असल्यामुळें बुवांना पुण्याची ओढ लागली, ती नित्य वाढत गेली.

भास्करबुवांच्या जीवनांतील कित्येक कालखंडांतील घटनांची कारणपरंपरा अज्ञात, अस्पष्ट आहे; ती अस्पष्टता तशीच राहिली तरी चालेल, पण चुकीच्या माहितीच्या आधारावर चुकीचीं विधानें करूं नयेत, असा माझा कटाक्ष आहे. तो कटाक्ष कसोशीनें पाळण्याचा मीं सर्वत्र प्रयत्न केला आहे.

बुवांचा रोज देवदर्शनास जाण्याचा नेम फार वर्षांचा होता. पुण्यांत आल्यावर बेलबाग त्यांच्या बिऱ्हाडापासून जवळच असल्यामुळें ते दररोज

देवदर्शनासाठीं वेलबागेंत जाऊं लागले. पुढें देवस्थानचे मालक श्री. वेलबागकर ह्यांच्याशीं परिचय होऊन देवस्थानचे गायक अष्टेकरबुवा व नामांकित मृदंगवादक शंकरभय्या ह्यांचाही बुवांशीं परिचय झाला. पुढें क्रमानें 'पूना गायन समाजा 'च्या वतीनें अनेक शाळांत शिकविणाऱ्या गायन-शिक्षकांचाही परिचय नित्य वाढत गेला.

त्या काळीं सुशिक्षित समाजांत रोज देवदर्शनाला जाण्याचा प्रघात असे व देवस्थानांतून सनई-चौघडा वाजवणारे, पुराणिक, कथेकरी व गायक ह्यांची सेवा अखंड चालू असे. भास्करबुवा ह्याच पुराणिक-कथेकरी संप्रदायांतून गायन-विद्येकडे वळलेले. त्यांना स्वाभाविकच ह्या देवस्थानांच्या आश्रयाला असलेल्या विद्वान् व कलावंत मंडळींचें आकर्षण वाटे.

पेशवाईच्या काळीं प्रस्थापित झालेलें हें मांगल्य इंग्रजी राज्यांत वेगानें नष्ट होऊं लागलें. सर्वांचीं उत्पन्नें व जहागिरी कोणत्याही सबबीवर जप्त करण्यांत येत व ह्या श्रीमंतांचे आश्रित जे विद्वान् व कलावंत, ते भिकेला लागत.

भास्करबुवा संसारी असले, तरी विदेही वृत्तीचे इरसाल कलावंत होते. आपणांस किती पैसे मिळतात, ते पुरतील कीं उरतील, ह्याची फिकीर ते करीत नसत. ह्या विदेही साधुसंताच्या संसाराला, मिळालेले पैसे हवे तसे उधळले जाऊं नयेत अशी सावधगिरी बाळगणाऱ्या एखाद्या व्यवहारदक्ष माणसाची जरुरी होती. शंकरबुवा अष्टेकर हे स्वतः कल्पनातीत साधे आणि निरिच्छ असे गवई होते. पण गरिबींत पैशांना जपलें पाहिजे आणि तें कसें जपावें, ही गोष्ट ते अनुभवानें शिकले होते. हीं जुनीं माणसें किती साधीं-भोळीं, निष्कपट व प्रामाणिक होतीं, हें आजच्या चतुर लोकांच्या सहज लक्षांत येणार नाहीं.

भास्करबुवांना इतर गवई पेशाच्या मंडळीस मदत करण्याचें विलक्षण वेड असे. अशी मदत करतांना स्वतःजवळ पुरेसे पैसे आहेत कीं नाहींत, ह्याचें बुवांना कधींही भान नसे. स्वतःला मिळालेलीं जरीचीं वस्त्रें, बुवा नेहमींच कोणातरी गवयांना वांटून टाकीत. शिष्यांना कपडे, वाहाणा, जोडे, धोतरें, वगैरे पुरवून स्वतःचे शिष्य नीट-नेटके दिसावेत ह्याबद्दल बुवा दक्ष असत.

ह्या उधळ्या वृत्तीच्या गैरहिशेबी ' बुवा ' साहेबांना संभाळलें अष्टेकर-बुवांनीं. कारण स्वतःच्या रामेश्वरमंदिरासमोरील फरशीवाल्या साठ्यांच्या वाड्यांतील बिन्हाडाजवळच त्यांनीं बुवांचेंही बिन्हाड थाटलें असल्यामुळें बुवांच्या सर्व हालचालींवर बारीक नजर ठेवणें त्यांना शक्य होत असे. बुवांना आंबे, मिठाई, वगैरे भरमसाट खरेदी करण्याची संधि ते देत नसत. अर्थात् बुवांचें खाणें-पिणें, कपडेलत्ते, वगैरे सुखसोयींत ते कसलीच कमतरता पडूं देत नसत. बुवांची सारी कमाई स्वतःच्या ताब्यांत घेऊन ती ते बुवांच्याच संसारासाठीं वापरीत. संसार भागून जें उरे तें बुवांच्या हातीं पडूं नये म्हणून ते लगेच बुवांच्या पत्नीसाठीं व मुलींसाठीं दागिने घडवून घेत. आणि तेही थोड्या जास्तच किंमतीचे. म्हणजे पुढील प्रसंगीं मागचें देणें दाखवून जादा कमाईची गुंतवणूक सहज करतां येई. बुवांच्या खर्चिक स्वभावाची कल्पना त्यांना असल्यामुळें ही दक्षता क्रमशः घेणें प्राप्त असे. अष्टेकरबुवांनीं भास्करबुवांची किती प्रकारें, किती सेवा केली असेल, त्याला मर्यादा नसे. लक्ष्मणानें रामाची सेवा करावी, तसा प्रकार होता. बुवाही रामाप्रमाणें शंकरबुवांवर पूर्ण विश्वास टाकून असत.

अष्टेकरबुवांना स्वतःचा अगदीं साधा संसार चालविण्यापुरत्या निरनिराळ्या नोकऱ्या असत. ' भारत गायन समाजां ' त तर गायन-शिक्षक म्हणून त्यांची कायमच बैठक असे. ' समाजां ' तून त्यांना कितपत वेतन केव्हां मिळालें असेल कोणास कळे, पण स्वभावच अत्यंत साध्या राहाणीचा व कौटकसरीचा. त्यांना कधींच कांहीं कमी पडलें नाहीं. बुवांनाही त्यांनीं कांहीं कमी पडूं दिलें नाहीं.

बुवा अविश्रान्त गात. शिकवण्या करीत. राहाणी कमालीची साधी. वृत्ति दिसायला विलासी वाटली, तरी अत्यंत निर्व्यसनी, साधेपणाची. व्यसन फक्त अविरत गाण्याचें. श्रमपूर्वक गाण्याचें. त्यामुळें नियमित खाणें, दूध पिणें, वगैरे फैजमहंमदखांनीं घालून दिलेली शिस्त थोडी-फार पाळीत.

अष्टेकर हे बुवांचा ' समाज ' चालवीत. कधीं सिंध-पंजाबच्या दौऱ्यावर बुवांबरोबर जात. बुवांच्या संसाराला जें किंचित् स्थैर्य होतें, तें सर्वस्वीं अष्टेकरबुवांचें कर्तृत्व. बुवांच्या मृत्यूनंतरही ' समाज ', बुवांच्या मुली, पत्नी,

ह्या सर्वांना अष्टेकरबुवांचा एकमेव आधार होता. भास्करबुवांना कमाई नेहमींच भरपूर होई. दौऱ्यावर गेले, कीं प्रतिवर्षी दोन-चार हजारांची बुवा कमाई करीत. पण बुवांनीं फारशी शिल्लक ठेवली नाहीं.

बुवांनीं पुण्यास बिऱ्हाड केलें, तरी ते तेथें स्थाइक होतील, अशी स्थिति अजून आली नव्हती. शिकवण्यांच्या व मैफलींच्या निमित्तानें ते पुणें व मुंबई ह्या दोन्ही ठिकाणीं जाऊन-येऊन असत. शिवाय 'किर्लोस्कर मंडळी' शीं जो बुवांचा ऋणानुबंध जडला होता, त्यामुळें कंपनीचा मुक्काम जेथें जेथें जाई, तेथें तेथें बुवांना सल्ला-मसलतीसाठीं जावेंच लागे. भाऊरावांच्या मृत्यूनंतर 'किर्लोस्कर मंडळीं' त त्यांच्या तोला-मोलाचा गायक नट कोणीच नव्हता, तरी बुवांचे अनेक नवे-जुने शिष्य कंपनीला मिळाले असल्यामुळें खास अडचण भासत नसे. पण ह्याच सुमारास पुण्यांत मुक्काम असलेल्या 'नाट्यकला प्रवर्तक नाटक मंडळी' ला सवाई गंधर्वांसारखा गायक-नट लाभल्यामुळें 'किर्लोस्कर मंडळी' स उत्तम गायक-नटाची उणीव तीव्रतेनें जाणवूं लागली होती. हे सवाई गंधर्व म्हणजे बेळगांव येथें अब्दुल-करीमखांसाहेबांकडे पूर्वींच शिकून तयार झालेले रामभाऊ कुंदगोळकर होत.

'किर्लोस्कर कंपनी' चा मुक्काम ह्या काळीं पुण्यास असून नाट्याचार्य खाडिलकर, श्रीपाद कृष्णांचें 'प्रेमशोधन' नाटक बसवीत होते. खाडिलकरांस भास्करबुवांच्या अद्भुत गायकीनें मोहून टाकलें होतें. कारण त्यांची गायनाची अभिरुचि शास्त्रीय वळणाची असे व त्याच वळणाचीं गाणीं 'प्रेमशोधनां' त आणण्याचा त्यांचा बेत होता. श्रीपाद कृष्णांसही थोडेंसें गाण्याचें ज्ञान व आवड असून, ते स्वतः गुणगुणून साधारण गाणें म्हणत असत. गाण्यांच्या चालींत वैचित्र्य यावें म्हणून त्यांचें लक्ष उर्दू व गुजराथी रंगभूमीवरील गायनाकडे असे. जयशंकर सुनरी व इतर गुजराथी नटांच्या गाण्यानें मुंबईचा पारशी, बोहरी, गुजराथी समाज आकर्षिलेला त्यांनीं पाहिला होता आणि त्या वळणाचें गाणें त्यांनाही आवडे.

नानासाहेब जोगळेकर किंवा नाट्याचार्य खाडिलकर ह्यांचा कल हिंदुस्थानी शास्त्रीय संगीताकडे होता. पण श्रीपाद कृष्णांनीं घरांत गाणें न शिकलेल्या बायका ज्या प्रकारचें गाणें गातात, तशा कांहीं चाली 'प्रेमशोधनां' तील

नंदिनीचें काम करणाऱ्या नारायणराव राजहंसांसाठीं निवडल्या होत्या व जरा अवघड चाली कंदनाचें काम करणाऱ्या गणपतराव बोडसांसाठीं योजल्या होत्या. नंदनाची भूमिका करणारे नानासाहेब जोगळेकर शास्त्रीय वळणाचेंच काय, पण साऱ्या रंगभूमीवरील गाण्याचा नूर पालटून टाकण्याइतके प्रभावी गायक आहेत, ह्याची जाणीवही त्यांनीं ठेवलेली दिसली नाहीं.

श्री. खाडिलकर व जोगळेकर ह्यांस श्रीपाद कृष्णांचें हें धोरण पटलें नसावें. पण कोल्हटकर स्वतःच्या नाटकांत, काय इष्ट व काय अनिष्ट तें ठरवतील, त्यांना उपदेश करण्याचा अधिकार आपला नाहीं, हें जाणून खाडिलकर-जोगळेकर तटस्थ राहिले. तरीही शेवटीं आपल्या मंडळींतील गायनाचा एक मोठाच आधार असे जे भास्करबुवा त्यांच्या गाण्याकडे कोल्हटकरांचें लक्ष वेधण्याचें योजून 'किर्लोस्कर थिएटर' मध्यें एके संध्याकाळीं भास्करबुवांचें गाणें ठेवलें. खाडिलकर, कोल्हटकर, गंधर्व व 'किर्लोस्कर कंपनी' तील नोकर मंडळी गाणें ऐकायला बसली होती.

श्रीपाद कृष्णांना भास्करबुवांचें गाणें कितपत समजलें वा आवडलें असेल हें सांगणें कठीण आहे. बुवा त्या बैठकींत 'कोण तुजसम सांग' हें 'सौभद्र' नाटकांतलें गाणें म्हणाले असावेत. कारण खामगांवला गेल्यावर श्रीपाद कृष्णांनीं त्याच चालीवर 'योग्य कानन मोहण्या ही नारी' हें पद जोगळेकरांसाठीं करून पाठविलें. तरीही इतर गाण्यांत भास्करबुवांची गायकी पेलणारे श्री. जोगळेकर ह्यांस पुरेसा वाव देण्याचें श्रीपाद कृष्णांच्या डोक्यांतसुद्धा आलें नाहीं.

वरील मनोरंजक हकिकतीवरून एक निष्कर्ष निघतो, तो म्हणजे नाट्यरसिकांना नाटकांतील गाण्यांना लागलेलें शास्त्रीय वळण आवडत तर होतेंच पण मानवतही होतें. ह्यांतूनच पुढें शास्त्रीय बैठकीच्या गाण्याचेंही पाऊल पुढें पडूं लागलें आणि आत्तांपर्यंतच्या संस्थानिकांच्या आश्रयापेक्षांही गायन-वादन-विद्या सामान्य बहुजन समाजाच्या आश्रयाकडे वळूं लागली. अर्थातच ही वाढती सामाजिक गरज शास्त्रीय ज्ञानाचा परिचय करून देणाऱ्या अनेक गायन-समाजांनीं उत्तरोत्तर वृद्धिंगत होत जाऊन, गायन-वादन अधिक जिज्ञासूपणें, अधिक रसिकतेनें ऐकण्याची प्रवृत्ति वाढत

१२

होती. जे आठ-दहा महान् विद्वान् १९०० च्या सुमारास महाराष्ट्रांत आले, त्यांनीं शिकविलेला शिष्यसंप्रदाय वाढूं लागला.

'पुणें गायन समाजां' त गेल्या दहा वर्षांत बळवंत गोविंद बापट, हरि बळवंत बापट, जगन्नाथबुवा पंढरपूरकर, गणपतबुवा पाध्ये (हैद्राबादच्या भटजीबापूंचे शिष्य), बळवंतराव दिवटे, गणपतबुवा भिलवडीकर, आठवले, वगैरे अनेक विद्वान् ध्रुपदगायक शिक्षक म्हणून नेमले गेले होते. ह्या मंडळींपैकीं अनेक लोक स्वतंत्र बुद्धीचे, अभ्यासी व कर्तबगार गायन-शास्त्रज्ञ होते. पाठक, वगैरे ध्रुपद-धमार गायकांचा शाळा-खात्याशीं किंवा गायन-समाजांशीं संबंध आला नाहीं. परंतु तुळशीबाग, बेलबाग, पर्वती, वगैरे देवस्थानांत नोकऱ्या करून गायन-विद्येचा सचोटीनें शास्त्रोक्त अभ्यास केलेली अशी ही मंडळी असत. ध्रुपद-धमाराचें व इतर ढंगांचें गायन शिकून कथेकऱ्याच्या पेशांत जगणारी अनेक गळेबाज विद्वान् गायक मंडळी असत. भाऊराव कोल्हटकर, भास्करबुवा बखले, नारायणराव बालगंधर्व व बाळकृष्ण-बुवांसारखे अनेक गवईही कथा-कीर्तनकारांच्या परंपरेंतूनच वर आले असल्यामुळें परंपरेचें हें सातत्य लक्षांत घेतलेंच पाहिजे.

कोणत्याही विद्या-कलेची परंपरा त्या त्या परंपरेची अर्थव्यवस्था लक्षांत न घेतां समजून घेणें हें केवळ आंधळ्या कोशिंबिरीच्या खेळासारखें ठरतें. संगीत परंपरेच्या महाराष्ट्रांतील विकासासंबंधीं अनेक शौकीन, रसिक व चतुर लेखकांनीं लेख व ग्रंथही लिहिले आहेत. त्या लेखनांत ह्या अर्थ-व्यवस्थेकडे दुर्लक्ष झाल्यामुळें विद्येच्या व कलेच्या उत्कर्षापकर्षाचें तें वृत्त अपुरें वाटतें.

आपण त्या परंपरेंतील अर्थव्यवस्थेचा आतां प्रत्यक्ष विचार करूं या. सुशिक्षित व प्रतिष्ठित समाजापलीकडे ज्या कलावंतिणींच्या प्रयत्नानें गायन-वादनाची जोपासना होई, त्यांच्या संघटनेकडे विशेष लक्ष दिलें, तर गायन-वादनाच्या परंपरेच्या अखंडत्वाचें रहस्य सहज लक्षांत येईल.

गायिकांच्या कोठींत एक-दोन उस्ताद, तबलिये, सारंगीवाले, वगैरे दहा-पांच लोकांची एकेक संघटना असे. शौकीन लोक अशा कोठ्यांत जाऊन नाच-गाण्याला बसायचे. गाणें आवडो, न आवडो, तास-अर्धा तास बसून, दोन-पांच रुपये ऐपतीप्रमाणें टाकून, दुसऱ्या कोठींत जायचे. गाणें आवडेल

तेथेंमात्र मन मानेल तेवढा वेळ बसून दहा-वीस रुपये टाकून उठायचे. अशा रीतीनें प्रत्येक कोठींतल्या तबकांत मध्यरात्र उलटेपर्यंत वीस-पंचवीस ते शें-पाऊणशें रुपये जमत. ह्या पैशांपैकीं तबलिया, सारंगीवाला, नाच-गाण्यांचे उस्ताद, घरभाडें, वगैरे हिस्से देऊन उरेल ती कमाई कोठीच्या बाईची, किंवा बायांची. ह्या व्यवस्थेनें अनेक वर्षें रियाज करणारे उस्ताद, त्यांचे चेले, ह्यांना पोटाची विवंचना नसल्यामुळें अशा कोठ्यांतून अनेक तबलजी, सारंगी-वादक, कवाली-गायक तयार होत. त्यांतून उच्च दर्जाचे कलावन्त निर्माण होणें अगदीं स्वाभाविक क्रमानें घडे. सुखवस्तु विलासी शहरांत ही एक प्रकारची लोकशाही शेंकडों वर्षें तग धरून आहे. ह्या अगदीं हलक्या अवस्थेंतून अनेक अलौकिक गायक-वादक समाजाला लाभले असून ही परंपरा अखंड चालू राहिली आहे. इतर कोणताही टिकाऊ आधार ह्या परंपरेस नव्हता. मुंबईत अनेक मोठे नामांकित गवई आले व राहिले. क्वचित् त्यांना प्रतिष्ठित समाजांतून जलशांच्या, मैफलींच्या रूपानें मान्यता मिळाली, तरी त्यांचें पोट भागणें, आयुष्यभर कलानिष्ठ व्यासंग होणें, ह्यासाठीं एका स्थिर अर्थव्यवस्थेची अपेक्षा सदैव असे. कलावंताला व त्याच्या कुटुंबालाही रोज पोटाला लागतेंच !

अनेक नामांकित पखवाजी लोक, नृत्य शिकविणारी गुरव मंडळी, ही देवदासी वा कलावंतिणींच्याच आश्रयानें आपली विद्या करीत, वाढवीत. काळ पालटला. कांहीं गायकांस कथेकरी म्हणून वा नाटक कंपन्यांत पोटाचें साधन उपलब्ध होई, पण त्यांचा विद्याव्यासंगाचा क्रम खंडित होत असे. अनेक गोड आवाजाचीं मुलें नाटक कंपन्यांतून आलीं व गेलीं. कोणी निदान पेटी वाजवायला तरी शिकलीं, पण कांहींना गाणें सोडून हॉटेलमध्यें कपबश्या विसळायला राहावें लागलें.

काळ पालटत होता. सर्वच प्रकारच्या शिक्षणाचा प्रसार होत होता. पण देशांतले अनेक जुने धंदे व व्यवसाय डफघाईस येत होते. कलांच्या शिक्षणाचें स्वरूपही काळाप्रमाणें पालटलें. परंतु ह्या नवशिक्षित कलावंतांना नवें कार्यक्षेत्रमात्र निर्माण झालें नव्हतें. पूर्वीं कला-व्यवसाय करणारी मंडळी अनीतिमान् म्हणून खालच्या दर्जाची गणली जात. आतां त्यांचें शिक्षण व

व्यवसाय ह्यांना सभ्य स्वरूप प्राप्त झालें असलें, तरी सामान्यतः कलावंत वर्ग हा कंगाल व त्यामुळें कमी दर्जाचा मानला जाई. नवीन शिक्षण-संस्थांत गायन व चित्रकला शिकविणारास एका माणसाचें पोट भरेल इतकेंच वेतन मिळे.

गायन-वादनाच्या शिक्षणास आधुनिक वळण देण्याचा एक फार मोठा उपक्रम ह्या सुमारास पं. विष्णु दिगंबर ह्यांनीं मुंबईस सुरू केला होता. हा उपक्रम म्हणजे 'गांधर्व महाविद्यालया'ची स्थापना. पंडितजींनीं 'विद्यालय' सुरू करून केवळ एक मोठी गायन-वादन शाळा काढली एवढेंच नव्हे, तर गायन-विद्येची सामाजिक प्रतिष्ठा वाढण्यास जे-जे बाह्योपचार अवश्य ते-ते पंडितजींनीं अंगीकारले. निश्चित शिक्षणक्रम, निश्चित काळांत किमान शिक्षण देण्याची हमी, अतिशय वक्तशीरपणा, प्रत्येक विभागावर लायक अशा गुरुजींची नेमणूक, अशी बिनतोड संघटना पंडितजींनीं उभारली आणि 'गांधर्व महाविद्यालयां'तील विद्यार्थ्यांची संख्या शेकड्यांनीं मोजण्याइतकी झाली. दिलरुबा, सतार, व्हायोलिन, तबला, वगैरे वाद्यें शिकविण्याची सोय होतीच. पण शिवाय दरवर्षी निश्चित कांहीं राग नोटेशनसह शिकविण्याचा उपक्रम सुरू केल्यामुळें पारशी, गुजराथी, वगैरे सधन समाजांतलेही विद्यार्थी विद्यालयांत येऊं लागले.

'विद्यालया'शिवाय पंडितजींचे खाजगी जलसेही त्यांस पैसा व प्रतिष्ठा देण्यास कारणीभूत झाले. धनवान् मंडळी, इंग्रजी सरकारी अधिकारी व इतरही सुशिक्षित समाज पंडितजींच्या कर्तृत्वाच्या प्रभावानें दिपून गेला. पंडित विष्णु दिगंबर ह्यांचा जीवनविषयक व कलाविषयक दृष्टिकोन अगदीं अर्वाचीन वळणाचा होता. विद्यालयांतील टापटीप अगदीं शाळा-कॉलेजांतल्या-सारखी असे. ह्या विद्यालयाची पूर्वतयारी पंडितजींनीं १९०१ मध्यें लाहोरलाच केलेली असल्यामुळें लायक असा शिक्षक-वर्गही एव्हांना तयार झाला होता. ह्याच सुमारास मुंबईत अनंत मनोहर, पं. भातखंडे, वगैरे मंडळींनींही अशाच वळणाचीं संगीत विद्यालयें सुरू केलीं होतीं.

प्रकरण पंधरावें

## ' किर्लोस्कर भारत गायन समाज '

कोणत्याही असामान्य व्यक्तीचें कार्य आजच्या समाजव्यवस्थेंत संस्थारूपानेंच व्यापक व टिकाऊ बनूं शकतें. वैयक्तिक कष्ट समाज विसरतो, असाच सर्वत्र अनुभव येतो. भास्करबुवांना त्यांच्या कर्तृत्वाच्या प्रारंभकालापासूनच गायन-शाळांचा अनुभव होता. बडोद्याच्या दोन शाळांप्रमाणें मुंबईची नातूंची संगीत शाळा, प्रिन्सेस स्ट्रीटवरील ' श्रीपाद संगीत विद्यालय ', भातखंडे, अनंत मनोहर, वगैरे मंडळींच्या शाळा, पंडित विष्णु दिगंबर ह्यांनीं लाहोर व मुंबईत सुरू केलेलें ' गांधर्व महाविद्यालय ' व अबदुलकरीमखांसाहेबांचा बेळगांवचा ' गायन समाज ' व ' सरस्वती संगीत विद्यालय ', धारवाडचा गायन समाज, ' पुणें गायन समाज ' ह्या सर्व संस्थांचें कार्य भास्करबुवांच्या डोळ्यांसमोर होतें. हें कार्य करणारे सर्व लोक भास्करबुवांच्या परिचयाचे होते. पुण्यांत स्थाइक झाल्यावर आपणही आपलें एक संगीत विद्यालय स्थापन करावें, असा विचार भास्करबुवांनीं निश्चित केला.

ह्या सुमारास पुण्यांत उच्च दर्जाच्या गायक-शिक्षण-संस्थेची गरज तीव्रतेनें भासूं लागली होती. एका अनपेक्षित घटनेनें, पुण्यांत एक संगीत विद्यालय निघावें व तें भास्करबुवांनीं चालवावें, अशी कल्पना निर्माण झाली. ह्या काळीं ‘ किर्लोस्कर कंपनी ’तील नवीन गायक मुलें गाण्याच्या शिकवणीसाठीं ‘ गांधर्व महाविद्यालयां ’त जात. ‘ किर्लोस्कर कंपनी ’चें नवें नाटक ‘ मानापमान ’ मुंबईंत रंगभूमीवर आलें, त्यांत मालक नानासाहेब जोगळेकर हे धैर्यधर ह्या नायकाची भूमिका करीत. त्यांचीं कित्येक गाणीं त्या काळीं गाजलीं व लोकप्रिय झालीं; परंतु त्यांच्या गायनशैलीवर पं. विष्णु दिगंबर ह्यांनीं जाहीर समारंभांत खूप कडक शब्दांत टीका केली. ती श्री. जोगळेकर ह्यांस आवडली नाहीं. त्यांच्या मैफलींतल्या गाण्यावरची टीका त्यांनीं सहन केली असती, पण पंडितजींनीं त्यांच्या रंगभूमीवरील गाण्यावर जो हल्ला केला, तो त्यांना मानवला नाहीं. कारण ते ‘ किर्लोस्कर कंपनी ’चे मालक होते. पंडितजींच्या प्रतिकूल अभिप्रायामुळें ‘ मानापमान ’ नाटकाबद्दल जनतेंत गैरसमज होऊन कंपनीचें बरेंच नुकसान होईल, असें त्यांस वाटलें.

ह्या घटनेनंतर श्री. जोगळेकर ह्यांनीं ठरविलें, कीं ‘ किर्लोस्कर मंडळी ’चा ‘ गांधर्व महाविद्यालया ’शीं असलेला संबंध तोडून कंपनींतील गायक नटवर्गासाठीं स्वतंत्र संगीत विद्यालय स्थापन करायचें. कंपनीच्या सल्लागार साहाय्यकांत भास्करबुवा होतेच आणि कंपनींतील बराच नटवर्गही त्यांच्याकडेच शिक्षण घेणारा होता. त्यामुळें भास्करबुवांसच एखादें विद्यालय कंपनीनें काढून दिल्यास, कंपनींतील नटवर्गाच्या गायन-शिक्षणाची तर सोय होईलच, पण गायनाच्या शिक्षणाला व प्रचारालाही मदत केल्यासारखें होईल, असा विचार करून नानासाहेब जोगळेकरांनीं मंडळींच्या सल्लागारांचा विचार घेतला. खूप भवति न भवति होऊन शेवटीं ‘ भास्कर गायन समाज ’ नांवानें विद्यालयाची स्थापना करून त्यांत कंपनीनें पुढाकार घेण्याचें ठरलें. पण खुद्द बुवांनींच ह्या नांवाला विरोध दर्शविला म्हणून ‘ किर्लोस्कर भारत गायन समाज ’ हें नांव निश्चित झालें.

‘ किर्लोस्कर संगीत नाटक मंडळी ’च्या सल्लागारांपैकीं डॉ. गर्दे व ‘ केसरी ’चे संपादक तात्यासाहेब केळकर ह्यांच्या सहीचें प्रसिद्धिपत्रक जाहीर

करण्यांत आलें. बुवांचे शिष्य नसलेले पण पूर्वपरिचित चाहाते, संगीतप्रेमी सुशिक्षित गृहस्थ गोविंदराव टेंबे हे समाजाचे चिटणीस आणि नानासाहेब हर्डीकर हे मदतनीस, अशी संघटना निश्चित झाली. गांवोगांवीं नाटक मंडळीचा मुक्काम असेल तेथें गायन-वादनाचे जलसे करून त्यांचें उत्पन्न शाळेच्या खर्चासाठीं वापरावें आणि भास्करबुवांना गायन समाजाचे प्रिन्सिपल म्हणून निश्चित वेतन द्यावें, अशी योजना ठरली.

सुरुवातीचें हें वृत्त जेवढें जमा करतां आलें, तेवढें सर्व 'भारत गायन समाजा'चे कार्याध्यक्ष रावसाहेब केळकर ह्यांनीं स्वतंत्रपणें प्रसिद्ध केलेंच आहे. त्यांत 'भारत गायन समाज' ह्या संस्थेच्या संस्थापकांत 'किर्लोस्कर नाटक मंडळी', भास्करबुवा व गोविंदराव टेंबे हे भागीदार असल्याचा उल्लेख असला, तरी गोविंदराव टेंबे हे स्वतंत्रपणें एका शाखेंतील प्रवीण म्हणून 'समाजां'त सामील झाले होते. भास्करबुवांच्या चरित्राशीं ह्या संस्थेचा निकटचा, टिकाऊ व जिव्हाळ्याचा संबंध असल्यामुळें त्यांच्या चरित्रांत हें छोटें प्रकरण अतिशय महत्त्वाचें आहे.

१९३६ सालीं प्रसिद्ध झालेल्या संस्थेच्या पंचवीस वर्षांच्या अहवालांत पुढील माहिती नमूद झाली आहे : "'भारत गायन समाज' ही संस्था भाद्रपद शुद्ध ८ शके १८३३ रोजीं (ता. १ सेप्टेंबर, १९११) कै. संगीताचार्य भास्करबुवा बखले ह्यांनीं पुणें येथील सुप्रसिद्ध 'किर्लोस्कर थिएटर' मधील मागील इमारतींत स्थापन केली. ह्या 'समाजा'चें पहिलें नांव 'किर्लोस्कर भारत गायन समाज' असें होतें. ही संस्था स्थापन करण्याचा हेतु आरंभीं दिलेल्या उद्देशाप्रमाणें म्हणजे 'शुद्ध व शास्त्रीय संगीताचा प्रसार करणें, त्यासंबंधीं निबंध, ग्रंथ, वगैरे प्रसिद्ध करणें, गायन-वादनाचे वर्ग चालविणें, इत्यादि' ह्याच होता; व शिवाय उत्तम तऱ्हेनें गाणारे नट तयार करण्याचाही होता. कै. भास्करबुवा ह्यांना ही संस्था स्थापन करण्याच्या कामीं कै. नारायणराव जोगळेकर ह्यांनीं साहाय्य केलें. किंबहुना त्यांच्या प्रेरणेनेंच कै. भास्करबुवांनीं ही संस्था स्थापन केली, असें म्हणायला हरकत नाहीं."

'समाज' स्थापन झाला त्या वेळचा अध्यापक वर्ग पुढीलप्रमाणें होता : (१) भास्करबुवा : प्रिन्सिपल व मुख्य गायन-शिक्षक. (२) श्री. शंकरबुवा

अष्टेकर : व्हाइस प्रिन्सिपल व गायन-शिक्षक. ( ३ ) श्री. गोविंदराव टेंबे : सेक्रेटरी व हार्मोनिअम-शिक्षक. ( ४ ) श्री. नानासाहेब हर्डीकर : जॉइंट सेक्रेटरी. ( ५ ) श्री. गुंडोपंत वालावलकर : साहाय्यक हार्मोनियम-शिक्षक. ( ६-७-८ ) गणपतराव पुरोहित, बळवंतराव दिवटे व कै. दत्तूबुवा बागलकोटकर : गायन-शिक्षक. ( ९ ) श्री. वामनराव ( कोचीनचे ) : फिड्ल्–शिक्षक. ( १० ) शंकरभय्या : तबला-शिक्षक. ( ११–१२ ) श्री. रहिमतखां पुणेंकर व एकनाथ पंडित : जलतरंग व सतार-शिक्षक.

ह्या संघटनेकडे पाहातांच मुंबईच्या ‘ गांधर्व महाविद्यालया ’ ची संघटना ‘ भारत गायन समाजा ’ च्या संस्थापकांच्या डोळ्यांपुढें होती, हें उघड दिसतें. ‘ किर्लोस्कर मंडळी ’ चे सल्लागार हेच ‘ भारत गायन समाजा ’ चेही संचालक-सल्लागार होते. समाजाची स्वतंत्र संघटना व संचालक-मंडळ नव्हतें. भास्करबुवा हे पगारी प्रिन्सिपल म्हणून राहावे अशी योजना होती.

उपजत गुण, उपजत स्वाभाविक गोड गळा, ह्यांच्यापासून फार दूर, आटोक्यापार असें गायन-कलेंतील स्वरेल रचनांचें मार्मिक आकलन असतें, त्या अटकेपार जाण्यासाठीं सर्व-सामान्य तांत्रिक ज्ञानाचा फारच भक्कम पाया अवश्य असतो. नुसतें गाणें वा वादन रसज्ञतेनें ऐकायलाही निदान एक तपाचा अभ्यास अवश्य असतो, हें सत्य अघोरी अभ्यास केलेल्या प्रत्येक कलावंताला निश्चित ठाऊक असतें. भास्करबुवांसारख्या अविरत पंचवीस-तीस वर्षें अभ्यास केलेल्या व सौंदर्य-निर्मितीच्या सर्व सिद्धि आत्मसात् केलेल्या कलावंताला हें रहस्य निश्चितच समजत होतें.

समाजांत शेकडों मुलें-मुली शिकल्या, तर त्यांतूनच एखाद-दुसरा महान् कलावंत निर्माण होण्याची शक्यता अधिक. स्वतः त्यांना व त्यांच्या पिढीपूर्वीच्या विद्यार्थ्यांना जें दिव्य करावें लागलें, तशी खडतर अवस्था पुढच्या पिढीला अनुभवावी लागली नाहीं, तर अधिक संख्येनें संगीत-कलाप्रेमी समाज निर्माण होईल; व गाणारे तयार न झाले, तरी निदान गाणें ऐकणारे तरी तयार होतील. महान् गायनाचार्यांची योग्यता ओळखणारे, त्यांच्याकडे प्रेमादरानें पाहाणारे लोक तयार झाले, तरी तोही कलाक्षेत्रांत एक खूपच मोठा फायदा होईल, हें बुवा जाणून होते.

कोणाच्या कां प्रेरणेनें होईना, संगीत-कलेची उपासना करणारी व विद्यादान करणारी एक संस्था निघाली, तर त्या संस्थेसाठीं तन-मन-धन अर्पण करण्यास भास्करबुवा उत्सुक होते. धारवाडच्या नोकरीपेक्षां 'भारत गायन समाजा' चे संचालक ही नोकरी बरी होती.

ज्यांच्या प्रेरणेनें 'भारत गायन समाज' सुरू झाला, ते नारायणराव जोगळेकर 'समाज' स्थापन झाल्यावर चारच महिन्यांत कालवश झाले. 'किर्लोस्कर थिएटर' ची मागची जागा अपुरी व गैरसोईची वाटूं लागली, म्हणून लवकरच 'किर्लोस्कर भारत गायन समाज' दाणेआळींतल्या भुतकरांच्या वाड्यांत हलविण्यांत आला. समाजाला सरकारी मदत मिळवणें त्या काळीं अवघड होतें. म्हणून नारायणराव जोगळेकरांनीं दरसाल एक हजार रुपये मदत देण्याचें जाहीर आश्वासन 'किर्लोस्कर नाटक मंडळी' च्या वतीनें धारवाडच्या जलशांत दिलें होतें. पण हें आश्वासन पुरें करण्यास स्वतः नानासाहेबच हयात नव्हते. कंपनीला थिएटर-बांधणीपायीं बरेंच कर्ज झालें होतें. त्यामुळें 'किर्लोस्कर भारत गायन समाज' हें नांव टिकलें, तरी समाजाला प्रत्यक्ष आर्थिक मदत देणें नाटक कंपनीस सोयीचें नव्हतें.

ज्या-ज्या गांवीं 'किर्लोस्कर मंडळी' चा मुक्काम असेल, तेथें तेथें जाहीर गायन-वादनाचा एकेक जलसा होऊन, खर्चवेंच जातां राहिलेलें उत्पन्न 'किर्लोस्कर भारत गायन समाजा' स मिळे. नारायणराव राजहंस हे कंपनीचे प्रमुख लोकप्रिय नट जलशांत गायला बसत, पण मुख्यतः गाण्याची मैफल भास्करबुवांच्या गाण्यावरच अवलंबून असे. नाटकाच्या मानानें जलशास फारच थोडें उत्पन्न होई. त्यामुळें समाजांतील शिक्षक-वर्गाचा पगार, वगैरे नित्यखर्चासाठीं पैसा उभा करणें अत्यावश्यक असे. शें-दीडशें विद्यार्थी शिकायला आले, तर जेम-तेम शें-सवाशें रुपये फी जमे. घरभाडें, वाद्यें व त्यांची दुरुस्ती, वगैरे नित्यखर्च चालविण्यास समाजास दरसाल किमान सहा ते दहा हजार रुपयांची जरुरी होती. शिक्षकांस वेताचाच पगार असे. आठ-दहा जलसे झाले, तर दीड-दोन हजार रुपये प्राप्ति व्हायची. हजार रुपये वार्षिक फीचें उत्पन्न होई.

एक गायन-वादन-शाळा चालवायची, हा अतिशय आनंदाचा उपक्रम असला, तरी शिक्षकांचें पोट भरणें अवश्य होतें. नारायणराव जोगळेकरांच्या मृत्यूनंतर ‘समाजा’चे चिटणीस गोविंदराव टेंबे ‘समाज’ सोडून ‘किर्लोस्कर नाटक मंडळी’चे नायक बनले. पेटी-वादनाचा वर्ग गुंडोपंत वालावलकर ह्यांच्या स्वाधीन करण्यांत आला. तरी पेटी शिकण्यास जे साठ-पाऊणशें विद्यार्थी येत, त्यांपैकीं नवीन विद्यार्थ्यांस शिकविण्यास श्री. दातार ह्या विद्यार्थ्याची योजना करावी लागली. ‘समाजां’त फुकट शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांनीं तीन वर्षें शिक्षण होतांच ‘समाजां’त अगदीं माफक पगारावर नोकरी करावी, असा करार सुचविण्यांत आला. सार्वजनिक मदतीनें चालणारी संस्था म्हणून असले नियम व शिस्त ठेवावीच लागे.

खुद्द भास्करबुवा सकाळीं, दुपारीं, संध्याकाळीं व रात्रीं ‘समाजां’त शिकवीत, पण त्यांना त्यांच्या अगदीं छोट्याशा संसाराइतकेही पैसे, पगार निश्चित झाला असतांही, ‘समाजा’कडून मिळणें शक्य नव्हतें. आर्थिक तुटीच्या भरीला, पुण्यांतली प्रतिवर्षीं येणारी प्लेगची साथ, वगैरे दुसरींही संकटें असत. भास्करबुवांजवळ शिक्षणाऱ्या कलावंत स्त्रिया मुख्यतः मुंबईत असत. बुवांजवळ ‘समाजां’त शिकणारी मंडळी फी देण्यास बहुधा असमर्थ, अतएव फुकट शिकणारीच असत. पण भास्करबुवा केवळ गायन-विद्येच्या प्रेमानें अखंड मेहनत घेऊन शिकवीत. स्वतःच्या चाहात्यांकडून व गायनप्रेमी मंडळींकडून मदत मिळवून ‘समाजा’ला स्थैर्य आणण्यासाठीं बुवा प्रयत्नशील असत. त्यांनीं ‘भारत गायन समाजा’साठीं पहिल्या पांच वर्षांत केलेल्या प्रचंड प्रयत्नांकडे पाहिलें, तर कोणालाही कौतुक वाटेल.

‘समाजा’ची स्थापना झाल्यापासून एकच वर्षानें, सेप्टेंबर १९१२ त, बुवांना एक महान् बुद्धिमान् शिष्य मिळाला. ह्याचें नांव कृष्णा फुलंब्रीकर. सेप्टेंबर १९२२ मध्यें काळाचें बोलावणें येईपर्यंत बुवांनीं ह्या शिष्याला जितकें शक्य झालें तितकें शिकविलें. ह्या नवीन शिष्याचा आवाज किंचित् घोगरा, बराच कमताकत असला, तरी त्याच्या गळ्याला त्याच्या पूर्व-प्रयत्नांनीं बरें वळण लागलेलें होतें. मिलवडीकर, सवाई गंधर्व, वगैरे मंडळींच्या सहवासांत व ‘नाट्यकले’तील तालमीनें कृष्णाच्या गाण्याला आकर्षक वळण

लागलें होतें. कुशा नारायणराव जोगळेकरांचीं 'मानापमानां' तील पदें ऐकून ऐकून अतिशय सफाईनें म्हणे. हीं कुशाचीं पदें मीं १९११ च्या डिसेंबरमध्यें दिल्लीच्या दरबार सोहळ्यानिमित्त मुंबईस कापाच्या मैदानावर भरलेलें भव्य प्रदर्शन पाहाण्यास वडिलांसह मुद्दाम पुण्याहून आलों असतां गोकुळदास देवजीच्या वाडींत ऐकलीं होतीं. तीं आवडल्यामुळें माझ्या वडिलांनीं त्याला 'नाट्यकले' त प्रवेश मिळवून दिला. सर्व लोकांच्या व गायकांच्या नकला करणें, हा त्याच्या खोडकर स्वभावाचा भाग होता. ह्या कुशानें हरिभाऊ आपटे ह्यांच्या 'संत सखू' नाटकांत 'विठ्ठला' ची भूमिका करून ह्यापूर्वीं नांवलौकिक मिळविला होता. हें 'संत सखू' नाटक हरिभाऊंच्या 'करमणूक' साप्ताहिकाच्या १ एप्रिल, १९११ च्या 'वसंत' अंकांत प्रसिद्ध झालें. त्यांतलें 'भक्तजन सदा' हें कुशाचें गाणें सर्वत्र लोकप्रिय झालें. ह्या गाण्याची चालही 'मानापमानां' तील 'सेवि रविकरा' ह्या गाण्यावरून घेतलेली होती. त्यानंतर कुशाचा 'मास्टर कृष्णा' झाला. नाटकांत थोडें नांव मिळून, 'सौभद्रां' त नारदाचें काम करून, तींही पदें नीटनेटकीं म्हणून, मास्टर कृष्णा ह्यांचें नांव गायक नट म्हणून प्रस्थापित झालें व लवकरच त्यांना गायनाचें स्वतंत्र शिक्षण देण्याचे घरच्या मंडळींचे प्रयत्न सुरू झाले.

पुण्यांत मास्तर कृष्णांचे वडील बंधु दत्तोपंत हे अब्दुल करीमखांसाहेबांनीं शुक्रवार पेठेंत १९१२ सालीं स्थापन केलेल्या 'आर्य संगीत विद्यालया' शीं संबंधित होते. त्यांनीं धाकटा भाऊ कुशा ह्याला खांसाहेबांकडे नेलें. आपले शिष्य सवाई गंधर्व रामभाऊ ह्यांच्याच कंपनींत ह्या मुलानें नोकरी केली, आपण त्याला शिकविलें, तरी फी देण्याची त्याची ऐपत नाहीं, वगैरे बोलणीं दत्तोपंतांनीं केलीं.

खांसाहेबांनीं आनंदानें कबूल केलें, कीं मुलानें फी देऊं नये; पण पांच वर्षें शिक्षण घेतल्यावर 'आर्य संगीत विद्यालयां' त तीन वर्षें विनावेतन अथवा विद्यालयाला परवडेल तें वेतन घेऊन, त्यानें शिक्षक म्हणून काम करावें. खांसाहेबांची ही अट अगदीं सयुक्तिक होती. पण ती दत्तोपंतांनीं मान्य केली नाहीं. दुसरे एक मध्यस्थ घेऊन त्यांनीं मास्तर कृष्णरावांस

भास्करबुवांकडे नेलें. त्यांनीं कोणतीच अट न घालतां मास्तर कृष्णरावांस शिकविण्याचें कबूल केलें व १९१२ अखेर हा सुप्रसिद्ध गुरु-शिष्यसंबंध प्रस्थापित झाला.

मास्तर कृष्णा ह्यांचा आवाज किंचित् घोगरा व कमी मर्यादेंत सरळ फिरणारा असला, तरी त्यांच्या आवाजांत गोडी होती. फिरत अंगवळणीं पडली होती. अनुकरणाची शक्ति उत्तम होती. मुलगा गायनविद्येंत जात्याच बुद्धिमान्, मार्मिक आहे, असें बुवांच्या लवकरच लक्षांत आलें. असेल त्याच भांडवलावर गाण्याचा व्यवहार साधण्याचें भास्करबुवांचें चातुर्य केवळ अद्‌भुत होतें. कृष्णा मास्तरांच्या आवाजाला झेपेल इतपतच सरळ साध्या प्रकारांनीं बुवांनीं शिक्षण चालू केलें. सोपे राग व ताल ह्यांचें बंधन हळूहळू बुवांनीं निर्माण केलें. एखाद-दुसरी चीज बसवून स्वतःच्या जलशांत ते कृष्णाला गायला बसवीत. त्याच्या अंगीं नाटकांत कामें करून सभाधीटपणा अजाण वयांतच मुरलेला होता. वर्षा दोन वर्षांत मास्टर कृष्णा हे बुवांचे पट्टशिष्य म्हणून त्यांचा लौकिक होऊं लागला.

मास्तर कृष्णा ‘ समाजांत ’ त शिकायला राहिला तेव्हांच दातार व हरिभाऊ वाटवे हीं दोन गरीब नादार मुलें ‘ समाजां ’ त दाखल झालीं. श्री. दातार हे पुढें ‘ समाजा ’ चे आमरण सेवक म्हणून राहिले. त्यांनीं ‘ समाजा ’ विषयीं त्या काळाचें वृत्त लिहून दिलें आहे, त्यापैकीं कांहीं भाग त्यांच्याच शब्दांत येथें देत आहें. श्री. दातार लिहितात, “ माझी एकंदर परिस्थिति मीं गुरुवर्यांना सांगितली व त्यांनीं त्याच दिवशीं माझी शिक्षणाची व राहाण्याची सोय केली आणि ‘ तूं तूर्त हार्मोनियमचं शिक्षण घे ’ असें सांगितलें. त्या वेळचे हार्मोनियम-शिक्षक श्री. गुंडोपंत वालावलकर होते... पूर्वीची ओळख नसूनसुद्धा, माझी एकंदर परिस्थिति ऐकून मन द्रवणें, ह्यालाच मनाचा मोठेपणा म्हणतात.

“ १९१२ सालीं माझ्या शिक्षणास सुरुवात झाली. ह्या वेळीं संस्थेची अत्यंत भरभराट होती. त्यावेळीं मी व हरि नारायण वाटवे असे आम्ही दोघे हार्मोनियमकडे मोफत विद्यार्थी होतों. पुढें ४–६ महिन्यांनीं गुरुवर्य बुवांनीं आम्हां दोघांस बोलावून असें सांगितलें, कीं सहा वर्षांचा करार करून द्या.

असा, कीं तीन वर्षें शिक्षण व पुढें तीन वर्षें आम्ही सांगूं त्या गांवीं व सांगूं त्या पगारावर आपण नोकरी करूं. परंतु अशा तऱ्हेचा करारनामा करून देण्याचें रा. वाटवे ह्यांनीं नाकारलें. १९१२ व १९१३ सालीं हार्मोनियम-कडील संख्या ६० ते ७५ पर्यंत होती. इतके विद्यार्थी श्री. गुंडोपंत वालावलकर ह्यांना शिकवणें अशक्य असल्यामुळें सकाळीं ७॥ ते ८॥ व रात्रौ ९ ते १० असे दोन तास मी शिकवीत असें. १ जानेवारी, १९१५ रोजीं गुंडोपंतांनीं 'भारत गायन समाज' ह्या संस्थेंतील शिक्षकाच्या जागेचा राजीनामा दिला ... १९१५ सालीं हार्मोनियम-शिक्षक म्हणून माझी नेमणूक केली ...

"**नियमितपणा व आशीर्वाद** — गुरुवर्य बुवांचा नियमितपणा इतका असे, कीं बरोबर ४ वाजतां मला शिकवायला येत. पुढें ५ ते ६ दे. भ. कृ. प्र. खाडिलकर (काकासाहेब) ह्यांचा तास असे. ६ ते ७ रा. मुरुडकर, रा. ताराबादकर, विश्वनाथ पंढरपूरकर, वगैरे मंडळीचा असे. नंतर ८ ते १० मा. कृष्णराव, कै. दत्तोबा बागलकोटकर, यशवंतराव ठाकोरदास, वामनराव फिड्ल्-मास्तर, वगैरे मंडळींचा तास असे.

एका गायन-वादन शाळेचे मुख्याध्यापक म्हणून बुवांना जी सामाजिक प्रतिष्ठा लाभली असेल, तेवढाच काय तो फायदा त्यांना मिळाला. ह्या लाभाच्या मानानें त्यांनीं 'समाजा' साठीं ज्या खस्ता खाल्ल्या, त्या अपरिमित होत्या.

५ मे, १९१४ रोजीं बुवांना 'फिल हार्मोनिक सोसायटी' च्या कौन्सिलचे सभासद करून घेण्यांत आलें. असे सन्मान्य सभासद करून घेण्याचा 'फिल हार्मोनिक सोसायटी' नें १६ डिसेंबर, १९११ रोजीं ठराव केला होता. त्या ठरावान्वयें बुवांना सोसायटीचे ऑनररी सेक्रेटरी श्री. कृष्णाजी बल्लाळ देवल ह्यांनीं विनंतीपत्र लिहिलें व सभासदत्व स्वीकारण्याची विनंती केली. पत्रावर सातारचा पत्ता आहे. कलकत्ता, मद्रास, म्हैसूर, कोइमतूर, इंदूर, मुंबई, सांगली, कुरुंदवाड, खामगांव, आदि गांवांतील संगीत संस्थांशीं 'फिल हार्मोनिक सोसायटी' चा संबंध प्रस्थापित झाला होता. तेलंग बंधु, पंडित भातखंडे, आदि मुंबईची अनेक नामांकित मंडळी संस्थेंत होती.

ह्या ' सोसायटी ' नें बावीस श्रुतींची पेटी बनविली होती. संगीतविषयक जुने संस्कृत ग्रंथ व प्रचलित भारतीय संगीत ह्यांचा तुलनात्मक अभ्यास चालविला होता. महत्त्वाचें तात्विक विवेचन, पुस्तक-प्रकाशन, व्याख्यानें व चर्चारूपानें ' सोसायटी ' चें कार्य अखंड चालू असे. अनेक शिक्षण-संस्थांचें व नामांकित कलाकारांचें सहकार्य नेहमींच घ्यावें लागे. बुवाही अनेक सभांस उपस्थित असत. पं. भातखंडे व भास्करबुवांचा स्नेह ह्या कार्यामुळें झाला.

बुवांचा सन्मान १९१५ सालीं लो. टिळकांनीं केला. गायकवाड वाड्यांतील गणेशोत्सवांत असे सत्कार-समारंभ लो. टिळक घडवून आणीत. रहीमतखां, पंडित ॐकारनाथ ठाकूर, आदि विद्वान् गायकांचे लो. टिळकांनीं अशा उत्सवांतून सत्कार केले होते.

न्या. रानडे व लोकमान्य टिळक हे नेते नाटक, संगीत, वगैरे ललित कलांचें समाजांत फार महत्त्वाचें स्थान आहे, असें मानीत. संस्थांच्या कारभारांत जातीनें लक्ष घालून त्यांच्या अडचणी दूर करीत. ' बालगंधर्व ' ही पदवी लोकमान्यांनींच कोल्हापुरास त्या मुलाचें गाणें ऐकून सहज उच्चारली. तीच पदवी नारायणराव राजहंस ह्यांनीं लोकाश्रयावर टिकविली. बालगंधर्वांचे अलौकिक गुरु म्हणून लोकमान्यांनीं भास्करबुवांचा गणेशोत्सवांत सत्कारपूर्वक गौरव केला. एक जरीचें उपरणें बुवांस अर्पण केलें. बुवा लोकमान्यांचे अनन्यभक्त होते. लोकमान्यांनीं दिलेलें मानाचें उपरणें बुवांनीं ' प्रसाद ' म्हणून आमरण संभाळलें.

' भारत गायन समाजा ' स, लो. टिळक, खाडिलकर, केळकर, वगैरे मंडळींचा पाठिंबा असे. त्याचप्रमाणें अब्दुलकरीमखांसाहेबांच्या ' आर्य संगीत विद्यालया ' ला डॉ. सर रामकृष्ण भांडारकर व हरिभाऊ आपटे ह्या नेमस्ताग्रणींचा पाठिंबा असे. चुरशीचें कार्य करणाऱ्या ह्या दोन संस्थांच्या पुरस्कर्त्यांची विभागणी केवळ अपघातानें घडून आली होती.

बुवांना सामाजिक मान्यता मिळे, त्यांचे सत्कार होत, त्याचप्रमाणें बुवाही थोर गवयांना ' समाजां ' त आमंत्रण करून, त्यांचे सत्कार करीत. थोर विद्वानांचें गाणें ' समाजां ' तील विद्यार्थ्यांस ऐकायला मिळावें व विद्वान् गवयांसही सामाजिक लौकिक लाभावा, म्हणून बुवा सत्कार-समारंभ

घडवून आणीत. बुवांनीं मियाजान, बशीरखां, हैद्राबादचे ध्रुपदिये व टप्पा गाणारे भटजीबापू, ह्यांचा सत्कार केला. त्यांना मेजवान्या देऊन दक्षिणा व जरीचीं वस्त्रें देऊन, बुवा सत्कार करीत. शेकडों रुपयांची मिठाई अशा समारंभांत वांटली गेली, असें 'समाजा' च्या हिशेबाच्या वह्यांवरून दिसतें. बुवांना अनेक दरबारांतून मिळालेलीं भरजरीचीं वस्त्रें, शाली, रुमाल, पटके, वगैरे बहुतेक ठेवणींतलें सामान बुवांनीं इतर गवयांस वांटून टाकलें.

'समाजां' तील नोकर व विद्यार्थी ह्यांत नित्यच बदल होऊन 'समाजा' ची सुरुवातीला आखलेली घडी सुरळीत चालू ठेवणें, ही नित्याचीच डोकेंदुखी असे. 'समाजा' ची आर्थिक स्थिति सुधारण्यास ह्या शाळेस सरकारी मदत मिळवितां आली असती, पण बुवांचा पिंड संस्था-चालकाचा नव्हता. ते कर्मयोगी कलावंत होते. नित्य नवीं गरजू गरीब मुलें संगीतप्रेमानें शिक्षणासाठीं समाजांत येत. बुवा त्यांस शिकवणीसाठीं ठेवून घेत.

पुण्याच्या 'भारत गायन समाजा' संबंधीं गैरसमज होण्यासारखा बराच मजकूर कै. गणपतराव बोडस ह्यांच्या आत्मवृत्तांत नमूद झाला आहे. कायम स्वरूपाच्या ग्रंथांत ही चुकीची माहिती असल्यामुळेंच येथें चुकीची दुरुस्ती करणें अवश्य वाटतें.

'भारत गायन समाजा' च्या दिवाणखान्यांतच 'किर्लोस्कर नाटक मंडळीं' तून फुटलेल्या नटांनीं 'गंधर्व नाटक मंडळी' चा मुहूर्त केला होता. ह्या नव्या कंपनीशीं बुवांचा संबंध 'किर्लोस्कर मंडळी' पेक्षांही अधिक निकटचा होता. त्यामुळें ह्या नवीन मंडळीच्या तीन मालकांपैकीं एका मालकानें केलेलीं विधानें विश्वसनीय मानलीं जातील. इतर अनेक चुकीच्या विधानांप्रमाणें श्री. बोडस लिहितात, कीं "'गंधर्व कंपनी' नें बुवांना दरमहा तीनशें रुपये द्यावेत, अशी योजना ठरली होती." ह्याच आत्मवृत्तावरून हेंही उघड होतें, कीं बालगंधर्व व टेंबे ह्या दोन भागीदारांस मान्य असलेल्या ह्या संकल्पाची कांहीं ना कांहीं कारणानें अंमलबजावणी झाली नाहीं. योजिलेले संकल्प मोडण्याचा वारसा 'किर्लोस्कर कंपनी' कडून 'गंधर्व नाटक मंडळी' कडे आला असावा !

‘ भारत गायन समाजा ’ स नित्य नवे विद्यार्थी लाभत. यशवंतराव ठाकोरदास, दत्तोबा बागलकोटकर, रा. मुरुडकर, रा. ताराबादकर, विश्वनाथबुवा पंढरपूरकर, वगैरे अनेक विद्यार्थी ‘ समाजां ’त बुवांच्या खास शिकवणीच्या वर्गांत दाखल झाले होते. नाट्याचार्य खाडिलकरही बुवांच्या शिष्यवर्गांत सामील झाले होते.

संघटनेपेक्षां ‘ समाजा ’ ची विघटनाच अधिक वेगानें चालू असे. मुख्य कारण असें होतें, कीं बहुतेक शिकाऊ मंडळीस उदरनिर्वाहाचीं साधनें नसत. त्यामुळें प्रत्येक होतकरू विद्यार्थ्यास पोटासाठीं शक्य तों लवकर नोकरी मिळविण्याची गरज असे.

तीन वर्षें नोकरी केल्यावर गुंडोपंत वालावलकरांनीं ‘ भारत गायन समाज ’ सोडून स्वतःची शाळा काढली. फिड्ल्शिक्षक वामनराव हे कोचीनला ‘ समाजा ’ ची नोकरी सोडून परत गेले होते. गणपतबुवा पुरोहित व यशवंतराव ठाकोरदास ह्यांनीं मुंबईस स्वतःच्या गायन-वादनाच्या शाळा काढल्या. पंढरपूरकरबुवा व मास्तर कृष्णराव ‘ गंधर्व कंपनीं ’त नोकरीस राहिले. ह्या क्रमानें १९१६ पर्यंत भास्करबुवांचे सर्व प्रमुख शिष्य आपापल्या पोटाच्या व्यवसायास लागले.

बुवांना केवळ प्राथमिक अवस्थेंतील नवे शिष्य तयार करून, ते आपल्या खास शिकवणीचा लाभ घ्यायला पात्र होईपर्यंत वाट पाहात राहाणें इष्ट वाटलें नाहीं. शिवाय पुण्यास दरसाल प्लेग येई. त्यामुळें बुवांना पुण्यांत राहाण्यांत स्वारस्य वाटेना. १९१६ च्या प्लेगमध्यें बुवा जे मुंबईस गेले, ते ‘ समाजा ’ चीं सर्व सूत्रें व्हाइस प्रिन्सिपल अष्टेकरबुवा व हार्मोनियम-शिक्षक ह्यांच्या हातीं सोपवूनच. भास्करबुवा ह्यापुढें पुण्यास येऊन-जाऊन असत. त्यामुळें ‘ समाजा ’ च्या प्रगतीवर त्यांचें सदैव लक्ष असे. मुंबईत त्यांचें शिष्यमंडळ वाढत होतें. ताराबाई शिरोडकर, मुक्ताबाई कलगुटकर, अंजनीबाई कलगुटकर, चंदाबाई कारवारकर, दिलीपचंद्र वेदी, बापूराव केतकर, बापूराव राजहंस, पिंगळे, वगैरे शिष्य-संप्रदाय मुंबईत वेगानें वाढत गेला.

प्रकरण पंधरावें

# बुवांचे शिष्य

भास्करबुवांनीं बडोद्याला फैजमहंमद-खांसाहेबांच्या शाळेंत शिकविलें, त्यानंतर मुंबई, धारवाड व पुणें येथें पन्नासांहून अधिक विद्यार्थ्यांस व कलावंत स्त्रियांस शिकविलें. त्यांतील प्रत्येकानें आपापल्या शक्तीनुसार बुवांच्या शिकवणीचा फायदा घेतला. फक्त वीस-पंचवीस विद्यार्थ्यांनीं दीर्घ काळ शिक्षण घेऊन नांवलौकिक मिळविला. सर्व विद्यार्थ्यांबद्दल एक गोष्ट प्रामुख्यानें ऐकायला मिळाली ती अशी, कीं भास्करबुवांकडे शिक्षण घेतलेली प्रत्येक व्यक्ति अतिशय आकर्षक वळणामुळें व्यवसायांत लोकप्रिय व यशस्वी झाली. गाण्यांतली रंगत, चीज-मांडणीचें कसब, सुरेलपणा व लयकारी ह्या गुणांनीं बुवांजवळ शिकणाऱ्या व्यक्तीचें वळण सुंदर, शोभिवंत व कलात्मक बने. शिकणाऱ्याच्या आवाजाचा गुणधर्म ओळखून बुवा प्रथम गाण्यांत हळूहळू तालसुराची शिस्त निर्माण करीत, शिकणाऱ्याच्या नैसर्गिक गुणांना जास्तींत जास्त वाव देत व नंतर त्याच्या कलेवर क्रमानें विद्येचे संस्कार करीत. ज्या विद्यार्थ्यांनीं

बुवांचा लौकिक वाढविला, अशा कांहीं शिष्यांचा येथें अल्प परिचय करून देणें अवश्य वाटतें.

**गतपतबुवा पुरोहित** — ह्यांनीं अगदीं बालवयांत बुवांकडे शिक्षण घेण्यास सुरुवात केली. बुवा धारवाडला जाण्यापूर्वी सुमारें साडेचार वर्षे शिक्षण घेऊन गणपतबुवा 'किर्लोस्कर मंडळीं' त नट म्हणून दाखल झाले. तेथेंही बुवांचें गाणें अखंड ऐकायला मिळे, पण नियमित असें शिक्षण मिळत नसे. कंपनींत बालगंधर्व, गुंडोबा वालावलकर, कोल्हापुरे, आदि बालनटांच्या गाण्याबरोबर गोविंदराव टेंबे ह्यांचें पेटीवादनही ऐकायला मिळे. गणपतबुवा गोविंदरावांच्या पेटी-वादनाकडे जास्त आकर्षिले गेले आणि त्यांनीं पेटी-वादन शिकण्यास सुरुवात केली. कंपनींत जादा पेट्या व तबले बरेच असत. त्यामुळें गतपतबुवांना साथीची अडचण पडत नसे.

पुण्यांत 'किर्लोस्कर भारत गायन समाज' सुरू होतांच नाटक कंपनी सोडून गणपतबुवा भास्करबुवांच्या गायन-वर्गांत दाखल झाले. तेथें दोन-तीन वर्षे गायनाचें अधिक शिक्षण घेतल्यावर कौटुंबिक गरजेनुसार त्यांनीं मुंबईस स्वतःची गायन-शाळा सुरू केली व शिकवण्याही सुरू केल्या. गाण्यापेक्षां त्या काळीं पेटी-वादनाच्याच शिकवण्या अधिक मिळत. सुमारें पन्नास मुलें-मुली त्यांच्याकडे शिकत. शाळेची जागा फारच लहान असल्यामुळें गटा-गटानें शिकवावें लागे.

गणपतबुवांचें शिक्षण बऱ्याच प्रगल्भ अवस्थेचें असल्यामुळें ते स्वराला सच्चे व लयीला पक्के असत. गोविंदराव टेंबे ह्यांना असें शिस्तीचें शिक्षण फारसें नसल्यामुळें त्यांचें लयीचें अंग बेतावेताचें असे. गणपतबुवांच्या पेटीवादनांत गोविंदरावांचा किंचित् डौल आला, तरी त्यांच्या वादनांत अधिक पक्क्या लयीचें, भास्करबुवांच्या गाण्याचें वळण अधिक स्पष्ट असे. त्यांच्या गाण्यांत गंधर्व व भास्करबुवा ह्यांची छाप दिसे. विद्वान् गायक-वर्गांत गणपतबुवांची पेटीची साथ मान्य झाली होती. भास्करबुवांकडील चिजा मिळवाव्या म्हणून सवाई गंधर्वांनीं गणपतबुवांशीं भास्करबुवांच्या मृत्यूनंतर स्नेह वाढविला. सवाई गंधर्वांना अब्दुलकरीमखांसाहेबांनीं स्वरेलपणा शिकवून तयार केलें असलें, तरी त्यांच्याकडे वैचित्र्यपूर्ण उत्तम चिजांचा भरणा कमी असे.

फारच थोड्या रागांची त्यांना पक्की तालीम मिळाली होती. सवाई गंधर्व ह्यांना खांसाहेबांचा जरी खूप अभिमान असला, तरी भास्करबुवांच्या गायकीचें अतिशय आकर्षण वाटे. त्यांनीं गणपतबुवांकडून, पूर्वा-कल्याण, शुद्ध-कल्याण व इतर अनेक रागांतील भास्करबुवांच्या चिजा घेतल्या. भास्करबुवांच्या तोंडून ऐकलेल्या चिजा ते गणपतबुवांना गायला सांगत, पेटीवर वाजवायला सांगत व त्या चिजा ते स्वतःच्या मैफलींत अत्यंत तयारीनें व तडफेनें गात. गणपतबुवांनीं शिकविलेल्या अनेक चिजा व राग त्यांनीं स्वतःचे शिष्य भीमसेन जोशी ह्यांसही शिकविले. पं. भीमसेन ह्यांच्या तोंडून त्या चिजा ऐकतांना त्यांच्यावर भास्करबुवा व सवाई गंधर्व ह्यांच्या गायकीची छाप दिसते, ह्याचें कारण गणपतबुवांकडून ह्या चिजा आल्या, हेंमात्र ऐकणारास ठाऊक नसतें. गणपतबुवांनीं शेकडों विद्यार्थ्यांना शिकविलें, त्यांपैकीं कांहींना आतां अखिल-भारतीय लौकिक मिळाला आहे.

**गुंडोबा वालावलकर** — हे गणपतबुवांचे 'किर्लोस्कर मंडळीं'तील एक मित्र होते. पेटी-वादक व संगीत-दिग्दर्शक म्हणून पुढें त्यांनीं बराच लौकिक मिळविला. अगदीं लहानपणापासून भास्करबुवांचा सहवास ह्यांना लाभला. नारायणराव जोगळेकर, कोल्हापुरे, चिंतोबा गुरव, कृष्णराव गोरे ह्यांच्या शिकवणीच्या वेळीं गुंडोबा गाणें शिकत. ऐकलेली तालीम पेटीवर वाजवीत. गाण्याचें शास्त्रीय ज्ञान व लयकारी ह्या गुणांकडे गुंडोपंतांचें बारकाईनें लक्ष असे. 'किर्लोस्कर मंडळीं'तील नटाचा पेशा सोडून भास्करबुवांकडे त्यांनीं 'भारत गायन समाजां'त शिकवणी चालू ठेविली. पेटी-शिक्षक गोविंदराव टेंबे ह्यांचे मदतनीस म्हणून ते 'समाजां'त पेटीचा वर्ग घेत, पण स्वतःमात्र बुवांच्या खास शिकवणीच्या गायनाच्या वर्गांत शिकत. दोन-तीन वर्षें 'समाजां'त राहून त्यांनीं गायनाचें शिक्षण घेतलें, पण नंतर कांहीं काळ स्वतःची स्वतंत्र पेटी-शिकवणीची शाळा त्यांनीं सुरू केली. हरिभाऊ वाटवे त्यांच्याकडे मुख्यतः शिकले. गोविंदराव टेंबे ह्यांच्या पेटी-वादनांतील लालित्य आपल्या पेटी-वादनांत यावें, असा गुंडोपंतांचाही प्रयत्न असे. पण त्यांचा लौकिक श्री. टेंबे ह्यांच्यापेक्षां अधिक चांगले लयकार व शास्त्रज्ञ, असा असे. बुवांच्या मृत्यूनंतर ते पुणें सोडून

कोल्हापूर येथें स्थाइक झाले. अनेक चित्रपटांचे संगीत-दिग्दर्शक म्हणून त्यांनीं लौकिक मिळविला. कोल्हापूर येथील विद्वान् गवई विश्वनाथबुवा जाधव, बुर्जीखां, वगैरे मंडळींच्या तोंडून मीं गुंडोपंतांची तारीफ ऐकलेली आहे. गुंडोपंतांच्या कलेंत भास्करबुवांची चमक प्रसंगशः दिसते, असा त्या विद्वानांचा अभिप्राय असे.

**यशवंतराव ठाकोरदास** — 'भारत गायन समाजा'च्या स्थापनेपासून सुमारें तीन-चार वर्षें पुण्यास व नंतर अनेक वर्षें मुंबईस भास्करबुवांकडे शिकवणी घेऊन ह्यांनींही स्वतःची संगीत-शाळा मुंबईस स्थापन केली. बुवांच्या मृत्यूनंतर यशवंतराव ठाकोरदास ह्यांचे चिरंजीव माणिकराव हे बुवांचे पट्टशिष्य बापूराव केतकर ह्यांजकडे शिकले. गायनाच्या दोन पिढ्यांचा हा संबंध फलदायी ठरला. माणिकरावांस कांहीं काळ यशवंतरावांकडूनही शिक्षण मिळालें होतें. बुवांच्या परंपरेचे हे अभिमानी असल्यामुळें बुवांची पुण्यतिथि हे अजूनही साजरी करतात.

**बळवंतराव बर्वे** — बुवांकडे शिक्षण घेतलेल्या गणपतबुवा पुरोहितांच्या बरोबरीचे हे जुने शिष्य. ते पोस्टांत नोकरी करीत. परंतु बुवांशीं त्यांनीं अखंड संबंध टिकविला. बुवांच्या मृत्यूनंतर बुवांच्या शुद्ध वळणाचें गाणें ऐकण्यासाठीं जाणते गायक त्यांचें गाणें प्रयत्नपूर्वक ऐकत. बुवांच्या गाण्याचा डौल त्यांनीं बऱ्याच प्रमाणांत साध्य केला होता. बुवांच्या अखेरच्या आजारांत व मृत्यूनंतर गुरुपत्नीस मदत करण्यास बर्वे अनेकदा धावून जात. बुवांच्या मुंबईतील अगणित बैठकींत हे बर्वे तंबोऱ्यावर असत व त्यांच्या साथीनें रंगतींत भर पडे. बर्वे ह्यांचे मेहुणे श्री. काळे ह्यांनाही बुवांच्या शिकवणीचा व सहवासाचा लाभ अनेक वर्षें झाला.

**पित्रे वकील** — हे बुवांचे एक थोर शिष्य धारवाड येथें वकील होते. बुवांकडे शिक्षण घेण्यापूर्वीं त्यांनीं विष्णुपंत छत्रे ह्यांचे शिष्य, मुंबईतील जुने गवई बर्वे ह्यांजकडे अनेक वर्षें शिक्षण घेतलें. पण बर्वे ह्यांच्या हयातींतच पित्रे वकील भास्करबुवांकडे आकर्षित झाले. त्यांनीं मुंबई व धारवाड येथें बुवांकडे अनेक वर्षें तालीम घेतली. कर्नाटकांत गायन-वादनाचे एक आचार्य म्हणून पित्रे वकील ह्यांचा लौकिक सुमारें चाळीस वर्षें अखंड टिकला. पित्रे

वकील सतारही वाजवीत. ते बुवांचे चाहाते, मित्र, भक्त व साहाय्यक असत. 'भारत गायन समाजा' चा बुवांसाठीं प्रचार करून ते बुवांना सर्व प्रकारें साह्य करण्यास झटत. ह्या चरित्राच्या लेखनास त्यांनीं अगत्यपूर्वक लिहिलेल्या विस्तीर्ण वृत्ताचा मोठाच आधार मिळाला. जुना पत्र-व्यवहार व टिपणें त्यांनीं भक्तिपूर्वक जतन करून ठेवलीं होतीं. ते बुवांना भेटण्यासाठीं वारंवार पुण्या-मुंबईस येऊन जात. आतां त्यांचे चिरंजीव 'भारत गायन समाजां'त शिक्षक आहेत.

**गणपतराव मणेरीकर** — पित्रे वकिलांचे एक मित्र व त्यांच्याचबरोबर भास्करबुवांच्या परिवारांत आप्तासारखे आमरण राहिलेले हे बुवांचे दुसरे शिष्य. बुवा पंजाबांत गेले, तेव्हां त्यांचे साथी म्हणून हे तंबोऱ्यावर असत. मुंबईनंतर धारवाड येथें व नंतर पुन्हा मुंबईत ते बुवांच्या अखंड सहवासांत असत. ह्यांच्या गाण्याचा लौकिक अथवा प्रत्यक्ष गाणें मला ऐकायला मिळालें नाहीं, तरी मणेरीकरांना बुवांबद्दल असलेल्या अनन्य भक्तीच्या अगणित कथा बुवांच्या चाहात्यांनीं सांगितलेल्या मीं ऐकल्या आहेत. मणेरीकर हे ड्रॉइंग मास्तर असल्यामुळें त्यांनीं स्मरणानें चित्रिलेलें भास्करबुवांचे गुरु नथ्थनखां ह्यांचें एकमेव चित्र आतां उपलब्ध आहे. त्याच चित्राच्या प्रती 'भारत गायन समाजां'त व आग्रा घराण्याच्या गायकांकडे पाहायला मिळतात. बुवांचे हे शिष्य असले, तरी बुवांबद्दल त्यांना एक वेगळाच कौटुंबिक जिव्हाळा वाटे.

**मास्तर कृष्णराव** — बुवांच्या शिष्यांपैकीं ज्यांना जास्तींत जास्त लौकिक मिळाला असे शिष्य म्हणजे कृष्णराव फुलंब्रीकर. बुवांकडे गाण्याचें शिक्षण घेऊन, ज्यांनीं स्वतःच्या बुद्धिमत्तेनें एक स्वतंत्र वळण निर्माण केलें, असे स्वतंत्र प्रतिभेचे गायक म्हणून मास्तर कृष्णा ह्यांचा लौकिक सर्वत्र पसरला. मास्तर कृष्णरावांचें गायनाचें शिक्षण ते 'समाजां'त दाखल झाल्यापासून दोन-तीन वर्षांनीं ते 'गंधर्व कंपनीं'त दाखल होईपर्यंत स्थिरपणें झालें. कृष्णा मास्तरांची गायनांतील कुशाग्र बुद्धि पाहून बुवांचा त्यांच्यावर अतिशय लोभ असे. शिष्याला उत्तम कपडे करावेत, त्याला गांवोगांवीं स्वतःच्या दौऱ्यावर घेऊन जावें, अशी बुवांची प्रेमाची वागणूक असे. ते रागावत,

एखादी चापटीही जोरांत मारीत. अशा प्रकारें स्वतःचा मुलगा मानूनच बुवांनीं मास्तरना शिकविलें. ही शिकवणी मास्तर कृष्णा 'गंधर्व कंपनीं'त राहिले, तरीही बुवांनीं शक्य तों चालू ठेविली, ती अगदीं मृत्यूपर्यंत.

शिष्याच्या आवाजाच्या व बुद्धीच्या मर्यादा जाणून बुवा शिकवीत. भास्करबुवांची दमछास व आवाजाची झेप मोठी होती. कृष्णा मास्तर ह्यांच्याजवळ ही शक्ति फारच मर्यादित होती. बुवा छोट्या छोट्या अलंकारांची व वैचित्र्यपूर्ण रचनांची बढत शिकवीत. ह्या मांडणीनें विस्तार साधायचें कौशल्य मास्तर कृष्णांच्या गळ्याच्या व बुद्धीच्या आटोक्यांत होतें. लयकारीचे कांहीं अतिशय गमतीचे प्रकार बुवांनीं मास्तरना शिकवले. शास्त्रीय गायन न समजणाऱ्या नाट्य-प्रेक्षकांसमोर गाऊन त्यांना अखंड झुलवीत ठेवायचें कसब मास्तर बुवांजवळच शिकले. तसेंच बुवांच्या अंगीं मैफलीला डोलत ठेवायचें जें कौशल्य होतें, त्याचें अनुकरण करण्याचाही मास्तरांचा प्रयत्न असे. अनपेक्षित अशा मुखड्यानें व समेनें आपणाकडे श्रोत्यांचें लक्ष खेचून घेण्याची बुवांची पद्धति मास्तरनीं अंशतः हस्तगत केली होती. छोटे वैचित्र्यपूर्ण अलंकार योजून रागाची बांधणी करण्याचें बुवांचें कसबही मास्तर अल्प प्रमाणांत योजीत. बालगंधर्वांपेक्षां अधिक अवघड शास्त्रीय वळण शिकूं इच्छिणारे गायनाचे विद्यार्थी मास्तरांच्या अनेक लकबींचें अनुकरण करूं लागले. त्यांनीं संपादन केलेली अवघड तालांतील लयकारीमात्र सहज अनुकरणानें साध्य होण्याइतकी सोपी नव्हती.

मास्तर बुवा म्हणत असलेला एखादाच ख्याल, अनेक ठुमऱ्या व नाटकांतील पदें गाऊन मैफली रंगवीत. मैफलींत अखंड रंग भरण्याच्या कौशल्यानें मास्तरांची लोकप्रियता दिवसेंदिवस वाढत गेली.

बुवांच्या मृत्यूनंतर 'गंधर्व नाटक मंडळी'चें संगीत-दिग्दर्शन क्रमानें कृष्णरावांकडे आलें. परंतु बुवांच्या मृत्यूनंतर 'स्वयंवरां'तील भारदस्त गायकी झेपेल असा 'कंपनी'स विश्वास वाटेना, त्यामुळें 'एकच प्याला' ह्या नव्या नाटकाच्या वेळीं सुंदराबाईचें दिग्दर्शन घेण्यांत आलें. परंतु ज्या वळणानें भीमपलास, मालकंस, बागेश्री, वगैरे राग बालगंधर्वांच्या गळ्यावर चढले होते, ज्या गायनानें त्यांना लोकप्रियता लाभली, तेंच वळण ठेवून

मास्तर कृष्णरावांनीं ह्यानंतरच्या संगीताची योजना केली. ' आशा निराशा ' ह्या नाटकांत तर त्यांनीं एक वेगळाच प्रयोग केला, पण तो फारसा यशस्वी झाला नाहीं.

संगीत-दिग्दर्शनाच्या कामीं मास्तर कृष्णरावांच्या प्रतिभेस वाव मिळाला तो चित्रपटांत व ' नाट्यनिकेतन ' च्या नाटकांत. ह्या दोन्ही कार्यांत मास्तरना अलोट यश मिळालें. त्यांच्या योजना-कौशल्यानें अभ्यासी गायक-वर्गांत मास्तरांच्या गुणांचें भरपूर कौतुक झालें. भास्करबुवांचें वळणमात्र ह्या काळांत बहुतांशीं सुटलें होतें. बुवांनीं नाट्य-संगीत ख्याल-गायकीच्या दर्जावर नेलें, तर मास्तरांच्या मैफलींत भजनांना ख्यालाचें स्थान मिळूं लागलें. ह्यामुळें मास्तरांची लोकप्रियतामात्र अनेक वर्षें वाढत्या प्रमाणांत टिकली.

**बालगंधर्व** — भास्करबुवांकडे मर्यादित शिक्षण घेतलेले नारायणराव राजहंस हे बुवांचे दुसरे दैदीप्यमान् शिष्य. ह्यांचें गायनाचें प्राथमिक शिक्षण बालवयांत महबूबखां ह्यांच्याकडे झालें. आवाजांत जव्हारदार गोडी होती. कंठांत अनुकरणानें अतिशय मोहक ढंग मुरलेला होता. गोहरजान, मोजुद्दिनखां ह्यांच्यासारख्या गोड गाणाऱ्यांच्या ग्रामोफोनमधील ठुमऱ्यांचें पाठांतर करून, कित्येक सुंदर आलापांची व सरळ तानांची फिरत गळ्यांत बसल्यावरच बालगंधर्व ह्यांस बुवांनीं शिकविलें. ह्या नव्या शिकवणींत बुवांचा संयम व मार्मिक योजना ह्यांचें आश्चर्यजनक दर्शन घडलें. ' गंधर्व कंपनी ' च्या ' स्वयंवर ' ह्या नाटकाचें संगीत-दिग्दर्शन बुवांनीं केलें. अतोनात मेहनत घेऊन बुवांनीं ' ख्याल ' वळणाच्या नव्या चिजा बालगंधर्वांस शिकविल्या. अनेक नव्या रागांत हे ख्याल योजिले होते आणि ते नाट्यमंचावर अतिशय लोकप्रिय झाले. ' गंधर्व कंपनी ' चे नवे संगीत-दिग्दर्शक म्हणून बुवांनीं जुन्या नाटकांतील पदेंही पुन्हा सुधारून बसविलीं. जुन्यांना एक वेगळेंच दैदीप्यमान् स्वरूप प्राप्त झालें. स्वतःचें कठीण, प्रचंड विस्तारानें फुलणारें गायन संयमानें बाजूस सारून शिष्याच्या गळ्यांत बसेल असें एक नवें मनोहर स्वरूपाचें सरळ गाणें बुवांनीं नारायणरावांच्या तोंडून सर्वांस ऐकविलें. नारायणरावांचा प्रवाही गळा अनेक रागांतील जीव-स्वरांवर इतक्या गोडीनें स्थिर होऊं लागला व लयीच्या डौलांत इतका फरक दिसूं लागला, कीं

जाणते गायक लोक ह्या नव्या दर्शनानें चमकून, दिपून गेले. बालगंधर्वांच्या गायनाचा दर्जा आतां उच्च पातळीवर गेला. 'स्वयंवर' नाटकापूर्वी नारायणरावांशीं बरोबरी किंवा स्पर्धा करूं पाहाणारे लोक आतां केवळ त्या अजोड कर्तृत्वाचें कौतुक करून डोलूं लागले. बुवांनीं नारायणराव राजहंस ह्यांस आपल्या आयुष्यांतील शेवटचीं चार-पांच वर्षें मार्गदर्शन केलें. गंधर्वांच्या गाण्यांत सुरेलपणाचा व लयकारीचा एक नवा आदर्श बुवांनीं प्रस्थापित केला आणि तोही एका अशिक्षित गायकाचा दर्जा सांभाळून. गंधर्वांच्या नैसर्गिक आवाजाची गोडी व अनिर्बंध फिरत ह्यांना बाधक होईल असें बुवांनीं कांहींही शिकविलें नाहीं. क्रमानें कायद्याच्या बंधनांत नारायणरावांच्या गाण्याचा विलास त्यांनीं बहुतांशानें साधला. 'गंधर्व कंपनी'तील प्रत्येक नाटकांतील गाण्याला बुवांच्या मार्गदर्शनानें एक चमकदार, मनमोहक रूप प्राप्त झालें. मराठी गायनप्रेमी लोकांच्या अभिरुचीवर हा एक मोठा संस्कार बुवांनीं केला. मराठी गायनप्रेमी जनता ख्याल-गायन ऐकण्यास उत्सुक बनविली. साऱ्या भारतांतील लोकांपेक्षां मराठी गायनाचा श्रोतृवर्ग अधिक उच्च पातळीवर नेला.

**जगन्नाथबुवा पंढरपूरकर**—ह्या जुन्या वळणाच्या ध्रुपद-गायकाला, पर्वति-मंदिरांत देवापुढें गाऊन पोट भरेना, म्हणून बुवांनीं शिकवून 'गंधर्व कंपनी'तील एक प्रमुख गायक-नट बनविलें. भास्करबुवांच्या सुरेल शुद्ध वळणाची आठवण कायम टिकली. नारायणराव राजहंस व मास्तर कृष्णराव ह्यांच्याचप्रमाणें पंढरपूरकरबुवांचें गाणें 'गंधर्व कंपनी'च्या नाट्य-श्रोत्यांच्या कानांवर दीर्घकालीन संस्कार करी. ह्या संचांत बसणें ही गोष्ट सोपी नव्हती. 'गंधर्व कंपनीं'त अनेक नट गायक होते. पण नारायणरावांसमोर उभें राहून रंगमंचावर मोहिनी टाकणें फक्त मास्तर कृष्णराव व जगन्नाथबुवा पंढरपूरकर ह्या कसलेल्या गवयांनाच साधलें.

**बापूराव केतकर**—पुणें सोडून बुवा १९१५ नंतर कायम मुंबईस येऊन राहिल्यावर त्यांच्याकडे जी अनेक तरुण मंडळी शिकायला राहिली, त्यांपैकीं नांव केलें फक्त बापूराव केतकरांनीं. बापूराव केतकरांच्या घरांत

वडील, चुलते, वगैरे मंडळींपासूनच शास्त्रीय गायनाची परंपरा होती. बापूराव केतकर ह्यांचा आवाज गोड, भरीव, वजनदार असे. कांहीं वर्षांचें शिक्षण होऊन बापूराव थेट भास्करबुवांच्या वळणानें गाऊं लागले. बुवांच्या मृत्यूपर्यंत सुमारें पांच वर्षें बापूरावांस शिक्षण मिळालें. बुवांच्या मृत्यूनंतर त्यांनीं बुवांचें स्मारक जो 'भारत गायन समाज,' त्या संस्थेचें आमरण नेतृत्व केलें. अष्टेकरबुवांच्या बरोबरीनें 'भारत गायन समाजा'स बापूरावांचा स्थिर आधार असे.

'भारत गायन समाजां'तील मैफलीच्या दिवाणखान्याला बापूराव केतकरांचें नांव दिलें आहे. सर्व इमारतीस बुवांचें नांव दिलें आहे.

**दिलीपचंद्र बेदी** — हे बुवांचे पंजाबांतील शिष्य. त्यांनीं बुवांचा विधिपूर्वक गंडा बांधला होता. बुवांच्या अखेरच्या वर्षांत त्यांनीं गायनाचें शिक्षण घेतलें. श्री. वेदी हे फार तयारीनें पेटी वाजवीत. बुवांच्या निधनानंतर वेदी बडोद्याच्या फैय्याजखांसाहेबांकडे शिकले. त्यांनीं खूप लौकिक मिळविला. महामहोपाध्याय हा किताबही त्यांना मिळाला. अनेक संगीत-परिषदांत भाग घेऊन, उत्तर हिंदुस्थानांतील व बंगाल्यांतील अनेक शहरीं त्यांनीं नांव केलें. हे बुवांच्या पुण्यतिथीनिमित्त त्यांचेंच आख्यान लावून कीर्तन करीत. भास्करबुवांची स्तुति गाण्यासाठीं त्यांनीं अनेक रागांत नव्या चिजा बांधल्या आणि त्या ते स्वतःच्या मैफलींतून अजून गातात. बुवांच्या सिंध व पंजाब प्रांतांतील दौऱ्यांत हे अनेकदा बुवांच्याबरोबर साथीला असत. त्यांनीं बुवांच्या ह्या दौऱ्यांचें हिंदींत वृत्त लिहून पाठविलें, त्याचें शब्दशः भाषांतर करून तें परिशिष्टांत स्वतंत्रपणें सादर केलें आहे.

**विलायतहुसेनखां** — बुवांचे गुरुजी नथ्थनखां आग्रेवाले ह्यांचे हे तृतीय चिरंजीव. आग्रा येथें बालपण गेलें, तेथें नातलगांकडून शिक्षण घेऊन, विलायतहुसेन मुंबई-पुण्याकडे आले व कांहीं काळ त्यांनीं भास्करबुवांकडेही शिक्षण घेतलें. दहा-पंधरा रागांचें व त्यांतील चिजांचें बुवांजवळ शिक्षण घेतल्याचें वृत्त त्यांनींच लिहिलेल्या ग्रंथांत नमूद केलें आहे.

मुंबईतील गायन-वर्गांत अतिशय विद्वान्, भरणेदार गायक व शेकडों शिष्य तयार करणारा शिक्षक, असा थोर लौकिक पुढें ह्यांस प्राप्त

झाला. भास्करबुवांबद्दल जो आदरभाव त्यांनीं आपल्या मातेकडून व वडील बंधूंकडून ऐकला होता, त्याच भावनेनें ते भास्करबुवांच्या पत्नीस भेटत, ' समाजां ' त जात. भास्करबुवांनीं जलसे करून आपल्या कुटुंबीयांस ह्यापुढें मदत करूं नये, असें त्यांनीं बुवांना कृतज्ञतापूर्वक सांगितल्यावरच बुवांनीं मदत थांबविली.

खुद्द विलायतहुसेनखांसाहेबांनींच लिहून ठेवलें आहे, म्हणूनच भास्करबुवांकडे त्यांना शिक्षण मिळालें, असें मानावें लागतें. विलायतहुसेन-खांसाहेबांचें गाणें इतक्या भिन्न शैलीचें होतें, कीं त्यांनीं बुवांचें गाणें नुसतें ऐकलें तरी असेल कीं नाहीं, अशी दाट शंका येई. मग प्रत्यक्ष शिक्षण तर दूरच. त्यांच्या स्वर लावणें, राग-विस्तार, वगैरे कोठल्याच अंगावर भास्करबुवांच्या गायकीचा अस्पष्टही संस्कार दिसत नसे. विलायतहुसेन-खांसाहेबांना अनवट रागांचें ज्ञान होतें आणि ते उत्तम लयकारही होते.

**दत्तोबा बागलकोटकर** — ' भारत गायन समाजा ' च्या स्थापनेपूर्वींच दत्तोबांचें भास्करबुवांकडे शिक्षण सुरू झालें. बुवांनीं पुणें सोडल्यावरमात्र त्यांच्या शिक्षणांत खंड पडला. बुवांच्या मागें ते तंबोऱ्यावर बसले तर बुवांच्या तानेबरहुकूम तान घेत. इतर कोणताही शिष्य दत्तोबांची ह्या कामीं बरोबरी करूं शकत नसे. बुवांच्या गाण्यांतील अतिशय अवघड तान-पलटे सफाईनें गाण्यास अनुकूल असा त्यांचा आवाज असे. ' भारत गायन समाजां ' त त्यांनीं कांहीं वर्षें शिकविलें. दर गुरुवारीं बुवा रात्रभर गात. त्या गाण्याच्या श्रोत्यांत पुण्यांतील कांहीं सनईवाले असत. त्यांपैकीं बाबुराव देवळणकरांनीं दत्तोबा बागलकोटकर ह्यांच्याकडून अनेक रागांचें शिक्षण घेतलें. दत्तोबा अल्पायुषी ठरले व त्यांनीं निर्माण केलेल्या आशा नष्ट झाल्या.

**ताराबाई शिरोडकर** — सात वर्षांहून अधिक काळ अखंड शिक्षण घेतल्यामुळें ताराबाईच्या गाण्यांत बुवांच्या गाण्याची शोभा स्पष्ट दिसूं लागली होती. त्यांचा गळा कमालीचा मधुर असून त्यांना रूप, आरोग्य, वगैरे नैसर्गिक देणगी भरपूर मिळाली होती. पुणें, मुंबई, धारवाड, सोलापूर, ह्या सर्व गांवीं बुवांकडे त्यांनीं अखंड शिक्षण घेतलें. जेथें बुवा जातील, तेथें

ताराबाई मुक्काम करीत आणि शिकवणींत खंड पडूं देत नसत. बुवांच्या पट्टशिष्या म्हणून त्यांचा लौकिक झाला होता. सूरश्री केसरबाईंनीं म्हटलें, " ताराबाईनें गाणें सोडलें नसतें, तर आम्हा कोणालाही गाण्यांत मानाचें स्थान मिळणें कठीण होतें. आधींच बांसरीनें लाजावें असा गोड आवाज आणि भास्करबुवांसारख्या अजोड गायकाची शिकवणी." ताराबाईंचा लौकिक सर्वत्र पसरला होता. इंदूरच्या महाराजांनीं त्यांची दरबार-गायिका म्हणून नेमणूक केली, पण बाईंनीं ती संस्थानची नोकरी कांहीं कारणानें सोडली. पुढें त्यांनीं गाणेंच सोडून दिलें. संगीताची एक मोठी हानि झाली. बुवांना ह्या घटनेनें केवढें दुःख झालें असेल, त्याची कल्पनाही करणें कठीण.

**सूरश्री केसरबाई** — आज महाराष्ट्रांतील गायक-वर्गांत पहिल्या दर्जाची जी थोडी मंडळी आहेत, त्यांत सूरश्री केसरबाईंची गणना होते. त्यांनीं अनेक थोर गायकांकडे शिक्षण घेतलें. विशेषतः अलादियाखांसाहेबांच्या शिष्या म्हणून त्यांचा लौकिक आहे. त्या १९१० च्या सुमारास मुंबईस आल्या. त्यापूर्वीं त्यांनीं गोव्यांत गायनाचें प्राथमिक शिक्षण घेतलें होतें. मुंबईत आल्यावर सुमारें वर्षभर त्यांनीं भास्करबुवांकडे शिक्षण घेतलें. नंतर कांहीं वर्षांनीं त्यांची अलादियाखांसाहेबांची शिकवणी सुरू झाली. ही शिकवणी सुरू असतांही केसरबाईंना भास्करबुवांचें गाणें वारंवार ऐकायला मिळे. खांसाहेबांचा आवाज वयपरत्वें ठीक नसला, कीं ते भास्करबुवांस बोलावून कित्येक अवघड जागा व ताना त्यांच्या तोंडून केसरबाईंना ऐकवीत. भास्करबुवा व अलादियाखां ह्यांचें कमालीचें प्रेमादराचें नातें केसरबाईंच्या अनुभवास येई. बुवांच्या मृत्यूनंतर अलादियाखांसाहेब कित्येक वेळां शिकवणी मध्येंच सोडून, गंधर्वाच्या नाटकांतील गाणें ऐकून येत. ते बाईंना म्हणत, " गंधर्वाचं गाणं ऐकतांना भास्करच्या दिव्य गाण्याच्या सुखद स्मृति जागृत होतात." सूरश्री केसरबाईंच्या मनांत अजूनही भास्करबुवांबद्दल नितान्त आदराचें स्थान आहे.

प्रसंगशः बुवांच्या अनेक शिष्यांचा उल्लेख आला आहे. परंतु इतरही अनेकांचा निदान नाममात्र उल्लेख करणें अवश्य वाटतें. कारण प्रत्येकाला बुवांची शिकवणी मिळाली होती. 'किर्लोस्कर नाटक मंडळीं' त जे नट

शिकत, त्यांतील अनेकांचा उल्लेख ह्यापूर्वी आला असला, तरी येथें त्यांचा पुन्हा उल्लेख करीत आहें. चिंतोबा गुरव, कृष्णराव गोरे, कोल्हापुरे, पेटकर.

गायिका-वर्गात पुण्याच्या रहमूबाई, मुंबईच्या चंदा कारवारकर, कुमटेकर, अंजनीबाई कलगुटकर, पद्माबाई कलगुटकर, वगैरे कित्येक स्त्रियांनीं शिक्षण घेतलें. त्याचप्रमाणें पुरुषवर्गात मुंबईस शास्त्रीहॉलमध्ये शिकणारे शंकरराव शिरगुडकर, त्र्यंबकबुवा कर्वे, शंकरराव पुराणिक, मधुसूदन वामन पाटणकर, अनंत शंकर करंदीकर, नारायण रामचंद्र ऊर्फ बाबुराव टापरे, बुवांचे आद्यगुरु पिंगळेबुवा ह्यांचे चिरंजीव, बापुराव राजहंस, वेहेरेबुवा, माधवराव लेले, नरहरबुवा पाटणकर, पंडित ब्रिजलाल, दस्तुर, विश्वनाथ पंढरपूरकर, डॉ. भांडारे, मायदेव, आदि अनेकांना बुवांची शिकवणी मिळाली. त्यांतील कांहीं नाटकांत, कीर्तनांत प्रसिद्ध आहेत. पंडित ब्रिजलाल मुख्यतः पेटी वाजवीत व बुवांची साथ करीत. बुवांच्या चरित्राशीं प्रत्येकाचा कमी-अधिक संबंध असला, तरी येथें सर्वांबद्दल विस्तारानें लिहिणें अशक्य आहे. अनेकांचा उल्लेख न कळत टळला असेल, त्यांनीं लेखकास क्षमा करावी.

एवढ्या बहुसंख्येनें विद्यार्थी शिकूनही बुवांचें घराणें कां निर्माण झालें नाहीं, त्याचा शेवटीं थोडा विचार अवश्य आहे.

भास्करबुवांनीं स्वतःच्या गायनानें एक अतिसुंदर, भव्य, वेड लावणारा आदर्श श्रोत्यांपुढें ठेविला. पण त्यांचें घराणेंमात्र निर्माण झालें नाहीं. कारण त्यांची स्वतःची गायकी हें एक अवघड रसायन असे. अनेक वर्षांच्या अखंड रियाजानें त्यांच्या स्वरांना जिल्हई आली होती. त्यांच्या त्या अतिशय अवघड गाण्याला सहजतेची सफाई आली होती. त्यांच्या रचनाबुद्धीला दीर्घ खोल अभ्यासाची व व्यापक चौकस अनुभवांची बैठक होती. स्वभावांत सौंदर्यपूजक वृत्ति होती. हवे ते पराक्रम करण्याची कष्टशीलता होती. त्यांच्या ह्या भव्य भूमिकेवर कोणीच शिष्य अथवा तत्कालीन कलावान् पोंचला नाहीं. भास्करबुवा ह्यांच्या गायकींत अनेक घराण्यांतील उत्तमोत्तम गुणांचें संमेलन झालें होतें.

बुवांच्या रंजकता ह्या एकाच अंगाचा त्यांच्या शिष्यांनीं आपापल्या मगदुराप्रमाणें पाठपुरावा केला. गाणें ऐकून कंटाळा न येणें, एवढीच

कल्पना त्यांच्या शिष्यांना उचलतां आली. बुवांच्या अष्टपैलू कौशल्याचें व विद्येचें ग्रहण करायला सर्वच विद्यार्थ्यांची शक्ति क्षीण ठरली. बुवांच्या स्वरसाधनेचें स्थूल स्वरूप गंधर्वांच्या गळ्यांत उमटलें. त्यांच्या लयकारीचा किंचित्सा भाग मास्तर कृष्णरावांच्या गाण्यांत दिसे, पण त्यांच्या रचनाबुद्धीच्या प्रतिभेच्या मागें असलेली प्रचंड विद्या व व्यापक अनुभव शिष्य-मंडळींच्या आकलनाच्या पार असे. दत्तोबा बागलकोटकर बुवांचा एखादा आलाप किंवा त्यांची एखादी तान बरोबर उमटवीत. बापूराव केतकर बुवांच्या वळणानें गात. पण शिक्षण, अनुभव, वगैरे सर्वच गुणांत त्यांचे शिष्य छोटुकले होते. बुवांच्या गायकींत सहजासहजीं अनुकरण करण्यासारख्या लकबी नसत. स्वर लावायच्या अनेक लकबी आहेत. तशा लकबी असलेल्या इतर गवयांच्या स्वरोच्चार-पद्धतींनीं त्यांचें घराणें ओळखतां येतें. सरळ, निर्दोष, स्पष्ट स्वर लावून, स्वरांना जिवंत करण्याची भास्करबुवांची संजीवनी केवळ लकबींची नक्कल करणाऱ्या शिष्यांना साधणें अशक्य असे. त्यांचा सूक्ष्म स्वरस्पर्श, स्वरक्रम, स्वरोच्चारांतील गतिमय आघात, त्या सर्व स्वरमालांत थरथरणारें – जाणवणारें सामर्थ्य व स्थैर्य, ह्यांची केवळ पुसट नक्कल करणेंही अशक्य असे. बुवा प्रत्येक स्वराच्या उच्चारांत आपलें सर्व, कौशल्य, जीवशक्ति आणि सौंदर्यशोधक प्रतिभा ओतीत. त्यांचा प्रत्येक स्वर हा एका मोठ्या गतिमय रचनेच्या स्पष्ट आकाराचा घटक असे. त्या स्वरांत जराही अस्पष्टता नसे. आजू-बाजूच्या स्वरकणांनीं त्यांचे स्वर बुळबुळीत होत नसत. ते अंतर्गत गतिमयतेनें गुंफलेले असत व संवादांच्या आंसेनें त्यांच्या गाण्याचा एक प्रकारचा निनाद कानांत घुमे. स्वरप्रेमी श्रोत्याच्या मनांत क्षणापूर्वीं ऐकलेल्या स्वराला पाठीमागून येणाऱ्या स्वराची आंस भेटून, संवादांचा एक अखंड स्रोत बने. रसिक श्रोता ह्या भरगच्च स्वरधारांत बांधला जाई. केवळ एखाद्या स्वर-जोडीच्या संवादांत बुवा स्वतःला गुरफटून घेत नसत. त्यांचें गाणें अकुंठित, अगणित स्वर-संवादांच्या आंसेनें ओथंबलेलें, वैभवसंपन्न असे. बुवांच्या चतुर, सहस्रविध स्वररचनांनीं, लयकारीच्या डौलदार गुंफणीनें गाणें रंगे. त्यांत स्वाभाविक गोड गळ्याचा नाद नसे. त्यांत स्वरांच्या सामर्थ्याची जाणीव प्रभावीपणें योजण्याचें कलावंताचें अमर्याद कौशल्य असे.

त्या प्रतिभेची नक्कल कशी होणार ? व घराणें कसें निर्माण होणार ? लोकमान्यांचें व्यक्तित्व जसें त्यांच्या प्रचंड भव्य आत्मिक शक्तींत असे, तोच प्रकार भास्करबुवांच्या स्वर-विश्वाचा असे. अशा गायकीचें घराणें उत्पन्न होणें अशक्य. बुवांसारखा शिष्य एकही उत्पन्न झाला नाहीं. अनेक शतकांत अशी बुद्धिमत्ता, कष्ट व कौशल्य ह्यांची क्वचित् सांगड पडते.

## प्रकरण सोळावें

# शिक्षण-पद्धति

भास्करबुवांसारख्या महान् कलाकाराची स्वानुभवावर आधारलेली शिक्षण-पद्धति कशी होती, ह्याविषयीं गायनप्रेमी व संगीत-शिक्षण घेणाऱ्या वाचकांस जिज्ञासा असावी, हें साहजिक आहे. गळ्याला, आवाजाला एक सुरेल, स्थिर, वजनदार वळण देणें, ही ह्या शिक्षणांतील एक प्राथमिक गरज असते.

युरोपांतील व अमेरिकेंतील संगीत-शाळांत ह्या आवाज-संस्करणाला अतिशय महत्त्व देण्यांत येतें. आवाज भरदार, गोल, पल्लेदार बनविणें व तीन सप्तकांतले स्वर तितक्याच वजनानें स्पष्ट व स्थिरपणें उच्चारण्यास समर्थ करणें, हा एक त्यांच्या गायन-शिक्षणांतील अवश्य भाग असतो. युरोपीय संगीत व आशियाई संगीत ह्यांत एक फरक आढळतो. आशियाई संगीतांत आवाज वजनदार, भरदार बनविण्याकडे विशेष लक्ष पुरविलें जात असलें, स्वरोच्चार खुल्या मोकळ्या गळ्यानें व्हावा असा प्रयत्न असला, तरी गायनानुकूल आवाज तयार करण्याची विद्यामात्र अतिशय उपेक्षिली जाते.

उत्तर-हिंदुस्थानी पद्धतीचें शिक्षण देतांनामात्र गाणाऱ्याला सप्तस्वरांचा दर्जा ओळखून त्या सप्तकांतील मधल्या छटांचें ज्ञान व उच्चारण साधावें, असाच मुख्य प्रयत्न असतो. वेगवेगळ्या स्वरांचा सप्तकांतील दर्जा ओळखणें ह्याला स्वरज्ञान म्हणतात व तोच राग-गायन शिकण्याचा पाया मानण्यांत येतो. हें स्वर-ज्ञान करून घेणाऱ्या विद्यार्थ्याला त्याच्या नैसर्गिक आवाजांतच स्वरोच्चार सहज साधावा, असें एक शिकवणीचें वळण दिसतें. गाण्याची दृष्टि, मोकळ्या गळ्यानें स्वराचा दर्जा बिनचूक लावून व तंबोऱ्यांतील स्वराशीं एकजीव करून, प्रयत्नपूर्वक देण्यांत येते. ह्या सुरेलपणानें नैसर्गिक गळ्याची गोडी वाढते, असें ह्या पद्धतींत मानण्यांत येतें.

दुसऱ्या एका वळणांत आवाजाला वजनदार ‘गाझ’, भरीवपणा, आणण्याचा प्रयत्न करण्यांत येतो. दररोज खर्जांतील स्वर स्थिर लावून व श्वसनक्रियेची शक्ति वाढवून, आवाजाचा भरदारपणा वाढविणें, ह्या गोष्टीला ह्या दुसऱ्या वळणांत फार महत्त्व देण्यांत येतें.

तिसऱ्या वळणांत सुरेलपणा साधण्यासाठीं नैसर्गिक आवाजाला कृत्रिम स्वरूप देऊनही सुरांचा दर्जा साधावा लागतो. वरचे स्वर घसा दाबून पण उत्तम संवादी दर्जाचे लावणारे अनेक गायक दिसतात. सर्व स्वरांत ह्या मंडळींच्या आवाजाचें जाडेंपण व वजन टिकत नाहीं, पण स्वरांचा मुलायम उच्चार हेंच ते ध्येय मानतात. वरच्या स्वरांची तीव्रता कमी व्हावी म्हणून ही मंडळी हलक्या आवाजांत किंवा आवाज चोरून वरचे स्वर लावतात. त्यांच्या गळ्यांतले हे दोष श्रोते सुरेलपणामुळें क्षम्य मानतात.

भास्करबुवा पहिल्या वळणानें नैसर्गिक आवाजाला सुरेल वळण देत. त्यांना आवाजावर कोठलीही कृत्रिम प्रक्रिया पसंत नसे. ते विद्यार्थ्यांच्या नैसर्गिक गुणधर्माचा फायदा घेत. त्यांनीं त्याच धोरणानें सर्व शिक्षणक्रम आखला होता. ‘भारत गायन समाजा’चा शिक्षणक्रम व अभ्यास-पद्धति ह्यांजबद्दल त्यांनीं एका पत्रकांत तपशील दिला आहे. त्या तपशिलाचा बारकाईनें अभ्यास केला, तर बुवांचे विचार व कार्यपद्धति ह्यांचा बराच स्पष्ट बोध होऊं शकतो.

'समाजा'च्या स्थापनेच्या वेळीं जें पत्रक प्रसिद्ध झालें, तें प्रिन्सिपल भास्करबुवांच्या संमतीनें अथवा त्यांच्या लेखी आदेशानुसार लिहिलें असावें, असें वाटतें. "अभ्यासक्रम सहा वर्षांचा असून, शेवटचीं दोन वर्षें विशेष वर्गासाठीं ठेवलीं आहेत. पहिल्या चार वर्षांत गायन-विद्येचें सामान्य स्वरूप विद्यार्थ्यांना मिळून, ज्यांना ह्या विद्येंत विशेष पारंगत व्हायचें असेल, त्यांना स्वतः मनन करून, दुसऱ्याचें ऐकून व ग्रंथ वाचून ज्ञान वाढवितां यावें, म्हणून भारतीय गायन-विद्येचें सोपपत्तिक ज्ञान, चिन्हांची स्वरमाला लिहिणें व स्वरमालेवरून चिजेची बांधणी करणें, वगैरे विषय दुर्मिळ चिजांच्या भरण्यासह शिकविण्यांत येतील.

"सप्तसूर गळ्यांत बरोबर बसविण्यांत पहिलें वर्ष जाईल. सूर काढतांना गळ्याची स्थिति कशी ठेवावी; उच्चाराचा झोत कंठाच्या भलत्याच भागावर न बसेल अशी खबरदारी कशी घ्यावी, सूर एकसारखा स्थिर करून ठेवण्यास, एका सुरावरून दुसऱ्या सुरावर जाण्यास, पुढें जाण्यास किंवा मागें परतण्यास श्वासोच्छ्वास कसा घ्यावा, किंवा कसा रोखून ठेवावा, वगैरे गोष्टींकडे ह्या वर्षीं विशेष लक्ष पोंचविण्यांत येईल व त्यामुळें सूर लावण्यासंबंधींच्या वाईट सवयी विद्यार्थ्यांना लागणार नाहींत.

"सप्तसूर गळ्यांत बसल्यानंतर निरनिराळ्या रागांच्या ठेवणीला उपयोगी पडणाऱ्या सुरावर्ती – स्वरांचे विशिष्ट समुदाय – विद्यार्थ्यांकडून तयार करून घेण्यांत येतील.

"गायन-विद्या ही केवळ पुस्तकी विद्या नसून तोंडी गणिताच्या धर्तीची, असल्यामुळें, तोंडच्या हिशेबाला जसे पाढे व पर्वचा यावा लागतो, त्याप्रमाणेंच कोणतेंही गीत गायला लागण्यापूर्वीं विद्यार्थ्यांना सामान्य सुरावर्ती कंठगत होणें जरूर आहे. सुरावर्ती घटवीत असतांना चार-पांच सोप्या रागांचें सुरावर्तीच्या पद्धतीचें स्वरूप विद्यार्थ्याला शिकविण्यांत येईल ... शिकविल्या जाणाऱ्या सुरावर्ती व सोप्या चिजा ह्यांना लागणारें तालाचें सामान्य ज्ञानही ह्याच वेळीं देण्यांत येईल.

"दुसऱ्या वर्षीं मुख्य रागांच्या सुरावर्ती, हिंदी व मराठी चिजा आणि साध्या ताना ह्यांस ह्याच वर्षीं आरंभ होईल. तिसऱ्या वर्षी मुरक्या, खटके

घसीट, वगैरे अलंकारांची माहिती देण्यांत येईल. हे अलंकार म्हणजे भारत-गायन-विद्येचें विशेष अंग होय. ह्या अलंकारांनीं गायन कसें नटवावें हें शिकवून, नटलेल्या, सजलेल्या चिजा शिकविण्यांत येतील. चौथ्या वर्षांत चीज घोळून विस्तार करणें, तानांचे फैलाव व अलंकारांचा वैचित्र्यपूर्ण वापर ह्यांसह चिजा शिकविण्यांत येतील. पांचव्या व सहाव्या वर्षांत तानांच्या फैलावाचें सोपपत्तिक ज्ञान, अलंकारांची सशास्त्र बांधणी, ऐकलेल्या चिजेची स्वरमाला लिहिणें, लिहिलेल्या स्वरमालांवरून चीज कंठांतून काढणें, व दुर्मिळ चिजांचा भरणा करून देण्यांत येईल. ”

ह्या अभ्यासक्रमांत भास्करबुवांची गायनविद्या शिकविण्याची योजना थोडक्यांत समजते. एका गायन-विद्यालयाचे प्रिन्सिपल म्हणून बुवांनीं केलेल्या विधानांवरून व प्रत्यक्ष अनुभवावरून भास्करबुवांच्या शिक्षणपद्धतीची स्पष्ट कल्पना येते.

‘ भारत गायन समाजां ’ त शिक्षण घेतलेल्या बुवांच्या शिष्यांनीं त्यांच्या शिक्षण-पद्धतीचें मोठें रंजक वर्णन केलें आहे. स्वरोच्चार निर्दोष व्हावेत असा कटाक्ष, भास्करबुवांच्याही शिक्षणांत पायाभूत असे. भास्करबुवांचा लयकारीवरही विशेषच भर असे. पण खर्ज लावण्याच्या मेहनतीनें स्वतःच्या गळ्याचें वजन – गाज – वाढविण्याची कल्पना त्यांस मान्य नव्हती असें दिसतें. फैजमहंमद ह्यांनींही कोणा विद्यार्थ्यास खर्जाची मेहनत करण्यास सांगितली नाहीं, असेंच श्रीमती हंसाबाई, कानडेशास्त्री, आदि विद्यार्थ्यांच्या विधानांवरून स्पष्ट दिसतें.

एखाद्या सुरेल्या गळेबाज कलावंत स्त्रीनेंही लाजावें, इतकी अनिर्बंध फिरत भास्करबुवांच्या गळ्यांतून तिन्ही सप्तकांतून सारख्याच वजनानें प्रकट होई. खालच्या सप्तकांत स्वर रुंदावणें व तार सप्तकांत किरटा होणें, घशाला ओढ पडणें, ह्या दोषांपासून भास्करबुवांचें गाणें अलिप्त होतें. एखाद्या वाद्यांत समान पातळीची स्वरमाला उमटावी, तसें बुवांचें तीन सप्तकांत सहज निर्दोष फिरणें असे. ह्या आदर्शानुसार शिष्याच्या नैसर्गिक आवाजाची गोडी व झेप वाढविण्याचा बुवांचा प्रयत्न असे. पहाटेपासून मध्यरात्रींपर्यंत अखंड रियाज – शिकवण्या – चालू असल्यानें त्यांच्या घशांतले दोष विरघळून

गेले होते. मनांत कल्पना येतांच बुवांचा गळा लयबाज, सुरेले स्वर उच्चारी. बुवांच्या गाण्याचें स्वाभाविक अनुकरण होऊन शिकणाराच्या गळ्याला अप्रतिम वळण लागे. प्रत्येक विद्यार्थ्याच्या आवाजाचा नैसर्गिक धर्म व मर्यादा लक्षांत घेऊन बुवा शिकवणींत फरक करीत. शिष्य तालास्वराला पक्का होऊं लागतांच बुवा त्याला वेगवेगळ्या वेळीं गायचा एक प्रमुख राग शिकवीत. सकाळ, दुपार, संध्याकाळ व रात्र ह्या काळाचा एकेक राग शिकवून झाला, कीं नंतर क्रमानें एकेका रागाची भर घालीत. एकेका रागांतले, ध्रुपद, ख्याल, वगैरे अनेक प्रकार शिकवून त्या रागाचें वैशिष्ट्य व विविध प्रकारचा विस्तार ह्यांचा विद्यार्थ्यास सहज बोध व्हावा, अशा प्रकारें स्वतः गातांना स्पष्टीकरण करीत. गायनांतल्या अनेक दोषांपासून ते विद्यार्थ्याला पदोपदीं सावध करीत. ज्यांना आस नाहीं, गुंजनाची मधुरता नाहीं, असे खडे स्वर लावणें, ह्यांचें बुवांना वावडें असे; शिष्यांत ती अभिरुचि उत्पन्न होऊन, जाणीवपूर्वक लावण्यपूर्ण स्वरोच्चार करण्यास बुवा त्याला उद्युक्त करीत.

चिजेची नित्य नवी, विविध अलंकारांनीं नटलेली एकजीव बांधणी करणें व गायनांत उत्कर्ष साधणें, हा बुवांच्या गायनांतला जो वैभवाचा भाग असे, तो भाग स्वयंस्फूर्त येणें, ही क्रिया विद्यार्थ्याच्या बुद्धीवर व अनुभवावर अवलंबून असे. चिजेच्या विस्ताराचें रहस्य क्रमानें सर्व विद्यार्थ्यांनीं साध्य करावें म्हणून बुवा ‘ समाजां ’ त गुरुवारीं रात्रभर गात. विद्यार्थ्यांना सुरुवातीस थोडा वेळ गायला बसवीत. इतर गवयांच्या तर ‘ समाजां ’ त अखंड मैफली होत. वादकांचे कार्यक्रम होत. विद्यार्थ्यांची सौंदर्यबुद्धि जागृत व्हावी असे प्रयोग व चर्चा ‘ समाजां ’ त अखंड चाले. ह्या सारांशावरून बुवांच्या शिक्षण-पद्धतीचें स्वरूप समजेल.

प्रकरण सतरावें

# शास्त्र-ज्ञान

भास्करबुवा बखले हे अतुल कलावंत होते. भास्करबुवांच्या शिक्षणकालांत शास्त्राभ्यासाच्या अनेक अंगांना चालना मिळाली. स्वर-लेखन-पद्धति, बावीस श्रुतिस्थानें निश्चित करणें, बावीस श्रुति-वादनाची पेटी, वगैरे चळवळींमुळें संगीताभ्यासी मंडळीस शास्त्र-ज्ञानाची चर्चा व प्रयोग ऐकायला मिळत. अशा प्रयोगांत बुवांना भाग घ्यावा लागे व संस्कृत ग्रंथांचीं वेगवेगळीं मतें अशा चर्चेंत अभ्यासी लोकांच्या तोंडून ऐकूं येत. कोणताही कलावंत अशा शास्त्रीय चर्चांतून सर्वस्वीं मुक्त राहाणें शक्य नसे. बुवांनींही अनेक ग्रंथ वाचले होते. गायनशास्त्र समजण्यासाठीं अवश्य ती पूर्वतयारी बुवांच्या गुरुजींनीं करून दिली होती.

अगदीं बालवयांत भास्कर बखले ह्याला कथेकरी पिंगळे ह्यांनीं गायन शिकविण्यास सुरुवात केली. त्या काळीं कथेंत ध्रुपद-धमाराचें गाणें गायक कथेकरी गात व गुरव पखवाजी तालांची करामत करीत. झांज, चिपळ्या, वगैरे साधनांनीं लय व लयीची दुप्पट, चौपट नामगजर करतांना करीत.

ध्रुपदाची बांधणी व लयकारी ह्या विषयांचें ज्ञान कलेचा पाया म्हणून शिकविलें जात असे. ह्या वर्षा-दोन-वर्षांच्या शिक्षणानंतर 'भास्कर' 'किर्लोस्कर कंपनीं' त बाळकोबा नाटेकर ह्यांजवळ राहून शिकूं लागला. त्यांना सतार-वादनाचा विशेष नाद असे. ह्याच काळांत भास्करला सुमारें पांच-सहा महिने बीनकार बंदेअल्ली ह्यांची तालीम मिळाली व सप्तकांतील सूक्ष्मश्रुति, ठाय लय, स्वरांचें आंदोलन, संवाद, आस, वगैरे गुणांचें प्रयोगशः ज्ञान मिळूं लागलें. शास्त्र-वचनांचा अर्थ समजण्याइतकी समज कलावान् ह्या नात्यानें भास्करमध्यें निर्माण झाली. स्वर-ज्ञान अधिक निश्चित होऊन पुढें फैजमहंमद मुलाला तालीम देत, ती खोलीबाहेर उभें राहून, ऐकून, चीज व सारेगम ह्यांचें कागदावर टिपण करून, विद्या चोरण्याइतकी तयारी भास्करची झाली.

नंतर सात वर्षें फैजमहंमदखांसाहेबांची वेगवेगळ्या रागांची निश्चित मूर्ति साकार करण्याची प्रत्यक्ष तालीम मिळाली. वेगवेगळ्या तालांचें वैचित्र्ययुक्त वजन आलापांत अखंड टिकविण्याचेंही वळण खांसाहेबांनीं भास्करला लावलें. ह्या तालमींतूनच नथ्थनखां व अलादियाखां ह्यांच्या विद्येतील स्वारस्य समजण्याची पात्रता भास्करमध्यें निर्माण झाली. स्वरांचें सूक्ष्म संवादी सौंदर्य फैजमहंमदखांनीं भास्करच्या गळ्यांत इतक्या प्रभावानें ठसविलें होतें, कीं पुढें भास्करबुवांच्या त्या स्वरांनीं श्रोत्यांचे डोळे आनंदाश्रूंनीं अनेकदा भरून येत. वेगवेगळ्या रागांत स्वरांचीं प्रभावी श्रुतिस्थानें कशीं वापरावीं, ह्या विषयाचें बाळकडू फैजमहंमद ह्यांनीं भास्करला आठ-नऊ वर्षांच्या शिक्षणांत पाजलें होतें.

कलावन्त म्हणून जें शास्त्रीय ज्ञान भास्करला मिळालें, तें इतकें उत्तम दर्जाचें होतें, कीं पुस्तकी शास्त्रीय ज्ञान समजण्यास भास्करला जराही कष्ट पडत नसत. मूळच्या संस्कृत शिकवणीमुळें संगीत ग्रंथांचें हृद्गत समजण्याची संगीत-विद्या-विभूषित भास्करची खूपच उत्तम तयारी झाली होती. मन शास्त्र-ज्ञानाचे कण वेचण्यास सादर उत्सुक असे.

बडोदा हें संगीत-विद्येचें एक आश्रयस्थान असल्यामुळें तेथें उत्तम कलावन्त व विद्वान् मंडळींची नेहमीं ये-जा असे. मंगेशराव तेलंग व

पुरुषोत्तमराव तेलंग, हे संगीत-शास्त्राचे अभ्यासक बडोद्यास राहात. मौलाबक्ष ह्यांच्या शाळेचें वळणच पुस्तकी शास्त्र-ज्ञानाच्या मदतीवर उभारलेलें असल्यामुळें तेथें अखंड शास्त्रचर्चा चाले.

पुस्तकी शास्त्रीय ज्ञान हें नेहमींच कलाक्षेत्रांत दुय्यम दर्जाचें; गुरुपरंपरेचें, गुरुमुखानें प्रयोगशः मिळणारें ज्ञानच कलेला अत्यावश्यक, अशा पक्षाची जी दुसरी शाळा फैजमहंमद १८८९ सालापासून चालवीत, त्या शाळेचे मुख्य मदतनीस गुरुजी म्हणून भास्कररावांची नेमणूक झाली होती. अर्थातच सरकारी कलाक्षेत्रांत संगीत-कला-विषयक व शास्त्र-विषयक जितक्या घडामोडी होत, त्यांची दाद भास्कररावांस घ्यावीच लागे.

भास्कररावांचें बडोद्यांतील शिक्षण पूर्ण होण्यापूर्वींच अनेक शास्त्रीय पुस्तकांचा परिचय बडोद्यांतील अभ्यासी मंडळीस झाला होता. अनंत सखाराम माळवेनामक एका अभ्यासु गृहस्थांनीं 'राग-विलास' नामक एक संगीत-शास्त्राचें पुस्तक १८९२ सालीं लिहिलें व तें भाऊराव कोल्हटकर ह्यांस अर्पण केलें. माळवे ह्यांचें पुस्तक तयार होण्यापूर्वींच दहा-बारा पुस्तकें बडोद्यांत उपलब्ध असत. 'संगीत-रत्नाकर' चें प्रकाशन नंतर दोन वर्षांनीं झालें, पण त्याच्या हस्तलिखित प्रती उपलब्ध असल्यामुळें त्याचा परिचय अभ्यासी लोकांत होता. माळवे ह्यांच्या पुस्तकांत 'रत्नाकरां' तले उतारे आहेत. शिक्षण-खात्यांतील सहस्रबुद्धे ह्यांचें 'हिंदु म्यूझिक', कवि लोकनाथ पंडितांचें 'वंसि-रागमाला', प्रो. आदित-रामजींचें 'संगीतादित्य', प्रो. मौलाबक्षांचें 'संगीतानुभव', गणपतराव बर्वे ह्यांचें 'नादलहरी', 'रागस्तान', 'चयमन-ए-बेनजीर' व 'गुन्च्यू-ए-राग', नरहरराम मुनशी ह्यांचें 'गायनदर्पण', कवि दलपतराम ह्यांचें 'सकल-शास्त्र-निरूपण', माकोडे ह्यांचें 'रस-प्रबोध', इत्यादि ग्रंथांच्या आधारें माळवे ह्यांचें 'राग-विलास' हें संगीत-शास्त्र-विषयक पुस्तक लिहिलें गेलें. सहस्रबुद्धे ह्यांनीं सुमारें तीसहून अधिक शास्त्रग्रंथांचा परिचय व उल्लेख आपल्या 'हिंदु म्यूझिक' ह्या पुस्तकांत केला होता.

भास्करबुवांची विद्यार्थी-दशा अशा नव्या-जुन्या पुस्तकांच्या चर्चेनें व्यापलेली असे. ज्या प्रकारच्या वातावरणांत विद्यार्थ्यांचें शिक्षण होतें, त्या

वातावरणाचा परिणाम विशेष जागृत अशा हुशार विद्यार्थ्यांवर कमी-अधिक प्रमाणांत होतोच. त्यामुळें संस्कृततज्ञ भास्कर बखले ह्यास संगीत-शास्त्राच्या पुस्तकी ज्ञानाचा परिचय होणें अगदीं स्वाभाविक होतें.

अर्वाचीन कलेंतील प्रत्यक्ष रियाज व संस्कृत शास्त्रग्रंथांतील निरूपण ह्यांत बरेंच अंतर असल्यामुळें शास्त्र-ज्ञानाचा परिणाम गायनकलेंत दिसणें अशक्य होतें. एक 'ग्राम' ही कल्पना घेतली तर चार ग्रंथांत त्या कल्पनेबद्दल चार भिन्न विधानें आढळतात. हें ज्ञान गायकास शास्त्र-जिज्ञासेमुळें झालें, तरी त्या ज्ञानाचा कलावन्ताच्या कलेवर कसलाच संस्कार उमटणें कठीण.

कलावन्त जगाशीं भास्करबुवा एकजीव होत, त्याचप्रमाणें शास्त्र-ज्ञानाचे जिज्ञासु लोक भास्करबुवांशीं संगीत-शास्त्र-चिकित्सा करण्यास उत्सुक असत. बडोद्याचे सहस्रबुद्धे, मंगेशराव तेलंग, 'पूना गायन समाजा'तील सहस्रबुद्धे, देवल, दत्तोपंत जोशी, तांबे, शास्त्री, अचरेकर, पाध्येबुवा, वगैरे अनेक अभ्यासी लोकांचा गराडा भास्करबुवांच्या भोवतीं नेहमींच असे. भास्करबुवा उत्तरेकडे दौरे काढीत, तेथेंही ध्रुपदिये व शास्त्र-विचार केलेले लोक त्यांना भेटत. भास्करबुवा सर्व प्रकारच्या चर्चेंत भाग घेत. तो विषय ते टाळीत नसत. शास्त्राभ्यास करणारांबद्दल योग्य आदर बाळगून ते जिज्ञासेनें अनेक शास्त्र-ग्रंथांतील मतें समजून घेत. स्वतःच्या मनाशीं ते तात्पर्यार्थ निश्चित ठरवीत.

मीं ज्या काळीं भास्करबुवांना अशा चर्चेंत भाग घेतांना पाहिलें आहे, त्या काळांत मला त्या चर्चा मुळींच समजत नसत. 'रत्नाकर', 'पारिजात', 'मकरंद', वगैरे अनेक ग्रंथांचा उल्लेख चर्चा करणारे करीत. भास्करबुवा एखादा श्लोक व गायनांतलें एखादें उदाहरण सुचवीत, पण चर्चेचें स्थूल स्वरूप मला आतां स्मरत नाहीं. भास्करबुवा शास्त्रीय ज्ञानाबद्दल उदासीन नसत. विद्वान् संगीत-शास्त्रज्ञांच्या चर्चेंत ते जाणतेपणानें भाग घेत. एकेका रागांतील स्वराचें श्रुतिस्थान निश्चित व्हावें, म्हणून पाध्येबुवा व भास्करबुवा दोन तंबोरे घेऊन तासन्तास आलाप घेऊन गात व अमूक रागांत, अमूक स्वर, अमूक दर्जाचाच घेणें इष्ट, असें ठरवून चार-चार तासांनीं चर्चा थांबवीत. भास्करबुवा शास्त्र-चिकित्सक सहस्रबुद्धे ह्यांच्या सहवासांत सुमारें

पांच वर्षें असत. क्लेमंट्स्साहेबांची बावीस श्रुतींची पेटी, तिचा प्रयोग व चर्चा ह्यांत भास्करबुवा लक्ष घालीत, त्यामुळें १९१४ सालीं भास्करबुवांना ' फिलहार्मोनिक सोसायटी ' नें सन्मान्य सभासदत्व दिलें. ह्या सर्व घटना लक्षांत घेणें आवश्यक वाटतें.

संगीत-शिक्षक म्हणून स्वतःच्या वेगवेगळ्या गुरूंनीं शिकविलेल्या शेकडों चिजांची रूपरेषा ग्रंथरूपानें प्रसिद्ध करावी अशा इच्छेनें भास्करबुवांनीं कित्येक चिजा डॉ. सांब्रारे ह्यांच्या हस्तें लिहून घेतल्या होत्या. शास्त्र-चिकित्सेच्या क्षेत्रांत न उतरतां कलावंताला अवश्य ती भूमिका समजावी म्हणून भास्करबुवांनीं एक दीर्घ प्रस्तावना-लेखही लिहायला सुरुवात केली होती. हा लेख लिहून पूर्ण झाला नाहीं, त्याचप्रमाणें अनेक रागांतील कित्येक चिजांच्या सुरावटीची रूपरेषाही लिहून पूर्ण झाली नाहीं.

भास्करबुवा अधिक काळ जगते तर कदाचित् ही ग्रंथमाला लिहून पूर्ण झाली असती. नुसता प्रास्ताविक विभाग जरी लिहून पूर्ण झाला असता, तरी बुवांची शास्त्र-विषयक भूमिकाही अधिक स्पष्टपणें व पूर्णत्वानें त्यांत नमूद झाली असती.

' भारतीय संगीत ' ह्या मासिकाच्या दुसऱ्या अंकांत ( १९३३, जानेवारी ) बुवांच्या हातचें एक अपूर्ण टांचण त्यांचे जामात श्री. धामणकर ह्यांनीं प्रसिद्ध केलें आहे. त्या टांचणावरून बुवांचीं मतें पुसटपणें लक्षांत येतात. त्या लेखांतील कांहीं भाग परिशिष्टांत दिला आहे. त्यावरून बुवांचीं मतें पं. भातखंडे ह्यांच्याशीं बऱ्याच प्रमाणांत जमत असें दिसतें.

पं. भातखंडे ह्यांजसारख्या चिकित्सक अभ्यासी मंडळींबद्दल भास्करबुवांस आदरयुक्त कौतुक व प्रेम वाटे. त्यांची जिज्ञासा व संगीत-शास्त्रावरील निष्ठा थोर होती. पण ते पोथी-निष्ठ, पंथ-निष्ठ सिद्धान्तवादी नव्हते, ते व्यवहारचतुर होते.

भास्करबुवांची रसिक वृत्ति, वेगवेगळ्या घराण्यांत व वेगवेगळ्या पद्धतींत अगणित सौंदर्य-स्थानें असतात, तीं हंस-क्षीर न्यायानें वेचावीं अशी होती. गायनाच्या प्रभावी मांडणीसाठीं जुन्या उस्तादांनीं तत्त्वज्ञान व प्रयोग

ह्या दोन्ही दृष्टींनीं सिद्धान्त मांडले, ते समजून आपण आपला उत्कर्ष व प्रगति साधावी, अशी बुवांची अभ्यासी वृत्ति होती.

भास्करबुवांना स्वर-लेखन-पद्धतीच्या अपूर्णतेची पूर्ण जाणीव होती, तरीही त्या पद्धतीचा व्यावहारिक उपयोग त्यांना महत्त्वाचा वाटे. गायनांतील गतिमयता, सौंदर्य, वगैरे कितीतरी गुणांची यथातथ्य नोंद स्वर-लेखन-पद्धतींत होऊं शकत नाहीं, गुरुमुखानेंच अनेक गुणांचें ज्ञान घेणें अवश्य, असा भास्करबुवांचा अनुभवजन्य दृढ विश्वास होता. ह्या त्यांच्या मतामुळें पंडित ॐकारनाथ नाराज झाल्याची एक आठवण जालंदरच्या वनस्थळींतील एका प्रसंगीं नमूद झाली आहे.

भास्करबुवा मुसलमान गुरुजींकडून विद्या शिकले, तरी भारतीय संगीतशास्त्र हें मुख्यतः हिंदूंचें असून, हिंदूंनींच ह्या शास्त्राचा विकास साधला, असें त्यांचें मत दिसतें. तरी गुणांची कदर करण्यासाठीं भास्करबुवा मुसलमान गवयांचा आदर-सत्कार करीत, त्यांच्याशीं धर्मभेद व जातिभेद ह्यांची जाणीव न ठेवतां वर्तन करीत. गुरूला दैवत मानण्याची त्यांच्या मनाला शिस्त होती.

भास्करबुवांना रागांचें रंजकत्व व शुद्ध स्वरूप ह्यांचें महत्त्व सर्वांत अधिक वाटे. त्यांच्या कलेंत व त्यांच्या अपूर्ण टांचणांतही हें स्पष्ट दिसतें. ठुमरीच्या गायनाला नर्तनाची लय अनुकूल, हेंही त्यांचें मत लक्षांत घेतलें पाहिजे.

श्रुति, ग्राम-व्यवस्था, वगैरे केवळ शास्त्रीय विषय त्यांनीं स्वतःच्या प्रस्तावनेंत गाळून केवळ बारा स्वरांच्या स्थूल रूपरेखेनें रागांचें स्वर-वर्णन सुरू केलें आहे. सूक्ष्म श्रुति-स्थानें व शास्त्रेतिहास-विषयक इतर प्रश्न, ह्या अवघड विषयांत विद्यार्थी गोंधळून जाऊं नये, हा त्यांचा स्पष्ट उद्देश दिसतो.

नाद-लहरींची स्थूल कल्पना दिल्यानंतर कोमल, अतिकोमल, वगैरे स्वर-प्रकार सांगून, षड्ज व पंचम हे अविकृत मानून, बारा स्वरांच्या मदतीनें रागांच्या वर्गीकरणाची सुरुवात भास्करबुवांनीं केली. भातखंडे ह्यांच्याच वळणाची दहा थाटांची योजना वापरून ते राग-वैशिष्ट्याकडे वळले आहेत. रागाचें वेगळेंपण दर्शविणाऱ्या रचनांस गातांना प्राधान्य दिलें पाहिजे, ह्या त्यांच्या स्वतःच्या धोरणावर बुवांनीं प्रस्तावनेंत भर दिला आहे.

तालांचें वर्गीकरण, वगैरे प्रत्येक विषयांत भास्करबुवांचा स्वतःचा दृष्टिकोन स्पष्टपणें दिसावा, अशी त्यांची लेखनपद्धति आहे. दुर्दैवानें ही संक्षिप्त प्रस्तावनाही पूर्ण लिहिली गेली नाहीं. लयकारीबद्दल त्यांचें धोरण लिहिलें गेलें असतें, तर एक अमोल लाभ झाला असता.

ही त्रोटक प्रस्तावना लिहितांना वादग्रस्त विषय, संगीत-कलेच्या विकासाचा इतिहास, आदि ज्ञान भास्करबुवांस होतें असें वाटतें. बुवा विद्वान् चिकित्सक मंडळींच्या नित्य सहवासांत होते. चिकित्सा टाळण्याची त्यांची वृत्ति नव्हती. तत्कालीन सभांना ते उपस्थित असत, चर्चा ऐकत व वाचीत. 'केसरी'-सारख्या बुवांच्या आवडत्या वर्तमानपत्रांत बर्वे, वगैरे मंडळींचे लेख प्रसिद्ध होत. १८९० ते १९२० चा तो अभ्यासी चिकित्सेचा काळ डोळ्यांपुढें आणला, तत्कालीन ग्रंथ, चर्चा, चळवळी, लक्षांत घेतल्या, तर बुवांच्या शास्त्र-ज्ञानाचें क्षेत्र अंदाजानें कळतें. भास्करबुवांच्या शास्त्र-ज्ञानाबद्दल दत्तोपंत जोशी, पाध्येबुवा, आदि मित्रमंडळींनीं आपापले अनुभव नमूद केले असते, तर बुवांच्या चरित्राचें हें अंग अधिक स्पष्टपणें समजलें असतें. तूर्त बुवांनीं 'भारत गायन समाजा'च्या उद्देशपत्रिकेंत स्वीकारलेल्या कार्यक्षेत्रावरून मानावें लागतें, कीं कलाभ्यास व शास्त्र-ज्ञान ह्या दोन्ही अंगांचें ज्ञान घेण्यास विद्यार्थी तयार व्हावेत असें बुवा मानीत. त्यांचें तसें मत होण्याइतकी त्यांची बहुश्रुत भूमिका होती, एवढें निश्चित म्हणतां येतें.

प्रकरण अठरावें

# सुगम संगीत

भास्करबुवा हे शास्त्रज्ञ, विद्वान् ख्याल-गायक होते, ध्रुपदासारख्या प्रौढ, कठीण गायकीचा त्यांना दृढ परिचय होता व कलेच्या विकासांतील अवघड समस्यांच्या चिंतनांत ते अखंड मग्न असत. परंतु त्या सर्व अवघड गायन-क्षेत्रांत रंजकता निर्माण व्हावी, असा सुगम संगीताचा भरपूर मसाला त्यांच्या संग्रहीं असे.

भजन, लावणी व नाट्यगीतें हे मराठी प्रकार त्यांस अवगत होते. गुजराती गरबे, व्रिजभाषेंतील होरी व दोहेही त्यांना मुबलक प्रमाणांत पाठ येत व प्रसंगीं त्यांच्या मैफलींत ह्या सर्व प्रकारांचें दर्शन घडे. त्याचप्रमाणें पंजाबी टप्पे, बनारसची व लखनौची ठुमरी, गझल, कवाली, आदि अनेक ढंगांचें गायन ते हौसेनें ऐकत-शिकत. टप्पा व ठुमरी हे दोन प्रकार ते अनेकदा गात. त्यांचे गुरु फैजमहंमद हे अष्टपद्या म्हणत, दोहे म्हणत, मोठ्या भक्तिभावानें भजनें गाऊन ते शिष्यांस म्हणत, कीं मी माझी जुनी हिंदु परंपरा विसरलों नाहीं. फैजमहंमदसाहेबांकडे शिक्षण घेत असतांच भास्करबुवा बडोद्यांत अनेक गरबे शिकले, त्या नृत्य-गायनाचे ताल शिकले. त्याच

काळांत लावणी-गाण्याचे महान् उस्ताद अप्पाराव कोल्हटकर ह्यांजकडे बुवांनीं उत्तम ढंगाची लावणी व त्या गायकीची ढंगदार लय आत्मसात् केली होती.

बडोदा दरबारांत अनेक नर्तकींचें नृत्य होई. तेथें बुवांना खास ढंगदार ठुमरी ऐकायला मिळे. ठुमरींतला भावपूर्ण शब्दोच्चार, नखरेल स्वरालंकार, डौलदार आंदोलनांची गतिसूचक लय, ह्या सर्वांचा त्यांच्या संस्कारक्षम मनावर खोल ठसा उमटे. नित्य नवें ऐकावें, तें अखंड गावें, गळ्यांतून हरढंगी संगीत सफाईनें व्यक्त व्हावें, हा त्यांचा प्रयास अखंड चाले.

फैजमहंमद ह्यांच्याकडे शिकणाऱ्या विद्यार्थ्यांचे गट जमून त्यांचें अखंड गायन-वादन चाले. अशा बैठकी अप्पाराव कोल्हटकरांकडेही झडत. तेथें फैजमहंमदसाहेबांचें अवजड गाणें भास्कर गाऊन दाखवी, त्याचबरोबर तो अनेक ठुमऱ्या व लावण्याही म्हणे. अप्पारावांच्या तोंडच्या अनेक लावण्या भास्कर त्यांच्या ढंगानें गायचा प्रयत्न करी. भाऊराव कोल्हटकरांचें लावणी वळणाचें बरेंचसें गाणें भास्करला मुखोद्गत असे.

काव्य व स्वरोच्चार आणि भावना व लय ह्यांचा प्रभावी समन्वय साधण्याची दृष्टि भास्करला विद्यार्थीदशेंत आली. नाट्याच्या रंगमंचावरील गाणें व नाच ह्यांचाही संस्कार पुसट झाला नव्हता. भास्कर उत्तरोत्तर विद्वान् ख्याल-गायक झाला, तरी त्याच्या मनावर भावनोद्दीपक गाण्याचा विचार खोल रुजलेला असे. त्याच्या अतिशय प्रगल्भ व अवघड गाण्यांतील रंजकतेला जराही कमीपणा येत नसे. कारण खेळकर भावयुक्त गाण्याचे साधे प्रकार त्यानें कधींच गौण मानले नाहींत. बहुजनसमाजाला रंजविण्याचें कलावन्ताचें आद्य कर्तव्य विद्वान् भास्करबुवांनीं उपेक्षिलें नाहीं.

भास्करबुवा मैफलीच्या आकलनाच्या मर्यादेंत येतील असे अनेक सुगम संगीत प्रकार गात. ठुमरी व नाट्यगीतें बुवा कसे गात, त्यांचें अभ्यासपूर्वक वर्णन कोणींच केलें नाहीं. गोविंदराव टेंबे, प्रोफेसर ना. सी. फडके, केशवराव भोळे, वगैरे जाणत्या लेखकांनीं बुवांच्या अवघड गायकीचें वर्णन करण्याचा प्रयत्न केला. प्रत्येकानें स्वतःच्या आवडी-निवडीनुसार लेख लिहिले. कांहीं लेखांत ह्या सुगम संगीताचा गौरवपूर्ण उल्लेख आहे. परंतु भास्करबुवांच्या

चरित्रांत ठुमरी, नाट्यसंगीत, वगैरे गायनप्रकारांना फार महत्त्व असल्यामुळें, येथें त्यांच्या पद्धतीचें स्वरूप वर्णन केलें आहे.

बुवा ज्या दर्जाचें प्रौढ अवघड ख्याल-गायन करीत, त्या प्रकारचें गाणें ऐकण्यास त्या काळीं बहुसंख्य समाज सुसंस्कृत झाला नव्हता. उत्तर भारतांत ठुमरी-गायनाचा तो वैभव-काळ होता. बहुजनसमाजाची अभिरुचि त्या सोप्या गाण्यानें बनविली होती. गोहरजान, मल्काजान, जोहराबाई, जानकीबाई, मोजुद्दिनखां, प्यारासाहेब, वगैरे मंडळी अतिगोड ठुमरी कौशल्ययुक्त वळणानें गात. बहुतेकांचे आवाज मधुर, आकर्षक असत. ह्या ठुमरी-गायकांपैकीं अनेकांनीं महाराष्ट्रांतही दौरे काढले, मुक्काम केले. महाराष्ट्रांत ख्याल-गायकी ऐकण्यास उत्सुक असे श्रोते निर्माण होण्यापूर्वीचा निदान दहा-वीस वर्षांचा काळ असा होता, कीं जेव्हां गायनप्रेमी बहुजनसमाज ठुमरी व मराठी नाट्यगीतें ह्यांचा हौसेनें आस्वाद घेई. क्रमानें मराठी नाट्यसंगीत ठुमरीच्या मार्गानें ख्याल-गायनाच्या वळणावर गेलें व बहुजनसमाजाचीही जिज्ञासा वाढली.

मराठी नाट्य-संगीताला भाऊराव कोल्हटकरांनीं अलोट लोकप्रियता मिळवून दिली. त्याच सुमारास बाळकृष्णबुवा इचलकरंजीकर ख्याल-गायकी शिकून महाराष्ट्रांत येऊन स्थाइक झाले. पुढें क्रमानें रहिमतखां, नथ्थनखां, अबदुलकरीमखां, भास्करबुवा, रामकृष्णबुवा वझे, अलादियाखां, आदि विद्वान् गायक व त्यांची शिष्यपरंपरा क्रमानें वाढत गेली. बंदेअली, मियाजान, बडे निसार हुसेन, वगैरे अनेक गायक विसाव्या शतकाच्या सुरुवातीस महाराष्ट्रांत आले. विष्णु दिगंबर, अनंत मनोहर, आदि बाळकृष्णबुवांच्या शिष्यांनींही महाराष्ट्रांत ख्याल-गायकी ऐकायला पात्र असा शिष्यवर्ग तयार केला. सुमारें १८८० ते १९२० पर्यंतचा हा परिवर्तन-काल, महाराष्ट्रांतील उच्च दर्जाच्या गायकीचा भरभराटीचा काळ ठरला. ह्या परिवर्तनांत भास्करबुवांनींही फार मोठी कामगिरी केली. बुवांनीं सुगम संगीताच्या मार्गानें क्रमशः मराठी मनें जिंकलीं; थोर अभिजात गायन ऐकण्यास समर्थ केलीं. ह्या कामगिरीचें यथार्थ आकलन होण्यास बुवांच्या सुगम संगीत-कौशल्याचा अभ्यास अवश्य आहे. बुवा क्वचित् पंजाबी टप्पा

म्हणत, तो पूर्णतया तंत्रशुद्ध असे. प्रत्येक शब्दागणिक मुरक्या, छोट्या फिरत्या ताना ते घेत. दीर्घ, वक्र अथवा गमकयुक्त ताना त्यांत नसत. बोलतान, वगैरे ख्याल-गायकीचें विस्तार-स्वरूप न देतां, ते छाटछूट असे टप्पे गात. पण ते टप्पा-गायन क्वचित् गात. बुवांजवळ पंजाबी लोकगीतें, टप्पे, वगैरे बराच संग्रह असे. प्रसंगशः बोलतां बोलतां तसे प्रकार बुवा गुणगुणत. कांहीं संघ-गीत प्रकार असत. कांहीं संघ-नृत्योपयोगी गीतें असत. घशाला कंप देत, उच्च स्वर लावून लोकगीतें म्हणण्याची पंजाबी ढब बुवा अचूक म्हणत, चुटकीनें ताल दर्शवीत. एक सवाल-जबाबाचें गीत मला आठवतें. दरीच्या दोन बाजूच्या डोंगरांवरून प्रियेनें व प्रियकरानें आर्त उच्च स्वरांत केलेली ती पुकार विलक्षण भावपूर्ण असे.

बुवांचा ठुमरीचा वापर पंजाबी टप्प्यापेक्षां फारच जास्त प्रमाणांत असे. त्यांचा ठुमरी-संग्रहही फार मोठा वैचित्र्यपूर्ण असे. पंजाबी, दीपचंदी, वगैरे तालांतील जरा ठाय लयीच्या ठुमऱ्या ते गात. डौलदार आंदोलनाच्या त्यांच्या त्या ठुमऱ्या अलंकारांनीं व भावपूर्ण उच्चारांनीं नटलेल्या असत. पिलू, जंगला, खमाज, देस, पहाडी, मांड, झिंजोटी, वगैरे रागांतल्या अगणित ठुमऱ्या बुवा गात. एकताल, धुमाळी, केरवा, वगैरे अनेक तालांच्या वजनानें ठुमरी रंगे. प्रयत्नपूर्वक ठुमरी-गायनाचें पथ्य पाळूनही बुवा ठुमरी गात, तिच्यावर ख्यालाची छाया पडे. ज्या रागांतली ठुमरी असेल, त्या रागाची वैशिष्ट्यपूर्वक ठेवण निर्माण करण्याचा बुवांचा स्वभाव होता. त्यामुळें त्यांनीं उच्चारलेल्या भावपूर्ण अलंकारांतून व बोलांतून भावगीत-गायनापेक्षां रागाच्या शुद्ध मांडणीचा प्रभाव पडे. ठुमरी गातांना ते मुद्दाम दुसऱ्या रागांच्या छाया दर्शवीत, जोड रागांतील ठुमऱ्या म्हणत. पण कौशल्यानें एकजीव केलेल्या रागाचेंही वेगळें पूर्ण रूप स्पष्ट ओळखूं येई. जातिवंत ठुमरी-गायकांच्या स्वरोच्चारांत व लयीच्या डौलांत किंचित् पुनरुक्ति व उच्चारांत एक लटका आवेग असतो. हा भावनेचा ओलावा काव्यार्थानेंच निर्माण होतो असें नसून, केवळ गायनांतील लकब म्हणूनच ठुमरीच्या गायनांत कांहीं भावुकता रूढ आहे. ‘ जमुना किनारे मेरा गांव ’ हे शब्द उच्चारतांना ज्या श्रीकृष्णाच्या बांसरीनें व क्रीडांनीं यमुना-किनारा पावन झाला, त्या पुण्यक्षेत्रीं

माझा गांव, असा अभिमान त्या उच्चारांत न येतां, अत्यंत आर्त असा वेगळाच भाव त्या उच्चारांत दिसतो. नृत्यांतील संथ, मध्यम व झटकेदार गतींचा क्रम ठुमरीच्या गायनांत येतो. त्या खास लकबी नर्तिकांच्या घराण्यांत रूढ असतात. ह्या घराणेदार ठुमरीपेक्षां बुवांच्या ठुमरीचें स्वरूप भिन्न असे.

बुवांच्या ठुमरींत सर्व तांत्रिक पथ्य ते पाळीत. मोठ्या ताना, बोलताना, ख्यालाची जडण-घडण, हे ख्यालांतले प्रौढ प्रकार बुवांच्या ठुमरींत नसत. छोटे छोटे अलंकार, तेही नृत्याच्या लयींत घेऊनही बुवांची ठुमरी एक वेगळेंच रूप धारण करी. ह्या गोष्टीची सर्वांत जास्त जाणीव खुद्द बुवांना सर्वांत अधिक असे. बुवांच्या ठुमरीचें स्वरूप घराणेदार ठुमरीपेक्षां किंचित् भिन्न असलें, तरी ती ठुमरीही देशाच्या सर्व भागांत शिरोधार्य मानली गेली. सिंध, पंजाब व महाराष्ट्र ह्या भागांत बुवांची रसेली ठुमरी श्रोत्यांना वेड लावी. शब्द-प्राधान्यापेक्षां स्वर-प्राधान्य हा बुवांच्या गाण्याचा स्थायीभाव असे. ‘ पिया गये परदेस ’ ही ओळ ऐकतांना रुदनाची झलक न दिसतां बुवा स्वरांच्या संवादानें कारुण्याचा परिणाम साधीत. दरेक रागाच्या स्वरमालेंत ज्या भावना उद्दीपित करण्याची शक्ति असेल, ती पुरेपूर प्रभावी सामर्थ्यानें बुवा वापरीत. एखाद्याच्या सुरेल गळ्याच्या सौष्ठवाचें वर्णन, गाण्यांत ‘ दर्द ’ आहे असें करतात. बुवांच्या गाण्यांत केवळ ‘ दर्द ’ नसून, नवरसाची जागृत सिद्धि असे. हर्ष, खेद, संताप, भक्ति, प्रेम, कारुण्य, ह्यांसारख्या अनेक भावना त्यांच्या स्वरमालांनीं श्रोत्यांना अनुभवायला मिळत, पण मनावर प्रमुख संस्कार असे, तो सुस्वर, सुडौल गाण्याचा. काव्य-गायनाचा परिणाम प्रभावी नसे.

आतांपर्यंत केलेल्या वर्णनावरून बुवांच्या ठुमरीचें भिन्न आणि रसगर्भ स्वरूप जाणत्या वाचकांच्या सहज लक्षांत येईल. ठुमरींतील भावगीत हिंदी, उर्दू, व्रज, भाषेंतील असे. त्या प्रकारचें मराठी भावगीत मराठी नाटकांत प्रचलित असे. ह्या क्षेत्रांत बुवांनीं नेत्रदीपक क्रांति घडविली. मराठी संगीत नाटकाशीं बुवांचा संबंध अगदीं आद्यस्वरूपांतच आला. अण्णासाहेबांनीं साकी, दिंडीबरोबर कांहीं रागदारीचें संगीत ‘ सौभद्रां ’ त वापरलें. बाळकोबा नाटेकरांप्रमाणें रागदारीचें गाणें गाणारे नट नारायणराव जोगळेकर हे आले.

धैर्यधराच्या गाण्यांत जोगळेकरांनीं कित्येक रागांतील गाणीं रंगभूमीवर यशस्वी केलीं. तीं पदें भास्करबुवांनीं दिलेल्या चालींवर रचलेलीं होतीं. विशेषतः कर्नाटकांत लोकप्रिय असलेल्या ' हरणी मनसुगरिक दीनश्री ' ह्या चालीवर ' झालें युवतिमना दारुण रण ' हें पद रचलें गेलें. मूळ कानडी गाणें मीं बुवांच्या तोंडून अनेकदा ऐकलें होतें.

' मानापमान ' व ' विद्याहरण ' ह्या दोन नाटकांना चाली दिल्या गोविंदराव टेंबे ह्यांनीं. त्या काळीं लोकप्रिय असलेलें ग्रामोफोनमधलें ठुमरी-दादऱ्याचें गाणें गोविंदरावांनीं निवडलें होतें. परंतु ' विद्याहरणां ' त शुक्राचार्य होते बुवांचे शिष्य कृष्णराव गोरे. त्यांनीं रागदारीच्या चाली स्वतःसाठीं सुचविल्या. बुवांनीं तीं पदें बसविलीं, पण थोड्याशा रागदारीच्या भरीला बालगंधर्वांच्या गाण्यांत बुवांची एखाद-दुसरी ठुमरीही योजण्यांत आली. बाकीची गाणीं मुख्यतः गोहरजानच्या ठुमरी-दादऱ्यावरून घेतलेलीं होतीं. बुवांची ' देस ' मधील प्रभावी ठुमरी गोविंदराव पेटीवर अतिशय सौंदर्यपूर्ण वाजवीत. ' मधुकर वन वन फिरत करी गुंजारवाला ' हें त्या ठुमरीचें रूपान्तर रंगभूमीवर फारच गाजलें. ' देस ' मधील ह्या ठुमरीप्रमाणेंच ' हमीर ' मधील बुवांची एक ठुमरी ' विमल अधर निकटि मोह हा पापी ' ह्या पदाच्या रूपानें गाजली. त्या मानानें ' जननी चला-चला ' ही गोहरजानची ठुमरी अनुकरणाला अवघड ठरली. बुवांच्या गाण्यांत सोपें, चटकदार असेल तेवढें नाटकांत वापरावें, असा प्रकार सुरुवातीला झाला. पुढें ' गंधर्व कंपनी ' च्या स्थापनेनंतर लवकरच गोविंदराव ती कंपनी सोडून गेले. त्यांच्यानंतर बुवांनीं संगीत-दिग्दर्शनाची जोखीम घेतली आणि रंगभूमीवरील गाण्याचा संपूर्ण कायापालट करून टाकला.

१९१५ च्या अखेरीस नाट्याचार्य खाडिलकरांचें ' स्वयंवर ' नाटक तयार होत आलें. क्रमानें पदांना चाली देणें, पदें प्रत्यक्ष म्हणतांना त्यांत अक्षर-मात्रांची सुधारणा करणें व पदें बसविणें हीं कामें सुरू झालीं. पुण्यांत दिवाळीनंतर थंडींत प्लेगचा जोर वाढला, म्हणून ' गंधर्व मंडळी ' चा मुक्काम मुंबईस होता. नाटकांतील पदांची मेहनत अहोरात्र सुरू झाली. त्यामुळें बुवांनींही स्वतःचें बिऱ्हाड मुंबईस आणलें.

गंधर्वाच्या आवाजाची शक्ति बुवांनीं अनेक पदें बसवितांना आधींच अजमावली होती. बुवांनीं एकेक ख्याल नव्या नाटकाच्या चालींसाठीं निवडला. शास्त्रीय गायनाचा आतां एक वरचा टप्पा गांठायचा होता. सवाई गंधर्व, केशवराव भोसले, वगैरे गायक नट शास्त्रीय गायनाचें शिक्षण घेऊन रंगभूमीवर तसें गाणें गाऊं लागले होते. ह्या इतर नटांपेक्षां गंधर्वाच्या आवाजांत एक विलक्षण माधुरी होती. सरळ लयकारी व स्वरांची फिरत गंधर्वाच्या गाण्यांत आधींच मोठ्या मनोहर स्वरूपांत विलसे. बुवांनीं प्रत्येक चरणाला अनुरूप असे आलाप योजिले. स्वतःच्या अवघड ख्याल-गायकींतील सोपा, आकर्षक भाग निवडून तो गंधर्वास शिकविला. लयीला एक वेगळें रूप दिलें. तें गंधर्वाच्या प्रवाही गळ्याला शोभा देई. कित्येकदा लयीचें वजन कठीण असे. तो भाग स्वतः शेकडों वेळां म्हणून दाखवून व तो यथायोग्य सौंदर्यानें गंधर्वाच्या मुखांतून उमटेपर्यंत घोटून घेतला. प्रयत्नांची पराकाष्ठा केली. हिऱ्याला पैलू पाडायचे होते. गंधर्वानीं व साथीदारांनीं बुवांवर निष्ठा ठेवून एकेक भाग घटवून-घोटून चमकदार केला. त्यामुळें बुवांनीं बसविलेल्या ह्या पदांमुळें 'स्वयंवरा' चा प्रत्येक प्रयोग एखाद्या मैफलीसारखा रंगे. ज्या क्रमानें यमन, भूप, बिहाग, आदि राग मैफलींत गवई गाईल, त्या क्रमानें पदांना बहुतेक चाली दिल्या होत्या. चार भव्य ख्यालांनंतर एखादी हलकी-फुलकी चाल. त्यानंतर पुन्हा ख्यालाचें वजनदार गाणें, पुन्हा एखादी ठुमरी, असा सर्व थाट बुवांनीं 'स्वयंवरां'त मांडला. नारायणराव गंधर्व, कृष्णा मास्तर, पंढरपूरकर ह्या शिष्य-त्रयीनें कमाल केली. 'स्वयंवर' नाटकाचें यश दृष्ट लागेल इतकें दैदीप्यमान् झालें.

नाट्य-रंगभूमीवर अवतरलें तें भास्करबुवांच्या भव्य-दिव्य ख्याल-गायकीचें बालबोध स्वरूप. वरवर पाहाणाराला तें जितकें सोपें भासे, तितकें तें सोपें नव्हतें. ह्या गाण्याची यथार्थ नक्कल शेकडों गळेबाज गायकांनीं केली, ती यशस्वी झाली नाहीं. आतां पन्नास वर्षें उलटून गेलीं, तरी 'स्वयंवरां'तील गंधर्वाचें गाणें मराठी श्रोत्यांच्या मनांत ताजें टवटवीत आहे.

'स्वयंवरा'चें यश पाहून इतर नाटकमंडळ्यांनीं अनेक कठीण रागही रंगभूमीवर गाण्यांत योजिले, परंतु त्यांत गंधर्वाचा आवाज व बुवांच्या

शिक्षणांतील शोभा नव्हती. अवघड ख्याल-गायन ऐकण्याची जिज्ञासा बुवांनीं नाट्यसंगीताच्या रूपानें लाखों मराठी संगीत-प्रेमी मनांत पेरली. बुवांच्या कर्तृत्वाचा हा एक प्रचंड विजय होता.

भास्करबुवांचा लौकिक त्यांच्या बहुविध कार्यानें व अखंड मेहनतीनें महाराष्ट्रांत दृढ झाला होता. गायक, शिक्षक व नाट्यदिग्दर्शक ह्या अनेक नात्यांनीं जाणत्या संगीतज्ञांप्रमाणेंच हौशी गायकांपर्यंत बुवांचें गाणें पसरलें. घरोघरीं हौसेनें गाणाऱ्या गोड आवाजांच्या मुलांमुलींच्या गळ्यावर आतां 'स्वयंवरा'तील पदें चढलीं. गायनाभ्यासी विद्यार्थ्यांनीं त्या पदांच्या मूळच्या चिजा मिळविल्या. जो तो त्या मूळच्या चिजा बुवांच्या तोंडून ऐकायला उत्सुक झाला होता. 'स्वयंवर' नाटकांतील संगीताच्या यशानंतर लवकरच बुवांचा लौकिक आणखी एका प्रांतांत पसरण्याची संधि अचानक निर्माण झाली.

१९१७ सालीं सिंधप्रांतांतील शिकारपूर ह्या गांवीं, तेथील एक धनाढ्य व्यापारी शेट लुनीदाससिंग सक्रमसिंग बजाज ह्यांच्या पुत्राचें लग्न ठरलें. लग्नसमारंभासाठीं गांवोगांवचे पाहुणे यायचे होते. एखाद्या राजघराण्यांत व्हावेत त्याहीपेक्षां थाटानें हे विवाहसमारंभ आठवडेच्या आठवडे चालत. पैसा किती खर्चावा, ह्याला राजदरबारींही कांहीं शिस्त-मर्यादा असे, पण ह्या व्यापारीवर्गावर तसले कसलेच निर्बंध नव्हते. ते एखाद्या कलावंतावर फिदा झाले, तर त्याच्यावरून हजारों रुपये ओवाळून टाकतांना त्यांना यत्किंचित्‌ही दिक्कत वाटत नसे.

भारताच्या पश्चिम सरहद्दीवरील सिंधप्रांताची संस्कृति अंशतः कच्छी, काठेवाडी व राजस्थानी संस्कृतीशीं सुसंबद्ध असली, तरी त्या भागाचें व्यापारी दळणवळण मुसलमानी संस्कृतीशीं जास्त निकट नात्याचें असे. सिंधु नदी ओलांडून पलीकडे इराणशीं संबंध असल्यामुळें सिंधी काव्य-गायनादि सर्व कलांवर मुसलमानी संस्कृतीची अधिक छाप असे. भारतांत जागृति होऊन, स्वदेशी चळवळ, हिंदूंचें संघटन, ह्या कल्पना पंजाबमध्यें अधिक प्रबळ होत होत्या. आर्यसमाजाची चळवळ जोरावली व हिंदुधर्मीय सिंधी व्यापाऱ्यांनींही पंजाबचें अनुकरण करून प्रथमच आपल्या हिंदु वैदिक धर्मशास्त्राकडे लक्ष द्यायला सुरुवात केली होती. सिंधी लग्न-समारंभांत

गायनाची प्रथा पूर्वी मुसलमानी लग्नविधीप्रमाणें निषिद्ध मानीत. पण आतां हिंदूंच्या लग्न-समारंभांत भारतीय पद्धतीचें धर्मकार्य, गायन, नृत्य, वगैरे नवें वळण प्रस्थापित होत होतें.

बजाजशेठच्या लग्न-समारंभांत गाण्याच्या मैफली, नृत्याच्या मजलसी खूपच थाटानें झडल्या पाहिजेत असें ठरलें होतें. बजाजशेठ जसे असाधारण श्रीमंत, तसे त्यांच्याकडील कार्यक्रमांसाठीं पाचारण करायचे सर्व कलावंतही सर्वोच्च दर्जाचेच पाहिजेत, अशी सर्व सग्यासोयऱ्यांची अपेक्षा होती. कराचीसारख्या शहरांतून कांहीं नामवंत विद्वान् गवई होते, तरीही पंजाबमधील हरिवल्लभ मेळ्यांत भारताचे जे सर्वश्रेष्ठ कलावंत जमत, त्यांतल्या अग्रगण्य कलावंतांस आमंत्रण करायचें ठरलें. बजाजशेठच्या घरीं केवळ उत्तम गोष्टी चालण्यासारख्या नव्हत्या, तेथें फक्त सर्वोत्तमच हवें होतें.

शिकारपूरला पंडित रावळदास हे एक संगीत गायन समाज चालवीत. ते पंजाबमधील हरिवल्लभ मेळ्यास विद्यार्थी व इष्टमित्र घेऊन दरसाल जात. तेथें मराठी पंडित भास्करबुवा बखले ह्यांस कित्येक वर्षें सर्वश्रेष्ठ पद प्राप्त झाल्याचें रावळदासांच्या परिवारांत सर्वांस ठाऊक होतें. खुद्द रावळदासांनीं भास्करबुवांच्या कित्येक मैफलीही ऐकलेल्या असल्यामुळें आणि त्यांच्याच सल्ल्यानुसार बजाजशेठकडील कार्यक्रमांची योजना होत असल्यामुळें, त्यांनीं सर्वोत्तम गायक म्हणून साहजिकच भास्करबुवांची शिफारस केली आणि त्याप्रमाणें बुवांना आमंत्रण पाठविण्यांत आलें.

बजाजशेठचें आमंत्रण स्वीकारून बुवा शिकारपूरला आले. सीझरबद्दल म्हणत, कीं 'तो आला, त्यानें नजर टाकली व त्यानें जिंकलें.' [He came, he saw and he conquered.] नेमका हाच प्रकार भास्करबुवांचा होता. बुवा जेथें जेथें जात, तेथें तेथें आपल्या कलामोहिनीनें सर्व श्रोत्यांचीं मनें जिंकीत.

लग्नसोहळा दहा दिवस अहोरात्र सर्वांचे डोळे दिपून जातील अशा ऐश्वर्यानें साजरा झाला. त्या अवधींत बुवांच्या अनेक मैफली झाल्या. व्याही-विहिणी, मित्र-मैत्रिणी, सगे-सोयरे, स्नेही-व्यापारी, विद्वान् गायक-वादक व गायिका, वगैरे प्रत्येक वर्गासाठीं वेग-वेगळ्या मैफली निरनिराळ्या ढंगांत

झडल्या. सिंधी श्रोत्यांच्या आवडी-निवडींचें स्वरूप बुवांस रावळदासांकडून आधींच कळत असे. गझल, कवाल्या, पंजाबी टप्पे, ठुमऱ्या हे गाण्याचे प्रकार सिंधी समाजाला फार आवडत. बुवांजवळ ह्या लोक-संगीताचा मालमसालाही भरपूर असल्यामुळें सर्व वर्गांच्या श्रोत्यांना त्यांनीं आपल्या कमालीच्या सुरेल ढंगदार गायकीनें अगदीं मोहून टाकलें. खास विद्वान् गायकांच्या छोट्याशा बैठकींत तर ख्याल-गायकीनें पक्का दरारा बसला. त्याचप्रमाणें शृंगारिक ठुमऱ्या, भजनें व मराठी नाट्यगीतें ह्यांनीं उरला-सुरला समाजही बुवांनीं जिंकला. सिंध प्रांतांतील ठिक-ठिकाणांहून समारंभास आलेल्या सर्व थरांतल्या श्रोत्यांकडून बुवांवर अगणित आमंत्रणांचा वर्षाव झाला. बुवांचें गाणें सर्वांनाच समजलें, असें नाहीं; तरी त्यांच्या गायनांत कांहींतरी अद्‌भुतरम्य आहे, नित्य ऐकायला मिळणाऱ्या गझल-कवाल्यांपेक्षां कमालीचें आकर्षक असें नावीन्य त्यांत आहे, हें दरेकास जाणवलें. जाणता गायकवर्ग तर आपलें भाग्य थोर, म्हणूनच हें दिव्य-भव्य गाणें आपल्याला ऐकायला मिळालें, असें म्हणे. ह्या त्यांच्या अभिप्रायाचा परिणाम सर्वच प्रतिष्ठित समाजावर झाला. बुवांच्या गाण्याच्या रूपानें हें एक नवें लावण्ययुक्त आनंदभांडार आपल्या हातीं आलें, असें सर्व सिंधी समाज मानूं लागला.

शिकारपूर हें गांव सक्करच्या उत्तरेस कराचीपासून तीनशेंहून अधिक मैल दूर आहे. कराची, हैद्राबाद, खैरपूर, वगैरे सिंधी शहरांतूनही क्वचित् कांहीं घराणेदार गायक त्या काळीं असत. तरीही सिंध प्रांतांतील संगीत-क्षेत्रांत नवें चैतन्य निर्माण करण्यास भास्करबुवांसारख्या अष्टपैलू, प्रतिभावान्, मधुर गायकाची आवश्यकता होती. शिकारपूरसारख्या गांवांत संगीत समाज स्थापन करून ही सामाजिक गरज भागविण्याचा प्रयत्न रावळदास, वगैरे मंडळी करीत होती. इंग्रजी राज्यांतल्या शांतता-काळांत देशाच्या सर्व भागांतच हें सांस्कृतिक पुनरुत्थान होत होतें. रावळदास व त्यांचे बंधु हे गायन, तबला-वादन, आदि विद्यांत निष्णात होते, अभ्यासी होते. पण एकंदर समाजांत ही सुसंस्कृत जीवनाची जाग अजून आली नव्हती. व्यापारी वर्गांत विद्या व कलांसाठीं मुबलक पैसा खर्चायची ऐपत होती. रंजनासाठीं समाज उत्सुक होता. होळीच्या सणांत दूरदूरचे

गायक-वादक बोलवावे, त्यांना अमाप पैसा देऊन गाण्या-बजावण्याच्या मैफली भरवाव्या, अशा उपक्रमाला चांगलें वळण लावण्याचा रावळदास कुटुंबाचा अखंड प्रयास पाकिस्तान-निर्मितीपर्यंत चाले.

दरवर्षी भास्करबुवांनीं आपल्या शिष्यगणांसह यावें, आपलें कमालीचें सुस्वर व डौलदार लयीचें गाणें ऐकवावें आणि होळीचा महोत्सव खूप गाजवावा, अशी आग्रहपूर्वक विनंती रावळदासांनीं केली व बुवांनींही तें आवाहन हौसेनें स्वीकारलें. भास्करबुवा, मास्तर कृष्णराव, बापूराव केतकर ह्या मंडळींस सिंधमध्यें ह्या दौऱ्यामुळें प्रतिवर्षी भरपूर लौकिक व धनप्राप्ति होई.

एकंदर सिंधच्या श्रोत्यांची आवड जाणून बुवा तिकडे मुख्यतः ठुमरी, टप्पा व मराठी नाटकांतलीं पदें मैफलींत अधिक गात. समोर चार विद्वान् गायक ऐकायला बसले, तर त्यांच्यासाठीं दोन ख्याल गावे व इतरेजनांसाठीं ठुमरी व नाट्यसंगीत, अशा सुगम-संगीताचा वापर करावा, असें बुवांचें धोरण असे. बुवांच्या गाण्यांतल्या रसीलेपणानें, त्यांच्या खानदानी हिंदी-उर्दू चिजांचा भावार्थ समजत असल्यानें, सिंधी लोक हळूहळू त्यांचें सर्वच प्रकारचें गाणें मोठ्या भक्तीनें ऐकूं लागले.

कराचीचे गामणखां व त्यांचे विद्वान् गायक पुत्र बिब्बेखां ही सर्व मंडळी बुवांची भक्त बनली. बिब्बेखां तर बुवांच्या मस्तकाला उंची अत्तर-मिश्रित सुगंधी तेलानें तास-तास मालीश करीत. त्याचा बुवांना संकोच वाटे. त्यावर ते बुवांना म्हणत, “ बुवा, आम्ही गोड गाणं ऐकतों, तुम्हीं डोक्याला ताप करून घेऊन इतकं उत्कृष्ट गातां. आतां आम्हांला गुरुसेवेचं जें पुण्य मिळतं, त्यासाठीं तरी मालीश करूं द्या ना. तुम्ही मराठी मंडळी मालीश करून घेत नाहीं. पण गुरुसेवेबद्दल आमच्या ज्या कल्पना आहेत, त्यांचा तुम्हीं मान राखलाच पाहिजे. ”

पंजाबप्रमाणें अगदीं थोड्याच काळांत बुवांनीं सिंधप्रांत आपलासा करून ठेवला. तेथील लोकांच्या गायनाभिरुचींत बुवांनीं मोठी क्रांति केली. बुवांच्या मृत्यूनंतरही मास्तर कृष्णराव ह्यांस त्या कर्तृत्वाचा फायदा झाला. कमाईचें व कर्तृत्वाचें एक क्षेत्र लाभलें.

## प्रकरण एकोणिसावें

# भाग्यकाळ

१९१६ च्या अखेरीस 'स्वयंवर' नाटक रंगभूमीवर आलें. त्यापूर्वींच बुवांनीं आपलें बिऱ्हाड पुनश्च मुंबईस थाटलें होतें. नाना चौकाजवळ शास्त्रीहॉलच्या आवारांत अनेक चाळींत ब्राह्मण वस्ती आहे. उजव्या हातास अगदीं शेवटीं असलेल्या 'आनंदी' चाळींत बुवांचें बिऱ्हाड होतें. ह्या आवारांत मध्यवर्ति भागांत एक छोटी बंगली होती. तेथें बुवांची शिकविण्याची व गाण्याची जागा असे.

नवे शिष्य बापूराव केतकर, बापूराव राजहंस, टापरे, मायदेव, बडोद्याचे करंदीकर, िंगळे, ब्रिजलाल, जुने विद्यार्थी बर्वे, वगैरे कितीतरी विद्यार्थ्यांचा वेढा पडलेला असे आणि ह्याच काळांत अलादियाखांसाहेब कोल्हापूर सोडून कायम मुंबईस राहायला आल्यामुळें तेही सवड मिळतांच बुवांच्या गायनाच्या मठींत येत. तासन् तास गात बसत. अलादियांचा आवाज आतां वयपरत्वें नीट चालत नसे, परंतु जुन्या आठवणी काढून 'भय्या भास्कर' ला सुचेल तें सारें ऐकवीत. विशेषतः राग-रचनांतील कूटस्थळें, लयकारीच्या हरकती,

ह्यांची अखंड उजळणी चाले. स्वतःचा गळा चालेनासा झाला, तर ते एखादी पकड शब्दांनीं सुचवून, सा-री-ग-म करून बुवांना गायला लावीत. भास्करबुवांनीं त्या अवघड करामती सफाईनें म्हटल्या, कीं खांसाहेबांना कमालीचा आनंद होई. त्यांचे डोळे भरून येत.

अलादियाखांसाहेबांचे बंधु हैदरखां म्हणून होते. तेही बरेच विद्वान् असून त्यांच्या आवाजांत जास्त माधुर्य असे. भास्करभय्यासारखा अजोड कलाकार आपल्या घराण्यांतीलही विद्या मिळावी, म्हणून उभय बंधूंची सेवा करतो, ह्या घटनेनें हैदरखांना अतिशय संकोच वाटे. बंधु अलादियांच्या लहरीपणामुळें वा कोठल्याही कारणानें भय्या भास्करला जयपूरच्या घराण्यांतील अवघड चिजा वेळेवर मिळत नाहींत असें पाहून, हैदरखां अशा चिजा भास्करबुवांस शिकवीत. अलादियाखांसाहेबांच्या मागें हैदरखां व भास्करबुवा तंबोरा वाजवायला बसत. एकाच गुरुपरंपरेचें शिक्षण घेतल्यामुळें हैदरखां अलादियाखांच्या वळणानें, मनमोकळें गाऊन साथ करीत. बंधूंच्या बरोबरीनें गातांना हैदरखांना संकोच वाटत नसे. भास्करबुवामात्र अवश्य तेवढीच साथ देत; अलादियांच्या मैफलींत खांसाहेबांस क्वचित् सुचणारे स्फूर्तिकण वेचून घेत; विद्यार्जनाच्या एकमेव उद्देशानें त्यांचें कार्य अखंड चालू असे.

अलादियाखां व हैदरखां ह्या बंधूंचें भास्करबुवांवर निरतिशय प्रेम असे. त्याचा इतर मुसलमान गवयांस हेवा वाटे. अशा एक दोन मुसलमान गवयांनीं अलादियांचें मन भास्करबुवांबद्दल कलुषित करावें, म्हणून अनेक मसलती केल्या. भास्करबुवांनीं अलादियांचा गंडा बांधला नाहीं; ते वेगळें स्वतंत्र वळणाचें गाणें गातात; मराठी पदें मैफलींत गातात; हलक्या-फुलक्या ठुमऱ्या-टप्पे गातात; अशा हरतऱ्हेच्या कागाळ्या करून, अगदीं अखेरची शिकायत केली ती म्हणजे, "भास्करभय्या आपकी किमती चीजें नाटकवालोंको शिखाते हैं और आपकी अजीब कुसर गटरमें जा पडती है !" मोठ्या तावातावानें अशा तक्रारी अलादियांना सांगण्यांत येत.

एके दिवशीं अशाच तक्रारी चालू असतां भास्करबुवा बंगलींत आले व त्यांनीं आलेल्या पाहुण्यांची अदबीनें चौकशी केली; पण आजचा रंग

वेगळा होता. पाहुणे आग्रहानें अलादियांस सांगत होते, कीं "सर्व दुर्वर्तनाचा जाब शागीर्द 'भास्करभय्या' ला विचारा."

अलादियांनीं एवढेंच विचारलें, कीं "भय्या, तुमने किस नाटकवालोंको अपनी चीजें शिखाई?" बुवा प्रथम कांहींच बोलले नाहींत. त्यांनीं सर्व तक्रारी शांतपणें ऐकून घेतल्या व शेवटीं अलादियाखांसाहेबांस विनंती केली, कीं "मीं ज्या नाटकवाल्यांना शिकवलं, त्यांचं नाटकच आपण पाहा व मीं कोणा अयोग्य माणसास गाणं शिकवलं कीं काय, तो स्वतःच फैसला करा." अलादियांनीं नाटक पाहाण्याचें कबूल केलें व ते रविवारीं दुपारीं गंधर्वांच्या 'स्वयंवर' नाटकाचा प्रयोग पाहायला बसले.

नाटक सुरू झालें. गंधर्वांचें एकेक पद ऐकून अलादियाखांसाहेब खूप रंगले. अतिशय सुरेल, लयबद्ध गाणें; भरगच्च साथ; सर्वच थाट केवळ दृष्ट लागण्यासारखा होता. यमन, भूप, बिहाग, वगैरे ऐकून अलादियांना अतिशय आनंद झाला. नंतर 'मम सुखाची ठेव देवा' हें तिलक कामोदांतील पद आलें. तें अलादियांच्या एका चिजेवर आधारलें होतें. अलादिया आनंदानें व आश्चर्यानें स्तिमित झाले. अंतऱ्याचा भाग ऐकतांना त्यांना स्वस्थ बसवेना. 'जीते रहो!' म्हणत ते मध्येंच उभे राहिले.

भास्करबुवा प्रवेशद्वाराशीं उभे राहून अलादियाखांसाहेबांच्या प्रतिक्रियेकडे पाहात होते. खांसाहेबांचें त्यांच्याकडे लक्ष गेलें. इतक्यांत पद पुरें झालें. पण लगेच 'वन्स मोअर' च्या टाळ्यांचा कडकडाट झाला. सारा प्रेक्षकवर्ग हर्षोन्मादानें भारावला होता. अलादियाखांसाहेबांसही आनंदानें गहिंवरून आलें होतें. त्यांनीं भास्करबुवांना कडकडून मिठी मारली. क्षणभर त्यांना बोलवेना. नंतर ते म्हणाले, "भास्करभय्या, तूं ज्या डौलानें आणि वैभवानें मीं दिलेली चीज नटवून लोकांपुढें मांडलीस, तशी ती दुसऱ्या कोणाच्याच गळ्यांतून शोभेनें उच्चारली जाणार नाहीं. तुझा शागीर्द 'गंधर्व' हा खराच गंधर्व आहे."

ह्या प्रसंगानें भास्करबुवा अतिशय आनंदित झाले. 'स्वयंवरां' तलें गाणें जनतेनें शिरोधार्य मानलें, त्याचप्रमाणें अलादियाखांसाहेबांसारखा थोर जाणता रसिक ह्या कर्तृत्वानें आनंदित झाला, हें पाहून बुवांना केवढी धन्यता

वाटली असेल ! अंक संपल्यावर, भास्करबुवांनीं अलादियांची व गंधर्वांची ओळख करून दिली. ह्यापुढें अलादियांसाठीं पहिल्या रांगेंत मधली खुर्ची कायम राखीव जागा म्हणून ठरून गेली. भास्करबुवांच्या कीर्तिमंदिरावर हा एक कळसच चढला, हें जणूं नाट्य-संगीताच्या इतिहासांतील एक सोनेरी पानच म्हटलें पाहिजे.

'स्वयंवर' नाटकांतील पदांनीं बुवांची कला महाराष्ट्रांतील घरोघरीं पोंचली. ग्रामोफोन कंपनीनें त्यांतील अनेक गाण्याच्या मुद्रिका तयार केल्या, त्या सर्वत्र ऐकूं येऊं लागल्या. गंधर्व आपल्या गाण्याच्या कीर्ति-शिखरावर पोंचले. मात्र ह्या सर्व यशांत बुवांचे कष्ट व जादूचा भाग किती, हें गायनांतल्या खास जाणत्या वर्गाशिवाय इतरांस समजत नसे. अनेक गायक-वादक आपापल्या मगदुराप्रमाणें गंधर्वांची नक्कल करण्याचा प्रयत्न करीत, पण बुवांच्या त्या डौलदार गाण्याची यथार्थ नक्कल करणें कोणासही शक्य होत नसे.

'स्वयंवर' नाटकाच्या दर प्रयोगाला हजार दीड हजार रुपयांहून अधिक उत्पन्न होऊं लागलें होतें. पण बुवांना त्यांच्या कामाचें वेतन कोणत्याच स्वरूपांत मिळालें नाहीं. त्यांना मिळालें तें केवळ आत्मिक समाधान. बुवांना मैफलींची कमाई पंचवीस ते शंभर रुपयांपर्यंत होई. कलावंत स्त्रियांच्या शिकवण्यांचेही बरे पैसे मिळत. पण गणेशोत्सवांचे संचालक बुवांना जीं गाण्याचीं आमंत्रणें देत, त्यांच्या बिदागीचामात्र भरंवसा नसे. देवाची सेवा म्हणून बुवा प्रत्येक आमंत्रणाचा आदर करीत. दहा-वीस रुपये बिदागी मिळे. साथीदार, वाहन, वगैरे कामीं पांच-चार रुपये खर्च होत. कधींकधीं हाही खर्च बुवांनाच करावा लागे. बुवांच्या साथीला दत्ताराम नांदणीकरांसारखे नामांकित वादक असत. तंबोरा-पेटीवर शिष्य असत, त्यांचाही खर्च अनेक प्रकारें बुवाच करीत. बुवांच्या खर्चिक राहाणींतही कांहीं कमी पडत नसे.

बुवांना मुख्य कमाई होत असे, ती उत्तर हिंदुस्थानांतील संस्थानिकांकडून. काश्मीर, पतियाळा, वगैरे नरेश शेकड्यांनीं व हजारांनीं बिदागी देत. हा पैसा बुवा एखाद्या मित्राकडे ठेव म्हणून ठेवीत. मुलीच्या लग्नाला उपयोगी पडावेत म्हणून बुवांनीं एका दौऱ्याच्या अखेरीस मिळालेले दोन हजार रुपये

एका वकील मित्राकडे ठेवून दिले. ते बुवांची थोरली मुलगी माई हिच्या लग्नप्रसंगीं उपयोगी पडले.

भास्करबुवांचा लौकिक पंजाब, सिंध, वगैरे भागांत प्रस्थापित झाला, तेथें स्वतंत्र बिदागी देऊन मास्तर कृष्णरावांचें व नथ्थनखांचा मुलगा अबदुल्ला ह्याचें गाणें व्हावें, पं. रामकृष्णबुवांना राजाश्रय मिळावा, असे प्रयत्न बुवा करीत. रामकृष्णबुवा वझे ह्यांस बुवा एकदा काश्मीरच्या महाराजांकडे घेऊन गेले होते. अशाच खटपटींचा परिणाम म्हणून पं. रामकृष्णबुवांना नेपाळांत दरबार-गवई म्हणून नेमणूक मिळाली होती.

खुद्द महाराष्ट्रांत भास्करबुवांचें गाणें उत्तरोत्तर अधिक उत्सुकतेनें व कांहींशा जाणतेपणानें ऐकणारा वर्ग हळूहळू निर्माण होत होता. पं. विष्णु दिगंबर, पं. भातखंडे, अनंत मनोहर, आदि विद्वानांकडे शेकडों गायनाभ्यासी मंडळी ख्याल-गायकी ऐकण्यास उत्सुक असत.

पं. विष्णु दिगंबर ह्यांनीं 'गांधर्व-महाविद्यालयां'त दरसाल एक समारंभ घडवून, गाण्याच्या मैफली, वाद्य-प्रदर्शन, वगैरे उपक्रम सुरू केले. स्वतःचे गुरु बाळकृष्णबुवा आणि इतर थोर थोर गवई व वादक ह्यांस ते आमंत्रण करीत. भास्करबुवांसही अशा समारंभांत गाण्यास बोलावून, त्यांचा सत्कारही करावा, अशी सूचना पं. बाळकृष्णबुवांनीं केली. वाद्य-प्रदर्शनाचे उद्‌घाटक सन्मान्य पाहुणे म्हणून भास्करबुवांस आमंत्रण देण्यास स्वतः पं. विष्णु दिगंबर शास्त्रीहॉलमध्यें बुवांच्या बिऱ्हाडीं गेले. भास्करबुवांना गाण्याची बिदागी म्हणून मिळालेले पन्नास रुपये त्यांनीं 'गांधर्व-महाविद्यालयां'तील विद्यार्थीवर्गांत बक्षीस म्हणून वांटून टाकले. ह्या प्रसंगाची आणखी एक आठवण तत्कालीन विद्यार्थी सांगतात ती अशी : 'गांधर्व-महाविद्यालया'चे विद्यार्थी समारंभाच्या निरनिराळ्या कामांत गुंतलेले असत. पण काम सोडून भास्करबुवांचें गाणें ऐकायला चला, ही संधि टाळूं नका, असें आग्रहानें सांगून पं. बाळकृष्णबुवा विद्यार्थ्यांस भास्करबुवांचें गाणें ऐकायला बळेंच आणून बसवीत.

भास्करबुवांच्या कलेचा असा सर्वांगीण भरभराटीचा काळ आला, तेव्हांच बुवांवर अनेक आपत्तिही कोसळल्या. १९२० सालीं आग्रा येथें राहाणारे दोन गुरुबंधु, महंमदखां व अबदुल्ला ह्यांस मृत्यूनें गांठलें. त्याच सुमारास वृद्ध

गुरुजी फैजमहंमदखां अचानक पैगंबरवासी झाले. मला नेमके महिने आठवत नाहींत, पण भास्करबुवांच्या तोंडून आमच्या वाड्यांत राहाणाऱ्या पाध्येबुवांच्या कानीं ह्या दुःखद वार्ता पडत, तेव्हां ते लगेच शिकवणी बंद करून, ह्या विद्वान् गवयांच्या अनेक आठवणी सांगत. भास्करबुवांचें दुःख हेंच पाध्येबुवा, अष्टेकरबुवा, वगैरे भक्तांचें दुःख असे.

१९१९ पासूनच बुवांचीही प्रकृति वारंवार बिघडे. त्यामुळें त्यांनीं कांहीं दिवस सातारला सासुरवाडीस जाऊन राहाण्याचा बेत केला. परंतु ज्या वडील बहिणीनें बुवांचा मातृवत् प्रतिपाळ केला, त्या तानूताईस अपघात झाला. टांग्याखालीं सापडून त्यांचा पाय मोडला. त्याच आजारांत शेवटीं तानूताईचा अंत झाला. बुवांच्या मनावर ह्याचा फार खोल परिणाम झाला.

आतां सर्व जुने कौटुंबिक पाश क्रमानें नाहींसे झाले होते. त्यांची स्वतःची प्रकृतिही बरी नव्हती व मनावर फारच आघात होत होते. तरीही बुवा मैफलींत गायला बसले, म्हणजेमात्र स्वतःचीं सर्व दुःखें विसरून, गाण्याच्या आनंदांत धुंद होऊन, सर्व श्रोत्यांसही सर्वसाधारण लौकिक जीवनाचा विसर पडेल, अशा आनंदाच्या – कैफाच्या अवस्थेंत डोलत ठेवीत.

मैफल संपली, कीं पुन्हा बुवांना वास्तव जाणीव होई आणि ते उदासीन, सचिंत असत. एके दिवशीं सकाळीं सहा वाजतां आपले मित्र गणपतबुवा पाध्ये ह्यांच्याकडे ते आले. पाध्येबुवांचीं दोन-तीन मुलें नित्याप्रमाणें गायन शिकायला बसलीं होतीं. मी घराच्या दरवाजांत वर्तमानपत्रांसाठीं उभा होतों. भास्करबुवा येतांच त्यांनीं हसून माझ्याकडे पाहिलें. "पाध्येबुवा उठले का?" इतकें उगाचच विचारून बुवा आंत आले. त्याच्या आधीं आंत जाऊन मीं पाध्येबुवांना भास्करबुवा आल्याची वर्दी दिली. आंघोळ करून, ओला पंचा खांद्यावर टाकून, बुवा मुलांबरोबर 'हिंदोल' गात होते. भास्करबुवा आलेले पाहून गाणें एकदम थांबलें. भास्करबुवांनीं स्वरांची पेटी हातांत असलेल्या शामरावाकडे ( पाध्येबुवांचा वडील मुलगा ) पाहून 'हिंदोल' मधील एक आलाप घेत त्याला म्हटलें, "हं, थांबू नको. स्वर चालू ठेव." तरीही पाध्येबुवांनीं शिकवणी थांबवलीच आणि भास्करबुवांना म्हटलें, "आपली

प्रकृति बरी नसतां आपण स्वतः कां बरं आलांत? मला निरोप पाठविला असतात तर ... ”

“ कधीं-कधीं कांहीं सुचेनासं होतं. घरीं स्वस्थ बसवेना. कांहीं दिवस मी हवा बदलण्यासाठीं सातारला जाऊन राहीन म्हणतों. ”

भास्करबुवांच्या नेहमींच्या वृत्तीपेक्षां आज त्यांचें मन फारच व्यग्र असावें असें भासत होतें. स्वतःच्या गैरहजेरींत पाध्येबुवांनीं करायचीं लहान-मोठीं दोन-तीन कामें सुचवून बुवा अर्ध्या तासाच्या आंत परत गेले. त्या दिवशीं पाध्येबुवांनीं तंबोरा हातीं घेतला नाहीं. वास्तविक पाध्येबुवा आज आमच्याकडेच चहाला यायचे होते. कारण आमच्याकडे उतरलेले पाहुणे नाटककार बामणगांवकर ह्यांच्याशींच त्यांचें तसें ठरलें होतें. पण भास्करबुवांच्या आकस्मिक आगमनामुळें साहजिकच त्यांना उशीर होऊं लागला. तेव्हां माझ्या वडिलांनीं नारायणराव बामणगांवकरांना म्हटलें, “ तुम्ही घ्या चहा. पाध्येबुवांचं दैवत आलं आहे. ” इतकें बोलणें होत आहे तोंच पाध्येबुवा कपडे करून आमच्या ओटीवर आले. बामणगांवकरांनीं विचारलें, “ बुवा, ‘ दैवता ’ ला कुठें घालवलंत? त्यांना आणायचं होतंत चहाला; ओळख तरी झाली असती. ”

पाध्येबुवांचा चेहरा अतिशय गंभीर झाला. “ त्या दैवताच्या पायांची धूळ मस्तकाला लावायची आमची योग्यता नाहीं. बाबुरावानें (मला घरीं ‘ बाबू ’ म्हणत) नुसतं सुचवलं असतं तर बुवा आले असते इकडे चहाला! आणि त्यांची ओळख करून घ्यायला कुणाचे वशिले नकोत. बुवांची थोरवी ओळखायलामात्र सात जन्मांची पुण्याई हवी. आम्ही नुसते हमाल. बारा न् बारा वर्षं गाणं शिकलों, पण आमच्या डोक्यांत प्रकाश पडला नाहीं. भास्करबुवांच्या प्रत्येक स्वरांत ‘ भास्कराचं तेज ’ प्रकट होतं. आम्हीं पामरांनीं नुसता चमत्कार पाहायचा नि दिपून जायचं! ”

पाध्येबुवांच्या बोलण्याचा आजचा अगदींच निराळा पण गंभीर सूर ऐकून माझ्या वडिलांनीं म्हटलें, “ बुवा, हा तुमचा केवळ नाटकी विनय आहे. भास्करबुवा एकेका रागांतल्या स्वराबद्दल तुमच्याशीं चार-चार तास चिकित्सा

करतात, तुमचा सल्ला घेतात, तुम्हांला ते केवढा मान देतात. मी स्वतः डोळ्यांनीं पाहिलं आहे."

"हें त्या गुरुमाउलीचं केवळ सौजन्य आहे. त्यांना एकेक श्रुतीचं स्थान निश्चित करीपर्यंत झोप येत नाहीं. आम्ही केवळ शुष्क चर्चा करूं शकतों. पाठान्तर व शास्त्र उच्चारतों. पण बुवांना त्या शास्त्र-वचनांची जागृत प्रचीति आहे. त्यांच्या गाण्यांतलं स्वर-वैभव ऐकलं नाहीं, तोंपर्यंत आम्ही किती अजाण आहोंत ह्याची जाणीव होत नव्हती."

पाध्येबुवांची एकंदर गंभीर वृत्ति पाहून नंतर कोणीच कांहीं बोललें नाहीं. चहापानानंतर पाध्येबुवा कामासाठीं बाहेर गेले.

त्या रात्रीं गाणें सुरू होण्यापूर्वीं पाध्येबुवा माझ्या अभ्यासाच्या खोलींत आले. आमच्या घरांत त्या काळीं रोज रात्रीं वझेबुवा, सवाई गंधर्व, वगैरे मंडळी गात. रामभाऊंसाठीं प्रथम त्यांनीं तंबोरे जुळवून ठेवले. पेटी-तबल्याचे साठे बंधु अजून आले नव्हते. रामभाऊ (सवाई गंधर्व) खालीं माझ्या वडिलांजवळ पान खात बसले होते. बुवा एकटेच माझ्या खोलींत होते. बुवा मला सांगूं लागले, "बाबूराव! आज भास्करबुवांच्या तोंडून मीं सकाळीं जे उद्गार ऐकले, त्यांमुळें मी फार बेचैन झालों आहें. बुवा म्हणत होते, 'माणसाच्या आयुष्याचा कसलाच नेम नाहीं. आज मी आहें, उद्यां नसेन. मला अजून खूप जगायचं आहे. खूप गाणं शिकायचं आहे. पण कधीं-कधीं वाटतं, कीं आपला चार घटकांचाही भरंवसा नाहीं. परवां अंगांत ताप होता. तसाच मी 'समाजां' तून घरीं जात होतों. जातां-जातां वाटलं, कीं आपली वाटचाल इथेंच संपली. कदाचित् ही लवकरच घडणाऱ्या गोष्टींची चाहूलही असेल.' बाबूराव, बुवांच्या तोंडचे ते शब्द ऐकलेमात्र नि माझ्या हृदयाचं पाणी झालं. सकाळपासून मी अगदीं अस्वस्थ आहें. भास्करबुवा हा सिद्ध पुरुष आहे. त्याची वाणी कधीं खोटी व्हायची नाहीं." पाध्येबुवांच्या डोळ्यांत कधीं नाहीं तें पाणी आलें होतें. मीं बुवांना म्हटलें, "मन चिंती तें वैरी न चिंती. बुवांची प्रकृति जरा सुधारली, कीं त्यांची वृत्ति पालटेल, भाषा पालटेल. ते स्वतःच्या उत्साहानेंच शतायु होतील." मी केवळ

पाध्येबुवांना बरें वाटावें म्हणून बोललों. "तुझ्या तोंडांत साखर पडो." बुवा म्हणाले.

एवढ्यांत तिकडे पलीकडे रामभाऊ, साठे बंधु, वझेबुवा, वगैरे मंडळी जमली व गाणें सुरू झालें. मी नि पाध्येबुवा गाण्याला जाऊन बसलों. पण पाध्येबुवा ती सबंध रात्र उदासीन, उद्विग्न होते. पाध्येबुवांची ती अंतर्मुख नजर अजून माझ्या डोळ्यांसमोर येते. असें दुःख क्वचितच पाहायला मिळतें.

## प्रकरण विसावें

# नाट्यसृष्टींतलें अखेरचें कार्य

बुवांचे आजार, त्यांमुळें आलेली अशक्तता ह्यांचा आतां बुवांच्या प्रकृतीवर टिकाऊ परिणाम होत होता. जरा बरें वाटलें, कीं उत्साहानें काम करावें, गावें, आपली आजारी अवस्था विसरावी, असा बुवांचा क्रम होता. बुवांच्या ह्यांच अवस्थेंत काकासाहेब खाडिलकरांच्या 'द्रौपदी' नाटकांतील पदांना चाली निवडायच्या होत्या. ह्याच विषयावरचें बामणगांवकरांचें 'आत्मतेज' हें नाटक आधींच रंगभूमीवर आलें होतें. सवाई गंधर्वांनीं 'आत्मतेज' नाटकांत फारच निवडक चाली दिल्या होत्या.

'स्वयंवरां'तील भास्करबुवांची किमया लक्षांत न घेतां ह्यापुढें नव्या नाटकाची संगीत-योजना करणें अशक्य होतें. भास्करबुवांशीं स्पर्धा करण्याची कल्पना सवाई गंधर्व ह्यांस सहन झाली नसती. 'स्वयंवरां'तलें गाणें यशस्वी व्हावें म्हणून सवाई गंधर्व ह्यांनींच एखादा आलाप सुचवून नारायणरावांस प्रोत्साहन दिलें होतें. दोन्ही गंधर्वांचें एकमेकांवर बंधुतुल्य प्रेम होतें. सवाई गंधर्व हे भास्करबुवांनाही गुरुस्थानीं मानीत.

सवाई गंधर्वांनीं ‘ आत्मतेज ’ नाटकांत वेगळ्याच वळणाचें गाणें योजिलें होतें. ‘ ये रे बाळा राजस राजिवा ’ ही त्यांची भैरवी ते इतक्या तल्लीनतेनें, भक्तिभावानें रंगवीत, कीं गायनप्रेमी लोक तें व आणखी दोन-तीन लोकप्रिय झालेलीं गाणीं ऐकायला वारंवार नाटक पाहूं लागले. भास्करबुवा तर वारंवार त्या गाण्यांची प्रशंसा करीत.

‘ आत्मतेजां ’ तील गाण्यांपेक्षां ‘ द्रौपदीं ’ तील गाणीं अधिक प्रभावी करण्याची जबाबदारी बुवांची होती. ‘ द्रौपदी ’ नाटकाचें लेखन पूर्ण होऊन पदें तयार होत होतीं. बुवा विश्रामबाग वाड्याजवळील ‘ गंधर्व मंडळी ’ च्या बिऱ्हाडीं उतरले होते. त्यांना ह्या मुक्कामांत उचकीचें एक दुखणें झालें. उचकी कशानेंही थांबेना. तीन आठवडे हें दुखणें आटोक्यांत आलें नव्हतें. डॉक्टरांचे उपाय चालू होते. गंधर्व व त्यांचे बंधु बापूराव राजहंस ह्यांनीं अखंड सेवा-शुश्रुषा केली. बुवा ह्या शुश्रूषेबद्दल पुढें कृतज्ञतेचे उद्गार वारंवार काढीत.

बुवा ह्या उचकीच्या आजारांतून बरे होण्यापूर्वींच लोकमान्यांनीं मुंबईंत देह ठेवला. त्यांच्या मृत्यूपूर्वीं कांहीं दिवस पुण्यांत लोकांनीं रात्री जागून काढल्या. दर तासाला मुंबईहून टेलिफोनवरून प्रकृतीचें वृत्त कळे. तें घरोघरीं कळावें म्हणून लोक रात्रंदिवस रस्त्यांतून फिरत. एकमेकांस समाचार सांगत. भास्करबुवा रस्त्यावरील खिडकीशीं बसून राहात. लोकमान्यांच्या प्रकृतीचें वृत्त समजावें म्हणून ‘ गंधर्व मंडळीं ’ तील नोकरांना बाहेर पाठवीत व ताजें वृत्त ऐकत. शेवटीं लोकमान्यांच्या स्वर्गवासाचें वृत्त आलें. बुवांच्या डोळ्यांतून अखंड अश्रुधारा वाहूं लागल्या. लोकमान्यांना लोक आप्त मानीत; दैवत मानीत. तत्कालीन महाराष्ट्रीयांच्या जीवनावर लोकमान्यभक्तीचा केवढा खोल संस्कार असे, त्याची कल्पनाच आजच्या वाचकाला येणार नाहीं. भास्करबुवांच्या मनावर फारच परिणाम झाला. ‘ संदेश ’, ‘ केसरी ’, वगैरे पत्रांतील लोकमान्यांच्या गुणगानाचे लेख कोणाला तरी वाचायला लावून बुवा ऐकत व अखंड अश्रु ढाळीत. शिष्य व इतर संबंधितांना हा भावनावेग पाहून आश्चर्य वाटे.

कांहीं काळानें बुवांचा आजार व दुःखावेग आटोक्यांत आला. पुन्हा नित्यक्रमांत हळूहळू बुवा लक्ष घालूं लागले. ‘ द्रौपदी ’ च्या गाण्यांना चाली देण्याचें आजारामुळें व लोकमान्यांच्या मृत्यूमुळें मागें पडलेलें काम बुवांनीं पुन्हा हातीं घेतलें. इतरही व्यवहार चालू झाले. ‘ भारत गायन समाजां ’ त त्यांच्या मैफली पुन्हा हळूहळू सुरू झाल्या.

‘ द्रौपदी ’ नाटकांतील पदांना ‘ स्वयंवरा ’ च्या वळणावरच चाली देण्यांत आल्या. शेवटच्या भैरवीसाठीं बुवांनीं ‘ सोज ’ नामक एका नव्याच मिश्र भैरवीची योजना केली. ‘ सोज ’ हा गीत-प्रकार त्यांना फैजमहंमदखांसाहेबां-कडून मिळाला होता. वस्त्रहरणाच्या प्रसंगीं ‘ मी जरि आज केशवा – माधवा गमविली लाज ’ हा सिंध भैरवींतील सोज कमालीचा करुण आणि रंजक असे. ‘ द्रौपदी ’ नाटकाच्या पदांना चाली देऊन तीं बसविणें, हें बुवांच्या जीवनांतलें नाट्यसृष्टींतलें अखेरचें कार्य ठरलें. ‘ द्रौपदी ’ हें नाटक ‘ स्वयंवरा ’ सारखें गाजलेंमात्र नाहीं.

बुवांचा ‘ गंधर्व कंपनी ’ वर कांहीं काळ राग व्हावा, गंधर्वांशीं बुवांनीं अबोला धरावा, अशी एक घटना ह्यानंतर घडली, ती म्हणजे ‘ मानापमाना ’ चा संयुक्त प्रयोग.

प्रकरण एकविसावें

# संयुक्त ‘ मानापमान ’

महाराष्ट्रीय नाट्यसंगीताचें १९१६ अखेर ‘ स्वयंवर ’ नाटकानें जें वैभवशाली पर्व सुरू झालें, त्यामुळें संगीत नाटक मंडळ्यांत एक विलक्षण चुरस सुरू झाली. गंधर्वाशीं आपापल्या गुणांनीं स्पर्धा करणारे निदान दोन-तीन गायक नट त्या काळीं मराठी रंगभूमीवर तळपत होते. ‘ बलवंत मंडळी ’ चे मालक मास्तर दीनानाथ, ‘ ललितकले ’ चे मालक केशवराव भोसले व ‘ नूतन संगीत मंडळी ’ चे मालक सवाई गंधर्व हे ते तीन प्रमुख गायक होते. प्रत्येक मंडळीचे नाटककार ह्या स्पर्धेला प्रोत्साहन देत. रामकृष्णबुवा वझे ह्यांची शिकवणी ‘ ललितकला ’ ह्या मंडळीनें सुरू केली होती. त्या मंडळीचे मालक श्री. केशवराव भोसले ह्यांनीं कांहीं वर्षें गायनाचें शिक्षण घेतलें होतें. त्यांचा आवाज खणखणीत व पल्लेदार असे. तानफिरत अमर्याद होती व स्वभाव अतिशय महत्त्वाकांक्षी होता. मोठाल्या गायकांशीं स्पर्धा करून त्यांचा पाडाव करावा, अशी त्यांना वारंवार लहर येई. वझेबुवांच्या जलशांत ते गायले,

तरी चार तंबोरे व खूप चढा स्वर ठेवून गात. नंतर गाणाऱ्यांचा रंग जमू नये, असा निकराचा प्रयत्न ते करीत. स्वतःच्या कंपनींत सवाई गंधर्वांना गायला बोलावून त्यांचा पाडाव करण्याचा केशवरावांनीं एकदा प्रयत्न केला, पण त्यांत त्यांना यश आलें नाहीं. आपणास यश आलें नाहीं, तर तसें कबूल करण्याचा दिलदारपणामात्र केशवरावांच्या अंगीं होता.

सवाई गंधर्वांपेक्षांही गंधर्वांचा पाडाव करण्याची ईर्षा केशवरावांच्या मनांत सदैव असे, कारण तींत वैयक्तिक स्पर्धेबरोबर धंदेवाईक स्पर्धाही होती. ही केशवरावांची ईर्षा पुरी होण्याची एक संधि अगदीं अनायासें चालून आली.

त्या काळीं खाडिलकरांच्या 'मानापमान' नाटकाचा प्रयोग लावण्याचा प्रयत्न प्रत्येक संगीत नाटक मंडळीचा असे, 'सौभद्र', 'शारदा', 'मानापमान' हीं अव्वल नाटकें करणारी नाटक मंडळी ही पहिल्या दर्जाची, असें मानलें जात असे. केशवराव भोसले ह्यांची 'ललितकलादर्श मंडळी' 'मानापमाना'चे प्रयोग मोठ्या थाटांत करी. त्यांत केशवराव भोसले ह्यांची धैर्यधराची भूमिका फारच लोकप्रिय झालेली होती. त्यांचा आवाज व शास्त्रीय वळणाचें गाणें ह्यामुळें धैर्यधराच्या भूमिकेंत केशवरावांनीं एका विशिष्ट गायन-प्रेमी प्रेक्षक-वर्गाची वाहवा मिळविली होती.

ह्याच्या उलट 'गंधर्व मंडळी' 'मानापमान' नाटक करी, तें बालगंधर्वांच्या 'भामिनी'च्या गाण्याच्या जोरावर. भास्करबुवांच्या शिकवणीमुळें गंधर्वांच्या भूमिकेचा व गाण्याचा दर्जा दिवसेंदिवस इतका उंचावला होता, कीं त्यांची बरोबरी करणारी 'भामिनी' कोणत्याही संगीत नाटक मंडळींत नसे. धैर्यधराची भूमिका प्रभावी करणारा नट मात्र 'गंधर्व मंडळींत'त नव्हता. कारण प्रथम 'किर्लोस्कर मंडळीं'त व नंतर 'गंधर्व मंडळी'त धैर्यधराची भूमिका सर्वांगांनीं उत्कृष्ट वठवील असा नट नानासाहेब जोगळेकरांच्या मृत्यूनंतर एकही झाला नाहीं. केशवरावांना 'गंधर्व मंडळी'च्या 'मानापमानां'तील हा कच्चा दुवा ठाऊक होता. त्याचा फायदा घेऊन गंधर्वांचा धंदेवाईक स्पर्धेत पराभव करण्याची एक योजना त्यांनीं ठरविली. ह्या योजनेसाठीं महात्माजींनीं 'टिळक स्मारक फंडा'साठीं एक कोट रुपये जमविण्याच्या सोडलेल्या संकल्पाचा फायदा घेण्याचें त्यांनीं

ठरविलें. फंडाला मदत म्हणून 'मानापमान' नाटकाचा 'ललितकलादर्श' व 'गंधर्व' ह्या दोन मंडळ्यांचा जर संयुक्त प्रयोग केला, तर केशवराव धैर्यधर व गंधर्व भामिनी अशा भूमिकांनीं लोकोत्तर दर्जाचा प्रयोग होईल व त्याला भरपूर उत्पन्न होऊन दोन्ही नाटक मंडळ्यांस ह्या सार्वजनिक कार्याचें श्रेय मिळेल, अशी ती योजना होती. ह्या योजनेंत गंधर्वांचा स्पर्धेत पाडाव करण्याचा एक सुप्त हेतुही केशवरावांच्या मनांत होताच. गंधर्वांस समक्ष भेटून त्यांनीं आपली योजना त्यांच्या गळीं उतरविली.

ह्या वृत्तामुळें 'गंधर्व मंडळी' चे सल्लागार व हितचिंतकमात्र अतिशय अस्वस्थ झाले. खाडिलकरांनीं व भास्करबुवांनीं ह्या संयुक्त प्रयोगाच्या परिणामाचा नेमका अंदाज बांधला, कारण गंधर्वांच्या लौकिकाच्या व यशाच्या उभारणींत त्या दोघांचाही फार मोठा वांटा होता.

'मानापमान' नाटकांत अभिजात गायनामुळें धैर्यधर ही भूमिका भामिनीपेक्षां अधिक प्रभावी होती. मात्र धैर्यधराची भूमिका करण्यास शास्त्रीय गायन जाणणाऱ्या गळेबाज नटाची जरूर असे. केशवराव धैर्यधर व बालगंधर्व भामिनी, असा 'मानापमाना' चा संयुक्त प्रयोग झाल्यास त्यांतली एरव्हीं अपूर्व वठणारी गंधर्वांची भामिनीची भूमिका सामान्य जनतेला उठावदार वाटणार नाहीं, अजाणपणें तुलना होऊन गंधर्वांच्या लौकिकास बाध येईल, हा धोका निश्चित होता. खाडिलकर, भास्करबुवा व अलादियाखां ह्यांनीं हा धोका लक्षांत घेऊन, गंधर्वांनीं 'मानापमान' नाटकाचा हा संकल्पित संयुक्त प्रयोग करूं नये, असें आग्रहपूर्वक सुचविलें. पण 'मी वचनबद्ध झालों आहें' एवढेंच त्रोटक उत्तर देऊन, गंधर्व आपल्या हितचिंतकांचा सल्ला मानण्यास तयार होईनात.

भास्करबुवांनीं अनंत कष्ट करून गंधर्वांच्या गाण्यावर संस्कार केले, गंधर्वांचा लौकिक नाट्यसंगीतांत मूर्धस्थानीं स्थापन केला, तो सर्वच डोलारा कोसळण्याचा धोका ह्या संयुक्त प्रयोगानें निर्माण झाला होता. गंधर्वांचा स्पर्धेत पाडाव झाला, तर तो एक प्रकारें स्वतःचाच फार मोठा पराभव होईल, असें बुवा आत्मीयतेनें मानीत होते. एकंदर नाट्य-संगीतांतील स्पर्धेचें स्वरूप

बुवा पूर्णपणें ओळखीत असल्यामुळें केशवरावांचें चढाईचें धोरण बुवांनीं नेमकें ताडलें होतें. अशा प्रसंगीं मोठें धोरण राखायला हवें होतें.

धैर्यधराची भूमिका केशवराव एकदम धूमधडाक्यानें करीत. इंग्रज सेनानीसारखा भरजरी पोषाख त्यांनीं धैर्यधराच्या भूमिकेसाठीं मुद्दाम शिवून घेतला होता. 'युवतिमना दारुण रण' हें पद म्हणतांना केशवराव तरवार उपसून सर्व रंगमंचावर चौफेर चढाईच्या त्वेषानें फिरत; तरवारीचे हात करीत; टाळी पडेपर्यंत तानेचा पट्टाही चालू ठेवीत. हा सारा दांडगाईचा प्रकार बहुजनसमाजास आश्चर्यजनक कौतुकाचा वाटे. बराचसा गायन-प्रेमी वर्ग केशवरावांच्या पल्लेदार आवाजावर लुब्ध असे. बहुजनसमाजाची अभिरुचि व केशवरावांची आक्रमक चढाऊ वृत्ति ह्यांमुळें आपले शिष्य बालगंधर्व व्यर्थ अवमानित होतील, हें बुवांना स्पष्ट दिसत होतें. श्रोतृसमाजाचें गाढ अज्ञान बुवांच्या चिरपरिचयाचें होतें. आपलें नाक कापून गंधर्वानें स्वतःस अपशकुन करून घेऊं नये, म्हणून बुवांनीं गंधर्वास परोपरीनें समजावण्याची पराकाष्ठा केली.

अगदीं अखेरचा प्रयत्न म्हणून बुवांनीं सुचविलें, कीं कांहीं विशेषच करायचें असलें, तर 'विद्याहरण' नाटक करावें. आपल्या आवडत्या शिष्याचा पाडाव टाळण्यासाठीं आपला नाटकांत पुन्हा काम न करण्याचा निर्णय मोडून, तोंडाला रंग लावून शुक्राचार्याची भूमिका करायलाही बुवा सिद्ध झाले. बुवांनीं अनेक शुक्राचार्य शिकवून तयार केले होते. बुवा काम करते, तर नाटकाला तोबा गर्दी झाली असती. हवे तितके पैसे मिळाले असते !

कांहींही करून बुवांना हा चुरशीचा सामना टाळायचा होता. ह्या प्रयोगाबद्दल तत्कालीन वातावरण कसें दूषित होतें व बुवांचा दृष्टिकोन कसा अचूक होता, हें एका छोट्या उताऱ्यावरून वाचकांच्या लक्षांत येईल. 'नाटकवेडे' कै. पु. रा. लेले ह्यांच्या 'महाराष्ट्राचें दुसरें वेड' ह्या पुस्तकांत ह्या संयुक्त प्रयोगाचें वर्णन आहे. ते लिहितात : "संयुक्त प्रयोग म्हणजे द्वंद्व होतें. झुंज होती. प्रेक्षकसुद्धा त्या द्वंद्वांत भाग घ्यायला आले होते. प्रयोग म्हणून कोणी त्याच्याकडे पाहातच नव्हते. लढत वा चुरशीचा सामना

म्हणून पाहात होते.” ह्याच पुस्तकांत केशवराव भोसले ह्यांचें काम असमाधानकारक होतें, ही गोष्ट परस्पर श्री. पु. गो. काणेकरांच्या ‘ नाट्यस्मृतीं ’तील उतारा देऊन श्री. लेले ह्यांनीं स्पष्ट केली आहे.

नारायणरावांनीं बुवांचें सांगणें ऐकलें नाहीं. उलट संयुक्त ‘ मानापमाना ’-बरोबरच ‘ सौभद्रा ’ चाही प्रयोग करण्याचें निश्चित ठरून तारखासुद्धा मुक्रर झाल्या. बालगंधर्वांची ही विटंबना पाहाण्याचें दुर्भाग्य टळावें म्हणून नाट्यप्रयोगापूर्वी बुवा एकाएकीं कोठें जातों हें न सांगतां मुंबईहून निघून गेले. सातारला ते सासुरवाडीस जाऊन राहिले. बुवा कोठें गेले, हें पुण्या-मुंबईंत कोणालाच ठाऊक नव्हतें.

बुवांचें भाकीत खरें ठरलें. संयुक्त ‘ मानापमान ’ झाल्याबरोबर अच्युतराव कोल्हटकर ह्यांच्या सुप्रसिद्ध ‘ संदेश ’ पत्रांत भले-मोठे मथळे देऊन ‘ केशवरावांनीं बालगंधर्वांचा पुरा पाडाव केला ! ’ असें वृत्त प्रसिद्ध झालें. उलट संयुक्त ‘ सौभद्रां ’त ‘ गंधर्वानें केशवरावांचा पाडाव केला ! ’ हेंही वृत्त तितक्याच भल्या-मोठ्या टायपांत छापून आलें. तमासगिरांना कोणाची तरी फजिती बघायची होती, टाळ्या वाजवून दोन दिवस गंमत करायची होती. बुवांना जनता व कलावंत ह्यांचें हें नातें पूर्णपणें ठाऊक होतें. बुवांचें अजोड गाणें ऐकण्याची हौस असलेला श्रोता हजारांत एक असे. अब्दुल्करीमखां व भास्करबुवा ह्यांना सभेच्या आराधनेसाठीं मैफलींत नाटकांतील पदें, भजनें गाण्याचा प्रसंग नित्य येत असे. त्यामुळें सर्वसामान्य जनता कशी गाजरपारखी आहे, हें बुवांच्या चिरपरिचयाचें होतें.

बुवा सातारला असतां अचानक श्री. माधवराव धामणकर त्यांजकडे गेले. बुवांनीं धामणकरांना नाट्यप्रयोग पाहाण्यापासून परावृत्त केलें. सातारचें काम आटोपून श्री. धामणकर मुंबईस संयुक्त ‘ मानापमान ’ पाहाण्यास जाणार होते. त्यांनीं तिकिटेंही घेतलीं होतीं. बुवांच्या सांगण्यावरून धामणकरही चार दिवस साताऱ्यास राहिले. नाटकास गेले नाहींत. भास्करबुवांस माधवरावांचें हें वागणें फार समाधानकारक वाटलें. बुवांनीं गंधर्वांशीं ह्यानंतर अनेक महिने अबोला धरला. पुढें नाट्याचार्य खाडिलकर व कंपनीचे इतर हितचिंतक बुवांस

भेटले व त्यांनीं ' गंधर्व मंडळी ' च्या गणेशोत्सवाचें बुवांस आमंत्रण देऊन अबोला सोडण्याचीही विनंती केली. बुवांनीं देव-स्थापनेचें आमंत्रण म्हणून तें स्वीकारलें आणि नंतर ' गंधर्व मंडळी ' च्या गणेशोत्सवांत बुवांचें गाणें झालें व हा अबोला संपला. बुवांना स्वतःच्या शिष्यांच्या हितसंबंधांची जी आस्था होती, ती ह्या घटनेंत स्पष्ट दिसली.

प्रकरण बाविसावें

# अखेरच्या दोन मैफली

'गंधर्व कंपनी 'शीं बुवांनीं धरलेला अबोला गणेशोत्सवांतील त्यांच्या गाण्यानें संपला व त्यांची प्रकृतिही सुधारत आहे, असें त्यांच्या कार्यक्रमांवरून वाटूं लागलें. नंतर दोन-तीनच महिन्यांनीं ते दरसालप्रमाणें आपल्या पंजाबांतील दौऱ्यावर गेले. तिकडेही त्यांनीं कांहीं काळ विश्रांति घेतली व अमृतसर, वगैरे भागांतील मैफली आटोपून ते महाराष्ट्रांत आले.

ह्यानंतर १९२२ च्या सुरुवातीस भास्करबुवांच्या दोन अविस्मरणीय बैठकी दक्षिणेंत झाल्या. कोल्हापूरच्या ' देवल क्लबां ' त सर्वच थोर गवयांचीं गाणीं होत. अलादियाखां, रहिमतखां, वझेबुवा, वगैरे अनेक पट्टीचे गायक तेथें उपस्थित असत व गात. रहिमतखां कधीं कोणाचें गाणें ऐकायला समोर बसत नसत. दिवाणखान्याच्या बाजूच्या खोलींत एका आरामखुर्चीवर बसून, डोळे मिटून, ते सर्वांचीं गाणीं ऐकत. त्या दिवशीं भास्करबुवा अतिशयच चुरशीनें गायले. पित्रे वकील, गुरुनाथ देशपांडे, वझेबुवा, अलादियाखां

व त्यांचे पुत्र, विश्वनाथबुवा जाधव, गुंडोपंत वालावलकर, गोविंदराव टेंबे, वगैरे अनेक मान्यवर विद्वान् रसिक श्रोते समोर बसलेले. भास्करबुवांनीं स्वतःच्या सर्व गुरूंचें स्मरण करून गायला सुरुवात केली. कोणालाही न नमणारा तो गायनकेसरी होता. अनेक गवयांची विद्वत्ता व कलावंतांच्या सौंदर्याचा अर्क त्यांच्या प्रतिभेंत एकवटलेला होता. त्यांनीं गायला सुरुवात केली तीच कमालीच्या चढाईची. एकेक स्वर इतका कसून लागे, कीं आजन्म स्वरांच्या स्वर्गांत वावरलेल्या गवयांनींही भास्करबुवांच्या चतुर स्वरयोजनेनें व स्वरोच्चारानें चमकून जावें. गाणें थोड्याच वेळांत कल्पनातीत रंगलें. सर्व सभा भारावून गेली.

शेजारच्या खोलींतून रहिमतखां डोळे मिटून गाणें ऐकत होते. ते खडबडून उठून बसले. "कोरमेका खुशबू आ रहा है, यह गाना सुननाही चाहिये" असें म्हणत त्यांनीं खुर्ची सोडली व ते थेट मैफलींत भास्करबुवांसमोर येऊन बसले. अलादियाखां, वझेबुवा, पित्रे वकील, वगैरे श्रोते त्या वैभवशाली गाण्यांत अगदीं तल्लीन होऊन गेले होते. भास्करबुवांच्या अस्ताईच्या मांडणीनें आणि सर्वांगीण बढतीनें मैफल इतकी रंगली, कीं त्या बैठकीस उपस्थित असलेल्या अनेकांनीं ह्या अविस्मरणीय मैफलीचें वृत्त लिहून ठेवलें आहे. खांसाहेब अलादियांना शेवटीं स्वस्थ बसणें अशक्य झालें. त्यांनीं भास्करबुवांस म्हटलें, "वाहवा! आपण काय सुंदर मैफल जमविली!" अलादियासारख्या, रहिमतखां-वझेबुवांसारख्या विद्वानांच्या तोंडून 'वाहवा' मिळविणें हेंच त्यांच्या सर्व विद्येचें, कलावान् म्हणून केलेल्या चतुर आविष्काराचें यश होतें. बुवांनीं यशाचें शिखर केव्हांच गांठलें होतें.

नंतर इतकीच गाजलेली दुसरी मैफल पुण्याच्या 'डेक्कन जिमखान्या' वर झाली. येथेंही अखिल भारतीय कीर्तीचे अनेक गायक-वादक उपस्थित होते.

पुण्याच्या 'डेक्कन जिमखान्या' वर प्रतिवर्षी मर्दानी व मैदानी खेळांची एक प्रचंड दंगल होत असे; धावणें, उड्या, वेताचा व खांब मलखांब, सिंगल व डबलबार, कुस्त्या, वजन फेकणें, सायकल-शर्यत, २७ मैल धावण्याची शर्यत, आट्या-पाट्या, खोखो, वगैरे अनेक प्रकारचे खेळ फारच

मोठ्या प्रमाणांत होत असत. अखिल-भारतीय लौकिकाचे पहिलवान ह्या उत्सवांत पंजाब, इंदूर, बडोदें, पंढरपूर, कोल्हापूर, सोलापूर, वगैरे अनेक शहरांतून येत. प्रांतांचे गव्हर्नर, सर्वोच्च लष्करी अधिकारी, कोल्हापूरचे छत्रपति शाहूमहाराज, वगैरे बड्या मंडळींचा ह्या उत्सवांत भाग असे. कांहींही साहित्य न घेतां, लष्करी लोकांना व्यायाम करण्यास, चपळ राखण्यास भारतीय खेळ फार उपयुक्त आहेत, अशी परदेशी अधिकाऱ्यांची हा महोत्सव पाहून खात्री झाली होती. नवीन पद्धतीनें, अत्यंत मार्मिकतेनें आंखलेलें अंगण, सर्व खेळांत नियमबद्ध शिस्त, ह्यांनीं युक्त असे देशी खेळ प्रथमच इतक्या प्रेक्षणीय स्वरूपांत इंग्रजांस पाहायला मिळाले होते.

पहिल्या जर्मन महायुद्धांत इंग्रज सरकार खर्चानें, मनुष्यहानीनें व स्वदेशी चळवळीनें अगदीं खिळखिळें झालें होतें. लोकमान्यांच्या मृत्यूनंतर महात्माजींची चळवळ सुसंघटित होईपर्यंत जीं कांहीं वर्षें गेलीं, त्या काळाची विस्कळित अवस्था तेव्हां होती.

सरकारच्या महायुद्धामुळें झालेल्या कर्जबाजारी स्थितींत ह्या महोत्सवाला आलेल्या बड्या मंडळींकडून महायुद्ध-निधीला पैसे उकळण्याची एक कल्पना सरकारी अधिकाऱ्यांनीं सुचविली. ह्या मैदानी व मर्दानी खेळांबरोबरच एक संगीत महोत्सव भरवून ' वॉर फंडा ' साठीं पैसा जमा करण्याची कल्पना निश्चित झाली. ' डेक्कन जिमखान्या ' च्या खेळांच्या महोत्सवाचें नेतृत्व, एस्. आर्. भागवत, अनंतराव सरदेसाई, कंत्राटदार दत्तोपंत परांजपे, आबासाहेब गोखले, वगैरे मंडळीकडे असे. पुण्याचे श्रीमंत आबासाहेब मुजुमदार हेही ह्या उत्सवांत भाग घेत. ही सर्व मंडळी भास्करबुवांना दैवत मानणारी असे. अनेक नामवंत गायक-वादकांना आमंत्रण करण्यांत आलें होतें. बाळकृष्णबुवा इचलकरंजीकर, त्यांचे चिरंजीव अण्णूबुवा, विलायत-हुसेन, भास्करबुवा, सवाई गंधर्व, कृष्णराव फुलंब्रीकर, अहमदजान तिरखवा, वगैरे नामांकित कलावंतांचा गायन-वादनाचा महोत्सव झाला. अलादियाखां, अब्दुलकरीमखां, वगैरे मंडळी येऊं शकली नाहींत.

भास्करबुवा बखले ह्यांचा गौरव करण्याची ही उत्तम संधि आहे असें महोत्सवाच्या चालक मंडळींच्या मनांत आलें. परंतु बाळकृष्णबुवांचें वय

आतां ऐशीं वर्षांचें असूनही ते अप्रतिम गाणें गात. अशा वडील गायकाचा अपमान होऊं नये, म्हणून भास्करबुवांनीं दोन गोष्टी केल्या. शेवटच्या दिवशीं त्यांचें अखेरचें मानाचें गाणें ठरलें होतें. त्यांना मानधन म्हणून १०० रुपये द्यावे, बाळकृष्णबुवांना ७५ रुपये द्यावे, अशी महोत्सव-संचालकांनीं योजना केली होती. ह्या दोन्ही गोष्टी भास्करबुवांनीं बदलून घेतल्या. अखेरचें बहुमानाचें गाणें वृद्ध गायनमहर्षि बाळकृष्णबुवांचें व्हावें व त्यांस सर्वांत अधिक मानधन द्यावें, असा भास्करबुवांनीं आग्रह धरला व स्वतःचें गाणें सकाळीं ठरविलें. मानधनही ७५ रुपये स्वीकारण्याचें त्यांनीं निश्चित केलें. भास्करबुवांच्या आग्रहापुढें उत्सव-संचालकांस मान तुकवावी लागली. भास्करबुवांच्या कांहीं भक्तांचा ह्या घटनेनें अतिशय विरस झाला. कारण बुवांची त्यांच्या भक्तांना आदरयुक्त भीतिही वाटे.

माझे वडील 'डेक्कन जिमखान्या'च्या संस्थापकांपैकीं असून मी ह्या महोत्सवांत स्वयंसेवक म्हणून बड्या मंडळींच्या व प्रेक्षकांच्या सेवेसाठीं उपस्थित होतों. मला उत्सवांतील सर्वच चर्चा समजत. उत्सवाच्या कार्यक्रमांत भास्करबुवांचें गाणें अखेरचें ठरविलेलें पाहून बाळकृष्णबुवांच्या चाहात्यांनीं बाळकृष्णबुवांजवळ विरोध दर्शविण्याची सूचना केली. त्यांनीं पाहुणचार स्वीकारतांना कसलीच तक्रार आपण करणार नाहीं, असें बरोबर आलेल्या शिष्यवर्गास सांगितलें. बिदागीविषयींही बोलण्याचें त्यांनीं नाकारलें, भास्करबुवांच्या सौजन्यानें व वडील गायकाबद्दल आदर दर्शविण्याच्या शिस्तीनें बाळकृष्णबुवांच्या शिष्यवर्गाच्या तक्रारीला कांहींच वाव न राहातां हा प्रसंग अत्यंत आनंदांत पार पडला.

एकंदर संगीत-परिषदेच्या पांच बैठकी झाल्या. तिरुखवासाहेबांचें तबलावादन व इतर अनेकांचे कार्यक्रम तीन बैठकींत उरकल्यावर समातीच्या आदल्या रात्रीं मास्तर कृष्णराव व सवाई गंधर्व ह्यांना सारखा वेळ देण्यांत आला. मास्तर कृष्णरावांच्या खूप तयारीच्या रंगलेल्या गाण्यानंतरही सवाई गंधर्वांनीं आपल्या चातुर्यानें मैफल जिंकली. त्यांचें गाणें अतिशय प्रभावी झालें. व्यासपीठावर चढून रामभाऊंना भास्करबुवांनीं शाबासकी दिली.

समातीच्या दिवशीं सकाळीं भास्करबुवांचें गाणें झालें. तंबोऱ्यावर मास्तर कृष्णराव व बापूराव केतकर ही पट्टशिष्यांची जोडी होती. बुवांनीं जौनपुरी. वगैरे सकाळचे राग खूपच रंगविले.

आधींच बुवांच्या गाण्याचा दर्जा इतका श्रेष्ठ असे, कीं त्यांचें गाणें इतरांच्या उत्तम रंगलेल्या गायनापेक्षांही विलक्षण प्रभावी असे. इतरांच्या गाण्याचे संस्कार बुवा पुसून टाकीत. बुवा सकाळचे राग तर इतक्या तेजानें गात, कीं ते ऐकण्यासाठीं गैरसोय सोसूनही त्यांच्या अनेक मैफली सकाळीं होत. ' जिमखान्या ' वरील सकाळची बैठक अशीच असामान्य तेजस्वी व अविस्मरणीय ठरली.

' डेक्कन जिमखान्या ' च्या संगीत-महोत्सवांत सरदार आबासाहेब मुजुमदार, आबासाहेब गोखले व कॉंट्रॅक्टर दत्तोपंत परांजपे ही मंडळी अधिक उत्सुकतेनें पुढाकार घेत होती. दत्तोपंत परांजपे महाविनोदी गृहस्थ होते. एखादी गोष्ट अवर्णनीय झाली असें म्हणण्यासाठीं ते " पी डीडी सी एच वाय सी सी " अशीं कांहीं इंग्रजी मुळाक्षरें वेगानें उच्चारीत.

भास्करबुवांचें गाणें संपलें तेव्हां अशींच कांहीं अक्षरें भराभर उच्चारीत ते माझ्याजवळ येऊन म्हणाले, " काय, ऐकलंस गाणं ? " असें म्हणून पुन्हा त्यांनीं आपली अद्भुत इंग्रजी वर्णमाला उचारली. पलीकडेच बाळकृष्णबुवा बसले होते. दत्तोपंतांकडे ते कुतूहलानें पाहात होते. त्यांनाही दत्तोपंतांनीं हसत हसत विचारलें, " काय बुवासाहेब, कसं काय वाटलं भास्करबुवांचं गाणं ? "

" भास्करबुवांच्या गाण्याबद्दल काय विचारतां ? त्यांच्या गळ्यांतून प्रत्यक्ष देव-गंधर्व गातात. त्यांच्यासारखा गायनविद्येचा भक्त पाहायला मिळायचा नाहीं. " दत्तोपंत परांजपे इतके खूष झाले, कीं माझ्याकडे वळून म्हणाले, " ऐकलंस ? नाहींतर म्हणशील, मीदेखील बुवांपेक्षां चांगलं गातों ! " ते मोठ-मोठ्यानें हसले आणि स्वतःशींच पुटपुटत गेले, " डी डी एच सी एल डी, पी. वाय. सी ... " मला ती त्यांची पेटंट अक्षरमाला आतां नीट आठवत नाहीं.

परिषदेच्या समातीच्या रात्रीं बाळकृष्णबुवांचें गाणें झालें, तेंही अविस्मरणीय. सरळ गायकी पण अत्यंत सुरेल आणि रसपूर्ण. तंबोऱ्यावर त्यांचे चिरंजीव अण्णूबुवा होते. त्यांनीं तयारीच्या तानांचा पाऊस पाडला. बाळकृष्णबुवांच्या नरम गोड गायकीशीं ही साथ विसंगत असली, तरी बाळकृष्णबुवांनीं स्वतःचें गाणें इतकें रंगून म्हटलें, कीं श्रोत्यांचा त्या मैफलींत विरस झाला नाहीं. त्या वयस्क गायकाच्या गायकीचें गोड स्मरण श्रोत्यांच्या मनावर राहिलें. परिषद यशस्वितेनें पार पडली.

दुसऱ्या दिवशीं बुवा कृष्णा मास्तरांकडे गेले. ते बाळकृष्णबुवांच्या रात्रीच्या गाण्याची पुन्हा पुन्हा आठवण करून स्तुति करीत होते. " आतां ऐंशीं वर्षांचं वय उलटल्यावर बाळकृष्णबुवा इतकं सुंदर गायले, मग आपल्या उमेदीच्या वयांत ते कसे गात असतील, कांहीं कल्पनाच करवत नाहीं ! " नंतर रामभाऊ कुंदगोळकर ह्यांचीही त्यांनीं मनःपूर्वक तारीफ केली, " किती छान रंग जमवला रामभाऊंनीं ! "

भास्करबुवांना स्वतःबद्दल जबरदस्त आत्मविश्वास असे. त्याचप्रमाणें स्वतःच्या शिष्यांबद्दलही योग्य प्रमाणांत अभिमान व आस्था असली, तरी इतर गुणीजनांबद्दल त्यांच्या रसिकतेंत जराही गढूळपणा येत नसे. तो त्यांचा स्वभावच नव्हता. त्यांना बरोबरीच्या थोर गायकांचे श्रेष्ठ गुण, मर्यादा व दोषही पूर्णपणें समजत असले, तरी त्यांच्या तोंडून इतरांच्या फक्त गुणांचा तेवढाच उल्लेख व तोही हटकून व्हायचा. कोणाचेंही वैगुण्य त्यांच्या तोंडून कधीं उच्चारलें जात नसे, एवढेंच नव्हे, तर त्यांच्या परिवारांतील कोणीं बुवांची खुशामत करण्याच्या उद्देशानें इतरांचें वैगुण्य दर्शविलें, तर भास्करबुवा त्याची न चुकतां कडक शब्दांत खरडपट्टी काढीत. " त्यांचे गुण इतके प्रशंसनीय आहेत, कीं तेवढ्यांचंच फक्त स्मरण करा. " असें ते निक्षून त्या माणसाला बजावीत. " दुसऱ्याचे दोष दाखविण्याइतका तूं तरी कोण दुढ्ढाचार्य लागून गेला आहेस ? " असें स्पष्ट म्हणत व परनिंदेच्या सवयीपासून त्याला परावृत्त करण्याचा कटाक्ष ठेवीत. विशाल गुणांच्या व गुणीजनांच्या सहवासानें त्यांना सामान्य कलावंतांबद्दलही पूर्ण सहानुभूति असे.

प्रकरण तेविसावें

# अखेर

१९२१ च्या दसऱ्यापूर्वी बुवा आपले पंजाब व सिंध प्रांतांतील दौरे आटोपून परत महाराष्ट्रांत आले, ते अतिशय आनंदानें, आशावादी वृत्तीनें. सौंदर्यपूजकाच्या मनांत आशेचें साम्राज्य असतें आणि तेथें नित्य नवें पराक्रमक्षेत्र जन्माला येतें. अमूक एक थोर कल्पना मी साकार करीन, स्वतःच्या व लोकांच्या जीवनांत मी अशीच आनंदाची फुलबाग फुलवीन, अशीच प्रत्येक खऱ्या कलावंताची महत्त्वाकांक्षा असते. आपलें हें ध्येय साध्य करतांना अमर्याद कष्ट पडले, तरी तेंच कलावंताचें जीवितकार्य. ह्याच कार्याला दिव्य-भव्य स्वरूप देण्याचीं सुख-स्वप्नें कलावंताची बुद्धि आणि भावनाविश्व व्यापून टाकतात.

सिंध-पंजाबची थंड हवा, उत्तम दर्जाचें खाणें-पिणें, नव्या निसर्गाचें दर्शन आणि गायन-भक्त रसिकांचा अखंड सहवास, ह्यांमुळें बुवांची प्रकृति सुधारूं लागली. मनःप्रवृत्ति तर अतिशयच उत्साही बनली होती. एक कारणमात्र अगदीं घरगुती होतें. बुवांची ज्येष्ठ कन्या माई हिचा विवाह हर्डीकर नामक

तरुणाशीं ठरला होता. हातांत खर्चायला मुबलक रक्कम होती. आधींपासूनच लग्नासाठीं राखून ठेवलेल्या दोन हजार रुपयांपेक्षां कितीतरी अधिक पैसा बुवांनीं दौऱ्यावरून आणला होता. पत्नीच्या संमतीनें अष्टेकरबुवांनीं लग्न ठरविलें, तें बुवांनीं अतिशय थाटानें साजरें केलें. परंतु हा आनंद फार काळ टिकला नाहीं. लग्नानंतर थोड्याच महिन्यांत मुलगी आजारी पडली. दुखणें क्षयावर गेलें. मुलीला हवा बदलण्यासाठीं मिरजेस नेण्यांत आलें. ओळखीचे मुंबईचे दोन डॉक्टर व बुवांचे शिष्य बुवांबरोबर मिरजेस जाऊन राहिले. पण दुखणें आटोक्यांत आलें नाहीं. मुलीला काळानें हिरावून नेलें.

जसें एखाद्या ईश्वरभक्ताला नाम-स्मरण, तशी भास्करबुवांना त्यांची गायनभक्ति हीच प्रोत्साहक प्रेरणाशक्ति असे. बुवांच्या आतेष्टांनीं लिहून ठेविलें आहे, " मुलीच्या मृत्यूनें सर्व घरांत उदासीनता पसरली होती. कोणी विशेष बोलत नव्हतें. प्रत्येकाच्या हालचालींत विचित्र गंभीर उदासीनता होती. शेवटीं चार-पांच दिवसांनीं ह्या असह्य उदासीनतेचा भंग करून भास्करबुवाच आतेष्टांना म्हणाले, 'तुम्ही सारे असे घुम्यासारखे कां ? मला गायला कां सांगत नाहीं ?' बुवांनीं तंबोरा जुळविला आणि गुणगुणायला सुरुवात केली. "

गाणें म्हणजेच जगणें, गाणें बंद म्हणजेच जीवन संपलें, असें त्या गायन-भक्ताला वाटे. गाणें हाच सारा जिवंतपणा, उत्साह आणि आनंद. स्तब्धता, शांतता म्हणजेमात्र मृत्यु. स्वर-सागराच्या आंदोलनांवर अखंड तरंगत राहावें, सागराच्या तळाशीं म्हणजे स्तब्ध पाण्यांतमात्र जाऊं नये. कारण तेथें हीं आंदोलनें पोंचूं शकतच नाहींत आणि आंदोलनें नाहींत म्हणजे मगमात्र मृत्युच. सारें स्वर-सागरांतलें ऐश्वर्य, सौंदर्य, सामर्थ्य स्वतःच्या गळ्यानें निर्माण करून जीवनांतील आनंदाचा तो उसळता खळखळाट अखंड कानीं पडावा, हेंच त्या गान-भक्त भास्कराचें जिणें होतें. कौटुंबिक कोणताच पाश टिकाऊ नव्हता. स्वतःचा मुलगा जगला नाहीं, ज्या चार मुली होत्या, त्यांपैकीं वडील सासरींच नव्हे, तर परलोकीं गेली, दुसऱ्या तीन मुली लहान, त्यांचें गाणें शिकण्याचें वय नाहीं. स्वतःजवळचें उदंड ऐश्वर्य, गायनांतील सौंदर्य शोधून, नित्य नवें निर्माण करून, त्या कैफांत स्वतः जगायचें व

इतरांना जगवायचें. हें सारें ऐश्वर्य, हा अनंत आनंदाचा सांठा आतां कोणाच्या स्वाधीन करावा ? जन्मभर जें मिळवलें, जें कमालीच्या चातुर्यानें नित्य सजवून जनतेला दोन तपें ऐकवलें, तें सारें वैभव केवळ हवेंतच विरून जाणार का ? ती विद्या, ती स्फूर्ति, त्या प्रत्येक रागाचा स्वर न् स्वर नटवण्यासाठीं योजलेल्या अनंत युक्त्या, रचलेले शेकडों आलाप, ह्या सर्वांचा फळा मृत्यु असाच पुसून टाकणार का ?

अनेक गुरूंकडून जें विद्यावैभव मिळवलें, तें कांहीं जन्मभर पुरणार नाहीं. जालंदरला भेटलेले ते वृद्ध गवई – ज्यांनीं सुचविलें, कीं ध्रुपदाचीं चारी अंगें नीट विकास पावलीं, तरच ख्यालाचा समतोल विकास साधेल. किती अर्थ-गर्भ उद्गार होते ते ! पण मला स्वतःला त्या मूलभूत शास्त्रीय दृष्टीनें हा विकास समजेल का ? मला ह्यापेक्षां अधिक भव्य विस्तृत ख्याल केव्हां मांडतां येईल ? भास्करबुवा हीं सर्व आत्मगत विचारांचीं प्रमेयें रघुवीर पेंटर, अष्टेकरबुवा, वगैरे जाणत्या मित्रांजवळ बोलत. ते जितकें बोलत, त्याच्या कितीतरी पट अवघड प्रमेयें त्यांच्या मनांत घोळत असत. बुवा स्वतःच्याच तंद्रींत मग्न असायचे. अशाच विचारांना एकाएकीं स्वरांचें मूर्त रूप येई. बुवा तंबोरा उचलीत. शेकडों वेळां मैफलींत ज्या जुन्या चिजांनीं श्रोत्यांना बेहोष बनविलें, त्यांतली एखादी चीज ते पुन्हा नवीन विचारांनीं नवीन मांडणीनें मांडीत. शिष्यांना, जाणत्या श्रोत्यांना वाटे, बुवांच्या डोक्यांत त्या जुन्या चिजांनाच नित्य नवें तेजाळ स्वरूप देण्याची कोणती किमया आहे ? बुवा आपल्या कलासक्तींत सारें जग विसरत, परंतु घरगुती निराशाजनक घटनांचा बुवांच्या मनावर फार मोठा विपरीत परिणाम झाला. मध्येंच कांहीं काळ प्रकृति सुधारावी, पुन्हा बुवांनीं सहन न होईल इतकी मेहनत करावी. ह्या अतिश्रमानें त्यांची प्रकृति अतिशय वेगानें बिघडूं लागली.

त्या वेळीं डॉक्टर लोकांचें ज्ञानही आजच्या मानानें जरा बेताबाताचेंच असे. वरवर दिसणाऱ्या लक्षणांवर अघोरी इंग्रजी औषधें देणें व रोगाचें मूलस्थान न शोधणें, वगैरे तत्कालीन डॉक्टरांच्या रूढ पद्धतीनें रोग आटोक्यांत ठेवणें, मुळांतच वाढूं न देणें, ह्या गोष्टी होत नसत. १९२२ च्या सुरुवातीस बुवांस रक्तक्षयाचा विकार जडला व शेवटच्या दोन-तीन महिन्यांत

तो डॉक्टरांच्या आटोक्यापार गेला. न्युमोनिया, मलेरियासारखे आजारच त्या काळीं बहुधा अनावर ठरत. रोगी विषमांतून उठला, तर यमराजाच्या गैरमर्जीमुळेंच तसें घडे. रोग अनावर होत आहे, औषधांचा उपयोग होत नाहीं, हें पाहून बुवा यवतला कोरड्या हवेवर गेले. पण तेथून ते आठ-दहा दिवसांतच पुण्यास परतले. पुण्याच्या 'डेक्कन जिमखान्या'च्या आसपास तेव्हां नवी वस्ती वाढत होती. गांवच्या सदोष गटारांमुळें बिघडलेल्या हवेपेक्षां टेकडीच्या उतरणीवरची ही वस्ती चांगल्या हवेसाठीं व शहरी डॉक्टरांच्या सान्निध्यासाठीं आजारी लोक अधिक पसंत करीत. बुवांचे भक्त मित्र दत्तोपंत परांजपे कॉंट्रॅक्टर ह्यांनीं एक नवा बंगला तेथील आंबराईत बांधला होता. बुवांना ते आग्रहानें तिकडे राहायला घेऊन गेले.

बुवांच्या आजाराचें वृत्त त्यांच्या सर्व शिष्य व चाहात्या वर्गांत पसरलें. मुंबईचे पोस्टांतले बर्वे हे पुण्यास बुवांस वारंवार भेटून जात. त्यांनीं अनेकांस बुवांच्या आजाराबद्दल लिहिलें. त्यांनीं बुवांच्या आजारांत कुटुंबास मदत म्हणून दोनशें रुपये चार शिष्य मंडळींकडून जमवून पाठविले. शंकरबुवा अष्टेकर, शंकरभय्या, गणपतबुवा पाध्ये, आबासाहेब गोखले कॉंट्रॅक्टर, वगैरे बुवांच्या नित्य सहवासांतली मंडळी बहुधा रोज तासभर बुवांकडे येऊन बसत. बापूराव केतकर, पाटणकर, वगैरे शिष्यही रोजचे येणारे-जाणारे. बुवांच्या सासुरवाडची मंडळी, वगैरे आप्त अगदींच थोडे होते. पण बुवांनीं निर्माण केलेले आप्त अगणित होते.

बुवांचे भक्त व शिष्य श्री. पित्रे लिहितात, "डिसेंबरच्या सुमारास मी त्यांची प्रकृति पाहाण्यासाठीं पुण्यास गेलों. मी संध्याकाळीं ४।५ च्या सुमारास त्यांच्याकडे गेलों. त्या वेळीं रा. शंकरभय्या तेथें होते. मी जातांक्षणींच त्यांच्या कुटुंबाचे डोळे अश्रूंनीं भरून आले व त्यांचा चेहरा एकदम उतरला. तें दृश्य अवलोकून मलाही कसेंसेंच वाटलें. मी त्यांच्या निजण्याच्या पलंगडीजवळ बसलों व कांहीं वेळानें गुरुवर्य बुवा आंतल्या खोलींतून हळूहळू आले व गादीवर बसले. झालेल्या श्रमानें त्यांना दम लागून कांहीं वेळ बोलवेना. त्या वेळची त्यांची कृश होत चाललेली व वाळलेली गात्रयष्टि पाहून, माझे डोळे एकदम पाण्यानें भरून आले व अश्रु

आवरेनात. बुवांच्या नजरेस ते येऊं नयेत, म्हणून मी लगेच बाहेर जाऊन, डोळे, वगैरे पुसून, जराशानें परत त्यांच्याजवळ येऊन बसलों. त्या प्रसंगीं बुवांनाही काय वाटलें कोण जाणे; त्यांचें हृदयही भडभडून आलें होतें. नंतर त्यांनीं पहिल्यापासून, नाटकांतील कै. भाऊराव व त्यांचे बंधु अप्पारावजी कोल्हटकर, बडोद्यांतील गायन क्लास, वगैरे गोष्टींपासून सुरुवात करून पुष्कळच हकिकती सांगितल्या व शेवटीं गहिंवरून म्हणाले, 'मला पुष्कळ वेळां माझी स्नेही मंडळी व हितचिंतक म्हणत, बुवा, तुम्ही चार-साडेचार पट्टी लावून तासचे तास जोर-जोराने गाणं म्हणतां, त्यामुळें तुम्हांला पुढें त्रास होईल. तरी खालची पट्टी धरीत जा. मला त्या वेळीं त्यांचं बोलणं कसंसंच वाटे, पण त्यांत बराच अर्थ होता, असं आतां मला भासूं लागलं आहे; पण मैफलींत, चढाओढींत जर तशा उंच पट्टींत गायचं नाहीं तर केव्हां ? तें कांहीं नव्हे ! लहानपणापासून बसलेली पट्टी कशी बदलतां येणार ? बरं, ह्या सर्व गोष्टी राहूं द्यात. आमच्या घरची मंडळी माझ्याविषयीं दुःखीकष्टी होऊन काळजी करीत बसतात, ह्याला काय म्हणावं ? मी आतांच कुठें थोडासा गाऊं लागलों आहें. माझी तर अशी खात्री आहे, कीं मी ह्या दुखण्यांतून लवकरच बरा होईन व आणखी १०-१२ वर्षे तरी निदान जगून, गुरूंच्या कृपेनें असा गाईन, कीं सर्वांना माझी कांहींतरी आठवण राहील. माझी ही गाण्याची हौस कांहींतरी पुरी होईल.' अशा एक-दोन गोष्टी बोलून दमल्यामुळें ते अंथरुणावर हळूच लवंडले. तें त्यांचें माझ्याशीं अखेरचेंच बोलणें. हें अद्याप माझ्या डोक्यांत घोटाळत आहे. त्यांची ती झिजलेली गात्रयष्टि डोळ्यांसमोर दिसत आहे.

"त्या पर्निशिअस ॲनिमियानें अशा गुणी रत्नाला झिजवून त्याला नष्ट करावें, ही किती शोचनीय मानवी परतंत्रता ! गुरुवर्य बुवांची काय ही गायनविद्येची असामान्य आवड, ध्येयनिष्ठा व कलेच्या उत्कर्षाविषयीं ध्यास ! मोठ्यांचें सर्वच मोठें म्हणतात, तें खोटें नाहीं. मला त्यांचा तो विलक्षण आशावाद व विद्येविषयीं उत्कंठा पाहून जितकें कौतुक वाटलें, तितकीच ह्या सर्व गोष्टी फक्त आशेंतच व कल्पनेंतच राहाणार अशी निराशा वाटून, अंतरांत कालवाकालव झाली. हे थोर कलावान् व गुरुवर्य पुन्हा भेटतात

कीं नाहीं, ह्याबद्दल मनांत भयंकर शंका उद्भवून मीं अगदीं जड पावलांनीं त्यांचा निरोप घेतला. तो दर्शनाचा शेवटचाच योग घडला ! ! ”

पित्रे वकिलांप्रमाणेंच बालगंधर्व व कृष्णा मास्तर भेटून गेले. ‘ गंधर्व कंपनी ’ तेव्हां मुंबईस होती. त्या वर्षीच्या वर्षप्रतिपदेपर्यंत बुवांची आशावादी वृत्ति टिकून होती. स्वतःच्या आजारामुळें पाडव्याच्या दिवशीं कांहीं गोड-धोड करण्याचें घरच्या मंडळींच्या मनांत नाहीं, हें कळतांच बुवा कुटुंबास म्हणाले, “ अग, सण माझ्याकरतां का करायचा आहे ? ह्या पोरांच्यासाठींच सण करायचा. ” असें म्हणून अष्टेकरबुवांच्या जांवयाला गांवांत दूध आणायला पाठवून, त्यांनीं मुलांसाठीं बासुंदी-पुरी करविली.

बुवांच्या जीवनांतला तो शेवटचा पाडवा ठरला. बुवांच्या तीन मुली लहान होत्या. बुवा त्यांचे अतोनात लाड करीत. प्रमिला सर्वांत लहान. ती बुवांच्या पानांत जेवे. अगदीं दूध पिण्याच्या अवस्थेपासून पमा बुवांच्या जेवणाच्या वेळीं त्यांच्या हातानें दूध प्यायची. मुली पानांतलें तूप खाऊन टाकीत. बुवांना विलक्षण आनंद होई. शांता पहिली इयत्ता पास होऊन परीक्षेंत पहिली आली. बुवांनीं तिला सोन्याचा घड्याळाचा शेडा गळ्यांत घालायला दिला. ते मुलींना गाणें शिकण्यासाठीं उत्तेजन देत. घरीं रोज शिष्यांच्या तालमी ऐकून मुली कित्येक चिजा म्हणत. पण बुवांच्या समोर म्हणायला त्यांना लाज वाटे. घरीं बुवा नाहींत असें पाहून मुली गात. बुवांना मुलींचें गाणें ऐकून अतिशय आनंद वाटे. बुवांना एकच मुलगा झाला, पण तो त्यांना लाभला नाहीं. थोरली मुलगी लग्नानंतर १६–१७ वर्षांची असतांनाच १९२० सालीं देवाघरीं गेली. येसू, शांता व पमा ह्या तीन लहान मुली व पत्नी एवढेंच आतां छोटेंसें कुटुंब उरलें होतें. साताऱ्याहून सासू-सासरे आले. शंकरबुवा अष्टेकरांनीं सख्ख्या भावाचा अधिकार एक तपापेक्षां अधिक सेवेनें प्रस्थापित केला होता. गाण्याच्या दुनियेंत बुवांवर अमर्याद प्रेम करणारी जनता शेकड्यांनीं मोजण्याइतकी होती. बुवांचे ते एक प्रकारें आप्तच होते. हे आप्त पंजाब, सिंध, महाराष्ट्र व भारताच्या अनेक भागांत पसरले होते. आतां बुवांना ह्या सर्व आप्त भक्तजनांतून, संगीतविश्वांतून चिरशांतीकडे खेचून नेण्यास काळ आला

होता. एप्रिल १९२२ च्या सुमारास बुवांना आतां आपण ह्या आजारांतून उठत नाहीं, असें स्पष्ट समजून आलें होतें. त्यांच्या चाणाक्ष नजरेला, डॉक्टर, कुटुंबीय व मित्र ह्यांच्या चेहऱ्यांवर व वर्तनांत जें नैराश्य दिसे, त्याचा अर्थ समजला होता.

अगदीं ह्या शेवटच्या चार-दोन दिवसांत ते सर्वांशीं निरोपाचें, निरवा-निरवीचें बोलूं लागले. नारायण व मास्तरना त्यांनीं "एकजुटीनें राहा, यशस्वी व्हा –" असें म्हटलें. 'गोपाळ गायन समाजा'चे प्रिन्सिपल गोविंदराव देसाई ह्यांचा निरोप घेतांना बुवांनीं म्हटलें, "असंख्य लोक ज्या मार्गानें गेले, त्याच मार्गानें मी जाणार, हें मला समजलं आहे. संगीत-विद्येची व्हावी तशी सेवा माझ्या हातून झाली नाहीं, एवढाच हेतु राहिला आहे. परमेश्वरकृपेनें तो हेतु पूर्ण झाला असता, तर संतोषानें गेलों असतों. पण तसं झालं नाहीं." गोविंदराव देसाई ह्यांनीं लिहिलें आहे, "ज्यांचें गायन ऐकून, घमेंड, दुष्टपणा, हेवा, ईर्षा, निंदा, इत्यादि विकार नाहींसे होत असत, त्यांनीं 'माझ्या हातून संगीत-विद्येची सेवा झाली नाहीं–' म्हणावें ह्यावरून ह्या व्यक्तीची योग्यता केवढी होती हें वाचकांना सहज समजून येईल."

बुवांनीं ८ एप्रिल, १९२२ रोजीं सायंकाळीं ४ वाजतां इहलोक सोडला. भारतांतील 'संगीत-भास्कर' अस्तास गेला. बुवांचे आप्त, शिष्य, चाहाते, वगैरे जवळ-जवळ शें-सवाशें लोक स्मशान-यात्रेस गेले होते. रात्रीं दहा वाजतां मंडळी परत आली.

दोन दिवसांनीं पुण्यास व नंतर मुंबईस शोकसभा झाल्या. पुण्याच्या शोकसभेंत तात्यासाहेब केळकर, 'पुणें गायन समाजा'चे सेक्रेटरी साने, सरदार मुजुमदार, श्रीगोंदेकर, वगैरे मंडळींनीं व मुंबईच्या शोकसभेंत 'संदेश'कार कोल्हटकर आदि मंडळींनीं श्रद्धांजलि वाहिली. गणपतराव मणेरीकर, शिल्पकार फडके, पुरोहित, वगैरे मंडळींनीं आदरांजलि वाहिली. बुवा आतां अमर लोकांत कायम राहायला गेले होते.

प्रकरण चोविसावें

# उपसंहार

भास्करबुवा बखले ह्यांचें चरित्र हें एका थोर आदर्श कलावन्ताचें चरित्र आहे. महाराष्ट्रांत ज्या कांहीं सुप्त शक्ति आहेत, त्यांपैकीं कला-कौशल्य संपादन करण्यासाठीं अपरिमित कष्ट करण्याची हौस ही एक प्रमुख शक्ति आहे. विद्या व कलांच्या उपासकांना दिवसाचे बारा तास कष्ट करूनही जगतां येईलच अशी निश्चित अर्थव्यवस्था आपल्या देशांत नाहीं. तरीही मराठी माणसांत एक वर्ग जात्याच कलासक्त आहे. त्याला आर्थिक अडचणीचें भय वाटत नाहीं. आतां जुनीं गुरुकुलें, अग्रहार, माधुकरी, वगैरे सर्वच आधार नष्ट होऊन विद्यार्थी निराधार झाला आहे.

बाळकृष्णबुवा, रहिमतखां, भास्करबुवा, अबदुलकरीमखां, रामकृष्णबुवा वझे हे कला-महर्षि देवलोकीं गेले. त्यांच्यापेक्षां जरा कमी दर्जाचे ह्या महर्षींचे शिष्यही मरण पावले असून, आतां भास्करबुवा कसे गात होते ह्याची कल्पना देण्यासारखें उच्च दर्जाचें संगीतच कोठें उपलब्ध नाहीं.

अब्दुलकरीमखां ह्यांच्या मधुर गायनाचा फक्त अल्पांश आतां ग्रामोफोन रेकॉर्ड्स्च्या रूपानें ऐकायला मिळतो.

पण विविध नव्या-नव्या आलापांनीं प्रेक्षकांचें मन अखंड गुंगवून टाकण्याचें भास्करबुवांचें तास दीड तास केवळ अस्ताईची उभारणी करण्याचें सामर्थ्य आतां कोठेंही दिसत नाहीं. आजच्या सर्वोत्तम गाणाराचें गाणें तासा दोन तासांत त्याच-त्याच प्रकारच्या आलापांनीं व तानांनीं केवळ कंटाळवाणेंच नव्हे तर असह्य होऊं लागलें आहे.

भास्करबुवांची मैफल रात्रीं साडेनऊ ते पहाटे पांच-साडेपांचपर्यंत चाले. श्रोते अतृप्त असत. पुन्हा दोन-चार दिवसांत दुसरी मैफल ऐकायला केव्हां मिळते, ह्याची श्रोते आतुरतेनें वाट पाहात. बुवांच्या गाण्यांत कोणत्याच आकर्षक वा मोहक लकबी नव्हत्या. त्यांच्या गाण्यांत जी एक सर्वांगीण परिपूर्णता होती, तिची नक्कल होणेंच शक्य नाहीं. स्वर, लय, चिजेची बांधणी, गायनांतील सर्व लहानमोठ्या अलंकारांची बांधणींत योजना, अनंत नव्या रसयुक्त आलापांची व लयीच्या डौलांची किमया, ती प्रतिभा, ती कल्पनेची झेंप, पांच-चार वर्षांच्या गुरुसेवेनें कोणालाच हस्तगत करण्याइतकी सोपी नव्हती. तें गाणें नीटपणें ऐकायला व समजायलाच निदान एक तपाचें शिक्षण व तीन तपांची चिंतनयुक्त अभ्यासयुक्त अनुभविक प्रगल्भता अवश्य असे. लोकमान्य टिळक, डॉ. भांडारकर, डॉ. केतकर, इतिहासाचार्य राजवाडे, वगैरे विद्वानांच्या कर्तृत्वाचें यथार्थ आकलन होण्यास जी विद्वत्तापूर्ण प्रगल्भता व रसिकता हवी, तोच प्रकार अलादियाखां, भास्करबुवा व वझेबुवा ह्या ‘ अवघडदासां ’ च्या गाण्याचें यथार्थ आकलन होण्यास अवश्य असे.

आज संगीत-क्षेत्रांत एवढी ओसाडी उत्पन्न झाली आहे, कीं एखाद्या रागाची व तालाची बांधणी संभाळून कोणी अर्धा तास गायलें, तर गंगेंत घोडें न्हालें असें कलावंत व श्रोता मानतो. सुरेलपणाला इतकें ठोकळ स्वरूप आलें आहे, कीं किराणा घराण्याचा किंवा एखादा मुसलमान गायक जरा सुरेल नरम स्वरोच्चार करील, तर श्रोता आश्चर्यानें, कौतुकानें भांबावून जातो. बँडच्या ढोलाची लय गाण्यांत दिसली, तर सभा हुरळून जाते. घोकंपट्टी करून तयार केलेल्या ताना संपून गवई समेपर्यंत आला म्हणजे ‘ वाहवा ’

देणारांना हर्षातिरेक होतो. उत्तम सुरेल आलापांनीं व्हायोलिन, सतार, वगैरे वाद्यें वाजविणारा चीज सुरू करून रागाची बंदिष वाजवूं लागला, तर त्याचें लक्ष स्वरावरून उडून तबलजीच्या बंधनांत अडकतें. त्याच्या वादनाचा स्वैर विहार विराम पावतो. सर्वत्र एकच गोष्ट ठळकपणें जाणवते, ती म्हणजे अभ्यासाचा, रियाजाचा अभाव.

ह्यांत कलावंतांना दोष देण्याचा हेतु नाहीं. हें कालमाहात्म्य आहे. देश स्वतंत्र झाला, आतां सांस्कृतिक कार्य करणाराच्या जीवनाच्या सर्व वाटा बंद करण्यांत येत आहेत. सरकार विद्वान् कलावंतांना काम देऊं शकत नाहीं, समाजाला तर जरूरच नाहीं. आतां लोकशाहीचें खुशामतीचें रंजन करून जगावें, सरकार क्वचित् थोडी भीक देतें ती वशिले लावून मिळवावी, एवढाच वाव सांस्कृतिक कार्यकर्त्यांस उरला आहे. विद्या आणि कलांचा उपासक विलासांची अपेक्षा करीत नाहीं, जगायची इच्छा धरतो. सुदृढ शरिरानें व मनानें तो जगूं इच्छितो. पण तशी त्याची ती अपेक्षा कोणालाच न्याय्य आहे, असें वाटत नाहीं. बालपणापासून आमरण अभ्यासांत रमावें, तेव्हां विद्या व कला ह्यांत थोडें प्रावीण्य व यश मिळतें. आयुष्याच्या अखेरीस प्रगल्भ व्यापक दृष्टि येते. विद्या व कलांतील कर्तृत्वाला तेज येतें. पण ह्या विद्यानिष्ठ जीवनाला पोषक असे व्यवसाय फारच थोड्या लोकांना उपलब्ध होतात. व्यवसाय बहुधा विद्यानिष्ठा खाऊन टाकतो, कलादृष्टि बोथट बनवतो. अभ्यासाला, रियाजाला सवडच उरत नाहीं. अर्धवट शिकलेले व त्याहून जरा अधिक शिकलेले लोक शाळा काढतात आणि हळूहळू शिक्षकाची विद्या व कला विद्यार्थ्यांच्या पातळीवर येऊन स्थिरावते.

भास्करबुवा गेले; त्यांच्याबरोबर त्यांची सर्व विद्या गेली, सर्व कला गेली. त्या नाद-लहरी फक्त त्यांच्या श्रोत्यांच्या मनांत अजून आठवणींच्या रूपानें रेंगाळत आहेत. गेल्या पिढ्यांतील चित्रकार गेले, त्यांच्या चित्रांचा कोणीं संग्रह केला नाहीं. त्या जुन्या अभ्यासी चित्रकारांबरोबर त्यांचें रेषाप्रभुत्व, प्रकाशनियमनशास्त्र, गेलें. आतां दोन महायुद्धांनीं निर्माण केलेल्या युरोपियन कलेची – त्या असंबद्धतेची भ्रष्ट नक्कल हाच असंस्कृत, अडाणी

कलापेशांतल्या लोकांचा मोक्ष ठरला आहे. औद्योगिक व व्यापारी उपयोगाची कला निदान क्वचित् आकर्षक स्वरूपांत प्रकट होते.

युरोपियन महायुद्धांनीं युरोपियन कलेंत जी विकृति आली, त्या विकृतीच्या जोडीला नवीन प्रगमनशील विचार व क्रियाशीलतेची जोड आहे. नाटक, संगीत, वाङ्मय, चित्र, शिल्प, वगैरे सर्व क्षेत्रांत जी विकृति युरोपांत उत्पन्न झाली, जुन्या निष्ठांचा नाश करण्याची उत्कट इच्छा बळावली, त्या वृत्तींत युरोपियन संगीतांतील विसंवाद होता. असंबद्ध भाषा, असंबद्ध लेखन ह्यांतून नव्या युगाचें नवें सत्य शोधण्याची शक्ति युरोपियन कलेंत आतां दिसूं लागली आहे. कारण त्यांच्या सर्व कला जीवननिष्ठ आहेत. व्यक्ति आणि समाज, व्यक्ति आणि यंत्र, व्यक्ति आणि शिस्त, व्यक्ति आणि निसर्ग, ह्या सर्व द्वंद्वांचें स्वरूप समजून घेण्याचा प्रयत्न जर्मन नाटककारांनीं, कथा-लेखकांनीं केला. नवीनच व्यक्तित्व प्रस्थापित करूं पाहाणाऱ्या अमेरिकन लेखकांनीं ह्या जर्मन चळवळींत प्रभावी कार्य केलें. असंबद्धता, गूढ सौंदर्याचा शोध, वगैरे अनेक नवे उपक्रम कलाक्षेत्रांत युरोप-अमेरिकेंत दिसले. मोर नाचतो म्हणून लांडोर नाचते, तसे भारतीय कलावंत पण त्या लयशून्य असंबद्ध नकलेच्या नाचांत रमले. त्यांना ना स्वतःचें जीवन, ना जीवननिष्ठा, ना कलातंत्र-निष्ठा. ‘प्रयोगशील आविष्कार-स्वातंत्र्या’ची निरर्थक नौबत आधुनिक भारतीय कलावंत वाजवीत आहेत. कला प्रभावी होण्यास ती अत्यंत उग्रतेनें अंतर्मुख असावी लागते. ह्या अंतर्मुख दृष्टींत सर्व आत्मिक बळाचा वापर करण्याची शक्ति असते. आपापल्या कलात्मसाधनांनीं व तंत्र-प्रभुत्वानें आपल्या सौंदर्यदृष्टीचा ठाव कलावंत घेतो. जीवनाशीं संवाद साधला तर ही सौंदर्यदृष्टि क्रियाशील होते. आज भारतांत जीं मोठीं परिवर्तनें सर्व क्षेत्रांत होत आहेत, त्यांना स्थिर वैभवसंपन्न अवस्था जेव्हां येईल, तेव्हां पुन्हा खास भारतीय कला जन्माला येईल. पुन्हा भास्करबुवा जन्म घेतील.

परिशिष्ट पहिलें

# थोरांचे उद्गार

बुवासाहेबांच्या हयातींत त्यांच्याशीं प्रत्यक्ष सहवास व परिचय लाभलेल्या अनेक मंडळींनीं लेखरूपानें व आठवणींच्या रूपानें जे उद्गार लिहून ठेविले, ते बुवांच्या मृत्यूनंतर अनेक वर्षांनीं जुने हेवे-दावे, राग-लोभ निवाल्यानंतर लिहिलेले असल्यामुळें ते सत्यस्थिति वर्णन करणारे आहेत. बुवांचा स्वभाव, त्यांच्या गायनाचा प्रभाव, वगैरे सर्व बाबतींत जाणत्या व कित्येक अधिकारी लोकांनीं जे उद्गार लिहिले, ते चरित्रांत बहुमोल भर टाकणारे ठरतील अशी खात्री वाटते. बुवांच्या मृत्यूनंतर वीस वर्षांनीं आठवणी लिहिणाऱ्या मंडळींनीं कधीं तारखा चुकीच्या लिहिल्या असल्या, इतरही तपशील क्वचित् चुकीचा लिहिला असला, तरी दीर्घ काळ सहवासानें जो ठसा मित्रांच्या, शिष्यांच्या मनावर उमटला त्याचा भावार्थ पूर्णतया खरा आहे. ह्या उद्गारांतून बुवांचें व्यक्तित्व स्पष्ट डोळ्यांपुढें उभें राहातें.

ज्या मंडळींचा संगीत विषयांत बोलण्याचा अधिकार, त्यांनीं बुवांच्या गायनाविषयीं काढलेले उद्गार बुवांच्या गायनांतील सौंदर्य व त्याच्या अजोड

दर्जाची स्पष्ट कल्पना देतात. येथें अनेक लेखांचा अगदीं थोडक्यांत सारांश दिला आहे.

**प्रा. नारायण सीताराम फडके,** 'कोंदणें' ह्या पुस्तकांतील 'महाराष्ट्रांतलें संगीत' ह्या लेखांतील उतारे — "इनायत हुसेन ह्यांच्या जागीं नोकरी मिळविण्याचा नथ्थनखां ह्यांचा प्रयत्न. त्यामुळें ते बडोद्यास गेले. त्यांचा मुक्काम बडोद्याला होता, तेवढ्या अवधींत भास्कररावांस त्यांचा बराच फायदा झाला. फैजमहंमद ह्यांची भास्कररावांवर फार मर्जी होती व नथ्थनखां ह्यांस त्यांनीं मुद्दाम शिफारस करून सांगितलें, कीं 'तुम्ही भास्करला कांहीं सांगा.' ह्यामुळें नथ्थनखां बडोद्यास होते तेवढ्या अवधींत त्यांजकडून बरेच अस्ताई-अंतरे भास्करराव ह्यांस घेतां आले. पुढें भास्करराव ह्यांची स्वतःची तयारी चांगल्या प्रकारची झाल्यानंतर ते मुद्दाम म्हैसूरला जाऊन नथ्थनखां ह्यांच्याजवळ राहिले. फैजमहंमद व नथ्थनखां हे भास्कररावांचे दोन्ही गुरु हद्दूखांच्या परंपरेपैकींच. ... नथ्थनखां ह्यांच्या वृत्तींत लयीची मौज कांहीं विशेषच होती. ... श्री. भास्करबुवा बखले ह्यांनीं आपल्या अमदानींत महाराष्ट्र पुरा-पुरा आपलासा केला. ... बाळकृष्णबुवा व रहिमतखां ह्यांच्यापेक्षांही कांहीं निराळीच अशी एक रंगत भास्कररावांजवळ आहे. भास्कररावांचें गाणें त्यांच्या वयाबरोबर व कीर्तीबरोबर वाढतच गेलें व शेवटीं-शेवटीं तर त्यांनीं आपल्या गाण्याचें महाराष्ट्रासच नव्हे तर परप्रांतांसही वेड लावलें होतें. सिंध प्रांतांत शिकारपूर, पंजाबांत जालंदर, काश्मिरांत चंबा, दक्षिणेस म्हैसूर, अशा प्रकारें चारी दिशांच्या मुख्य-मुख्य शहरीं त्यांनीं आपल्या गाण्याचा झेंडा फडकवला होता. जालंदर येथें दरवर्षी जो गाण्याचा महोत्सव होतो, त्यांत तर भास्करराव ह्यांची कीर्ति इतकी झाली होती, कीं भास्करबुवा आले नाहींत, तर जलसा होणार नाहीं, असें तिकडचे लोक म्हणत. मैफल हमखास मारण्यास जे गुण अंगीं लागतात, ते भास्करराव ह्यांच्या ठिकाणीं होते, ह्यांत तिळमात्र शंका नाहीं. एक तर त्यांच्या आवाजींत ज्याला स्वाभाविक मिठेपणा म्हणतात तो नसला, तरी कमावलेली गोडी होती. त्यांच्या आवाजीचा धर्मही उंच असल्यामुळें, श्रोत्यांवर त्यांच्या गाण्याचा परिणाम चटकन् होत असे.

शिवाय त्यांच्या गाण्यांत त्यांनीं आपला म्हणून एक विशेष ढंग उत्पन्न केला होता. शब्दोच्चाराची ऐट, ताल-सुराचा मिलाफ, योग्य अभिनय, अस्ताई भरतांना प्रत्येक सूर पिळून लावण्याची त्यांची तरकीब, वगैरे अनेक गोष्टींमुळें त्यांची मैफल नेहमीं रंगत असे.... बुवांची गायकी जितकी गोड होती, तितकाच त्यांचा स्वभाव गोड होता व विद्येवर त्यांचें अमर्याद प्रेम होतें. ह्या दोन गुणांनीं त्यांनीं दुनिया जिंकली. कोणीही विनंती करतांच ते गात ! आपली विद्या आपल्याबरोबरच नष्ट व्हावी असा कुविचार त्यांच्या मनाला कधीं शिवला नाहीं. उलट शिष्य कंटाळा करीत. ... बाळकृष्णबुवांचा गाण्याचा थाट जुना व भास्कररावांच्या गायकींत नवाई फार. असा फरक कोणालाही चटकन् दिसून येत असे. सर्व प्रकारच्या लोकांना रंजविण्यास लागणाऱ्या अनेक कलाकुसरी त्यांच्या संग्रहीं होत्या व प्रसंग पडेल त्याप्रमाणें त्या प्रगट करण्याची चतुराईही त्यांच्या ठायीं होती. ... गुणग्राहकता व विद्येविषयींचा खरा-खुरा आदर अंगीं वसत होता. म्हणून अलादियांना गुरुसमान मानिलें. अलादिया त्यांना ‘ बेटा भास्कर ’ म्हणत. ....... शेवटीं-शेवटीं भास्कररावांच्या गाण्याला विलक्षणच भरतें आलें होतें व वीर लढतां-लढतां मरावा, त्याप्रमाणें ते गातां-गातां गुजरले हें एका दृष्टीनें बरेंच झालें. त्यांनीं आपल्या गाण्यानें अनेक नामदार मुसलमानी गवयांसही चकित केलें. ... एकदा मिरज येथें त्यांचें गाणें माडीवर चालू असतांना खालीं रहिमतखांची स्वारी ऐकत बसली होती. गाणें संपल्यावर त्यांनीं विचारलें, ‘ कोन गाते थे जी ? ’ ‘ पंडित भास्करराव. ’ म्हणून त्यांस उत्तर मिळाल्यावर ते म्हणाले, ‘ ये पंडत है ? ’ ‘ हां जी पंडित है. ’ त्यांना उत्तर मिळालें. ‘ नही नही, ये पंडतका गाना नही, ’ रहिमतखां त्यावर म्हणाले, ‘ ये हड्डी का गाना है. ’ मला वाटतें ‘ हड्डी का गाना ’ ह्या दोन शब्दांत रहिमतखांनीं भास्कररावांच्या गाण्याचें जें वर्णन केलें, तें अत्यंत मार्मिक होय. ... ‘ स्वयंवर ’ ... महाराष्ट्रीय रंगभूमीवरील संगीताची दिशाच एकदम बदलल्यासारखें झालें. ह्याचें श्रेय बालगंधर्वांच्या सुंदर पाक गळ्यास जितकें दिलें पाहिजे, त्याच्याहूनही अधिक भास्करराव ह्यांस दिलें पाहिजे. ...

महाराष्ट्रीय संगीताच्या क्षेत्रांत भास्कररावांची कामगिरी संस्मरणीय झाली, ह्यांत संशय नाहीं."

**प्रा. ना. सी. फडके,** 'मुजरे' ह्या पुस्तकांतील उतारे — "अलादियांना समुद्रकांठच्या हवेनें बरें वाटेल म्हणून ते भास्करबुवांकडे राहिले. 'इतके दिवस मी तुम्हांकडे राहिलों. पण तुम्ही एकदेखील चीज मागितली नाहीं हें कसें?' 'आपली निरपेक्ष सेवा करावी एवढाच हेतु आहे.' लवकरच ते त्यांना शिकवूं लागले. तबलजी जितका विद्वान् आणि ढंगदार असेल, तितकें त्यांना अधिक स्फुरण चढत असे. परंतु कोणत्याही तबलजीला त्यांचें एक सांगणें असे, कीं 'बाबा, जोंपर्यंत मी रागिणी भरतों आहें, मींड अंगानें तिचें रूप स्पष्ट करून सजवतों आहें, तोंपर्यंत सुंदर, स्पष्ट, सीधा ठेका चालूं दे. माझा पूर्वरंग आटोपला आणि मी तानफिरत व लयकारी सुरू केली, कीं मग कसब दाखवण्यासाठीं तुला किती वाजवायचं असेल तेवढं खुशाल वाजव.' तबलजीशीं लढाई देतांना भास्कररावांना अधिकच अवसान चढत असे आणि निष्णात तबलियाच्या बोलांना लपेटून त्यांची तानफिरत सुरू झाली, कीं मैफलीचा रंग उचंबळून येई. श्री. नांदिवडेकर, श्री. दादा लाड्ड, श्री. दत्तारामजी, श्री. शंकरभय्या असे एकाहून एक कसबी तबलिये त्यांची साथ करण्यास अतिशय उत्सुक असत. सहसा प्रचारांत नसलेले रागही लोकांना परिचित व्हावेत, असा भास्करबुवांनीं कटाक्षानें प्रयत्न केला. भास्करबुवांच्या गाण्यामुळें कितीतरी राग 'मुश्कील' ह्या सदरांतून 'मामुली' ह्या सदरांत येऊन पडले. ... श्यामकल्याण, खंबावती, दुर्गा, बिहागडा, काफी-कानडा, सुहा कानडा, गौरी, पटबिहाग, खोखर, सावनी, बिलासखानी तोडी, खट असे कितीतरी राग भास्करबुवांनीं वारंवार गाऊन 'मामुली' सदरांत आणून सोडले, ही त्यांची खास कामगिरी म्हणावी लागेल. ... नवे-नवे अपरिचित राग श्रोत्यांच्या परिचयाचे व्हावे, ह्यासाठीं भास्करबुवांनीं ते वरचेवर मैफलींत गाऊन तर दाखविलेच, परंतु खाडिलकरांच्या 'स्वयंवर' नाटकांतल्या पदांसाठीं सूरदासी मल्हार, वृंदावनी सारंग, अशांसारख्या अपरिचित रागिणी त्यांनीं मुद्दाम निवडल्या. मूळ चिजा आणि पदें ह्या दोहोंचीही यथेच्छ तालीम त्यांनीं बालगंधर्वांना दिली आणि हीं सर्व पदें

रंजकतेच्या दृष्टीनें यशस्वी करून दाखविलीं. ‘स्वयंवर’ नाटकाला भरगच्च मैफलीचें स्वरूप आलें, आणि तें नाटक संगीत-षौकिनांचें सर्वांत प्यारें नाटक ठरलें. ह्या गोष्टीचें फार मोठें श्रेय भास्कररावांकडे आहे. ... महाराष्ट्रीय श्रोत्यांची अभिरुचि अशा प्रकारें उंच आणि प्रगल्भ करण्याची जी क्रांति मराठी रंगभूमीनें केली तिच्या श्रेयाचा अर्धा वांटा जसा बालगंधर्वांच्या कंठमाधुर्याला द्यायला हवा, तसाच भास्करबुवांच्या योजनेला, हौसेला आणि परिश्रमांना द्यायलाच हवा. ... मैफलीसाठीं सजविलेल्या हॉलमध्यें श्रोत्यांची दाटी झालेली आहे, श्रोत्यांमध्यें अग्रभागीं गाण्या-वाजवण्यांतील जाणकार मंडळी बसलेली आहेत, षोकीन माणसें आहेत, केवळ संगीताच्या प्रेमानें आकर्षित झालेली मंडळी आहेत, .... मुख्य बैठकीवर दत्तारामजी नांवाचे सुप्रसिद्ध तबलिये साज जुळवून, आपल्या मलमलीच्या सदऱ्याच्या बाह्या सरसावून तयार आहेत, दुसऱ्या बाजूला किडकिडीत अंगाचे, चष्मा लावलेले, निष्णात आणि प्रख्यात पेटीवादनकार गुंडोपंत वालावलकर बसलेले आहेत, अत्यंत सुंदर जुळवलेल्या दोन तंबोऱ्यांपैकीं एक तंबोरा मास्तर कृष्णराव छेडीत आहेत, अंगांत अलपाकचा लांब कोट, खांद्यावर आडवें टाकलेलें जरीकांठी उपरणें, डोक्याला ऐटबाज जरीकांठी रुमाल, रुंद कपाळावर मधोमध कोरलेलें गंध, कांहींशा झुबकेदार मिशा, अशा थाटांत मध्यम उंचीचे, मध्यम वर्णाचे, तेजःपुंज भास्करबुवा बखले गायनासाठीं आसन घालून बसले असून, हास्यवदनानें श्रोत्यांकडे बघत आहेत! दुसऱ्याच क्षणीं दत्तारामजींना इशारा करून भास्करबुवा ‘भूप’ रागांतला ख्याल सुरू करतात. ‘अब मानले!’ अस्ताईच्या स्वरांनीं वातावरण भरून जातें. गंभीर मधुर स्वरांचें छत पसरतें. समेची जागा आल्यावर पुढें बसलेले जाणकार माना डोलवतात. ‘वाहवा! वाहवा!’ असे उद्गार सभेतून निघतात. ... ते नेहमीं म्हणत असत, कीं ‘माझ्याजवळ जें गाणें आहे, त्याच्या बळावर मी साऱ्या संकटांतून पार पडेन.’ ह्या दृढ विश्वासामुळें त्यांच्या करारी व तेजस्वी चेहऱ्यावरचें हास्य कधीं मावळलें नाहीं. .... ‘स्वयंवर’ नाटकांत ‘कवाली’ ढंग अजिबाद मागें पडून ‘ख्याल’ गायकीचा अनिर्बंध विलास दिसला. ह्या नाटकांत भास्करराव बखल्यांच्या

कृपेनें नारायणराव गवय्ये बनले आणि आपल्या अपूर्व मैफली गाण्यानें त्यांनीं लोकांना अक्षरशः वेड लावलें. नारायणरावांनीं तीन लाखांहून अधिक रक्कम सव्याज कर्जफेड म्हणून दिली, ती मुख्यतः 'स्वयंवर' नाटकांतील मैफली गाणें गाऊन. ह्या नाटकाचें सरासरी उत्पन्न दीड हजार रुपये होतें. ... गोविंदराव टेंबे आणि भास्करबुवा बखले ह्यांच्या मार्गदर्शनानें त्यांच्या गायनाला एक नवीनच दिशा लागली. ... जाणते लोक असें सांगतात, कीं नथ्थनखांच्या निधनानंतर त्यांचें गाणें ऐकायला मिळालें, तें अबदुल्ला आणि भास्करराव ह्या दोघांकडूनच. दुसऱ्या कलावंतांच्या गुणांचें कौतुक करण्यांत भास्करराव अत्यंत उदार होते. अबदुल्लांना जालंदरच्या जलशांत गायला नेलें भास्कररावांनींच. तिकडल्या लोकांकडून वझेबुवांचा मान-सन्मान करविला भास्कररावांनींच. दुसरा चढला तर आपण पडूं, असें भय भास्कररावांना कधींच वाटलें नाहीं. कारण स्वतःच्या कलागुणांबद्दल त्यांना जबर आत्मविश्वास होता. .... आपला अंतकाळ जवळ आला हें जाणून नथ्थनखांनीं आपल्या मुलांना व भास्करबुवांना जवळ बोलावून म्हटलें, 'मला तीन मुलगे नव्हेत, तर चार मुलगे आहेत, असं मी समजतों.' मग महंमदखां व अबदुल्लाखां ह्यांजकडे वळून ते म्हणाले, 'माझा सर्वांत मोठा मुलगा कोण, तर हा भास्कर. तुम्ही त्याला थोरल्या भावासारखं मानावं, अशी माझी इच्छा आहे.' नथ्थनखांचीं मुलें भास्कररावांना 'बडे भय्या' म्हणून हाक मारीत. भास्कररावांच्या पत्नीला ते 'भाभी' म्हणत आणि त्यांना भास्कररावांविषयीं कमालीचा आदर होता."

रसिकाग्रणी, महान् पेटीवादक, लेखक, नाटककार गोविंदराव टेंबे ह्यांची सौंदर्यदृष्टि अचूक, मार्मिक असे. बुवांजवळ ते कधींच शिकले नाहींत, तरी त्यांनीं बुवांचें गायन चिकित्सक अभ्यासी नजरेनें न्याहाळलें, हें ह्या लेखांत प्रकर्षानें दिसतें. बुवांना ते गुरुस्थानीं मानीत.

**गोविंदराव टेंबे**, ('भास्करबुवा बखले', 'रत्नाकर', जून, १९२७) — "...... गुरुवर्य भास्करराव गंधर्वलोकीं गेले आणि त्यांची स्वरगंगाही त्यांच्याबरोबरच स्वर्गवासी झाली. ... भास्करराव ह्यांचें गायन म्हणजे एक काव्य होतें. ... भास्कररावांच्या गायनांतील प्रचंड स्वर-विस्ताराच्या प्रत्येक

कणामध्यें विलक्षण जिवंतपणा दिसून येत असे. जिवंतपणाच्या पोटीं प्रकाश आणि प्रकाशाच्या पोटीं सौंदर्य अशी परंपरा आहे. ..... स्वरांचा जिवंतपणा, रागाचा सच्चेपणा व तालाचें लालित्य हे तिन्ही गुण सारख्या उत्कर्षाला पोंचलेले गुरुवर्य भास्कररावांप्रमाणें क्वचित्च इतर गायकांच्या अंगीं दिसून येत असत. निश्चित स्थान, इच्छित काळपर्यंत स्थैर्य, रागरचनेंतील स्वतःचा दर्जा, सुसंगतपणा, वगैरे सर्व गुणांची स्थापना रागांतील प्रत्येक स्वराच्या ठिकाणीं करून त्यांचा सांभाळ व उत्कर्ष योग्य प्रमाणांत करण्याची कला, गुरुवर्य भास्करराव ह्यांना बेमालूम साधली होती. अशा गुणमंडित जिवंत स्वरांनीं आळविलेल्या राग-रागिणी किती हृदयंगम होत असतील, ह्याचें वर्णन ज्याप्रमाणें शब्दांनीं करणें अशक्य आहे, त्याचप्रमाणें स्वरांना जिवंत ठेवण्याची ही संजीवनी विद्या हस्तगत करण्याचें कर्म किती कठीण आहे, ह्याचीही कल्पना करणें अशक्य आहे. ...... गुरुवर्य भास्करराव हे केवळ एखाद्या घराण्याची अंध परंपरा राखणारे गवई नव्हते — ते डोळस व चौकस गवई होते. त्यांनीं गायनाचें एक नवीन सर्वांगसुंदर व तेजस्वी घराणें निर्माण केलें. सबंध शतकांत असा एखादा पुरुष निर्माण होतो, असें त्यांच्याविषयीं कोणींही म्हणावें, एवढी त्यांची थोरवी होती. ... समान भासणाऱ्या रागलक्षणांचा भिन्नपणा गुरुवर्य भास्करराव इतका स्पष्ट दाखवीत, कीं श्रोत्यांना त्याविषयीं यत्किंचितही शंका राहात नसे. ही कला त्यांना मुख्यत्वें प्रो. अल्लादियाखां ह्यांच्याकडून मिळाली. ... अशा रीतीचीं बिकट भेद-लक्षणें संभाळून अनेक नवे-नवे राग विस्तारानें गाऊन ते लोकप्रिय करण्याचें सामर्थ्य गुरुवर्य भास्करराव ह्यांच्याइतकें फार थोड्या गवयांच्या ठिकाणीं दिसून येतें. स्वरांचा जिवंतपणा राखण्यांत व रागाची सूक्ष्म छाननी करण्यांत गुरुवर्य भास्करराव ह्यांची योग्यता फार मोठी होती. ..... त्यांच्याइतका वर्णोच्चाराचा स्पष्टपणा व रेखीवपणा चुकून एखाद्यामध्यें दिसून येत असे. तेजस्वी रेखीव वर्णांना जिवंत स्वरांचा राग-रक्तिमा चढवून, बांधणीचें कौशल्य वाढवून व त्यांनीं शक्य तर काव्यार्थ-भावानें वेळो-वेळीं सुवासित करून, गुरुवर्य भास्करबुवा ज्या वेळीं एखाद्या चीजेची प्रमाणबद्ध सुंदर मांडणी करीत, त्या वेळीं

मंदारकुसुमाभरणांनीं नटलेल्या स्वर्गांगनेचें ललितनृत्य आपल्यापुढें चाललें आहे कीं काय, असा मोह श्रोतृवृंदाला पडत असे, ह्यांत नवल नाहीं. जिवंत स्वरालापाची जादू बडोद्याचे पै. वा. फैजमहंमदखां गवई ह्यांच्याकडून त्यांनीं पैदा केली. त्याचप्रमाणें भावपूर्ण स्वरोच्चाराचा व तालबद्ध चीज मांडण्याचा मोहिनीमंत्र भास्कररावांनीं म्हैसूर दरबारचे मरहूम नथ्थनखां ह्यांच्याकडून प्राप्त करून घेतला. ... चिजेच्या अंगभूत असलेल्या विशिष्ट शोभेच्या जागा भास्करराव इतक्या मार्मिकपणें व सफाईनें दाखवीत, कीं तीच चीज इतरांच्या तोंडून ऐकली असतां चकाकणाऱ्या हिरकणीपुढें मातीच्या ढेकळाप्रमाणें निःसत्त्व दिसत असे. ... चीजेचा, आलापाचा किंवा तानेचा प्रत्येक भाग, त्या-त्या तालविभागांशीं संलग्न झालेला. ..... भास्कररावांच्या गायनांत हा तालाचा अंतरपाट स्वरांच्या रेशमी रजईला इतक्या बेमालूमपणें जोडला जात असे, कीं एखादा शेवट पुढें-मागें झालेला, किंवा कोठेंही एखादी चुणी अगर सुरकुती केव्हांही दिसून येत नसे. आणि खरी तालबद्धता ती हीच. त्यांनीं गळ्याची कल्पनातीत तयारी केली, तरी त्या तयारीला आपल्या काबूच्या बाहेर कधींच जाऊं दिलें नाहीं. त्यांची तान अव्वलपासून अखेरपर्यंत निर्मळ आणि मोत्याच्या एकसराप्रमाणें समांतर स्वरांनीं खचलेली असे. त्यांत कोठेंही अस्पष्टपणा किंवा पुसटपणा दिसत नाहीं. तान कितीही तयार असली, तरी त्यांतील स्वरांचा भरदारपणा, जाडी व रसदारपणा आणि आवाजाची रुंदी कमी होत नाहीं. तानेंतील प्रत्येक दाणा तालविभागाच्या पकडींत बसलेला असतो; सप्तकांतील कोठल्याही स्थानावरून तान सुरू करायला, त्यांचा गळा समर्थ असतो. तानेच्या तयारींतदेखील ते रागाची छाया केव्हांही लोपूं देत नाहींत. आणि तानेवर त्यांचा इतका ताबा असतो, कीं इच्छित ठिकाणीं ती तान ते सहज सौंदर्यानें तोडूं शकतात, आणि वर्णाशीं किंवा दुसऱ्या तानेशीं जोडूं शकतात. इतक्या सर्व गुणांनीं युक्त व शाखेतून उपशाखा व त्यांतून पुन्हा फाटे फुटणाऱ्या भरदार वृक्षाची शोभा दाखविणारी तान त्यांच्या गळ्यांत असे. त्यांच्या तयारीची शोभा असामान्य दिसत असे, हें सांगायला नको. ... गुरुवर्य भास्करबुवा मैफलींत आपल्या स्थानावर विराजमान झाले, म्हणजे पराक्रमानें पूर्वींच वश करून

घेतलेल्या राजकन्येच्या स्वयंवर-मंडपांत बसलेल्या विजयी वीराप्रमाणें त्यांची मुद्रा खुललेली दिसे. ... स्वतःचा उल्हास गायक श्रोत्यांवर पसरतो आणि श्रोत्यांचा उल्हास म्हणजे रंगदेवतेचा प्रसाद ; हा प्रसाद भास्कररावांना अखंड मिळत असे. ... अनेक वेळां टाळ्यांच्या गजरांत त्यांची चीज सुरू होई, इतका श्रोत्यांच्या हृदयाचा ठाव त्यांना सापडत असे. असा अष्टपैलू गुणमंडित गायक शतकामध्यें एखादाच निर्माण होतो. खऱ्या कलासंपन्न गुणीजनांच्या योग्यतेचें मर्म आपल्या अल्पबुद्धीप्रमाणें व भक्तिभावानें जनतेपुढें मांडून खऱ्या कलेकडे तिचें लक्ष वेधावें, ह्या हेतूनें केलेलें हें गुरुमाऊलीचें गुणगान तिच्या चरणीं अर्पण असो."

**गोविंदराव टेंबे**, 'जीवन व्यासंग' — "ख्याल-गायकीचीं रोपें दक्षिण महाराष्ट्रांत लावून त्यांची जोपासना बाळकृष्णबुवांनीं व त्यांच्या शिष्यांनीं सतत पंधरा-वीस वर्षें केली आणि ह्याच कालावधींत त्या रोपांना फुलविणारे वनमाळी भास्करबुवा बखले हे दुसरे अतुलनीय तरुण गायक, बडोदें दरबारचे विद्वान् गायक फैजमहंमदखां ह्यांच्या तालमींत ख्यालाची विशेष रंगदार व अभिनव गायकी आत्मसात् करीत होते. ह्या गायकीमध्यें स्वरालाप वीनावरील मींडीसारखा पीळदार आणि भरीव असे आणि स्वर-संगीतामध्यें इतकें योजनावैचित्र्य असे, कीं अगदीं साध्या-सीध्या रागांचादेखील अननुभूत असा परिणाम होई. गायनाला सुरुवात झाली, कीं पांच मिनिटांतच रागाची मोहिनी श्रोत्यांना मंत्रमुग्ध करीत असे. परंतु एवढ्या एका सिद्धीवर संतुष्ट न राहातां भास्कररावजींनीं आग्रा घराण्याच्या गायकीचे निर्माते नथ्थनखां ह्यांच्या तालमींत त्यांच्या ताल-विलासाची व स्वर-गुंफणीच्या पेंचदार पद्धतीची आपल्या गायनांत भर टाकली. शेवटीं कोल्हापूर दरबारचे गायन-महर्षि अल्लादियाखां ह्यांच्या मुष्कील व अवर्णनीय अशा सर्वांगपरिपूर्ण गायन-पद्धतीचा त्यांनीं परिचय करून घेतला. अत्यंत श्रेष्ठ पदवीला पोंचलेल्या अशा ह्या तीन उस्तादांच्या गायन-पद्धतींचा सूक्ष्म दृष्टीनें व अत्यंत मार्मिक रसिकतेनें अभ्यास करून आणि आपल्या बुद्धिमत्तेची त्यांत भर घालून, भास्कररावजींनीं त्रिविध रंगसंगतीचें हें गायन सतत पंचवीस-तीस वर्षें महाराष्ट्रीय श्रोत्यांना मनमुराद

ऐकविलें. त्यामुळें महाराष्ट्रीय श्रोत्यांचें श्रवण चोखंदळ बनलें आणि कोणत्याही घराण्यांतील गायकाच्या गुणांचें कांटेतोल मूल्यमापन करण्याची जी दृष्टि त्यांना आली, त्याचें श्रेय प्रथम भास्कररावजींना दिलें पाहिजे. अभिजात संगीताची कदर महाराष्ट्राइतकी इतर कोणत्याही प्रांतांत डोळसपणें होत नाहीं, असा अनुभव आल्यामुळें पुढें उत्तरेकडील अनेक नामवंत गायकांनीं महाराष्ट्रांत आपलें कायमचें निवासस्थान केलें."

**मृदंगाचार्य शंकरभय्या** — "बुवा तालाचे सच्चे, व अस्ताईत तर ताल व लय इतकी बांधून ठेवीत, कीं ठाईची साथ करणें मुष्कील होत होतें; परंतु ज्या प्रमाणांत साथ हवी, तीच करण्यांत भूषण वाटत असे. त्यांच्याबरोबर कठीण ताल, आढा-चौताल, सवारी, झुमरा, वगैरे बोल परणासकट वाजविले असतांना त्यांना फार स्फुरण येत असे. साथीदाराचा दर्जा ते कधींही कमी लेखत नसत. इतका ढंगदार व लयबाज गवई आतां कोणी शिल्लक नाहीं व वाजविण्याच्या दृष्टीनेंही (गायकाची) उणीव भरून निघणें शक्य नाहीं. ... ध्रुवपद धमार पण त्यांच्याबरोबर वाजविण्याचे प्रसंग थोडे-बहुत आले. त्यांचा प्रेमळ स्वभाव, ह्यामुळें दुनियेला ते आपलेसे वाटत असत. ... माझ्यासारख्या साथीदाराला एक प्रेमाचें, अधिकाराचें ठिकाण नाहींसें झालें. ही आठवण मी जन्मभर विसरणार नाहीं."

**गोविंद लक्ष्मण सोरटी**, 'किर्लोस्कर मंडळीं' तील एक नट — "एकदा ग्वालेर मुक्कामीं असतांना सद्गृहस्थ गवई बळवंतरावमामा ह्यांच्याजवळून त्यांनीं (भास्करबुवांनीं) अगदीं नवीन अशी एक चाल मिळविली. ती म्हणजे 'मेरि नाजुक चुरिया करके.' ('स्वयंवरां' तील 'अति आनंद फुलवी कलिका'). कै. गायनाचार्य भास्करबुवा बखले ह्यांची आठवण मी आजन्म विसरणें शक्य नाहीं. कारण 'आधीं केलें मग सांगितलें।' ह्या समर्थांच्या वाणीची साक्ष मला त्यांनीं पटवून दिली व त्यांच्याच कृपेचें फळ म्हणून आज जगांत मी अब्रूनें, मानानें व स्वतंत्रतेनें सुखाचे क्षण लोटीत आहें."

**ठोसरस्वामी नारायणाश्रम**, १९०० ते १९०४ पर्यंत बुवांचे शिष्य — "बुवासाहेबांचा स्वभाव फार प्रेमळ, मनमिळाऊ, निगर्वी, निर्लोभी, अक्रोधी

असा होता ; फार काय, एखाद्या सत्पुरुषास साजेसाच होता. बहुतेक क्रोध येतच नसे. क्रोधामध्यें स्वाभाविक होणारी क्रूर मुद्रा न दिसतां उलट मोहक मुद्राच दिसून येई. हें लक्षण फारच दुर्मिळ. प्रेमानें व कनवाळूपणानें विद्यार्थ्याला ते चुका समजावीत. बुवासाहेबांना आपल्या अंगीं असलेल्या अत्युच्च गायन-कलेबद्दल केव्हांही अभिमान झाला नाहीं किंवा पूर्णताही वाटत नसे. उलट पक्षीं ते नेहमीं म्हणत, 'काय करूं हो नाना! मनाची हौस पुरत नाहीं. व्हावी तशी मेहनत होत नाहीं!' काय अलौकिक निरभिमानता व विद्येबद्दल कळकळ! त्यांना नैसर्गिक आवाजाची देणगी नव्हती. ... तरी उद्योगाची शिकस्त, विद्येवरील प्रेम किंवा आपण म्हणूं, कीं एखाद्या गंधर्वाच्या संचारामुळें त्यांनीं कष्टानें व मेहनतीनें गायकीला योग्य असा आवाज प्राप्त केला होता. ... बुवांना प्रत्यक्ष पाहिल्याशिवाय जर कोणीं आडून त्यांचें गाणें ऐकलें, तर ऐकणाराला कोणीतरी उत्कृष्ट मुसलमान गवईच गात आहे, असा भास होई. त्यांची ती चिजेची उठावणी, तो सूरभरणा, अस्ताई मांडण्याचा ढंग, तान, अस्खलित दाणेदार व प्रसंगानुसार कडकडणारी वीज कीं काय, अशी. समेवर अचूक (ओढाताणीशिवाय) येणें, वगैरे गोष्टी अत्यंत नांवाजलेल्या मुसलमान गवयांच्या तोडीस तोड, किंबहुना कांकणभर जास्तच दिसत असत. एक तान, जिला 'बकरी तान' असें म्हणत, तिचें तर बुवांनीं पेटण्टच घेतलें होतें. हें त्यांच्या कसरतीचें फळ. ... त्यांच्या गायकीची हातवटी व स्वारस्य समजण्याइतके अधिकारी श्रोतेच आमच्यामध्यें फार कमी होते. ... बुवांच्या वेळीं मुंबईमध्यें एक रसिक श्रोता असे. त्या व्यक्तीचें नांव पुरुषोत्तमराव तेलंग. ही व्यक्ति मैफलींत पुढें बसली, कीं रंगदेवता हजर. त्यांचे बंधु मंगेशराव तेलंग. हे बीनकार म्हणून समजले जात असत."

**गोविंदराव देसाई,** 'गोपाळ गायन समाजा'चे संचालक, (१९१३-१४ मधील पुण्याच्या 'नूतन आर्यभूषण थिएटर' मधील जलशानंतरचा एक संवाद) — "बुवासाहेब, आपला सर्वच कार्यक्रम उत्तम झाला. चिजेचे शब्द, स्वरांच्या जागा, विस्ताराची पद्धत, लय, स्वर, इत्यादि गोष्टी ऐकून शास्त्रीय संगीताबद्दल कांहीं श्रोत्यांचा असलेला गैरसमज साफ दूर झाला. प्रत्येक गायक जर ह्या गोष्टी ध्यानांत ठेवून गाईल, तर

संगीत-कलेचा दर्जा वाढत जाईल." भास्करबुवांनीं उत्तर दिलें, "आपण जी स्तुति करतां, ती गुरुजींकडून मला जी विद्या मिळाली, त्या विद्येची स्तुति आहे. कार्यक्रमांत जें उत्कृष्ट झालं असेल, तें गुरुजींचं आणि जें चुकलं असेल, तें सर्व माझं. ..." भास्करबुवांचें निस्सीम गुरुभक्तीचें उदाहरण निरंतर ध्यानांत ठेवण्यासारखें आहे.

**गोविंदराव देसाई,** (१९१८, 'गांधर्व महाविद्यालयां' तील 'संगीत परिषदें' त) — "भास्करबुवांच्या नेहमींच्या शिरस्त्याप्रमाणें ते प्रथम गायला बसले. कार्यक्रमानंतर मीं त्यांना विचारलें, 'बुवासाहेब, आज आपला आवाज असावा तितका अनुकूल नव्हता. तरीसुद्धा कार्यक्रमांत तसं कुठेंच दिसून आलं नाहीं. एवढंच नव्हे, तर आज आपला कार्यक्रम श्रोत्यांच्या निरंतर ध्यानांत राहाण्यासारखा झाला.' ह्यावर बुवा म्हणाले, 'रणांगणावर जाणाऱ्या वीराची तरवार गंजलेली असतां कामा नये. ... आज माझा आवाजसुद्धा माझ्या मनाप्रमाणें नव्हता. तरीही सबब न सांगतां मी आज गायला बसलों. श्रोत्यांनीं माझ्या कार्यक्रमाचा फार मोठा आदर केला. गोविंदराव, ह्यालाच म्हणतात गुरुकृपा.' (श्रोते मंडळींत गायनाचार्य बाळकृष्णबुवा, पंडित विष्णु दिगंबर, रामकृष्णबुवा वझे, विलायतहुसेन, इत्यादि बडे अधिकारी श्रोते होते.) ... भास्करबुवांचें अंतःकरण अतिशय निर्मळ, गर्व नाहीं, कोणाशीं ईर्ष्या वा द्वेष नाहीं, किंवा कोणाची निंदा नाहीं. ... त्यांच्या भाषेवरून मला त्याच वेळीं तुकाराममहाराजांच्या अभंगाची आठवण झाली. 'कासया गुण-दोष पाहूं आणिकांचे । मज काय त्यांचें उणें असे ॥' ह्याचाच अर्थ असा, कीं भास्करबुवांची वृत्ति ही संतासारखी होती, हें निराळें सांगायला नको. ... १९१२-१९१३ — पंडित विष्णु दिगंबर कलकत्त्याच्या दौऱ्यावर जातांना मध्यंतरीं त्यांचा नागपुरास महिनाभर मुक्काम होता. भास्करबुवांनीं आपल्या जलशाला त्यांना आमंत्रण केलें होतें. पहिल्या ओळीच्या पहिल्याच खुर्चीवर पंडित विष्णु दिगंबर बसले होते. पंडितजींकडे पाहून भास्करबुवांनीं गाण्यास जी सुरुवात केली, ती इतकी जोरकस व रंगदार होती, कीं श्रोते आनंदानें फुलून गेले. शेवटीं ते ठुमरी गायले. ठुमरी-गायनाचें कौशल्य पाहून व ऐकून प्रत्येकाच्या तोंडून असे शब्द

निघाले, कीं बैठकींत निश्चितपणें रंग भरण्यासाठीं बुवासाहेबांनीं केवढी मेहनत घेतली असेल, ह्याचा अंदाज करवत नाहीं. जलशानंतर भास्करबुवा पंडितजींकडे आले. पंडितजी म्हणाले, ‘बुवासाहेब, गायनविद्या आपणांस प्रसन्न झाली आहे. सर्व श्रोते वेळो-वेळीं टाळ्यांचा गजर करून, आपली प्रशंसा व्यक्त करीतच होते. ह्याचें कारण असें, कीं जसा एखादा भक्त, ईश्वराच्या ठिकाणीं ध्यानस्थ असतो, तशी आपण आपली वृत्ति गातांना ठेवली होती.’ मृत्यूपूर्वीं बुवांच्या समाचारास गेलों असतां बुवा म्हणाले, ‘असंख्य लोक ज्या मार्गानें गेले, त्याच मार्गानें मी जाणार, हें मला समजलं आहे. वाईट एवढंच वाटतं, कीं गायन-विद्येची सेवा मला मनाप्रमाणें करतां आली नाहीं. फक्त त्या विद्येचा संस्कार माझ्यावर उत्कृष्ट झालेला आहे — ह्यांतच समाधान मानून मी चालू लागणार.’ ह्यापेक्षां अधिक ते बोललेच नाहींत. ज्यांचें गायन ऐकून दुष्टपणा, हेवा, ईर्ष्या, निंदा, इत्यादि विकार नाहींसे होत असत, त्यांनीं ‘माझ्या हातून संगीत-विद्येची सेवा कांहींच झाली नाहीं,’ असें म्हणावें, ह्यावरून त्या व्यक्तीची योग्यता केवढी होती, हें कोणालाही सहज समजून येण्यासारखें आहे.”

**नारायण रामचंद्र ऊर्फ बाबू टापरे** – “गुरुवर्य कैलासवासी परमपूज्य भास्करबुवा बखले ह्यांचा स्वभाव अत्यंत ममताळू, करारी, शिष्यांबद्दलची हितदृष्टि, उदार अंतःकरण, साधी व स्वच्छ राहाणी, तसेंच दुसऱ्यांच्या सद्गुणांबद्दल कौतुक, स्वाभिमानी वृत्ति, द्रव्य मिळविण्याबाबत निःस्पृहपणा, अलोट विद्वत्ता, इत्यादि सद्गुणमंडित असें विद्वद्रत्न मिळणें दुरापास्त. ... बुवा प्रतिवर्षीं डिसेंबर महिन्यांत पंजाबमध्यें जालंदर येथें जात असत. जालंदर येथें तुलाराममहाराजांकडे प्रतिवर्षीं मेळा असतो, त्या वेळीं तेथें शें-दोनशें गवयी येतात व तीन दिवस गवयांचें गाणें सकाळीं ४ ते दुपारीं १२ पर्यंत व दुपारीं ३ ते रात्रीं १२–१ वाजेपावेतों, सारखें कोणाचें ना कोणाचें गाणें उत्सवाप्रीत्यर्थ चालू असतें व योग्यतेप्रमाणें देणग्याही मिळतात. त्या सर्व गवयांत भास्करबुवांचा पहिला मान असून बुवांस तेथें ‘देव-गंधर्व’ ही पदवी देण्यांत आली होती व एक सुवर्णपदकही दिलें गेलें

होतें. परंतु बुवा मेडल्, सर्टिफिकिटें किंवा पदव्यांस बिलकूल महत्त्व देत नसत. त्यांनीं म्हणावें, 'गळा बादशहा आहे. ज्या वेळीं गळा काबूंत राहून मैफल रंगेल, तेंच आमचें सर्टिफिकिट. नाहींतर एखादे वेळीं गाणें बिघडलें, तर पदव्या आणि सर्टिफिकिटें हीं उपहासास कारणीभूत होतात.' ... बुवा गात असतांना केव्हांही नोटेशन करीत नसत, परंतु विद्यार्थ्यांस ते नोटेशनशिवाय कधींही शिकवीत नसत. ... त्यांचा असा एकही शिष्य सापडणार नाहीं, कीं बुवांचें शिक्षण मिळाल्यानंतर त्याला स्वतःच्या पायांवर उभें राहून प्रपंच भागवतां आला नाहीं. त्यांचें शिक्षणच इतक्या उच्च दर्जाचें असे, कीं मठ्ठांतला मठ्ठ विद्यार्थी असला, तरी त्याला स्वतःचें पोट भरण्यापुरतें गातां यायचेंच."

**स. कृ. जोशी**, वकील, सातारा; पुण्याच्या 'डेक्कन जिमखान्या' वरील १९२२ च्या गायन-उत्सवांतील गाणें ऐकून लिहितात — "चिजेची बांधेसूद मांडणी, रागाची ऐटबाज बढत, व लयदार तानांची तयारी - हीं बुवांच्या गायकीची विशिष्ट अंगें प्रामुख्यानें दिसून आलीं. श्रोतेही समजदार होते. ... अशा एकंदर थाटांत बैठकीस अपूर्व रंग चढला. दोन-तीन तासांच्या कार्यक्रमानंतर आज आपण कांहीं विशेष असामान्य व अपूर्व असें गाणें ऐकलें, असें म्हणत श्रोते निघून गेले."

**र. रा. चाफळकर**, हुबळी, माधवपूर, [चाफळकरांकडे पिढीजाद गाण्याचें अध्ययन अजून चालू आहे.] आपल्या पत्रांत लिहितात — "माणिकनगरचे महापुरुष **खंडेरावमहाराज** हे गाण्यांतले तज्ज्ञ होते. त्यांनीं मुक्तकंठानें पत्रांत भास्करबुवांची स्तुति केली होती. दुर्दैवानें तीं पत्रें आतां माझ्याजवळ नाहींत. त्या पत्रांत खंडेरावमहाराजांनीं बुवांना 'गायन-सम्राट्' असा मान दिला होता. तेंच विशेषण मीं पत्रारंभीं लिहिलें आहे."

**विनायकबुवा पटवर्धन**, प्रिन्सिपल, 'गांधर्व महाविद्यालय' — "मीं १९११ पासून कै. गायनाचार्य भास्करबुवांचें गाणें ऐकलें आहे. पुढें माझी त्यांच्याशीं ओळखही झाली. त्यांच्या ह्या परिचयाबद्दल मला धन्यताच वाटते. त्यांचें गाणें मीं इतक्या वेळां व इतकें अभ्यासपूर्वक ऐकलें आहे

आणि त्याचा माझ्यावर इतका परिणाम झाला आहे, कीं अजूनही त्यांच्या गाण्याची आठवण झाल्याशिवाय राहात नाहीं. त्यांच्या गाण्यांतील रंगेलपणा, तडफ, पीळदारपणा ह्यांची आठवण होतांच, त्यांच्याविषयीं मन आदरानें भरून जातें. त्यांनीं स्वतःच्या गुरुजींसाठीं घेतलेल्या कष्टांवरून तर त्यांची अलौकिक गुरुनिष्ठा व संगीत-विद्येबद्दलचा ध्यास ह्यांची पूर्ण कल्पना येते. त्यांच्या गाण्यांतील गुणांमुळें त्यांचें नांव अखिल हिंदुस्थानभर झालें आहे, विशेषतः पंजाब, सिंध, कर्नाटक व महाराष्ट्र ह्या प्रांतांत तर त्यांची फारच प्रसिद्धि आहे. अशा गुणसंपन्न व एकनिष्ठ अशा संगीत-कलेच्या थोर व निस्सीम उपासकाच्या पवित्र स्मृतीस मी अभिवंदन करतों."

**भुरजीखां** (अलादिया-पुत्र) — "भास्करबुवांच्या तोडीचा एकही महाराष्ट्रीय गायक महाराष्ट्रांत दुसरा झाला नाहीं. ते अत्यंत सुस्वभावी, मनमिळाऊ होते. इतक्या उच्च दर्जाचा निगर्वी गायक माझ्या पाहाण्यांत आला नाहीं."

**राजाभय्या पूंछवाले** (माधव संगीत-विद्यालयाचे प्राचार्य) हे पंडित भातखंडे ह्यांचे साहाय्यक. ग्वालेरच्या गायकीची परंपरा पूर्णपणें त्यांच्या लक्षांत होती. ते पेटी उत्तम वाजवीत. त्यामुळें परंपरेंतील गायकीची 'सा-री-ग-म' त्यांस अधिक बारकाईनें समजे. राजाश्रयामुळें त्यांस ग्वालेरची व उत्तरेची सर्वश्रेष्ठ गायकी सदैव ऐकायला मिळे. त्यांच्या चिकित्सक अभ्यासी वृत्तीमुळें त्यांच्या अभिप्रायाला फारच महत्त्व दिलें पाहिजे. ते लिहितात — "जालंदर (पंजाब) मध्यें दरवर्षी ता. २५ ते २९ डिसेंबरांत होणाऱ्या जलशांत व १९०९ सालीं मी गुरुवर्य कै. शंकरराव पंडित; ... श्री. गुरुवर्य कै. बाळासाहेबगुरुजी, कै. बर्कतुल्ला सतार-वादनकार, विष्णुबुवा आठवले, कै. भास्करबुवा बखले, रा. नानासाहेब फडणीस, पुणें ह्यांच्यासह व आणिक शें-पाऊणशें कलाकार जालंदरांत उपस्थित होतों. अशा समाजांत कै. बुवासाहेबांचें गायन प्रभावशाली झाल्यानें माझ्या अंतःकरणांत त्यांच्यासंबंधीं चिरकाल अत्यंत आदर स्थित झाला आहे.... ग्वाल्हेरला १९०९ च्या मार्च महिन्यांत होणाऱ्या होलिकोत्सवाकरितां श्रीयुत कै. सदाशिवराव परचुरे, इन्स्पेक्टर जनरल, एज्युकेशन डिपार्टमेंट, ग्वाल्हेर गव्हर्नमेंट, ह्यांच्या

आग्रहावरून कै. बुवासाहेबांचें आगमन होऊन पॅलेसमध्यें श्रीमंत सरकार कै. माधवरावमहाराज शिंदे ह्यांच्या सान्निध्यांतील कलाकार मंडळीसह श्रीमंतांनीं कै. बुवासाहेबांचें गायन ऐकलें व प्रसन्न होऊन रु. ३०० पुरस्कारार्थ दिल्याची बातमी चहूंकडे – ग्वाल्हेरमध्यें – पसरल्यानें मला अत्यंत समाधान झालें. पॅलेस बैठकींत त्या वेळीं मला स्वतःला गायन ऐकायचा योग आला नाहीं; परंतु सुदैवानें एक आठवड्याच्या आंतच श्रीमंत कै. दौलतरावमहाराज शिंदे ह्यांच्या छत्रींत होणाऱ्या त्यांच्या वार्षिक स्मृति-उत्सवांत सर्व कलाकारांची – परदेशी व स्थानीय – हाजिरी होत असल्यावेळीं कै. बुवासाहेबांचें सुश्राव्य गायन ऐकण्याचा मला पुन्हा सुयोग आला. त्या उत्सवांत सर्वांना मोकळीक असे. त्या दिवशीं तर कै. बुवासाहेबांचें गायन इतकें प्रभावशाली झालें, कीं त्यानंतर त्या दिवशीं ... एकाच सुप्रसिद्ध (हल्लींच्या काळांतले) कलाकाराचें ... गायन झालें. परंतु त्या गायनाचा परिणाम फिका राहिला. ... कै. बुवासाहेबांसारखे ह्या काळांत प्रभावशाली कलाकार उत्पन्न होणें असंभवनीय आहे, असें मला वाटतें."

नामांकित संगीत-दिग्दर्शक व प्रांजलपणें संगीत-विषयक चिकित्सक लेखन करणारे **केशवराव भोळे** आपल्या 'अस्ताई' त लिहितात — "भास्करबुवांच्या तोडीचे अष्टपैलू व श्रोत्यांना आपल्या गाण्यानें बांधून ठेवणारे गवई महाराष्ट्रांतच काय, पण भारतवर्षांतही फार थोडे होऊन गेले. उमद्या गायनाबरोबरच अंतःकरणाचा ठेवा बुवांजवळ असल्यानें 'ऐकणाराला व शिकणाराला' बुवांनीं विन्मुख केव्हांही पाठविलें नाहीं. .... मुसलमान गवयांमध्येंही इतका चतुरस्र, खरोखरीचा विद्वान्, रसीला गायक झाला नाहीं आणि ही जाणीव अल्लादियाखांनाही होती. बुवांनीं महाराष्ट्राच्या गवयांच्या नांवाचा दबदबा म्हैसूरपासून जालंदरपर्यंत ठेविला होता. ... विद्वत्तापूर्ण असूनही रसयुक्त, भारदस्त असूनही ढंगदार, असा अस्ताई-अंतरा बाळकृष्णबुवांनंतर सरसपणें मैफलींत कोणी भरत असतील तर ते भास्करबुवाच! नुसता अस्ताई-अंतरा लोचदार व कमावलेल्या आवाजानें गाऊन रागाची मूर्ति श्रोत्यांसमोर उभी करावी बुवांनींच!"...'भास्करबुवांची विलंबित गायकी'

[ जिज्ञासूंनीं हा लेख मुळांतून अवश्य वाचावा. येथें त्यांतलीं थोडींशीं वाक्येंमात्र उतरून घेत आहें.] " आमचा हा कंपू शास्त्री हॉल, 'ब्राह्मणसभा', पेंडसेवाडी, 'गांधर्व महाविद्यालया'चा हॉल, इत्यादि बुवांच्या गाण्याच्या ठराविक ठिकाणीं हक्कानें बेधडक आंत शिरत असे. ... बुवांच्या हसऱ्या चेहऱ्यानें, भारदस्त वागणुकीनें, माझ्या मनावर फारच चांगला परिणाम झाला, आणि मैफल संपेपर्यंत तो कायम राहिला. स्वरांची केवढीही मोठी खेंच असो, कितीही आवर्तनांची फिरत असो, बुवांची ती हसरी मुद्रा वेडीवाकडी झाली नाहीं, डोकीवरील रुमालाचा कांठ कधीं ढळला नाहीं, किंवा खांद्यावरील पांढरें स्वच्छ जरीकांठी उपरणें खालीं उतरलें नाहीं. ... बुवांचे स्वरांचे दर्जे इतके रागवाचक असत, कीं ते ऐकतांच ते काय गाणार ( कोणता राग ) ह्याचा पहिल्या दोन-तीन सेकंदांतच ते मैफलीला अंदाज देत असत. ... त्यांच्या विलंबित लयींतील दर्जेदार स्वरांचा माझ्या कानांवर व मनावर इतका पक्का संस्कार झाला आहे, कीं .... अस्ताई-अंतऱ्याची बंदीष ढंगदार होती. तो म्हणतांना स्वरांच्या त्या-त्या जागा तालाच्या त्या-त्या ठराविक मात्रांना लागूनच अगदीं नेमक्या तशाच यायच्या. ... ही घराण्याची पक्की तालीम. अगदीं घोंटीव ! हिलाच 'नायकी' म्हणतात ! .... मी ही मैफल आजही विसरलों नाहीं. बुवांची ही पहिलीच मैफल ऐकत असल्यानें संगीताचा कैफ एवढा जबरदस्त असतो, ह्याचा अनुभव तेव्हां घेत होतों. .... रागाचें हें स्वरूप श्रोत्यांच्या मनावर पक्कें बसलें, कीं मगच ते बढत करीत. त्या बढतींत, विस्तारांत, तानेंत त्यांचे राग कधींच बिघडले नाहींत. श्रोत्यांना 'सरगम' करतां आली नाहीं, तरी बुवांनीं विलंपतींत स्वरांची पक्की तोंडओळख करून दिल्यामुळें स्वरांचे ते चेहरे श्रोत्यांच्या नजरेसमोर सतत राहात. त्यांचा श्रोत्यांना कधींही विसर पडायचा नाहीं. ... बुवांचा गळा विलंपतीनें इतका निकोप आणि साफ लागे, कीं तारसप्तकांतील मध्यम पंचम बुवा लीलेनें घेत. बुवांच्या विलंपत गायकींतून निर्माण झालेलें स्वरांचें जिवंत सौंदर्य, रागांचा साधेपणा आमच्या शिकाऊ गायकांनीं घेण्यासारखा आहे."

धारवाडचे विद्वान् गायक, बुवांचे शिष्य **त्रि. का. पित्रे**, वकील, [ एक तपापेक्षां अधिक काळ पित्रे वकील बुवांचे शिष्य, मित्र व भक्त म्हणून

बुवांच्या सहवासांत होते. पित्रे ह्यांच्या अभिप्रायास विद्वान् मंडळींत फार मान मिळे.] झावबा वाडींतील एका बंगलींतील दिवाणखान्यांत बुवांचें गाणें १८९६ सालीं प्रथमच ऐकून पित्रे वकील लिहितात, — " तो अस्ताई-अंतऱ्याचा प्रकार आम्हांला कांहीं अपूर्वच वाटला. अस्ताई-अंतऱ्याचा इतका ढंगदार, सुंदर, रसीला व बांधेसूद उठाव व मिलाफ पूर्वी आमच्या ऐकण्यांत नव्हता. अस्ताई-अंतऱ्याची ती मनोहर पद्धति मनांत भरून आम्हां सर्वांना त्यांच्याविषयीं मोठा आदर व आपल्या हिंदूंतही मुसलमान गवयांनाही जड वाटणारा व खालीं पाहायला लावणारा गुणी जवान असल्याबद्दल मोठा अभिमान उत्पन्न झाला. मंगेशरावांकडे, खुद्द त्यांच्या घरीं आम्हांला पूरिया-धनाश्री, पूर्वी, गौरी, हमीर, छायानट, बहार, बागेश्री, अडाणा, मालकंस, वगैरे प्रचारांतील अनेक रागांतील तयारीला चढलेल्या चिजांची चित्ताकर्षक ठेवण व त्यांचा विस्तार करण्याची रसभरित पद्धति पाहून त्यांच्या गाण्याच्या ढंगाविषयीं मनांत फारच आवड उत्पन्न झाली. ... बुवासाहेब हे मोठे रंगीले व रसीले गायक होते व त्यांची मैफल मोहक व आकर्षक होत असे, असा सामान्यतः उद्गार निघतो. बुवांचें गाणें आरंभापासून रंगत असे व त्याचा रंग चढत जाऊन श्रोतृवृंद आनंदित होत असे. बुवांच्या गाण्यांत साधारणतः बरेच प्रकारचे ढंग व रंग असत. उच्च व सामान्य दर्जाच्या श्रोतृजनांना ते रंजवीत असत, सर्वांकडून वाहवा घेत. ... ते मोठ-मोठे व सामान्यतः प्रचारांत असलेलेच राग गात. त्यांना अप्रचलित व अनूठे राग येत असूनही ते मैफलींत फारसे गात नसत. पण नेहमींचेच राग ते अशा अपूर्व असाधारण रंगदारीनें गात, कीं त्यांतच श्रोते तल्लीन होत. पुष्कळ वेळां गाण्यांत व ऐकण्यांत येणाऱ्या रागांतच असामान्य रस भरून श्रोतृजनांना डोलत ठेवणें ही सिद्धि खरोखरच अपूर्व. गुरुवर्य बुवासाहेब उच्च दर्जाचे शास्त्रीय राग प्रेमळपणानें, सफाईनें व ऐटबाजीनें गात असत, एवढेंच नाहीं, तर ते ठुमऱ्या, भजनें, संगीत पदें, वगैरे साधारणपणें सामान्य लोकांना रंजविणारे प्रकारही फार गोडीनें श्रोतृजनांपुढें मांडीत. त्यामुळें सर्व दर्जाची मैफल खूष होऊन जात असे. ... ही गायकी कशी होती व तिची गोडी कशी होती, ह्याचें शब्दांनीं वर्णन

करणें म्हणजे साखरेची गोडी, सूर्याचें तेज किंवा चंद्र-किरणांची आल्हादकता ह्यांचें शब्दांनीं वर्णन करण्यासारखाच अयशस्वी प्रयत्न होय. त्याचें खरें स्वरूप व मर्म कळण्याला त्याचा साक्षात् अनुभवच पाहिजे. ... गाणें पडल्यासारखें, नीरस किंवा कंटाळवाणें न होतां त्याचा रंग व ढंग चढत जात असे. ह्या मुख्य व प्रधान अंगाचें मुख्य श्रेय त्यांचे आद्य गुरु फैजमहंमदखां ह्यांच्याच शिकवणीला व त्यांनीं मूळ घातलेल्या पायालाच होय. कारण रागाच्या आरंभींची स्वरांची व आलापांची साधणूक, शुद्धता व अक्षरांचे स्पष्ट, मुलायम व रसभरित उच्चार व चिजेच्या निर-निराळ्या भागांची मांडणी व विस्तार ह्या सर्व गोष्टींचा समावेश फैजमहंमदखांसाहेबांच्या पद्धतींत जसा उत्कर्षानें दिसतो, तसा व तितका इतर गान-प्रसिद्ध घराण्यांत दिसत नसल्याचें तज्ज्ञ मंडळींचें मत आहे. इतर घराण्यांत तानबाजी, लयदारी, खटके, मुरक्या, बोलताना, वगैरेंचा कमी-जास्त प्रकर्ष असे. पण अस्ताई-अंतरे मांडण्याकडे तितकें लक्ष नसे. ... पहिला भाग मांडला जातो, त्याचीच इतकी मशागत करून घेतली जात असल्यानें, स्वाभाविकपणेंच आरंभींच रंग उत्पन्न होऊं लागे. ... नथ्थनखां ... ह्या द्वितीय गुरुवर्यानें .... उमद्या, प्रेमळ व मोकळ्या मनाच्या गुणी श्रेष्ठानें बुवांच्या अगोदरच्या सुंदर पद्धतींत ढंगदार, लयदार, नखरेदार व भावनाव्यंजक पद्धतीची भर घातली. ह्या द्वितीय गुरुवर्यांपासून लयीबरोबर स्वरांचें व बोलांचें विविध प्रदर्शन, रसाविर्भाव, वगैरे गुणांची पूर्वींच्या मोहक पद्धतींत भर पडली. एवढ्यानेंही समाधान न मानतां गायनसम्राट् अलादियाखां ह्यांच्या गाण्यांतील भरदारपणा, पेंच, चक्री फिरत, सहजता, वगैरे गुणांचा संग्रह सुरू ठेवला. ... देशी, आसावरी, तोडी, रामकली, गौडसारंग, देसकार, मुलतानी, भीमपलासी, पूरिया-धनाश्री, श्री, गौरी, यमन, हमीर, छायानट, केदार, बागेश्री-बहार, बसंत, मालकंस, जैजैवंती, ललत, सोहोनी, वगैरे राग त्यांचे अगदीं हातखंडा होते. ... बुवांच्या अष्टपैलूपणामुळें पूरब, खमाज, काफी, पिलू, वगैरे जिल्ह्यांतील ठुमऱ्या, दादरे, भजनें, ते रंगवून गात असत. नाटकांतील पदें, गुजराती गरबे, वगैरे ते छान म्हणत. अष्टपैलू गायक ही संज्ञा त्यांना खरोखरीच शोभत असे. ... त्यांच्या गाण्यांतील सर्वांत श्रेष्ठ व तुरळक

आढळणारा गुण म्हटला म्हणजे त्यांच्या गाण्याचा परिणामकारक टिकाऊपणा हा होय. त्यांनीं गायिलेल्या जोरकस व श्रुतिमनोहर गाण्याचा परिणाम किंवा ठसा बराच काळपर्यंत टिकत असे. त्यांच्या कांहीं-कांहीं गाण्यांची स्मृति अनेक वर्षें झालीं, तरी जागरूक होते. ... प्रो. मंजीखां (अलादियांचे चिरंजीव) १९२४ सालीं एका मैफलप्रसंगीं मजजवळ म्हणाले होते, कीं 'कै. भास्करबुवांची गोष्ट काय सांगावी! वाहवा! धन्य त्यांची! आम्ही त्यांना आमचे वडील बंधु असे मानीत असूं व त्यांच्या समोर वा बरोबर गाण्याला आम्हांला धैर्य होत नसे. कै. बुवांनीं आपल्या अपरिमित बुद्धीच्या बळावर व ग्रहणशक्तीच्या सामर्थ्यानें मरहूम फैजमहंमदखां, नथ्थनखांजी व आमचे वडील ह्या तीनही गुरूंकडे शिकून सर्वांकडून उचललेल्या प्रकारांचें एक रसायन बनविलें होतें व बखलेबुवांची किंवा भास्करबुवांची पद्धति म्हणून एक स्पेशल पद्धति निर्माण केली होती. धन्य त्यांची!' हे त्यांचे शब्द जसेच्या तसेच मीं लिहिले आहेत. ... "सदर संस्था काढण्यांत बुवांचा कोणताही स्वार्थ किंवा द्रव्यार्जनाचा हेतु नव्हता. वरिष्ठ दर्जाच्या संगीताचा प्रचार जनतेंत वाढत जावा व तें शिक्षण घेतांना विद्यार्थ्यांना विनाकारण कष्ट न पडतां व वेळेचा निष्कारण व्यय न होतां विद्यार्जन व्हावें व कलासंपन्न गुणवान् शिष्य बाहेर पडावे, असा गुरुबुवांचा स्तुत्य उद्देश असल्यानें त्यांनीं अडचणींना न जुमानतां, 'समाजा'चें कार्य यथासमय चालू ठेवलें होतें. सन १९१४ मध्यें 'भारत गायन समाजा'चे प्रिन्सिपल ह्या नात्यानें स्वतःच्या व कै. रा. भिंगारकर वकील, ऑनररी सेक्रेटरी, अशा दोघांच्या नांवाचीं छापील विनंती-पत्रकें काढून ह्या बाजूला त्यांचा प्रसार करण्यासाठीं माझ्याकडे पाठविलीं होतीं व 'भारत गायन समाजा'च्या परिस्थितीचें संपूर्ण वर्णन केलेलें स्वतःच्या सहीचें पत्र ११ ऑगस्ट, १९१४ रोजीं पाठविलें. १९१५ एप्रिलमधील पत्रांत त्यांनीं लिहिलें, 'समाज ठीक चालला आहे. बराच बोजा (कर्जाचा) कमी केला आहे.' वगैरे मजकूर होता. आणखीही अशाचसंबंधीं पत्रें येत. ह्या सर्व पत्रांवरून 'समाजा'चा उद्दिष्ट हेतु सिद्धीस नेण्यासंबंधीं व त्याच्या उत्कर्षासंबंधीं गुरुवर्य बुवांना किती तळमळ होती व किती उत्कट ध्यास होता, हें दिसून येतें."

गायनाचार्य **रामकृष्णबुवा वझे** ह्यांचा अभिप्राय — " कै. भास्करबुवांसारखा सर्वांगसुंदर, प्रेमळ आणि आपल्या मोहक व तेजदार गायकीनें अथपासून इतीपर्यंत मैफल किंवा श्रोतृसमाज डोलविणारा किंवा रमविणारा गायक आपल्या पाहाण्यांत विरळा. त्यांच्यापेक्षां तयार विद्वान्, तानेचे कप्तान, इत्यादि एखाद-दुसऱ्या गोष्टींत वरचढ असे कलावंत अवलोकनांत आहेत. परंतु भास्करबुवांसारखे अष्टपैलू, सर्वांगसुंदर व आपल्या गायनोत्कर्षानें मैफल झुलविणारे कलावंत हाताच्या बोटांवर मोजण्याइतके सांप्रत असतील किंवा नसतील ह्याची वानवा." 'सह्याद्रि' मासिकाच्या १९३८ च्या नोव्हेंबरच्या अंकांत वझेबुवा लिहितात — " त्यांच्या गाण्यामध्यें परिपूर्ण रंग भरलेला होता. हिंदुस्थानी गाण्याची सर्व तऱ्हा त्यांना आली होती. उत्तर हिंदुस्थानांत, पंजाब, वगैरे ठिकाणींही त्यांचें नांव आहे. हें नांव जोंपर्यंत गाणें नष्ट होणार नाहीं, तोंपर्यंत राहील. मरावें परी कीर्तिरूपें उरावें."

**रघुनाथ कृष्ण फडके,** ह्यांनीं बुवांसंबंधीं बरेंच लिहिलें आहे. गायन व नाट्य-कलांचे ते निःस्पृह टीकाकार असून जाणते चिकित्सक आहेत. ते लिहितात — " संगीत-क्षितिजावर नांवाप्रमाणें भास्करासमान प्रकाशमान् होऊन हा थोर गायक दिवंगत झाला. ... संगीत-विषयक माझ्या स्मृति-सुवर्ण-कोंदणांत 'भास्करराव' हें नांव हिऱ्यासारखें बहुमोल असून, त्या नामोच्चाराबरोबर, बुवासाहेबांची संगीत-सौंदर्य-मूर्ति, कलाविशेषाला साजेशी दिलदार वृत्ति, व त्यांनीं संपादन केलेली स्पृहणीय कीर्ति मनांत येऊन, आल्हाद, आदर व अभिमान वाटतो. ... भास्करराव मैफलींत गाण्याला बसत, तेच इतक्या प्रसन्न चित्तानें, कीं जणू काय अपेक्षापूर्तीचें आगाऊ आश्वासनच देत आहेत, असें उत्कंठित श्रोतृवर्गाला निश्चित वाटावें. ... प्रारंभापासून गाण्याला रंग जमत जाऊन, उत्तरोत्तर त्याचा बहर वाढतां-वाढतां रंगतीचा उच्चांक गांठला जावा; गाणें जमण्यास विलंब लागणें, मध्येंच तें बंद पडणें, किंवा अखेर निष्प्रभ होणें, ह्या अनुचित प्रकारांपासून अलिप्त आणि अखंड रंगत गेलेलें गाणें माझ्या ऐकण्यांत काय तें भास्कररावांचेंच. जाणकारांपासून तों सर्वसाधारण श्रोत्यांपर्यंत डोलत राहिलेल्या मैफली मीं पहिल्या, त्या भास्करबुवांच्याच. ... 'हवा आहे ही. जमली तर

ठीक ' असें बुवाही म्हणत होते, तरी त्यांना ही ' हवा ' ठीक मानवली होती, ह्यांत शंका नाहीं. ज्यांनीं आढ्यतेखोरपणानें भास्कररावांच्या गाण्याला कान दिला नव्हता, त्यांनीं जेव्हां तें ऐकलें, तेव्हां कान पकडून, हात जोडल्याचें मीं पाहिलें आहे. बुवांच्या गाण्याचा ज्याला मोह पडला नाहीं, असा अस्सल दर्जाचा श्रोता माझ्या पाहाण्यांत नाहीं. आधीं कोणी का गाईना, अगर नंतर गाणारा कोणताही असेना, बुवांना ' आधीं, मग ' हा मानापमानाचा किंवा चुरशी-बुद्धीचा प्रश्न नव्हता. ते प्रथम बसले, तर नंतरचें गाणें परिणामकारक होणें कठीण आणि नंतर गायले, तर आधींचें गाणें श्रोत्यांच्या कानांत टिकणें दुरापास्त. ... बुवांचें गाणें ऐकण्यांत येण्यापूर्वी त्याचें वर्णन ऐकून केव्हां-केव्हां मला फारच विस्मय वाटे. अशा मैफलींत अखेर ढळढळां रडूं आलें, असें मास्तर मणेरीकर गहिंवरून सांगूं लागले, कीं ह्याहून अधिक अघटित व विपर्यस्त तें काय, असें माझ्या मनांत येई. ' गाण्याचं पर्यवसान रडण्यांत होत असेल, तर त्यापेक्षां तें ऐकूं नये, हें ठीक; असं बोलतां येईना, इतकंच काय तें ! ' ... हा अपूर्व साक्षात्कार कांहीं दिवसांनंतर घडून आला. हिराबागेंत सकाळच्या वेळींच बुवांच्या गाण्याचा सार्वजनिक जलसा होता. त्या वेळेची नैसर्गिक प्रसन्नता व रात्रीच्या ठराविक कालाहून तिचें कांहींसें नावीन्य अनुकूलच म्हटलें पाहिजे. तोडी रागाची बिनतोड रंगत चालू असतां, स्वराची उज्ज्वलता अशी कांहीं परिणामकारक होऊं लागली, कीं माझ्या डोळ्यांतून पाण्याच्या धारा वाहूं लागल्या. त्या आवरतांही येत नाहींतसें पाहून, एकीकडे मला हसूंही येतच होतें. त्या वेळीं माझी खात्री झाली, कीं ऐकीव वर्णनांतील ' रडूं ' हा शब्द अप्रयोजक होता इतकेंच. नाहीं तर स्वरांचा असा आसर होणें, असंभवनीय आहे असें नाहीं. हा प्रत्यय माझ्या आठवणींत बुवांच्या गाण्यांतच आला. ... भास्कररावांच्या गुरूचे उभय विख्यात चिरंजीव केव्हां-केव्हां बुवांच्या साथीला बसत, त्या वेळीं येणाऱ्या रंगतीखेरीज हें नुसतें दृश्यही भावनाप्रधान व आदरणीय वाटे. ... बुवासाहेबांची प्रत्येक आठवण भावनाप्रधान, कलासंस्कारित व आदरणीय अशीच असून, तिला अखेर ' भास्करराव ते भास्करराव ' असेंच म्हणावें लागतें. ... ( १९१७ ) ह्या वेळीं त्यांच्या

गायकीला एक विशिष्ट परिपक्वता आली होती. तरुणपणचा ताठरपणा व कडकपणा गायकींतून पार नाहींसा झाला होता. ती मृदु व हळुवार बनली होती. ह्या वेळीं ते राग-स्वरांच्या व आरोह-अवरोह आदि संगीत शुष्क व्याकरण-नियमांच्या पलीकडे पोंचले होते. प्रत्येक रागांत त्यांना एक विशिष्ट मूर्ति व भावना दिसूं लागली होती. त्यांचें हृदय स्वरांशीं एकजीव झालें होतें. ते ह्या वेळीं तांत्रिक रीतीनें गात नसून एकाद्या भावनाप्रधान द्रष्ट्याप्रमाणें आपल्या हृदयांत उचंबळून आलेल्या भावनांचे कढ प्रेक्षकांना स्वरानें सांगूं लागले होते आणि म्हणूनच पंजाबांतील अलिबक्ष-(जनैल) सारखे वृद्ध व कसलेले संगीतवीर भास्करबुवांच्या गाण्यावर बेहद्द खूष झाले होते.... भास्करबुवा पहिल्या वेळीं कराचीला गेले, त्या वेळीं खांसाहेब गामणखां हे वृद्ध गवई जिवंत होते. त्यांचे तिन्ही पुत्र मुबारकअल्लीखां, मुरादअल्लीखां व बिब्बेखां ऐन जवानींत असून तय्यारीनें गात होते. त्यांना बोलावून गामणखां म्हणाले, 'उद्यां पंडित भास्करबुवांचं गाणं ऐकण्यासाठीं माझ्याबरोबर चला व त्यांचं गाणं ऐका. म्हणजे खरं गाणं कशाला म्हणतात, त्याची तुम्हांला कल्पना येईल.' हें ऐकून मुबारकअल्लींना राग आला. त्यांनीं उद्गार काढले, 'एक हिंदु पंडित आणि तोही महाराष्ट्रांतील, म्हणे आम्हांला खरं गाणं ऐकवणार! आमचे वडील वृद्ध झाल्यामुळें आज त्यांची अक्कल कांहीं ठिकाणावर दिसत नाहीं.' ... ज्या ठिकाणीं रात्रीं बुवासाहेबांचें गाणें व्हायचें होतें, त्याच ठिकाणीं व त्याच दिवशीं ह्या तिघा भावांनीं आपलीच मैफल ठरविली व ऐकण्यासाठीं बुवासाहेबांना आमंत्रण दिलें. तिघा भावांनीं चढाऊ वृत्तीनें गाऊन, तानांचा पाऊस पाडला. मैफल झाल्यावर गामणखांनीं बुवासाहेबांना आपल्या पुत्रांच्या गाण्याविषयीं त्यांचें मत विचारलें. बुवांसाहेबांनीं उत्तर दिलें, 'गामणखां, तुम्ही स्वतः कसबी गायक आहां व त्यामुळें आपल्या मुलांना तुम्हीं उत्तम तालीम दिली आहे व त्यांना गुणी लोकांची गाणींही तुम्हीं पुष्कळ ऐकवलीं आहेत. ते आज फारच तयारीनें गायले व असंच गातां-गातां त्यांचं गाणं चांगलंच सुधारेल.' हें संभाषण मुबारकअल्लीखां चोरून ऐकत होते. ह्या उत्तरानें ते नाखूष झाले.... रात्रीं हे तिघेही बंधु

ह्या दक्षिणेंतील हिंदु पंडित आतां आपल्या गाण्यावर कसा रंग जमवतो तें ऐकण्यासाठीं गेले. ह्यापुढील मजकूर मुबारकअल्लीखांच्याच शब्दांत सांगायचा म्हणजे, 'ती स्वतःच्याच विचारांत मग्न असलेली बुवासाहेबांची साधी-सुधी मूर्ति बैठकींत दाखल झाली. तंबोरे मिळवूं लागतांच त्यांची चर्या बदलूं लागली, व एक नवीनच तेज त्यांच्या चेहऱ्यावर झळकूं लागलें. सुरेल तंबोरे लागतांच त्यांचा चेहरा प्रफुल्लित झाला व स्मित-हास्य करून आनंदी मुद्रेनें त्यांनीं श्रोत्यांकडे दृष्टि फिरवितांच आम्हांस त्यांनीं कोणत्या तरी जादूनें भारून टाकलें आहे, असें वाटूं लागलें. हमीर रागांतील 'सुर झारही' ह्या अस्ताईचें तोंड बांधून ते निषादावरून धैवतावर इतक्या मोहक मींडेनें आले, कीं आम्हांस नकळतच आमच्या तोंडून 'सुभानल्ला' हे शब्द बाहेर पडले. ... गाण्याच्या सुरुवातीलाच त्यांच्या योग्यतेची साक्ष आम्हांस पटली व आमचे वडील पंडितजींची एवढी स्तुति कां करीत होते, त्याचें गुपित समजलें. मी तर वेडाच होऊन त्यांच्या मागून फिरूं लागलों व शिकारपूर येथें असतांना त्यांच्या डोक्यास तेल लावून तें दररोज दाबून देण्यांत भूषण मानूं लागलों.'"

'सा सुंदर-वदना' ह्या लेखांत (रविवारची लोकसत्ता, १३ डिसेंबर, १९५९) शिल्पकार **र. कृ. फडके** लिहितात — "कऱ्हाडकरबुवा त्यांच्या मिष्कास हरदासी शैलींत सांगतात, 'गायनाचार्य रामकृष्णबुवा वझे ह्यांचें प्रथम सुश्राव्य गायन झालें. एक तर वझेबुवांसारखा वाघ, दरबारीसारखा गंभीर राग, साथीला बुवांचे शिष्य नटश्रेष्ठ केशवराव भोसले व पेंढारकर ही जोडी अन् त्यांत आणखी भास्करबुवांसारखे श्रोते! अशा वैभवी थाटाच्या मैफलीला दरबारी रागाचें स्नानच घडलें. कानाकोपऱ्यांतही दरबारी रागाची हवा बुसली होती! ... वझेबुवांच्या गाण्यानंतर भास्करबुवांना गाण्याची सविनय विनंती करण्यांत आली. ... साथीलादेखील कुणी नसावें ह्याची फिकीर न करतां, भास्करबुवांनीं मालकंस रागांतील 'सा सुंदर-वदना' ही चीज सुरू केली. इतक्यांत अचानकपणें बुवासाहेबांचे पट्टशिष्य कृष्णराव मास्तर साथीला येऊन बसले.' ... कऱ्हाडकरबुवा पुढें म्हणतात, 'वझेबुवा काय अन् भास्करबुवा काय; दोघेही मला वंदनीयच! कोणाचाही उणेपणा

अथवा मोठेपणा मला दाखवायचा नाहीं; पण आजही त्या बैठकीची आठवण झाली, म्हणजे असें म्हणावें लागतें, कीं तसा 'मालकंस' पुन्हा ऐकायला मिळाला नाहीं! एखाद्या देवालयाची प्रक्षाल पूजा व्हावी, असें वाटूं लागलें. 'दरबारी कानडा' नांवाचा राग तिथें गायला गेला होता कीं नाहीं, अशी अवस्था ह्या गुरु-शिष्यांनीं करून सोडली! ... अशाच एका जलशांतील ... वातावरणच नीरस बनलें होतें. पण आश्चर्याची गोष्ट अशी, कीं भास्करबुवांनीं मालकंस रागांतील 'सा सुंदर-वदन' ही चीज सुरू केली व रंगदेवता धावूनच आली. मंदावलेली दिव्याची रोषणाई झगझगीत दिसूं लागली. मैफलीचा आरंभींचा रुसवा क्षणार्धांत नाहींसा होऊन ती प्रसन्नतेनें भारली गेली! .... तबल्याच्या साथीला साथ-संगत-निपुण दत्तारामजी नांदवडकर हे होते. 'झपताला'च्या पहिल्याच समेच्या जागेपूर्वी आडमात्रेवर त्यांच्या कुशल हातानें बाह्यावर जी एक मर्मज्ञ थाप मारली, ती मी विसरूं शकत नाहीं. तेढ्या जागेवरील हा पेंचदार आघात गाणाराला सामान्यतः झेपणेंही मुष्कील! पण भास्कररावांच्या तपस्वी लयकारीला दत्तारामजींचा हा खूबसुरत इषारा उत्तेजकच ठरला. ... भास्कररावांच्या पश्चात् 'मालकंस' रागांतील ही चीज इतक्या प्रभावी ढंगानें माझ्या पण ऐकण्यांत आली नाहीं! .... अशा अविस्मरणीय संगीत-भास्कराचा लाभ ज्यांना घडला नसेल, ते रसिक श्रोते कांहींसे कमनशिबीच! त्यांना बुवासाहेबांच्या गुणप्रतिष्ठेची प्रशंसा कदाचित् अतिरंजक वाटली, तर त्यांत नवल नाहीं. वस्तुतः ती अवास्तव नसून उलट तिचें यथार्थ वर्णन शब्दानें करतां येणें दुरापास्तच! .... तृप्ति तर व्हावी अन् उलट अतृप्तिमात्र शिल्लक राहावी, तेंच श्रेष्ठ दर्जाचें संगीत. ... भास्करबुवांना 'मैफलीचा राजा' म्हणत तें यथार्थच. ... भास्कररावांसारखा मैफलीचा श्रोताही असाच विरळा! कुणाचेंही गाणें-वाजवणें बुवासाहेब मन लावून ऐकत. अन् त्याला प्रोत्साहन देत. ह्यामुळें ज्या मैफलीला भास्करबुवा उपस्थित, त्या मैफलीचा रंग कांहीं वेगळाच. ... नथ्थनखांसाहेबांचे चिरंजीव अबदुल्लाखां अन् महंमदखां आणि बुवासाहेब हे तिघेही शिष्यच. परस्परांचा लोभसंबंध इतका जिव्हाळ्याचा, कीं भास्कररावांच्या साथीला अबदुल्लाखां अन् महंमदखां मोठ्या अगत्यानें

बसत. असलें आपुलकीचें वैभव प्रत्ययास येणें दुर्मिळच नाहीं का? ... बुवासाहेबांच्या 'ठुमरी' साठीं श्रोते हपापलेले असायचे. पण खुद्द बुवासाहेब म्हणायचे, 'ठुमरी आम्हांला गावी लागते, पण ठुमरीचा असा खास ढंग वेगळाच!' मला वाटे खास ढंग आणखी वेगळा तो काय असायचा? पण त्याचाही प्रत्यय आला. संस्थानांतील एका वयोवृद्ध गायकाचा हिराबागेंत सकाळच्या वेळीं कार्यक्रम होता. ह्या उतारवयाच्या गायकाच्या गळ्याची तासीर अशी कांहीं मोहक होती, कीं तो जर पडद्याआड गाता, तर एखादी मध्यम वयाची गायिकाच गात आहे असें वाटावें! त्याची गायकी ठुमरीची होती. ... भास्करराव मला निक्षून म्हणाले, 'मास्तर, मी ठुमरीचा अस्सल ढंग म्हणतों तो हा बरं का.' ह्या गायकाची एक बैठक बुवासाहेबांनीं त्यांच्या बिन्हाडीं गुणग्राहकवृत्तीनें घडवून आणली. ... भास्कररावांनीं निरपेक्ष विद्यादान केलें. ह्या कामीं ते स्वतः किती परिश्रम घेत असत, हें मीं प्रत्यक्ष पाहिलें आहे. ... गृहस्थी व नोकरपेशाची संगीतबुभुक्षु मंडळी बुवासाहेबांच्या शिक्षणाचा लाभ घेण्यासाठीं फार उत्सुक असायची. ह्या प्रौढ वर्गाचें वयमान होतें चाळीस ते पन्नासपर्यंत. ... प्रौढ वयाच्या विद्यार्थ्यांनीं खडे स्वर लावले म्हणजे बुवासाहेब कांहींशा त्रस्त स्वरांत म्हणायचे, 'बाबांनो, स्वराला लोंच घेत जा.' भास्कररावांची शैली विशेषच लोंचदार असल्यामुळें त्यांना खडे स्वर स्वाभाविकच फार खटकत. ... भास्कररावांनीं उदार अंतःकरणानें विद्यादान केलें, पण दुसरे भास्करराव निर्माण होऊं शकले नाहींत. त्यांचें संगीत-वैभव त्यांच्याबरोबरच गेलें. मित्र गोविंदराव टेंबे भास्कररावांना गुरुस्थानीं मानीत, पण बुवासाहेब त्यांना म्हणत, 'तुम्ही म्हणतां मला गुरु, पण शिकत तर नाहीं.' भास्कररावांचें हें म्हणणें अक्षरशः खरें असलें, तरी गोविंदरावजींनीं त्यांना गुरुस्थानीं मानावें हें पण योग्यच. ... अल्लादियाखां-साहेबांविषयीं गोविंदरावांना जो परमावधीचा आदर वाटत असे, त्याचें उगम-स्थान भास्कररावच! ... गोविंदरावांच्या सुश्राव्य पेटी-वादनांतून त्यांचे गुरु भास्कररावच असल्याचा ध्वनि उमटत होता. ... भास्कररावांकडून कोणाही गायक-वादकाची निंदा अगर कुचेष्टा माझ्या ऐकण्यांत आलेली नाहीं. तसेंच एखाद्याची अवास्तव प्रशंसा त्यांना खपत नसे. ते स्वतः वाजवी तेवढी तारीफ

अगत्यानें करीत. एकदा ते मला म्हणाले, 'आमच्या अबदुल्लाचं गाणं ऐका. एकदा तो जमला किनई, म्हणजे त्याच्यावर गाणं मुष्कील!' केवढी समतोल ही प्रशंसा!... अलादियाखां ह्यांच्या थोरवीपुढें बुवासाहेब विनम्रच होत. अन् खांसाहेबांचाही बुवासाहेबांवर अत्यंत लोभ. खांसाहेबांच्या भेटींत बुवांची आठवण हटकून निघायची अन् ती गहिंवरूनच! एका भेटींत खांसाहेब जड अंतःकरणानें म्हणाले, 'आतां ह्या उतारवयांत गाणं कुणाला ऐकवायचं मीं? भास्कर नाहीं.'... दुसऱ्या एका भेटींत खांसाहेब जुनी आठवण काढून सांगूं लागले, 'ग्वालेरला होता मोठा जलसा. त्यांत बाळकृष्णबुवांसारख्या नामवंत गायकांचीं गाणीं झालीं. एक दिवस भास्करचाही कार्यक्रम ठेवला होता. त्या वेळीं भास्कर तरुण वयाचा. त्यामुळें स्वाभाविकच तो काय गाणार, असंच वाटलं असावं सर्वांना. पण भास्करचं गाणं ऐकल्यावर बाळकृष्णबुवांनीं तर मिठीच मारली भास्करला!'... अपरिमित संगीतभक्ति, कष्टसाध्य कलोपासना, प्रदीर्घ तपस्या, गायनाचा रियाज सतत चालू ठेवण्याची आस्था, गुणग्राहकता, विद्यादानाचें औदार्य, रसिक अन् सोज्वळ वृत्ति, इत्यादि बुवासाहेबांचा गुणमहिमा संगीत-तज्ज्ञांनीं लक्षांत बाळगण्यासारखाच आहे. भास्कररावांचें नांव चिरंजीव होण्यांतील बहुमोल रहस्य ह्याहून वेगळें तें काय असायचें!... 'संगीत-भास्कर' ही सार्थ उपमा एका प्रसंगीं पं. विष्णु दिगंबर ह्यांनींच सन्मानपूर्वक योजिली होती."

पं. बाळकृष्णबुवांचे शिष्य **अनंत मनोहर** लिहितात — "१८९६ सालीं कै. भास्करबुवा ह्यांची भेट मिरज येथें झाली. आम्ही त्या वेळीं शिकत होतों. नंतर १९०१ सालीं सातारा येथें श्री. कै. दादासाहेब करंदीकर ह्यांच्या घरीं दहा-पांच गवयांचा गायनाचा कार्यक्रम होता. त्या वेळीं त्यांचें तास दोन तास गायन ऐकण्याचा व ऐकवण्याचा योग आला होता. मी गात असतां वरचेवर प्रसन्नता दाखवणें, 'वाहवा' म्हणणें, शिफारस करून दुसरा राग गाण्यास सांगणें, ह्यांवरून त्यांच्या मनाचा मोकळेपणा मजला स्पष्ट दिसून आला.... भास्करबुवांसारख्या प्रसिद्ध गवयानें मी विद्यार्थी-अवस्थेंत असतांना माझ्यासारख्याकडून एक चीज अप्रसिद्ध रागांतील ऐकतांच, ती चीज दहा-पांच वेळ म्हणून घेऊन, लिहून, बसवून घेतली, हें आश्चर्य होय,

असें मला वाटलें ; परंतु त्यांचें एकंदर चारित्र्य पाहिलें असतां, त्यांनीं शेवटपर्यंत विद्याभिलाष सोडला नाहीं, व्यासंग कमी केला नाहीं, दररोज चार-पांच तास तरी मेहनत करीत असत. ... ही कला वाढविण्याची पराकाष्ठा केली होती. हा त्यांच्या अंगचा सद्गुण सर्वत्र अनुकरणीय नाहीं, असें कोण म्हणेल ! ... भास्करबुवांच्या गाण्याचा रंग, जमावट, अवघडपणा आणि तयारी अत्यंत प्रशंसा करण्यासारखी असे. वाटेल तो इसम गाऊन गेला, तरी त्याच्या नंतर ह्यांच्या गायनाची छाप सर्वत्र बसत असे. अशा वेळीं ते कोणाही गायकाचा उपमर्द किंवा टाकून बोलणें, मर्मभेद करणें, इत्यादि गोष्टी त्यांच्या स्वभावांत कधींही दिसून आल्या नाहींत. ह्या अवगुणांपासून सुटलेले लोक क्वचित् असतात. हा मनाचा मोठेपणा, गर्व-ताठा नसणें, हे प्रशंसनीय गुण त्यांच्या ठिकाणीं भरपूर असत, हें विशेष होय ! ”

२ ऑगस्ट, १९०६ च्या पत्रांत कै. **गोपाळराव सुळे**, कॉंट्रॅक्टर लिहितात — “ आपल्या कलेंतील सर्वोच्च पारंगततेबद्दल धारवाडची जनता भास्करबुवा बखले ह्यांस सुवर्णपदक देऊन सत्कार करीत आहे. त्या वेळीं त्या कलेंतील प्रभुत्वाप्रमाणेंच त्यांचें सौजन्य, उत्तम आचार, आनंदी वृत्ति, थोर चारित्र्य ह्यांजबद्दलही त्यांचा गौरव करणें इष्ट आहे. मुंबईंतही बुवा ह्याच अनेक गुणांनीं लोकप्रिय आहेत. सामान्यतः कलावंतांत न आढळणारें उत्कृष्ट शील व अत्यंत सुसंस्कृत वृत्तीनें भास्करबुवा सर्व समाजाला प्रिय झाले आहेत. ह्या सत्कारप्रसंगीं मी स्वतः उपस्थित राहूं न शकलों, तरी मी मनानें त्या सत्कारांत पूर्णपणें सामील होत आहें. ”

**रामभाऊ पुणेंकर**, कलेक्टर कचेरींतील सेवानिवृत्त हेडक्लार्क, धारवाड, लिहितात —“ कृष्णराव मोघे ह्यांची बदली झाली त्या निमित्त १९०७ मध्यें हा समारंभ झाला. ... बळवंतराव सहस्रबुद्धे, शं. बा. करंदीकर, भास्कररावजी जठार, हेर्लेकर, पित्रे, मणेरीकर, वगैरे गायन-प्रेमी मंडळी मैफलीला होती. संध्याकाळीं ४ नंतर गाणें सुरू झालें. गाणें सुरुवातीलाच अतोनात रंगलें. प्रथमतः ‘ गौडसारंग ’ रसभरित झाल्यावर भीमपलासी रागाची आलापदारी सुरू झाली. ‘ नाद समुद्रको ’ हा ख्याल सुरू होता. अस्ताई भरतांना असे कांहीं गोड व मधुर स्वर लागले, कीं अगदीं नकळत साहजिकपणें

श्रोते, बुवा, सारंगीवाला, तबलजी, वगैरे सर्वांच्या नेत्रांतून आनंदाश्रु गळूं लागून, गाणें अकस्मात् थांबलें. हा प्रकार काय झाला म्हणून जो-तो एकमेकांकडे पाहूं लागला. प्रो. भास्कररावजींना विचारतां ते म्हणाले, 'आम्ही नेहमीं गातों, पण क्वचितच असे हृदयभेदी व अंतःकरण भरून टाकणारे खरे-खरे मधुर व गोड स्वर लागून श्रोते तल्लीन होऊन जातात.'"

प्रो. **गुरुरावजी देशपांडे**, गवई, धारवाड, ह्यांजकडून — "शेवटचें गाणें सन १९२१ मध्यें 'देवल क्लब' तर्फे कोल्हापूर मुक्कामीं माझ्या ऐकण्यांत आलें. त्या दिवशीं संध्याकाळीं बुवासाहेबांचें जें गाणें झालें, तें फारच अप्रतिम. तसलें गाणें क्वचितच ऐकायला मिळायचें. हजारांवर श्रोतृजन जमले होते. पूरिया-धनाश्री, श्री, यमन, बागेश्री, अडाणा, तिलककामोद असले प्रचारांतले रागच, पण ते इतके अपूर्व, जोरदार व परिणामकारक रीतीनें गायले, कीं सर्व श्रोते अगदीं तल्लीन होऊन गेले. गाणें संपतांच गायन-सम्राट् अल्लादियाखांसाहेबांनीं 'वा! भास्करराव, काय उत्तम गायलां!' म्हणून त्यांची मोठ्या प्रेमाच्या उमाळ्यानें पाठ थोपटली. कै. गायनाचार्य प्रो. भास्करबुवा ह्यांच्या गान-नैपुण्याबद्दल अनेक गुणीजनांनीं मान्यता दिली आहे. ह्या ठिकाणीं माझें स्वतःचें मत देण्यापेक्षां माझे गुरुजी कै. गायनाचार्य वझेबुवा ह्यांचें त्यांच्या गाण्यासंबंधानें किती श्रेष्ठ मत होतें, तें नमूद करणेंच सर्वथा विहित व उचित आहे. कै. भास्करबुवांची आठवण निघाली, कीं ते वारंवार म्हणत, 'ते फार सुंदर गात असत. मोठ-मोठे मुसलमान गवयीसुद्धा प्रो. भास्कररावजींसारखा रंगदार व रसिक गवई आम्हीं ऐकला नाहीं, असें म्हणत असत व अद्यापही म्हणतात. चांगल्या गुणी व विद्वान् लोकांजवळ विद्या शिकण्याचा त्यांचा अखेरपर्यंतचा हव्यास लक्षांत घेतां, त्यांच्या गायन-विद्येच्या प्रेमाबद्दल व निष्ठेबद्दल फारच कौतुक वाटतें. त्या विद्येमध्यें ते इतके असामान्य प्रवीण असूनही विद्यार्थ्याप्रमाणेंच त्यांच्या मनाची सरणी असे. ... गवयी धंद्यांतील गुणी लोकांमध्यें समान गुणीजनांविषयीं इतकी सहानुभूति, प्रेमळपणा, गुणज्ञता व औदार्य क्वचित्च दृष्टीस पडतें. ह्या बाबतींत भास्करबुवांचा कित्ता सर्व संगीत-व्यवसायी लोकांनीं गिरविण्यासारखा आहे. प्रो. भास्करबुवांसारखा तेजस्वी हिरा

गेल्यावर आमच्यासारख्यांनीं तरी कशाला राहावें !' ...... 'आमच्या राहाण्याचें काय काम व उपयोग !' असें डोळयांत अश्रु आणून ते केव्हां-केव्हां म्हणत. ... तानरसखांचे चिरंजीव उमरावखां, मोजुद्दीनखां, मियांजान हेही भास्करबुवांची फार तारीफ करून त्यांना मान देत. .... जम्मूला काश्मीरच्या महाराजांसमोर वझेबुवांचें दोन-तीन तास खूप तयारीचें गाणें झाल्यावर मोजुद्दीनखां ह्यांना महाराजांनीं गायला सांगितलें. त्यांनीं भैरवींतली ठुमरी सुरू केली. 'त्यानें असा अपूर्व रंग बांधला, कीं माझं इतक्या श्रमानें गायलेलं गाणं लोपल्यासारखंच वाटलं.' असल्या तयारीच्या लोकांनाही भास्करबुवा दाद न देणारे होते. ह्या उद्गारांवरून प्रो. भास्कररावजींसंबंधानें गुरुवर्य वझेबुवा ह्यांना किती प्रेम, आदर व आपलेपणा वाटत होता, ह्याची कल्पना येईल."

**पी. एस्. शिरूर** (म्हैसूर मिल फॅक्टरीचे मॅनेजर, गायक शिष्य) लिहितात — "१९११ पासून १९१७ पर्यंत मी मुंबईत कॉलेजमध्यें विद्याभ्यास करीत असतां भास्करबुवांचा ज्यास्त परिचय होण्याचा सुयोग मला लाभला. आणि जितका-जितका त्यांचा परिचय जास्त झाला, तितक्या प्रमाणानें माझी त्यांच्याबद्दल असलेली पूज्यबुद्धि वाढत गेली. मला पूर्वी बुवा एक मोठ्या दर्जाचे गवय्ये इतकेंच वाटत होतें आणि त्यांच्या कलेबद्दल फारच आदर वाटत असे. पण जेव्हां त्यांच्या सहवासांत मी येऊं लागलों, तेव्हां ते एक सरळ हृदयाचे, प्रेमळ आणि आपल्या विद्येविषयीं अतुल भक्ति, उत्साह असलेले गृहस्थ, असें मला आढळून आलें. त्यांच्या गाण्यांत जी एक अपूर्व गोडी भरलेली असे, तिचें रहस्य त्यांच्या विद्वत्तेंत जितकें होतें, तितकेंच त्यांच्या प्रेमळ स्वभावांतही आहे, असें माझ्या निदर्शनास आलें. गाणें ऐकणारा कोणीही असो, लहान मुलगा असो किंवा मोठा मनुष्य असो, जर त्याला गाण्याची खरी गोडी असेल, तर त्याला आपल्या गाण्यानें खूष करण्याची ह्या थोर पुरुषाची उमेद कांहीं अवर्णनीय असे. .... कै. भास्करबुवांची विद्वत्ता जितकी दांडगी होती, तितकीच त्यांची नम्रताही प्रशंसनीय होती. त्यांच्या तोंडून चुकूनसुद्धा दुसऱ्या गवयांची निंदा मीं ऐकलेली नाहीं. 'मला काय येत आहे ? ह्या अफाट गान-समुद्रांतून

एक-दोन थेंब काय ते मला मिळाले आहेत. ’ असें ते म्हणत. ‘ कालाच्या वाळवंटावर गारगोट्या गोळा करणारा मी एक बालक आहें. ’ ह्या न्यूटनच्या उक्तीची मला आठवण झाली. त्यांची ही नम्रता दिखाऊ आणि वरपांगी नव्हती, हें मला त्यांच्या निकट सहवासामुळें माहीत आहे. ‘ गान-सरस्वतीचा मी एक भक्त ’ ह्या भावनेंत ते अखेरपर्यंत राहिले व अहंकाराचा वारा त्यांना शिवला नाहीं. ‘ यथा नयति कैलासं नगं गानसरस्वती । तथा नयति कैलासं न गंगा न सरस्वती ॥ ’ असा एक श्लोक माझ्या वाचण्यांत आलेला आहे. ह्या श्लोकाप्रमाणें योग्यांना जी सद्गति मिळते, तीच सद्गति गान-सरस्वतीनें ह्या आपल्या निस्सीम भक्ताला दिली असावी, अशी माझी पक्की समजूत आहे. .... ह्या थोर पुरुषाची कीर्ति हिंदुस्थानांत कायम राहून, आमची गायनकला चिरंजीव होवो, अशी सर्वोत श्रेष्ठ योगी परमेश्वराजवळ प्रार्थना करून, ही वाक्-कुसुमांजलि भास्करबुवांच्या कीर्तिरूपी मूर्तीस समर्पण करतों. ”

इंदूरचे **रामूभय्या दाते** लिहितात — “ मला फक्त त्यांचें दर्शन व त्यांच्या अलौकिक, सर्वांगीण, दमदार गायकीचेंही ओझरतें दर्शन होण्याचें भाग्य इंदूरला लाभलें. ते कांहीं तरी अद्भुत होते. .... माझ्यापेक्षां अधिक भाग्यवान् अशा माझ्या ज्येष्ठ पिढीकडून व विशेषतः त्यांतील नामांकित कलाकारांकडून मला बुवासाहेबांचें जें गुणवर्णन ऐकायला मिळालें, त्याचा सारांश असा — मरहूम अल्लादियाखांसाहेब, फैयाजखांसाहेब व रजबअलीखांसाहेब ह्या श्रेष्ठ त्रयीकडून मीं जे प्रशंसोद्गार ऐकले, तेच येथें उध्दृत करीत आहें. त्या सर्वांचें बुवासाहेबांविषयीं एकमत होतें. कोणालाही न मानणारे रजबअलीखांसाहेब तर मला नेहमीं म्हणायचे, ‘ दातेसाहेब, हिंदूओंनें एकही गवय्या पैदा किया, जिसे हम सब मानते हैं, और वो था हमारा भय्या भास्करबुवा. ’ व हें नांव घेतांच त्यांचे डोळे पाणावत असत. हीच स्थिति अल्लादियाखांसाहेब व फैयाजखां ह्यांची होत असे. ”

**अनंत शंकर करंदीकर** — “ आपल्याला परमपूज्य असलेल्या व्यक्तीची नुसती आठवण मनांत येतांच आपणांस जो सात्त्विक आनंद होतो, तो अवर्णनीय असतो. आणि हा आनंद उत्पन्न करणाऱ्या

व्यक्तीचा मोठेपणा ह्यांतच दृग्गोचर होतो. गायनाचार्य गुरु भास्करबुवा बखले ह्यांच्या बाबतींत हेंच सांगायचें आहे. त्यांची आठवण हा माझा सात्त्विक आनंद आहे. हा आनंद शब्दातीत आहे; .... बुवा संगीताचार्य होतेच, त्याचप्रमाणें त्यांचें व्यक्तित्वही दांडगें होतें. संगीताप्रमाणेंच त्यांच्या व्यक्तित्वानें त्यांचें जीवन प्रकाशमान् झालेलें होतें. ... मीं आजपर्यंत अनेक बडे-बडे गायक पाहिले, पण विद्या-दान करण्याच्या बाबतींत बुवांच्या इतक्या भरमाप रीतीनें कोणीच करीत नसे. ते कमालीचे उदार होते. आपल्या संगीत-कलेचें दान ते दोन्ही हातांनीं करीत. आपल्याजवळच्या कलेचें त्यांनीं अन्नछत्रच उघडलें होतें. हें करीत असतां आपण कांहींतरी भरगच्च करीत आहोत, असें तर त्यांना कधींच वाटलें नाहीं. ... कित्येक वेळां तर रस्त्यांतून जातां-जातां ते मला माहिती देत, पलटे सांगत, त्या वेळीं ते इतके गुंगून जात, कीं आजू-बाजूचे लोक आश्चर्यानें पाहात आहेत, ह्याकडे त्यांचें यत्किंचितही लक्ष नसे. खरा कलावंत हा असा असतो. ... बुवांचें मोठेपण ह्यांतच आहे. स्वतःला विसरून जाणें म्हणजेच कला होय आणि हें बुवांमध्यें होतें. त्यांची थोरवी कशी आहे असें विचारलें, तर मी म्हणेन, कीं गात असतां ते अखिल सृष्टीला विसरून जात ह्यांतच ! स्वतः विसरून जात, शिवाय साऱ्या चराचर सृष्टीला डोलायला लावीत. .... ( १९१४–१५ च्या सुमारास सकाळीं ८ ते संध्याकाळीं ७॥ पर्यंत बुवा अहमदाबाद येथें आप्पाराव कोल्हटकरांच्या सूचनेवरून गात राहिले, ती आठवण. ) संध्याकाळीं ७॥ ला घड्याळ दाखवून जाणीव दिली, तेव्हां सकाळीं ८ ला लागलेली तंद्री भंगली. आम्ही वेळेचें भान इतकें विसरून गेलों होतों, कीं आंघोळ, जेवण कशाचीच आठवण नव्हती आम्हां कोणाला. तंद्रींतून जागे झाल्यावरही आजू-बाजूचें वातावरण तेच स्वर काढीत आहे कीं काय, असा भास व्हायचा. तंबोऱ्याची गवसणी, बाजूच्या भिंती, साऱ्या वस्तूंतून तेच स्वर निघताहेत कीं काय, असें वाटे. त्यानंतर आठ दिवस स्वर कानांत सारखे गुणगुणत असत. एक प्रकारच्या गोड वेडानें आम्ही उन्मोहित झालों होतों. सर्वत्र तेच सूर, तोच गंभीर निनाद ! ... धारवाडच्या असिस्टंट कलेक्टरांकडे बुवांचें गाणें होतें. बुवांनीं सुरुवातच ‘ भीमपलास ’ मधल्या ‘ अब तो बडी देर ’ ह्या गाण्यानें केली. बुवा

जों-जों रंगूं लागले, तों-तों श्रोतेही रंगूं लागले. ह्या गाण्यानें बुवांच्या वृत्ति इतक्या थरारून गेल्या, कीं त्यांच्या डोळ्यांतून सारखा अश्रुप्रवाह सुरू झाला. श्रोत्यांच्याही डोळयांतून अश्रु चमकूं लागले. ... मीं त्यांना विचारतांच ते गंद्गद स्वरांत बोलले, ' बेटा, आज माझ्या गुरूंची मला आठवण येत आहे. ते असेंच गायचे.' .... हें सर्व लिहीत असतां माझें अंतःकरण भरून आलें आहे. बुवा म्हणजे सबरंगी, सबढंगी चौकोनी चिऱ्यासारखे होते. ह्या महान् व्यक्तीविषयीं परमपद गुरुवर्यांविषयीं, ' काय म्यां पामरें बोलावीं उत्तरें। ' असें म्हणून त्यांच्या आठवणीनें पुनीत झालेली ही लेखणी खालीं ठेवतों."

भास्करबुवांचे गुरुबंधु **दादाबुवा निगोजकर** लिहितात —"उस्तादी गाण्याशिवाय बुवा लावणी, टप्पा, वगैरे फार उत्तम गात असत. माझे ते गुरुबंधु आज हयात असते, तर दुनियेला कांहीं अप्रतिम लाभ झाला असता. धन्य ते शिष्य व धन्य ते गुरुजी ! "

**बडे गुलामअलीं**ची लेखकानें घेतलेली मुलाखत — " भास्करबुवांच्या गुरुपरंपरेची माहिती मिळावी म्हणून मी बडे गुलामअली ह्यांस भेटायला गेलों असतां त्यांनीं फैजमहंमदखां हे घग्गे खुदाबक्ष ह्यांचे शागीर्द असावे, असा आपला अंदाज सांगितला व तो पूर्णतया खरा ठरला. ... भास्करबुवांचा परिचय व त्यांचें गाणें ऐकण्याचा योग आपणांस तरुण वयापूर्वींच कसा आला ह्याबद्दल खांसाहेबांनीं वृत्त सांगून भास्करबुवांबद्दल सर्व थोर गवयी लोकांत केवढा आदर व कुतूहल असे, ह्याविषयींही अनेक आख्यायिका सांगितल्या. .... बडे गुलामअलीखां ह्यांचे चुलते कालेखां व भास्करबुवा ह्यांचा अतिशय प्रेमादराचा संबंध होता. १९१२ च्या सुमारास कालेखां ह्यांस भास्करबुवांनीं गाण्याचें आमंत्रण दिलें व बिदागी काय द्यावी असें विचारलें. भास्करबुवांनीं बिदागीबद्दल विचारावें, ही गोष्ट कालेखांना आवडली नाहीं. ' मी गाण्याचे निदान पांचशें रुपये घेईन ' असें त्यांनीं म्हटलें. ' ही रक्कम देणें कठीण ' असें भास्करबुवांनीं म्हणतांच ' तर मग हजार रुपये घेईन. ' पुढच्या वाक्याला तर आंकडा दोन हजार, अडीच हजार असा त्यांनीं चढविला. शेवटीं भास्करबुवांनीं बिदागीची भाषा सोडून दिली. कालेखां व बडे गुलामअली ह्यांनीं भास्करबुवांच्या घरीं जेवायला

जायचें व नंतर गायचें असें निमंत्रण निश्चित झालें. आंबरस-पुरीचा बेत होता. ' पानांतील इतर पदार्थ नकोत, माझ्या ओंजळीनें मी आंबरस पितों, ' असें म्हणून कालेखांनीं स्वतःच्या ओंजळीनें एका दोन-तीन शेरांच्या पातेल्यांतील रस पिऊन टाकला. इतर पदार्थांस हात लावला नाहीं. बडे गुलामअलींनींमात्र सर्व पदार्थांचा समाचार घेतला. जेवणानंतर कांहीं वेळानें कालेखां दोन-तीन तास खूप रंगून गायले. बुवांकडून बिदागी घेण्याइतका परकेपणा कालेखांना मान्य नव्हता. तरीही मोठ्या आग्रहानें बुवांनीं त्यांना दोनशें रुपये व एक जरीचें वस्त्र अर्पण करून तें स्वीकारण्यास भाग पाडलें. ... बुवा स्वतःचे गुरु व गवयी लोकांची किती कदर करीत त्याविषयीं बोलतांना फैजमहंमदखांसाहेबांची पुढील कथा त्यांनीं सांगितली — भास्करबुवांचें लग्न झालें तेव्हां खांसाहेबांनीं भास्करबुवांना सांगितलें, ' नुसतं लग्न झालं असं काय सांगतोस ? एक दिवस पत्नीला घेऊन ये. तिच्या हातचा स्वयंपाक मला खाऊं दे. ' भास्करबुवांच्या पत्नीचें वय फक्त सात वर्षांचें होतें. गुरु-आज्ञा मानून बुवा पत्नीस गुरुगृहीं घेऊन गेले. तिनें थोडें शिजवून गुरुजींस जेवायला वाढलें. गुरुजींनींही खण-नारळ, वगैरे देऊन नव्या सुनेचा सत्कार केला. भास्करबुवा गुरूंना पित्यासमान मानीत. हिंदु-मुसलमान हा भेद त्यांच्या मनांत नव्हता. ... बुवांचीं अनेक मैफलींतलीं गाणीं बड्या गवयांच्या संगतींत स्वतः अठरा-एकोणीस वयाच्या सुमारास मीं ऐकलीं. भास्करबुवांच्या गाण्याबद्दल बड्या-बड्या गवयांना कल्पनातीत आदर असे. एकदा एका आलापांत वर्ज-पंचमाची छाया दिसली. स्वतःच्या गळ्यांतून चुकीचें वजन येतांच भास्करबुवांनीं चमकून समोर बसलेल्या बड्या उस्तादाकडे पाहिलें. त्यांनीं म्हटलें, ' भय्या, गलत स्वरकी छाया दिखाय दी. लेकिन आप फौरन समज गये. इसमें कोई खामी नहीं. आप स्वरके पूरे सच्चे उस्ताद है, यहही इससे जाहीर हुवा. समझदारके लिये सो खून माफ होते है. ' ..... बडे गुलाम ह्यांनीं मनवरअल्ली, वगैरे मंडळींस सांगितलें, ' भास्करबुवांना तोड नव्हती. ते असामान्य गायक होऊन गेले. ' "

**गणपतबुवा पाध्ये** ( हे ध्रुपद व टप्पा गाणारे विद्वान् गायक आमच्या घरीं भाडेकरू म्हणून राहात. त्यांच्यामुळें मला भास्करबुवांचें गायन अगणित

वेळां ऐकायला मिळालें. त्यांनीं कांहीं आठवणी सांगितल्या. पैकीं पहिली गंमत स्वतः भास्करबुवा हजर असतां मीं ऐकली. ) — " बुवा अमृतसरला जिथें उतरत, त्या सरस्वती-सराईच्या गल्लीजवळ लहान-थोर हिंदु-मुसलमान गवयी आले, कीं पायांतून चढाव काढून, रुमालांत गुंडाळून, कांखेंत ठेवीत व तिथून ' बंदगी ' करीत पुढें जात. रस्त्यांत कोणीं विचारलें, कीं ' खांसाहेब हें काय आहे ? ' तर उत्तर मिळे, ' अरे पंडतजी सराई में ठेहरे हुवे हैं, बेइज्जती थोडेही कर सकतें हैं ! ' ... जालंदरला भास्करबुवांची साथ बहुधा तेथील महान तबलजी मलंगखां करीत. पण समारोहांत रीत असे, कीं गायकासमोर चार-सहा नामांकित तबलजी बसत. गायक उत्तम लयकार असेल, तर क्रमानें एकेक उस्ताद तयारीचें तबला-वादन करी. भास्करबुवांनीं ह्या सर्व प्रकारच्या वादकांच्या लयीबरोबर चुरशीचें गाणें अनेकदा केलें, पण शेवटीं सभेनें ठरविलें, कीं हा पोरखेळ तबलजींनीं भास्करबुवांशीं खेळूं नये. बुवांना अत्यंत नरम, लयबाज, ढंगदार साथ पाहिजे. ज्यांना ती साधेल, त्यांनीं बुवांची साथ करावी. पण तेथील सर्वश्रेष्ठ विद्वान् लयकार मलंगखांनाच हा साथीचा मान मिळे. मलंगखां हे भास्करबुवांचे परमभक्त होते. बुवांचा मुक्काम जालंदरांत व पंजाबांत असेतों मलंगखां भास्करबुवांच्याच मुक्कामाच्या खोलींत कायम ठाण मांडून असत. .... बुवा पंजाबांत रस्त्यांतून जाऊं लागले, कीं गवयी, त्यांचीं बायका-मुलें, बुवांच्या पायांवर लोळण घेत. पाय घट्ट पकडून ठेवीत. बुवांना गांवांतून रस्त्यांत जाणें-येणें नको करून टाकीत. बुवांना विलक्षण संकोच वाटे. बुवा प्रत्येक गवयाला उठवून स्वतःच्या खांद्याला खांदा लावून भेट देत. ... अशा अगणित कथा मीं भास्करबुवांच्या बैठकींत ऐकल्या आहेत. त्या सर्वांचें सार एकच. बुवा स्वतःच्या कलेनें कलावंतांचीं मनें जिंकीत. जाणकार त्यांचे भक्त बनत. "

भास्करबुवांचे जामात **श्री. धामणकर** ह्यांनीं सांगितलेल्या आठवणी — " एकदा ' ब्राह्मणसभे ' त गाणें चालू असतां बैठकींतील किटसनच्या दिव्यांत कांहीं कीट अडकून दिवा विझला. थोड्याच वेळांत दिव्याला पिन करून दिवा प्रज्वलित करण्यांत आला. अंधार झाल्यामुळें थोडा वेळ गाणें थांबलें होतें. भास्करबुवा हसत सभेला म्हणाले, ' पूर्वींचे गवयी दीप राग

गाऊन दिवे लावीत असत. आमच्या गाण्याचा प्रताप इतका अजब, कीं आम्ही गात असतां दिवे विझतात.' बुवांनीं गाण्यांत किंचित् काळ आलेलें विघ्न विनोदी वृत्तीनें हसून साजरें केलें. तंबोरे चालूच होते. बुवांच्या ह्यानंतरच्या आलापांनीं वातावरण केवळ प्रफुल्लच नव्हे तर प्रकाशमान् केलें. .... भारताचे एक अग्रगण्य शिल्पकार प. वा. गणपतराव म्हात्रे ह्यांनीं मुंबईत १९२१ च्या सुमारास सँढर्स्ट पुलावरून चौपाटीकडे जातांना, ह्यूजेस रोडपलीकडील कोपऱ्यावर स्वतःसाठीं एक सुंदर इमारत बांधली. ह्या इमारतीच्या वास्तुशांतीचा मुहूर्त ठरून त्या वेळीं श्री. भास्करबुवा बखले ह्यांचें गायन व्हावें, अशी योजना ठरली. बुवांचें गाणें अचानक ठरल्यामुळें साथीदार मंडळींशीं बुवांची भेट-गांठ होऊं शकली नाहीं. बुवांनीं तंबोऱ्यासाठीं स्वतःचे शिष्य बापूराव केतकर, तबल्यासाठीं दत्ताराम, वगैरे मंडळींस ठरल्या वेळीं श्री. म्हात्रे ह्यांच्या नव्या इमारतीवर पाठवावें, अशी घरीं व्यवस्था करून बुवा श्री. म्हात्रे ह्यांजकडील वास्तुशांतीच्या पूजेस गेले. बुवांच्या साथीची मंडळी म्हात्रे बिल्डिंगचा पूर्ण पत्ता न घेतां, चौपाटीच्या जवळ नवीन बांधलेली भव्य सुंदर इमारत सहज सापडेल ह्या कल्पनेनें मलबार हिलच्या वरच्या टोकापर्यंत जाऊन आली. शेवटीं नक्की पत्ता मिळून साथीदार मंडळी पाऊण तास उशिरां म्हात्रे ह्यांच्याकडे येऊन दाखल झाली. साथीदार म्हात्रे ह्यांच्या स्टुडियोंत पोंचले तेव्हां भास्करबुवांनीं डाव्या हातानें डग्गयावर ताल धरून, उजव्या हातानें तंबोरा वाजवून, ऐन मुहूर्ताच्या वेळीं प्रार्थना-गीताचें गायन सुरू केलें होतें. साथीची मंडळी उशिरां आली, तरी जराही न रागावतां, बुवांनीं साथ मिळतांच अतिशय प्रसन्नतेनें गाणें खूप रंगविलें. जणूं काय कांहींच घडलें नाहीं असें मानून, बुवा खूप रंगून गायले. ही स्थितप्रज्ञ अवस्था शिल्पकार गणपतरावांचे आवडते गवई भास्करबुवा ह्यांनाही लाभली होती. दोघेही अजोड कलावंत. दोघेही आपल्या कलेंतील योगी, थोर विभूति होते. बुवांच्या गाण्यानें सर्व पाहुणे अतिशय खूष झाले. शिल्पकार गणपतराव, त्यांचे दाते मित्र माधवमहाराज, 'स्कूल ऑफ आर्ट' मधील कांहीं मंडळी व डॉ. भाजेकर, वगैरे मुंबईतील अगणित थोर लोक वास्तुशांति-समारंभास आले होते."

शास्त्री हॉलमध्यें शिकणारे **एक विद्यार्थी** लिहितात — " भास्करबुवा स्वतःच्या विद्यार्थ्यांना प्रत्येक पलटा शेकडों वेळां घोटायला सांगत. विद्यार्थी अर्थातच कंटाळत. साधारण स्वरोच्चार ठीक झाला, साधारण तालाचा लयीचा डौल साधला, कीं पलटा घोकायचा विद्यार्थी कंटाळा करीत. एकदा बुवा स्वतःच्या तीन-चार विद्यार्थ्यांना घेऊन पहाटे ५॥ च्या सुमारास शास्त्री हॉलमधून निघाले. भेंडीबझार भागांत त्या काळीं बडे गुलामअलींचे चुलते कालेखां राहात. त्यांच्या बिऱ्हाडीं बुवा विद्यार्थ्यांसह जाऊन पोंचले. कालेखांचा स्वतःचा रियाज चालू होता. एक तानेचा पलटा खांसाहेब अतिशय काळजीपूर्वक आळवून पुनः पुनः म्हणत होते. ' त्यांचा रियाज चालू आहे. आपण जरा चक्कर मारून येऊं. आतां त्यांच्या अभ्यासांत व्यत्यय नको. ' असें म्हणून भास्करबुवांनीं स्वतःच्या विद्यार्थ्यांना दोन मिनिटें घराबाहेरूनच तो पलटा ऐकवला व नंतर ते त्यांना घेऊन इतरत्र फिरायला गेले. पुन्हा दोन-तीन तासांनीं बुवा विद्यार्थ्यांना घेऊन परत कालेखांसाहेबांकडे आले, तरी तोच तान-पलटा चालू होता. पहिल्याइतक्याच हिरिरीनें रियाज चालू होता. तानेंतला स्वर न् स्वर दाणेदार, स्पष्ट व योग्य दर्जाचा लागत होता. बुवा विद्यार्थ्यांना घेऊन पुन्हा थोडा वेळ बाहेरच उभे राहिले. नंतर थोडा वेळ गेल्यावर आंत गेले. बुवा व खांसाहेबांचें थोडें अनौपचारिक बोलणें झालें. नंतर बुवांनीं खांसाहेबांस सांगितलें, कीं ' पहाटे ५॥ पासून ९॥ पर्यंत आपला एकच पलटा चालू आहे, हें विद्यार्थ्यांना दाखवायला घेऊन आलों होतों. ' हजारों वेळां एकच आरोह-अवरोह किंवा तान सावधानतेनें व दक्षतेनें घोटल्याशिवाय त्या तानेचा डौल, सफाई, परिपूर्णता हीं साध्य होत नाहींत, हें विद्यार्थ्यांच्या मनावर ठसावें, म्हणून भास्करबुवा त्या दिवशीं घरीं रियाज न करतां पहाटेचे फिरायला निघाले होते. स्वतः भास्करबुवा अहोरात्र अखंड रियाजांत मग्न असत. शिकवणीच्या रूपानें असो, स्वतःची उजळणी म्हणून असो वा समोर कोणी दोन श्रोते आहेत म्हणून असो, बुवांच्या गळ्याचा प्रवाह अखंड चालू असे. ह्या अखंड डोळस रियाजानें त्यांना स्वरसिद्धि प्राप्त झाली. त्यांच्या स्वराला तेज आणि प्रकाश लाभे.

त्यांचें गाणें केवळ कानांतच नव्हे, तर श्रोत्याच्या मनांत कायमचें घर करून राही. ''

**श्री. चाफळकर** चित्रकार ह्यांनीं सांगितलेली एक आठवण —
'' भास्करबुवा जालंदरचा महोत्सव आटोपून दिल्लीस आले. तेथें त्यांना काश्मीरच्या महाराजांचे मुख्य मंत्री जम्मू-काश्मीर भागांत गायनाचें आमंत्रण करण्यासाठीं भेटले. त्या जमान्यांत काश्मीरपर्यंत नीट सडक नसे. अजूनही डोंगर व जंगलें ह्यांमुळें पंजाबांतून काश्मीर भागांत जाणें-येणें बरेंच धोक्याचें आहे. चढ-उतार, डोंगराचीं वळणें व दऱ्यांवरील पूल हे अनेकदा अपघाताला कारण होतात. ह्या साहसाला बुवा तयार होईनात, परंतु मुख्य मंत्र्यांनीं फारच आग्रह धरल्यामुळें त्यांच्याबरोबर काश्मीरला जायचें त्यांनीं कबूल केलें. खेचरांवर व गाढवांवर सामान लादून आणि घोड्यावर बसून बरेंच अंतर काटायचें होतें. एका भयंकर खोल, हजारों फुटांच्या दरीवर फळ्या टाकून एक कच्चा पूल केलेला होता. तो ओलांडून गेल्यावर पलीकडे पुन्हा नीट सडक होती. हा सर्व खडतर मार्ग पाहून भास्करबुवांनीं काश्मीरच्या पंत-प्रधानांस म्हटलें, 'मंत्रीमहाशय, आपल्या खास आग्रहाखातर मी ह्या भयावह प्रवासास सिद्ध झालों खरा, पण मजवर पत्नी, मुलगी, वगैरे अवलंबून आहेत. ती मंडळी हजाराहून अधिक मैल दूर आहेत. मला अपघातांत मरायचंदेखील स्वातंत्र्य नाहीं. मी माझ्या कुटुंबाच्या रक्षणाची जबाबदारी कोणावर टाकीन, असं माझं कुणी नाहीं. मलाच जगलं पाहिजे व बायको-मुलींस पोसलं पाहिजे. मी आपला परत जातों.' 'पण बुवासाहेब, मी तुम्हांला स्वतःच्या खांद्यावर घेऊन पुलापलीकडे नेतों. आपण काळजी करूं नका.' महामंत्री म्हणाले. 'एका मराठी गायकासाठीं आपल्यासारख्या एका राज्याच्या महामंत्र्यानें स्वतःचा जीव धोक्यांत घालावा, हें मला प्रशस्त वाटत नाहीं.' भास्करबुवा म्हणाले. 'बुवासाहेब, एका राज्याचा महामंत्री अपघातांत मेला, तर त्याची जागा पटकावण्यासाठीं अनेक राजकारणी लोक टपून बसलेले असतील. कदाचित् मी अपघातांत मेलों, तर आमच्या राज्याला माझ्यापेक्षांही अधिक हुशार व हितकारक महामंत्री मिळेल, पण भास्करबुवांना कसलाही अपघात झाला, तर त्यांच्या तोलाचा दुसरा गायक

भारताला सहज मिळायचा नाहीं. मिळेल कीं नाहीं हेंही सांगतां येणार नाहीं. ’ भास्करबुवा महामंत्र्यांचा हात धरून फळ्यांचा पूल ओलांडून गेले. काश्मीरच्या राजघराण्याशीं भास्करबुवांचा संबंध अमरण टिकला, एवढेंच नव्हे, तर बुवांच्या मृत्यूनंतर मास्तर कृष्णराव ह्या बुवांच्या शिष्यालाही काश्मीरचें आदरपूर्वक आमंत्रण आलें. ”

**प्रो. माणिकराव ठाकूरदास** ह्यांच्या आठवणी — ( दादरच्या ‘ विश्वसंगीत ’ ह्या कॉलेजचे प्रिन्सिपल प्रो. माणिकराव हे भास्करबुवांचे शिष्य यशवंतराव ठाकूरदास ह्यांचे चिरंजीव. लहानपणापासून त्यांस वडिलांकडून भास्करबुवांच्या जीवनांतील अगणित किस्से ठाऊक आहेत. ते त्यांच्या तोंडून ऐकतांना गाण्याच्या मैफलीसारखी रंगत येते. ) “ भास्करबुवांच्या मृत्यूनंतर बारा-तेरा वर्षांनीं बडोदें दरबारचे गायक फैयाजखां हे मुंबईस व नंतर पुण्यास आले होते. त्यांच्या कांहीं बैठकी ह्या काळीं पुण्या-मुंबईच्या रसिकांना ऐकायला मिळाल्या. पुण्याच्या ‘ बडोदा असोसिएशन ’ तर्फे फैयाजखांसाहेबांची एक मैफल गोखले हॉलमध्यें झाली. चहापानाच्या वेळीं प्रो. माणिकराव व त्यांचे मित्र शिंदे ह्यांनीं पुण्यांत ‘ भारत गायन समाजां ’ त येण्याबद्दल खांसाहेबांना आमंत्रण दिलें. ‘ भास्करबुवांच्या ‘ समाजां ’ त मी अवश्य येईन. भाई भास्कररावांच्या पत्नींना – भाभींना – मला भेटलंच पाहिजे. ’ असें म्हणून खांसाहेबांनीं आमंत्रण स्वीकारलें. दुसऱ्या दिवशीं खांसाहेब ‘ समाजां ’ त आले. बुवांच्या पत्नीला भेटले. नंतर ‘ समाजां ’ तील बुवांच्या तसबिरीला वंदन करून ते म्हणाले, ‘ हा एक आमच्यांतला सिंह गेला, ( हममेंसे एक शेर गया ) आणि स्वर व गाण्यांतील रौनक नाहींशी झाली. ’ मुसलमान गवयी भास्करबुवांची आठवण झाली, कीं जाति-धर्म-भेद विसरून ह्या महान् कलाकाराला आदरांजलि अर्पण करीत. ... माझे वडील यशवंतराव, आजोबा, आदि मंडळी साताराकडची राहाणारी. साताऱ्चे महाराज व त्यांचे बंधु हे गायनाचे शौकीन असत. महाराजांना भास्करबुवांचें गाणें अतिशय आवडे. त्यांच्या बंधूंना अबदुलकरीमखांसाहेबांचें गाणें प्रिय असे. दोघा भावांमध्यें चुरस असे. प्रत्येकजण आपल्या आवडत्या गवयाची अधिक तारीफ करायचा. एकदा

असाच वादविवाद होऊन दोघांचीं गाणीं एकाच मैफलींत करावीं, असें ठरलें. प्रथम भास्करबुवा गायला बसले. त्यांनीं ‘ मुलतानी ’ राग इतक्या गौरवानें आळवला, कीं मैफलीला एक विलक्षण कैफ चढला. अब्दुलकरीमखांसाहेबांनीं त्या मैफलींत गाण्याऐवजीं दुसऱ्या दिवशीं गायचें ठरविलें. पहिली रात्र भास्करबुवा गायले. दुसऱ्या दिवशीं अब्दुलकरीमखांसाहेबांनीं ‘ भीमपलास ’ खूपच रंगविला व बैठक रंगली. दोन्ही कलाकारांत वेगवेगळें कौशल्य असल्याचा प्रत्यय आला. ... माझें व मुबारकअल्लींचें बोलण्यावरून बोलणें निघालें. मास्तर कृष्णरावांत कांहीं असाधारण चमक दिसते, त्यावरून भास्करबुवांच्या शिकवणीची आठवण येते. ते सूर व तो गुरुचा कायदा किती भव्य होता, ह्याबद्दल मुबारकअल्ली अतिशय रंगून आठवणी सांगत. ... मुबारकअल्ली ह्यांचे वडील, कराचीचे बडे उस्ताद गामणखां, ह्यांनीं पंजाबांत भास्करबुवांचें गाणें ऐकलें होतें. ते मुलांना सांगत, कीं ‘ गाण्यांतील सौंदर्य व विद्येचं वैभव पाहायचं असलं, तर पुण्याच्या पंडित भास्करबुवांचंच गाणं ऐकलं पाहिजे. ’ मुलांना हें गौरवाचें बोलणें पटत नसे. भास्करबुवांचें सिंधमध्यें जाणें सुरू झाल्यावर, मुबारकअल्लींना भास्करबुवांची गांठ घेणें शक्य झालें. स्वतः तंबोरे, वगैरे साहित्य घेऊन मुबारकअल्ली भास्करबुवांस भेटले व त्यांना गाणें ऐकवण्यास आपण आलों आहोंत, असें सांगूं लागले. मुबारकअल्ली हे गामणखांसारख्या विद्वान् गवयाचे चिरंजीव व शिष्य हें जाणून भास्करबुवांनीं मोठ्या गौरवानें त्यांचें गाणें ऐकलें व कौतुक केलें. पण मुबारकअल्लींच्या मनांत त्वेष होता. त्यांनीं स्वतःचें गाणें दोन तास रंगल्यावर, भास्करबुवांस गाण्याचें आव्हान दिलें. बुवांनीं तंबोऱ्यांचे स्वर उतरवून, स्वतःच्या आवाजाला अनुकूल करून घेतले. मुबारकअल्ली पाहातच राहिले. ‘ एवढ्या रंगलेल्या गाण्यानंतर स्वर उतरवून हे भटजी काय गाणार ! ’ असा ते स्वतःशीं विचार करीत असतांच बुवांनीं तंबोरे अतिशय सुस्वर लावले व स्वतःचा स्वर त्या तंबोऱ्यांच्या स्वरांत मिळविला. मुबारकअल्लींना पहिलाच आश्चर्याचा धक्का बसला. इतके सुंदर मिळलेले तंबोरे व त्यांत एकजीव झालेला स्वर ऐकतांच मुबारकअल्लींचा गर्वाचा पारा

उतरूं लागला. बुवांचें गाणें तास-दोन तास ऐकल्यावर त्यांची खात्री पटली, कीं वडिलांनीं जी तारीफ केली, ती पूर्णतया यथार्थ आहे, मगमात्र भास्करबुवांचा गंडा बांधण्याचा त्यांनीं निश्चय केला. कांहीं दिवसांनीं भास्करबुवांना भेटावें म्हणून मुबारकअली अचानक मुंबईस आले व भास्करबुवांचें बिऱ्हाड कोठें आहे असें विचारीत, मुंबईतील रस्त्यांत हिंडूं लागले. दोन दिवस त्यांस कोणी माहितगार माणूस भेटला नाहीं. त्यांनीं स्टेशनवर एका मालीशवाल्याकडून अंगमर्दन करून घेतलें. भटकून-भटकून ते थकले होते. त्यांना तेथेंच झोप लागली. स्टेशनांत झोपलेल्या ह्या मुशाफिराचा रुमाल, कोट, वगैरे सामान चोरांनीं लांबविलें. मुबारकअलींचे सर्व पैसे, कपडे, वगैरे चोरांनीं नेलें होतें. ते पुन्हा वेड्यासारखे हिंडत केनेडी पुलावर आले असतां भास्करबुवा व्हिक्टोरियांतून शास्त्री हॉलकडून येतांना त्यांच्या अचानक नजरेस पडले व त्यांनीं आनंदानें 'पंडतजी–पंडतजी' म्हणून बुवांना हाका मारल्या. भास्करबुवांनीं गाडी थांबवून मुबारकअलींची चौकशी केली. चोरीचें वृत्त कळतांच बुवांनीं त्यांस नवीन कपडे, पैसे, वगैरे दिले व प्रेमाचा पाहुणचार दिला. मुबारकअलींची बुवांवर किती गाढ भक्ति जडली होती, त्यासंबंधीं त्यांचें रेडियोवरील भाषण प्रसिद्ध आहे. ....
कर्नाटकांत धारवाड येथें भास्करबुवांचे अनेक भक्त होते. त्यांत * * * हे वकील विशेष रंगेल व हौशी होते. एकदा त्यांनीं होळी-पौर्णिमेनिमित्त भास्करबुवांचें गाणें रात्रीं दहाच्या सुमारास ठेवलें. ह्या प्रसंगीं बुवांचे अखेरच्या काळांतले पट्टशिष्य श्री. बापूराव केतकर हे बुवांबरोबर तंबोऱ्याच्या साथीला होते. त्यांनीं ही आठवण गुरुबंधूस अनेकदा सांगितली. बुवा व त्यांचे साथीदार वकीलसाहेबांच्या घरीं रात्रीं गाण्याच्या वेळेवर साजासह जाऊन पोंचले, तेव्हां वकीलसाहेबांच्या दिवाणखान्यांत एका नामवंत तमाशांतील कोल्हाटणीचें लावणी-गायन अतिशय रंगांत आलें होतें. गाणें ऐन रंगांत आलें असतां भास्करबुवा व त्यांचे साथीदार गाण्याच्या वेगळ्याच मैफलीसाठीं तेथें येऊन पोंचल्यामुळें सर्वच मंडळी मोठ्या पेचांत पडली. वकीलसाहेबांनीं बुवांस प्रार्थना केली, कीं रंगलेलें लावणीचें गाणें कांहीं काळ ऐकल्यावरच मग शास्त्रीय बैठक सुरू करावी. बुवांच्या शिष्यवर्गास व खास बुवांचें गाणें

ऐकायला आलेल्या निमंत्रितांस हा प्रसंग फार अप्रशस्त वाटला. पण बुवांनीं खेळाडू वृत्तीनें लावणीची मैफल ऐकायचें कबूल केलें. सुमारें मध्यरात्रीपर्यंत त्या कोल्हाटणीनें आपल्या कौशल्याची कमाल केली. पण वकीलसाहेबांनीं मध्यरात्रीस कोल्हाटणीचें गाणें बंद केलें व नंतर बुवांस गाण्याची सुरुवात करण्याची विनंती केली. बुवांनीं त्या कोल्हाटणीस आपलें गाणें ऐकण्यास थांबण्याचा अतिशय आग्रह केला. आपल्या गाण्याच्या दिवशीं वकीलसाहेबांनीं दुसऱ्याच मोठ्या गवयाचें गाणें ठरविलें हें पाहून बाईचाही अभिमान दुखावला होता. बुवांच्या आग्रहाला त्यांनीं नाइलाजानें मान दिला. त्या बुवांचें गाणें ऐकायला बसल्या. बुवांनीं पंधरा मिनिटांत ईश्वर-प्रार्थनेदाखल बागेश्रींतील एक ख्याल आटोपला व बाईंना अधिक थांबण्याचा पुन्हा आग्रह करून ‘ पंच कल्याणी घोडा अबलक ’ ह्या प्रसिद्ध लावणीनें मैफलीस सुरुवात केली. भास्करबुवांनीं विद्यार्थी-दशेंत भाऊराव व त्यांचे बंधु अप्पाराव कोल्हटकर ह्यांचा अद्‌भुत लावणी-संग्रह वर्षानुवर्षें गोडीनें ऐकलेला. बुवांनीं त्या मैफलींत वेगवेगळ्या ढंगाच्या इतक्या अद्‌भुत लावण्या वकीलसाहेबांस व त्या कोल्हाटणीस ऐकवल्या, कीं ती गाणारी बाई स्वतःचा राग व अपमान विसरून सकाळपर्यंत बुवांच्या लावणी-गाण्याच्या श्रवणांत रमली. सकाळीं बुवांना उस्ताद म्हणून वंदन करूनच बाईंनीं बुवांचा निरोप घेतला. वकीलसाहेब तर बुवांचे भक्तच होते. त्यांना बुवांच्या ह्या अज्ञात पैलूचा लाभ झाल्यानें अतोनात आनंद झाला. वकीलसाहेबांकडे नंतरही बुवांच्या कितीतरी मैफली झडल्या. बापूसाहेब केतकर ही आठवण एक अद्‌भुत अनुभव म्हणून मोठ्या रंगांत येऊन सांगत. ... सातारला भास्करबुवांची सासुरवाड होती, त्याचप्रमाणें त्यांचे एक शिष्य यशवंतराव टाकूरदास ह्यांचे वडील विनायक जगन्नाथबुवा टाकूरदास हेही शनिवार पेठेंत राहात. हें घर गायकांचें म्हणून परंपरेनें प्रसिद्ध असे. पुण्याच्या सुंदराबाई, गोदूबाई वाघ, आदि गायिका ह्याच घराण्यांत शिकल्या. श्री. टाकूरदास ह्यांजकडे, बाळकृष्णबुवा, वझेबुवा, भास्करबुवा, वगैरे बडे गायक जमून एक अखंड मैफल सुरू होत असे. वयानें लहान म्हणून, किंवा अंगच्या जातिवंत विनयानें, भास्करबुवा अशा थोरांच्या मैफलींत नेहमीं प्रथम गायला बसणें पसंत करीत. ‘ माझ्यानंतर

गाणारा हा कोण शेकोजी ? ’ अशी दर्पयुक्त कल्पना त्यांच्या मनांत कधींच येत नसे. एकदा अशीच एक सुंदर मैफल झडली. भास्करबुवांनीं ‘ छायानट ’ इतका डौलदार सजविला, कीं बाळकृष्णबुवांच्या तोंडून सहजच प्रशंसेचे उद्गार बाहेर पडले, ‘ आमचं सरळ साधं बाळबोध गाणं, भास्करबुवांचं गाणं अतिशय कठीण – ते आहेत ‘ अवघडदास ! ’ हें गाणं दुसऱ्या कुणालाच झेपायचं नाहीं ! ’ बाळकृष्णबुवा भास्करबुवांना नंतर नेहमींच ह्या पदवीनें पुकारीत. मुंबईत ‘ गांधर्व महाविद्यालया ’ च्या परिषदेंतही भास्करबुवांचा उल्लेख त्यांनीं ‘ अवघडदास ’ असाच केला. विष्णु दिगंबरांच्या सर्व शिष्यांना ते म्हणत, ‘ अवघडदास भास्करबुवा गात आहेत. ऐकून ठेवा. असलं गाणं पुन्हा ऐकायला मिळायचं नाहीं. जिवाचे कान करून ऐका. ”

**मास्तर कृष्णराव** ह्यांची लेखकानें दादर येथें घेतलेली मुलाखत ( १० डिसेंबर, १९६५ ) — “ फैजमहंमदखांसाहेब ह्यांचा फोटो मिळत नाहीं व ज्यांनीं त्यांना अनेकदा पाहिलें, अशा लोकांनीं केलेल्या वर्णनांतही अनेकशः फरक पडतो. संगीत-कला-निधि मास्तर कृष्णराव हे बडोदें मुक्कामीं ‘ गंधर्व नाटक मंडळी ’ असतांना आपल्या गुरुजींचे गुरु म्हणून फैजमहंमदखांसाहेबांस भेटायला गेले. १९१६ ते १९२० च्या दरम्यान केव्हांतरी ही भेट झालेली. मास्तर कृष्णराव वर्णन करतात, ‘ फैजमहंमद हे काळे-सांवळेसे, लहान चणीचे, त्या वेळीं ऐशीं ते ब्यायशीं वर्षांचे वृद्ध गृहस्थ होते. ते मानेशाहीवत्ति सफेत पगडी वापरीत. बारावंदी अंगरखा व मध्यम सैल पायजमा वापरीत. चुडीदारप्रमाणें घट्ट नाहीं व अगदीं रुंद ढिला नाहीं, असा पायांना सैलसर बसणारा पायजमा खांसाहेब वापरीत. ह्या वयांतही खांसाहेबांची दृष्टि उत्तम होती, मात्र किंचित् कमी ऐकूं येई. पण जरा स्पष्ट बोललें, तर फार न ओरडतांही त्यांस ऐकूं येत असे. फैजमहंमद ह्यांस अगदीं थोडी टोकदार दाढी असे. गालांवर केस कमी व डॉ. झाकिर हुसेन ह्यांची असते, तशी ते आखूड आटोपशीर दाढी ठेवीत. ’ ...... खर्जाच्या मेहनतीबद्दल विचारतां मास्तर कृष्णरावांनीं पुढें दिल्याप्रमाणें वर्णन केलें, तें श्रीमती हंसाबाई पटवर्धनांनीं लिहून पाठविलेल्या वर्णनाशीं पूर्णपणें जमतें.— ‘ पूर्ण उघडे होऊन, फक्त लंगोट-काचा कसून खांसाहेब स्वर-साधना

शिकवीत. स्वराचा उगम बेंबीपाशीं होऊन हृदय, मुख व नासिका ह्या चार स्थानीं स्वर कसा निर्माण होतो, तें खांसाहेब प्रयोगशः शिकवीत. स्थिर, केवळ खर्ज लावून, बराच वेळ मेहनत करणें, हें खांसाहेबांस पसंत नसे. ते गमकेनें खर्जांतल्या स्वरावर स्थिर होत व एकंदर सुरावर्तींच्या मेहनतीचाच खर्ज लावून स्वर स्थिर करणें, हा एक भाग असे. खांसाहेब जमिनीकडे तोंड वळवून गमकेनें खर्ज स्वरावर स्थिर झाले, तर त्या स्वरांचा प्रतिध्वनि उमटे. जुनीं माणसें अघटित मेहनत करीत – अलादियाखांसाहेब ताम्रभस्म पचावें म्हणून अर्धा शेर तूप खात – मला गमकेनें खर्ज लावण्याची भास्करबुवांनीं जी तालीम दिली, तीमुळें माझी खोकल्या-कफाची (ब्राँकायटिसची) व्यथा कायम गेली.' .... बोलण्यावरून कृष्णरावांनीं गिरगांव नाक्यावरील 'महाराजा' बिल्डिंगमध्यें झालेल्या भास्करबुवांच्या एका मैफलीचें वृत्त सांगितलें. भास्करबुवांच्या गायकीचें त्यांत अत्यंत मार्मिक वर्णन आहे. 'महाराजा' बिल्डिंगमधील ह्या मैफलीला विठ्ठलदास जरीवाले, वगैरे बुवांचे चहाते लोक उपस्थित होते. अमृतसरचे पंजाबी सारंगी-नवाज मम्मनखां बुवांचें गाणें प्रथमच साथीस बसून ऐकत होते. बुवांनीं मैफलीची सुरुवात आडाचौतालांतल्या भूपाच्या चिजेनें केली. 'ततत्तत घन' ही चीज बुवा पाऊण तास गायले. अस्ताईची मांडणी मोठ्या डौलानें चालू होती. आलाप व स्वरांच्या भरण्यानें मैफल अतिशय रंगली. बुवा तारस्वराला जाऊन मिळाले. श्रोते आनंदानें बेहोष झाले. सारंगी-नवाज मम्मनखांही खूप रंगले होते. त्यांना राहवेना. त्यांना बुवांच्या गाण्याची कल्पना नव्हती. ते एकदम म्हणाले, 'भास्करबुवा, आपने विलंपत आला दर्जेकी करदी — क्या विलंपत गाये आप! मुष्कीलसे ऐसा खूब-सुरत गाना सुननेमें आता है. अगर आपके गलेमे तानपलटा होता, तो और दर्जेका गाना बन जाता.' सारंगी-नवाज मम्मनखांचें हें भाष्य ऐकून बुवांनीं अंतरा म्हटला व द्रुत चीज सुरू केली. बऱ्याच वेळानें बुवांनीं एक दीड सतकाची तान इतक्या डौलानें घेतली, कीं मम्मनखां आश्चर्यस्तिमित झाले. त्यांना काय बोलावें तें सुचेना. त्यांनीं शेवटीं आपली भलीमोठी सारंगी खालीं ठेवली व बुवांना

म्हटलें, 'आपने तानपलटा ऐसा गाया, की मै भूल गया, आप विलंपत गाये, या नहीं.' गाण्याच्या एकेका अंगानें मम्मनखां बेहोष होत गेले."

फैजमहंमद ह्यांच्या शिष्या श्री. **हंसाबाई पटवर्धन** लिहितात— "गुरुवर्य फैजमहंमदखां ह्यांचा इतिहास असा, कीं मूळ पुरुष पैसारंग. त्यांचे चिरंजीव ढेलारंग. पै. ढेलारंग ह्यांचा आवाज अतिशय मधुर होता व अमृताचा वर्षाव होतो कीं काय, असा भास श्रोतेवृंदास भासायचा व त्यांत सर्व श्रोतेजन मूर्च्छित होऊन जायचे. त्याचप्रमाणें नथ्थन पीरबक्ष ह्यांच्या गुरुघराण्यांतही स्थाई व अंतरा इतकाच सुमधुर व महशूर असे, असें मी माझे गुरुजी पै. फैजमहंमद ह्यांच्याकडून ऐकलें होतें. आमच्या पै. गुरुजींचे वडील पै. फत्तेहमहंमदखां ह्यांस दोन फरजंद होते. त्यांपैकीं, पहिले पै. घसीटखां व दुसरे माझे गुरुजी पै. फैजमहंमद. पै. घसीटखां १२ वर्षांचे असतांना माझ्या गुरुजींचे वडील पैगंबरवासी झाले. तेव्हां गुरुजींचें वय अवघें सहा महिन्यांचें होतें. वडील पैगंबरवासी झाल्यानंतर माझ्या गुरुजींना व घसीटखांना त्यांचे काका महंमदबक्ष ह्यांनीं संगीत शिकविलें. नंतर कोणी दुष्ट इसमांनीं घसीटखां ह्यांच्या खाण्यांत शेंदूर घातला. त्यामुळें त्यांचा आवाज साफ गेला व ते सतार वाजवूं लागले. सतार वाद्यावर त्यांचें अद्‌भुत प्रभुत्व होतें. बडोदें संस्थानांत त्या वेळीं कै. खंडेरावमहाराज होते. त्यांनीं बऱ्याच गुणिजनांना राजाश्रय दिला. माझ्या पै. गुरुजींच्या पाहाण्यांत त्या वेळीं असे बरेच गुणिजन राजाश्रयाला होते. पै. हकीम हाशमअलीखां त्या वेळच्या बडोदें संस्थानांत नांवाजलेले हकीम राजाश्रयाला होते. त्यांनीं खंडेरावमहाराज ह्यांस खास विनंती करून पै. फतेहमहंमदखां ह्यांस बोलाविलें व त्यांचें गाण्यांतलें कुशल प्रभुत्व पाहून, खूष होऊन, त्यांनासुद्धा राजाश्रय दिला. माझे गुरुजी पै. फैजमहंमद बडोदें संस्थानांत (तिसरे) सयाजीराव गायकवाडमहाराज ह्यांच्या नोकरींत होते. कै. राजारामशास्त्री टोपे (टोपले ?) ह्यांच्याशीं आमच्या गुरुजींची संगीत-शास्त्रांतील नायिकाभेद, वगैरे विषयांवर बरीच चर्चा होत असे. आमच्या गुरुजींना संगीत-शास्त्रांतील नायिकाभेद ह्या विषयाचें उत्तम प्रकारचें ज्ञान होतें. तें ज्ञान गुरुजींनीं मला दिलें. तो मला दिलेला गुरुप्रसाद होय. आमच्या गुरुजींचे बडोदें येथें बरेच शिष्य होते. त्यांपैकीं, कै. भास्करबुवा

बखले, कै. गोविंदराव श्रीधर वैद्य ऊर्फ रोकडनाथ, कै. गोविंदप्रसाद गोपाळप्रसाद ऊर्फ गंगानंद ब्रह्मचारी, कै. रामचंद्र निगोस्कर, कै. परांजपे व मी स्वतः. आणखी पुष्कळ शिष्य होते. त्यांत माझा नंबर शेवटचा. फैजमहंमद हे इ. स. १९१७ च्या (?) रज्जब महिन्यांत पैगंबरवासी झाले. (तारीख माहीत नाहीं.) ते बडोदें येथें नागरवाडा, बहेचराजी रस्ता, ह्या ठिकाणीं राहात होते. पैगंबरवासी झाले त्या वेळीं त्यांचें वय सुमारें ८५ होतें. व माझें वय २४ होतें. गुरुजींस मृत्युसमयीं गलमिशा होत्या पण दाढी नव्हती. गुरुजीनीं स्वतःचा फोटो कोणास काढूं दिला नाहीं. माझ्याकडेही त्यांचा फोटो नाहीं. ब्ऱ्याच लोकांनीं गुरुजींचा फोटो काढण्याचा प्रयत्न केला, पण तो सफल झाला नाही. ते दिसायला काळे-सांवळे होते व बुटके होते. त्यांची चालण्याची गति मुंगीच्याच चालीची म्हणतात तशी होती. गुरुजींची सेवा थोडीफार करावी म्हणूनच मी माहिती देण्यास संमत झालें."

'भारत गायन समाजा'तील शिक्षक **दातार मास्तर** लिहितात — "एकदा क्लास चालू असतां श्री. मोरगांवकर दीक्षित वर्गात आले व गुरुवर्य बुवांची स्तुति करून म्हणाले, 'बुवा, तुमच्या शिकवणीमुळें माझा मुलगा अबदुलकरीमखांसाहेबांपेक्षांही चांगला गाऊं लागला आहे.' तेव्हां बुवांना राग येऊन त्यांनीं श्री. मोरगांवकर दीक्षित ह्यांची चांगलीच खरडपट्टी काढली. 'खांसाहेबांची बरोबरी कोणत्याच विद्यार्थ्याला साधायची नाहीं. कोणत्याच गवयाची तुलना व निंदा मी कधींच सहन करणार नाहीं.' वगैरे बोलून बुवांनीं दीक्षित ह्यांची बोळवण केली."

**पं. रामकृष्णबुवा वझे** स्वतःच्या आठवणींत भास्करबुवांबद्दल लिहितात — "त्यांचें तें लयीला येणें, ती गमक धमक, हीं अजूनही केव्हांतरी मी गातांना मला आठवतात व मधून-मधून तशा बोलताना व ताना मी घेतों. अशा वेळीं मला रोमांच आल्याशिवाय राहात नाहींत. ... त्यांचा आमचा एकोपा पुढें-पुढें असा झाला, कीं मी 'नाट्यकलें'त होतों व ते 'किर्लोस्कर'मध्यें होते. 'नाट्यकले'चें आणि 'किर्लोस्करां'चें नेहमीं वैर. तें वैर मीं काढून आमच्या 'नाट्यकलें'त एक मोठा जलसा केला. त्या जलशांत अबदुलकरीम, भास्करबुवा, एक बेंजूवाला व एक सरोदिया अशी

सर्वत्रांनीं मिळून ती रात्र चांगल्या रीतीची घालवली. त्या वेळचें भास्करबुवांचें गाणें अजूनही माझ्या लक्षांत आहे. पुणेंकरांच्यासुद्धा लक्षांत असेल. ह्या गोष्टीस फार तर २५ वर्षें झालीं असतील. ‘नाट्यकले’तील वासुदेवराव पटवर्धन हे गुणांचे फार चाहते होते. त्यांच्यामुळें ह्या जलशाचा योग आला.”

**बाबू श्यामनाथ गुर्टू**, ‘संगीताचार्य भास्करबुवा’ ह्या वृत्तांत धारवाड येथून लिहितात (मूळ मजकूर इंग्रजींत आहे. मी शब्दशः भाषांतर देत आहें.) — “एक दिवस झोहराबाई व मोजुद्दिनखां ह्यांचीं ग्रामोफोन रेकॉर्ड्स् ऐकून बुवा स्वतःचें गाणें ग्रामोफोनमध्यें नमूद करण्यास अर्धवट अनुकूल दिसले. माझ्याकडे बुवांनीं हीं रेकॉर्ड्स् ऐकलीं. बुवांची संमति मिळेल अशा आशेनें मीं ग्रामोफोन कंपनीशीं पत्रव्यवहार केला. ग्रामोफोन कंपनीचे मॅनेजर माझे मित्र होते. थोडीशी घासाघीस होऊन शेवटीं ग्रामोफोन कंपनीनें बुवांचीं १२ रेकॉर्ड्स् घेण्याची तयारी दर्शविली. शास्त्रीय व सुगम संगीताचीं गाणीं द्यावीं असें कंपनीनें सुचविलें. ११–८–१९११ रोजीं बुवांनीं चांचणीसाठीं मुंबईस यावें असें ठरलें. कांहीं कारणानें बुवा त्या चांचणीसही गेले नाहींत आणि कायम स्वरूपांत बुवांच्या गाण्याच्या मुद्रिका बनण्याची ही सुवर्णसंधि वायां गेली. मला अतिशय वाईट वाटलें. मुद्रिका बनल्या असत्या तर आज बुवांच्या अप्रतिम कौशल्याचा लाभ मिळाला असता.”

**सवाई गंधर्व** (लेखकानें लिहिलेली हकीकत)—“एक दिवस रामभाऊ तिन्हिसांजा घरीं आले, ते सरळ माझ्या आंतल्या खोलींत त्यांचे तंबोरे असत, तेथें जाऊन ‘मुंदरी मोरी का’, ‘काहे अब तुम आये’ ह्या मास्तर कृष्णरावांच्या चिजा म्हणत बसले. मी ऐकत उभा होतों. ते मला म्हणाले, ‘आज ह्या गाण्यांच्या मुद्रिका फाटकांच्या दुकानीं वारंवार ऐकल्या. आतां जोंपर्यंत स्वर व जागा लक्षांत आहेत, तोंपर्यंत त्या पाठ केल्या पाहिजेत.’ रामभाऊ त्या मुद्रिकांतील गाणें अगदीं मास्तरांच्याच वळणानें तासभर गात राहिले. शेवटीं आम्ही रात्रीच्या जेवणासाठीं निघालों, तेव्हां ते मला म्हणाले, ‘बाबुराव, ह्या गाण्यांत बुवांच्या कितीतरी जागा आहेत. माझी आयुष्यांतली सर्वांत मोठी महत्त्वाकांक्षा आहे, कीं भास्करबुवांसमोर गावं व त्यांनीं शाबासकी द्यावी. त्यांची शाबासकी मिळाली तर माझ्या गाण्याचं सार्थक

झालं असं मी मानीन. स्वतःला धन्य समजेन.' डेक्कन जिमखान्यावरील १९२१ मधील परिषदेंत रामभाऊंनीं अशी शाबासकी मैफलींच्या मंचावर मिळविली. भास्करबुवांनीं अगदीं त्यांच्या पाठीवर हात ठेवून ही शाबासकी दिली. माझ्या ह्या अनुभवांना श्री. देशपांडे ह्यांच्या ग्रंथांत दुजोरा मिळतो. ते लिहितात — 'कै. रामभाऊ – सवाई गंधर्व – ह्यांना खास तालीम अब्दुलकरीमखांसाहेबांची असतांना नुसतें ऐकून ऐकून कै. भास्करबुवांचा आसर माझ्यावर फार झाला होता, असें ते मनमोकळेपणानें सांगत.' भास्करबुवांच्या बरोबरीचे, खूपच तपस्या केलेले, खडतर जीवनानें तापट स्वभावाचे बनलेले रामकृष्णबुवा वझे भास्करबुवांच्या मैत्रीनें व प्रेमानें भास्करबुवांशीं लहान भावाप्रमाणें वागत. इतर कोणाचें सरळ बोलणें सहन न करणारे रामकृष्णबुवा भास्करबुवांचें रागावणें मुकाट्यानें ऐकून घेत. हव्या त्या बिनहिशेबी गाणाऱ्या-वाजविणाऱ्या माणसाकडूनही रामकृष्णबुवा चिजा उतरून घेत. भास्करबुवा म्हणत, 'कोठल्या फडतूस माणसाकडून चिजा घेतां, बुवा ! तुमच्याजवळची विद्या दहा जन्मांना पुरेल इतकी आहे. उत्तम वळणाच्या माणसाजवळची उत्तम चीज फक्त घ्यावी.' आमच्या घरांत श्री. भाटवडेकरांचे पाहुणे म्हणून रामकृष्णबुवा राहात. एक दिवस त्यांच्या व्हायोलिनला मीं नवीन तार बसवून दिली, तेव्हां त्यांनीं भास्करबुवांच्या ह्या रागावण्याची गोष्ट मला सांगितली. रामभाऊ (सवाई गंधर्व) ह्यांच्या बोलण्यावर एकदा रामकृष्णबुवा म्हणाले, 'भास्करबुवांजवळ गाणंच काय, इतर शंभर गोष्टी गवयांनीं शिकाव्या अशा आहेत.' तात्यासाहेब केळकरांच्या षष्ट्यब्द समारंभानिमित्त रामभाऊ त्यांच्या घरीं जाऊन रात्रीं गायले. 'तू है महमदसा', 'करीम नाम तेरो', वगैरे चिजा ते म्हणाले. तात्यासाहेबांना मराठी चिजा आवडतात हें जाणून त्यांनीं दरबारींतील एक मराठी पद म्हटलें, 'जातिकुसुमसम कोमला.' ते कमालीच्या तडफेनें व त्वेषानें गायले. न. चिं. केळकरांचे आप्त, हितचिंतक, सुमारें शें-दोनशें लोक मैफलीला आले होते. मध्यरात्रीनंतर चहा-कॉफीची विश्रांति चालू असतां, तात्यासाहेबांनीं रामभाऊंचा गौरव करून म्हटलें, 'रामभाऊ, मीं ह्या चिजा इतरत्र ऐकल्या, 'दरबारी' पण ऐकला, पण

तुमच्या गाण्यांत वेगळीच तडफ दिसली. इतरांच्या तोंडून कांहीं राग 'सुस्त' लागतात, रंगत मंद भासते.' रामभाऊंनीं उत्तर दिलें, 'मी ह्या कांहीं चिजा भास्करबुवांच्या पद्धतीनें गातों.' (रामभाऊंनीं क्षणभर हात जोडून डोळे मिटले. बुवांना मनोमन वंदन केलें.) रामभाऊ पुढें म्हणाले, 'भास्करबुवा कोणताच राग कंटाळवाणा होऊं देत नसत. त्यांच्या स्वरास्वरांत, आलापांत, जिवंत रंग असे. मला त्यांतला थोडा जरी अंश साधला, तरी मी स्वतःला कृतार्थ समजेन.' हे उद्गार मी बुवांच्या मृत्यूनंतर कितीतरी वर्षांनीं पुनः ऐकले. बुवांच्या मृत्यूनंतर रामभाऊ 'भारत गायन समाजां'त एका गुरुवारीं गायला आले. त्यांनीं बुवांच्या बैठकीच्या जागेला साष्टांग नमस्कार घातला. ते हॉलच्या दुसऱ्या टोकाला समोर बसले. म्हणाले, 'समोर रामाचं स्थान. मला हनुमानाची जागा मिळाली तर तें केवढं भाग्य.' रामभाऊ त्या रात्रीं रंगून गायले. बुवांची सेवा झाली म्हणून अतिशय खूष होते."

**गणपतराव बोडस,** 'माझी भूमिका' ह्या पुस्तकांतील उतारे— 'भारत गायन समाजा'ची व्यवस्था प्रथम टेंवे ह्यांच्याकडे होती. नंतर ते 'किर्लोस्कर कंपनीं'त आल्यावर ती नाना हर्डीकर ह्यांच्याकडे आली. १९१३ सालीं 'समाजा'ची स्थिति चांगली नव्हती. भास्करबुवा उत्तम गवई होते, पण व्यवस्थेचें काम त्यांच्याकडून पार पडण्यासारखें नव्हतें. म्हणून शिकविण्याशिवाय ते कांहीं करीत नसत. 'समाजा'ची बिघडलेली स्थिति सुधारून देण्याचें आश्वासन देऊन त्याचीं सर्व सूत्रें पंडितांनीं आपल्या हातीं घेतलीं. भास्करबुवांना दरमहा तीनशें रुपये पगार द्यायचा; बाकी जलसे, वगैरे करून 'समाज' कर्जमुक्त करायचा असें ठरविलें. सुरुवातीपासूनच 'गंधर्व कंपनी'शीं 'भारत गायन समाजा'चा संबंध जोडून घेतला. आमची बैठक भरवून पंडितांनीं सर्व हकीकत आम्हांस सांगितली आणि ज्या-ज्या गांवीं 'कंपनी' जाईल त्या-त्या गांवीं 'समाजा'चा जलसा झालाच पाहिजे, असें ठरविलें. भास्करबुवांबद्दल आम्हां सर्वांच्या मनांत आदर होताच. 'भारत गायन समाज' सुस्थितींत राहिला तर तेंही आम्हांला इष्टच होतें. नारायणरावांनीं एकदा एक गोष्ट मनावर घेतली, कीं कांहीं झालें

तरी ती पार पाडायची, अशी त्यांची इच्छा असे. आणि त्यांत 'आपल्या बाळासाहेबांनीं' जबाबदारी घेतली. मग नारायणराव वाटेल तें करायला कबूल झाले ह्यांत नवल काय? टेंबे भास्कररावांना गुरु मानणारे परंतु 'समाजा'चा सगळा कारभार पंडितांच्या हातीं, म्हणून प्रथम धरसोड करूं लागले. शेवटीं त्यांनीं संमति दिली. राहातां राहिलों मी. माझ्या मनांत जरी भास्करबुवांच्या गायन-विद्येबद्दल परमेश्वरतुल्य आदर वसत होता, तरी पंडितांच्या हातून 'समाज' कर्जमुक्त होईल असेंमात्र वाटत नव्हतें. म्हणून मीं गुळमुळीत उत्तर दिलें. नंतर 'समाजा'ची गंगाजळी तयार करण्यासाठीं 'कंपनी' नें दर मुक्कामीं एका प्रयोगाचें उत्पन्न 'समाजा' ला द्यावें असें एक पिल्लूं पंडितांनीं सोडलें. मगमात्र मीं एक अट घातली. ती ही, कीं 'समाजा' च्या आर्थिक स्थितीचा अहवाल दर सहा महिन्यांनीं आमच्याकडे आला पाहिजे. हेतु हा, कीं आमच्या श्रमांच्या पैशाचा विनियोग योग्य रीतीनें होत आहे कीं नाहीं, हें पाहावें. ही अट कोणालाही नाकबूल होण्यासारखी नव्हती. अर्थात् पंडितांनाही ती मान्य झाली. इतकें करूनही 'समाजा' चा अहवाल आम्हांला पाहायला कधींही मिळाला नाहीं. बरें, ही गोष्ट भास्करबुवांजवळ बोलण्याची सोय नव्हती. अशा रीतीनें 'भारत गायन समाजा' च्या कर्जाच्या खड्ड्यांत 'गंधर्व कंपनी' चे पैसे जाऊं लागले. शिवाय 'भारत गायन समाज' कर्जमुक्त झाला नाहीं तो नाहींच." [वस्तुस्थिति अशी होती, कीं बुवांच्या कष्टाचेही पैसे 'गंधर्व कंपनी' नें भास्करबुवांस दिले नाहींत. मृत्यूपूर्वी श्री. बोडस ह्यांचा 'भारत गायन समाजा' त सत्कार झाला, त्या वेळीं समाजाचे हिशेब दाखवून समाजाच्या अध्यक्षांनीं बोडस ह्यांस कबूल करण्यास भाग पाडलें, कीं 'गंधर्व कंपनी' नें 'भारत गायन समाजा' स व बुवांस मुळींच आर्थिक साहाय्य दिलें नाहीं.]

महामहोपाध्याय **दिलीपचंद्र वेदी** [नामांकित हार्मोनियम-वादक, भास्करबुवा व फैयाजखां ह्यांचे शिष्य. बुवांच्या सहवासांत ह्यांनीं प्रत्यक्ष पाहिलेल्या घटनांचें वृत्त येथें त्यांच्या हिंदी लिखाणाचा शब्दशः अनुवाद करून देत आहें. शक्य तों मूळचेच शब्द वापरण्याचा प्रयत्न केला आहे. ह्या लेखनांतील कांहीं तारखा चुकीच्या आहेत.] लिहितात — "स्वर्गीय

फैजमहम्मदखां ह्यांनीं घग्गे खुदाबक्ष व त्याचप्रमाणें हद्दूखांसाहेबांचे पिता ह्यांजपाशीं ध्रुपद व ख्याल-गायकीचें शिक्षण घेतलें. ह्यांना १९२० मध्यें बडोद्यांत मृत्यु आला.

" स्वर्गीय मियां नथ्थनखां आगरावाले ह्यांनीं आपले चुलते मियां गुलाम अब्बास व नंतर मियां घसीटखां व मियां ख्वाजाबक्ष ह्यांजकडे शिक्षण घेतलें. १९०१ मध्यें ह्यांचा म्हैसूरमध्यें देहान्त झाला.

" सुमारें ८८ वर्षांपूर्वी पंजाब प्रदेशांतील जालंदर नगरांत देवी-तलाव-मंदिराचे महंत बाबा हरिवल्लभगिरिजींनीं प्रतिवार्षिक एका संगीत-समारोहाची सुरुवात केली. ह्या प्रथेचा उद्देश असा होता, कीं वैदिक व गांधर्व-संगीताच्या ह्या प्राचीनतम केंद्रांत, पश्चिमोत्तर भारतांत भारतीय संगीताचा दर्जा पुन्हा उच्चतम व्हावा. हरिवल्लभ हे हुश्यारपूर जिल्ह्यांतील बिझवाडा येथील मूळचे रहिवासी होते. हे बाबाजी उत्तम ध्रुपद-गायकही होते. नंतर जालंदरला येऊन देवी-तलाव-मंदिराचे महंत स्वामी तुळजागिरी ह्यांचे हे शिष्य झाले.

" बाबा हरिवल्लभगिरिजींच्या स्वर्गवासानंतर जालंदरच्या जनतेनें पं. तुलारामजींना ह्या मंदिराचे महंत नेमलें. पं. तुलारामजींनीं हरिवल्लभजींचें कार्य बरेंच पुढें वाढवलें. आणि ह्या वार्षिक संगीत-समारोहाचें नांव ' हरिवल्लभ संगीत मेळा ' हें प्रसिद्ध झालें. ह्या मेळ्यांत भारतांतील सर्व शहरांतील प्रसिद्ध गायक भाग घेऊं लागले.

" पंजाबांत ध्रुपद-गायनाचा प्रचार फार होता. अमृतसर, तलवंडी, हरियाना, श्याम चौरासी, कपुरथळा हीं गांवें ध्रुपद-गायन-केंद्रें मानलीं जात. अमृतसरचे उस्ताद उत्तमसिंह, ग्वालेरच्या हद्दूखांचे शिष्य मियां बन्नेखां, पतियालाचे मियां अलीबक्ष व फतेहअलीखांसाहेब हे सर्व विख्यात ख्याल-गायक होते.

" १८९० ते १९०९ पर्यंत पतियाळाचे फत्तेअलीखांसाहेब पंजाबचे सर्वश्रेष्ठ ख्याल-गायक मानले जात. जालंदरच्या ' हरिवल्लभ संगीत मेळ्यां ' त स्वर्गीय पं. विष्णु दिगंबर पलुस्कर, बाळासाहेब गुरुजी, शंकरबुवा पंडित, वगैरे गायकांच्या ख्याल-गायनाची प्रशंसा अवश्य होत असे. पण ह्या प्रशंसेच्या मागून कांहीं लोक फत्तेहअलीखांची तारीफ करीत असत. डिसेंबर

सन १९०३ च्या वार्षिक संगीत मेळ्याच्या प्रसंगीं मेळ्याचे सर्वाधिकारी स्व. तुलारामजींनीं कै. पं. विष्णुबुवा पलुस्करजींना प्रश्न केला, 'ज्यांना आम्हीं आपल्या संगीत मेळ्यांत बोलवावें अशा दुसऱ्या एखाद्या महान् ख्याल-गायकाचें नाम सुचवाल का ?' पंडित विष्णु दिगंबरांनीं उत्तर दिलें, 'ह्या काळचे सर्वश्रेष्ठ ख्याल-गायक भास्कररावजी बखले आहेत, त्यांना पुण्याहून बोलवावें.'

"२५ डिसेंबर, १९११ रोजीं पंडित भास्करबुवा आपल्या मंडळींसह जालंदरला पोंचले. २६ डिसेंबरच्या रात्रीच्या समारोहांत त्यांनीं जवळ-जवळ ८,००० श्रोत्यांना 'हमीर' मधील दोन ख्याल ऐकवले. 'सुलझाय रही' व द्रुत ख्याल 'आवीं वे मैडर यार.' ह्यानंतर ह्याच रागाचा तराणा गाऊन त्यांनीं श्रोत्यांना मंत्रमुग्ध बनविलें.

"ध्रुपद-गायक विलम्बित आलापांवर खूप होते. ख्याल-गायक द्रुत तानांनीं हात उंचावून 'वाहवा' देत, तोंडानें 'सुभानअल्ला', वगैरे उद्गार काढीत 'आपल्याला तोड नाहीं', वगैरे शब्दांनीं तारीफ करूं लागले. पखवाज-वादक व तबला-वादक बुवासाहेबांच्या लयकारीची उसळून-उसळून स्तुति करीत. तात्पर्य हें, कीं आपापल्या अंगानें सर्वच तारीफ करूं लागले. गाणं संपल्यावर बुवांना हजारों गायन-प्रेमिकांनीं वेढलें, त्या कोंडाळ्यांतून बाहेर पडायला बुवांना पुरा एक तास लागला. कोणी चरण-स्पर्श करीत, तर कोणी साष्टांग नमस्कार घालीत.

"२७ डिसेंबर रोजीं सकाळच्या समारोहांत आढा चौतालांतील गुजरी तोडीमधील विलम्पत ख्याल 'जा जा रे पथिकवा' व द्रुत तराणा 'नादिर दिर तोम् तनाना' गाऊन बुवांनीं आपल्या कला-कौशल्यानें आदल्या रात्रीपेक्षांही श्रोत्यांना आश्चर्यचकित केलें. सर्व कलावंत अतिशयच प्रभावित झाले. ग्वालेरचे विख्यात ख्याल-गायक मिया हद्दूखांसाहेबांचे शागीर्द बाळासाहेब गुरुजी गद्गद झाले. भर सभेंत मोठ्यानें बोलले, 'भास्करराव पहिल्यापेक्षां तेरा पटीनें अधिक तयारीनें गायले.' ह्या वर्षी (१९०८) पंडित तुलारामजींनीं पंजाब व ग्वालेरच्या सर्व नामांकित कलाकारांना आमंत्रण

दिलें होतें. ह्या समारोहानंतर सरदार उबेराय बुवांना सियालकोटला घेऊन गेले. तेथील जनताही बुवांच्या अतुल कौशल्यानें मंत्रमुग्ध झाली.

"सियालकोटच्या मैफलीनंतर पंडित श्री. सातवळेकर ह्यांच्या खास निमंत्रणानुसार बुवासाहेबांनीं लाहोरच्या जवळ जवळ ७,००० श्रोत्यांना म्युनिसिपल बगीच्यांत आपलें मनोहर गाणें ऐकविलें. त्यांत पतियाळाचेही अनेक जाणकार होते. गायन ऐकवून बुवा श्रोत्यांना सदैव आपलेसे करून ठेवीत.

"२७ डिसेंबर, १९१८ रोजीं जालंदरच्या हरिवल्लभ मेळ्यांत बुवांनीं अनेक बाल-कलाकारांना ऐकलें; ज्यामध्यें दिलीपचंद्र वेदी हा एक होता. स्वतः दिलीपचंद्र व अमृतसरच्या सभेचे अध्यक्ष स्वर्गीय स्व. गु. स. मल्लजींच्या आग्रहावरून बुवांनीं दिलीपचंद्र वेदींचा स्वतःचा शिष्य म्हणून स्वीकार केला.

"१९१९ डिसेंबरचाही संगीत-समारोह प्रतिवर्षाप्रमाणेंच थाटानें साजरा झाला. ह्या वेळीं स्वर्गीय विष्णुबुवा पलुस्कर, रामकृष्णबुवा वझे, कृष्णराव शंकर पंडित, ह्यांशिवाय इतर अनेक गायक उपस्थित होते. २९ डिसेंबर रोजीं सायंकाळीं बुवांनीं मारवा राग गायिला. तंबोऱ्यावर मास्तर कृष्णराव होते. हा मारवा ऐकलेले जुने श्रोते अजूनही त्या संध्याकाळची आठवण काढतात.

"१९२० डिसेंबरमधील जालंदरचा जलसा आटोपल्यावर पतियाळा राज्याचे मुख्य मंत्री राजा दयाकिशन कौल ह्यांनीं पतियाळा नरेश भूपेंद्रसिंग्रजींना ऐकवण्यासाठीं भास्करबुवांना आमंत्रण दिलें. १ जानेवारी, १९२१ रोजीं सकाळीं बुवा आपल्या मंडळींसह पतियाळाला पोंचले. ३ जानेवारीच्या रात्रीं राजा कौल - प्रधान मंत्री - ह्यांजकडे पहिली मैफल झाली. त्या बैठकीला पतियाळा घराण्याचे नवघोषित संस्थापक मियां अलीबक्षसाहेब (जरनैल साहेब) हे उपस्थित होते. बुवासाहेबांनीं प्रथम राग 'पूरिया' (षाडव) मधील विलंबत ख्याल 'फूलन के हरवा' सुरू केला. त्यानंतर 'कामोद' व अलीबख्शसाहेबांच्या आग्रहामुळें नंतर 'दरबारी कानडा' विलंबित ख्याल 'तू ऐसो है करीम' और द्रुत ख्याल 'नयनसों नैन मिलाय राखूंगी' म्हटला. मियां अलीबक्ष मधून-मधून म्हणत होते, 'ही आहे

हद्दूखांसाहेबांची गमक तान, ही फैजमहंमदखांची खानापुरी आणि रागविस्तार, ही आहे रहिमतखांची बारीक फिरत आणि ही आहे मुबारकअलींची पेंचदार तान.' आणि राजासाहेबांकडे वळून ते म्हणाले, 'हुजूर! लोक म्हणतात, कीं अलीबक्ष कुणाची कधीं तारीफ करीत नाहीं, फार अभिमानी आहे. वास्तविक ते लोक मला खूष करणारं गाणंच गाऊं शकत नाहींत. माझी तर कल्पना होती, कीं आतां ख्याल-गायकी मरत आहे. पण खुदाची मेहेरबानी आहे, कीं पं. भास्कररावांच्या रूपानें एक अद्वितीय ख्याल-गायक जिवंत आहे. आतां ह्यांच्या बरोबरीचा ख्याल-गायक हिंदु पंडितांत व खांसाहेब लोकांतही मिळणार नाहीं. चारही अंगांनीं अत्युत्तम ढंगानें सजलेलं गाणं भास्करबुवांच्या कलेंत दिसतं. खुदा ह्यांना उत्तम तन्दुरुस्ती व दीर्घायुष्य देवो.'

"मियां अलीबक्षांचें वय ह्या काळीं अंदाजें ७७ होतें. पतियाळाचे प्रधान मंत्री राजा दयाकिशन कौल ह्यांनीं अल्लाबंदेखां, राजा महंतसिंहजी, त्याचप्रमाणें बरकतुल्लाखांकडून ध्रुपद दिलरुबा व सतार ह्यांची तालीम घेतली होती. राजेसाहेब थोर संगीत-मर्मज्ञ होते.

"ह्यानंतर बरोबर पंचवीस दिवसांनीं पतियाळा-नरेश भूपेंद्रसिंगजींनीं रात्रीं मैफलींत बुवासाहेबांचा राग 'अडाणा कानडा' व 'बसंत' ऐकला. महाराज अतिशय प्रसन्न झाले. बुवांच्या बरोबर तंबोऱ्यावर दिलीपचंद्र वेदी व तबल्यावर पंजाबचे विख्यात कलाकार मलंगखां होशियारपूरवाले होते. पुरा एक महिना बुवासाहेब पतियाळा राजवाड्यांत पाहुणे-दालनांत राहिले. रोज संध्याकाळीं नगरांतील कलाप्रेमी व कलाकार भेटायला येत. गाणेंही होई. सायंकाळच्या एका गाण्याच्या बैठकींत बुवासाहेबांकडून 'श्री' व 'मारवा' हे राग ऐकून मियांअलीबक्ष अतिशयच खूष झाले. त्यांचे स्वर्गीय गुरुबंधु फत्तेअलीखांचे चिरंजीव आशिकअली ह्यांच्या डोळ्यांत अश्रु आले.

"एका प्रसिद्ध हकीम-वैद्यजींनीं बुवासाहेबांस स्वरचित सरगम, गरमम, परगम आणि धरगम ऐकवली. हकीमजींचा मौलिक प्रयत्न खूप मनोरंजक होता. अलिबक्षांनीं बुवासाहेबांना स्वतःच्या बिऱ्हाडीं येण्याचें आमंत्रण दिलें. त्यांचा पुत्र अक्तरहुसेन ह्यांनीं 'तोडी' व त्यांची शिष्या हिराबाई

पतियाळावालीनें रामकलींत झपतालांतील ‘रात इकबातपर अखियां बदल गयी’ ही चीज उत्तम गायली. पतियाळाची ही यात्रा स्वास्थ्यप्रद व सर्व प्रकारें लाभदायक ठरली.

१९१२ ते १९२१ पर्यंत पंडित भास्करबुवा प्रतिवर्ष ‘होलिका-उत्सवा’साठीं अमृतसरला भेट देऊन हजारों संगीतपिपासूंची तहान आपल्या अनुपम गायनानें तृप्त करीत. बुवांना अमृतसरला आमंत्रण देण्याचें श्रेय दुर्गायाना मंदिर कमेटीचे अध्यक्ष लाला गुरुसहाय मल्लजींना आहे. लालाजींचें कलाकारांवर अतिशय प्रेम असे. त्यांचे बालमित्र त्यांना ‘गायकांचे मामा’ म्हणून चिडवीत. लालाजी बुवासाहेबांचे अनन्य भक्त होते. बुवांच्या गाण्यावर स्वतःचा जीव ओवाळून टाकण्यास ते सदा सिद्ध असत. ते बुवांना पंडतजी म्हणत आणि पंडित भास्करबुवांचें नांव ऐकतांच त्यांचा चेहरा प्रफुल्ल उमलत असे.

त्या काळांत अमृतसर हें गाण्याचें पंजाबांतील एक महत्त्वाचें केंद्र बनलें होतें. तलवंडी घराण्याचे शिष्य व ध्रुपद-गायक ह्यांची सर्व संख्या येथेंच वसति करून असे. स्व. उस्ताद उत्तमसिंहजी, हर्षसिंहजी, गंगासिंहजी आणि वैष्णवदासजी हीं नांवें त्यांत उल्लेखनीय असत. पतियाळा घराण्याचे प्रसिद्ध गायक मियां मेहरबान, भाई मोती, भाई आरुढा, उस्ताद महताबसिंग, हरिनामसिंग, भाई अमीरसारखे पखवाजी व तबलावादक ह्या सर्वांची वसति अमृतसर येथेंच होती.

सुप्रसिद्ध सीखरागी व रबाबी हरिकीर्तनकारांच्या जवळजवळ चौवीस मंडळ्या इतिहासप्रसिद्ध सीख गुरुद्वारा ‘श्रीहरि मंदिर’ मध्यें पहाटे ४ ते रात्रीं ११ पर्यंत रोज अखंड पाळी-पाळीनें हरिकीर्तन करीत. शिवाय तलवंडी, हरयाना, श्याम चौरासी, कपुरथळा, पतियाळा, लाहोर, इत्यादि शहरांतील प्रसिद्ध कलावंत होळीच्या उत्सवासाठीं प्रतिवर्ष अमृतसरला येत व त्यांत भाग घेत.

आठ हजार श्रोते व मंचावर जमलेल्या ह्या उत्तम कलावंतांच्या मध्यें भास्करबुवासाहेब बसले, कीं तारा-मंडलांत चंद्रमा शोभतो तसे ते दिसत. संगीताच्या गगनांत सदैव उजाळा देण्याचा गुण ‘संगीत-भास्कर’ बुवांचा

होता. दिवसा भास्कर व रात्रीं चंद्राप्रमाणें ते विराजत. आपण गायिलेल्या प्रत्येक रागांत रसिक श्रोत्यांचें हृदय जिंकायचें त्यांचें सामर्थ्य अद्‌भुत होतें. शंकरा, वागेश्वरी, बहार, जौनपुरी, देसी, ललित, भीमपलासी, बिहाग, मालकंस, आदि रागांनीं बुवा सर्वसाधारण श्रोत्यांवर जादू करीत, त्यांना भारून टाकीत.

एकदा कटरा चढतसिंह येथील बैठकींत बुवासाहेबांनीं ' मालकंस ' आणि ' बिहाग ' गाऊन लोकांस आनंदविभोर केलें. मास्तर कृष्णरावही बुवांबरोबर तंबोऱ्यावर आपल्या स्वरेल गायनाची साथ देत होते, आपल्या कलाकौशल्याची साक्ष देत होते. आज इतक्या वर्षांनींही जाणते-पुराणे श्रोते त्या बैठकीची आठवण ठेवून आहेत. त्या मैफली अविस्मरणीय होत्या.

दुसऱ्या दिवशीं मियां मेहरबान ह्यांच्या घरीं अमृतसरचे एक संगीत-मर्मज्ञ धनाढ्य शेख हबीबुल्लाखांच्या उपस्थितींत कोणी विद्वेषी खानदानी गायकानें पतियाळाच्या फतेहअलीखांसाहेबांची खूप वाखाणणी करून भास्करबुवांना त्यांजपेक्षां कमी दर्जाचे ठरविण्याचा धिटाईचा प्रयत्न केला. शेख हबिबुल्लांनीं ह्या बाबतींत निर्णय देण्याची विनंती मियां मेहरबान ह्यांस केली. तेव्हां मियां मेहरबाननीं स्पष्ट शब्दांत सुनविलें, कीं " जर माझे उस्ताद फतेहअलीखां जिवंत असते, तर त्यांनींही भास्करबुवांचें गाणें ऐकून मनःपूर्वक त्यांचीच प्रशंसा केली असती. " ह्या भाषणानें द्वेषज्वाला पाण्यानें विझावी तशी निमाली.

१४ मार्च, १९१९ च्या सकाळीं नऊ वाजतां अमृतसरच्या गुरुबागेंत पांच हजार जनसमूहासमोर शेख हबिबुल्ला ह्यांच्या मार्मिक भाषणानंतर संगीत-भास्करांनीं बालक दिलीपचंद्र वेदीच्या हातीं विधिपूर्वक गंडा बांधला.

१५ मार्चच्या सकाळीं मियां मेहरबानसाहेबांचे मर्मज्ञ शिष्य स्व. पं. कर्मचंदजींच्या बैठकींत बहोतशा संगीतज्ञांच्या समोर संगीत-भास्करजींनीं ललितचा ख्याल ' रैन का सुपना ' ऐकतांना मियां मेहरबान ह्यांना आनंदाश्रु आवरेनात. संगीत-भास्करजींच्या विलंपत बढतींत न्यासाची तान समेवर आली, कीं सर्व श्रोत्यांच्या डोळ्यांतून अश्रुधारा वाहात. ही विलंपत कशी होती ! हें गाणें, कीं तंतुवादन, कीं दोहोंचें मिश्रण, कीं संगीत-देवतेचा

प्रभात-संदेश, कीं संपलेल्या रात्रींतील सुख-स्वप्नांची मधुर स्मृति ? गायनाच्या ह्या बैठकीनंतर बुवा आपल्या मंडळींसह सिंध-शिकारपूरकडे गेले.

अमृतसरहून १५ मार्च, १९१९ रोजीं निघून बुवा १६ मार्च रोजीं रात्रीं शिकारपूर (सिंध) येथें पोंचले. बुवांच्या बरोबर स्व. शंकरबुवा अष्टेकर, दिलीपचंद्र वेदी, होते. ह्या प्रदेशांत बुवा आतां दुसऱ्या खेपेस आले होते. त्यांचें प्रथम आगमन १९१८ सालीं होऊन महिन्यापेक्षां अधिक काल त्यांचा तेथें मुक्काम होता. बुवांच्या अनुपम गायकीचा लाभ शिकारपूरस्थांना झाला. तेथील संगीत समाजांत पं. रावळदास, बिहारीलाल, नंदलाल मसन्द, सुंदरदास व सेठ कीमतराय हे प्रमुख मानले जात.

ह्या काळीं शिकारपूरच्या हिंदु समाजानें विवाहोत्सव प्रसंगीं गायकवर्गावर बहिष्कार पुकारला होता. अन्य प्रसंगीं धनाढ्य व गोरगरीब हिंदु रंगेल लोक गायकांच्या कलेचा मनसोक्त आनंद लुटीत. परंतु विवाह-उत्सव, मुंडन, इत्यादि शुभ समारंभांत हळू-हळू गायक व कथ्थकांना आमंत्रण मिळूं लागलें. ह्यांत प्रसिद्ध टप्पा गाणारे बिशनलालजी, हिरालाल, पन्नालाल, धन्नालाल, मोतीलाल, शिवलाल, पतियाळाचे प्रसिद्ध ख्याल-गायक मियांजान, प्रसिद्ध सारंगी-नवाज व बीनकार अब्दुल अजीजखां, अमृतसरचे गामणखां, सौन्धेखां, प्यारेखां, भाईलाल रबाबी, त्याचप्रमाणें कलकत्त्याचे ठुमरी-गायक प्यारेसाहेब ह्यांचीं नांवें उल्लेखनीय आहेत. सिंधुप्रदेशांत शिकारपूर हें प्रमुख संगीत-कलाकेंद्र बनलें होतें. दरवर्षी होलिका-उत्सव (दाउदजींचा हान्डा) मोठ्या धूमधडाक्यांत साजरा होई. मोठ्या उत्साहानें सर्व दर्जाचे कलाकार ह्या उत्सवांत भाग घेत.

एकदा सन १९२० मध्यें ह्या समारोहांत पू. भास्करबुवांना पाहून एका घराणेदार गायकानें रागविस्तार सोडून, आपल्या कुडत्याच्या अस्तन्या वर सारून, हात पुढें फैलावून, द्रुततान फेकीत, बुवासाहेबांकडे बघत, गर्जना करीत, एक चीज सुरू केली. स्वारीला आपण काय करीत आहोंत ह्याची शुद्धही राहिली नाहीं. आणि त्या जोशांतच त्यानें बुवांस म्हटलें, "पंडितजी ! आपणच बघा, जिथें गायक गाण्याचा अंत करतो, तिथूनच मी गाणं सुरू करीत आहें." हें ऐकून बुवांनीं हसत उत्तर दिलें, "मी ऐकतों आहें व

पाहातही आहें. माशा-ए-अल्लाह, मला असं वाटतं, कीं आपणच धरून गाणं सुरू करून निघालांत नि इथेंच त्याचा अंत होत आहे!"

हें ऐकून स्वतः ख्याल-गायक व सर्वच सभा हसूं लागली. नंतर बुवा रंगमंचावर आले. त्या काळीं मायक्रोफोन नव्हते, पण पांच हजार श्रोते बुवांचें गाणें ऐकून बेहोष झाले. गामणखां एकदम सभेला म्हणाले, "दुहई है (धन्य आहे) दुहई है. ही गायकी कुठेंही ऐकायला मिळायची नाहीं!"

ह्याही खेपेस बुवांना गायन-प्रेमी जनांनीं महिनाभर शिकारपुरांत ठेवून घेतलें. जरी तज्ज्ञ, मार्मिक श्रोते शास्त्रीय गायनानें संतुष्ट होत, तरी सामान्य जनता ठुमरी, दादरा, भजन, गझल, वगैरे रचनांनीं आनंदित होत. कलकत्त्याचे प्यारेसाहेब बायकी आवाजानें गोहरजानच्या ग्रामोफोन रेकॉर्ड-मधील गीतें गात, तीं फार लोकप्रिय होत. त्यांचा एक दादरा — 'सांवलियारे काहे मारे नजरियां', एक भजन-गीत — 'मुखडा क्या देखे दर्पणमें जो दयाधर्म नहि मनमें', त्याचप्रमाणें एक गझल — 'हुस्ने इन्सान जब आया, तो अदा भी आई' फारच लोकप्रिय होता. सर्वसाधारण अजाण श्रोत्यांपुढें प्यारेसाहेबांच्या नंतर कोणाही पुरुष गायकाला रंग भरणें कठीण होई, परंतु बुवासाहेबांनीं आपल्या शास्त्रीय ख्याल-गायनानें ही जनताही मंत्रमुग्ध करून टाकली. त्यांच्या स्वर-प्रयोगाच्या प्रभावानें मार्मिक श्रोत्यांचे डोळे अश्रूंनीं भरून येत. त्यांच्या कल्याण, छायानट, बिहाग, बागेश्वरी, पूरिया, नन्द, इत्यादि रागांवर आणि दादरा, ठुमरी, ह्यांवर, नायक नायिकेवर आषक होतो, तशी सभा पागल बने.

ख्याल-गानानंतर अनेकदा श्रोत्यांच्या आग्रहापायीं बुवासाहेब ठुमरी, भजन, माण्डगीत, संस्कृत व मराठी पदें म्हणत व सर्वसाधारण समाजाला रंजवीत. निराश होऊं देत नसत. बुवांनीं गायिलेल्या 'गांगर मोंपे डार गये', 'पिया परदेस मोरा', 'पिया बिन नाहि', 'पिया-मिलनकी लगी आस', 'पिया विदेस गये', 'पीकी बोली न बोल', 'बाबुल मोरा नैहर', 'बाँकी रे सूरत', इत्यादि अनेक ठुमऱ्या व 'अब सुधि ले हो मोरे राम', 'हमरी मडैया कैसी सूनी', 'मुकट परिवारी जाऊं', 'गोवर्धन गिरिधारी', 'ठुमक चलत रामचंद्र', इत्यादि अनेक भजनें, 'सुन हो

बालम मोरा', 'रसिया राणाराव वे लाला' इत्यादि अनेक मांड-गीत, अनेक संस्कृत व मराठी पदें ऐकून सामान्य जनसमूह मदमत्त होत असे. प्यारासाहेबांसारख्या नामांकित ठुमरी-गायकाला बुवांच्या ठुमऱ्या ऐकून म्हणावें लागलें, "पंडितजी 'चौमुखिया' ( हरढंगी, चौरस ) गायक आहेत. ठुमरी गाऊनही जादू घालतात. गणपतभय्यांची आठवण होते. असे गुणी शंभर सदींनीं एकदा जन्माला येतात."

श्रीमंत मसंद सुंदरदास, पं. रावळदासांचा संगीत समाज, शेख फैजअहंमदखां व अन्य अनेक संगीतज्ञांच्या निवासस्थानीं बुवांच्या पांच-पांच तासांपेक्षां दीर्घ बैठकी होत. तेथें केवळ ख्याल-गायनच होई, परंतु श्रोते आपलें स्थान सोडून, श्वास घेण्यासही उठत नसत. सकाळीं नऊ ते रात्रीं नऊपर्यंत बुवांना भेटायला कलावंतांची अखंड रीघ लागे. रागी आपापले हृदयोद्गार व अनुभव निवेदन करीत. बदाम, पिस्ते, किसमिस व चिलगुजा ह्यांचे ढीग पडलेले असत. हरिद्वारला यात्रिकांना चणे वांटतात, तसा हा मेवा बुवांच्या भेटीस येणाऱ्यांना वांटला जाई. संगीतप्रेमी श्रद्धाळु लोक अनुपम संगीताचा लाभ घेत आणि बुवासाहेब व शिष्यमंडळी तेथील स्वास्थ्यप्रदायक खाद्य-पेयांचा आस्वाद घेत.

१९१७ सालीं स्व. महाराजा हरिसिंहाच्या विवाहोत्सवांत अनेक सुप्रसिद्ध कलाकारांना निमंत्रण होतें. कपुरथळा घराण्याचे सुप्रसिद्ध ध्रुपद-गायक व जम्मूचे दरबारगायक पं. अमीचंद्रजी ह्यांजकडे संगीत-संमेलनाची व्यवस्था होती. स्व. पं. भास्करबुवा, अलाबन्देखांसाहेब, अब्दुलाखां, विलायतहुसेनखां, लाहोरचे कालेखां, अलीबक्ष व अन्य कलावंतांनीं आपापल्या कलेचा अहेर सभेला सादर केला. बुवासाहेबांचें गाणं ऐकून सुप्रसिद्ध मियां अलाबंदेखांसाहेब ह्यांनीं स्पष्ट शब्दांत आपलें हृद्गत व्यक्त केलें, "पंडतजी, आपणाइतका सुंदर 'दरबारी कानडा' कोणीही ख्याल-गायक गाऊं शकणार नाहीं. आपण खरोखरच वर्तमानकाळचे लासानी ( अनुपम ) ख्याल-गायक आहांत!"

ह्या दौऱ्यांत मा. कृष्णरावांनीं जम्मू व चंबाच्या पहाडी लोकांचीं लोकगीतें अतिकाळजीपूर्वक ऐकलीं व तेथेंच 'गोरी दाचित्त लग्गा चम्बे दी आंधारा' गाणें स्वतः गाऊं लागले. स्व० महाराजा प्रतापसिंहजींनीं मोठ्या गोडीनें व

उत्सुकतेनें हें गाणें वारंवार कृष्णरावांच्या तोंडून ऐकलें व त्यांची खूपच तारीफ केली. बुवासाहेब मास्तर कृष्णरावांसह महाराष्ट्रांत परत आले व त्यांनीं ह्या पहाडी गीतांच्या चालीवर नवीन मराठी पदें रचून, ते स्वर महाराष्ट्रांत घरोघरीं गुंजत राहातील असें केलें.

जालंदर, अमृतसर व शिकारपूर येथील अनेक गुणी, घराणेदार, तरुण कलाकारांनीं बुवांजवळ शिक्षण घेण्याची उत्कंठा व्यक्त केली. त्यांमध्यें दिलीपचंद्र वेदी, तवक्कल हुसैन, मुरादअल्ली, हरिश्चंद्र बाली, हंसराजभाई, समुद्रसिंघ व अमृतसरचे भाईलाल रबाबी हीं नांवें उल्लेखनीय आहेत. पण त्यांपैकीं फक्त दोघांनाच सफलता मिळाली. १९१८ डिसेंबरमध्यें दिलीपचंद्र वेदी व मार्च १९२१ मध्यें भाईलाल रबाबी ह्यांचा बुवांनीं शिष्य म्हणून स्वीकार केला. ह्या दोघांतही असें अंतर पडलें, कीं दिलीपचंद्र वेदींना बुवांच्या सहवासांत राहून शिक्षण घेण्यास अवसर मिळाला. पण भाईलालना ही संधि मिळाली नाहीं. कारण एप्रिल १९२२ मध्यें बुवासाहेब परलोकीं निघून गेले. त्यामुळें भाईलाल फार दुःखी झाले. त्यांनीं बुवांच्या स्मरणार्थ कित्येक चिजा बांधल्या — ‘मालकंस’ रागांत झपतालमध्यें ‘सुस्वर स्वर की तान मोहे भा गई। कासे कहूं मोहे बावरा बना गई ॥ ध्रु० ॥ भास्करराव छुपा गायनका हिंदसे लालको दुःख जैसे आयुविहा गई ॥ १ ॥’ युवक दिलीपचंद्र वेदींनींही आपल्या पूज्य गायन-गुरूंच्या स्मरणार्थ अनेक रागांत अनेक रचना केल्या – जैसे कीं,

राग ललित – त्रिताल

कहां छिपेजा स्वरके भास्कर, कंठ माहिं जिन राख्यो शास्त्र। (अंतरा)
बहुल प्रकाश करे, वेदी कहे, लग रहि अंखिया तुमरि आसकर ॥ १ ॥

राग टोडी – त्रिताल

धाक परी तुमरी हिंद में सिंधु पंजाब दक्षिण गुजरात। गुरुवर्य भास्करराव महाराज ॥ ध्रु० ॥ (अंतरा) कंठ मधुरसो गांधर्व गायन सुनत मग्न वेदी। भये लोंगवा सरस्वती आप सवारे काज ॥ १ ॥

राग शंकरा – त्रिताल

प्रकट भयो जब स्वर को भास्कर, अतिप्रकाश भयो नाद मंडलमें ॥
(अंतरा) गोविन्द कृष्ण गणपति गांधर्व, दत्तात्रय नरहरि वेदी सब।
शिष्यवर्ग सोहे तारामंडलमें ॥ १ ॥

तात्पर्य, बुवासाहेबांच्या परलोक-गमनानें त्यांच्या भक्तांना असह्य दुःख झालें आणि त्यांच्या मधुर आठवणींच्या समृद्धींतही अजून सर्व बेचैनच आहेत. देवा, ते कोठें गेले ?

**बापूराव राजहंस** ह्यांनीं सांगितलेल्या आठवणी — १९१९ सालीं जालंदरच्या हरिवल्लभ मेळ्यांतील गायनानंतर बुवांना पतियाळा संस्थानचे महामंत्री किसनदयाळ ह्यांनीं आपणाकडे दोन दिवस राहायला बोलाविलें. बरोबर दिलीपचंद्र वेदी, बापूराव केतकर, बापूराव राजहंस, हे सर्व नवे विद्यार्थी होते. किसनदयाळ ह्यांजकडे नित्याप्रमाणें गाणें, विद्यार्थ्यांची तालीम चालू असतां अकल्पित पतियाळा-नरेश तेथें आले. संस्थानी राजेरजवाड्यांच्या रीतीप्रमाणें राजेसाहेबांनीं बुवासाहेबांना दोन मिनिटें भेटण्याची परवानगी मागितली. बुवासाहेब तात्काळ महाराजांसमोर गेले. महामंत्री बिसनदयाळ (बिसनदयाळ व किसनदयाळ हे दोन्ही नामपर्याय प्रचलित असत.) ह्यांजकडील पाहुणचार संपवून बुवांनीं शिष्यपरिवारासह राजवाड्यांत पतियाळा-नरेश ह्यांचा पाहुणचार स्वीकारावा, अशी महाराजांनीं बुवांस विनंती केली. बुवांनीं राजाज्ञा आनंदानें मान्य केली व ते पतियाळा राजवाड्यांत नरेशांच्या खास पाहुण्यांच्या दालनांत उतरले. तेथें त्यांचा दहा दिवस मुक्काम होता. एके दिवशीं संध्याकाळीं नामांकित कलावंत अलिया फतु हे बुवांस भेटायला आले. त्यांनीं बुवांना आपल्या विशिष्ट वळणाचा ‘पूर्वी’ राग सुमारें वीस-पंचवीस मिनिटें गाऊन दाखविला. बुवांनीं अलिया फतू ह्यांस स्वतःच्या पद्धतीनें सुमारें तासभर ‘पूर्वी’ राग ऐकविला. दोघांनीं प्रेमभरानें परस्परांस उत्तरेच्या पद्धतीनें खांद्यास खांदा लावून अभिवादन केलें व अलिया फतू गेले. पतियाळा-नरेशांकडे बुवांच्या ह्या मुक्कामांत धोलपूरचे महाराजही पाहुणे म्हणून आले. ‘भास्करबुवांचें गाणें ऐकवा’ अशी त्यांनीं पतियाळा-नरेशांस विनंती केली. रात्रीं दरबार भरला. बुवा

आपल्या शिष्यांसह दरबारांत येतांच उभयतां महाराज बुवांच्या सन्मानार्थ उभे राहिले. अर्थात् सर्व दरबारी मंडळीही उभी राहून बुवांस वंदना करण्यांत आली. महाराज, दरबारी, आदि सर्व सभा स्वतःचें स्वागत सन्मानानें करण्यासाठीं उभी असलेली पाहून बुवा गोंधळले. त्यांना काय, कसें बोलावें हें सुचेना. त्यांनीं सभेला मराठी पद्धतीनें फक्त नमस्कार केला. आतां प्रथम कोणीं बसायचें ह्याचा बुवा विचार करीत आहेत असें पाहून, धोलपूरच्या महाराजांनीं म्हटलें, " आपण बसलांत तर सर्वांना बसणं बरं पडेल. " बुवांना बसायला लावून, उभयतां नरेश कोचावर बसल्यावर सर्व सभा गाणें ऐकण्यास बसली. धोलपूरचे महाराजही संगीताचे अभ्यासी षोकी होते. त्यांना रात्रीं बारा वाजतां परत रेल्वेनें जायचें होतें, पण गाणें इतकें रंगलें, कीं पहाटे साडेचारपर्यंत कोणींही सभास्थान सोडलें नाहीं. बुवांनीं सर्व सभा मंत्रमुग्ध करून सोडली होती. बापूराव केतकर, बापूराव राजहंस व दिलीपचंद्र वेदी हे तिघे ह्या प्रसंगीं उपस्थित होते. आज त्यांपैकीं दोघे तरुण म्हातारे होऊन हे अविस्मरणीय प्रसंग स्मरत आहेत. पतियाळा-नरेशांकडे मुक्काम असतांनाच पुण्याहून अष्टेकरबुवांचें पत्र आलें, कीं बुवांची वडील मुलगी माई हिचें लग्न हर्डीकर ह्यांजकडे नक्की झालें आहे. महाराजांकडील राजवाड्यांतील दहा दिवसांनंतर पुन्हा दोन दिवस दिवाण बिसनदयाळनीं बुवांना स्वतःकडे ठेवून घेतलें. ५०० रुपये भेट दिली. महाराजांकडून ताट भरून चांदीचे रुपये सत्कार-पुरस्कार म्हणून आले. ताटांत तीन हजार रुपये होते. बुवांनीं पैसे घेऊन येणारास शंभर रुपये बक्षीस दिले. ते म्हणाले, " ही राजलक्ष्मी आहे. हिला कद्रूपणा आवडत नाहीं. " हे सर्व पैसे घेऊन बुवांनीं बापूराव राजहंस ह्यांस पुण्यास पाठविलें. स्वतः परत दोन उरलेल्या शिष्यांसह जालंदरच्या वनस्थलींत जाऊन राहिले. त्यांना थोड्याच दिवसांत शिकारपूरला हंड्याच्या उत्सवासाठीं जायचें होतें. बापूराव राजहंस बुवांच्या घरीं पैसे पोंचवून मास्तर कृष्णांना घेऊन शिकारपूरला गेले. तोंपर्यंत बुवाही तेथें पोंचले. "

**हरिश्चंद्र बाली** — [ हे महाराष्ट्रांत सिने-संगीत-दिग्दर्शक म्हणून प्रसिद्ध होते. १९३४ सालीं देवकी बोस ह्यांच्या ' जीवन नाटक ' ह्या

फिल्ममध्यें ते मजबरोबर काम करीत होते. त्यांनीं निदान बेचाळीस फिल्म्सूचें संगीत-दिग्दर्शन केलें.

हरिश्चंद्र बाली हे संगीत आणि संस्कृत भाषेचे अभ्यासी पंडित आहेत. त्यांचे वडील पंडित अर्जुनदास हे जालंदरच्या ‘ हरिवल्लभ मेळ्या ’ चे खजिनदार व पंडित तुलाराम ह्यांचे जिवलग मित्र होते. १९०४ सालीं भास्करबुवा जालंदरला जाऊं लागल्याचा पुरावा श्री. अर्जुनदास ह्यांनीं देवी-तलाव उत्सवाचा जो हिशेब ठेविला आहे, दैनंदिन्या ठेविल्या आहेत, त्यांजवरून मिळाल्यानें महत्त्वाची माहिती विश्वसनीय पुराव्यासहित उपलब्ध झाली आहे.

अगदीं बालवयापासून ह्या गायनाभ्यासी मुलाला भास्करबुवा ह्यांचा सतत पंधरा वर्षें गाणें ऐकण्याचा लाभ झाला. परंतु बुवांकडे शागीर्द म्हणून त्यांस राहातां आलें नाहीं, ह्यामुळें त्या कुटुंबाला अजूनही हळहळ वाटते. हरिश्चंद्र बाली लिहितात, “ ‘ त्वमेव माता पितात्वमेव । ’ अशी माझी बुवांवर भक्ति. ” त्यांच्या वडील मंडळींचा व पं. तुलारामजींचाही बुवांवर अमर्याद भक्तिभाव असे. बुवांच्या तोलाचे गवई जालंदरच्या ह्या उत्सवांत कोणीच आले नाहींत, असा ह्या सर्वांचा दावा आहे. अमृतसरला बुवांचे तंबोरे मंदिरांत पूजास्थानीं ठेविलेले आहेत.

बालीजींच्या लिहिण्याला ‘ चक्षुर्वैसत्यं ’ पुराव्याचें महत्त्व असून हें विद्वान् गायक घराण्याचें बुवांविषयींचें मत व माहिती चरित्राला पूरक ठरत आहे. ]

बालीजी लिहितात —

परमप्रिय श्री. केलकरजी, नमस्कार —

हा लेख पाठवीत आहें. तीनदा लिहून फाडून टाकला. लेख लिहिणें कठीण झालें, कारण भावनांनीं वाहून जाऊन रडूं कोसळलें.

माझा प्रत्यक्ष संबंध बुवासाहेबांशीं आला तो १९१४ सालीं. त्यानंतरच्या घटना मीं प्रत्यक्षच पाहिल्या आहेत. कांहीं घटना पंडित तुलारामजींनीं ( अंतकाल १९२९ ) व कांहीं माझ्या पिताजींनीं सांगितल्या. नंद भट्ट अजून जिवंत आहेत. ‘ निक्का सोनार ’ बुवांच्या मृत्यूनंतर साधु बनून पंजाबांतील कोठल्या तरी मंदिरांत राहायला गेला.

निक्का सोनाराच्या छोट्याशा दुकानांत बुवा कधीं गात. नाटक-गृहाची छोटीशी जागा व माझें घर बुवांच्या गाण्यानें पावन होई. तें त्या जागांचें भाग्य. मीं प्रत्यक्ष व्यक्तींचा व कलावंतांचा उल्लेख केला आहे. केवळ बुवांची स्तुति केली नाहीं. (बुवांचें पौरोहित्य केलेलें नाहीं.) बुवासाहेबांच्या वर्णनपर जवळजवळ २० ख्याल गायिले जातात. मीं पण अनेक चिजा बांधल्या झाहेत. अवश्य तर पाठवून देईन.

आपला सदैव
**हरिश्चंद्र बाली**

## पंजाबांतील सदावंदनीय भास्करबुवा बखले ह्यांचें अमर संस्मरण

**प्रास्ताविक** — नारद, भरत, कालिदास, हरिदास, तानसेन, बैजू व सदारंग हेच काय, पण त्यांच्याहून प्राचीन काण्व, अध्वर्यु, यास्क, ऑफियस, टर्पेंडर व पॅथॅगोरस् ह्या मंत्रद्रष्ट्यांचीं रासायनिक शरिरें खड्डा खणून पुरून टाकलीं गेलीं, अथवा झगमगणाऱ्या अग्निज्वालांत भस्म झालीं. हीच अवस्था बेथोवेन, टाकूर (रविबाबू) व गांधींच्या रासायनिक शरिरांची – परंतु ह्या मंत्रद्रष्ट्यांच्या जीवनांत, मस्तकांत, केवळ प्राणवायु, कार्बन व गंधक ह्यांपेक्षां असें कांहीं होतें, कीं जें पुरून टाकणें अशक्य; जळून जाणें अशक्य. रासायनिक घटकांव्यतिरिक्त 'अकस्मात् कल्पना' (स्फूर्ति) असें द्रव्य असतें, तें समाजाला अमृत स्वरूपांत मिळतें.

भौतिक शरीर बंधनयुक्त, लोखंडी कुंपणाच्या आंत वावरतें, हिंडतें-फिरतें, झोपतें-जागतें व शेवटीं नाश पावतें. परंतु त्या मंत्रद्रष्ट्यांची 'आकस्मिक कल्पना' युगां-युगांतून सर्व विश्वसंचारी आनंदरूपानें वावरते. पृथ्वी, आप, तेज, वायु व आकाश ह्या घटकांचें टॉलस्टॉयचें शरीर पुरलें गेलें, परंतु त्याच्या अतिरिक्त आकस्मिक कल्पनासृष्टीनें आजही सर्व विश्वाला सौंदर्याभिमुख केलें आहे.

संगीत, साहित्य, उत्खनन, वाङ्मय, त्याचप्रमाणें चित्र, वास्तु ह्या कलांच्या रूपानें हजारों वर्षांनंतरही त्यांच्या निर्मात्यांचें आत्मिक दर्शन आपणांस होतें. स्वरश्रुतींच्या रूपानें त्यांची 'आकस्मिक कल्पना' मंत्रद्रष्ट्यांचे अनुभव नित्य

कथन करते. अपोलो बेल्विडियर, डायक्रिसोस्तोम, फीडियस्, हडप्पा, मोहेंजदडो, तक्षशीला, अजिंठा, वेरूळ, वगैरे गुंफा, ताजमहाल, ह्या अवशेषांच्या रूपानें हजारों गतवर्षांचा इतिहास, अभिनव अनुभव व कवि-कल्पना ह्यांचा प्रवाह अखंड चालूच आहे. मंत्रद्रष्टयांचे उदात्त अनुदात्त स्वर, स्वरित श्रुति-स्वर-ग्राम, रागानुकूल स्वरांचे विविध प्रयोग, ह्याच 'आकस्मिक कल्पनां' चे स्वर प्रवाहांत अजून आपणांस डुंबूं देतात.

ह्या मंत्रद्रष्टयांच्या कल्पना जाणकार ओळखतात. हेच लोक त्या कल्पनांचा विकास साधतात. त्यांचें नांव गौरवानें उच्चारलें जातें. जयंत्या, वर्षश्राद्धें, सहस्राब्द-समारंभ, मंदिरें, भवनें, आश्रम ह्या विविध रूपांनीं, आणि काव्य व संगीत ह्या कलांच्या आविष्कारानें ह्या कल्पना स्मारक-रूप धारण करतात. ह्या सर्वांतून भावी पिढ्यांना सत्प्रेरणा मिळतात.

चाळीस वर्षांपूर्वी वैज्ञानिक उपकरणें आमच्या स्वप्नांतही नव्हती. ग्रामोफोन-रेकॉर्डस, बोलके चित्रपट, टेलिव्हिजन, समाचारपत्रें, रेडियो, छापखाने, फोटोग्राफी, आजचीं प्रचार व प्रसारसाधनें अस्तित्वांत नव्हतीं. ज्ञानप्राप्तीसाठीं इतिहासावर अवलंबून आनंद घ्यावा, प्रेरणा घ्यावी व 'आकस्मिक कल्पने' सारख्या अमर कृतींच्या द्वारें निर्मिति करणाऱ्या विभूतींचें स्मरण करावें. बैजूबावरा, तानसेन व हरिदास ह्या देवपुरुषांची ओळख ऐकल्या-पाहिलेल्या इतिहासानेंच पटे. महानात्म निर्मात्यांच्या 'आकस्मिक कल्पना' केवळ इतिहासांत गुंफतां येत. ह्या इतिहासांत बनावट असत्याची भेसळ होते. पण ह्या महान् निर्मात्यांच्या 'आकस्मिक कल्पना' नव्या कल्पनांत मिसळून आम्हांला मार्गदर्शन होतें व आम्ही इष्टसिद्धि प्राप्त करतों. पंजाबची आर्यभूमि आम्हांला जन्म-मरणाचें चित्र दाखविते. पददलित आर्यभूमींत विनाश-निर्माण व निर्माण-विनाशाच्या चक्रांत सर्वच सापडले आहेत. ह्या कालचक्रांत संस्कृतींचें सिंहासन स्थापन होतें व उजाड होतें.

विसाव्या शतकाच्या सुरुवातीचा काळ हा नव्या युगाचा जन्म-काळ होता. विशेषतः पंजाबांतील संगीत-क्षेत्रांत विचारजागृति झाली. जालंदर, तलवंडी, श्याम चौरासी, सडका क्कां, कसूर, हरियाला, आदि ठिकाणीं ध्रुपद, ख्याल, कव्वाल व बतियांचीं घराणीं बनत होतीं. गुरु नानककालीन रबाबी

घराणें संगीताच्या सर्व शाखांत जवानीच्या तेजानें तळपत होतें. सर्वच जण चुरशीनें, सहकारानें, स्पर्धेनें आपापलें महत्त्व प्रस्थापित करीत होते.

जाति, संप्रदाय, प्रादेशिकता, इत्यादि संकुचितता मागें पडून सद्‌गुरु, सत्साधना, सन्मार्ग व सद्भावनांनीं मानव समाजाला एक श्रेष्ठ भव्य अवस्था प्राप्त झाली व ह्या उत्तम भूमिकेवर मुसलमानी घराणीं उन्नति-शिखरावर पोंचलीं. त्यांच्याशीं खेळीमेळीनें राहून हिंदु कलाकारही संग्रह व नवीन रचना करीत होते. दिल्लीचे तानरसखां, मौलाबक्ष, मियांजान, मेहरबान ( अलादिया ) करीमखां व रहीमखां सफलतेनें भव्य भवनास पोंचले होते. बाबा हरिवल्लभगिरी, सिद्ध केरूराम यज्जूराम, गुज्जर पंडित, हे विद्यासमृद्ध होते. पंजाबची विशेष प्रगति होत होती. ह्या आर्यभूमीच्या संसारांतील विनाशाच्या तांडव-नृत्यांतूनही, वेद, उपनिषदें, भगवान् व्यासांचीं अठरा पुराणें, भारत, पाणिनी व पतंजलींचें व्याकरण-भाष्यें, हीं अजून नष्ट झालीं नाहींत. तक्षशीलेसारखें विद्याकेंद्र, तेथील कौटिल्य, नागार्जुन, सुश्रुत ह्यांजसारखे स्नातक व इतर विद्यांचे निर्माणकर्ते अजूनही विश्वाच्या गुरुस्थानीं शोभत आहेत.

**पंडित तुलाराम** — वेद-वेदांगपारंगत, संगीताचे महान् संग्राहक, महात्यागी ब्राह्मण, पंडित तुलाराम ह्यांचा पंजाबच्या कलावंतांशीं संबंध होताच, पण पंजाबच्या बाहेरही त्यांची चौकस नजर असे. राजा-महाराजांपासून, धनिकांपासून गरीब लोक पं. तुलारामांविषयीं आदर बाळगीत. त्यांच्या निःस्वार्थ संगीत तपश्चर्येनें जालंदर हें गायन-विद्येचें तीर्थक्षेत्र बनलें. महात्मा हरिवल्लभगिरी ह्यांची समाधि देवी-तलाव शहरापासून बरीच दूर; तेथें एका वनस्थलींत तुलारामजींची वस्ती असे. रात्रंदिवस सस्वर स्तोत्रपाठ, ध्रुपद व अन्य गायनप्रकारांची गंगा अक्षय वाहात असे, व पंजाबच्या त्या अशान्त जगांत हिंस्र पशु-पक्षी व सर्पांनीं व्याप्त अशा त्यांच्या वनस्थलींत शांतता नांदे. मथुरेच्या गतश्रम-नारायण मंदिराचे अध्यक्ष पूज्य माधवाचार्य ह्यांची पंडित तुलाराम ह्यांजपाशीं मैत्री होती. त्यांच्यामार्फत तुलारामजींनीं पंडित विष्णु दिगंबर पलुस्करांशीं स्नेह जोडिला होता. कांहीं कालांतरानें पंडित

विष्णु दिगंबर ह्यांच्या सूचनेनुसार भास्करबुवा बखले ह्या अनुपम गायकाशीं मैत्री जोडली.

**भास्करबुवा बखले** — २६ डिसेंबर, १९०४ रोजीं सकाळीं 'हरिवल्लभ समाधी' समोर भास्करबुवांचें पहिलें गायन झालें. तंब्ोऱ्यावर गणपतराव मणेरीकरमास्तर व जालंदरचे नंदभट्ट होते. भाई वसावा हार्मोनियम-वादनास बसले, झंडेखांनीं सारंगीनें साथ केली. हे दोघे आतां जिवंत नाहींत. बुवासाहेबांनीं हुसेनी तोडीचा सादरा 'निरंजन की जे मलमुक्त मेरी' हा म्हटला. सर्वांना आनंदमय आश्चर्य झालें. सर्व गायक घराण्यांत हें गाणें चर्चाविपय बनलें. त्याच दिवशीं ह्या गायनाची कीर्ति लाहोर, अमृतसर, होश्यारपूर, वगैरे ठिकाणीं पोंचली. रात्रीला गर्दीचा लोंढा आला. सर्व कलावंतांनीं आपापलें शक्तिसर्वस्व पणाला लावलें. एकेकाचें गाणें संपलें, कीं वाटे, ह्यापुढें दुसऱ्या गायक-वादकाचा रंग जमणें कठीण. रात्रीचे अकरा वाजले. भास्करबुवा गायला बसले. शंकरा रागाच्या उदात्त स्वरांत बुवासाहेब 'निडर डरे न वारे हो। शाहे जहांगीर बलवीर राजा राम।' ही चीज उत्तम गायले. सर्व सभा जादूनें भारली गेली. गायक-वादक, रसिक-अरसिक सर्वांच्याच हृदयांवर बुवांच्या गायनाच्या चमत्काराचा प्रभाव झाला व सर्वच लोक बुवांकडे लोकनायक ह्या रूपानें पाहूं लागले. सर्वांच्या मनावर न पुसला जाणारा संस्कार उमटला होता. त्यांचें मोहक गाणें ही केवळ प्रभावी जादूची फुंक नव्हती, तर त्यांची एकंदर हालचाल आणि वर्तनही हा प्रभाव पडण्यास कारण झालें. शालीनता, सौम्यता, हसतमुख, निष्कपट, सौंदर्य-शोधक व अभ्यासी वृत्तीची सर्वांवर प्रेम करणारी त्यांची दृष्टि, ह्या सर्व गुणांवर बुवांनीं पंजाबचें हृदय जिंकलें. भास्करबुवांचा लाभ ही आपल्या जीवनांतील सर्वांत थोर सफलता असें पंडित तुलाराम मानीत.

आपल्या गायनापेक्षां इतरांना क्षुद्र लेखणारे व दुसऱ्या वळणाचें गाणें ऐकून मन कलुषित करून घेणारे लोक येथेंही होतेच. आजही हीच क्षुद्र भावना पंजाबांत सिद्ध असलेली दिसते. परंतु बुवासाहेबांची कला व व्यक्तित्व ह्यांनीं ही हीन भावना नष्ट केली. अगदीं साधारण गायकाचें गाणें ऐकूनही

त्यांत आनंद घेण्याची विद्या व सद्भावना बुवांनीं तेथें रुजवल्या. खरेंच्सें प्रेमळ गायक-कलावंत लोक बुवांना ईश्वरतुल्य मानीत.

स्वर्गीय बूटेखांसाहेब कलावंत मंडळींत महानास्तिक म्हणून प्रसिद्ध होते. परंतु बुवांचें गाणें ऐकून त्यांनीं सर्व कलाकारांपुढें घोषणा केली, कीं 'भास्करबुवांचें सर्वांगसुंदर गायन पुढच्या शंभर पिढ्यांपर्यंत पुन्हा ऐकायला मिळणार नाहीं." अलिया फत्तू, मियांजान, अलादिया मेहेरबान, भाई मोती व माननीय तानरसखांचे पुत्र ह्यांच्यासारख्या दिग्गज गायकांची सतत तीस वर्षांहून अधिक काळ साथ केलेले सारंगी-नवाज उस्ताद झंडेखां ह्यांना सर्व प्रकारच्या गायकीच्या सर्वांगांचा परिचय होता. भास्करबुवांची साथ करतांनामात्र आनंदातिशयानें अश्रु ढाळीत झंडेखांनीं आपली सारंगी भास्करबुवांच्या चरणीं वाहिली.

**पंजाबी कलावंतांचें भास्करबुवांवरील प्रेम** — मियां मलंग, भाई मोती, भाई वसावा, त्यांचे पुत्र खुशीमहम्मद, मियां मौलाबक्ष, मौला, अहमदबक्ष, बूटेखां, त्याचप्रमाणें हिंदु व शीख ह्या सर्व पंथांचे गवयी भास्करबुवांवर जीव ओवाळून टाकायला सिद्ध असत. बुवासाहेबांच्या गाण्याची सहसा चिकित्सा होत नसे, पण कधीं-कधीं झालीच तर, कलावंत मंडळी एक-मेकांना मारायला उठत. संगीत-समारोहांत जराशी फुरसत मिळाली, कीं बुवासाहेबांचीं सुंदर वचनें, कथा व आत्मनिवेदन करून बुवांकडून मिळेल तें ज्ञान मिळविण्यांत लोक धन्यता मानीत.

**काणा झंडूखां** — अद्‌भुत कलावंत काणा झंडूखां आपल्या घरापासून एक मैल दूर असलेल्या बुवासाहेबांच्या मुक्कामीं रोज येई. आपल्या अत्यंत सुरेल आणि मधुर कंठानें कधीं मुलतानी, कधीं भीमपलासी, तर कधीं तोडी रागांत बुवासाहेबांना उद्देशून आशीर्वचनें असलेलीं कवनें तो गात असे. बुवांच्या दारांत तो अशा गाण्यांची इतकी झोड उठवून देई, कीं बुवांना स्वतःचीं कामें सोडून बाहेर यावें लागे. ते म्हणत, "झंडूसाहेब आले." आणि बाहेरच बसून झंडूचें गाणें ऐकत, प्रसन्न होत. झंडूनें तशी शास्त्रीय गायनाची फारशी तालीम घेतलेली नव्हती. पण झंडूच्या गाण्यांत अशी आश्चर्यजनक विचित्रता असे, कीं बुवा मुग्ध होत. झंडूखां तान घेतांना

श्वासोच्छ्वास करीत असतांही त्याची तान सुटत नसे. तान अखंड चालू असतां तो श्वासोच्छ्वास करी. सनई किंवा बीनाचा सकाळीं अखंड नाद ऐकावा, तशी त्याच्या गाण्याची आस तुटत नसे. श्वासोच्छ्वास करतांनाही स्वरांची आस न तुटण्याच्या झंडूच्या कसबासाठीं बुवा त्याला थोडे रुपये देत. झंडूखां सलाम करून गात-गातच परत जात असे. बुवांचें मैफलींत गाणें सुरू असलें, कीं एका कोपऱ्यांत शालींत तोंड झाकून झंडूखां बसे. त्याचे डोळे भरून येत. बुवांचें गाणें संपलें, कीं झंडूखां चूपचाप घरीं जाई.

दुसऱ्या दिवशीं पुन्हा तोच क्रम. " भास्कर तेरी वेल वधे। भास्कर तेरी लकवां वरे यादी उपर होवे ॥ भास्कर तूं जगदा गुरू है। भास्कर दे गाणेदा जादू फूलदा फलदा रवे।" असें गात-गात तो बुवांकडे पोंचे. त्याच्या गाण्याचा भावार्थ असा – " भास्कर, तुझा वंशविस्तार होवो; भास्कर, तुला लाख वर्षें आयुष्य मिळो; भास्कर, तूं सर्व संसाराचा गुरु आहेस; भास्करच्या गाण्यांतील जादू सफल फुलत राहो. " ही त्याची घटना रोजचीच होती. ती नित्य नव्या गाण्यांत नव्या स्वरूपांत घडे.

**साईंची भैरवी** — जे तारुण्यांत धुरंधर गायक होते असे साधु करीम, हे सिद्ध बनले होते, कीं पागल, हें शोधायलाच हवें होतें. ते एक पैसा मागत व भैरवींत ' हर दम रेंदा मेरे सामने। ' गात असत. जेव्हां बुवांनीं साईंना शोधून बोलावलें, तेव्हां साई थंडीनें कुडकुडत होते. बुवांनीं त्यांना लोकरी शालजोडीनें लपेटून टाकलें. साई करीम आपल्या मोहक आवाजांत गाऊं लागले, ' हरदम मेरे सामने रहता है। ' व नेहमींप्रमाणें पैसा मागूं लागले. बुवांनींही त्यांच्या भैरवींत आपला सूर मिळविला आणि पैशासाठीं ते जितक्या वेळां हात वर करीत, तितक्या वेळां त्यांच्या हातांत एकेक रुपया ठेवण्यास सुरुवात केली. बुवासाहेबांच्या उत्तेजनानें साई अधिकच रंगून गाऊं लागले. बुवाही गातच राहिले. साईंची गाण्याची मुद्रा प्रेक्षणीय होती. नजर जमिनीवर खिळवून, लकेरी गळ्यापासून निघून, जमिनीवरून वाहात आहेत, असा आविर्भाव ते डाव्या तर्जनीनें जमिनीवर रेघा ओढून चित्रित करीत आणि उजवा हात पैशासाठीं सदा पुढें असे. पैसा मिळाला नाहीं, तर गाणें बंद होत असे. त्या दिवशीं बुवासाहेब कारुण्यानें विचलित होऊन रडत

होते, गात होते आणि साईचें गाणें चालू राहावें म्हणून त्यांच्या हातावर रुपयामागून रुपया ठेवीत होते. त्या दिवशीं साईनीं प्रथमच आपल्या बावऱ्या नजरेनें बुवासाहेबांकडे रोखून पाहिलें. बुवांच्या साश्रु नयनांशीं दृष्टि भिडविली. त्यांनीं बुवांना एकदाच ' गुरु ' म्हणून पुकारलें आणि ते निघून गेले. सर्व लोक म्हणत होते, भास्करबुांनीं साईवर दौलत उधळली.

**शालीनता व कर्मकाण्ड** — पौष शुक्ल द्वादशीपासून पौर्णिमेपर्यंत नेहमीं ' हरिवल्लभ मेळा ' भरे. दहा-वीस दिवस आधींपासून साधु, संत, योगी, यति ह्यांचे आखाडे जमूं लागत. ह्या दिवसांत शीतदेव आपल्या पुऱ्या यौवनांत असत. त्यामुळें वीस अग्निकुंडें रात्रंदिवस प्रज्वलित ठेवीत. राजा-महाराजांच्या तंबूंची छावणी पडे. जमिनीवर कोरडें गवत किंवा उंसाचीं सुकलेलीं सालपटें पसरून, त्यावर जाड्या सतरंज्या पसरीत. लाकडी तिवयांवर कोळशाच्या धगधगत्या शेगड्या पेटलेल्या असत. स्नानासाठीं गरम पाण्याच्या मोठ-मोठ्या कढया उकळत असत. ही सर्व व्यवस्था चोख असे. कारण पाहुण्यांची कसलीच गैरसोय होऊं नये.

आपल्या मित्र व शिष्य मंडळींसह भास्करबुवा स्वच्छ पाण्यानें भरलेल्या ' राम-तलाई ' च्या बाजूच्या खोलींत उतरत. शेजारींच विहिरीला मोट चालू असे. एक किंवा दोन बैल त्या मोटेला जोडीत. ह्या मोटेच्या पाण्यानें ' राम-तलाई ' त रोज पाणी भरलें जाई. फुलबागेला व शेतांना तेथूनच पाणी मिळे.

बुवासाहेब पहाटे अंधारांतच शौच-मुख-मार्जन आटोपून ह्या मोटेच्या पाण्याखालीं स्नान आटोपून, स्तोत्र-पूजा-पाठ करीत. संस्कृत मंत्र म्हणत. ' अविनयमपनय विष्णो दमय मनः शमय विषयमृगतृष्णाम् ॥ ' आदि आन्हिक चाले. नंतर कपडे घालून तयार होत. तोंपर्यंत लोक ऊबदार दुलयांत झोपलेले असत. जेव्हां दूध, चहा, मिठाई, फळें न्याहारीसाठीं येत, तेव्हां बुवा बरोबरच्या मंडळींना उठवीत. सर्व मंडळी झटकन् उठून, तोंड धुवून, न्याहारीला येत.

संगीत-सभेचा कार्यक्रम साडेसात-आठच्या सुमारास सुरू होई. बुवासाहेब नऊपर्यंत तेथें येऊन, रंगमंचासमोर बसत. कोणाच्याही स्वरभ्रष्ट, तालभ्रष्ट,

अथवा रागभ्रष्ट गाण्यानें बुवांच्या मुद्रेवर तिरस्कार अथवा गायकाला निरुत्साहित करणारी नाराजी कधीं दिसत नसे. त्याच आनंदमयी मुद्रेनें ते गायकास उत्तेजन देत. रुपयाभर गाणारा माणूस ह्या उत्तेजनानें सव्वा रुपया गाणें गाई. आळशी, कुत्सित स्वभावाचे क्वचित् थोडे गायक बुवासाहेबांवर चढाई करीत, पण बुवांच्या चेहऱ्यावरील प्रसन्नता व शालीनता कधींच ढळत नसे. क्रमानें शेवटीं बुवांचें गायन होऊन सभा विसर्जन होई. इतर गवयांच्या चढाईला बुवा आपल्या नैतिकता व शालीनतापूर्वक वर्तनानें व गायनानें उत्तर देत.

लौकिक होणें, मान होणें व पूर्णरूपानें सिद्ध गायक होणें ह्या गोष्टी एक नाहींत. आज पंजाबमध्यें हद्दू-हस्सूखांचे वंशज महान् रहमतखां ह्यांना कोणी ओळखीत नाहीं. कित्येक अशिक्षित गायकांनीं नांव खूप कमावलें असलें, तरी गायनविद्या संपादन करण्यांतमात्र ते असफल ठरले आहेत. महापुरुषांच्या गायकींतील कांहीं अंश चोरून गाणारे आपल्या आश्रयदात्यांवरच चिखलफेक करतांना दिसतात. असले कलेचे पुरोहित पैसा कमावून, पैशानें मान खरेदी करीत असले, तरी तेच कलेची उन्नति रोखतात. ह्यांत साधना होत असली, तरी सिद्धि प्राप्त होत नाहीं. उलट कलेचें विडंबन करून मिळविलेले मान-सन्मान मृत्यूनंतर जनता विसरते आणि स्मरणांत राहातें तें कलेचें विडंबन.

कोणा एका प्रसिद्ध गायकानें बुवा गैरहजर असतां मैफलींत बुवांवर चढाई केली. नश्वर गुणवंतानें अनश्वर गुणवंताची खोडी काढली. बुवांना कोणींतरी सांगितलें. तरी त्यांनीं तिकडे लक्ष दिलें नाहीं. दुसऱ्या दिवशीं सकाळीं कार्यक्रमांत बुवासाहेबांनीं ' विद्याधर गुणियन सों कहा करिये ॥ ' हा ख्याल गायिला. तेव्हां त्या गायकानें बुवासाहेबांवर आदल्या दिवशीं केलेल्या हल्ल्याची श्रोत्यांना जाणीव झाली. बुवासाहेब प्रसन्न चित्तानें गात होते. परंतु श्रोतेमात्र त्या चढाईखोर गायकावर संतापले. इकडे बुवांनीं ' तेरो मेरो ... नाही गुणियन के चरण न परिये । ' हा अंतिम चरण म्हणतांचमात्र बुवासाहेबांची छेड काढणाऱ्या त्या गायकावर कांहीं श्रोते संतापून बोलले, " अरे ए ! बुवांच्या चरणांवर पड, एरव्हीं पंजाबी लोक गळ्याच्या ताना

जाणतात तसे तडाखे हाणणंही जाणतात." बुवांनीं नुसतें स्वाभाविकपणें हसून म्हटलें, "आपलं माझ्यावर गाण्यामुळें प्रेम आहे. तेव्हां आपण गाणं तेवढं ऐका." लगेच सर्व सभा शांत झाली.

बुवासाहेबांची शालीनता, सहनशीलता, स्पर्धाहीनता, विस्तृत प्रेम व सर्वांविषयीं आत्मीयता हा त्यांच्या चरित्राचा व कलेचा एक महान् संदेश आहे. त्यांच्या मन-वचन-कर्मांत एकतानता होती. त्यांचें निवासस्थान कलावंत तसेंच सर्वसामान्य लोकांनींही भरलेलें असे. लोक आग्रह करीत, "बुवा, आम्हांला अमूक चीज शिकवा." लगेच शिकविण्यास आरंभ होत असे. एकदा रात्रीं गाणें चालू असतां बुवांना अंतऱ्याचे शब्द आठवेनात. भरलेल्या मैफलींत ते गणपतराव मणेरीकरमास्तरना म्हणाले, "मास्तर, अंतरा आठवत नाहीं, तेवढा तुम्ही म्हणा." मणेरीकरमास्तरनीं लगेच अंतरा म्हणून टाकला.

**मर्मज्ञ राजाचें मस्तक डुललें** — जालंदरमध्यें हरिवल्लभ समाधि ही सर्व छोट्या-बड्या संगीतकारांचें आपुलकीचें आश्रयस्थान बनली होती. १८९० पासून अशी प्रथा होती, कीं कोणीही कलाकार येई, त्याला प्रथम पंडित तुलारामना ऐकवावें लागे. तुलारामांच्या ताजव्यावर तो योग्य ठरला, तर मग त्याला टिक्कासाहेबांच्या राजभवनांत हजेरी द्यावी लागे. वीणावादक टिक्का राजा प्रतापसिंह हे एक अद्‌भुत श्रोते व रसिक होते. पंचवीस वर्षें हा क्रम चालू होता. नंतर दुसऱ्या राजा-महाराजांकडेही गुणी गायकांना सन्मान मिळे. टिक्कासाहेबांच्या मैफलींत पंडित आपण होऊन येत. मैफलींत उत्तमांतील उत्तम गायन-वादन झालें, तरी टिक्कासाहेब चूपचाप, गंभीरपणें, कोणाची तारीफ न करतां रात्र-रात्रभर ऐकत. १९०४ मध्यें कोणा फारच बड्या गायकाचें टिक्कासाहेबांसमोर गाणें झालें. गाण्याचा सर्वांवर मोठा प्रभाव झाला. परंतु टिक्कासाहेब पाषाणमूर्तीप्रमाणें अचल राहिले. सर्व प्रशंसा करीत होते. शेवटीं सभा संपली. पंडितजींना दुःख झालें. त्यांनीं शिष्यांना म्हटलें, "मी माझी सारी शक्ति खर्चून गायलों, पण ह्या सीखाचें मस्तक डुललें नाहीं. हा सीख अरसिक आहे!" पंडितजी रागाच्या भरांत

आणखीही कांहीं अपशब्द बोलून गेले. ते सर्व टिक्कासाहेबांच्या कानांवर गेले. परंतु टिक्कासाहेब तसेच गंभीर, मुग्ध राहिले. दरबारी लोकांना ही गोष्ट आवडली नाहीं. ३१ डिसेंबर, १९०५ च्या रात्रीं बुवासाहेबांचें गाणें टिक्कासाहेबांपुढें ठरलें. पंडित रखाराम, पंडित अर्जुनदास, स्वतः पंडित तुलाराम तेथें उपस्थित होते. उस्ताद झंडेखां सारंगीवर, मास्टर खुशीमहम्मद हार्मोनियमवर आणि रखाराम व नंदभट्ट तंबोऱ्यावर होते. मलंगखां तबल्याची साथ करीत होते. बुवासाहेब 'दरबारी' चा 'तू करीम रहीम पाक परवर दिगार' हा ख्याल गाऊं लागले. जस-जशी बढत सुरू झाली, तस-तसे टिक्कासाहेब प्रसन्न मुद्रेनें स्वतःचें आसन सोडून पुढें सरकत-सरकत अखेर बुवांच्या समीप समोर येऊन बसले. टिक्कासाहेबांनीं क्षणभर गाणें थांबवायचा इशारा करून पंडित तुलारामांना उद्देशून म्हटलें, "तोलो (तुलारामजींचें संक्षिप्त नाम) पंडित, मी अरसिक नाहीं. आतां माझं मस्तक पाहा — डुलतं कीं नाहीं. आतां तें सदाच डुलत राहील. आज मी मंत्रमुग्ध झालों, खूष झालों. ह्यापुढें कोणाही गायकाला माझ्यापुढें गाण्याच्या आग्रह करूं नका. तुम्हीच त्याचं गाणं ऐकत जा. मी पैसे देईन. ह्यापुढें मी आतां फक्त भास्करजींचंच गाणं ऐकणार." गाणें पुन्हा सुरू झालें. आतां टिक्कासाहेब पाषाणमूर्ति नव्हते, ते खुलून डुलत होते. सजीवपणें आनंदास्वाद लुटीत होते. पहाटे चारनंतर बुवांनीं 'बांधो रे बांधो सब मिलके' ही चीज सुरू केली. जो कोणी ह्या मैफलीविषयीं बोले, तो म्हणे, कीं मैफलीचें वर्णन करायला शब्दच नाहींत. टिक्कासाहेबांनीं भावुकतेनें विभोर होऊन म्हटलें, "भास्करजींचं व माझं नातं आतां जीवनभर बांधलं गेलं – मी बंदा झालों." टिक्कासाहेब भास्करबुवांचे अनन्य प्रेमी झाले. ते स्वतः उत्तम बीनकार होते. कधीं सकाळीं, कधीं संध्याकाळीं तर कधीं रात्रीं, बुवासाहेबांचें तीन-चार तास गाणें होई. १९११ पर्यंत हा क्रम अखंड चालला. १९१२ च्या दिल्ली-दरबारापूर्वीं कांहीं दिवस टिक्कासाहेब दिवंगत झाले.

काश्मीर-पंजाबांतील कौल घराण्याचें संगीत-प्रेम प्रसिद्ध होतें. राजा हरिकृष्ण कौल, राजा दयाकृष्ण कौल, त्याचप्रमाणें राजा डॉ. बालकृष्ण कौल हे केवळ षोकी नव्हे, तर मर्मज्ञ संगीतज्ञ होते.

राजा हरिश्चंद्र कौल जालंदर विभागाचे कमिशनर होते. ते 'हरिवल्लभ समारोहा'स अवश्य हजर राहात. कारण ते बुवासाहेबांच्या गाण्यानें अतिशय प्रभावित झाले होते. कपुरथळ्याचे महामंत्री मियां अजिजुद्दिन, कपुरथळ्याचे महाराज, पतियाळा-नरेश, त्याचप्रमाणें जम्मू-काश्मीरचे महाराज, ह्यांजपुढें भास्करबुवांचें वारंवार गाणें होई. ह्यांत विचित्रता ही असे, कीं ह्या रियासतींचे कलाकार स्वतः बुवासाहेबांचें गाणें ऐकण्यास उतावीळ झालेले असत. कोटी सोलन आणि मंडि हीं सिमल्याचीं पहाडी राज्यें बुवासाहेबांना सन्मानानें बोलावीत.

एकदा जालंदरचे कमिशनर हरिकृष्ण कौल ह्यांजकडे बुवांचें गाणें झालें. राजेसाहेबांनीं 'दरबारी'ची फर्माईष केली. बुवासाहेब दरबारीचे कांहीं स्वर व हरकती अशा तऱ्हेनें घेऊं लागले, कीं ऐकणारे गहिंवरून आले. 'दरबारी' नंतर श्रोत्यांना व महाराजांना कसलें गाणें आवडेल ह्याचा बुवांनीं अंदाज बांधला. बुवासाहेबांनीं 'पियाकर धर देखो थरकत है मोरी छतीया' ही ठुमरी गायली. त्यामध्यें बुवांनीं बोलताना व इतर आलापांची अशी फेक केली, कीं प्रत्यक्ष रसराज शृंगारच श्रोत्यांसमोर उभा केला. राजेसाहेब निहायत खूष होऊन म्हणाले, "असलं अप्रतिम गाणं फक्त बुवासाहेबच गाऊं शकतात."

पतियाळा-महाराजांनीं बुवांना एका गाण्यासाठीं बोलावलें, पण अखंड दहा दिवस गाणें चालू राहिलें. कोटीच्या महाराजांनीं बुवासाहेबांना 'गायनसीमा' अथवा 'क्षितिज' म्हटलें. जम्मू-महाराजांचे राजगुरु पंडित ह्यांनीं म्हटलें, कीं "अभिनव गुप्त असे अवतारी पुरुष होते, कीं त्यांनीं केवळ भरतमुनींचा परिचयच करून दिला असें नव्हे, तर त्यांचें प्रत्यभिज्ञादर्शन देऊन (त्यांच्या शास्त्राचें रहस्य सांगून), सौंदर्यशक्तीचा मार्ग मोकळा केला. त्याचप्रमाणें भास्करबुवांच्या गाण्यांत सौंदर्याची मंदाकिनी वाहाते. त्यांचें गायन ऐकतांना वाटतें, कीं आपण जणूं सौंदर्याच्या नदींत विहार करीत आहोंत. अशा पुरुषोत्तम कलोत्तमांच्या आश्रयानेंच कला जीवन जगते. कला जिवंत राहाते."

**मंगूखां दबंग** — जम्मूच्या प्रतापसिंहमहाराजांच्या वाढदिवसाचें गाणें आटोपून परत येतांना बुवासाहेब जालंदरला येऊन राहिले. त्याच देवी-तलावच्या वनस्थळींत मोट-राम-तलाईजवळची सामान्य खोली व पंडित तुलारामांचें प्रेम, ह्यांच्या आश्रयाला बुवा कांहीं दिवस येऊन राहिले. शांत वातावरण, शांत तपोभूमि व शांत स्वभाव ह्यांमुळें बुवासाहेब मुंबईचें वर्दळीचें वातावरण विसरण्यासाठीं येथें कांहीं दिवस राहूं इच्छीत होते. दर मंगळवारीं संध्याकाळीं तीन तास संगीताची बैठक असे. मंगळवारीं सकाळीं बुवासाहेबांची आज्ञा झाली, कीं संध्याकाळीं बाबाजींची देवीसमोर हजेरी असल्यामुळें सारंगी-नवाज झंडेखां व तबला-नवाज मलंगखां ह्यांना बोलावणें पाठवा. झंडेखां कराचीला गेले होते. मलंगखां होश्यारपूरहून आले. झंडेखांच्या अनुपस्थितीमुळें उद्धत सारंगी-नवाज मंगूखांना पाचारण करण्यांत आलें. ही बातमी लाहोर, अमृतसर व आजूबाजूच्या गांवांत पसरली. संध्याकाळपर्यंत पंजाबांतील बहुधा सर्व कलावंत दाखल झाले. तंबोरे मिळविण्यांत आले. मलंगखां तबल्यावर होतेच. मंगूखां बुवासाहेबांच्या 'मुलतानी' 'सुरजन मतवाला' ह्या चीजेची साथ करूं लागले. मंगूखां हे पंजाबचे नामांकित तेज-तय्यार सारंगी-वादक जवान होते. थोड्याच वेळांत साथ विसंगत होऊं लागली. बुवासाहेबांची बढत चालू होती. मंगूखां दुपटीच्या लयींत विहार करूं लागले. श्रोते मंगूखांमुळें खिन्न झाले. उस्ताद मलंगखांनीं रागावून मंगूखांना म्हटलें, "तूं आपलंच वाजवीत आहेस, एखादी महाराजजींची हरकत तर वाजव." ह्या बोलण्याला मंगूखांनीं एक लांबलचक तान वाजवून उत्तर दिलें आणि म्हटलें, "मला तबलजीशींही मुकाबला करतां येतो." मलंगखां बुवासाहेबांना आपलें सर्वस्व मानीत असत. मलंगखांचा मंगूखांनें केलेला अपमान पाहून बुवांची मुद्रा बदलली. बुवासाहेब दोन सव्वादोन पटीच्या लयीनें आलाप घेऊं लागले. प्रत्येक आलापानंतर बुवा मंगूखांना म्हणत, "घे हा पलटा –" मंगूखांचें तोंड उघडें राहिलें. गज सारंगीपासून दूर हटला होता.

पंडित तुलाराम काम, मोह, लोभ व अहंकार ह्यांपासून मुक्त होते. ते आपल्या समाधींतून जागे झाले. त्यांनीं क्रोधमात्र जिंकला नव्हता. ते मंगूला

शिव्या देत त्याची थपडांनीं पूजा बांधूं लागले. मंगूखांनें क्षमा मागितली. गाण्यांत जेथून बखेडा माजला, तेथपासून गाण्याला पुनः सुरुवात झाली.

'मुलतानी' आणि 'भीमपलासी' हे पंजाबी कलावंतांना मातृस्थानीं आहेत, अशी ख्याति अजूनही आहे. पण बुवासाहेबांची मुलतानी 'डोलन मांडे घर आमीवे।' ऐकल्यावर पंजाबनें मान्य केलें, कीं भास्कर पंजाबी गायकीचाही बादशहा आहे. मंगूखां बुवासाहेबांचे परमभक्त बनले. पंजाबचें बिडार (अनगढत) अंग फार प्रसिद्ध आहे, परंतु कोणत्या तरी रूपानें बुवांनीं तेंही अंग आत्मगत केलें. त्यामुळें पंजाबचे सर्व कलावंत बुवांना सर्वांगांनीं एकाधिकारी मानूं लागले.

**पंडितजींची मुरम्मत** — बडे रेशमी पागोटें, लोकरीचा लांब सदरा, घोट्यापर्यंत धोतर, होश्यारपुरी चढाव व अंगावर काळ्या रंगाची गरम दुलई, अशा वेषांत पंडित तुलाराम असत. किंचित् कुबड आलेली, परंतु अतिशय प्रभावशाली व्यक्तित्व असलेली ती मूर्ति असे.

संगीत-सभा भरली होती. मांडव व बाजूची चढती मांडणी माणसांनीं खच्चून भरली होती. जनसमूहाच्या ह्या अथांग सागरांतून रंगमंचाकडे जायला-यायला छोटे मार्ग असत. व्यवस्थापक ह्या नात्यानें ह्या छोट्या रस्त्यांनीं पंडित तुलाराम हिंडत राहात. गाणें-वाजवणें चालू राहात असे. पंडित तुलाराम मंचासमोर गायन-वादन ऐकायला बसलेले कोणींच कधीं पाहिले नव्हते. पण भास्करबुवांनीं तंबोरे जुळवून स्वर लावला, कीं कोणीं जादू करावी, मंत्रसामर्थ्यानें आकर्षून घ्यावें, त्याप्रमाणें तुलारामजींचीं पावलें न कळत रंगमंचाकडे वळत. समोर बसून ते बुवांच्या गाण्यांत आनंदानें पूर्णपणें रमत. हाही त्यांचा क्रम कधींही चुकला नाहीं.

पं. तुलाराम नेहमींप्रमाणें गर्दींत हिंडत होते. रात्रीची वेळ होती. गर्दी इतकी झाली होती, कीं जाण्या-येण्याच्या अरुंद मार्गावरही पाऊल ठेवायला जागा नव्हती. कोणा प्रसिद्ध गायकाची मैफल विलक्षण रंगली होती. पंडित तुलाराम मंडपाच्या कोपऱ्यांत उभे होते. इतक्यांत बुवासाहेबांनीं 'मुंदरी मोरी काहे को छीन लयी' ही चीज सुरू केली. आतां सभेंत दाटी इतकी होती व लोक इतके रंगले होते, कीं तुलारामजींना मंचाकडे जायला वाट

मिळणें अशक्य होतें. माणसें तुडवीत पंडित तुलाराम मंचाकडे निघाले. एकाएकीं दंगल सुरू झाली. दोन लोक पंडित तुलारामना धडाधड मारीत होते. पंडितजींचें ह्या दंगलींत भान हरपलें. पिटणारे लोक पं. तुलारामजींना ओळखीत नव्हते. कांहीं लोक पुढें होऊन त्यांनीं पंडितजींचें रक्षण केलें. गाणें बंद पडलें होतें. मंचासमोर येऊन पंडित तुलारामनीं हसत बुवांना म्हटलें, " ' न सुखं दुःखैर्विना लभ्यते । ' अमृतप्राशनासाठीं ही मारपीट सहन करणं ही अगदीं क्षुल्लक गोष्ट आहे. " क्षणांत पुन्हा शांतता झाली. ' सुंदरी मोरी ' चें गाणें पुन्हा सुरू झालें. गायनाच्या अखेरीस पंडित तुलाराम म्हणाले, " आज गाणं अद्‌भुत सुंदर झालं. अतिशय आनंद झाला. " बुवांनीं प्रत्युत्तर दिलें, " माझ्यामुळें तर थपडा पडल्या. ठीक न गाऊन कसं भागतं ! तो मार मलाच लागला होता ! "

**' गुरूंच्या नगरींत गुरूंचा बगीचा '** — अमृतसर त्या काळपर्यंत भारताचें पॅरिस मानलें जात असे. इतर मोठ्या नगरींत लक्ष्मीची वसति असली, तरी तेथें असीम दारिद्र्यही वसे. पण अमृतसरमध्यें लक्ष्मीबरोबर दरिद्रता ही बहीण म्हणून नांदत नसे. येथें फक्त लक्ष्मीचाच वास असे. ही गोष्ट प्रसिद्ध आहे, कीं अमृतसरच्या सामान्य चणेवाल्याच्या पायांतही ' तिलई जूता ' ( नरम चढाव ) आणि अंगांत मलमलीसारखा तनजेब कुडता असे. उन्हाळ्यांत तो तलम शुभ्र धोतर परिधान करी. आणि थंडीच्या कडाक्यांत दीड-दोन शेरांची दुलई लपेटून तो बाहेर पडे. होळीच्या सणांत लाखों रुपयांचा रंग उडे, सर्वधर्मीय लोक विविध प्रकारच्या रंगानें भिजत, एकरंग भासत. हिंदु-सीख व मुसलमानांच्या टोळ्या शहरभर हुल्लड करीत. गुरूच्या बगीचांतमात्र हुल्लड नसे. तेथें संगीत-समारोह सुरू होई. उत्सवांत दहीं, दूध, मिठाई, अन्न व वस्त्र सर्वत्र विनामूल्य वांटलें जाई. तेथील सर्व सधन, सन्मान्य लोक पंडित तुलाराम ह्यांचा बहुमान करीत आणि भास्करबुवांचे तर ते अनन्य भक्तच बनले होते. सर्वांना बुवासाहेबांच्या गायनानें एक प्रकारची नशा चढे, बेहोषी येई. बुवासाहेब गायला बसले, कीं कलावंत लोक हात वर करून बुवांना कांहीं सांकेतिक इशारा करीत. त्या संकेताचा अर्थ समजून बुवा ' हजरत ख्वाजा संग खेलिये धुमार ' हें भजन सुरू करीत. कलावंत

व्याकुळ होत, विव्हळ होत, बेभान होत. नव्हे, ती एक वेगळ्याच आनंदाची अनुभूति असे. ह्या आनंदध्वनीसाठींच कान असतात आणि त्या अनुभूतीसाठींच आत्मा अवश्य असतो.

पंजाबमध्यें फुलमाळ्याचें काम बहुधा मुसलमान लोक करतात. कलावंतही मुसलमानच असत. त्यामुळें ते फुलें, गजरे, माळा घेऊन येत. साऱ्या अमृतसरमधलीं सर्व फुलें येथें बुवांवर उधळलीं जात. हा हजरत ख्वाजाचा प्रसाद बने. हा घुमारचा खेळ आटोपला, कीं हिंदु व सीख लोकही गर्जत, " महाराज, आतां आमच्याकडेही पाहा ! "

स्वर तेच, बुवासाहेबही तेच, पण शब्दमात्र ' भज रघुवीर श्याम युगल चरणा । ' हिंदु लोक खुषीनें बेहोष होत, पण पुष्पवृष्टिमात्र मुसलमान कलावंतच करीत. संपन्न लोक तर सुवर्णाचीं नाणीं उधळीत. उधळलेल्या त्या गिनी बहुधा फुलें विकणाऱ्यांच्या खिशांत जात.

हें बुवासाहेबांच्या रस-ज्ञानाचें एक अंग असे. ते भक्तिरस व शांतरस सर्व वातावरणांत भरून टाकीत आणि प्रसन्नतेच्या उन्मादांत लोक फुलें व गिन्या उधळीत. ही घटना जणूं आजच घडत असल्यासारखी अजूनही माझ्या डोळ्यांपुढें उभी आहे.

**दुर्ग्याणा** — दुर्ग्याणा हें अमृतसरचें स्मशान. एकदा कांहीं गैरसमज उत्पन्न होऊन कांहीं धार्मिकविरोधी मंडळींनीं बुवांच्या मैफलींत हुल्लड केली. धार्मिक बाबतींत बुवांची भूमिका फार उच्च असे.

आजही हिंदु, मुसलमान व सीख हे सर्व-धर्मीय लोक बुवांबद्दल तोच आदर, प्रेम व मधुर स्मृति बाळगतात. क्षणिक गैरसमजानें असत्य हेंच सत्य मानून अशा दुर्घटना घडतात. ह्या हुल्लडीमुळें बुवासाहेबांच्या प्रेमीजनांनीं रागांत गुरुबाग ह्या स्थानाचा त्याग केला आणि दुर्ग्याणा स्मशानाला एका प्रचंड सभा-मंदिराचें रूप आलें. तेथेंच बुवांचें गायनही होत असे. आणि त्याच दुर्घटनेच्या निमित्तानें बुवांचें गायन होई त्या जागेवर लक्ष्मी-नारायणाचें मंदिर, विशाल सरोवर, रंगमंडप, रागसभा, आदि कितीतरी वास्तु-शिल्पें उभारलीं गेलीं आहेत. बुवांच्या गायनानें पावन झालेल्या मूळच्या स्मशान-भूमीवर आतां ह्या सुरम्य वास्तु निर्माण झाल्या. विनाशांतून हें सुरम्य स्थान

निर्माण झालें. ही एक ऐतिहासिक घटना आहे. ह्याच ठिकाणीं आतां देश-देशांतरींचे कलाकार येऊन होळीचा उत्सव आनंदानें साजरा करतात.

**निक्का स्वर्णकार** — ‘ हरिवल्लभ मेळ्यां ’ त बुवांचें आगमन होऊन प्रथम त्यांचा परिचय झाला, तेव्हां सर्वोत्तम कलावंताला समाधीच्या कार्यवाहांतर्फे एक बहुमोल बनारसी पटका व सर्व गायक-वादकांच्या वतीनें दीड तोळ्याचें एक सुवर्ण-पदक देण्याची योजना ठरली. फुलांनीं मंडित असे गायक-वादक मंचावर बसत व फुलांनीं पूर्णतया झाकलेले बुवासाहेब मध्यस्थानीं बसत. त्यांच्या कोटाच्या वरच्या खिशाला सुवर्ण-पदक लटकावीत. हा पुष्पवृष्टिसमारंभ २८ डिसेंबर रोजीं होत असे. त्याचबरोबर ह्या वार्षिक उत्सवाची सांगताही होत असे.

त्या वर्षी २८ डिसेंबरच्या दिवशीं मंचावर पलुस्करबुवा, भास्करबुवा व इतर कलावंत उपस्थित होते. पुष्पवर्षा-समारोह चालू होता. पंडित तुलाराम सुवर्ण-पदक घेऊन मंचाकडे येत होते. भास्करबुवांनीं पंडित तुलारामना म्हटलें, “ हातांतली वस्तु मजजवळ द्या. ” पंडितजींनीं सुवर्ण-पदकाची डबी बुवांच्या हातीं दिली. त्यांनीं हसत डबींतून सुवर्ण-पदक काढलें व तें पलुस्करबुवांच्या राजशाही लांब कोटावर टांगण्यासाठीं ते पुढें झाले. पलुस्करबुवांनीं भास्करबुवांच्या हातचें मेडल घ्यायचा प्रयत्न केला व म्हटलें, “ पंडित तुलारामजी, सुवर्ण-पदक लटकवायचा अधिकार तुमचा आहे. तुम्ही तें भास्करबुवांच्याच कोटाला लावा. ” भास्करबुवा म्हणाले, “ हा मान विष्णु दिगंबरांनाच शोभतो. त्यांनींच माझ्यासाठीं ही इतकी सुंदर परिस्थिति निर्माण केली. ” जेव्हां दोघांचें कोणी कांहींच ऐकत नाहीं असें दिसलें, तेव्हां भास्करबुवांनीं हाक मारली, “ निक्काऽ निक्काऽ. ” निक्का बुवासाहेबांजवळच त्यांना छायेसारखा चिकटून असे. तो हात जोडून समोर उभा राहिला. भास्करबुवांनीं पलुस्करबुवांना म्हटलें, “ आतां हा मतभेदाचा मुद्दाच नाहींसा झाला. ” आणि असें म्हणतच त्यांनीं सुवर्ण-पदक निक्काच्या कोटाला लटकावून दिलें आणि म्हटलें, “ सोन्यावर अधिकार सोनाराचाच. ” निक्का बिचारा ओशाळा होऊन पदक उतरवीत मंचावरून खालीं उतरला.

वस्तुतः जेव्हांपासून हें सुवर्ण-पदक देण्याची प्रथा सुरू झाली, तेव्हांपासूनच तें पदक बुवासाहेबांच्या खिशाला लावलें, कीं बुवा तें हातानें झाकून टाकीत. बुवा मंचावरून उतरले, कीं ते सुवर्ण-पदक निका सोनाराकडे जाई. तो त्या सोन्याच्या अंगठ्या, लहान मुलांचे कानांतले लोलक, वगैरे बनवून बुवासाहेबांना आणून देई. ह्या प्रकारें सुवर्ण-पदकाचें रूपांतर झालें, कीं बुवा एकेक दागिना स्वतःच्या शिष्य-आप्तेष्टांना वांटून टाकीत. हें बुवांचें वर्तन लोकांस कोड्यांत टाकी. कोणीं आग्रहपूर्वक विचारलेंच, तर बुवा उत्तर देत, "साधना करून कंठसौंदर्यानेंच फक्त आत्मा व परमात्मा प्रसन्न होतो. सफल गायकाचं बक्षीस सफल गायन हेंच होऊं शकतं. हीं सुवर्ण-पदकं व इतर चिन्हं ह्यांनीं गायन कधीं सफल होत नाहीं. सुवर्ण-पदकं धारण करून, आत्मगौरव करणं, ही मोठी आत्मवंचना होते आणि स्वतःच्या अभिमानाला धोक्यांत घातल्यासारखं होतं. छातीवर पदकं धारण केलेला गायक कांहीं कारणानें उत्तम गाऊं शकला नाहीं, तर त्याच्या छातीवरील पदकांनीं त्याचं विडंबनमात्र होईल. आणि माझ्या अहंतेला तर माझं मैफल बेहोष करणारं गायनच अलंकार म्हणून हवं आहे." बुवा पैसा व इतर राजस थाट ह्यांच्या मोहापार केव्हांच पोंचले होते. त्यांना कोणतीही अलभ्य वस्तु सुलभ होती. बुवासाहेबांना पदकें, सोनें, लक्ष्मी, वैभव म्हणजे त्यांचें गायनच होतें. त्यांचें शरीर स्वरांशीं एकरूप झालें होतें. आम्ही दृष्टिविभ्रमामुळें भास्करबुवा व त्यांचें गायन भिन्न मानीत असूं.

**विवाह** — कदाचित् १९१७ तील फेब्रुवारी महिन्यांतील थंडीचे दिवस असतील. कधीं-कधीं थंडी उलटून येई. ढग येऊन गारठा अधिकच होई. सूर्याचें प्रखर ऊनही क्वचित् पडूं लागलें होतें. हरिवल्लभ यज्ञाचा 'बुंदी मठिया' व 'कसार' चा प्रसाद वांटून झाला होता. सरजूप्रसादजी हे एक उच्च दर्जाचे पोलीस अधिकारी सहारणपुराहून सेठ संभुप्रसादजींचा मुलगा प्रद्युम्नकुमार ह्याच्या विवाह-प्रसंगीं करायच्या गायनाचा कार्यक्रम ठरवायला जालंदरला आले होते. पं. अर्जुनदासजी ह्यांस बरोबर घेऊन त्यांनीं पंजाबच्या बहुतेक प्रमुख कलाकारांना जास्तींत जास्त बिदागी ठरवून संगीत-सम्मेलनाचा बेत ठरविला व भास्करबुवांना ठराव करून घेऊन यायची जबाबदारी

अर्जुनदासजींवरच टाकली. बुवांनीं आठ दिवसांसाठीं यावें म्हणून निश्चित तारखाही कळवून, बिदागी किती द्यावी लागेल ह्याविषयीं खुलासाही अर्जुनदासजींतर्फेच मागविला. बुवांना पंजाबांतील दौरा आटोपून शिकारपूरला जायचें होतें, त्याच सुमारास लग्नाचा मुहूर्त धरला असल्यानें बुवांनीं आमंत्रण स्वीकारतां येत नाहीं असें कळविलें. त्यावर भरमसाट बिदागी कळवून आमंत्रण स्वीकारण्याची आग्रहपूर्वक विनंती केली असतां बुवांनीं खुलासा केला, कीं “ आपण जाणतां, कीं मी हरिवल्लभ गिरिबाबांच्या समाधीपुढें गाण्यास नेहमींच येतों. माझें समाधीवर व आपणा सर्वांवर अत्यंत प्रेम आहे. मला आपल्या प्रेमानें तेथें यावेंच लागतें. ह्याचप्रमाणें माझें शिकारपूरच्या गायनप्रेमी मंडळींवरही प्रेम आहे. तेथेंही मी निष्ठेनें जातों. प्रेमबंधनामुळें मला जावेंच लागतें. पौष द्वादशीस जालंदरला न जातां मी धनलोभानें दुसऱ्या एखाद्या धनवानाकडे वा राजा-नबाबांकडे गेलों, तर आपणाला व पंजाबी जनतेला किती निराशा व दुःख वाटेल! आपल्या ही गोष्ट ध्यानीं आली नाहीं, कीं शेठजींकडील विवाहाच्या दिवशींच मला शिकारपूरलाही गेलें पाहिजे. त्यामुळें मला कोणीं कितीही पैसे देऊं केले, तरी मी पंजाबप्रमाणेंच शिकारपूरचेंही कर्तव्य टाळूं शकत नाहीं. शेठजींना माझी निराशा व सदिच्छा कळवाव्या.”

**अवगुंठनवती नारी** — कोणताही धर्म, व्यक्ति, देश, भाषा वा सांपत्तिक पातळी कलेवर सत्ता गाजवूं शकत नाहीं. ती सर्वोच्च मानवी सफलता असते. कलेचा सुगंध हवाबंदी करून कोंडून ठेवतां येत नाहीं. तो विश्वभर पसरतो. कलेच्या प्रत्येक आस्वादकाला आनंद घेण्याचा सारखाच अधिकार असतो. पुरुष, स्त्री, लहान मूल, तरुण-वृद्ध, सबल, निर्बल, दैशिक, पूर्वेचा वा पाश्चिमात्य हे सर्वच कलेच्या आनंदाचे समान अधिकारी असतात. हा राजा, हा रंक हा भेद न करतां कला सर्वांना आनंद देते. सर्वांच्या आत्म्यापर्यंत पोंचण्याचा कलेचा मार्ग सीधा असतो, ती विचार व चिकित्सा ह्या मार्गें जात नाहीं. डोळ्यांनीं सौंदर्य पाहिलें, कानांनीं मधुर ध्वनि ऐकले, कीं आत्म्यांतून पडसाद उठतात, “ ओहोहो, अहाहा, हाय ! ” चिकित्साबुद्धीचें दार बंद होतें. कला हें असें सुंदर बालक आहे, कीं त्यावर

त्याचीं माता-पितरेंच नव्हेत, तर सर्व आजू-बाजूचे लोक प्रेम करतात, मांडीवर घेऊन त्याला आंजारतात-गोंजारतात. सर्वांत खरी उत्तम कला ती, कीं जिला अधिकाहून अधिक स्त्री-पुरुषांची अधिकाहून अधिक कालपर्यंत प्रशंसा प्राप्त होते. कला-निर्मात्याच्या जीवनांतील जास्तींत जास्त कालपर्यंत तिचें आकर्षण टिकतें. अशा सौंदर्य-संपत्तीचें रक्षण करण्याची जबाबदारी सर्व मानव-समाजाची असते. ही सौंदर्य-संपत्ति जात्या नैतिकतापूर्ण असते. कला व नीति ह्यांचा अतिनिकट संबंध आहे. ज्या कलेंत नीति नाहीं, ती चिरायु होऊं शकत नाहीं. ह्याचें सर्वांत मोठें प्रत्यंतर म्हणजे वेदांचें आजपर्यंत टिकलेलें अस्तित्व. पशु-पक्षी व निसर्गांतील जड वस्तु-जातावर संगीताचे संस्कार अखंड चालू आहेत. हजारों वर्षांपूर्वी हा संस्कार सुरू झाला. ऑफियस् आज हजारों वर्षें हयात आहे.

भास्करबुवांच्या स्वराचें कलम नित्य सुंदरता-पूर्ण नवें चित्र बनवी आणि मानवसमाज त्याचा पूर्णपणें लाभ घेई. मूर्ख-विद्वान्, आस्तिक-नास्तिक सर्व आनंदविभोर होत. त्या काळचे कलारसिक स्वयंस्फूर्तीनें त्यांचा लौकिक वाढवीत.

'हरिवल्लभ संगीत-समारोहा' ची एक बरी-वाईट प्रथा होती, किंवा तिला सामाजिक रूढि म्हणूं या. ती प्रथा अशी, कीं संन्याशाच्या समाधीसमोर स्त्री-जातीला बंदी असे, सक्त मनाई असे. जालंदर विभागाच्या इंग्रज कमिशनरच्या मेमसाहेबांसही ह्या संगीत-समारोहांत गायन ऐकायची मुभा मिळाली नाहीं. पंजाबांत पडद्याची चाल कठोरपणें पाळीत. हिंदु स्त्रिया घुंगट ओढीत व मुसलमान स्त्रियांची बुर्की वापरण्याची रीत होती.

बुवांचें गायन हा सर्वांच्याच चर्चेचा, उत्सुकतेचा विषय असे. पेशावर, रावळपिंडी, लाहोर, अमृतसर, जालंदर व आस-पासच्या मुलखांतील घरोघरीं समारोहांतील गायन ऐकून परत आल्यावर चर्चा होई. गायन शिकणाऱ्या स्त्रियांची उत्कंठा ही चर्चा ऐकून प्रज्वलित होई. परंतु देवी-तलावच्या व्यवस्थापकांची लष्करी शिस्त पाहून त्या मनांत दुःखी असत. अर्ज-विनंत्या करूनही प्रत्यक्ष बुवासाहेबांची मैफलही ह्या शिस्तीला अपवाद ठरेना. त्या काळीं आजप्रमाणें रेडियो, लाउड-स्पीकर, ग्रामोफोन, टेपरेकॉर्डर, वगैरे

साधनेंही नव्हतीं. शेवटीं कांहीं चतुर स्त्रियांनीं जिवाचा धडा करून उपाय शोधून काढला. त्यांनीं डोक्याला पटके गुंडाळले. आपले केस झाकून घेतले. टोप्या घातल्या. बाकिचें शरीर कांबळीनें झाकून, आपापल्या अलग-अलग टोळ्या बनवून मैफलींत घुसायचा निश्चय केला. दहा माणसें आलीं, तर त्यांपैकीं तीन पुरुषवेषधारी स्त्रिया होत्या. ह्या प्रकारें स्वतःला लपवून असंख्यांच्या गर्दीत स्त्रिया मंडपांत घुसल्या. ही बातमी इतर ठिकाणच्या स्त्रियांनाही समजली. त्यांनींही हाच मार्ग पतकरला. अपमान होण्याची भीति असूनही बुवांच्या गायनाचा आस्वाद त्या घेत. ही गोष्ट फक्त रात्रीच्या वेळीं शक्य असे. जालंदरला वीज नव्हती. जंगली सडक काळोखी असे. वाटेवरील सामान्य दुकानांत केरोसीनचे दिवे मिणमिणत. आणि ह्या स्त्रिया वेष पालटून, स्वतःला संभाळीत, आपसांत भाषण न करतां, कांहीं अटकाव न होतां मंडपांत घुसत. त्या अफाट जनसमुद्रांत छोट्या-छोट्या नद्यांप्रमाणें लुप्त होत. ज्यांना हें रहस्य ठाऊक होई, तेही चूपचाप राहात. अधिकारी मंडळींना आजपर्यंत ह्या ऐतिहासिक घटनेची वार्ता समजलेली नाहीं. प्रसिद्ध पखवाजी मिया मलंगखां ह्यांची पत्नी दसोंधा हिनेंमात्र बुवासाहेबांना नमस्कारपूर्वक, अश्रुपूर्ण नेत्रांनीं सांगितलें, कीं " बुवासाहेब, मी आपल्या गायनाची प्रत्येक बैठक ऐकत्यें. "

बुवासाहेब आश्चर्यानें पाहातच राहिले. आतां सर्व स्त्री जातीला. सर्व बरोबरीचे अधिकार प्राप्त झाल्यावर हें रहस्य उघड करणें शक्य आ हे जर ही गोष्ट त्या जमान्यांत प्रकट झाली असती, तर स्त्रीजातीवर गहजब झाला असता.

**सूर्यास्त** — १९२२ च्या २५ डिसेंबरला जत्रेचा बाजार, हलवायांचीं मिठायांनीं लादलेलीं दुकानें, कव्वाल गायकांचे मंडप, स्त्रियांच्या पोहण्याची विशेष प्रकारची बंदिस्त व्यवस्था, पट्टबाज, लकडीबाजांचे जथे, विष्णुपद गाणारांच्या सभा, भजनी संकीर्तन मंडळ्या, पहिलवानांची दंगल, संस्कृत सम्मेलनाचा शास्त्रार्थ, साधु लोकांच्या धुम्या, दूध, लस्सी, चहा, मिठाई आणि भोजनाचे चौके, नित्याप्रमाणें सजले. बाह्यसमारंभ नेहमींसारखाच होता. परंतु आंतरिक समारोहाची दशा अत्यंत अनुकंपनीय होती. तीच

पुराणी मोट व विहीर जलहीन होती. राम-तलाईचा हौद कोरडा होता. बुवांच्या खोलीचीं उघडीं कवाडें अश्रु ढाळीत होतीं. कलावंतांच्या तंबूंत अखंड ऐकूं येणारे मृदंगांचे धेट् धेट् किडधा तेट, तन तों रितनों, तवक्लिची सारीगम, तें हास्य, थट्टा आणि उल्हास समाप्त झाला होता. कारण बुवासाहेबांच्या स्वर्गारोहणाची बातमी पंडित तुलारामना मिळाली आणि त्यांच्या अनुयायी वर्गांत कसलीच औपचारिकता न राहातां सर्व उदासीन बनले होते. त्यांचा प्रिय भास्कर निघून गेला होता.

१९२२ सालची २६ डिसेंबरची पहाटेची संगीत सभा सुरू झाली होती. एक कलावंत 'ललित' राग गात होते, 'नजर नाही आमदा, शशिसमान मुख चार दा। सगर सुने गुणि गंधर्व पंडित, आज छिपा भास्कर लालदा ॥' सर्व श्रोते व कलावंत गायक-वादक साश्रुनयन बेचैन अवस्थेंत श्रद्धांजलि देत होते. सुहागन-सभेच्या माथ्यावरील सिंदूर दिसत नव्हता! बांगड्याही दिसत नव्हत्या!

रात्र झाली. सभा भरली. गायन सुरू झालें. एक कलावंत मालकंस गाऊं लागला, 'सा सुंदद सुरकी तान मन भा गयी, कासे कहू मोहे बावरा बना गयी। भास्करराव छिपे, गान गयो हिंदसे, लालको दुख भयो आयु विहागयी।' २७ च्या सकाळीं पुन्हा नादब्रह्माचें रुदन सुरू झालें. हिंडोलमें 'गान बजावत नाही सुहावे, कहा गये मोरे स्वरके भास्कर। जबसे गये वैकुंठ धाम में, लयस्वरतान नजर नही आये अत प्रवीन मच संगीत शास्त्र ॥' पुन्हा केव्हां बुवासाहेबांच्या चरित्राची आठवण आली आणि कलावंत हंसकिंकिणींत शब्द गुंफूं लागला, 'विद्या बरवाने गुणि, नमन गुणको करे, मान अपमानको भेद न माने। नमन करे हरिदास बैजू तानसेनको, सदारंग भास्करको नित नाम ध्याने ॥'

सर्व वातावरण दुःख, करुणा, हताशता ह्यांत बुडून गेलें होतें. पंजाबच्या कलावंतांचा आदर्श गायक कायमचा निघून गेला होता. तमाम जनतेंत उल्हास भरणारा महान् कलाकार महाकालाच्या पाशांत बद्ध झाला होता. दक्षिणायनचा उगवलेला सूर्य पश्चिमेच्या बाजूस अंधार पसरीत बुडून गेला होता.

कोरडी विहीर आणि निर्जल राम-तलाई आणि रुदन करणारी धरित्री कधीं-कधीं कल्पना-जगतांत अमृताचा वर्षाव करते आणि बुवासाहेबांचें अमरगीत एकाएकीं अंतरंगांत प्रगटतें. तेव्हां कोणी खांदे हलवून सांगतें, "मूर्ख ! डोळ्यांवरील भौतिक चष्मा उतरून बघ."

त्याच्या तपस्येमुळेंच महामानवाची कल्पना आणि साधना अमर आहे. विश्वांत आनंदाचे अनंत स्रोत वाहात आहेत. ज्याला नश्वराचें व अनश्वराचें रहस्य उलगडलें, तोच सौंदर्याचें अमरत्व अनुभवतो.

## परिशिष्ट दुसरें

# ‘ ट्रिनिटी क्लब ’

‘ वालेस ’ कंपनींतील श्री. ब्रोंडसे व त्यांचे कांहीं मित्र ह्यांनीं मिळून १९०४–५ च्या सुमारास एक नवीन संगीत मंडळ स्थापन केलें. कांदेवाडींत सदाशिव गल्लीला मिळणाऱ्या एका छोट्या उपगल्लींत ‘ बटाट्याची चाळ ’ होती. तेथें श्री. ब्रोंडसे राहात. त्या त्यांच्या बिऱ्हाडीं त्यांची संगीत-प्रेमी मित्रमंडळी जमे. सुट्टीच्या दिवशीं संगीत-श्रवणाचा कार्यक्रम होई. ही संगीत-सभा पं. भास्करबुवा बखले ह्यांनींच स्थापन केली असावी, निदान त्यांचेंच नेतृत्व ह्या कामीं लाभलें असावें, असा समज निर्माण झाला होता. ह्या संगीत-सभेच्या वतीनें अजूनही दरसाल बुवांची जन्मतिथि व मृत्युतिथि पाळली जाते. ट्रिनिटी क्लबच्या स्थापनेबद्दल तपास केल्यावर असें कळतें, कीं भास्करबुवा व त्यांचे शिष्य-मित्र क्लबांत वारंवार गाण्या-वाजविण्याच्या मैफली करीत. बालगंधर्व, गोविंदराव टेंबे व स्वतः बुवा ह्या क्लबांत हौसेनें जात. ‘ किर्लोस्कर नाटक मंडळी ’ तील वादनकार साथीस असत. परंतु ह्या

संस्थेच्या स्थापनेचें व ती अखंड चालविण्याचें श्रेय श्री. बोंडसे व त्यांचे संगीत-प्रेमी मित्र ह्यांचें आहे. अगदीं जुन्या फोटोग्राफमध्यें, गंधर्व, गोविंदराव टेंबे, वगैरे मंडळी श्री. बोंडसे ह्यांजबरोबर दिसतात. भास्करबुवांच्या खास रंगतदार शैलीची आवड असलेली ही मंडळी अखंड साठ वर्षं संगीत–सेवा करीत आहे. बुवांच्या गाण्याचा प्रभाव अजून जागृत आहे.

## परिशिष्ट तिसरें

# भास्करबुवांचा लेख

गायन हा विषय अत्यंत महत्त्वाचा आहे. केवळ भौतिक दृष्टीनें विचार केला असतां त्यापासून फुफ्फुसांस व्यायाम होऊन शरीरप्रकृति दृढ होते; व आरोग्य प्राप्त झाल्यानें मन आनंदित होतें, एवढेंच नव्हे, तर स्वतःची करमणूक करतां येऊन दुसऱ्याचेंही मन रिझवितां येतें. अध्यात्मदृष्टीनेंही त्याचें मोठेपण फारच मानलेलें आहे. देवांची स्तुति कवनबद्ध केल्यानें देव संतुष्ट होतात. गायनानें मुलांचें रुदन थांबतें, वनेचर लुब्ध होऊन प्राणार्पणदेखील करण्यास तयार होतात, संतापलेला सर्पदेखील डोलूं लागतो, मनाचें स्वास्थ्य उत्पन्न करतां येऊन, मन विकाररहित करतां येतें व त्या योगानें ईश्वरप्राप्तीचा मार्ग सुकर करतां येतो. विश्व हें सर्व गायनमय आहे. ह्याच अर्थानें एके ठिकाणीं म्हटलेलें आहे —

**ना देव व्यज्यते वर्णः पदं वर्णात्पदाद्वचः ।**
**वचसो व्यवहारोऽयं नादाधीनमतो जगत् ॥**

ह्या गोष्टीचेंच रहस्य श्रीकृष्णाची मुरली, नारदाची व सरस्वतीची वीणा, महादेवाचा डमरू, ब्रह्मदेवाचा सामवेद ह्यांत आहे.

गायनाच्या इतिहासाचा आरंभ वेदापासून केला पाहिजे. वेदांतच नव्हे तर श्रुति, स्मृति, पुराणें, इत्यादिकांतही ठिकठिकाणीं श्रुति, स्वर, जाति, वीणा, वादन, ताल, वगैरेबद्दल विचार केलेला आढळतो. परंतु हा विचार व्यवस्थित रीतीनें केलेला दिसत नाहीं. तसा पहिला प्रयत्न भरतमुनींनीं केला आहे. त्यानंतर कश्यप, संबल, नारद, तुंबरू, हनुमान, रावण, भोजराज, सोमेरा, वगैरे अनेक संगीतशास्त्रवेत्ते होऊन गेले; पण त्यांपैकीं बहुतेकांचे ग्रंथ सध्या उपलब्ध नाहींत. शार्ङ्गदेव ह्यांचा 'संगीत-रत्नाकर' नांवाचा ग्रंथ फारच मोठा असून महत्त्वाचा आहे. त्यानंतर हिंदुस्थानांत पुष्कळशीं स्थित्यंतरें झाल्यानें संगीताचा लोप होऊं लागला. मुसलमानांच्या अमदानींत-मात्र त्याची थोडीशी सुधारणा तानसेन, नायक, गोपाळ, बैजू, वगैरे मंडळींनीं करण्याचा प्रयत्न केला व हल्लीं गायनाला जें हिंदुस्थानी पद्धतीचें वळण लागलें आहे, त्याचें बहुतेक श्रेय तानसेन ह्यांसच आहे. अगदीं अलीकडे उत्तर हिंदुस्थानांत शौरींद्र मोहन टागोर, कर्नाटकांत गोविंद दीक्षित, वेंकटमखी सुब्रय्या, ह्यांनीं खटपट चालविली आहे. महाराष्ट्रांत प्रो. भातखंडे ह्यांचें शास्त्रीयदृष्ट्या संशोधन व रा. विष्णु दिगंबरबुवा पलुस्कर, रहिमतखां, अब्दुलकरीम ह्यांनीं ठिकठिकाणीं गायन-विद्यालयें स्थापून त्याचें पुनरुज्जीवन करण्याचें स्तुत्य काम केलें आहे. परंतु संगीत-शास्त्रांच्या नियमांचें पालन गायक करतातच असें नाहीं. संगीत हें जसें शास्त्र आहे, तशीच कलाही आहे. कलेंत विधात्याच्या इच्छेनुरूप फेरफार होणारच. नियमांना अगदीं धरून चालायचें नाहीं. संगीताचा उपयोग मनोरंजन ह्या दृष्टीनें फार असल्यानें गोडी व रस ह्यांकडे लक्ष देऊन शास्त्रीय नियमांतही फरक केल्यास तो अनाठायीं होत नाहीं व ह्याच विचारानें ह्या पुस्तकांत शास्त्रीय विचाराच्या दृष्टीनें न लिहितां, मनोरंजन व लोकप्रियता ह्यांकडे लक्ष दिलें आहे.

आधुनिक शास्त्राच्या दृष्टीनें पाहिलें असतां, गायन हा ध्वनिशास्त्राचा भाग आहे. ध्वनि म्हणजे एक प्रकारच्या लहरी अगर लाटा आहेत. पाण्यांत दगड टाकला असतां ज्या प्रकारच्या लाटा दिसतात, त्या प्रकारच्या हवेंत लाटा उत्पन्न झाल्यानें ध्वनि प्रत्ययास येतो. ह्या लाटा एकीमागून एक कांहीं

क्रमानें येऊं लागल्या, म्हणजे त्यापासून उत्पन्न होणाऱ्या आवाजांत निश्चितपणा प्राप्त होतो. ह्या निश्चितपणांतच शब्दांचें रहस्य आहे. जितक्या लाटा उंच व मोठ्या येतील, त्या मानानें त्यांचा परिणाम जास्त होतो. त्या जितक्या लवकर येतील, त्या मानानें त्यांची तीव्रता वाढते. ह्यावरून आवाजाचे खालीलप्रमाणें भेद करतां येतील —

मंद्र – बारीक लाटा उत्पन्न करणारा – हलका आवाज
मध्य – साधारण लाटा उत्पन्न करणारा – मध्यम आवाज
तार – मोठ्या लाटा उत्पन्न करणारा – खडा आवाज

त्याप्रमाणेंच

कोमल – थोड्या लाटांचा – मृदु
शुद्ध – नियमित लाटांचा – साधा
तीव्र – पुष्कळ लाटांचा – उंच

साधारण बोलण्यांतील आवाज मध्य समजले जातात. त्यांतही कमी-अधिक प्रमाणांत तीव्रता दिसून येत असल्यानें त्यांच्या निदर्शनार्थ आवाजाचे सात भेद कल्पून त्यांत सा री ग म प ध नी अशीं सप्तस्वरात्मक नांवें दिलेलीं आहेत. शास्त्रांत ह्यांस सबंध नांवें आहेत तीं —

| सा | री | ग | म | प | ध | नी |
|---|---|---|---|---|---|---|
| षडज्, | ऋषभ, | गांधार, | मध्यम, | पंचम, | धैवत, | निषाद |

ह्या सातही स्वरांचे मंद्र, मध्य, तार असे भेद होऊन

| मंद्र | मध्य | तार |
|---|---|---|
| सारीगमपधनी | सारीगमपधनी | सारीगमपधनी |

ह्या प्रत्येकास सप्तक असें म्हणतात. जसें – मंद्र सप्तक, इत्यादि.

ह्या प्रत्येक सप्तकांत प्रत्येक स्वराचे अति कोमल, मध्य, तीव्र, तीव्रतर, तीव्रतम असे भेद मानतां येतील व त्याप्रमाणें निरनिराळ्या गायनशास्त्रवेत्त्यांनीं तसे मानलेही आहेत. परंतु हल्लींच्या गाण्यांत विशेपतः हिंदुस्थानी पद्धतींत प्रत्येक सप्तकांत पुढीलप्रमाणें स्वर मानले आहेत — षडज् व पंचम हे अधिकृत मानले आहेत. म्हणजे त्यांचे कोमल व तीव्र असे भेद नाहींत. हल्लींचे स्वर आहेत ते असे —

१. शुद्ध षडज्. २. कोमल ऋषभ. ३. शुद्ध ऋषभ किंवा तीव्र ऋषभ. ४. कोमल गांधार. ५. शुद्ध गांधार किंवा तीव्र गांधार. ६. कोमल किंवा शुद्ध मध्यम. ७. तीव्र मध्यम. ८. शुद्ध पंचम. ९. कोमल धैवत. १०. शुद्ध किंवा तीव्र धैवत. ११. कोमल निषाद. १२. शुद्ध किंवा तीव्र निषाद.

ह्या बाराही स्वरांची चांगली ओळख झाली, म्हणजे मग गायनाच्या शास्त्रास प्रारंभ करतां येतो. सात स्वरांपैकीं १, २, ३, ४, ५, ६, ७, इत्यादि स्वर एकत्र येऊन, ते उलटसुलट क्रमानें म्हणणें, ह्यास अलंकार अशी संज्ञा आहे. पूर्वीं सांगितलेल्या सात शुद्ध व पांच विकृत स्वरांच्या संमिश्रणानें राग बनतो. राग म्हणजे ह्या बारा स्वरांपैकीं कांहीं स्वरांचा उपयोग करून, मनाचें रंजन करणारें गायन. मात्र राग तयार होण्यास स्वर पांच किंवा त्यांपेक्षां जास्त पाहिजेत.

पांच स्वरांच्या रागास औडव, सहा स्वरांच्या रागास षाडव, सात स्वरांच्या रागास संपूर्ण, अशा संज्ञा आहेत. सारीगमपधनीसा ह्या क्रमास चढ किंवा आरोह म्हणतात व त्यांच्या व्युत्क्रमास सानीधपमगरीसा ह्यांस उतार किंवा अवरोह, अशीं नांवें आहेत. रागाचें गाणें गातांना आरोह व अवरोह ह्यांचा उपयोग करावा लागतो. ह्यांत आरोहाचे स्वर अवरोहाहून निराळे असूं शकतात. ह्यावरून रागांचे खालीलप्रमाणें विभाग कल्पितां येतील —

रागांचे विभाग — संपूर्ण, षाडव, औडव, मिश्र, वक्र, वगैरे.

ह्या रागांत आरोह व अवरोहाच्या वेळीं सा हा स्वर गायनाचा प्रारंभ असल्यानें टाकीत नाहींत. ह्यावरूनच रागांचे दुसऱ्या रीतीनें सहा विभाग करतां येतात.

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १ | री | स्वरांचें | प्राधान्य | असलेला | ह्या प्रत्येकांत सहा स्वर पाहिजेतच. |
| २ | ग | ,, | ,, | ,, | |
| ३ | म | ,, | ,, | ,, | |
| ४ | प | ,, | ,, | ,, | |
| ५ | ध | ,, | ,, | ,, | |
| ६ | नी | ,, | ,, | ,, | |

असा हा मुख्य स्वर, ज्यावर गायनांत जोर दिलेला आढळतो किंवा ज्याचा उच्चार इतरांपेक्षां जास्त होतो, त्यास वादी अगर अंशस्वर म्हणतात. त्याच्या खालोखाल महत्त्व असणाऱ्या स्वरांस संवादी अशी संज्ञा आहे. बाकीच्या स्वरांस अनुवादी व रागांत न येणाऱ्या स्वरांस विवादी अशीं नांवें ठेवलीं आहेत. उदाहरणार्थ —

यमन राग (संपूर्ण)

पपप मगरेगमपप सारे गम पमगारे ग म पप सारेगम पध पम गारे गमपप ॥ ह्यांत प हा अंशस्वर व ग हा संवादी आहे. इतर स्वर अनुवादी होत.

हमीर राग (वक्र)

सा गा म ध ध नी ध म प ग म ध सा नी ध म प ग म रे ग म म ग म रे सा ॥ ह्यांत ध हा वादी, म संवादी व इतर अनुवादी होत. ह्यांत आरोहांत रि प हे स्वर नाहींत, त्यांस विवादी म्हणतात.

हे राग गातांना जो आरोह-अवरोह होतो, त्यालाच मूर्च्छना असें नांव आहे. ह्या मूर्च्छनावरूनही रागांचे प्रकार ठरवितां येतात. हे राग सात शुद्ध व पांच विकृत स्वर ह्यांच्या मिश्रणानें ५-६-७ स्वरांनीं आरोहा-वरोहानुरोधानें झालेले असल्यामुळें रागांचे असंख्य प्रकार करतां येतील. विशेषतः एक मुख्य स्वरसमुच्चय कल्पून त्या स्वरांपासून थोड्याशा फरकानें होणारे भेद त्या समुच्चयांतील आहेत असें समजण्यास हरकत नाहीं. असले मुख्य समुच्चय दहा मानले आहेत. त्यांसच प्रचारांत थाट अगर मेळ असें म्हणतात, जसें —

उदा. १ — यमनथाट (स्वरसमुच्चय) सर्व तीव्र स्वर
ह्यांत भेद हमीर — री व प वर्ज्य फक्त आरोहांत
भूपाल — म व नी वर्ज्य
केदार — ग वर्ज्य, म दोन्ही लावावयाचे
हिंदोल — री व प वर्ज्य

उदा. २ — भैरवीथाट (स्वरसमुच्चय) सर्व (कोमल स्वर)
ह्यांत भेद भैरवी — पूर्ण स्वरांचा (कोमल)
मालकौंस — री व प वर्ज्य (इतर सर्व कोमल स्वर)

ह्याप्रमाणें भेद कल्पून झालेले मुख्य दहा थाट पुढीलप्रमाणें —

१ यमन — सर्व तीव्र स्वर
२ बिलावल — री ग ध तीव्र, म कोमल, नी दोन्ही
३ खमाज — नी दोन्ही, म कोमल
४ भैरव — री ध कोमल
५ भैरवी — सर्व कोमल
६ आसावरी — री तीव्र, बाकी सर्व कोमल
७ तोडी — री ग ध कोमल, म नी तीव्र
८ पूर्वी — री ध कोमल, म दोन्ही
९ मारवा — री ध कोमल, प वर्ज्य, बाकीचे तीव्र
१० काफी — नी दोन्ही, री ध तीव्र, ग म कोमल

ह्या रीतीनें थाटांची माहिती झाल्यावर गायनास सुरुवात करण्यास हरकत नाहीं. एखाद्या रागाचा स्वरसमुच्चय, आरोह अवरोह, अंश, संवादी, इत्यादि बाबींचा निर्णय झाल्यावर त्यांस अनुसरून त्या स्वरांचा प्रस्तार करून गायन गातात. जसें—

राग पिलू

| आरोहांतील स्वर | अवरोहांतील स्वर |
| --- | --- |
| सा री ग म प ध नी | नी ध प म गा रे सा |
| (कोमल व तीव्र स्वरांसह) | (कोमल व तीव्र स्वरांसह) |

ह्यांवरून हा राग गाण्यांत स्वरांचा उपयोग पुष्कळ प्रकारांनीं करतां येईल.

ग् ऽ रे् सा ऽ ग म् प ग् ऽ रे स ऽ म प नी सा ग म प ग् रे सा ऽ

सा नि ध प म प नी सा ग म प ग् ऽ रे सा ऽ म प नी सा

ग् म् प नी सा गं् ऽ रें सं ग ऽ रे स ॥

अशा रीतीनें प्रस्तार करून गाइलें, म्हणजे त्यास पिलू रागाचें गाणें म्हणतात; परंतु हे स्वर प्रस्तार करतांना मोठी काळजी घ्यावी लागते ती हीच, कीं एक राग गातांना अन्य रागांचा आभास त्यांत नसावा; म्हणजे इतर

रागांस लागणाऱ्या स्वरांहून भिन्न स्वरांचा उपयोग करावा. उदाहरणार्थ — पिलू राग गातांना री ध् म् प नी सा नी ध् प् म् ग् रे सा असा प्रस्तार होणें शक्य आहे. हाच प्रस्तार भीमपलास रागाचा होत असल्यानें पिलू रागांत भीमपलासाचा आभास होईल. म्हणून पिलू रागाच्या वेळीं ह्या प्रस्ताराचा उपयोग करूं नवे. हा भेद कायम ठेवून प्रस्तार करीत गेलें म्हणजे झालें.

रागाचें गायन म्हणतांना मध्यंतरीं ताना घेण्याची पद्धति आहे. ताना म्हणजे रागांतील स्वरच लवकर लवकर म्हणून रागाची विकृति न करतांना गाणें. क्वचित् प्रसंगीं (ह्यांचें वर्णन तालाचे वेळीं देण्यांत येईल.) कांहीं विवक्षित स्वर म्हणून झाल्यावर गाण्याच्या भागाची समाप्ति होते. परंतु त्यास लागणारा वेळ शिल्लक राहिल्यास तो भरून काढावा लागतो. अशा वेळीं, अगर मनास आनंद व्हावा म्हणून, रागांतील स्वर लवकर म्हटल्यानें गायनास शोभा आणतात; ह्यासच ताना असें म्हणतात. ह्या तानाही पुष्कळ असून त्या गातांनाही पूर्वीचाच भेद कायम ठेवावा लागतो.

रागांसंबंधीं माहिती झाल्यावर पदांच्या चाली कांहीं ठरल्या आहेत. अगदीं साधें उदाहरण घ्यावयाचें म्हणजे शिखरिणी वृत्त व चामर वृत्त हीं होत. दोन्ही वृत्तें अगर कविता एकाच रागांत गातां येतील, पण दोघांच्या चाली अगर म्हणण्याच्या पद्धति निराळ्या आहेत. ह्या चालींचे पुष्कळ प्रकार आहेत. त्यांपैकीं कांहीं पुढें लिहिल्याप्रमाणें. ह्या चाली किंवा नियमबद्ध गायनासच 'प्रबंध' असें म्हणतात.

ध्रुवपद — सध्या प्रचारांत उच्च प्रतीचें मानलेलें.
ख्याल — उत्तर हिंदुस्थानांत दुय्यम प्रतीचें श्रेष्ठ मानलेलें.
होरी — शृंगाररसप्रधान कवन.
टप्पा — बोरी मियानें प्रचारांत आणिलेलें.
ठुमरी — नर्तनास अनकूल गायन.
दादरा, गज्जल, रुबाई, लेज, वगैरे.
भजन =
प्रबंध — ईश्वर व राजादिक स्तुतिविषयक कवनें.
अष्टपदी — जयदेव कवीच्या गीतगोविंदानें प्रचारांत आलेलें.

दोहरा — ( द्विपदी ), चौपाई ( चतुष्पदी ), छपाई ( षट्पदी ) चतुरंग, इत्यादि.

स्वरावर्त, तिल्लाना, तराणा, तानवर्ण किंवा पर्णपल्लवी, वगैरे, पदें, लावण्या, पोवाडे, कटाव, फटका, भूपाळी, आरती, पाळणा, अभंग, ओंवी, आर्या, साकी, कविता, इत्यादि.

ह्या चालींचीं पदें, वगैरे म्हणतांना त्यांचा प्रारंभाचा जो भाग तो उद्ग्राह होय. जो भाग वारंवार उच्चारिला जातो त्यास ध्रुव म्हणतात. ह्या दोन्ही भागांचा संबंध जोडणारा भाग त्यास मेलापक व पदाचा अर्थ विशद करून सांगणारा भाग ह्यास आभोग अशीं नांवें आहेत. व दोहोंच्या मधल्या भागास अंतरा असें म्हणतात. ह्या पदाप्रमाणेंच रागाच्या पहिल्या भागास स्थाय, स्थायी अगर अस्ताई म्हणण्याचा परिपाठ आहे.

गायनांतील स्वर, राग, प्रबंध एवढ्याच ज्ञानानें भागत नाहीं. गायनाच्या वेळीं एक प्रकारानें वेळेचाही उपयोग करावा लागतो. एक स्वर म्हणण्यास लागणाऱ्या वेळास मात्रा ही संज्ञा आहे. गायन हें मात्रांकित आहे. एखाद्या प्रबंधांत अगर गीतांत १६,२०,४०,४८, इत्यादि मात्रा असतात व तो प्रबंध अगर गीत म्हणतांना मात्रांकित वेळच नेहमीं घेतला पाहिजे, व ह्याकरितांच तालाचा उपयोग करतात. ताल म्हणजे मात्रा मोजण्याचें एक साधन, अमूक प्रकारच्या वाद्यावर अमूक प्रकारच्या मात्रा वाजतात व गायन म्हणणारानें गीतांतील मात्रांचें प्रमाण त्यावर ठेवून गायलें पाहिजे.

वादन चार प्रकारचें आहे. त्यांचीं नांवें — तंतुवाद्य ( तंबोरा, बीन, वगैरे ), आनद्ध चर्मवाद्य ( मृदंग, तबला, वगैरे ), सुषिर ( सनई, हार्मोनियम, इत्यादि ), घन ( ताल, झंगट, घंटा, वगैरे ). ह्यांचा उपयोग गाण्यांत ताल ठेवण्याकडे अगर मात्रा मोजण्याकडे होतो व त्यासच लैकारी गाणें म्हणतात. ताल म्हणजे पूर्वीं सांगितल्याप्रमाणें गाण्याचें वेळामापक यंत्रच समजायचें. ह्यांत तबलजी अगर वादनकार कोणा एका नियमानें वाद्यांतून स्वरयुक्त आवाज अगर बोल काढतो व बोलावरून मात्रांचा निश्चय करून त्या मात्रांनीं बद्ध वेळांत गायनाचा चरण अगर भाग म्हणणें ह्यांतच गायकाची कुशलता समजली जाते. ह्यांत तालाचे मुख्य प्रकार पांच आहेत.

त्या प्रत्येकाचे सात भेद करून एकंदर पस्तीस ताल प्रचारांत आले आहेत. सर्वसाधारण तालांचीं प्रचारांतील नांवें —

त्रिवट, चौताल, एकताल, झंपा, धमार, झुमरा, आडाचौताल, दीपचंदी, तेंवरा, पंजाबी ठेका, दादरा, खेमटा, रूपक, इत्यादि.

ह्या तालांतून कांहीं मात्रा ठरलेल्या असतात. उदाहरणार्थ — दादऱ्याचा ठेका ह्यांत सहा मात्रा मानलेल्या आहेत. आरंभ अथवा ठेक्याचा मुख्य भाग किंवा थांबविण्याची जागा पहिल्या मात्रेवरतीच आहे. ह्या थांबण्याच्या जागेस सम अशी संज्ञा आहे. प्रत्येक वेळीं गायकानें आपल्या गायनांतील उद्ग्राह अगर समेचा स्वर ह्या मात्रेवरच आणून ठेविला पाहिजे. हीच गायनांतील खाशी अगर वाहवा म्हणण्याची जागा होय.

( अपूर्ण )

'भारतीय संगीत' मासिकांतील भास्करबुवांचा अपूर्ण लेख ( जानेवारी, सन १९३३, वर्ष १, अंक २ )

[ स्वतःच्या अनेक गुरुजींकडून शिकलेल्या शेकडों चिजा स्वर-लेखन रूपरेषेनें छापून प्रसिद्ध कराव्या अशा विचारानें भास्करबुवांनीं अशा चिजांचा एक संग्रह लिहून काढविला होता. डॉ. सांबारे हे चांगले गायक असून त्यांचें अक्षर सुरेख वळणदार होतें. त्यांच्या हातच्या तीन-चारशें चिजा बुवांनीं स्वर-लेखन पद्धतीनें लिहवून घेतलेल्या उपलब्ध आहेत. ह्या चिजांना प्रस्तावनेदाखल उपयोगी पडावा म्हणून भास्करबुवांनीं हा लेख लिहायला घेतला, तो अपूर्ण आहे. त्यांतील एकंदर धोरण बुवांच्या मतांवर प्रकाश टाकणारें असल्यामुळें तो येथें दिला आहे. ]

# सूचि


अचरेकरबुवा २१५

अजमल अली ८२

अबदुल्ला (नथ्थनखांचा मुलगा) १३७, १४०, १४२, २३४

अबदुल्ला (नोकर) ९२, ९७, १०२

अब्दुलकरीमखां ४२, ८२, ११६, १२८, १६४, १६८, १६९, १८१, १८७, १९०, १९४, २२१, २४६, २५०, २६१, २६२

अमीरखां (जलतरंगपटु) ८२

अमीरखां (सतारिये) ६४

अलादियाखां ४, ८, १०, १४, ३९, ४२, ४६, ११४, ११५, १४८, १४९, १५०, १५१, १५२, १५३, १५४, १५५, १५७, १६४, २०३, २१३, २२१, २३०, २३१, २३२, २३३, २४४, २४८, २४९, २५०

अलादिया मेहरबान (पंजाबचे) ९

अलीबक्ष ९, १५

अलीहुसेनखां बीनवाले ८२, १२८

अवघडदास १००, २६२

अष्टेकरबुवा ३३, १७४, १७५, १७६, १८३, १८४, २३५, २५२, २५७, २५९

अहमदलीखां सरोदिये १६६

आगासकर शां. पु. ४०

आग्राघराणें ४, ३९, ११७, १२१, १४९, १५४, १९७

आठवलेबुवा १७८

आत्मतेज नाटक २३९, २४०

आत्मारामबुवा ९९

आदितरामजी २१४

आपटे म. चि. १३०

आपटे ह. ना. ३२, ६३, १८७, १९०
आबालाल रहेमान १६४
आबिद हुसेन ८२
आयसन हौएर ४०
आर्यसमाज २२६
आर्य संगीत विद्यालय १८७, १९०
आशा निराशा नाटक १९९
इंगळेबुवा ३
इच्छाबाई ८२
इदनजान ८२
इनायहुसेन सतारिये ८२
इलायतबक्ष ८५
इंदूर ७०, ७१, ७२, ७३, ७५, ७८, १५९, २०३
उमरावखां ( तानरसखां पुत्र ) ९
उस्मानखां ८२
एकनाथपंडित ( ग्वालेर ) १८४
ॐकारनाथ ठाकूर २१७
कपिलेश्वरीबुवा ११६
करमणूक पत्र १८७
कराची १६
करंदीकर अ. शं. १०५, २०४, २३०
कर्वे त्र्यंबकबुवा १०५
कऱ्हाडकरबुवा ३०, ३५
कलगुटकर अंजनीबाई १९२, २०४
कलगुटकर मुक्ताबाई १९२, २०४
कलोत्तेजक समाज १३१
काणेकर पु. गो. २४६
कादरबक्ष ८५, ८७, ८८, ९८

कनडेशास्त्री ९४, ९९, १०२, १०४, १०५, २१०
कानिटकार वा. गो. ३०
कामताप्रसाद तबलिया १३८
कारवारकरीण चंदाबाई १९२
कालकाबिंदा ११०
काश्मीर २८
किंजवडेकर रामभाऊ ७०, ७२
किर्लोस्कर अण्णासाहेब १९, ३८, ५६, ५७, ५८, ५९, ६०, ६१, ६६, ६७, ६८, ६९, ७०, ७१, ७२, २२३
किर्लोस्कर थिएटर १७७, १८३, १८५
किर्लोस्कर ना. म. २२, ३८, ५६, ५७, ५८, ५९, ६०, ६१, ६२, ६३, ६४, ६५, ६७, ६८, ६९, ७०, ७१, ७२, ७३, ७४, ७६, ७७, ७८, ७९, ८१, ८९, ९०, ९१, ११९, १२०, १३२, १४४, १४५, १४६, १४७, १५६, १५८, १५९, १७६, १७७, १८२, १८३, १८४, १८५, १८६, १९१, १९४, १९५, २०३, २१३, २४३
किर्लोस्कर शंभूराव ८९
केतकर बळवंतराव १४७
केतकर बापूराव १७, ३३, १९२, १९६, २००, २०५, २०६, २५७
केतकर डॉ. श्री. व्यं. ५, २६२
केशवबुवा ९९
केसरबाई केरकर (सूरश्री) १६, १२५, १४९, १५१, १५२, १५३, १५७, २०३
केळकर न. चिं. १३३, १८२, १८७, २६०
केळकर सी. वि. ३२, ३३, ३४, १८३
क्लेमण्ट्स २१६
कोरगांवकर विठ्ठलराव ४७

कोल्हटकर अ. चिं. २८, २६०
कोल्हटकर अप्पाराव ५५, १०५, १०९, ११८, १२०, २२०, २५८
कोल्हटकर गणपतराव १०५, १०९, २४६
कोल्हटकर भाऊराव ४, २२, ५६, ५८, ५९, ६०, ६२, ७०, ७२, ७३, ७८, ७९, ८०, १०४, १०५, १०९, ११८, १२०, १३३, १४४, १७८, २१४, २२०, २२१, २५८
कोल्हटकर श्री. कृ. १७६, १७७
कोल्हापुरकरीण कृष्णा १२५, १३३
कोल्हापुरे कृष्णराव १९४, १९५, २०४
खरे ३५
खाडिलकर कृ. प्र. १९, १७६, १७७, १८९, १९०, १९२, २२४
खंडेराव महाराज ८३
गणपति ( तानूताईंचा मुलगा ) १३५
गर्दे डॉ. १८२
गाडगीळ नाना १२७, १४५
गामणखां २२९
गायनाब्धिसेतु ८३
गुप्ते वकील १७२
गुरट्ठु १६७
गुरव चिंतोबा १४७, १९५, २०४
गुरव शिवरामबुवा ३४
गुरव शंकर १४५, १४६
गुलाबसिंग पखवाजी ८२
गुलाम अब्बास ८८, १२५,
गुलामसागर ८२
गुळवे सावकार ५६
गोखले ( बडोदे ) ३५

गोखले बाबूराव ३४
गोखले गणपतराव ९९
गोपाळ गायन समाज २९
गोरे कृष्णराव, १४७, १९५, २०४, २२४,
गोरे डॉ. १६५, १६८
गोविंदप्रसाद ८८, १११
गोविंदसिंग १०६
गोहरजान ३५, १९९, २२१, २२४
गंधर्व ना. म. ४६, १४३, १९१, १९७, १९८, १९९, २२४, २४०
गांधर्व महाविद्यालय १५९, १८०, १८१, १८२, १८४, २३४
ग्वालेर १६, ६४, ८६, १५८, १५९
घग्गे खुदाबक्ष ८५, ८७, ८८
घसीटखा ८२, ८३, ८४, ८५, ८७, १०२
घाणेकर बंधु ८२
चर्चिल सर वि. ४०
चाफळकर १४७, १७०
चुन्ना ७१, ७५, १२५, १३३
चोणकर कृष्णराव १५१
चौबळ सर महादेव ५१, १७३
छत्रे विष्णुपंत ४१, १२४, १३१, १९६
छोटूमहाराज १०५
जमशेटजी जिजीभाई १२३
जमालुद्दिन बीनकार ८२
जयपूर घराणें १५४, १५५, २३१
जाधव लक्ष्मीबाई २१
जाधव विश्वनाथबुवा १९६

जानकीबाई ३५, २२१
जालंदर ९, १४, १६, २३, २८, ४५, १५८, १५९, १६०, १७१, २१७, २२७
जॉं क्रिस्तोप ४०
जुम्मादादा ८९
जोगळेकर नारायणराव ६०, ६१, १४६, १४७, १७६, १७७, १८२, १८५, १८६, १८७, १९५, २२३, २२४, २४३
जोगळेकर योगिनी ३४
जोशी अनंत मनोहर ४२, १६४, १८०, १८१, २२१, २३४
जोशी नथुबुवा १५१
जोशी बाबुराव ६०
जोहराबाई ३५, २२१
ज्योतीसिंग (पखवाजप्रवीण) ७०
झंडेखां ९
टापरे ना. रा. ऊर्फ बाबूराव २०४, २२०
टिळक स्मारक फंड २४३
टेंबे गोविंदराव २, ३, ४, ८, १७, १८, १९ २०, २५, ४६, ११४, ११५, १३५, १४६, १४८, १५७, १७३, १८३, १८४, १८६, १९१, १९४, २२०, २२४, २४५
टोपले राजारामशास्त्री ५१
ठाकूर अवनींद्रनाथ १६४
ठाकूर रवींद्रनाथ १६४
ठाकोरदास माणिळराव १९६
ठाकोरदास यशवंतराव १८९, १९२, १९६
ठोसरस्वामी २९, १२७, १४५, १५६, १५७
डेक्कन जिमखाना २४२, २५१, २५२, २५७
तानसेन ३, २४
तानरसखां ९

तानूताई ५०, १०३, १४४, १४५, १५७, १७२, १७३, २३५
तानूबाई घोरपडे १२५
तांबेशास्त्री (पू. गा. स.) २१५
तांबे राजरत्न दाजीसाहेब २२, १०६, १०८
तिरुखवा अहंमदजान, २५०
तेलंग बाळशास्त्री ५१, ५६, ९२, ९५, ९६, ९७, १०२, १०५, १०७,
तेलंग पुरुषोत्तमराव ११६, १२२, १२३, १२८, १३२, १३३, १८९, २१४,
तेलंग मंगेशराव ११६, १२२, १२३, १२५, १२७, १३२, १३३, १८९, २१३, २१५
तुळजागिरी १५८, १५९
तुळाराम १५८
दयाकिसन कौल राजा १५
दसोंधाविबी १०
दस्तुर (बुवांचे शिष्य) २०४
दक्षिणदास ५०, ५६, ८०, ९२, १४४
दातार मास्तर १८६, १८८
दातार सुहास ३४
दाऊद (फै. म. चा पाळलेला मुलगा) ८५, ९७, १९२, ११४
दिवटेबुवा १७८, १८४
दीक्षितार ८३
दुनीचंद १४८
देव ५१
देवधर प्रो. १०, ६५
देवल क्लब १५३, २४८
देवल मास्तर ५९, ७६
देवल रा. सा. कृ. ब. १८९, २१५
देवस्थळी १०६
देशपांडे गुरुराव १६४, २४८

देशपांडे वामनराव ३४, १०७
देसाई गोविंदराव ८, २८, २९, २६०
द्रौपदी नाटक १९, १११, २३९, २४०, २४१
धामणकर ३, २१, ३३, ३४, २१६, २४६
धारवाड २९, ३९, ८९, १२९, १३०, १३८, १४६, १५२, १६२, १६३, १६४, १६५, १६६, १६८, १७०, १७२, १८५, १९३, १९४, १९६, १९७
धारवाड गायन समाज १८१
नथ्थनखां ८, १४, ३९, ४१, ८८, ८९, ११६, ११७, १२०, १२१, १२२, १२३, १२५, १२९, १३०, १३४, १३६, १३७, १३९, १४०, १४१, १४२, १४३, १४४, १४५, १४६, १४९, १५०, १५४, १५५, १५७, १६४, १९७, २०१, २१३, २२१
नथ्थन पीरबक्ष ८५, ८७, ८८
नझरखां १२८, १३३
नझरखां पखवाजी ८२
नाटेकर बाळकोबा २३, ५६, ५९, ६०, ६४, ६५, ७०, ७४, ७८, ९१, १४७, २१३, २२३
नाट्यनिकेतन १९९
नातू (गायन शाळा) १२४, १२५, १३१, १८१
नान्दणीकर दत्ताराम १३३
नाना शंकरशेट १२३
नॉर्थब्रूक लॉर्ड ८४
निगोजकर ८४, ८८, १०६, १०९
निसारहुसेन (बडे) ३५, ८२, १२८, २२१
नूतन संगीत ना. मं. २४२
पटवर्धन वासुदेवराव ३५, ३६
पटवर्धन विनायकबुवा ३, ४, २८, २९

परांजपे दत्तोपंत, २५०, २५२
पतियाळा नरेश १५
पाटणकर नरहरबुवा २०४, २५७
पाटणकर म. वा. २०४
पाठक ध्रुपदिये, १७८
पाध्ये गणपतबुवा ३५, ३६, ३७, ४८, १७८, २१५, २३५, २३६, २३७, २३८, २५७
पानसे नानासाहेब २३, ७०, ७२, ७५, १२४
पारिजात ( संगीत ) २१५
पिंगळेबुवा ५२, ५३, ५४
पिंगळेबुवांचा मुलगा १९२, २०४, २३०
पित्रे वकील २९, १०४, १२२, १२४, १२५, १६२, १६३, १६४, १६५, १६८, १९६, २४८, २४९, २५७, २५९
पुणें १, ३२, ३६, ३९, ४६, ४९, ५०, ६०, ११९, १३३, १५७, १६४, १७१, १७६, १८१, १८३, १८६, १९२, १९३, १९४, १९५, २००, २२४, २४९
पुणेकर १६५, १६६
पूना गायनसमाज १, १७४, १७८, १८१, २१५, २६०
पुराणिक शंकरराव २०४
पुरोहीत गणपतबुवा २८, १४६, १५१, १६०, १७१, १८४, १९२, १९५, १९६, २६०
पेटकर दत्तोबा ४६, २०४
पेडणेकर हिराबाई १२५, १४६, १७१
पेस्तनजी बोमनजी ४०
पंचाक्षरीबुवा ३५
पंजाबी गोपाळजी २२
पंढरपूरकर ( पित्रे यांचे गुरु ) १२४
पंढरपूरकर जगन्नाथबुवा १८, ४६, १७८, १९२, २००, २२५

पंढरपूरकर विश्वनाथ १८९, १९२, २०४
प्रमिला ( बुवांची कन्या ) २५९
प्रेमशोधन नाटक १७६
फडके प्रो. ना. सी. ८, १४, २५, ३५, २२०
फडके र. कृ. ( शिल्पकार ) ८, ९, १४, २५, २८, २६०
फतेह अलीखां ( करनेल साहेब ) १५
फतेह महंमद ( फै. म. खांचे वडील ) ८५
फत्तेसिंग ( बडोदा राजकुमार ) ५४
फिदाहुसेन ८२
फिल हार्मोनिक सोसायटी १८९, २१६
फुलंब्रीकर दत्तोबा १८७
फैज महंमदखां ४, ८, १४, १५, २३, ३५, ३६, ३९, ८२, ८४, ८५, ८६, ८७, ८८, ८९, ९०, ९२, ९३, ९४, ९५, ९६, ९७, ९८, ९९, १००, १०१, १०२, १०३, १०४, १०५, १०६, १०८, १०९, ११०, १११, ११२, ११३, ११४, ११५, ११६, ११७, ११८, ११९, १२०, १२१, १२६, १४०, १४८, १४९, १५०, १५४, १५५, १६६, १६७, १९३, २१०, २१३, २१४, २१९, २२०, २३५, २५९
फ्रेडलिस ८४
फैय्याजखां ८२, ८४, ८८, ८९, ११६, २०१,
बखले त्र्यंबकराव ४९, ५०, ५१, ५३, ६५, ६७, १२३, १४७
बखले भास्करबुवा – चरित्राच्या प्रत्येक पृष्ठावर
बखले नाना ५०
बखले यमुना ऊर्फ जानकी ४९, ६५, ६७, १२३
बखले रघुनाथराव ४९, ५१, ६५, ६६, ६७
बखले शिवराम ५०

बजाजशेट २२६, २२७
बडेबावा १०९
बडोदें २९, ३५, ३९, ४२, ४६, ४९, ५०, ५१, ६५, ८१, ८२, ८३, ८४, ८७, ८९, ९२, १००, १०४, १०५, १०६, १०८ १०९, ११०, ११२, ११३, ११५, ११६, ११८, ११९, १२०, १२१, १२२, १२३, १२७, १४१, १८१, १९३, २१३, २१९, २२०
बरवे गणपतराव १०६, २१४, २१८
बरवेबुवा परशुरामपंत १२४, १२५, १२६, १२७, १२८, १३४, १४५, १९६
बरवे बळवंतराव (पोष्टांतले) १४५, १४६, १९६, २३०, २५७
बर्कतुल्ला १३३, १५७, १६६
बल्लारी वकील १६५, १७०
बशीरखां १९१
बागलकोटकर दत्तोबा १८४, १८९, १९२, २०२, २०५
बापट बळवंत गोविंद १७१, १७८
बापट हरि बळवंत १७८
बापूतारा १२५, १२७
बाबलीबाई १३४, १३७
बाबूराव पोष्टर ४०
बामणगांवकर नारायणराव २३६, २३९
बाल गंधर्व (नारायण श्रीपाद राजहंस) २, ३, ४, १८, २०, २७, २९, ३०, ४६, ४७, ८२, १११, १५३, १७७, १७८, १८५, १९०, १९१, १९४, १९८, १९९, २००, २०५, २२४, २२५, २३२, २३३, २३९, २४०, २४१, २४३, २४४, २४५, २४६, २५९
बाली हरिश्चंद्र ९, १०, ३४,
बाळकृष्णबुवा (कै. म. चे शिष्य) ९९

बाळकृष्णबुवा इचलकरंजीकर ३, ४०, ४१, ४२, ७८, ८६, १३०, १७८, २२१, २३४, २५०, २५१, २५२, २५३, २६१

बिब्बेखां २२९

बेलबागकर ( देवस्थानवाले ) १७४

बेलबागकर रावजीबुवा १३१

बैजूबावरा २४

बोडस गणपतराव १७७, १९१

बंदे अलीखां २३, ३८, ७०, ७१, ७२, ७३, ७४, ७५, ७८, ८७, ९०, ९१, १२५, २१३, २२१

बंसी–रागमाला २१४

ब्रिजलाल पं. १०५, २०४, २३०

भट वा. ना. ३४

भटजीबापू १७८, १९१

भाई मोती ९

भागवत मुत्तय्या १४२

भागवत डॉ. विष्णूपंत १३३

भागवत शंकरराव २५०

भाटवडेकर गजाननराव, सरसुभे ५४, ५६, १२२

भाटवडेकर सर भालचंद्र १२२, १३०, १४१, १४२, १५५

भांडारकर सर रामकृष्ण १९०, २६२

भांडारे भाचूभाई १४३, २०४

भातखंडे पं. विष्णूपंत १३१, १८०, १८१, १८९, १९०, २१६, २१७, २३०

भारत गायन समाज, ३०, ३२, ३३, ३४, ७७, १०८, १४६, १७५, १८१, १८२, १८३, १८४, १८५, १८६, १८८, १८९, १९०, १९१, १९२, १९४, १९५, १९६,

१९७, २००, २०२, २०४, २१०, २११, २१८, २३७
भारत गौरव ग्रंथमाला ३२
'भारतीय संगीत' २१६
भिलवडीकर गणपतबुवा, १७८, १८६
भोपटकर सावकार ४९
भोसले केशवराव २२५, २४२, २४३, २४४, २४५, २४६
भोळे केशवराव ८, १६, २३, २५, २२०
मकरंद (नारद) २१४
मख्खनखां ८८
मजीदखां – बीनकार १५७
मंजीखां ३
मंडलीक वि. ना. १३०
मणेरीकर गणपतराव २८, १२४, १४७, १६०, १६२, १६३, १६४, १६५, १६८, १७१, १९७, २६०
मथुरावाले पखवाजी ८२
मदरासा हायस्कूल २३, ७०
मराठे रामभाऊ २९
मलंगखां, व पत्नी १०
मल्काजान २२१
महबूबखा १९९
महाजनी मार्तण्ड ७७
महात्माजी २७, ४०, २४३, २४७
महाराष्ट्र संगीत विद्यालय ३४
महम्मदखां (नथ्थनखां पुत्र) १३७, १४०, १४५, १४६, १५७, २३४
महम्मदबक्ष ८५
महाबळशास्त्री ५१, ५२, ७७
माई (बुवांची ज्येष्ठ कन्या) २३४, २५४, २५५

माकोडे २१४
माणिक प्रभु १५८
माणिकराव ८२
माधवराव सर व्ही. पी. १६६
मानकामे ७६
मानापमान १९, २०, २७, २८, १८२, १८७, २२४, २४२, २४३, २४४, २४५, २४६
मास्तर कृष्णराव २, ३, १७, १८, १९, २०, २८, २९, ३०, ३३, ३४, ४६, १२७, १८६, १८७, १८८, १८९, १९२, १९७, १९८, २०५, २२५, २३४, २५०, २५१, २५२, २५३, २५९
मायदेव २०४, २३०
माळवे, अनंत सखाराम २१४
मियाजान १५७, १९१, २२१
मीनाप्पा पं. ८२
मुजुमदार शंकरराव ५६, ५७, ५९, ६०, ७६
मुजुमदार सरदार २५०, २५२, २६०
मुझफ्फरखां तबलिये १३८
मुनशी नरहरराम २१४
मुबारकअल्ली १०, १६
मुरुडकर १८९, १९२
मुंबई २७, २८, ३०, ३३, ३६, ३९, ४१, ४२, ४६, ५०, ६०, ६५, ६६, ११५, ११८, १२०, १२१, १२२, १२३, १२७, १२८, १२९, १३०, १३१, १३३, १३४, १४३, १४४, १४५, १४८, १४९, १५६, १५७, १५९, १६४, १७१, १७२, १७३, १८०, १८७, १९२, १९३, १९४, १९६, २००, २२४, २३०
मैराळ ५१

मोज़ुद्दिनखां १५७, १९९
मौलाबक्ष ५५, ५६, ८२, ८३, ८४, ८८, ९०, ९२, ९४, ९५, ९७, १००, १०१, १०२, १०४, १०६, ११५, ११६, ११८, २१४
म्हाळसा नारायणीदेवी ४९, १७१
म्हात्रे गणपतराव ४०, १६८
म्हैसूर २८, ५६, १२९, १३०, १३५, १४२, १४३, १५८, १६६
येसू ( बुवांची द्वितीय कन्या ) २५९
रजबअलीखां १७
रघवीरदास ९९
रघुवीर पेण्टर, ३४, २५६
रत्नाकर ( संगीत ) १३१, २१४, २१५
रहमूबाई २०४
रहिमतखां ( जलतरंग ) १८४
रहिमत खां, १६, ४१, ८६, ८८, १२८, १३०, २२१, २४८, २४९, २६१
रागविलास २१४
राजहंस बापूराव ३०, ३५, १५३, १९२, २०४, २३०, २४०
राजाभैया पूंछवाले २९
रानडे न्यायमूर्ती ३९, १९०
रामचंद्र १२७
रामराज्य वियोग नाटक ५९, ६०, ७२, ७६
रामूभैया दाते १०
रावळदास २२७, २२८, २२९
रास्तेवाडा १
राहतअल्ली ८२
रेशिमवाले जनरल ७६
रेळे बाबसोबा १७३
रोकडनाथ ८८, १०६

रोमा रोलां ४०
ललित कलादर्श ना. मं. २४२, २४३, २४४
लक्ष्मीबाई–गायिका ८२
लक्ष्मीबाई–नर्तकी ८२
लाड्डू दादा तबलजी १७४
लेले पु. रा. ६१, २४५, २४६
लेले माधवराव २०४
लोकनाथ पंडित २१४
लोकमान्य २७, ३९, ४८, १९०, २०६, २४१, २५०
वझेबुवा (रामकृष्ण) ३, ३५, ३७, ४२, ८६, ९०, २२१, २३४, २३७, २३८, २४२, २४८, २४९, २६१
वसई १४९, १५०, १५१
वसईकर ग. भि. सनईवाले ८२
वाघोलीकर मोरोबा २३, ५६, ५९, ७०
वाटवे, हरिभाऊ (पेटी) १८८, १८९, १९५
वामनराव फिडलवाले १८४, १८९, १९२
वालावलकर गुंडोबा १४७, १७३, १८४, १८६, १८८, १८९, १९२, १९४, १९५, २४९
वासुदेवाचार्य १४२
विठ्ठलदास, द्वारकादास १५७
विद्याहरण १९, २२४, २४५
विलायतखां ३, २८, ८५, १३७, १३८, २०१, २५०
विष्णू दिगंबर १६४, १८०, १८२, २२१, २३४
वेदी–पं. दिलीपचंद्र ८, १०, १४, १५, ३४, १९२, २०१
व्यंकप्पा ८२
शाकुन्तल नाटक ५९, ७६
शांताराम नारायण १३०
शांता (बुवांची कन्या) २५९

शामराव विठ्ठल १२५
शारदा नाटक २४३
शास्त्री हॉल २५ १५३
शाहूमहाराज २५०
शिकारपूर १०, २८, २२६, २२७, २२८
शिरगुटकर शंकरराव २०४
शिरोडकर ताराबाई १७१, १९२, २०२, २०३
शीव गणेशोत्सव २५, २९
शंकरभय्या २९, ७७, १७४, १८४, २५७
श्री गोंदेकर २९, २६०
श्रीपाद संगीत समाज, १२७, १३३, १८१
संगीत ( मासिक ) ८७
संगीत कला विहार २७, ३६
संगीत दर्पण १३१
संगीतज्ञांचें संस्मरण ८५
समर्थ नामदार १७१
समर्थ रामदासस्वामी १११
सयाजीराव गायकवाड ५४, ५५, ८१, ८२, ८३, ९०, ९५, ९६, १००, ११३, ११६, १२२
सरदेसाई अनंतराव २५०
सरदेसाई गणपतराव १०१, ११७
सरदेसाई डॉ. दिनकरराव १०१, ११७
सरदेसाई नानासाहेब २९, ८३, १००, १०१, ११३, ११७
सरदेसाई श्यामकांत १०१, ११७
सवाई गंधर्व ३, ३५, ३७, १६८, १७६, १८६, १८७, १९४, १९५, २२५, २३७, २३८, २३९, २४०, २४२, २४३, २५०, २५१, २५३
सहस्रबुद्धे बळवंतराव ( पु. गा. स. ) २१५

सहस्रबुद्धे बळवंतराव (धारवाड) १६२, १६३, १६५, १७०, २१४, २१५
सप्रे शंकरराव १००, १०८
साजापुरकरबुवा १२४
साठे बंधु २३७, २३८
साठे मॅनेजर ६१, ६२, ७८, ७९
सातवळेकर श्री. दा. १६०
सातारा २७, २३५, २३६, २४६, २५९
डॉ. सांबारे १७२, १७३, २१६
सिंध २२, २०१, २५४, २५९
सुनरी जयशंकर १७६
सुलतानखां ८२
सुळे गोपाळराव १२५
सौभद्र नाटक ५९, ६४, ७६, ७७, १७७, १८७, २२३, २४३, २४६
स्वयंवर नाटक १९, २०, १५३, १९८, १९९, २००, २२४, २२५, २२६, २३०, २३२, २३३, २३९, २४१, २४२
सॅण्ढर्स्ट लॉर्ड व लेडी १४२
हकीमसाहेब (बडोदें) ११५
हकीमसाहेब (मुंबई) ११५
हर्डीकर नाना १३३, १४५, १४[illegible]
हद्दखां ८५, ८८, ९७
हरिदासस्वामी २४
हरिवल्लभगीर १५८
हंसाबाई (पटवर्धन) [illegible], ८८, १०६, ११२, २१०
हस्सू खां ८५, ८८, ९७
हैदरखां २३१
होळकर ७०, ७१, ७२
क्षीरसागर पांडोबा १०३, १०४, १५६, १६०
व्हिक्टोरिया थिएटर ६६

REFBK-0016049